# व्यक्तिमत्व विकास

## दिवाळी अंक 2024



शुभ दिपवाली



... संपादक ...

**श्री. मंगेश विठ्ठल कोळी**

# वर्ष : 9

स्वागत मूल्य : 300/- ई-अंक

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**साप्ताहिक**
व्यक्तिमत्व विकास

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**संपादक -**
श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**अतिथी संपादक -**
डॉ. सुनिल दादा पाटील.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**अक्षर जुळणी -**
कवितासागर फीचर्स, जयसिंगपूर

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**विशेष सहाय्य -**
श्री. अमोल कोळी.
श्री. राज धुदाट.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

या अंकात छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# शुभ दिपावली

## ...विशेष आभार...



**- प्रेरणास्थान -**
**श्री. विठ्ठल आप्पा कोळी.**

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-



**- मार्गदर्शक -**
**श्री. निशिकांत परचंडराव.**
(मुख्याधिकारी तथा प्रशासक शिरोळ नगरपरिषद, शिरोळ)

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-



**- मुखपृष्ठ -**
**श्री. अमोल लाटणे.**

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

व्यक्तिमत्व विकास
Personality Development

आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटना
सदस्य
Member
International Diwali Ank Association

# ...अंतरंग...


- आदर्श जीवनशैली../ डॉ. सुनील दादा पाटील../08
- मुलांना कसे वाढवावे../ सौ. पुष्पा प्रभुदेसाई../11
- तारुण्य../स्नेहल शिंदे../13
- हुंदका../ विशाल मोहोड../14
- हृदयी ठेवीन../ मोहन सोनवणे../15
- रंगा कारभारी../ चंद्रकांत पाटील../16
- आयुष्यावर बोलू काही../ सौ.रोहिणी पराडकर../19
- गोधडी../ सौ.उज्वला ढमढेरे../20
- पालकत्व../ अर्चना पाटील../21
- श्रावणधार../ सूर्यकांत घिवारे../25
- गझल../ अमोल गोंडचवर../25
- दबलेल्या हुंदक्यांचा प्रवाह..!/ नितेश खरोले../26
- आयुष्य आहे अनमोल../ सौ. कविता अजय दाते../27
- तो आला रंगमंचावर../ उमेश लक्ष्मण परवार../27
- तरुणांची सामाजिक जबाबदारी../ सुतेजा दांडेकर../28
- स्त्री शक्ती../ श्रावणी योगेश जाधव../30
- बालपण दे गा देवा../ सौ. भारती दिलीप सावंत/31
- अन्नदाता../ प्रकाश बनसोड../33
- आंबा../ कु.वैष्णवी जामदार../33
- पाश्चात्यांचं अनुकरण../ अंकुश शिंगाडे../34
- चांदनी../ कल्पना दिलीप मापूसकर../36
- मनपाखरं../ आनंद देशमुख../37
- हंगाम../ सौ. कीर्ती विजय लंगडे../37
- आठवण एक दिलासा../ किशोर त्रींबक भालेराव../38
- पण सईच्या मनाची..!/ शशी त्रिभुवन../40
- कशी पेटवू रे वात ?../ श्री. वासुदेव खोपडे../40
- ती परत पहिलीत जातेय.../ एकता संकपाळ../41
- या वळणावर../ सौ.विद्या निनावे../44
- दवबिंदू../ सय्यद चाँद तरोडकर../46
- औदार्य../ भानुदास धोत्रे../46
- उंच तिचा झोका../ ज्योती हलगेकर-जाधव../47
- वाढदिवसाला वाढते../ सोहनी पुरनाळे../50
- आव्हानांना देऊ टक्कर../ कविता झुंजारराव../52
- मानसिक आरोग्य../ निलेश दिगंबर तुरके../52
- प्रेरणा../ सौ.वीणा मुळे../53
- बाकी त्यांच्याविणा वीट../ गणेश भाकरे../55
- पाठीराखा../ प्रा.सौ.सुमती पवार../55
- नात्यांची क्षीतीजरेषा!../ रवींद्र जवादे../56
- सोयरीक जुळव बघ.../ कु. प्रियांका सूर्यवंशी../57
- सयंमाचा महामेरू../ सौ.सपना पवार../58
- बाप../ जयराम मोरे../59
- लेक सावित्रीची!../ भास्कर बंगाळे../60
- लक्ष्मी आणि सरस्वती../ रामदास राजेगांवकर../63
- बालमनाचा शोध../ प्रा.भरत खैरकर../64
- जरा ऐका../ वैदेही आठल्ये../65
- मुलांचे खेळ घेत असता../ राधिका भांडारकर../66
- प्रेम म्हणजे../ विवेक द.जोशी../67
- सूर्य मी दिंगताचा../ वल्लभ दास../67
- तिमिरातून तेजाकडे../ सौ.प्रज्ञा घोडके../68
- लक्ष्मीची आरती../ श्रीमती पद्मजा कुलकर्णी../69
- पाऊस../ सौ.अनिता सातारकर../70
- नवख्या ठिकाणी../ मेघा रामचंद्र गोळे../71
- समाजमनासाठी स्वमन बदलणे../ आनंद घोडके../72
- वेदना../ प्रा. राजाराम बनसकर../73
- पुतळा../ प्रा. कमलाकर हणवंते../74
- मी आणि माझी सौ../ श्री. उद्धव भयवाळ..75
- मन शुद्ध तुझं../ अनुराधा जोशी../76
- तू../ डी.एन.मोरे,खैरकेकर../77
- विधा../ कुंदन पाटील../78
- डिटॅचमेंट../ डॉ. शैलजा करोडे../79
- नातं तुझं नि माझं../ डॉ. सौ. ज्युबेदा तांबोळी../81
- विंदांच्या कवितांच्या गावा../ सौ.ऋतुजा गवस../82
- सामर्थ्य लेखणीचे../ डॉ. मंदा पडवेकर../83
- मुलीचा जन्म../ विजया पाटील../84

# व्यक्तिमत्त्व विकास दिवाळी अंक 2024


- वंशाचा दिवा../ संजय अरबट../85
- भाऊ माझा पाठीराखा../ मंगेश रेडीज../87
- वाङ:मय क्रांती../ श्रीशैल चौगुले../87
- निर्णय../ जयंत गणपतराव कोपर्डेकर../88
- या भारत देशा../ शुभम येरुणकर../89
- प्रजासत्ताक../ सौ. स्वाती कोरगावकर../90
- वासनेचा बळी../ राहुल भोसले../91
- तिरंगा../ उषा जोईल../92
- निसर्गातील ऊर्जा../ सुनिता वैद्य../92
- भीक नको पण../ सौ. विद्या शैलेंद्र गोवर्धन../93
- आम्ही नसतो तर../ राकेश खलासने../94
- मन मुसाफर../ रघुनाथ मोहिते../94
- खाकी वर्दीतला निसर्गप्रेमी../ सुमित आर राठोड../95
- गृहिणी../ हेमंत मुसरीफ../96
- एक घर../ मितवा श्रीवास्तव अग्रवाल../96
- सावलीतलं रोप../ अंजली राठोड../97
- प्रश्न../ सतीश पुंडलिक नवघरे../103
- आई../ श्री.श्रीकांत म. शिरभाते../104
- मन../ बाळ झोडगे../104
- बाप नावाचे आभाळ../ प्रा.धनाजी बुटेरे../105
- आनंद बिंदू../ श्री.कलानंद जाधव../106
- कृष्णाची रुपे../ भारती थोरात../107
- मेलेली नजर../ डॉ. शशिकांत गंगावणे../107
- सण उत्सव आणि संस्कृती../ प्रा. प्रविण बोंद्रे../108
- बुद्धाची शिकवण../ श्री. रवींद्र चालीकवार../110
- विरह../ सौ. अपूर्वा पाटील../110
- वन्यजीव शास्त्रज्ञ../ सौ. रश्मी पिंप्रीकर../111
- शिकून घे../ श्री. का.रा.चव्हाण../112
- स्त्रीचे अंतर्मन../ प्रा. मनीषा नाडगौडा../113
- मैत्री../ श्रीमती संध्याराणी जयहिंद कोल्हे../114
- खरी भेट../ सौ. स्नेहा मुसरीफ../115
- पथ तरात्म्याचा../ डॉ.सुनिता चव्हाण../116
- निसर्ग../ डॉ. जी. आर. प्रविण जोशी../117
- जात../ सुधा पाटील../120
- दीपोत्सव../ ऋचा पत्की../120
- सुखाची चावी../ किशोर कासारे../121
- कविता../ प्रा. नरेंद्र गुंडेली../122
- बेटा../ विनोद जाधव../122
- पुनरागमन../ सौ.जया सुधाकर पाटील../123
- ताजमहल../ विजय शेळके../125
- नित्या बहार../ शशांक दिनकरराव देशमुख../125
- अब्राहम लिंकन../ प्रशांत हरीचंद्र शेंडे../126
- भारतीय संविधान../ दीपक तळवडेकर../127
- उचकी../ सौ. सुरेखा सुरेश हरपाळे../127
- पाय आणि वाटा../ सचिन वसंत पाटील../128
- बाईपण../ वर्षा झांबरे../130
- यशोगाथा../ प्रवीण काळे../130
- या झोपडीत सुद्धा../ प्रशांत नामदेवराव ढोले../131
- माणुस विणतो मी../ देवेंद्र औटी../133
- आरसा../ सौ.रुपाली लटके (लंबे)../133
- फराळ../ दीपक सोनवणे../134
- थोड्यात गोडी राहते../ नरेंद्र अ. वाकोडे../135
- डोंगर../ डॉ.ज्योती कदम../136
- थकते बऱ्याचदा आई../ प्रा. शशी बारी../136
- स्त्रीचे सामाजिक अस्तित्व../ सौ.विजया भांगे../137
- व्यथा समजली नाही../ विश्वजीत अनंत जगताप../139
- हे देवी शारदे../ उमा पाटील../139
- बुद्धांची शिकवण../ सौ. विद्या मलवडकर../140
- व्यसन../ गंगा सपकाळे../141
- स्त्री../ शांतीलाल ननवरे../141
- समर्थ आणि स्वराज्य../ राहुल बोर्डे../142
- गझल../ प्रीती तडस वाडीभस्मे../144
- स्वत:ला ओळख../ ॲड.अंश श्रीकांत खलिपे../144
- संवाद असावा नेटका../ राजेंद्र चुत्तर../145
- कशातही न गुंतता../ श्रेयस रविंद्र लहामगे../146
- वेलझुंबर../ नागरत्ना कुरतरकर../147
- वरदान../ शितल मोहोळकर../147
- रहें ना रहें हम../ डॉ. मीना श्रीवास्तव../148
- पोळ्याचा सण../ शिवाजी नामपल्ले../151
- अंबानगरीचे वैशिष्ट्ये../ नागनाथ पाटलोबा बडे../151

# व्यक्तिमत्त्व विकास दिवाळी अंक 2024


- देव माणूस../ शरद यशवंत नवाळे../152
- वेड मैत्री जपण्याचे../ उमेश प्रकाश साळुंके../155
- भाषा../ सौ.नीलम आफळे../156
- मनातील भावना../ कु. छाया उंब्रजकर../157
- पानगळ../ सौ. अर्चना प्र. निकारंगे../158
- उठा उठा चोर आले../ शंतनु वि. गौतम../159
- एकमेव सत्य../ रामानंद तारी../161
- विठ्ठल सावळा../ सौ. गीता नरेश रत्नाडे../161
- राजकुमार आणि फुल../ नितिन विनायक म्हात्रे../162
- आत्मविश्वास../ सौ.कल्पना तांबट../163
- भिंती../ महेंद्र ताजणे../163
- सल../ संगीता देवकर../164
- हायकू../ तुकाराम खिल्लारे../167
- तूच तुझी../ स्वप्नाली कोरे../168
- विठ्ठला../ संजीवनी काळे../168
- ऋतूगंध पाऊस../ संगीता कुलकर्णी../169
- लेकरांनो../ विलास मोरे../170
- प्रेरणा : नवा उजेड../ चारुशीला बिडवे../171
- आध्यात्म हेच ना?../ अनिल वामोरकर../171
- पदर../ रफिक इनामदार../172
- जातं../ सौ. बालिका बरगळ-वसमतकर../174
- अनुभव एक सत्य../ केतकी अनिल सुतार../174
- मी खरंच मराठी?../ ज्योती जयंतराव आळंदकर../175
- आली दिवाळी../ सौ.स्वाती रामचंद्र कोरे../176
- ढगांची अनोखी सफर../ अमोलजी पाटील../177
- दर्शनाचा जन्म../ सुभाष धाराशिवकर../177
- व्रण../ मयुरेश अरुण कुलकर्णी../178
- अर्धांगिनी../ अरविंद कुळकर्णी../182
- ईना मिना डिका../ अरुणभाऊ धर्माळे../183
- दिवाळी../ डॉ.सौ.निर्मला भामोदे../183
- अनोखा डाव../ अनुराधा पोतनीस../184
- गृहलक्ष्मी../ बाळासाहेब गिरी../187
- जगू आनंदी../ डॉ. राजेश जोशी../187
- थांब सूनबाई../ डॉ.शीतल शिवराज मालुसरे../188
- औक्षवंत भाऊ../ डॉ. प्रभाकर शेळके../190
- एकट चालावं../ ॲड. स्वप्नील जगताप../191
- सदाचारी झाडं../ दिगंबर कानोले../191
- मशागत हवी तनां-मनांची../ प्रा.आनंद कदम../192
- भावना../ सौ. पुष्पा कदम../193
- तांका../ प्रकाश पोळ../194
- बहाणे../ डॉ.अशोक काळे../194
- परीक्षा../ हरिष जाधव (वागळुदकर)../195
- आठवण येताच तुझी../ अरुण वि.देशपांडे../197
- मराठी../ चंद्रभारती आसडी../197
- सकारात्मकता../ सौ. मनीषा चिंतामणी आवेकर../198
- दुनिया आता../ संजय मुकुंदराव निकम..199
- नवी वाट स्वप्नांची../ सौ.संगीता एखंडे../200
- माणुसकीन जगायचं../ ॲड.संगिता केंजळे../200
- स्वीट रिव्हेंज../ महेश भा. रायखेलकर../201
- अभिवादन../ हरिबा महादेव कोळी../202
- श्री स्वामी समर्थ../ सौ.मनिषा पिंटू वराळे../203
- का टाळतोस../ सौ. राजश्री संजय जाधव../203
- जीवन अपूर्णत्व../ सौ. सुस्मिता रेंदाळकर../204
- पंख../ प्रा. सौ. वर्षा विलास कावरे../205
- दो आँखे बारह हाथ../ मीना खोंड../206
- स्वप्नातले घर../ उज्वला सहस्त्रबुद्धे../207
- आत्मनिर्भर../ सौ. अर्चना पाटील../208
- देहे दु:ख तें../ अतुल ठाकरे../209
- दिवाळी सण खास../ सौ. प्रज्ञा सचिन देशपांडे../211
- आई बाप../ डॉ. मधुकर हुजरे../211
- देवघराची फुले../ डॉ. राणी दुष्यंत खेडीकर../212
- विषम../ मेधा फडके-मराठे../213
- अण्णाभाऊ साठे../ किशोर देऊ कदम../214
- समाधान../ चैताली स्वप्निल प्रभुदेसाई../215
- नकोशी../ अशोक गंगाराम सावंत../216
- बांधावरचं झाड../ प्रथमेश भिमराव कुंभार../218
- राधा../ सौ.मीना घोडविंदे../218
- माणुसकी जपताना../ सौ. किशोरी पाटील../219
- गरिबांची दिवाळी../ संतोष किसन शिरावले../221
- अंतरंग../ संदीप मोकळे../222

- शब्द माझे काव्य गीत../सौ. मंगला रोकडे../223
- हर्ष पेरूनी विश्वात../ प्रा.विलास गायकवाड../223
- झोप../ प्रमोद वामन वर्तक../224
- पळस../ जावेद शेख../226
- संसाराची दावण../ शहादेव पा. सुरासे../226
- प्रेरणेस कारण की../ आसावरी ऐनापुरे../227
- नवख्या ठिकाणी../ मेघा रामचंद्र गोळे../228
- खेळ../ भूषण सहदेव तांबे../228
- माझा वेळ माझा हक्क../ नीता क्षीरसागर../229
- स्वातंत्र्याचे मोल समजले का?../ प्रा.प्रशांत शिरुडे./230
- विठू माझा सावळा../ श्री.युवराज गोवर्धन जगताप./233
- आनंद तरंग../ संजय धनगव्हाळ../234
- दृष्टिकोन../ सुमन ज्ञानदेव जाधव../237
- अनेक किती../ श्रीमती नीला पाटणकर../238
- तुमचं काय चाललंय सर../ प्रा. सचिन कोरोचीकर./239
- बिट्विन द लाईन्स../ अशोक चाफे../240
- शब्दांकन../ हसीना सुतार../243
- मी खरा गर्भश्रीमंत../ श्रीनिवास शेंडे../244
- एल्गार../ प्रा. स्वाती पाटील../245
- हार कधी ना मानेन मी../ प्रा. अरुण पाटील../247
- मी रणरागिणी../ सौ. भारती देशपांडे राजे../248
- मनाने श्रीमंत होवू या../ प्रियंका राजेश डेरे../252
- मनुष्य स्वभावाची पारख../ कर्नल. आनंद बापट../254
- सवड मिळेल तेव्हा तरी../ मुग्धा टेंगशे../256
- एक कवडसा../ श्री. काशिनाथ भारंबे../257
- पायगुण../ जयश्री देशकुलकर्णी../260
- कसं जमत नाही../ डॉ. अविनाश भोंडवे../264
- द मदर../ श्री.बाळासाहेब झोडगे../269
- ऐश्वर्या../ श्री.शामराव सुतार../272
- आर्टिफिशियल इंटेलिजन्स../ अभिषेक ठमके../278
- तू नसताना मी../ सौ. वंदना धर्माधिकारी../282


शुभ दिपावली



# व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंकास
# उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार प्रदान

- कोल्हापूर

दिवाळी अंक स्पर्धा २०२० चा निकाल जाहीर 'आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटना' आणि 'आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संग्रहालय' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या दिवाळी अंक स्पर्धा २०२० चा निकाल प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर नुकताच जाहीर करण्यात आला आहे.




राज धुदाट यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रत्येक वर्षी साजरा होणारा पुरस्कार वितरण सोहळा आणि दिवाळी अंकांच्या संपादकांचे एक दिवशीय विशेष अधिवेशन यावर्षी आयोजित केले जाणार नाही.

यास्तव दिवाळी अंक पुरस्काराचे प्रमाणपत्र भारतीय टपालाच्या द्वारे पुरस्कार प्राप्त दिवाळी अंकांना पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला; तसेच यावर्षी झालेल्या प्रदीर्घ जागतिक लॉकडाऊन आणि सामाजिकदृष्ट्या निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे दिवाळी अंक २०२० च्या निकालास विलंब लागला. मात्र सालाबादाप्रमाणे या वर्षीसुद्धा दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

११२ वर्षांची दिवाळी अंक परंपरा ही खास मराठी अभिरुचीचे प्रतीक आहे. दिवाळी अंकाची ही परंपरा वेगळ्या धाटणीत सुरु ठेवण्याचं काम आम्ही आनंदाने करत आहोत. ही परंपरा पुढेही अशीच सुरु राहील. अशी माहिती आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटनेचे कार्यकारी संचालक डॉ. सुनील दादा पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

# आदर्श जीवनशैली



भारतीय एकत्र कुटुंब पद्धती: आदर्श जीवनशैली असून ही पद्धती आपल्या समाजात अनेक वर्षांपासून प्रचलित आहे आणि यात अनेक सकारात्मक गुण आहेत.

एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये, एकाच छताखाली अनेक पिढ्यांचे सदस्य एकत्र राहतात. यात वडीलधाऱ्यांपासून ते नातवंडे पर्यंत सर्वजण असतात. या पद्धतीचे अनेक फायदे आहेत.

सामाजिक बंधन: एकत्र कुटुंबात, कुटुंबातील सर्व सदस्यांमध्ये खूप घट्ट नाते असते. एकमेकांना मदत करणे, सांभाळणे आणि प्रेम देणे ही या पद्धतीची खासियत आहे.

सांस्कृतिक मूल्ये: एकत्र कुटुंबात, भारतीय संस्कृतीचे मूल्ये जपली जातात. धार्मिक सण, उत्सव आणि परंपरा यांचे पालन करण्यात येते.

आर्थिक स्थिरता: एकत्र कुटुंबात, आर्थिक जबाबदारी सर्व सदस्यांमध्ये वाटली जाते. यामुळे कुटुंबाची आर्थिक स्थिती मजबूत होते.

वृद्धांची काळजी: वृद्धांची काळजी घेणे ही एकत्र कुटुंबाची मोठी जबाबदारी असते. त्यांना प्रेम, आदर आणि सुरक्षा दिली जाते.

बालवस्था विकास: मुलांचा विकास एकत्र कुटुंबात चांगल्या प्रकारे होतो. त्यांना मोठ्यांच्या मार्गदर्शनातून चांगली संस्कार मिळतात.

**आदर्श जीवनशैली का?**

एकत्र कुटुंब पद्धती एक आदर्श जीवनशैली म्हणून पाहिली जाऊ शकते कारण:

मानसिक शांती: एकत्र कुटुंबात राहून आपल्याला मानसिक शांती मिळते. कुटुंबातील सदस्यांच्या प्रेमात आपण सुरक्षित वाटतो.

सामाजिक समर्थन: कोणत्याही कठीण परिस्थितीत, कुटुंबातील सदस्य आपल्याला मदत करण्यासाठी तयार असतात.

जीवनाचा अर्थ: एकत्र कुटुंबात राहून आपल्याला जीवनाचा खरा अर्थ समजतो. आपण एकमेकांसाठी असतो आणि एकमेकांना आधार देतो.

आजच्या काळात एकत्र कुटुंब

आजच्या काळात, एकत्र कुटुंब पद्धती कमी होत चालली आहे. कारण, लोक स्वतंत्रपणे राहण्याकडे अधिक झुकत आहेत. तरीही, अनेक लोक या पद्धतीचे महत्त्व समजून घेत आहेत आणि ते पुन्हा एकदा लोकप्रिय होत आहे.

एकत्र कुटुंबातील काही आव्हाने:

जगण्याची जागा: एकत्र कुटुंबात, सर्व सदस्यांसाठी पुरेशी जागा नसल्याची समस्या उद्भवू शकते.

मतभेद: अनेक लोकांच्या एकत्र राहण्यामुळे मतभेद होणे स्वाभाविक आहे.

स्वातंत्र्य: एकत्र कुटुंबात, आपल्याला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची संधी कमी असते.

भारतीय एकत्र कुटुंब पद्धती आपल्या संस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. या पद्धतीचे अनेक फायदे आहेत आणि ही एक आदर्श जीवनशैली म्हणून पाहिली जाऊ शकते. आजच्या काळात, या पद्धतीतील काही आव्हाने असले तरी, आपण या पद्धतीचे महत्त्व समजून घेतले पाहिजे आणि ते जपले पाहिजे.

एकत्र कुटुंब आणि आजचे युग: बदलती परिस्थिती

आजच्या धकाधकीच्या जगात, एकत्र कुटुंब पद्धती कमी होत चालली आहे. याचे अनेक कारणे आहेत:

न्यूक्लियर कुटुंबाकडे झुकाव: आजकाल, बहुतेक लोक स्वतंत्रपणे राहण्याकडे अधिक झुकत आहेत. स्वतःचे घर, स्वतःचे निर्णय आणि स्वतःची जबाबदारी घेण्याची इच्छा ही यामागचे प्रमुख कारणे आहेत.

शहरीकरण: शहरांमध्ये राहण्याची जागा कमी असते. त्यामुळे अनेकदा एकाच छताखाली अनेक पिढ्यांचे सदस्य राहणे शक्य होत नाही.

कामकाजी महिला: आजकाल महिलांनाही पुरुषांबरोबरच करिअर करायचे असते. त्यामुळे त्यांना स्वतःचे घर सांभाळण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही.

आधुनिक जीवनशैली: आजच्या काळात, लोक आधुनिक जीवनशैलीकडे अधिक आकर्षित होतात. त्यांना स्वतःचे व्यक्तिगत जीवन जगायचे असते.

एकत्र कुटुंबाचे फायदे आजही प्रासंगिक

या बदलांच्या पार्श्वभूमीवरही, एकत्र कुटुंबाचे फायदे आजही प्रासंगिक आहेत:

सामाजिक समर्थन: आजच्या स्पर्धात्मक जगात, एकत्र कुटुंब आपल्याला मानसिक आधार देऊ शकते.

वृद्धांची काळजी: वृद्धांची काळजी घेणे ही एकत्र कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.

बालवस्था विकास: मुलांचा विकास एकत्र कुटुंबात चांगल्या प्रकारे होतो. त्यांना मोठ्यांच्या मार्गदर्शनातून चांगली संस्कार मिळतात.

सामाजिक बंधन: एकत्र कुटुंबात, कुटुंबातील सर्व सदस्यांमध्ये खूप घट्ट नाते असते.

आजच्या काळात एकत्र कुटुंब कसे टिकवू शकतो?

आजच्या बदलत्या परिस्थितीत, एकत्र कुटुंब टिकवणे आव्हानपूर्ण आहे. परंतु, काही गोष्टी करून आपण एकत्र कुटुंबाचे महत्त्व जपू शकतो:

संचार: कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकमेकांशी खुलेपणाने संवाद साधला पाहिजे.

समाधान: कुटुंबात कोणताही मतभेद झाला तर त्याचे शांतपणे निराकरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

समायोजन: प्रत्येक सदस्याने एकमेकांच्या गरजा समजून घेतल्या पाहिजेत आणि त्यानुसार स्वतःला समायोजित केले पाहिजे.

आधुनिकता आणि परंपरांचे संतुलन: आपण आधुनिक जीवनशैली स्वीकारण्यासोबतच आपल्या संस्कृतीचे मूल्येही जपली पाहिजेत.

एकत्र कुटुंब पद्धती आपल्या संस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. आजच्या काळात, या पद्धतीतील काही आव्हाने असले तरी, आपण या पद्धतीचे महत्त्व समजून घेतले पाहिजे आणि ते जपले पाहिजे. एकत्र कुटुंब आपल्याला मानसिक शांती, सामाजिक समर्थन आणि जीवनाचा खरा अर्थ देऊ शकते.

एकत्र कुटुंबातील मुलांचे पालन

एकत्र कुटुंबात मुलांचे पालन हा एक अद्वितीय अनुभव असतो. या पद्धतीत मुलांना विविध पिढ्यांच्या लोकांशी संवाद साधण्याची, त्यांच्याकडून शिकण्याची आणि त्यांच्या प्रेमात वाढण्याची संधी मिळते.

एकत्र कुटुंबात मुलांचे पालन करण्याचे फायदे:

विविध दृष्टिकोन: एकत्र कुटुंबात मुलांना विविध व्यक्तींचे विचार, अनुभव आणि दृष्टिकोन समजून घेण्याची संधी मिळते. यामुळे त्यांच्यात सहिष्णुता, आदर आणि खुलेपणा वाढतो.

सामाजिक कौशल्य: एकत्र कुटुंबात मुलांना लहानपणापासूनच विविध लोकांशी संवाद साधण्याची संधी मिळते. यामुळे त्यांच्यात चांगली सामाजिक कौशल्ये विकसित होतात.

संस्कृतिक मूल्ये: एकत्र कुटुंबात मुलांना आपल्या संस्कृतीची मूल्ये, परंपरा आणि रीतिरिवाज शिकण्याची संधी मिळते.

भावनिक सुरक्षा: एकत्र कुटुंबात मुलांना अनेक लोकांचे प्रेम आणि काळजी मिळते. यामुळे त्यांना भावनिक सुरक्षा वाटते.

जबाबदारी: एकत्र कुटुंबात मुलांना लहानपणापासूनच काही जबाबदारी घेण्याची संधी मिळते. यामुळे त्यांच्यात स्वावलंबन आणि आत्मविश्वास वाढतो.

एकत्र कुटुंबात मुलांचे पालन करताना येणारे आव्हान:

विविध मत: एकत्र कुटुंबात मुलांच्या पालनाबाबत विविध सदस्यांचे वेगवेगळे मत असू शकतात. यामुळे पालकांना कधीकधी गोंधळात पडावे लागू शकते.

स्पर्धा: मुलांमध्ये एकमेकांशी स्पर्धा होऊ शकते.

अधिक लोक: एकत्र कुटुंबात अधिक लोक असल्याने मुलांना वैयक्तिक लक्ष कमी मिळू शकते.

एकत्र कुटुंबात मुलांचे पालन कसे प्रभावी बनवता येईल?

स्पष्ट संवाद: मुलांना आपले विचार स्पष्टपणे सांगण्याची संधी द्या.

नियम: कुटुंबात काही नियम असले पाहिजेत जे सर्व सदस्यांना पाळावे लागतील.

समानता: सर्व मुलांना समान प्रेम आणि काळजी द्यावी.

स्वातंत्र्य: मुलांना स्वतःचे निर्णय घेण्याची संधी द्या.

शिक्षण: मुलांना चांगले शिक्षण द्यावे.

एकत्र कुटुंबातील मुलांचे पालन हा एक सुंदर अनुभव असू शकतो. यासाठी पालकांनी थोडीशी मेहनत घेतली तर मुले चांगली आणि संस्कारी बनू शकतात.

एकत्र कुटुंबात मुलांचा भावनिक विकास

एकत्र कुटुंबात मुलं मोठं होताना त्यांना विविध पिढ्यांच्या लोकांशी संवाद साधण्याची, त्यांच्याकडून शिकण्याची आणि त्यांच्या प्रेमात वाढण्याची संधी मिळते. यामुळे त्यांचा भावनिक विकास चांगल्या प्रकारे होतो.

एकत्र कुटुंबामुळे मुलांचा भावनिक विकास कसा होतो?

सुरक्षित वातावरण: एकत्र कुटुंबात मुलांना अनेक लोकांचे प्रेम आणि काळजी मिळते. यामुळे त्यांना भावनिक सुरक्षा वाटते.

आत्मविश्वास: एकत्र कुटुंबात मुलांना लहानपणापासूनच काही जबाबदारी घेण्याची संधी मिळते. यामुळे त्यांच्यात स्वावलंबन आणि आत्मविश्वास वाढतो.

सामाजिक कौशल्य: एकत्र कुटुंबात मुलांना लहानपणापासूनच विविध लोकांशी संवाद साधण्याची संधी मिळते. यामुळे त्यांच्यात चांगली सामाजिक कौशल्ये विकसित होतात.

सहिष्णुता: एकत्र कुटुंबात मुलांना विविध व्यक्तींचे विचार, अनुभव आणि दृष्टिकोन समजून घेण्याची संधी मिळते. यामुळे त्यांच्यात सहिष्णुता, आदर आणि खुलेपणा वाढतो.

भावनिक बुद्धिमत्ता: एकत्र कुटुंबात मुलांना आपल्या भावना ओळखण्याचे आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याचे शिकायला मिळते.

एकत्र कुटुंबात मुलांचा भावनिक विकास कसा अधिक चांगला करू शकतो?

स्पष्ट संवाद: मुलांना आपले विचार स्पष्टपणे सांगण्याची संधी द्या.

व्यक्तिगत लक्ष: प्रत्येक मुलाला वैयक्तिक लक्ष द्या.

प्रोत्साहन: मुलांच्या प्रत्येक यशासाठी त्यांना प्रोत्साहन द्या.

समस्या सोडवणे: मुलांना समस्या स्वतःच सोडवण्याची संधी द्या.

भावनिक आधार: मुलांना कठीण परिस्थितीत भावनिक आधार द्या.

एकत्र कुटुंबात मुलांचा भावनिक विकास करण्यातील काही आव्हान:

विविध मत: एकत्र कुटुंबात मुलांच्या पालनाबाबत विविध सदस्यांचे वेगवेगळे मत असू शकतात.

स्पर्धा: मुलांमध्ये एकमेकांशी स्पर्धा होऊ शकते.

अधिक लोक: एकत्र कुटुंबात अधिक लोक असल्याने मुलांना वैयक्तिक लक्ष कमी मिळू शकते.

एकत्र कुटुंबात मुलांचा भावनिक विकास होण्यासाठी पालकांनी थोडीशी मेहनत घेतली तर मुले भावनिकदृष्ट्या मजबूत आणि आत्मविश्वासपूर्ण बनू शकतात. एकत्र कुटुंब आणि मानसिक स्वास्थ्य यांच्यातील संबंध खूप जटिल आणि मनोरंजक आहे. एकत्र कुटुंब हे आपल्या समाजातील एक महत्त्वपूर्ण संस्था आहे आणि याचा आपल्या मानसिक आरोग्यावर खूप प्रभाव पडतो.

एकत्र कुटुंब आणि मानसिक स्वास्थ्य: सकारात्मक प्रभाव

भावनिक सुरक्षा: एकत्र कुटुंबात मुलांना अनेक लोकांचे प्रेम आणि काळजी मिळते. यामुळे त्यांना भावनिक सुरक्षा वाटते आणि त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

सामाजिक समर्थन: कठीण काळात एकत्र कुटुंब आपल्याला भावनिक आधार देऊ शकते.

सकारात्मक मनोवृत्ती: एकत्र कुटुंबात सकारात्मक वातावरण निर्माण होऊ शकते जे आपल्याला आनंदी आणि समाधानी राहण्यास मदत करते.

जीवनाचा अर्थ: एकत्र कुटुंब आपल्याला जीवनाचा खरा अर्थ समजून घेण्यास मदत करते.

वृद्धांची काळजी: वृद्धांची काळजी घेणे ही एकत्र कुटुंबाची मोठी जबाबदारी असते. यामुळे आपल्याला समाधान आणि आनंद मिळतो.

एकत्र कुटुंब आणि मानसिक स्वास्थ्य: नकारात्मक प्रभाव

दाब: एकत्र कुटुंबात अनेक लोकांच्या अपेक्षा असतात. यामुळे आपल्यावर मानसिक दबाव येऊ शकतो.

मतभेद: एकत्र कुटुंबात अनेक लोकांच्या एकत्र राहण्यामुळे मतभेद होणे स्वाभाविक आहे. यामुळे तणाव आणि चिंता वाढू शकते.

गुंतवणूक: एकत्र कुटुंबात आपले व्यक्तिगत जीवन कमी होऊ शकते.

स्वातंत्र्याचा अभाव: एकत्र कुटुंबात आपल्याला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची संधी कमी असते.

एकत्र कुटुंब आणि मानसिक स्वास्थ्य: आजच्या काळात

आजच्या काळात जीवनशैली बदलत आहे. यामुळे एकत्र कुटुंब पद्धतीही बदलत आहे. यामुळे एकत्र कुटुंब आणि मानसिक स्वास्थ्य यांच्यातील संबंधावरही प्रभाव पडतो आहे.

एकत्र कुटुंब आणि मानसिक स्वास्थ्य: निष्कर्ष

एकत्र कुटुंब आपल्या मानसिक स्वास्थ्यावर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारचे प्रभाव पाडू शकते. हे आपल्या कुटुंबाच्या वातावरणावर, आपल्या व्यक्तिमत्त्वावर आणि आपल्या जीवनशैलीवर अवलंबून असते.

एकत्र कुटुंबात मानसिक स्वास्थ्य चांगले ठेवण्यासाठी काही उपाय:

स्पष्ट संवाद: कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकमेकांशी खुलेपणाने संवाद साधला पाहिजे.

समाधान: कुटुंबात कोणताही मतभेद झाला तर त्याचे शांतपणे निराकरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

व्यक्तिगत जागा: प्रत्येक सदस्याला स्वतःची व्यक्तिगत जागा मिळाली पाहिजे.

आधुनिकता आणि परंपरांचे संतुलन: आपण आधुनिक जीवनशैली स्वीकारण्यासोबतच आपल्या संस्कृतीचे मूल्येही जपली पाहिजेत.

मदत: जर तुम्हाला मानसिक समस्या वाटत असतील तर तज्ज्ञांची मदत घ्या.

एकत्र कुटुंब आपल्याला आनंदी आणि समाधानी जीवन जगण्यास मदत करू शकते. परंतु, त्यासाठी आपल्याला काही प्रयत्न करावे लागतील.

**- डॉ. सुनील दादा पाटील**
**जयसिंगपूर**
**मो. 9975873569, 8484986064**

# मुलांना कसे वाढवावे



ईशावास्य उपनिषदामधे एक श्लोक आहे.—

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजिविषेत् शतं समाः|

एवं त्वयि नान्यंथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ||

वाट्याला आलेली कर्मे करीतच शंभर वर्षे( पूर्ण आयुष्य) जगण्याची इच्छा धरावी. तसेच 'उर्वारुकमिव बन्धनान् मृत्योर्मुक्षीय मामृतात ' या महामृत्युंजय मंत्रात,आत्महत्या न करता, भोग भोगून अमृताच्या मार्गाने जावे असे म्हटले आहे. अध्यात्मातील असा विचार सांगण्याचं प्रयोजन काय ? तर सद्यस्थितीत ते सांगण्याची नितांत गरज भासायला लागली आहे. मुलांना कसे वाढवावे, याचा विचार करताना सध्या दिसणारे समाजाचे चित्र कसे आहे? ते तसे का आहे? आणि त्यावर कौटुंबिक, सामाजिक,आर्थिक, नैतिक उपाय काय? याचा विचार करावा लागेल.

अगदी माहितीतली उदाहरणे–हुशार सुजय चुकीच्या रिझल्टमुळे नापास झाल्याचं कळलं आणि त्याच रात्री त्याने झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. सुदेश उत्तम मार्काने फार्मसी पास झाला, पण बरोबरीच्या मित्राला मार्क कमी पडूनही आरक्षणातून नोकरी मिळाली. आणि बेकार अवस्था असह्य होऊन सुदेशने घरातल्याच पंख्याला लटकवून घेतलं. सुधीर इंजिनीअरिंगला नापास झाला, आणि त्याने गच्चीतून उडी मारली. सावित्री परधर्मीय मुलाच्या प्रेमात पडली. पण नंतर त्याचा कावा लक्षात आल्यावर तिने रेल्वेखाली उडी घेतली. शाळेतील मुलं गट करुन शिक्षकांना धमकावतात. क्लबमध्ये जातात. अफू, चरस, गांजा, मेफ्रेडोन, यासारख्या अमली पदार्थांच्या आहारी जातात. जगाच्या कुठल्याही भागातून त्या वस्तू घरपोच मिळू शकतात. खेदजनक गोष्ट अशी की,महाराष्ट्र याबाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. सहलीच्या नावाखाली समुद्र, पूर, धबधबा अशा ठिकाणी, दारु पिऊन, सेल्फीच्या नादात कित्येक जीवांचा बळी गेलाय. रेव्ह पार्ट्या, बर्थडे पार्ट्या, यासाठी लागणारा पैसा आणि त्या पैशासाठी वेगवेगळे विकृत मार्ग, अशी श्रृंखला सुरु होते. ब्लू व्हेल या गेमने तर पालकांची झोप उडवली होती. उच्चशिक्षित, उच्चपदस्थ, सुसंस्कृत घरातला म्हैसकर, चौदा वर्षांचा मनप्रीतसिंग, तामिळनाडूतला बारा वर्षांचा मुलगा, अशी बोलकी उदाहरणं

पालकांच्या चिंतेचा आणि चिंतनाचा विषय झाली आहेत. काळजीन पोखरुन काढलंय त्यांना ! डिजिटल क्रांतीनंतर ऑनलाईन गेमच्या नादात जगात असंख्य बळी गेले आहेत. सुरुवातीला मोबाइल गेम, नंतर लॅपटॉप व ऑनलाईन गेम यांचे व्यसन, आणि नंतर त्यातून सुटका नाही, असे दुष्टचक्र सु रु होते. ब्ल्यू व्हेल गेममधे तर हॉरर गोष्टींपासून सुरुवात होते. हातावर तीक्ष्ण हत्याराने माशाचा आकार, उंच इमारतीच्या कठड्यावर चढणे, आणि शेवटी पन्नासाव्या टास्कला विजय घोषित करुन आत्महत्या——या गेमचा निर्माता फिलिप बुडेकिन आता तुरुंगात आहे. पण समाज स्वच्छ करण्यासाठी ( जैविक कचरा ) हा गेम सुरु केल्याचे तो सांगतो. या खेळाने भारतातही हात पाय पसरले होते. पौगंडावस्थेतील अनेक मुलांना अस्वस्थता आणि नैराश्याचा आजार जडल्यासारखे झाले आहे.

मुलं अशी भन्नाट का वागतायत, याच्या कारणांच्या मुळाशी जाऊन विचार करायला हवाय. विभक्त कुटुंब पद्धती सुरु झाली आणि मुलांचा आधार हरवला गेला. आई आणि वडील दोघेही नोकरीला जातात.रात्री कंटाळून परत आल्यानंतर मुलांशी संवाद साधायला, त्यांच्यासाठी वेळ द्यायला ते कमी पडतात. कोणाचंच नियंत्रण नाही, इंटरनेट वर किती वेळ आणि काय पहातात हे कोण विचारणार ? लहान असताना पाळणाघर, नंतर शाळा, अशावेळी प्रेमाचा ओलावा शोधत शोधत गेमच्या आभासी दुनियेत रमायला लागतात. घरातील वातावरण जर तणावपूर्ण असेल, आई वडील जर सतत भांडत असतील तर मुले एकतर आक्रमक तरी होतात, नाहीतर बुजरी अबोल एकलकोंडी होतात. पौगंडावस्थेतील मन अत्यंत संवेदनशील असल्यामुळे चांगले किंवा वाईट लक्षात न घेता कोणत्यातरी आकर्षणाच्या मागे धावायला लागते, असं मानसोपचार तज्ज्ञांचं मत आहे.

मुलांना वाढवत असताना त्यांच्या वयाचा विचार करता, अगदी लहानपणापासून ते सात आठ वर्षापर्यंतची,आणि नऊ दहा वर्षापासून ते टीनएज पर्यंतची,व पुढची मुलं असा विचार करावा लागेल.अगदी लहान असताना मुलं अनुकरणातून शिकत असतात. बिंब जसे असेल तसेच प्रतिबिंब पडणार. त्यामुळे पालकांनी आपल्यापासून सुरुवात करावी. त्यांना संस्कार वर्गाला पाठवावं. ज्यायोगे त्यांच्या वर्तणुकीत फरक पडतो.मूल थोडे मोठे झाले की, शाळेत जायला लागते. घरी आल्यानंतर घरात कोणीतरी असले की त्याला आनंद होतो. शाळेत घडणाऱ्या गोष्टी सांगायला त्याला कोणीतरी हवं असतं. त्याला आधार हवा असतो. त्यामुळे त्याला प्रेमाचा ओलावा मिळतो. ऊब मिळते. एक उपाय मला आवर्जून सांगावासा वाटतो की, वृद्धाश्रम आणि बालवाड्या जवळ-जवळ असाव्यात. त्यांना एकमेकात मिसळून द्यावे. ज्यायोगे, वृद्धांना बोधपर,प्रेरणादायी अशा गोष्टी मुलांना सांगता येतील.

मुलांनाही आजी-आजोबा, आणि वृद्धांना नातवंडांचा सहवास मिळेल. मुलं थोडी मोठी झाली की, स्वतःचे स्वतः काही प्रमाणात निर्णय घ्यायला लागतात. त्यांना ते तसे घेऊ द्यावेत. चूक होणे स्वाभाविक आहे.पण अशा वेळी सतत चुकीचा पुनरुच्चार न करता,

चुकीची दुरुस्ती करून सांगावी. "तुला काय येतय? तो बघ किती हुशार आहे". असं म्हणून आपल्या मुलाची सतत दुसऱ्या मुलांशी तुलना करू नये. त्यांना आश्वासक अशा सहवासाची, प्रेमाची गरज असते.बऱ्याच वेळा आपणच त्यांना समजून घ्यायला कमी पडतो असं मला वाटतं.चूक स्वीकारणं, चूक सुधारणं आणि चुकायचं टाळणं हे त्यांना पटवलं पाहिजे. भूतकाळातील चुका, त्यासाठीच्या शिक्षा या भविष्यकाळातल्या यशाच्या पायऱ्याही बनू शकतात. मुलं पौगंडावस्थेत आली की, संवेदनशील बनतात. त्यांचं स्वतःचं एक व्यक्तिमत्व घडत असतं. त्यांना कोणी अपमान केलेला आवडत नाही. प्रत्येक गोष्ट आपल्या मनाप्रमाणे त्यांनी करावी,अशी पालकांनी अपेक्षा बाळगणं योग्य नाही. त्याच्या कुवतीप्रमाणे अपेक्षा बाळगाव्यात. नाहीतर "श्यामची मम्मी" नाटकातील श्यामची अवस्था पहावी लागेल. जे पालक मुलांना चुकांमधून शिकण्याची हिम्मत देतात, चुका दुरुस्त करून सांगतात,तेच पालक मुलांसमोर आदर्श ठरतात. अभ्यास करताना, त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकून, विचारविनिमय करून, प्रोत्साहन दिलं तर, ती एक पाऊल नक्कीच पुढे टाकतील. या वयात मुलांना विरुद्धलिंगी आकर्षण वाटणे नैसर्गिक आहे. स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैराचार किंवा अतिरेक होत नाही ना, इकडे लक्ष द्यायला हवे. त्यांचे मित्र मंडळ कसे आहे? मुलाचं वागणं कसं आहे? याकडेही लक्ष द्यायला हवं.आजच्या विज्ञान युगात मुलांसोबतचा संवाद हरवत चाललाय. पालकांनी कौटुंबिक सुसंवाद आणि मित्रत्वाचं नातं जपायला हवं. सामाजिक प्रतिष्ठेपायी मुलांनी अमुकच व्हायला हवं, असं त्यांच्यावर दडपण आणलं आणि अपेक्षाभंग झाला तर सर्वांनाच निराशाजनक समस्यांना तोंड द्यायची वेळ येते.

मुलांचा जवळ-जवळ अर्धा दिवस शाळेत जातो. त्यामुळे ती बऱ्यापैकी शाळेत घडतच असतात. वाढत असतात. अधून मधून पालकांनी शिक्षकांकडे पाल्याबाबत चौकशी करावी. शिक्षकांनीही शुद्ध चारित्र्य ठेवायला हवे. तर-तम भाव न ठेवता, मुलांना समान वागणूक द्यायला हवी.शिक्षणात विद्यार्थ्यांचा कल कुणीकडे आहे, हे शिक्षकांनी पालक सभा घेऊन सांगावे. पालकांनी घरात शिक्षकांबद्दल अनुद्गार काढू नयेत. त्याचा परिणाम म्हणून मुलांच्या मनात त्यांच्याविषयी अढी बसते.

मुलांना मैदानी खेळांमध्ये भाग घ्यायला जरूर पाठवावे.त्यामध्ये यश- अपयश हे ठरलेलेच असते. त्यामुळे यशाच्या आनंदाबरोबर अपयशही पचविण्याची सवय होते. यश- अपयशाच्या पलीकडे जाऊन,भविष्यकाळ कसा घडवता येतो, याची उदाहरणे त्यांच्या मनावर लहानपणापासूनच बिंबवायला हवीत. अब्दुल कलाम, नरेंद्र मोदी, नारायण मूर्ती, अंबानी, अमिताभ बच्चन, सचिन तेंडुलकर,हे काही एका क्षणात मोठे झालेले नाहीत. त्यांची जिद्द, आत्मविश्वास,प्रयत्नांची पराकाष्ठा, शिस्त, आदर्शाचा अंगीकार आणि आत्मपरीक्षण मुलांच्या समोर, शाळेत व घरात दाखवायला हवे. मुलांच्या हित- अहिताच्या गोष्टींची समजुतीच्या शब्दात त्यांना जाणीव करून द्यायला हवी.'कसे जगावे,' याबाबत व्यायाम, प्राणायाम, ध्यान,भाषणे यांच्या माध्यमातून भरणाऱ्या शिबिरांना त्यांना जरूर पाठवावे.त्यातून खूप फरक पडतो,असा माझा अनुभव आहे. व्यायामाबरोबर आहार शक्य तितका शाकाहारी व सात्विक देण्याची जबाबदारी पालकांची आहे असे मला वाटते. शक्यतो बाहेरचे आणि जंक फूड खाणे योग्य नाही. दुष्परिणाम लगेच दिसत नाहीत. पण स्लो पॉइझनिंग सुरू होते. घरात ताणतणाव वाटल्यास, घरात स्वास्थ्यसंगीतही लावावे.

मुलांना वाढवत असताना घर, शाळा याबरोबरच बाहेरच्या समाजातही ती वाढत असतात. एखाद्या मुलाचा पाय घसरला असे वाटत असेल तर,इतरांनी ती गोष्ट पालकांना सांगायला हवी व त्याबद्दल पालकांनी राग मानू नये. तरुण पिढीला सर्वांनी मिळून घडवायला हवे.ब्ल्यू व्हेल, सारख्या चोकिंग गेम, हफिंग, डस्टिंग,एबीसी स्क्रॅचिंग अशा सगळ्या गेम्सवर सरकारकडून बंदी आणण्याचे प्रयत्न करायला हवेत. आर्थिक आणि सामाजिक कारणांमुळे अडचणीत असलेल्या मुलांना सामाजिक पाठबळ देऊन, 'समाज आणि मुलांचे वाद सामंजस्याने मिटविणारी व्यासपीठे' व्हायला हवीत. अध्यात्मिक विचारधारेतून त्यांच्यामध्ये उत्साह व महत्त्वाकांक्षा निर्माण केली पाहिजे. "नीरक्षीरविवेक आत्मनात्मान ".

मनुष्यजन्म ही परमेश्वराची महान देणगी आहे. आयुष्य हे जन्म आणि मृत्यू यामधील प्रवास आहे. तो प्रवास वाटेत गाडीतून उडी न मारता, सर्वांसोबत आनंदाने,उत्साहाने, खेळीमेळीने असा करावा. 'आनंद ' हा इप्सित स्टेशन पर्यंत गोळा करत रहावा. गेलेला काळ परत मिळत नाही. आलेल्या अडचणींचा स्वीकार करून, त्यांना पुढे जायला प्रवृत्त करायला हवे. लहानपणापासून मुलं खरोखरीच आदर्श विचारधारेत वाढली तर ती म्हणत रहातील,—-

"आज जाणिले,आम्ही जन्मलो राजहंस की होण्यासाठी,
आज जाणिले, या जगण्याचा हेतू सुंदर जगण्यासाठी."

——आणि हेच पद ती मुलं मित्रांमध्ये पसरवतील.

शेवटी सांगावसं वाटतं की, खरोखरीच पाल्यांच्या बाबतीत पालक काळजीत पडलेले आहेत. प्रत्येकालाच

आपली मुलं सद्गुणी, सद्वर्तनी, स्मार्ट व्हायला हवीत असं वाटत असतं. स्वतः पाल्य, पालक,शाळा आणि समाज सगळ्यांनी जर या बाबतीत जागरुकता दाखवली तर, सुदृढ

व्यक्तिमत्व असलेली तरुण पिढी,जी राष्ट्राचा आधार आहे,ती राष्ट्रोद्धारक होईल यात शंका नाही. हीच पिढी भारताला महासत्ता बनविणार आहे. ही गोष्ट एकट्या दुकट्याने करण्याची नाही, तर सर्वांनी मिळून, सर्वांच्या मुलांसाठी हातभार लावायला हवा, असे आवर्जून म्हणावेसे वाटते..

ॐ सहनाववतु सहनौभुनक्तु ।
सह वीर्यं करवावहै
तेजस्विनावधीतमस्तु ।
मा विद्विषावहै
ॐ शान्ति: शान्ति: शान्ति: ।

**सौ. पुष्पा नंदकुमार प्रभुदेसाई**
**मिरज**
**मो. ९४०३६७०९८७**

# तारुण्य



लिहावं थोडं तरुण्यावरी
त्या विशीच्या प्रवासावरी

क्षणभंगुर, मोहक अन चंचल
कोणी घडलं अन कोणी बिघडलं
यातूनही मित्रांनी सावरलं
याचं प्रवासानं खूप काही शिकवलं

नको जोखडू आता स्वत:ला
नात्यांच्या बंधनात,
सुंदरशा रुपात,
अन पैशांच्या मोहात

यश-अपयशाच्या नव्या दिशा
वाढतात प्रयत्नांच्या परिभाषा
अगणित मेहनतीची नशा
अन प्रेरित करणाऱ्या आशा

असेल खडतर जरी
आल्हाददायक तरी
प्रवास हा अनोखा
अगदी लाटांसारखा

**स्नेहल शिंदे**
**शिरोळ, कोल्हापूर**
**मो.7020117635**

# हुंदका



आज तीन दिवसापासून रडूनं रडूनं तिचे डोळे अगदी थकून गेले होते. पोटात अन्नाचा कण नव्हता. वातावरण भयाण वाटतं होतं. घरात कोणी कोणासोबत बोलतं नव्हतं. सासूबाई ओसरीवरच्या एका कोपऱ्यात निर्जीव दगडाप्रमाणे सुस्त पडल्या होत्या. कोणीतरी येत, दुखावर फुंकर घालून निघून जात. आता हुंदक्याचां उमाळाही पाहिजे तेवढा ताकदीने येतं नव्हता. काही वेळ सगळं शांत झालं की आपोआपचं आतून भरून येतं आणि एकदम रडायला येतं होतं.असं वाटतं होतं की, किती रडू नी किती नाही. जणू काही दुःखाचं सारं आभाळ आपल्याचवर कोसळलं की काय!असं भाषत होतं. केव्हा केव्हा तर असं वाटायचं की, आता आपलं या दुनियेत कोणीच नाही, असंच आपणही हे जग सोडून गेलेलं पुरलं. उभा धडधाकट, सावलीसारखा आधार देणारा माणूस आयुष्याचं ओझं टाकून निघून गेला,आता जगण्यासारखं राहीलंच काय?

काल परवापर्यंत आई होती तीही आता गेली. ती तरी किती दिवस थांबणार. बाबाची तब्येत नेहमीच चांगली नसते. ते सर्व आईलाच पाहावं लागते. लहान भाऊ आहे पण त्याचं आता शिक्षण चालू आहे, त्यामुळे तिलाही जास्त दिवस आपल्या घरी ठेवणं चांगल नाही. तरी ती जाताना म्हणाली की मी तेरवीच्या दोन-तीन दिवस अगोदरचं येईल म्हणून. शेवटी आपल्यालाही असं वाटते की आपल्या दुःखामुळं दुसऱ्यांला कशाला त्रास द्यायचा. श्रीकांतचे दोन तीन दिवसांनी बीए चे पेपर आहे. तरी तो सतत तीन दिवस आपल्या घरी राबला. तिसरा दिवस करूनच निघाला. आणि एखाद्या मुरब्बी माणसासारखा जाताना सांगून गेला की, "ताई, तु अजिबात टेन्शन घेऊ नको, जे झालं ते कदाचित देवालाचं मंजूर असणं. आपले कर्म चांगले हाय ना, त मग आपलं चांगलंच होईन. मरण काय कोणाच्या हातचं थोडी असते. मराच्या वेळी माणसाची आपोआप बुद्धी पलटते, आता तु रडशीन त त्या दोन पोरांनी कोणाकडे पाहावं मी येतोच पेपर झाले की." त्याचं ते बोलणं ऐकून मला रडू की त्याचं कौतुक करू हेच समजत नव्हतं. इतक्या लहान वयात किती समजदारी आली याच्यात.

तरी मागच्या महिन्यात पेरणीच्या वेळी मी आणि हे जेव्हा आपल्या माहेरी गेलो. तेव्हा बाबांनी स्वतःहूनचं विषय काढला होता,

"पाहुणेबॉ काही अडचण असली तं सांगत जा बरं, संकोच नका करत जाऊ. अडचण ही प्रत्येक माणसालाचं असतेच. अडलं नडलं तर मागत चला,आणि पीकपाणी आल्यावर दिलं तरी चालते.तसी काही घाई नाही.देवाच्या कृपेनें लय हाय."

बाबा यांना प्रत्येक चकराले काही ना काही देतच असतात.मागच्या सहा महिनेआधी बाबा रिटायर्ड झाले त्यावेळी तेच म्हणाले होते, "पाहुणेसाठी दोनेक एकर वावर पाहा लागण, नाहीतं एखादा धंदा टाकून देऊ वेळेपर्यंत." पण हा माणूस पाहिला स्वाभिमानी, यायले असं तसं जमतंय नाही. एखादी मजाकची गोष्ट सुद्धा बातच मनाले लावून घेते.मागच्या चं वेळी बोलता बोलता बाबानं यायले म्हटलं होतं, "बाप्पू यापुढे कच खायचा नाही, भाऊकीतलं वावर हाय म्हणून काय झालं, आपला हिस्सा आपण हक्कानं मागितलाच पाहिजे. किती दिवस असे दुसऱ्याची मजुरी करून जगालं.आता पोरं मोठी होऊन राहिली काय नाही लागतं संसाराले." एवढंच म्हटलं तं यायचं वाया गेलं होतं.तसे कोणाची हे हू सहन नाही करत एवढे तापड हाय.

पण आता असं कोणतं कारण नव्हतं. तरी कोणता असा लोड आला काय माहित,की एकदम कोणालाही नं सांगता त्यांनी आपल्याचं गवंडयाच्या भावकीतल्या वावरात बाबुळीले लटकून फाशी घेतली.कमीतकमी आपल्या दोन लेकराचा तं विचार कराले पाहिजे होता. आता पोरं रडतात आणि म्हणतात, "आई बाबा वापस कधी येणारं वं " मी उत्तर तरी काय देऊ. दोनदा सांगितलं, "बाळा बाबा देवाघरी गेले, आता कधीच येणारं नाही." तरी ते एकतं नाही.आधी ते कधीच असे रडले नव्हते काही तरी मागायला ते रडायचे आणि लगेच चूप होतं होते. पण आता त्यांना काही नको फक्त बाबा पाहिजे, बाबा पाहिजे करतात. आणि दिवसातून तीन चार वेळा तरी त्यांनी आणलेल्या वस्तू दाखवतात आणि म्हणतात

"आई, ही गाडी बाबांनीच आणली होती ना, हे कपडे, ही सायकल बाबांनीचं वाढदिवसाला घेतली होती ना." आणि हे सांगता सांगताचं एकदम रडायला लागतात. म्हणून आता तुमची खूप आठवण येते हो. तुम्ही एकदम असा निर्णय नव्हता घ्यायला पाहिजे. झालं असतं सगळं चांगलं.तुम्ही खुपचं घाई केली. थोडंतरी थांबायला पाहिजे होतं. काहीतरी मार्ग निघाला असता.पण तुम्ही खूप भित्रे निघाले. आपल्या बायकोच्या डोकयावर एवढ्या मोठया संसाराचां भार टाकून निघून गेले.

असं मरण मरून काय पुरुषांर्थ दाखवला तुम्ही सांगा बरं.? समाजासमोर तुम्ही एक नामुस्कीचं उदाहरणं झाले, काय म्हणतं होते त्या दिवशी लोकं

माहित हाय तुम्हाला,

“असे संकटाले घाबरून मरणारे लोकं यां समाजाला अन त्या घराण्याले कलंक आहे.आपल्या कुटुंबाला उघड्यावर टाकून जीव देतात मग संसारचं कशाला करतात काय माहित.” तर लगेच दुसरा म्हणाला,

“मरनाचं कारण हे वेगळही असू शकते भाऊ,घरातला नवरा बायकोचा वाद असणं. नाहीतं बायकोचं कुठं काही बाहेरचं याच्या लक्षात आलं असणं म्हणून यानं फाशी घेतली असणं, सहजासहजी माणूस फाशी थोडी घेते. तर तिसरा म्हणतं होता की,”मले असं वाटते की गळ्याले प्यायचा जास्त शौक लागला होता,अन बहुतेक करून वरली-मटका अन रंडीबाजीत हा पैसे गमावत असणं. अन त्याच्याचं कर्जापायी पट्ठ्यानं फाशी घेतली असणं.” आता समजलं, तुमच्या मागे तुमचे असे धिंडोळे निघून राहिले. तुम्ही जर खरोखर वरतून ऐकून राहिले असालं तर तुम्हालाही आज आपल्या मरनाचा पच्छाताप होतं असणं. तुम्हाला असं वाटलं असणं की,आपण मेलो म्हणजे झालो आपण मोकळं. पण मोकळ नाही सर्व जीवाले घोर लावून गेले तुम्ही.आता हे तुमच्यावरचे दोष ऐकून राहिले ना. जिवन्त होते तेव्हा कोणाची हू म्हणायची ताकद नव्हती,आता मेल्यावर हे लांच्छनं म्हणजे तुमच्या नकर्तेपणाचे फळ होय.

तुम्ही तं एकटे गेले पण आपल्या लेकरा बायकोचे किती हाल करून गेले. अहो कालपर्यंत कोण्या बाहेरच्या माणसाची माझ्याकडे वाईट नजरेने पाहायची हिम्मत होतं नव्हती.आज पुऱ्यातलीचं माणसं सांत्वना द्यायला येतात तेव्हा थोडा जरी खांद्यावरचां पदर सरकला की त्यांची कुदृष्टी माझं फक्त उघडं अंग शोधत असते. एकटी बाई पाहून कोणी काय म्हणतात तर कोणी कशी बोलतात. तुमच्या बायकोची इज्जत फक्त तुम्ही डावावर मांडली समजलं... सांगा बरं तुम्ही आत्महत्या करून काय मिळवलं. उलट जे होतं, ते सारं गमावलं, मरनानंतर. तुम्हाला असं वाटलं असेल की मृत्यू म्हणजे मुक्ती, मृत्यू म्हणजे या सर्व बंधनातून सुटका,पण तसं काहीच नाही उलट तुम्ही गेले तेव्हापासून तुमची उलट-सुलट जास्त बदनामी चालू आहे. आता तो डाग पुसण्यासाठी तुम्ही वापस येऊ शकता काय, तुमची वाईट बदनामी करणाऱ्या लोकांचे तोंड बंद करू शकता काय. नाहीना....! मग जे जिवन्तपणी करू शकला असता ते तुम्ही आज नाही करू शकत..म्हणून म्हणते माझं सर्वांना.. सर्वच पुरुष जातीला एकच सांगणं आहे की कितीही अडचण येऊ द्या,पण जीव देऊ नका, आत्महत्या करू नका. आपल्या फुलासारख्या मुलांना आणि कधीही घराबाहेर नं पडणाऱ्या बायकोला रस्त्यावर आणू नका......!

**विशाल मोहोड**
**अमरावती**
**मो.9011578771**

# हृदयी ठेवीन



नऊ मास ओझे माझे उदरी वाहिले येथे
हे ऋण आई तुझे मी सांग फेडू कसे येथे

बालपणी हि विष्ठा तू गेली धुवूनिया येथे
तिरस्कार न करता मला वाढवले येथे

म्हतारपण पाहून हाल तुझे आज येथे
श्रावणबाळ तुझा हा कावड वाहीन येथे

कलेक्टर होणे नाही राबूनी मी आज येथे
कर्ज फेडण्या तुझे ग सुश्रुशाकरीन येथे

बाईल वेड्यास मातृ मूल्य कळेल का येथे
चौऱ्यांशीच्या फेऱ्याततू वेड्या फिरशील येथे

खाऊन मायबापांचे बांडगुळ माझला येथे
भरशील पाप कोठे तू नरकात जाशी येथे

आईच देवता माझी तुझ पायी स्वर्ग येथे
फेडीन पांग तुझे मी झोका देऊनीया येथे

आई तुझ पोटी पुन्हा जन्मास येईन येथे
अर्पुनिया प्राण माझे हृदयी ठेवीन येथे

**मोहन सोनवणे**
**धुळे**
**मो.9423287835**

# रंगा कारभारी
## (अस्सल ग्रामीण कथा)



रंगा कारभारी म्हणजे गुडघ्यापातूर लालकाठाचं धोतर,खादीचा नेहरुशर्ट आणि डोक्याला मुंडासं, कपाळावर गंध, बुक्का लावलेला, आणि भराभरा चालणारा गडी. पहाटे पाचला उठून विठ्ठल रुकमाईच्या मंदीरात जायाचा मंदीर झाडलोट करायचा सगळं चकाचक करायचा आणि तसाच शेतात जायचा जनावराचं शानघाण बघायचा आणि दुध घेऊन डेअरीला याचा. रंगा कारभारी चालायला लागला म्हणजे त्याच्या कापशीटाईप चप्पल मधून “कार- कूर” असा आवाज निघायचा आणि तो आला हे समजायचं...

तर अशा ह्या कारभाऱ्याला दोन बायका पहिली बायको ‘रकमा’ शेजारच्या पाडळीतली आणि दुसरी ‘लक्ष्मी’ उरणाची.पहिली बायको गोरीपान आणि जरा बारक्या अंगकाठीची.. पण कणखर होती. ती घरातली सगळी कामं आवरायची पण तिला शेतातलं काम जमायचं नाही शिवाय तिला एका पाठोपाठ एक अशा दोन मुलीच झाल्या म्हणून कारभाऱ्यानं तिला टाकली आणि दुसरी बायको आणली, दुसरी बायको आणल्याबरोबर पहिल्या बायकोला राग आला, ती जी माहेरला गेली ती परत आलीच नाही.तिला वाटायचं... “दोन पोरी झाल्या म्हणून कोण संसार मोडतं कां? चांगल्या पाच पाच पोरी हुत्याता आणि मग पोरगा झाल्याची कीती तरी उदाहरणं हाई ती आणि हे काय म्हणायचं? मुळात कारभाऱ्याला आपल्याविषयी प्रेमच नाही म्हणून असं झालया!असा ती विचार करायची आणि मनातल्या मनात कुडत बसायची”. वास्तविक कारभारी काय रकमाला घर सोडून जा म्हणाला नव्हता किंवा तुला नांदवित नाही... असं पण म्हणाला नव्हता त्याची दोन्ही बायका नांदवायची तयारी होती. एक शेतात बरोबर काम करायला होईल आणि दुसरी घरकामाला होईल या हिशोबाने तो पुढे गेला होता पण तसं घडलं नव्हतं...

रकमाला राग आला होता ती उलटा विचार करत होती..

“माझी किंमत ह्यानां कळाली नाही पण एक दिवस माझी आठवण झाल्याशिवाय राहायाची नाही” असं म्हणून ती माहेरात राहू लागली.

तिचे आई, वडील, भाऊ सगळे चांगले आणि घरंदाज होते त्यानी तिला सांभाळली.

कारभारी तसा हाडाचा शेतकरी होता जमीन काही फार नव्हती. दोन एकरच होती पण “मव्हाचा टुकडा” म्हणजे कुठलही पीक घेतलं तरी भरभरुन उत्पन्न निघत असे थोडक्यात जमीन चांगली व पानस्थळ होती. वारणेचं पाणी सगळ्या शिवारात फिरलं होतं त्यामुळे उसाचं पीक उत्तम निघायचे आडसाली ऊस असेल तर ऐंशी,नव्वंद टन अवरेज पडायचं जवळच वारणानगर कारखाना असल्याने ऊस वेळत कारखान्याला जायाचा चांगले पैसे मिळायचे शिवाय मोकळं रान झालं की भोंड्यावर हरभरा,भुईमुग,

गहू अशी अतंरपिकं तो घायचा बांधावर,भाजीपाला करायचा. महिन्याला कारखान्याची साखर शिवाय सणासुदीला कांहीतरी गोडधड श्रीखंड,तुप वगैरे किंवा जादासाखर मिळायची त्यामुळे घर चालायचे आणि पैसा शिल्लक राहायचा त्यामुळे पुढच्या कांही काळात त्यानी शेजाऱ्याची एक एकर जमीन घेतली उत्पन्न वाढले व घराची प्रगती झाली विकास झाला. शेतात प्रगती झाली विकास झाला तसेच घरात पण प्रगती आणि विस्तार झाला दुसऱ्या बायकोला एका पाटोपाट एक असे दोन मुलगे झाले तिसरी मुलगी झाली. हळूहळू संसार मोठा होऊ लागला आर्थिक परिस्थिती सुधारु लागली.

मग कारभाऱ्यानं घर बांधायला काढले पदरात दोन मुले आहेत म्हणून चांगलं सहा जापत्याच मोठं घर बांधले.

कालांतराने मुले मोठी झाली पहिल्या बायकोच्या दोन मुलीही मोठ्या झाल्या त्यांची लग्ने त्यांच्या मामानी केली दुसऱ्या बायकोच्या दोन मुलांची लग्ने कारभाऱ्यानेही केली मुलीचेही लग्न झाले ती नांदायल्या गेली.मुले हाताखाली आली छोटामोठा व्यवसाय करु लागली दोन सुना घरी आल्या.नातवंडे झाली. कालांतराने मुले सुना विभक्त झाली आणि एकाच्या तीन चुली झाल्या दोन मुले वेगळी आणि म्हातारा म्हातारी वेगळे राहु लागले अशा तऱ्हेने कारभाऱ्याचा संसार चालला होता.

पण कारभाऱ्याच्या सुखी आणि चांगल्या चाललेल्या संसाराला कुणाची तरी दृष्ट लागली आणि अचानक एके दिवशी काय झाले कुणास ठाऊक दोन नंबरची बायको लक्ष्मी सकाळी उठली आणि मोरीत तोंड धुवायाला म्हणून गेली ती तिथेच पडली तिला रक्ताची उलटी झाली,पोरांनी डॉक्टरला बोलवीपर्यत सगळा कारभार आटोपलेला होता.

ह्या अचानक आलेल्या दैवी संकटाने रंगा कारभारी पार हबकून गेला,भयंकर दु:खी कष्टी झाला.चालत्या गाडीला घुणा लागला.नाही म्हटलं तरी दैनदिन गोष्टींचा प्रश्न गंभीर झाला. बायकू होती तेंव्हा चहापाणी जेवणखान सगळं टायमावर मिळत होतं. मुले आणि सुना आपआपल्या संसारात गुंतले असले तरी मालकीण मात्र काळजीनं कारभाऱ्याला बघत होती.

आता हे सगळं कोलमडून पडल होतं...

हल्ली कारभारी पहाटे देवळात गेला की विठ्ठलासमोर बसुन एकटाच रडायचा "माझी चालतीबोलती बायकू का नेलीस?" म्हणून जाब इचारायचा पण झाल्या गोष्टीपुढे काय इलाज चालतो का? अशी स्वताच स्वताला समजूत घालायचा आणि शेतात जायाचा.कारभाऱ्याची बायको वारल्यापासून तो अतिशय निराश झाला होता. मग एक दिवस धाकल्या लेकीने कारभाऱ्याला दुख सांडायला म्हणून तिच्या गावी नेले. तिथ गेल्यावर त्याला जरा बरे वाटू लागले विसर पडल्यागत झाले पण पावण्याच्या गावात तरी किती दिवस राहणार म्हणून एके दिवशी तो निघुन आला.घरी आल्यावर त्यानी दार उघडले आणि लाईट लावली आणी पाहतो तो काय... सगळं घर रिकामं झालेलं होतं म्हणजे दोन्ही खोल्यातील भांडी कुंडी,गॅस,अंथरून पांघरून सगळे नाहीसे झालेलं होते. फक्त एक कॉट आणि वलणीवरची कांही कपडे तेवढी शिल्लक होती.कारभाऱ्यानी बाहेर येऊन सगळ्यास्नी विचारल..."अरं! इथलं सामान काय झालं"? तर थोरली सुन पुढे आली आणि म्हणाली... "मामंजी आता तुमास्नी सामान काय कामाचं? उगाच धुळ खात पडायचं म्हणून आम्ही दोघीनी वाटून घेतलया"! हे ऐकूण कारभारी चाटच पडला आणि म्हणाला "पर इचारयाचं तरी" त्यावर धाकली म्हणाली "अवं मामंजी... त्यात विचारायचं काय? तुम्ही काय परकं हायसा व्हय? जिकडच्या तिकडं सामान असलं म्हजी धुरळा पडत नाही. घर स्वच्छ राहतया"!

कारभाऱ्याला बी कळून चुकलं होतं सुना म्हणत्यात ते बरोबरच हाय नाहीतरी आता ह्या सामानाचा काय उपयोग? जे होतय ते बऱ्यासाठी म्हणायचं आणि पुढं चालायचं असं म्हणून त्यानी मनाची समजूत काढली आणि कामाला लागला.

दिवसामागून दिवस जायाला लागलं दोन्ही सुना अगोदरच सवत्या राहील्या होत्या मग कारभाऱ्याच्या पोटाचं हाल सूरू झाले

दररोज नातवासनी खेळीवल्याशिवाय पोटाला तुकडा मिळेणासा झाला त्यात सकाळी एकीकडं आणि संध्याकाळी दुसरीकडं जेवायची पाळी आली एकंन्दरीत सगळं अवघड आणि अशुद्ध व्हायला लागलं.कधी चहा मिळायचा तर कधी नाही असं व्हायला लागले तब्येत ढासळायला लागली.

तिकडे पहील्या बायकोनी पंन्नाशी ओलांडली तिचे आई वडील मरून गेले. भाऊ भावजयांचे राज सुरू झाले त्याचीही मुलं मोठी झाली ते सगळे तिला चांगले सांभाळून घेत होते.पण तिलाही वाटायचे.. "माझा हक्काचा नवरा असताना मी हे विधवेचं जीणं काय म्हणून जगत असेन? बरं माझ्या नवऱ्यानं काय मला घरा बाहेर काढली नाही पण माझ्या अंगात मस्ती म्हणून इथं येऊन पडली. माझ्या घरात कवापण हक्कानं चहा करून प्याली असती मालकाला दिला असता माझ्या घरात मी कशीपण राहीली असती. इथं नाही म्हटंल तरी सांगतील ते काम करायला लागतयं जुळवून घ्यायला लागतयं. आता सवत मेल्या आपून पुन्हा जावावं मालकाकडं आणि नव्यानं एकत्र राहावावं पण म्हातारपणी हे चांगलं दिसलं का? आणि मालक तरी नेईल का? अस तीला वाटायचं".

दररोज संध्याकाळी पारावर असणाऱ्या भल्या मोठ्या लिंबाच्या झाडावर दिवसभर बाहेर असणारे पक्षी जमा व्हायचे आणि किलबिलाट सुरु व्हायचा त्याचबरोबर खाली म्हाताऱ्याचा कट्टा भरायचा...

रामा तुपे,बंडगर आप्पा,नाना पाटील,दादू परीट याच्या गप्पा सुरु व्हायच्या.

आज नेहम्हीप्रमाणे ग्रुप जमला होता त्यात दादू परटाची चेष्टा करायची चालू होती दादुनं बायको मेल्यावर दुसरं लगीन केल होतं. दादुची बायको तरूण होती.

नाना पाटील दादूला म्हणाला..."बायला काय बी म्हणा लगीन केल्यापस्न दादु तुझी तब्बेत सुधारली गड्या"!

"न सुधरायला काय झालं त्येला, पोटाला प्वॉटभर मिळत नव्हतं! म्हणून त्यों हडकुळा झाला होता आता खुराक चालू झाल्यावर बघा... गडी कसा ताजा तवाणा झालाय"!..बंडगर आप्पा म्हणाला

त्यावर दादू म्हणाला... "होय आप्पा म्हणत्यात ते खरं हाय माझ्याकडं सगळं होतं पण ह्या सुना माझ्याकडं बघत नव्हत्या म्हणून हाल चाललं होतं,माणसाकडं कितीबी इस्टेट असूद्या तिचा उपभोग घेता येत नसेल तर त्येचा काय बी उपयोग नाय"......

"व्हय तीबी खरंहाय म्हणा"... आप्पा म्हणाला.

तोपर्यंत कारभारी नातवाला घेऊन पारावर पोहचला.

त्याला बघून रामा तुपे दादुला म्हणाला...

"दादू कारभाऱ्याला वाईच तुझा अनुभव सांग की म्हजी त्येच बी दुसरं लगीन करू या"...

त्यावर नाना पाटील कारभाऱ्याला म्हणाला.. "गड्या बायकू गेल्यापस्न जरा जास्तीच थकलास"..

त्यावर कारभारी म्हटला "व्हय त्ये बी खरं हाय म्हणा... पर आता लेका सुनंच्या राज्यात असंच हयाचं"!...

"ती का म्हणून ?आप्पा म्हणाला अजून जमीन जुमला तुमच्या नावावर हाय नवका मग त्येला काय घाबरायच हाय"

"कारभारी मी एक उपाय सांगू का? दादूगत दुसरं लगीन केलं तर कसं हुईल म्हणायच"?.....बंडगरअप्पा म्हणाला. "या वयात कोन पुरगी दिल मला अप्पा"... कारभारी हसत हसत म्हणाला

"तुमच वय किती?"

"आता दिवाळीला पासट चालू झालया"!

त्यावर नाना पाटील म्हणाला "अहो आप्पा कारभाऱ्याचं म्हणणं बरोबर आहे इथं तरण्या पोरास्नी पोरी मिळन्यात आणि म्हाताऱ्याला कोन देताया!पण

कारभाऱ्याला लगीन करायची गरजच काय"?

"म्हजी काय म्हणतुयास जरा उलघाडून सांग की"....आप्पा म्हणाला

व्हय त्येच सांगतुया.. "आपुन सरळ पहिल्या वैनीला आनलं तर कसं हुईल कारभारी"?

"चांगलच हुईल की पण ती ईल का"?

"का येणार नाय? नक्की ईल"

"बघा तरी इचारुन"?

कारभाऱ्याला नानाचा इचार पटला आणि मिटींग संपली.संध्याकाळी झोपताना कारभारी विचार करु लागला.....

"बायला नाना म्हणतुया तेबी खरच हाय नाहीतर आपून असून नसल्यागत झालुया धड पोटाला मनासारखं नाय का मनातल बोलायला जवळच कोन नाही". "पाडळीकरनीला आणली तर मनातलं बोलायला यील शिवाय तुकडापाणी करील पण आता ती यील का नाय कुणास ठावं? आता तिला न येण्यासारखं कारण बी काय राहीलं नाय सवत तरी मरुन गेली. दुसऱ्या बाजुन विचार केला तर तिथं ती पावनी म्हणून किती दिवस राहील? आता ती कटाळली असलच की शिवाय काम केल्याबिगार कोन पोटाला घालतय?

तशी ती हुशार हाय! नाही म्हणायची नाही".

बघुया "गाजराची पुंगी वाजली तर वाजली"....

मग एके दिवशी कारभारी उठला आणि सरळ पाडळी गाठली अचानक आलेल्या पावण्याला बघून सगळी अचंबीत झाली. चहा पाणी झाल्यावर कारभाऱ्यानी डायरेक्ट रकमालाच विचारले "हे बघा उरण करीन वारल्या हे तुमास्नी ठावं हाय आणि ल्यॉकसुना आपआपल्या संसारात गुतल्याती आणि आमच्याकडं बघायला कुणाला वेळ नाही.तवा तुम्ही आलासा तर राहिलेली चार वर्स आनंदाने जगू! बघा तुम्हास्नी पटतय का ते"!

कारभारी एका दमात बोलून मोकळा झाला....

त्यावर रकमा म्हंणाली "पण आता लोकं काय म्हणतील म्हातरपणी बाई नादांयला निघाल्या म्हणून"...

"अवं लोक कायबी म्हणु द्यात आपून आपला इचार करायचा असतो".

"काय करायचं ते आपून ठरावयच असतया"!

ती कांहीच बोलली नाही

"मग काय"?

"बघू! मला जरा विचार करु द्या.आज तरी मी येत नाही। रकमा म्हणाली

"जशी तुमची मर्जी" म्हणून नाराज मनाने कारभारी उठला आणि धोतार झाडत गावाकडे आला

रात्रभर तो विचार करीत होता."बायला रकमाचं बरोबरच हाय म्हणा लक्ष्मी होती तवा आपून कवा तीची आठवण काढली नाय का विचारपूस केली नाय आजमातूर "बाजारातून म्हस सोडून आणावी तसं.. तीला आणायला गेलो", "ह्यो काय माणसांचा व्यवहार नव्हं नाहीच ती येणार नाही पण दुसऱ्या बाजूनं त्याला वाटायच.. किती झालं तरी बाईच्या जातीला नवऱ्याच्या घराशिवाय पर्याय नसतो असा विचार करीत त्यों छताकडं बघत बिछाण्यावर पडून राहीला"...अंधार वाढत गेला.

हिकडं रकमाला बी कळून चुकलं होत की... "किती झालं तरी नवऱ्याच्या घराशिवाय शेवट नाय लागायचा किती झाल तरी मी सवाशिण आहे आणि आता माझी त्यासनी गरज हाय तवा आपून रुसून माह्यारात राहणं योग्य नाही

शेवटी तीच्या मनातही शेवट गोड व्हावा हा विचार होताच. मग तीने रात्रीच भाऊ आणि भावजयीच्या कानावर ही गोष्ट घातली... त्याना पण आनंद झाला.

दुसरी दिवशी भावजयी ने गल्लीतल्या बायका गोळा केल्या चांगल्या पांच दुरड्या पोळ्याची शिदोरीची तयारी केली.रकमाला हिरवीगार साडी आणली, बांगड्या भरल्या आणि रकमा नवऱ्याकडे निघाली. माहेर सोडताना रकमा वहिनीच्या गळ्यात पडून रडू लागली माझ्यासाठी तुम्ही लई केलसा म्हणू लागली. वहिनी म्हणाली "तुमचा स्वभाव इतका गोड हाय की तुम्ही आम्हाला कवा परकं वाटला नाहीसा आता करमायचं नाई.जावा आनंदानं रहावा" आणि गाडी हलली तसं रकमाच्या बंधूराजानी कारभाऱ्याला फोन केला आणि "आम्ही रकमाला घेऊन येतोय म्हणून पुढे कळविले" त्याबरोबर त्यानाही आनंद झाला.

लगेच कारभाऱ्याच्या वाड्यात गडबड सुरु झाली सुना आणि गल्लीतल्या बायका गोळा झाल्या आणि बघता बघता रकमाची गाडी दारात आली.

एकाद्या नव्या नवरी सारखी रकमा दिसत होती.आज ती पंचवीस वर्षांनी पुन्हा एकदा सासरच्या पायऱ्या चढत होती ती आत निघाली तर दारातच सुनानी तिला थांबविली भाकरीचा टूकडा ववाळुन बाजुला टाकला पाणी पायावर वतलं टावेल पुसायला दिला आणि रकमा नव्या पावलानी घरात आली

आणि कारभाऱ्याचा दुसरा डाव सुरु झाला..

**चंद्रकांत पाटील**
**मो.9881307856**

# आयुष्यावर बोलू काही



आयुष्यावर बोलू काही भारी
सोशल मीडियाची आली वारी
वाढदिवस श्रध्दांजली सारे
पाठवा इमोजीसचे नारे

नको कोणाशी संवाद
मग कसे होतील वाद ?
सागर लक्ष्मी पाणी भरते
सुख पायाशी लोळण घेते

तरीही धनाड्यांची पत्नी नाते
शेवटी घटस्फोट मागते
शिक्षणाच्या केल्या डिग्र्या हासिल
झालो आम्ही समृद्ध राहून गाफील

विद्या विभूषकांचे मायबाप भ्रमात
श्रेष्ठ माझे संस्कार मग का गेले वृध्दाश्रमात ?
प्रसिद्ध व्यक्ती जाते पडद्याआड
एकटी डिप्रेशनची शिकार येता अहंकार द्वाड

प्रसिद्धीच्या झोतात मागेपुढे नाचणारे
गुणगाणचा पोवाडा गाणारे
कुठे जाऊन लपले आयुष्याच्या सांजवेळी
मोठेपणा काय कामाचा नको त्या वेळी

अडाणी, प्रामाणिक मजूरांचे मायबाप
आजारी सेवा सुश्रुषा करी वारे माप
कर्ज काढून जिव्हाळा जपती
संस्काराची नाळ टिकून ठेवती

व्यसनी नवरा गरिबीची जोड
कुंकवाचा धनी म्हणून करते तडजोड
त्यांच्या नात्यात टिकून आहे एकी
रुसवे फुगवे दूर करूनी बाळगी नेकी

भांडतात एकमेकांशी ताडताड
मुस्कटात लगावतात फाडफाड
नाही कुठे येत अहंकार आड
कुसीत बोलण्याची करतात चाड

संध्याकाळी भांडून सकाळी
देतात आलिंगन भेट गळी
भुकेला कोंडा उशाला धोंडा
नको टाकू झोपेची गोळी तोंडा

दु:खातही ठेवी संयमाची आस
त्यांचा माणूसकीवर गाढ विश्वास
झट मंगनी पट शादीचे दिवस
बदलतात देव नाही पावत नवस

एकत्रीत कुटूंब नको रे बाबा
रांधा वाडा उष्टी काढा का राबा ?
विकृत विचारांचा मनावर पगडा
फ्लॅट संस्कृतीत दरवाजा नसे उघडा

आभासी दुनियेची ख्याली खुशाली
श्रद्धांजलीला पेटती मशाली
व्याधीने जर्जर आईबाप कण्हतो
परदेशातून औषधास पैसे पाठवतो

बालपणी हॉस्टेल बोर्डिंग दिले मुलांना
म्हातारपणी एकटे जीवन मिळे वृद्धांना
जे पेरावे तेच उगवते
संस्कारक्षम नाही पिढी उमजते

जीवशास्त्रा ऐवजी जीवन शास्त्र शिकवा
चित्रकलेतून चारित्र्याची रंगसंगती टिकवा
शिकलो शाळेत त्रिकोण षटकोन
कोण शिकवी आयुष्याचा दृष्टिकोन ?

व्याकरणाची शिकलो भाषा
समजली नाही अंतकरणाची आशा
अंकगणित शिकताना शिका बेरीज
माणसाची माणसाला नितांत गरज

अंत समयी नाही आपत्तांचे दर्शन
का झाले मानवी मूल्यांचे घर्षण
नका ऐकू मुलांनो पॉप सॉंग
ऐका भजन, कीर्तन, सत्संग

**सौ.रोहिणी पराडकर**
**कोल्हापूर**
**मो. 9767725552**

# गोधडी



गोधडी वापरून जीर्ण झालेल्या कपड्यातून, शोधून व्यवस्थित असलेले कापडाचे तुकडे घेऊन, ते एकमेकांना जोडून, अंथरण्यासाठी किंवा पांघरण्यासाठी तयार केलेले वस्त्र. खरं म्हणजे जे कपडे अगदीच टाकाऊ आहेत, वापरून झिजले आहे, फाटले आहेत, वाया गेले आहे, अशा कपड्यांचा वा चिंध्यांचा वापर गोधडी शिवण्यासाठी केला जातो. गोधडीलाच वाकळ, धाबळ, पासोडी, रजई, दुलई हे शब्द समानार्थी म्हणून वापरले जातात पण तरीसुद्धा या प्रत्येक शब्दांमध्ये भेद आहेच. उदाहरणार्थ रजई किंवा दुलई हे साधारणपणे आत कापूस घालून बनवले जातात. आपण असं म्हणू शकतो की ते गोधडीचे श्रीमंत रुप आहे किंवा गोधडी हे रजई किंवा दुलईचे गरीब रुप आहे.

आपला भारत देश तसा पूर्वी गरीब होता. पारतंत्र्याच्या काळात किंवा नंतरही अनेक गरीब कुटुंब आपल्या भारतात होती. अजूनही आहेत. त्यांचे प्रमाण आता कमी झाले असेल कदाचित पण त्यांना रोज घालायलाही कपडे नसत. लहान मुले तर बऱ्याच वेळा उघडीच असत. पुरुष माणसांची ही तीच तऱ्हा. स्त्रिया अंगावर लज्जा रक्षणासाठी वस्त्र घालत, पण बऱ्याच स्त्रिया फाटलेल्या लुगड्यातील चांगला भाग काढून, ते दोन भाग एकत्र करून त्याचे लुगडे तयार करून नेसत. त्याला दंडाचे लुगडे असे म्हणत. आपल्या देश बांधवांना अंगभर वस्त्र सुद्धा नाहीत हे पाहूनच गांधीजींनी फक्त पंचा नेसायला सुरवात केली.अशी ज्यांची परिस्थिती आहे त्यांना आंथरूण, पांघरूण खरेदी करणे म्हणजे चैनच म्हणावी लागेल.त्यातूनच कदाचित गोधडीचा जन्म झाला असावा.व म्हणून टाकावू, उरलेल्या, वापरलेल्या कापडाच्या चिंध्या जोडून गोधडी शिवून आंथरूण व पांघरूणाची गरज भागवली असावी.

गोधडी शिवणे हे काम खूप किचकट वाटते. एखाद्या निगुतीने संसार करणाऱ्या किंवा प्रसंगी कोंड्याचा मांडा करणाऱ्या स्त्रिलाच हे जमू शकते. माझी आई दिवाळीला फार खर्च नको म्हणून, दर महिन्याच्या भरलेल्या किराणा सामानातून एका डब्यात थोडे थोडे सामान काढून साठवून ठेवत असे. डाळ, गुळ, खोबरे, साखर आणि ते साठवलेले सामान दिवाळीचा फराळ करण्यासाठी वापरत असे. उद्देश हा की दिवाळीच्या असलेल्या खर्चामध्ये जास्तीच्या किराणा सामानाच्या खर्चाची भर नको. हे एक चांगल्या गृहिणीचे लक्षण आहे असे मला वाटते. तोच प्रकार गोधडी शिवण्यात आहे. ज्याला चिंध्या म्हणून फेकून दिले आहे, त्याचाच वापर करून एक उबदार, तलम, मऊशार अंथरण्यासाठी व पांघरण्यासाठी वस्त्र तयार करणे ही साधी गोष्ट नाही.

गोधडी दिसायला कितीही आकर्षक रंगीत दिसत असली तरी जी शिवते तिलाच माहित आहे की, ती शिवताना, टाका टाका घालताना, किती वेळा सुई टोचली. किती वेळा बोट रक्ताळले. किती वेळा मनाजोगा जोड लागला नाही की उसवून पुन्हा जोडला. आणि हे सर्व लपवून किंवा त्याकडे दुर्लक्ष करून आपले जोडण्याचे काम पुढे चालूच ठेवून, उद्देशापर्यंत पोहोचायचे. आयुष्यातही असेच असते. आयुष्य जगताना असे अनेक प्रसंग येतात की, मन रक्ताळते, जखमी होते पण त्याकडे दुर्लक्ष करून, नको असलेल्या क्षणांना विसरून, उभारी देणारी क्षण लक्षात ठेवून, आयुष्याची वाट चालत राहायची. नाती सांभाळायची.तडजोड करत रहायची.कधीकधी तडजोड करता करता, नुसती जोडाजोड होते. ठिगळाच्या गोधडी सारखी पण तरीही ऊब देण्याचे आपले काम तलमपणे करतच रहायचे.

**सौ.उज्वला ढमढेरे**
**चिंचवड**
**सेवानिवृत्त मुख्याध्यापिका**
**मो.9623727723**

# पालकत्व



विनोद देशमुख चाळीस वर्षापासून देशमुख नगर मधील रहिवासी आहेत. पाच सहा वर्षापूर्वी त्यांचा एक तरुण मुलगा आर्यन कॉलेजच्या रॅगिंग प्रकाराने मरण पावला. एकुलत्या एक मुलाच्या मृत्यूच्या धक्क्याने त्याची आई उषाताई पण दहा-बारा दिवसातच हे जग सोडून गेली. विनोद देशमुख आयुष्यात पूर्णपणे एकटे पडले. आर्यनच्या जीवावर उठलेल्या मुलांना कोर्टकेस करून शिक्षा देण्याचे बळही त्यांच्यात उरले नव्हते. जगण्याची उमेद संपली. नोकरी सुटली.आज वयाच्या साठीत ते दिवसभर ओट्यावर बसून राहतात.सकाळ संध्याकाळ महादेव मंदिरात आरतीला जातात.अशा नैराश्यपूर्ण आयुष्यात प्रसन्नता निर्माण करणारा एक कोवळा जीव सारस त्यांच्या आयुष्यात आला.

सारसची आई गौतमी देशमुखांच्या शेजारच्या बंगल्यात राहायला आले. कुरळ्या केसांचा..बारा वर्षांचा..सावळ्या रंगाचा पण सरळ नाकाचा सारस देशमुखांना पाहताच क्षणी खूप भावला.स्वतःचा आर्यनच ते त्याच्यात शोधू लागले.सारस ची आई गौतमी शिक्षिका होती. गौतमी सकाळी साडेनऊला नोकरीवर गेली की संध्याकाळी साडेसहाला घरी येत असे. गौतमीची शाळा घरापासून 35 किलोमीटर दूर होती. सकाळ संध्याकाळ एस टी चे धक्के खाऊन तिच्यात सारस साठी खचितच काही उरत असे. सारस दुपारी दीड वाजता शाळेतून घरी आला. व्हॅनमधून उतरताच त्याची नजर देशमुखांवर पडली.

"सुटली का शाळा? नाव काय तुझे?"

" सारस "

"छान,सगळ्यात उंच भरारी घेणारा पक्षी आहेस मग तू"

" हो माझे बाबा नाहीत. त्यामुळे मीच भरारी घेऊन एक दिवस आईला विश्रांती देईन."

"काय गोड बोललास. ही घे कॅडबरी."

" नको, आई ओरडेल."

" आईला सांगूच नकोस ",देशमुखांनी हात पुढे करून फ्रेंड्स म्हणून साद घातली.

सारसने ताबडतोब देशमुखांचा प्रस्ताव स्वीकारला. सारस घरात शिरला. भेंडी भाजी पोळी खाऊन पोकेमॉन ची किमया टीव्हीवर बघत बसला. तरीही चार वाजता त्याला कंटाळा आलाच.कॉलनीतील मुले त्याला रस्त्यावर कुजबूज करताना दिसली.सारसही त्यांच्यात शिरला.

" नवीन दिसतोस ",मीहीर म्हणाला.

" हो,कालच आलोय"

" आमच्या खेळतोस का?", वरुणने विचारले.

"हो"

" नको रे,चिल्ला पिल्ला आहे तो ",रोशन म्हणाला.

सारस नाराज होऊन देशमुखांच्या ओट्यावर जाऊन बसला. मुले क्रिकेट खेळू लागली.इकडून एक घरांची लाईन, तिकडून एक घरांची लाईन आणि मध्ये सहा फुटी रस्ता. हा रस्ता म्हणजे मुलांची खेळण्याची जागा. कॉलनीला ओपन स्पेस आहे पण तेथे गवत वाढले आहे. खेळता खेळता बॉल देशमुखांच्या कंपाउंडमध्ये जाऊन पडला.

तोच देशमुख ओरडले," कारटे दुपारी पण शांततेत झोपू देत नाही."

देशमुखांनी बॉल जमा करून घेतला. संकल्पने मुद्दाम सगळ्या मुलांना जोरात आरोळ्या मारण्याचा सल्ला दिला.सगळी मुले ओरडू लागली.

तेवढ्यात चिटणीस बाहेर आले.

" काय गोंगाट लावलाय...घरी जाता की नाही."

देशमुख ही त्यांच्यासोबत ओरडू लागले.

" तुझं घर कुठे? तू खेळतो कुठे? आमच्या गल्लीत पाय ठेवायचा नाही आजपासून...."

" ही गल्ली तुमच्या बापाची आहे का ?",संकल्प देशमुख वर ओरडला.

" लहान-मोठ्याची पायरीच राहिली नाही या पोरांना ",चिटणीस म्हणाले.

तेवढ्यात मिहीरची आई साधना बाहेर आली. सगळ्या मुलांना स्वतःच्या घरात घालून घेतले.

" तुम्ही सगळ्यांनी तुमच्या आईला घेऊन या... आपण चिटणीसांनी संकल्पला मारले असे सांगायचे...कोण तुम्हाला या गल्लीत खेळू देत नाही तेच बघूया..."

साधनाच्या प्लॅन नुसार सगळ्या स्त्रिया जमल्या व चिटणीसांशी भानगड करू लागल्या.

" तुम्ही मुलांवर हात उगारता हे बरोबर नाही... आज संकल्पला मारले. उद्या तुम्ही आमच्या मुलांनाही माराल..."

" काहीही काय आरोप करतात तुम्ही...माझा माणूस काही रिकामा नाही हं तुमच्या मुलांशी मस्त्या करायला..," मिसेस चिटणीस म्हणाल्या.

आरडाओरडा सुरु झाला.शेवटी देशमुखांनीच मध्यस्थी केली. संकल्पच्या आईला समजावले. प्रकरण मिटले. त्या दिवसापासून चिटणीसांनी मुलांनी त्यांच्या कंपाउंडमध्ये बॉल फेकला, त्यांच्या गेट जवळ लॅम्प तुटला,फोरव्हीलरला बॉल लागला तरी मुलांचा नाद केला नाही. परंतु देशमुख व मुलांचे पुन्हा पुन्हा वाद होत. मुलांना साधनाची फूस होती. साधना

घटस्फोटीत होती. तिचे सतत फोन चालत. त्यामुळे मीहीर घराबाहेरच असलेला तिला चांगला वाटायचा.

एके दिवशी संध्याकाळ झाली. सात वाजले.अंधार पडला. मुले चार वाजेपासून खेळत होती. साडेसात वाजले तरी कोणी घरी जायला तयार नाही.

“मला इथे आता चकरा मारायच्या आहेत. बंद करा तुमचं डब्बागुल. “

मुले घोळका करून तिथेच उभी राहीली.देशमुख संताप करत घरात निघून गेले.सारसला वाईट वाटले. सारसची आणि देशमुखांची आता गट्टी जमली होती. सारस देशमुखांकडे गेला.त्यांना समजावू लागला.

“जाऊ द्या बाबा,सकाळी चकरा मारून घेत जा तुम्ही.”

“हो रे माझ्या सोन्या”

सारसची देशमुखांशी असलेली सलगी रोशन, मिहीर व संकल्पला खटकत होती.

“ आजपासून या सऱ्याला कोणीच आपल्यात खेळू द्यायचे नाही सगळ्यांना सांगतोय मी.गल्लीत जो त्यांच्यात खेळला त्याची खैर नाही,”,संकल्प म्हणाला.

“ बरोबर “,रोशन व मिहीरने दुजोरा दिला.

दुसऱ्या दिवशी दुपारी नेहमीप्रमाणे मुले क्रिकेट खेळू लागली. सारस बाहेर निघाला.

“ सऱ्या...घरी निघ... तू...त्या देशमुखांचा चमचा आहेस.आमच्यात यायचं नाही आजपासून...”,संकल्प म्हणाला.



सारसच्या डोळ्यात पाणीच आले व तो पटकन घरात पळाला. रविवार होता त्यामुळे सारसची आई गौतमी घरीच होती.सारस चा हिरमोड पाहून गौतमीचा संताप झाला.

“ काय रे हिजड्या... आमच्या अंगणात खेळतोस आणि आम्हालाच खेळू देत नाही..”

“ओ काकू,काहीही काय बोलता.. जरा तोंड सांभाळून बोलत जा..”

“ तू बोलतो का नीट...मवाली,टुकार,हुशाऱ्या करतोस. थांब तुझ्या बापाकडेच येते मी..”

साधनाने मिहीरला घरात घालून घेतले.गौतमी स्कुटी घेऊन संकल्पच्या घरी धडकली. गौतमीने दरवाज्याची बेल वाजवली संकल्पच्या वडिलांनी दरवाजा उघडला.

“ तुमच्या मुलाला तुम्ही आवरून घ्या.. दादागिरी करतो तो...उद्या जर मी त्याला झोडून काढले तर भांडण करायला येऊ नका.”, दरवाजा उघडतात गौतमी चढ्या स्वरात बोलू लागली.

“अहो ताई,घरात तर या. बोलू आपण.”संकल्पची आई म्हणाली.

गौतमी थोडी शांत होऊन घरात शिरली.

“ हे बघा, तुमचा मुलगा मला माझ्या मुलासारखाच आहे.म्हणून सांगते तुम्ही सर्वप्रथम मिहीर व रोशन पासून त्याची संगत तोडा. अत्यंत वाईट मुले आहेत हो ती.”

“अहो मॅडम मीच संकल्पला कीदरून गेली आहे. माझ्या गुरु महाराजांकडे दर रविवारी मी त्याला सत्संग मध्ये घेऊन जाते पण काही फरक पडत नाही. घरात पण त्याच्या बहिणीला तसेच करतो तो.”

“अहो ती मिहीरची आई.. किती अफेअर्स आहेत त्या बाईचे आणि तिच्या इशाऱ्यावर तुमचा संकल्प उड्या मारतो. समजवा त्याला. येते मी.”,गौतमी बेचैन अवस्थेतच तेथून उठून आली.

संकल्प घरी आला. गल्लीतील सर्व मुले सोबत घेऊन आला पण आई-बाबांनी जास्त संताप केला नाही हे पाहून बालकनीतूनच इशारा करून त्याने मुलांना घरी पाठवून दिले. गौतमी पण घरी आली. सारस पण चिंतेतच बसला होता.

“ जसं मी कुत्र्यासारखं त्याला काहीही बोलून गेली तू पण तसेच करायला हवे होते. जेव्हा आयुष्यात टारगट मुले भेटतात तेव्हा तोंडात येतील त्या शिव्या देऊन मोकळे व्हायचे.”

“ हो आई,असंच करेल मी आता, जेवण दे लवकर. मला भूक लागली आहे.”

सारसने गौतमीचा मूड बदलण्याचा प्रयत्न केला. गौतमीने खिचडीचा कुकर लावला. तेवढ्यात देशमुख येऊन बसले.

“चिंता करू नकोस.तू मला मुली सारखी म्हणून सल्ला देतोय.”

“ कसे लोक असतात ना.. आई दिवसभर सत्संग मध्ये,वडील दिवसभर दुकानात आणि पोरगा

वाऱ्यावर,मी म्हणते आपल्याला वेळ नाही तर मुले जन्माला घालूच नयेत की..", देशमुख गालातल्या गालात हसत होते.

" मला तर प्रश्न पडलाय मोबाईल मुळे मुले बिघडली आहेत की आई वडील...ती रोशनची मम्मी रात्रं दिवस प्रतिलिपीवर गोष्टी वाचत असते. रात्री दोन पर्यंत गोष्टी वाचते आणि दुपारी झोपा ठोकते आणि तो रोशन फिरतो की मग बेवारश्यासारखा.. याला त्याला आवाज देत. मला सारसला वेळ देता येत नाही म्हणून मी किती गिल्टी फील करते... काय सांगू तुम्हाला...आणि या बायांना वेळ असून त्या स्वतःच्या मुलांकडे लक्ष देत नाही.."

"बस,बस... किती त्रागा करून घेशील. शांत हो."

"माझी चिडचिड सारस मुळे होते आहे. खेळणं ही त्याची गरज आहे देशमुख काका.बाबा नाही,मोबाईल नाही, टीव्ही नाही, आणि आता खेळणंही नाही. संकल्प, मिहीर आणि रोशन सोडून जी उरलेली मुले आहेत ती पण त्याच्यासोबत या गुंड पोरांमुळे खेळत नाही. त्यामुळे तो खूपच उदास होऊन जातो."

"मी त्याला उद्यापासून बॅडमिंटन खेळायला घेऊन जाईल एका हॉलमध्ये. चिंता करू नकोस"

" पण मित्र तर हवेत ना आयुष्यात.. अगोदरच तो खूपच एकलकोंडा झालाय.."

" होईल सगळं व्यवस्थित. येतो मी."देशमुख काका पण आता सारसबाबत विचार करू लागले.

" बिचाऱ्याचा काय दोष? का म्हणून ही टारगट मुले खेळू देत नाही..यांची काय एवढी गुंडगिरी.. आठवी नववीची तीन माकडे. एका निरागस बालकाचे बालपण हिरावून घेत आहेत.ती साधना..तीच त्यांना खत पाणी घालते आहे.. बघतोच आता एकेकाला...", देशमुख काका मनात विचार करत करतच झोपले.

संकल्पच्या घरीही जेवणे झाली.

"काय रे कारट्या, किती जीव घेशील.."

"मी काय केलयं...उलट तीच बाई मला हीजडा म्हणाली..हीजडा शब्दाचा अर्थ तरी समजतो का तिला...मीहीरच्या आईला विचारा तुम्ही.माझी काहीच चूक नव्हती."

"बस कर.जीव कंटाळला आता तुला.",संकल्पचे बाबा वैतागून घराबाहेर निघून गेले.

गौतमीही दुसऱ्या दिवशी शाळेत आली. वर्गाच्या बाहेरच एक पालक उभे होते.

"अहो मॅडम, हा खूप टीव्ही पाहतो. याला काही सांगा ना"

" टीव्हीचे रिचार्ज मारू नका. त्याला सांगण्यापेक्षा तुम्हालाच सांगते मी ",गौतमी चिडूनच बोलली.

" काय गं..एवढी काय चिडचिड करतेस तु..", चौधरी मॅडम म्हणाल्या.

"बरोबरच आहे ना मग. मुलं मोबाईल पाहतात. टीव्ही पाहतात.यात शिक्षक काय करणार.स्वतःचा दोष कोणाला दिसत नाही पालकांनी स्मार्टफोन वापरला नाही तर मुलांना तरी कोठून मोबाईलचं व्यसन लागणार आहे. बरं सगळ्यांनाच अँड्रॉइड मोबाईल का लागतो तेच समजत नाही मला. साधे मोबाईल कोणीच वापरायला तयार नाही. आजी बाबा पण नाही आणि खुशाल म्हणतात मुले बिघडली आहेत. माझे तर ठाम मत आहे पालकच बिघडले आहेत."

"बरोबर म्हणतेस तू ",चौधरी मॅडमांनी दुजोरा दिला.

दिवसा मागून दिवस जात होते. मुले गल्लीत खेळत होती.गोंगाट घालत होती. सारस बिचारा घराच्या खिडकीत उभे राहून हिरमुसून दिवसभर त्यांची गंमत पहायचा. देशमुखांना आता हे सहन होत नव्हते.

देशमुखांनी एक दिवस रोशनच्या आईला गाठले. सकाळचे आठ वाजले होते.

"ताई मी काय म्हणतो तुमचा मुलगा चुकतो आहे."

" तुम्हाला काय शिकवायचे आहे. मला पहिलेच माहिती आहे काका..अहो मुलं या वयात खेळणार नाही तर केव्हा खेळणार तुमच्या घरात मुले नाहीत म्हणून तुम्ही या लेकरांचा राग करतात."

देशमुखांना रागच आला.

" अहो खेळाना. ओपन स्पेस मध्ये खेळा. पैसे द्या. मजूर लावा.तेथील गवत काढून घ्या.खुशाल खेळवा तुमच्या पोरांना. नियमात जे आहे ते करा."

"आमच्या पोरांचा नाद सोड देशमुख.निघ इथून.",रोशनचे वडील श्रीयुत बिराजदार म्हणाले.

देशमुख ताबडतोब निघाले. संध्याकाळी रोशन पाच वाजता क्लासला गेला. तो घरी परत आलाच नाही. रात्रीचे दहा वाजले.रोशनची आई वसुधा प्रत्येक गल्लीत मुलाच्या नावाने आरोळ्या मारू लागली. रोशनचे वडील श्री बिराजदार कंपनीतून घरी आले. पोरगा घरी नाही पाहून वसुधावर संताप करू लागले.

"तुझ्या या मालिका आणि तू..दिवसभर फक्त टीव्ही... एकच मुलगा दिला आहे देवाने.. बारा वर्षांनी नवसाचा...तोही तुला सांभाळता आला नाही... करतेस काय तू दिवसभर... क्लास सात वाजता सुटतो आणि तू.. आता त्याचा तपास करते आहेस."

" अहो तो रोज उशिराच घरी येतो. मित्रांसोबत गल्लीत गप्पा मारत बसतो. रोजच नऊ वाजता त्याला."

" होपलेस बाई आहेस तू.. तो घरी येताच तुझ्या छातीवर बसेल म्हणून तूच त्याला घराबाहेर फिरायचं वळण लावलेस. तुझ्या किटी पार्टी, योगा क्लास, भिशी सगळं आटोपत तुलाच नऊ वाजता घरी यायला."

शेजारी आता बोलू लागले.

"पहिले रोशनला शोधा. तुम्ही नंतर भांडा बिराजदार."

बिराजदार टूव्हीलर घेऊन निघाले. त्याच्या सगळ्या मित्रांकडे जाऊन आले. पूर्ण गाव पालथे घातले.रात्रीचे दोन वाजले. शेवटी पोलीस स्टेशनला तक्रार करून आले. गल्लीत एक भीषण प्रकारची शांतता निर्माण झाली.सारस ही आता घाबरून देशमुखांकडे जाऊन बसत असे. गल्लीतील मुलांचे खेळणेच बंद झाले. मिहीर व संकल्प सोबतच क्लास व शाळा करत असत.

एके दिवशी सकाळी सात वाजता ते सायकलवर शाळेत जायला निघाले. तेवढ्यात दोन रुमालाने चेहरा बांधलेले दोन व्यक्ती त्यांचा पाठलाग करू लागली. दोघेही घाबरत घरीच पळून आले. पुन्हा कधी शाळेत जाणार नाही असे म्हणायला लागले.

कॉलनीत पोलीस आले. प्रत्येकाची चौकशी करू लागले. रोशन मिहिर व संकल्पच्या आईने गौतमी वरच संशय घेतला.

" हिच्या सारसला आमची पोरं खेळू देत नाहीत म्हणून हीच आम्हाला त्रास देते आहे.",साधना पोलिसांना म्हणाली.

" अगं ये बये..बाहेरचे बारा कुत्रे ताजे करणारी तू माझ्यासारख्या चारित्र्यसंपन्न स्त्री वर बोट ठेवतेस. आज रात्री कोण तर दुसऱ्या रात्री कोण. तुझ्या औकातीत राहा.वेश्या कुठली.", गौतमी खेकसलीच.

मिहीर समोर साधनाचा असा झालेला अपमान साधनाच्या मनाला खूपच लागून गेला.

संकल्प व मिहीर एकमेकांच्या घरी जाऊन बसू लागली. रोशन सारखे आपण पण गायब होणार की काय त्यांना भीती वाटू लागली. कॉलनीत आता कोणीच खेळत नव्हते त्यामुळे सारस पण शांत व प्रसन्न राहत होता. संध्याकाळी देशमुख त्याला बॅडमिंटन क्लासला घेऊन जात होते. त्यामुळे शारीरिक थकवा येऊन तो रात्री पण लवकर झोपत असे. रोशनचे आई-वडील मुलासाठी खूप चिंतेत होते. एक आठवडा झाला तरी रोशनचा पत्ता लागत नव्हता. श्री बिराजदार क्षणाक्षणाला वसुधालाच दोष देत होते.

" धबधबे,किल्ले, शॉपिंग, हॉटेलिंग आणि फोटो... बसं एवढंच येतं तुला... आई म्हणून कधी त्याच्यासोबत फेरफटका मारला का.. गप्पागोष्टी केल्या का... तुझा वेळ जर माझ्या रोशनला मिळाला असता तर आज ही वेळ आली नसती"

वसुधा थोड्या थोड्या वेळाने बेशुद्ध पडत होती. संकल्प व मिहीरचे पालक ही घाबरले होते. आपल्या मुलांसोबत पण असेच काही घडले तर.. या विचाराने त्यांना पण झोप लागत नव्हती.संकल्पचे आई-वडील व साधना गौतमीला घरी जाऊन भेटले.

" आम्ही माफी मागतो तुमची.आमच्या मुलांमुळे तुम्हाला खूप त्रास झाला पण यापुढे सारस ला कॉलनीत काही त्रास होणार नाही याचा शब्द आम्ही देतो."

"रोशनच्या गायब होण्यात माझा हात आहे असं वाटतंय की काय तुम्हाला. अहो मी पण एक आई आहे व माझेही एक लेकरू आहे. मी कशी अशी वागू शकते. विश्वास ठेवा माझ्यावर."

"तसं नाही. आमची चूक आम्हाला समजली म्हणून आलो. एवढेच."

देशमुख खिडकीतून सगळी गंमत बघत होते.

"आले एकदाचे वठणीवर.तोंडाने आरोळ्या मारून सांगत होतो. पोरांना आवरा... तेव्हा कोणी लक्ष द्यायला तयार नव्हते.आताच रोशनला सोडून देतो"

देशमुख खिडकीत उभे राहून स्वतःशीच बोलत होते. देशमुख यांनी पाठ फिरवताच त्यांना त्यांच्या मागे सारस दिसला.

"अरे लबाडा, तू केव्हा आलास ?"

"केव्हाच पण बाबा हे बरे नव्हे.. जा आणि लवकरच सोडा त्याला."

"हो रे.. पण हे सिक्रेट कोणाला सांगायचे नाही हं "

एका तासातच रोशन झोपलेल्या अवस्थेत एका शेतात सापडला. पोलिसांचा फोन आला. बिराजदारांच्या जीवात जीव आला.सगळी कॉलनी त्याला पाहायला शेतात गेली. रोशनला पोलिसांनी प्रथम दवाखान्यात आणले.त्याला गुंगीचे औषध देण्यात आले होते. पोलिसांनी पुन्हा पुन्हा विचारूनही त्याला काहीच माहिती देता आली नाही.

" संध्याकाळी क्लास वरून घरी येत होतो.दोन माणसांनी स्प्रे मारला आणि डोळे बंद झाले यापुढे काहीच आठवत नाही.", रोशनच्या या वाक्यामुळे पोलिसांना तपासासाठी काहीच फायदा झाला नाही. रोशन संकल्प व मिहीर या तिघांची गुर्मी उतरली.पालक ही त्यांच्या वाईट सवयी बदलू लागले.देशमुखांना अपेक्षित असलेला बदल पालक व मुलांमध्ये घडून आला. सगळी मुले सातच्या आत घरात जाऊ लागली. कॉलनीतील सगळीच मुले सारस सोबत प्रेमाने राहू लागली. देशमुख खूप आनंदात सोफ्यावर बसले होते.

" काय बाबा आज एकदम खुश"

" हो..याच तीन मुलांनी मोठे होऊन माझ्या आर्यन सारख्या गरीब मुलाचा कॉलेजच्या रॅगिंग मध्ये जीव घेतला असता पण आता ती वळणावर आलीत. भविष्यात आयुष्यात ती कोणाशी उर्मटपणे वागणार नाहीत. माझा प्रयत्न यशस्वी झाला. सगळ्यात महत्त्वाचे माझ्या सारस बाळाला आता कॉलनीत खेळायला खूप खूप मित्र मिळाले. त्याला आता महागडे क्लास लावून बाहेर खेळायला जायची गरज नाही."

सारस गालातल्या गालात हसू लागला.

**अर्चना पाटील**
**अमळनेर**
**मो.8208917331**

# श्रावणधार





गावकुसात असता
धग नात्यांची छळते
दूरदेशी गेल्यावर
ऊब नात्यांची कळते

काही प्रसंगात नाते
असे नडाया लागते
कधी मंगल कार्यात
नाते अडाया लागते

मधुनच या नात्यांची
येते आठवांची सर
जाते गोकुळी घेऊन
लागी श्रावणाची धार

**सूर्यकांत घिवारे**
**सोलापूर**
**मो.९८९०६४५०१८**

# गझल



तुझ्या नावातले अक्षर, जणू अविभाज्य होतो मी...
कधीकाळी तुझ्यासाठी, तुझे साम्राज्य होतो मी...

कुणीही येत गेले अन्, मला भागत पुढे गेले.
असा आयुष्यभर अवघ्या, जगाचा भाज्य होतो मी....

जराही लांघता आल्या, कुठे माझ्या मला कक्षा.
जुन्या सीमांत गढलेले, अखंडित राज्य होतो मी...

कपाळावर पुसट रेषा, कुणी लिहिल्यात नशिबाच्या
पुढे कष्टात होतो पण, फळाला त्याज्य होतों मी...

गुन्हे अन्याय अत्याचार भ्रष्टाचार बघणारे.
गुलामी लोकशाहीचे, नवे गणराज्य होतों मी...

**अमोल गोंडचवर**
**अकोला**
**मो.८२७५३११९९६**

# दबलेल्या हुंदक्यांचा प्रवाह..!



चेहऱ्यावर आठ्या पडल्या नि हाडं कड कड आवाज करत हिंदोळ्याच्या चोचीत दाने टिपायला लागली. चिवऽचिवऽ करत पैंज लागायची पाठीला पोट लागलेल्या पोटाची. खुपसलेले दिसायचे डोळे त्या चेहऱ्यावर अन् दिसायचा वर्तुळ स्वतःची परिभाषा सोडवित. सूत्रे वापरायची जीर्ण झालेल्या काळाची अन् पायवाट मोडायची या नव्या युगाची. किती संयमी व्हावं जगणं अन् जीवनात मैल अंतरावर ते खळखळून हसणं. मुक्या झालेल्या चौबाजूही सांगतात कधी गप्पा गोष्टी एकटे पणाची भूक भागवताना. चालताना मात्र चरा पडायचे पायाला अन् अलगत घाव काळजाच्या कप्प्यात छाप सोडायचं स्वतःला जाणीव करून देत. कर कर आवाज देत हाडं कधी संगीतमय कट्यार झालेत कळलेच नाही या गोडवान जगण्यात. जगणं सुखद होत होतं अन् पानगळ मूळकूज होऊ लागली एक एक गळत होतं पानातच आठवणींचा पसारा त्याच सवे एकीकडे जळत होता आशा अपेक्षांचा मोह मायात दडून असलेला कडूवान दुःख अश्यातचं अन् मुळात रुजत गेलं बळ म्हणजेच. स्वबळावर लढण्याचा निर्णय हा इतिहास रचतो, घडवितो जगण्याला प्रतिमा, उत्तर अन् प्रश्न सुध्दा करतो. हयातीच्या जगण्यात त्या घामात अखेर आयुष्य वेचून मिळवलेल्या त्या मातीचा रंग कधीही दूर होणार नाही याची खात्री असते अन् एकीकडे पोटाची अन् पाठची केव्हा आपल्याला आपली किंमत कळवून देईल याचं नेम नाहीच.

करपलेलं रान छाताडावर घेऊन फिरनं अनपेक्षित मिळणार वरदान जगण्याची प्रेरणा देत जगण्याची व्याख्या कळवून देत, इतकंच नाही तर जगणं पण बदलून देते. आपुलकीचा स्नेह जेव्हा जळतो, अंतरीच्या स्मशानभूमीत नि राख होते आप्त मनाची अन् धूर निघतो विश्वास, अपेक्षांचा तीळ तीळ तुटून जळणारा कोळसा होतो हा निष्पाप देह. तेव्हा स्वबळ नवं सपान अन् इतिहास रुजायला सुरुवात करते. नात्यांच्या घट्ट मुळाशी जुळलेली नाळ अपवाद ठरताना वाद होतात स्वतःशी. गुन्हेगार पण आपणच आणि स्वतःला काय ती सजा द्यायची याला मोकळे पण असतोच आपण. सृजन, कृतज्ञता या शब्दांची उत्पत्ती आता होणे या देहाकडून कठीण झालं. बहरलेला कधी काळचा गुलमोहर हल्ली बाभळी काट्यांचा रूप रुबाबदार घेऊन सलते आतल्या आत. फळे नजरे समोरून अलिप्त झालेत तेव्हा, जगण्यातलं जगणंपण अरुची होते.

डोळ्यावर छत नसलेलं आभाळाची छाया देणाऱ्या पाखरांना धुक्यानं ओठ भिजवून त्यांना पाणी - पोटभर अन्न पुरवायला हवे. कारण आता पंख थकून गेलीयेत. आभाळाचं व्याप वाढत गेला त्याचे पाय जमिनीला टेकलेले नि नात्यांना वांझोटं नामकरण झालं. पोटाची सुद्धा आता पाठी मागून पाठ दाखवून निघालीत अन् उसनं फेडतात कागदी नोटांच्या दमानं. पण कधी लावलेला लळा, ओढ, कागदी नोटांच्या दमानं ऋण फेडता येत नाही, आणि थकलेल्या वयात पाखरांनी अशी ऋण फेडण्यासाठी मुळीच माय बाप पिल्यांसाठी करत नाही. तेव्हां बापाचं मन बोलतं त्याच्याशी. स्वतःची बाजू मांडताच येत नाही. नेहमी प्रमाणे अपूर्ण ठरतो आयुष्य चाळताना मनातलं मनातच राहून जातं. स्वतःच स्वतःला दफन करून निजूनही जातो.. स्तब्ध स्तब्ध होत सारखं. दफन करून झालं की त्यावर नवं चैतन्याने बीज रोवून अंकुरही येवून जातात. मात्र त्यालाही मनासारखं वागता येत नाही. भौताली ताणतणावाच्या खलबत्त्यात मन कुटून घेतलं जातं चांगलंच..! पुन्हा पालवी फुटली की नको तो वृक्षाला प्रश्न पडतो किमान.? विचार करायचा जाताच थरकाप सुटते. मन नकार देतो. पण आशा मनाला ढोसर देतं म्हणत. इतक्यातच हरलास का ? लढ रे पुन्हा., तू सक्षम नाहीस लढा द्यायला म्हणून तू कुटतेस. स्वतःला सक्षम कर. घाव झेलून झेलून खचू नकोस. त्यांनाच ढाल कर. स्वतःची कृपा बनव. मजबूत हो. तुला खलबत्त्यात कुटता कुटता हात दुखला पाहिजे. खलबत्त्याचे दोन भाग झाले पाहिजे पण तुझं एकही कण तुडता कामा नये. लक्षात ठेव रे नेहमी. खचून पडू नकोस. स्वतःचं अस्तित्व टिकवून ठेव. फक्त संपवू नकोस. फक्त संपवू नकोस...

इथ प्रत्येक व्यक्ती आपापली बाजू बळकटपणे जोपासत आहे. स्वतःच्या चुका लपवून दुसऱ्याला दोष देणं ही दुनियाची आगळी वेगळी रीत आहे. दुसऱ्याला कितीही समजून घेतलं. कितीही चांगलं सांगितलं तरी समोरचा आपल्याला चुकीचं समजून सोडून जातो, दुसऱ्यांचा विचार करता करता स्वतःच राहूनच जातं... गुंतागुंतीच्या नात्यात स्वतःची फसवणूक स्वतःच करतो आपण अन् शेवटी कळते हे जीवन आहे की गळाफास...

**नितेश खरोले**
**पलखेडा**
**मो.8329454924**

# आयुष्य आहे अनमोल



छोट्या छोट्या गोष्टींनी
विचलित व्हायचं नसतं
आयुष्य आहे अनमोल
ते जगायचच असतं

तडजोड, संयम आणि धीर
असावी आयुष्याची त्रिसूत्री
आनंदाने जीवन जाईल
आहे शंभर टक्के खात्री

आपल्याजवळ काय नाही
या पेक्षा काय आहे ते बघा
काही गोष्टी जोडत
काही वजा करीत जगा

आयुष्याचं गणित
एवढं काही अवघड नसतं
आपणच त्याला कधी
खूप जड केलं असतं

प्रत्येक प्रश्नाला एक
उत्तर नक्की असतं
वेळ लागेल शोधायला
पण मिळणार नक्की असतं

आयुष्यावर प्रेम करा
भरभरुन जगा
काट्यातला गुलाब कसा
हसतो जरा बघा

**सौ. कविता अजय दाते**
**पुलगाव**
**मो.8623808455**

# तो आला रंगमंचावर



रंगमंचावर असताना भावलेली कला
संगीतातून सरळ प्रेक्षकांच्या हदयी
स्थान मिळवते ती अश्रू दासळताना
किती लपलेली मोहमाया अश्रूत वाहून जाते...!

दफावर थाप काय ? आणि हार्मोनियमवर
स्वर काय ? कसा असतो हदयी संगम
तो स्वरशब्दानी उफाळून आला
अन् कंठ ही कोरडा पडू लागला शारदे...!

कारण तिला आठवलेला क्षण
अश्रूदायकच आहे अवघ्या मायबाप
लेकीचा नाळेचा संबंध तुटून जातो
आणि हंबरडा फुटावा तो ही किंकाळीचा...!

हे कधीही दु:ख विसरण्यासारखे नाही
झालेल्या अपघाताला अश्रूचाच आधार
मायबापाचा वळणावर घात होतो
तिच्या कानात तापलेले तेलासारखे शब्द पडावे...!

इथे किती भयंकर परस्थितीतून जावे
लागते हे स्त्रीलाच कळू शकते
समाजाची भाषा अनेक नृत्य करते
हे तिने अवघ्या क्षणात जाणिले

सत्य झाकले जाते दुनियेत
याची खबरदारी पुढे ही मृत्यू
आणि मागे ही मुत्यू अटळच आहे
हा फसवा रंगमंच फक्त खो-याने माती ओढतो

मडे ही खांद्यावर घेताना
माती देतो चंदनशब्दाची माणसाला
अन् चालताना मशाल पेटावी,
ती ही मायबापाचा मृत्यूची साक्ष देता

**उमेश लक्ष्मण परवार**
**गोवा**
**मो.९६३७१६४१८९**

# तरुणांची सामाजिक जबाबदारी



अनाकलनीय अज्ञाताचा अंधारा प्रवास म्हणजे आयुष्य. हे आयुष्य अतिशय रमणीय सौंदर्याने नटलेले नंदनवन असते. सतत कशाचा ना कशाचा तरी विचार करत करत राहणे हा मानवी स्वभाव आहे. माणसाचा जसा आहार-विहार असतो तसा तो विचार स्फुरत असतो. इंद्रिये कामात असतील तर मनही त्यात गुंतून राहते. रिकामा वेळ मिळाला रे मिळाला की मन कार्यरत राहते. आकाशाला गवसणी घालणाऱ्या स्वप्नांनी अभिमंत्रित झालेले तरुणांचे हृदय म्हणजे अनंत शक्यतांनी ठासून भरलेली अलिबाबाची गुहाच असते. सुताने स्वर्गाला जाणे हा तरुणांचा स्थायीभाव असतो. तरुणाच्या हृदयाचे प्रत्येक स्पंदन आव्हाने पेलण्याच्या ऊर्जेने भारलेले असते. अंधाराच्या कातळांवर शिल्पे कोरण्यात त्याला धन्यता वाटते. त्याला सतत खुणावत असतात स्वतःला सिद्ध करण्याची संधी देणारी आव्हाने. स्वतःचे अस्तित्व सिद्ध करायचे असेल तर कोणतेही दिव्य करायला तो एका पायावर तयार असतो म्हणूनच तरुण युवक विचार करतो की आपण घरातल्या जबाबदारी बरोबर समाजाची जबाबदारी उचलायला पाहिजे. आपण समाजातल्या वृद्धांकडे, बालकांकडे व तरुण युवतींकडे जास्त लक्ष दिले पाहिजे. आत्ताच्या या कठीणतर रोगांमध्ये जरा कोणी आजारी पडलेले दिसले तर तरुण त्यांच्या मदतीसाठी धावून जातो. मग त्यांच्या तपासण्या करणे, त्यांना हॉस्पिटलात दाखल करणे, त्यांच्या जेवणाखाण्याची व्यवस्था करणे सर्वकाही हा तरुण बघत असतो. यासाठी त्याला कशाचीही अपेक्षा नसते. फक्त सगळ्यांना बरे वाटावे, सगळे सुखात असावेत, एवढेच त्याला वाटत असते.

तशीच लहान मुले ---ज्यांना आता शाळेच्यामुळे मोबाईल हातात पडला आहे पण अभ्यासाव्यतिरिक्त इतर काही मोबाईलवर पाहत नाहीत ना! यावर या तरुणांचे जास्त लक्ष असते. नाहीतर लहान वयातच नाही त्याची समज लवकर यायची. समाजात जो आत्ता बलात्कार बोकाळला आहे त्यासाठी ते तरुणांना सांगत असतात की आपल्या बरोबरच्या मुलींचा तुम्ही आदर करायला शिकले पाहिजे. यावरून पूर्वीच्या काळची गोष्ट आठवली.पूर्वी एका छपराखाली शाळा भरायची. मुले-मुली एकत्रच बसायची.तेव्हा एका मुलाने आपल्या आईला विचारले," अग, मुलींशी कसे वागावे? मला काही कळत नाही."

तेव्हा आई म्हणाली," घरात जसे तू आपल्या वहिनीशी वागत आहेस तसेच तू वर्गातल्या मुलीची वाग." केवढे हे चांगले संस्कार!

असे सर्वच जण वागले तर----- परस्त्री मातेसमान कारण वहिनी मी आपल्या आई सारखीच असते. पण लक्षात कोण घेतो!

मुलांना वाचनाची आवड निर्माण केली पाहिजे शाळे व्यतिरिक्त अवांतर वाचन त्यांनी केले पाहिजे त्यासाठी त्यांनी मृत्युंजय, छावा, ययाती यासारख्या कादंबर्या वाचल्या तरच त्यांच्या जीवनामध्ये खूप फरक पडत जाईल. वाचन संस्कृतीला बळ देण्याचे आणि पुढील पिढीत संक्रमित करण्याचे काम लेखक, प्रकाशक, वितरक, पुस्तक विक्रेते, ग्रंथालये, कुटुंब, समाज, अवतीभवतीचा परिसर आणि सामाजिक संस्था हे सातत्याने करत असतात.मरगळ आलेल्या स्थितीत पुन्हा चैतन्य देण्याचे काम पुस्तके करतात. फक्त विचार सुंदर असून आयुष्य सुंदर होत नाही तर ते विचार शुद्ध भावात परावर्तित झाले म्हणजे जगण्याला अर्थपूर्णता प्राप्त होते.

तसेच खेळाच्या बाबतीत--- पूर्वीचे खेळ बिन पैशाचे सर्वजण विसरूनच गेलेले आहेत. आता म्हणजे या खेळाला एवढी फी भरा त्या खेळायला एवढी फी भरा यातच आई-वडील पण आपल्या जीवनाचे सार्थक मानत असतात. खरे पाहता लंगडी, कबड्डी, खोखो, सूरपारंब्या, लपाछपी खेळताना शरीराचा व्यायाम होत असतो. पण लक्षात कोण घेतो! जगाच्या पाठीवर प्रत्येक तरुणाला वाटत असते की आपण स्पेशल आहोत आणि परमेश्वराची प्रत्येक निर्मिती हे एकमेव अद्वितीय अशी आहे. एखाद्या तरुणाचा उपयोग कसा करून घ्यावा यासाठी त्याच्या डोक्यात सारखे चिंतन सुरु असते. या तरुणांना सतत आई-वडिलांचा भरपूर पैसा समोर दिसत असतो त्यामुळे त्यांना वेगवेगळी व्यसन लागतात. या व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी या युवकांनी मदत केली पाहिजे. व्यसनांपासून दूर राहण्यासाठी त्यांना रक्तदानाची माहिती समजावून दिली पाहिजे. आपल्या रक्तदानामुळे इतरांना जीवदान मिळते ही केवढी समाधानाची बात असते. हे एकदा त्या युवकांना पटले की मग रक्तातील प्लाजमा, प्लेटलेट्स हे कॅन्सर डेंग्यू सारख्या आजारांसाठी तरुण वर्ग द्यायला तयार होईल. नुसते रक्तदान असे नाही तर डोळे दान करणे बाकी सर्व अवयव दान करणे याची माहिती ते वारंवार या पिढीला करून देत असतात. अन्नदान यासारखे पुण्य नाही. स्वतः हॉटेलमध्ये जाऊन खावा आम्ही त्याबद्दल काही म्हणत नाही पण अजून काही जण की ज्यांना कधी काहीच खायला मिळत नाही त्यांच्याकडे ही लक्ष राहू दे व त्यांना शिळे नाही पण चांगले सुग्रास जेवण जर दिले तर ते

तुम्हाला आशीर्वादच देतील.आपल्या फोर व्हीलरचे कसे अधून-मधून सर्विसिंग करावे लागते म्हणजे मग कुठेही लॉंग ड्राईव्हला जाताना गाडीचा प्रॉब्लेम येत नाही. तसेच आपल्या शरीराचे सुद्धा सर्विसिंग करून घेतले पाहिजे म्हणजे "आयुर्वेदिक पंचकर्म शरीरशुद्धी" आतून-बाहेरून करून घेतली पाहिजे म्हणजे आपल्याला डॉक्टरांची गरजच पडणार नाही व समाज कार्य करण्यासाठी आणखी मोठा तरुण वर्ग तयार होईल. ते जसे म्हणतात ना "आपण जेव्हा दुसऱ्या साठी चांगले करत असतो तेव्हा आपल्यासाठी सुद्धा कुठेतरी चांगले घडत असते'

जीवनात काय करावे हे रामायण शिकवते
काय करू नये हे महाभारत शिकवते व
कसे वागावे हे भगवद्गीता शिकवते

पण हे सगळं करण्यासाठी या सगळ्याचे वाचन करणे तितकेच महत्वाचे आहे नुसते वाचन नाही तर समजून उमजून घेऊन वाचन हे महत्वाचे आहे.

"हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है" या वाक्याची खोलवर जाणीव आजच्या परिस्थितीत सर्वांना करून देणे महत्त्वाचा आहे.

"चादर ओढ शंका मत करीयो
दो दिन तुमको दीन्ही"

असे संत कबीर आपल्या भजनात म्हणतात. जोपर्यंत आयुष्य आहे तोपर्यंत ते कसं जगायचं हे मात्र आपल्या हातात नक्की आहे. जितक्या लवकर हे आपल्याला समजेल इतक्या लवकर आपण आयुष्याकडे योग्य दृष्टिकोनातून पाहू कारण आयुष्यातील बराचसा वेळ झोपेत, नकळत्या बालवयात आणि वृद्धापकाळात जातो त्यामुळे हातात खरा उरलेला मिळतो तो समज आलेला तारुण्यातला, जागृतावस्थेतील, जागरूक असणारा, क्रिएटिव्ह काळ हातातून घालवून चालणार नाही. आपले प्रयत्न, आपले कर्म आणि आपले विचार यावर तरुणांचा ठामपणे कंट्रोल आहे म्हणूनच ते सामाजिक जबाबदारी स्वीकारतात व पूर्णपणे पार पाडतात. समाजाबरोबरच घरातील लोकांनाही व्यवस्थित सांभाळणे एक मोठी जबाबदारी असते. त्यांच्याकडे व्यवस्थित लक्ष द्या. वडिलांच्या करोडो शुक्राणूंची पैकी एकापासून आपण निर्मिलो. आईच्या लाखो बीजांडापैकी एका बीजांडापासून आपण निर्मिलो. जर त्यांच्या शरीराचा आपण एक हिस्सा आहोत तर मग ते आपल्या घराचा हिस्सा ते का असू नयेत याचा प्रत्येकाने विचार करावा. आपल्या घरातील आजी आजोबा, आई वडील नामक संस्काराच्या विद्यापीठांना जर आपण जतन नाही करू शकलो तर सामाजिक जबाबदारी ला काय अर्थ राहिला! हे सर्वांना सांगण्याचे काम तरुण करत आहेत हीच मोठी सामाजिक जबाबदारी नाही का?

**सुतेजा दांडेकर**
**सातारा**
**मो.9423318452**



# स्त्री शक्ती



स्त्री अनेक भूमिका पार पाडत असते. स्वतःच्या इच्छा, आकांक्षा बाजूला सारून ती इतरांसाठी जगत असते. कधी आई, कधी मुलगी, कधी बहीण तर कधी पत्नी अशा विविध भूमिका पार पाडत असते. या भूमिका पार पाडताना प्रत्येक व्यक्तीचं ती मन जपत असते. स्वतःची ओळख बनवत आपल्या घराला घरपण देऊन सर्वकाही हसून सांभाळणारी एक स्त्रीच असते.

दोन्ही घरे प्रकाशित करून तिच्याकडे असणारे प्रेम, भावना, आपुलकी, संस्कारांनी, विचारांनी ती सर्वांचे आयुष्य सुखी ठेवण्याचा प्रयत्न करीत असते.

घरातल्या सर्व जबाबदाऱ्या पूर्ण करत गृहिणींपासून ते नोकरी करणाऱ्या स्त्री शक्तीच्या कार्याना मानाचा मुजरा

या देवी सर्व भुतेषु शक्तीरूपेन संस्थिता। नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।

जसे प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्री उभी असते. तसेच प्रत्येक कर्तृत्ववान स्त्रीच्या मागे एक पुरुष उभा असतो. स्त्री मनाने हळवी असली तरी विचारांनी खूप कणखर असते. तिच्या पुढे येत असणाऱ्या संकटांना हिंमतीने सामना करण्याचे धैर्य स्त्रीमध्ये असते. जेव्हा कधी प्रश्न स्त्रीच्या अस्तित्वाचा येतो, तेव्हा तिचा स्वाभिमान ती जपत असते. कारण तिची ही ओळखच तिला सशक्त बनवून लढण्याची ताकद देत असते.

साऱ्या विश्वाचं सारं म्हणजेच स्त्री होय. प्रत्येक व्यक्तीने प्रत्येक घटकाने स्त्रीकडे आई, बहीण, मुलगी या दृष्टीने पाहिल्यास समाजामध्ये होणार्या अत्याचारांना अळा बसेल, स्त्रियांचा अपमान झाला तरी त्या एकच गोष्ट मनाला लावून बसतात. कारण त्यांना सतत ते टोचत असतं. आपण एवढ वाईट का? हा प्रश्न सतत मनाला लागत असतो.

मला सर्व समस्यांची माहिती आहे. या भ्रमात न राहता ज्या गोष्टी पुरुषांना समस्या वाटत बसतात त्या स्त्रियांकरिता खूप मोठ्या समस्या असतात. हे जेव्हा पटते तेव्हा खूप साऱ्या समस्यांचे निराकरण होते. आज सर्वच क्षेत्रामध्ये स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने कार्य करीत आहेत. समाजामध्ये होत चाललेले बदल यांमुळे 'चूल आणि मुलं' फक्त न करता स्त्रिया नोकरी -व्यवसाय करताना त्यांच्यासमोर येणारी सर्व आव्हाने स्विकारत त्या कार्य करीत आहेत. स्त्रीच्या शक्ती, तिचा अभिमान इतरांसाठीही प्रेरणा असणारी स्त्री तिच्या कर्तृत्वातूनच तिची खरी ओळख इतरांना समजत असते.

इतिहास घडवणारी अनेक कार्ये स्त्रियांनी केलेली आहेत. आज स्त्री प्रत्येक क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावत आहे. आजची महिला सशक्त आहे. प्रत्येक व्यक्तीने स्त्री कडे बघण्याचा दृष्टीकोन बदलून समाजामध्ये स्त्रीच्या कर्तृत्वाला वाव दिला आहे. आज प्रत्येक व्यक्तीची समाजाची प्रेरणास्थान ही स्त्री आहे. "प्रत्येक स्त्री कडे ती स्त्री म्हणून पाहण्यापेक्षा एक व्यक्ती म्हणून पाहा. खूप साऱ्या समस्या व अत्याचार कमी होतील. माँ जिजाउंचे संस्कार, पूण्यश्लोकअहिल्याबाई होळकर यांचे सामाजिक कार्य, शूर आणि थोर कर्तृत्व व नेतृत्व असणाऱ्या राणी लक्ष्मीबाईंचे विचार, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा स्त्री शिक्षणासाठीचा खडतर प्रवास यांमुळे समाजामध्ये प्रत्येक स्त्रीवर्गाला प्रेरणा मिळाली. प्रत्येक स्त्रीच्या मनाचा, मानाचा, तिच्या विचार व भावनांचा आदर, सन्मान, करून स्त्रीची ओळख जाणणे खरी गरज आहे. तिचं अस्तित्व जाणण्यासाठी प्रत्येक व्यक्तीचे विचार बदलायला हवेत. कारण ज्या कुटूंबात ज्या समाजात आणि ज्या देशात प्रत्येक स्त्रिला आदर सन्मान असतो. ते कुटूंब तो समाज तो देश प्रगतशील देश असतो.

**श्रावणी योगेश जाधव**
**रेटारे बुद्रुक, सातारा**
**मो.7498798831**



# बालपण दे गा देवा



बालपणीचा काळ सुखाचा
झोपायचो आईच्या कुशीत
धुंद परिमळ तुझ्या साडीचा
घुसळायचो लाडात खुशीत

आईने तिच्या हाताने जेवण भरविण्यासाठी मी केलेला हट्ट, बाबांनी पाठीवर घेऊन घोडा घोडा करण्यासाठी केलेली जिद्द, आजीकडे गोष्ट सांगण्यासाठी लावलेला लकडा आणि आजोबांनी कडेवर घेऊन फिरवण्यासाठी खोटे खोटे काढलेले अश्रु. सारे काही बालपणातच घडते. आजी आजोबांची नक्कल करताना प्रेमाने त्यांनी घेतलेला गालगुच्चा. त्यांच्या डोळ्यांतून आणि तोंडावरून ओसंडणारे कौतुक. बाबांच्या चष्म्यासाठीचा हट्ट. अशा एक ना शंभर कित्येक अशा बालपणीच्या आठवणी या हृदयात साठवल्या गेल्या आहेत.

किती रम्य ते बालपण
अविस्मरणीय आठवणी
हृदयाच्या एका कप्प्यात
झाल्यात जणू साठवणी

खूप सुखवस्तू नसले तरी खाऊन पिऊन सुखात गेलेले आमच्या पिढीचे बालपण. थोड्याशा गोष्टीतही समाधान मानणारे. भावंडात वाटणीसाठी भांडण!! पण त्यातही मजा यायची. खायला भाजीपाला, फळे आणि रानमेवा बक्कळ. परंतु बिस्कीट, केक, पाव, ब्रेड या गोष्टींसाठी जीव खालीवर व्हायचा. दुधाची तरी रेलचेल असायची.पण दुध पहाताच पोटात मळमळ सुरु व्हायची. घरच्या गाई-म्हशींचे निरसे दूध पिताना ओकारी आल्यासारखे वाटायचे. बेकरी पदार्थांचे खूप आकर्षण वाटायचे.

‘ असेल ते विटवा आणि नसेल ते भेटवा’ या उक्तीप्रमाणे घरात सहजी उपलब्ध असणारे पदार्थ नको वाटायचे आणि नसलेल्या गोष्टींचे अप्रूप वाटायचे. नातेवाईकांनी आणलेल्या एक ब्रेडचा पुडा पाच सहा भावंडे वाटून दोन दोन स्लाईस यायच्या. परंतु त्या खातानाही चेहऱ्यावर अपूर्व आनंद वाटायचा. बिस्किटेही पुरवून खायचो आणि केक,पेस्ट्रीज वाढदिवसालाच मिळायचे. त्यामुळे वाढदिवस जवळ आला की दिवस मोजायला सुरुवात व्हायची. वाढदिवसादिवशी आम्ही राजे असायचो. शेतातल्या ओल्या भुईमुगाच्या, तुरीच्या, हरभऱ्याच्या,चवळीच्या शेंगांची काहीच अपूर्वाई नसायची. कारण ते मुबलक प्रमाणात मिळायचे.चॉकलेट नि कॅडबरी तरी क्वचितच मिळायचे. पण आईला मस्का मारून पाच पैसे मिळवायचे. त्याच्या लिमलेट किंवा लेमनच्या पाच गोळ्या दिवसभर पुरायच्या. ऊस किंवा गुळाची काकवी खाताना मजा येत नसे. परंतु आईस्क्रीम आणि श्रीखंड खायला खूप आवडायचे.

सुट्टीत तरी शेतातली कच्ची वांगी, टोमॅटो आणि चिंचेचा पाला हाच नाश्ता असायचा. आता मात्र वाटते ‘गेले ते दिन गेले’. हल्लीच्या पिढीला सर्वकाही आहे परंतु आमच्या बालपणीचा आनंद काहीच मिळत नाही. सुट्टीत आट्यापाट्या, कबड्डी खेळताना भले मोठे अंगणही कमी पडायचे. कोणाच्या घरच्या खिडकीची काच फुटण्याचे भयही नसायचे.घरे लांब अंतरावर असल्याने पळायला भरपूर संधी असायची. त्यामुळे चेंडूफळीने चेंडूवर खचून टोला मारला जायचा आणि दोघे तिघे चेंडू शोधण्यात गुंतून जायचे. किती सुंदर नि रम्य बालपण होते ते........

घरातून आईची शिव्या बोलणी खायला नकोत, कोणी मारेल, पळवेल अशी भीती नाही. मुलगा चुकेल ही धास्ती नाही. संपूर्ण गाव आमचे हूंदडण्याचे ठिकाण. मुलगा पोहायला गेलेला हे आईला तो घरी डोक्याला तेल लावायला आल्यावरच कळायचे. मुलगी कुठे खेळते? तिच्यावर अत्याचार होईल का? कुणी पळवून नेईल का ?अशी धास्ती पालकांना कधीच वाटली नाही. दिवसभर उन्हातान्हांत अनवाणी पायांनी ओढ्याच्या किंवा नदीच्या काठाने उंडारत रहायचो. ना भुकेची पर्वा ना आईच्या माराची भीती ! सुट्टीचा काळ म्हणजे मजा, उड्या मारणे आणि मनसोक्त हुंदडणे. नदीत किंवा विहिरीत दिवसातून किती तरी वेळा पोहायला जाणे,सायकल वरून कित्येकदा पडलो, खरचटले, लागले. पण आईपर्यंत ही बातमी पोहचतच नसे. घराबाहेरच जखमेला झाडपाला लावून औषधोपचार केला जात असे. नाही म्हणायला बाबांचा थोडा धाक होता. परंतु बाबा काही कारणाने चिडले की आजीच्या पाठी लपायचे. मग सर्व शिक्षा माफ होत.

संध्याकाळी मात्र हात-पाय धुऊन ओटीवर बसून परवचा आणि मनाचे श्लोक, रामरक्षा म्हटली जाई. नंतर आजीपुढे सर्वजण कोंडाळे करून बसत असू. आजी तिच्या पठडीतल्या कथाही रंगवून सांगायची. कथा संपल्या तर ती रामायण, महाभारतामधील प्रसंग सांगायची. कधीकधी बाबा, काका आणि आत्याच्या बालपणीच्या खोड्या सांगताना रंगून जायची. किती चांगले दिवस होते ते!......

किती खेळलो झोके
वडाच्या फांद्यावरती
जपले मैत्रीचेच नाते
उरल्या आठवांच्या राती

गावातील मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या प्रचंड

मोठ्या वडाच्या झाडाखाली लोंबकळणाऱ्या फांद्यांना धरून किती झोके घेतले, हाताच्या साली देखील निघून गेल्या. अनवाणी चालताना पायाचे तळवे उचकटून आले, तळपायाला भेगाही पडल्या तरी कधी लक्षही दिले नाही.नव्हती कपड्यांची पसंती- नापसंती, आवड-निवड. वर्षातून दोन ड्रेस नवीन मिळायचे. त्याच्यावरच आम्ही खुश असायचो. शाळेत जातानाही दप्तर कपड्याचे आहे की गोणपाटाचे आहे इतकेही भान नसायचे. आई-वडील शाळेची वेळ झाले की शाळेत पिटाळत. शाळेतून घरी परत येताना खेळत खेळत तासभर उशीराच घरी यायचे. आई-वडील देखील बिनधास्त असत. ना काळजी ना चिंता. शाळेचा गृहपाठ झाला की अभ्यास पूर्ण झाला समजायचे. वेगळा अभ्यास करायची कधी गरजच वाटली नाही. परीक्षेच्या आदल्या दिवशी तासभर अभ्यासाला बसले की परीक्षेत पहिला नंबर ठरलेलाच. त्यामुळे आई-वडिलांची ही काही तक्रार नसायची.

दूरदर्शन नव्हते,लॅपटॉप, मोबाईलवर गेम खेळून डोळ्यांचे विकार नाहीत.घरचे नैसर्गिक पदार्थ किंवा खाऊ, फराळ खाल्ल्याने शरीरात पौष्टिक घटक पोहचायचे. त्यामुळे कुठेही, कितीही फिरले तरी ताप, सर्दी, खोकला असले आजार आमच्या जवळपासही फिरकत नसत. उन्हाळ्याच्या सुट्टीत कच्च्या कैऱ्या, जांभळे, करवंदे, भोकरे आणि गाभुळलेल्या चिंचा, फुले असे कितीतरी पदार्थ पोटात जायचे. बोगनवेल आणि घाणेरीच्या फुलांमधील मध ओठाने शोषून नैसर्गिक मध मिळायचा. घाणेरीच्या झुडपांच्या कांगोण्या,ज्या आता विषारी म्हणून गणल्या जातात, शेताकडेची तोंदली, माकडमेवा, काकड्या सहज संपले जायचे. बाभळीच्या झाडाच्या शेंगा चापल्या जायच्या. उरलेल्या चौथ्याचा चेंडू बनायचा. झाडाला लागलेले कच्च्या फणसाचे गरे आणि बोरे पोटभरून खाताच ढेकर यायचा. त्यामुळे बऱ्यापैकी नाश्ता बाहेरच व्हायचा. घरी परत यायची ओढही नसायची. कुठे लागले,खरचटले तरी बेपर्वा वृत्तीमुळे ती जखम आपोआपच बरी व्हायची.कधीतरी आईच्या निदर्शनास आली किंवा आईला लंगडताना समजले तरच औषध पाणी मिळायचे. खेळता खेळता एकमेकांशी खोड्या, कलागती यांच्या बाबतीतही हेच. मित्र किंवा भावंडांनी एकमेकांशी केलेली भांडणे, मारामाऱ्या आई बाबांपर्यंत पोहचायचीच नाहीत. ती परस्परांत मिटवून, गळ्यात गळा घालूनच गृहप्रवेश व्हायचा. त्यामुळे आई आणि काकू यांच्यात आमच्या भांडणावरून कधीच वाद झाला नाही.एखादे लहान भावंडं घरात चुगली करू नये म्हणून, धाक दाखवून किंवा बोरे, जांभळे खायला घालून चुगली करण्यापासून परावृत्त केले जायचे.

सुटीत कितीही धमाल करायचो तरी वर्षभर अभ्यासासाठी तेवढेच जागरूक असायचो. खूप तावून सुलाखून अभ्यास केला नाही तरी शाळेतल्या गुरुजींच्या शिकवणीवरच आमचा अभ्यास पूर्ण होत असे.परीक्षेच्या चार दिवस आधी मन लावून अभ्यास केला की पहिला नंबर ठरलेलाच असायचा. त्यामुळे घरात आई-वडिलांचीही तक्रार नसायची. एखादा मित्र खूप कसून अभ्यास करू लागला की आम्ही त्याला 'पुस्तकातला कीडा' म्हणून चिडवायचो. शालेय शिक्षण जरी हसत, खेळत, हुंदडत गेले असले तरी कॉलेजमध्ये मात्र या पूर्ण आयुष्याला कलाटणी मिळाली होती. त्याच्यावरच पुढचे आयुष्य अवलंबून होते.परंतु बालपणातला हा काळ सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा मात्र नक्कीच होता.

होते जपायचे हृदयाशी
किती सुखाचे ते बाल्य
निसटून गेले हातातूनी
उरले मनात फक्त शल्य

रात्री मात्र अंगणात बिछाना पसरून चांदण्या मोजत ढगांचे विविध आकार बघत मस्त झोपून जायचं.......

किती आठवणी बालपणीच्या सांगू
फिकेच वाटेल आजचे सारे जीवन
नव्हते मॉल शॉपिंग छानछौकीही
तरीही जगलो सुवर्णाचे सारे क्षण

म्हणूनच संत तुकारामांनाही बालपणीच्या जीवनाची आस लागली होती. आणि ते आपल्या अभंगात म्हणतात, "लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा"

सुखाचे हे निरामय,निष्पाप,निरागस असे हे बालपण पुन्हा फिरून यावे असे प्रत्येक व्यक्तीला न वाटले तरच नवल!

सर्वगुणसंपन्न राजालाही जे जीवन जगता येत नाही ते बालपणी आम्ही जगलो आहोत. हा सुखाचा ठेवा संचित म्हणून हृदयात कायमचा जपून राहिल.

फिरावे स्वच्छंद मुक्त रानी
हवा कशाला पैसा पाणी
भिरभिरावे फुलपाखरासम
गात पाखरांची गोड गाणी

**सौ. भारती दिलीप सावंत**
**खारघर**
**मो.9653445835**

# अन्नदाता






घाम बापाचा सदा शेतीत जिरतो
त्यामुळे वस्तीत या बाजार भरतो

कोरडा परतून जातो पावसाळा
पूर अश्रूंचाच या डोळ्यात उरतो

अन्नदात्यावरच का ही वेळ येते ?
कर्ज मागायास दारोदार फिरतो

गांजलेल्यांनी कुठे जावे कळेना ?
घाव जो-तो थेट पोटावरच करतो

का इथे या कष्टकर्त्या माणसांचा ?
गाय बैलासारखा हा जन्म सरतो

प्रश्न हा इथल्या व्यवस्थेलाच आहे
बाप का माझा जहर घेऊन मरतो?

**प्रकाश बनसोड**
**आर्वी**
**मो. ९६६५२३३७८२**

# आंबा



आंबा असे
सगळ्यांच्या आवडता
येती फक्त एकदाच....

सगळेजण खातात भरपूर
गोड किंवा आंबट
आवडतो सगळ्यांना....

लहान किंवा मोठा
असा छोटा आंबा
झाला मोठा....



**कु.वैष्णवी जामदार./सांगली**
**इयत्ता ४ थी**
**किड्स पॅराडाईज इंग्लिश मिडीअम स्कूल**
**मो. 9175392934**



# पाश्चांत्यांचं अनुकरण

## संस्काराला मारक की तारक?

आज पाश्चात्य संस्कृती आपल्या देशात शिरू पाहात आहे. महिला सक्षमीकरण व समानतेच्या हत्यारानं विवाहासारखा एक चांगला संस्कार तुटू पाहात आहे. पाश्चात्त्य संस्कृतीच्या नादाला लागून लोकांनी कमी कपडे घालायला सुरुवातच केली नाही तर विवाहासारखा चांगला संस्कारही मोडायला सुरुवात केली आहे. त्यातच महिलाच्या महिलाही आज नशेच्या अति आहारी गेल्याची चित्रे दिसत आहेत. आजची तरुणाई रात्रभर डॉन्सबारमध्ये नशा करीत झिंगत असलेली दिसते.

ज्यात तरुणच नाहीत तर तरुणीही दिसतात. ज्या शिक्षणाच्या नावावर मायबापापासून कितीतरी दूर राहावयास गेलेल्या असतात. मोबाईलचा शोध लागल्यानं मायबाप येतीलच तर फोन करुन येणार, याचा अंदाज बाळगून. ज्यातून विवाहबद्ध होण्यापुर्वीच लिव्ह इन रिलेशनशीप तरुण तरुणीच्या नसानसात भरत असलेली दिसते.

ज्याचा परिणाम विवाहबद्ध झाल्यानंतर तो करार स्वरुपाचा वाटतो व तो विवाह विवाहाच्या शपथा घेतल्यानंतरही पटकन तोडावासा वाटतो. ज्यातून कौटूंबीक न्यायालयात असंख्य कौटूंबीक खटले जोर पकडू पाहात आहेत. लोकं लिव्ह इन रिलेशनशिपचा रस्ता धरु लागलेले आहेत. परंतु लोकं हा विचार करीत नाही की आपण भारतीय आहोत. भारतात राहणारे, संस्कारी असलेले. आपल्या भारतात संस्काराचा खजिना असल्यानं आपल्याकडील वातावरण या संस्काराला टिकविण्यास साजेसे नाही. येथील वातावरण विदेशांसारखं आपल्या शरीरातील असुरक्षीत हार्मोन्स वाढू देत नाही. त्यामुळंच आपण चांगलं राहावं. संस्कारी राहावं व संस्काराची जपवणूक करुन आपण स्वतःला, आपल्या परिवाराला व आपल्या देशालाही बदनाम करु नये म्हणजे मिळवलं.

पती आणि पत्नी. गाडीचे दोन चाकच यापैकी एक चाक जरी नसेल तरी गाडी चालत नाही. मात्र आजच्या काळात हीच चाकं डगमगायला लागलीत. कारण पती पत्नी नात्याचा अर्थच कुणाला समजलेला दिसत नाही.

अलिकडील काळात न्यायालयात वेगवेगळ्या स्वरुपाचे खटले अति प्रमाणात उभे राहात आहेत. त्या खटल्यात काही कौटुंबिकही आहेत. ज्याचे प्रमाण कितीतरी जास्त प्रमाणात अतिशयच आहे. याचे कारण काय? याचे कारण आहे पती पत्नींचं परस्परात न पटणं. शहाणी माणसं म्हणतात की दहा माणसं परवडली. परंतु एक बाई परवडत नाही. त्याचं कारण काय? त्याचं कारण एक उदाहरण देवून देतो.

दोन सख्खे भाऊ. त्या घरात एका भावाचा विवाह होईपर्यंत दोन्ही सख्ख्या भावाचं अतिशय चांगलं पटतं. परंतु जेव्हा त्या घरात एका भावाचा विवाह होतो व एक महिला घरात प्रवेश करते. तेव्हा पटणं कठीण जातं. याचं कारण काय? याचं कारण आहे ती महिला. ती महिला सारखी कुरघोडी करीत असते. सर्वच महिला द्रोपदीसारख्या जुळवून घेणाऱ्या नसतात. जसं द्रोपदीनं तिच्या पाचही पतींना अंतर दिलं नाही. जुळवून घेतलं. याचा अर्थ असा नाही की सर्वच महिला अशा वागतात आणि ज्या वागतही असतील, त्यांच्यात महिला सक्षमीकरणाचं वारं शिरलं असथ समजण्याची गरज आहे.

आज महिला स्वतंत्र्य आहे. तिला पुरुषांसारखेच अधिकार मिळाले आहेत. त्यातच समानता असल्यानं समानतेच्या चक्करमध्ये बसून महिला पुरुषांवरच अधिराज्य गाजवत असते आणि असंच तिचं वावरणं असतांना कधी कधी कुटूंबात हलकेसे वावटळ उठतात. ज्यात कधी स्त्री तर कधी पुरुषांना त्या वावटळाशी जुळवून घ्यावं लागतं. तेव्हाच संसार टिकतो.

परंतु अशा जुळवून घेण्याची गोळाबेरीज केली तर त्याचं प्रमाण अलिकडील काळात पुरुषात जास्त असतं. मग एखाद्या वेळेस पुरुषांनाही वाटतं की आपणच का सतत जुळवून घ्यायचं. तिनं का जुळवून घेवू नये. त्यानंतर तो संधी पाहात असतो. तद्नंतर पुन्हा एखाद्या वेळेस वावटळ उठतं. ज्यात पुरुष स्त्रीकडून जुळवून घेण्याची आशा करतो. परंतु ती महिला जुळवून घेत नाही. मग वितुष्ट निर्माण होत असतं. ज्याची परियंती पुन्हा एखाद्या तीव्र स्वरुपाच्या भांडणात वा एखादा संभाव्य विपरीत प्रसंग ओढवण्यात होतो. ज्यातून महिला आणि पुरुष यापैकी एकाचं जास्त नुकसान होत असतं.

पतीपत्नीच्या नात्यातही तसंच आहे. एक अनोळखी स्त्री व एक अनोळखी पुरुष, दोघंही जेव्हा विवाहबद्ध होतात. तेव्हा नाना तऱ्हेच्या शपथा टाकतात. त्यावेळेस दोघेही म्हणतात की मी तुला कधीच अंतर देणार नाही. परंतु जसा काळ ओसरत जातो. तसे पती व पत्नी असलेले ते जोडपे आपापसात भांडत असतात. कधीच जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. त्यातच मीच का जुळवून घ्यावं? असाही प्रश्न निर्माण होतो. खरं म्हणजे एक महिला वा एक पुरुष जेव्हा पती पत्नी म्हणून विवाहबद्ध होतो.

परंतु तसं विवाहबद्ध होण्याआधी त्यांनी वारंवार विचार करायला हवा की मी कोणत्याही परिस्थितीत परिस्थितीशी जुळवून घेईल व कधीच आमच्या नात्यात

फारकत येवू देणार नाही. महिला असेल तर तिनं विचार करावा की मी माझ्या पतीच्या इच्छेविरुद्ध वागणार नाही व पुरुषांनी विचार करावा की मी माझ्या पत्नीच्या इच्छेविरुद्ध कधीच वागणार नाही.

त्यानंतर समजा एखाद्या वेळेस भांडणाचं वावटळ उठलं आणि पतीचा आवाज तीव्र झाला तर पत्नीनं गप्प राहावं व कधी पत्नीचा आवाज तीव्र झालाच तय पतीनं गप्प राहावं. तेव्हाच नातं टिकतं. अन् तेवढंही करता येत नसेल तर आपल्या लेकरांकडं पाहावं. त्यांचा विचार करावा. त्यांच्या भविष्याचा विचार करावा. जेणेकरुन नातं टिकवता येईल. शिवाय विवाहबद्ध होण्यापुर्वी बॉयफ्रेंड, गर्लफ्रेंड असल्या तरी चालतील परंतु विवाहानंतर त्या नसाव्यात. जेणेकरुन नातं टिकवता येईल.

परंतु आज महिला सक्षमीकरणच्या व महिला समानतेच्या हत्याराने संपुर्ण पती पत्नीच्या नात्यांची वाटच लावून टाकलेली असून आज पती पत्नीचे नाते म्हणजे एक करार ठरत चाललेला आहे. केव्हाही करार करुन विवाहबद्ध व्हा आणि केव्हाही तो विवाहाचा करार मोडून विलग व्हा. परंतु ही गोष्ट निदान भारतासारख्या देशाला तरी शोभणारी गोष्ट नाही. कारण भारत हा संस्कारी देश आहे. येथील लोकांच्या नसानसात संस्कार कुटकूट भरलेला आहे. येथील लोकं विवाहाला करार मानत नाहीत. त्याला एक संस्कार मानत असून सोळा संस्कारामध्ये त्याला विशेष स्थान आहे. शिवाय तशी परिस्थितीही भारतात आहे. कारण भारत सुजलाम सुफलाम आहे.

मात्र विदेशात भारतीय स्वरुपाची परिस्थिती नाही. म्हणूनच विदेशात विवाहाला संस्कार समजला जात नाही. एक करार समजल्या जातो. त्याचं कारण तेथील वातावरण. तेथील वातावरण हे विवाह टिकविणारं वातावरण नाही. कराराचंच वातावरण आहे. ज्यातून शरीरातील हार्मोन्सची संख्या वाढते. म्हणूनच करार करावा लागतो. परंतु भारतात तसं वातावरण नाही की माणसांना करारबद्ध होवून विवाह करावा लागेल. शिवाय इथं बॉयफ्रेंड, गर्लफ्रेंडला थारा नाही. तरीही आजच्या काळातील काही मंडळी पाश्चात्यांचं अनुकरण करतात आणि विवाहाला संस्कार न मानता त्याला करारबद्ध समजतात.

ज्यातून अलिकडील काळात भारतातही लिव्ह इन रिलेशनशीपचे वारे वाहू लागले आहेत. अशी मंडळी विवाहाला एक करार मानू लागले आहेत. ज्यातून विवाहासारख्या संस्काराचे उच्छेदन होवू लागले आहे. यातूनच देशाचीही बदनामी होवू लागली आहे.

महत्वपुर्ण बाब ही की भारत देशात राहणाऱ्या तमाम विवाहबद्ध होणाऱ्या जोडप्यांनी विचार करावा की आपण भारत देशात राहात असून आपल्या भारत देशात हा संस्काराचा खजिना आहे. तो आधीपासूनच असून त्या संस्काराच्या खजिन्याला आपण पाश्चात्यांच्या नादी लागून व लिव्ह इन रिलेशनशीपचे वावटळ आपल्या मनात भरुन पाण्यात बुडवू नये की ज्यातून आपलंच नाही तर आपल्या कुटूंबाचं, आपल्या मुलाबाळाचं व आपल्या देशाचं नुकसान होईल. संस्काराचा खजिना नेस्तनाबूत होईल.

एकंदरीत सांगायचं झाल्यास आपल्याही देशातील वातावरण असे संस्कार तुटल्यानं गढूळ होईल. मग आपले देशांतर्गत संस्कार तुटल्यानं भारत व पाश्चात्य यात फरक उरणार नाही. ज्यातून माणूसकी संपेल. पुत्र आईला आई व भाऊ बहिणीला बहिण म्हणणार नाही. हा सर्व परिणाम पाश्चात्य संस्कृतीचं अनुकरण केल्यानं होईल. हे तेवढंच खरं.

**अंकुश शिंगाडे**
**नागपूर**
**मो.९३७३३५९४५०**

# चांदनी



२०१७ चे साल माझ्या व्यवसायाने पूर्णविराम घेतला. तब्बल २१ वर्षे मी माझ्या लॉंड्रि व्यवसायात होते. अनेक प्रकारची लोकं येत असत. तसेच एके दिवशी एक उंचपुरी, धिप्पाड व्यक्तिमत्व, रंगाने काळी असलेली एक तृतीयपंथी १६ साड्या घेऊन आली. अगोदर तीन कस्टमर उभे होतेच. त्यात ही चौथी. तिला पाहून सारे फटाफट बाजूला सरले.

तिने गुपचूप हातातील साड्या काउंटरवर ठेवल्या व मागे जाऊन उभी राहिली. पूर्वीच्या तीन कस्टमरला मोकळं करून मी तिच्या साड्या हातात घेतल्या तशी ती पुढे आली. मी साड्या चेक करु लागली माझ्या कामाचा एक भाग म्हणून.

दीदी सब अच्छा साडी है. ती बोलली.

फटा कपडा, कलर स्प्रेड सब देखना पडता है.

बील मे लिखाना पडता है. मी बोलले.

त्यावर ती काहीच न बोलता उभी राहिली. नियमानुसार बील बनले. नाव विचारले बीलवर लिहिण्यास "चांदनी" केवढं सुंदर नाव पण दिसायला बेढप व काळी. ती बील घेऊन गेली सात दिवसांनंतर ये असा वायदा घेऊन.

ती आली बील घेऊन ठरल्या तरखेवर. दरम्यान माझी नवऱ्यासोबत साडी व कस्टमर यावर चर्चा झाली. तृतीयपंथी आहे ना...!! म्हणून आमच्या नफ्यातील १० सूट यापुढे तिला देण्याचे त्यांनी सुचवले. मीही मान्य केले. तिच्या १६ साड्या व्यवस्तीत बांधून दिल्या व नवीन घेऊन आलेल्या साड्यांचे बील बनवले गेले. ठरल्याप्रमाणे १० सूट देऊन. दीदी कैसे लगाया साडी...?

उसमे तो ज्यादा लगाया है. ती बील पाहून बोलली.

उसमे ज्यादा नाही लगाया. इसमे कम लगाया.... मी बोलले

एवढं ऐकून निघून गेली. ती परत आली खूप सारे कस्टमर घेऊन. रेखा, आशा, शैला इ. आता ती हळूहळू कमी येऊ लागली. तिच्या त्या मुलीच तिच्या साड्या आणू लागल्या, त्या तिला गुरू म्हणत. सुरवातीला ३-४ वेळा आली तेवढीच पण तेवढ्या तिच्या सहवासातही ती मला खूप आपली वाटली. बोलणं मोजकच, मुद्देसूद. कुठलीच कटकट नाही. साड्या आणून टाकायची व न्यायची. तेवढ्या वेळेचं तिचं काऊंटरला उभं रहाणही इतर सो कोल्ड कस्टमरना काही रुच नव्हतं. ती असली की चार हात लांबच उभे राहायचे.

ती गेल्यावर सल्ले ही जोरदार.

यांची पावलं चांगली नसतात हो....

इनको ज्यादा देर तक खडा होने मत देना.....

एक ना दोन पण मला तीचा काही वाईट अनुभव आला नाही. बिचारी शांत व सुस्वभावी होती. परत मधेच तिनं येणं सुरु केलं.

आज आप आये... मी मोठ्या आपुलकीने प्रश्न केला.

हं...बच्ची लोक गाव गई है । ती बोलली. असे काही दिवस निघून गेले. तब्बल दीड वर्ष तिच्या १२ साड्या माझ्या शोकेस मध्ये लागलेल्या होत्या. कोणीच न्यायला आलं नाही आणि एके दिवशी एक स्त्री कस्टमर आली. अरे !! या साड्या कुणाच्या....तिने विचारलं.

मी म्हटलं आहेत एकीच्या.

अरे मॅडम त्या छक्क्याच्या साड्या.

मी विचारलं तू ओळखतेस का..?

व्हय, माझ्याच जागेत रायला हायती. द्या मी घिऊन जाते. किती पैसं झालं....?

नाही....मी म्हटलं. त्यांना पाठवून दे. त्याचं अस हाय ना... ते आता नाही रात तिथं; पण येतात माझ्याकडं.

मी देईन. मी नकार देताच तिच्या तोंडून एक बातमी बाहेर पडली. आणि का कोण जाणे ऐकून काळजात चर्रर्र झालं.

ती गुरु हाय ना मेली व.

कधी....मी विचारलं.

झालं वर्स होऊन गेलं.

माहीत नाही का पण मनात कालवा कालव झाली, मन गलबलून गेलं. पाय एक जागीच थबकले. वाटलं उगाच कळली बातमी. आणि तिच्यासोबत चे थोडे बहूत का होईना क्षण डोळ्यासमोर तरळून गेले. नकळत पापण्या ओलावल्या. काही दिवसांनंतर तिच्या ठेवलेल्या पोरीतील एक पोरगी आली. सड्यावर दावा करण्यासाठी. मी अलगद त्या साड्या काढल्या. व्यवस्तीत बांधून कार्बन कॉपी बीलवर तिची सही घेऊन तिच्या सुपूर्द केल्या. जगाच्या दृष्टीने ती दीड वर्षांपूर्वी गेली असली तरी चांदनीची आणि माझी नाळ आज इथेच त्या बातमीने तुटली पण ही चांदनी आजही माझ्या मनात घर करून आहे.

**कल्पना दिलीप मापूसकर**
**मीरा रोड**
**मो.9082646494**

# मनपाखरं



फुलपाखरं...
असतात मनभावन,सुंदर
हलकी फुलकी आणि
निरागस..निर्विकारही
नसतो अदमास त्यांना
माणसाच्या कटुतेचा,
फुलपाखरांच्या जाळीचा
ती खुशाल भिरभिरतात
रानावनात, बागेत
विहारात, स्मशानात
डेड एन्ड असलेल्या विवरात
आणि अगदी...
गॅसच्या निळ्या धगीवरही !
मनपाखरांचंही तसंच
जडतात कशावरही,कुणावरही
जातात, जाऊ नये तेथ
करतात करायला नको ते
आणि मग...
कोसळतात, खचतात,फडफडतात
पंख तुटल्या फुलपाखरांसारखी
फुलपाखरांना
माणसांची भाषा कळत नसेल
पण मनपाखरांचं काय ?

आनंद देशमुख
शिरपूर
९८६०६३०२३०

# हंगाम



आला पाऊस पाहुणा
नाव घेई ना जायचे
गेला हंगाम खरीप
वाटोळे कास्तकाराचे

तुर, मुंग,सोयाबीन
उभी वावरी वाळली
ऐनवेळी कास्तकारी
अशी बुडीत निघाली

तेल मीठ भाकरही
नाही घरी लेकरांना
काय उत्तर देऊ मी
या बोलक्या पाखरांना

मुलं शाळा शिकावीत
मनी हौस होती भारी
भार सोसेना खर्चाचा
केली मी उसनवारी

ओझे डोक्यावर माझ्या
सावकाराच्या कर्जाचे
आशा मावळल्या साऱ्या
कसे करावे पैशाचे

दैना गांजल्या जीवाची
नाही कळत कुणाला
पैसा आणू मी कुठून
फास माझ्याच गळ्याला

सौ. कीर्ती विजय लंगडे
कळमेश्वर, नागपूर
मो.7507524678



# आठवण एक दिलासा..

मला भुतकाळ आवडतो मला भविष्याची थोडीही आतुरता नाही एक आठवण बनुन राहीलेले ते दिवस आज खरेच पुन्हा नाही हे नक्कीच..

कधी कधी वाटतं की आपण आजच मरावं आणी पुन्हा त्या दिवसात जावं जिथं खुप काही होतं माय आप्पा, भाऊ बहिण, चुलतेकाके, मित्र मैत्रीणी, दिल्लगी करणाऱ्या भावजया, टोमणे देणारे म्हतारे, रीकामा दिसलो कि दुकानात धाडणाऱ्या आज्ज्या, त्यो एक जिवाचा मांगवाडा, अंगणातला डेरेदार लिंब, दरवाजा तुन दिसणारं बसस्टँड, मुक्कामी असलेली एसटी, रोडवर एकच काळ्यापिवळ्या रंगाची टमटम, चहासाठी जोरजोरात ओरडून सिटं गोळा करणारा नजिऱ्या, नं चुकता होणारी नमाज, पारावर दोन्ही वेळेला चालू असलेले गावकऱ्यांचे भजनं, काकडा, अभंग, अय इनका, तिरमक, गवणा, शंकर म्हणत सकाळीच मांगवाडा ऊठवणारी मरॅमआज्जी.

तीच्या पाठोपाठ काठी आपटत जोरजोरात खाकरत खोकरत चालणारा गफूरचाचा, समाजमंदिरात चालू असलेल्या थोरामोठ्यांच्या गप्पा, रुपायादोनरुपायाच्या लालचेनं रोड झाडणारी, नोकरी वाला नवरा मिळेल म्हणून सगळ्या मास्तरांच्या घरी पाणी भरणारी जनाबाई, दिवस ऊगवती तवापासून घुमणारा दसरथ आण्णाच्या कलॅटिचा सुमधुर आवाज, परदेसिया ये सच है पिया म्हणत एका हातानं चड्डी धरून एका हातानं डोकं खाजवत दात ईचकत गावात येणारा पिप्पळगावचा घळ्या, लाल लाल भावली चाराण्याला लावली, म्हणत आमचं लक्ष वेधून घेणारा गारीगारवाला, कायद्याचं बोला दाजि असं म्हणत जाग्यावर म्हणी जोडून शिवाकाका, सुखदेव काकाला पोट दूखुस्तर हसवणारा साहेबराव मामा, महि माय, चुलत्या सगळ्या मजाकीच्या लागतात म्हणुन सगळ्याच भावजयांना शिव्या देत मनमोकळी हासणारी नबाआई.

मांगवाड्यात काही कुणकुण चालू आहे का याचा सुगावा घेण्यासाठी येणारी रोजची पाहूणी गंगूमाय, वरल्या वाड्यातला संतनाना, आवं हार्रर हो दैहो म्हणत अख्खा दिवस ढोरं संभाळणारा येडा ईठल्या, बारीकसारीक काड्याचं पेंडकं बांधून डोक्यावर वाहणारे गोपीनाथ आप्पा, महारामांगानं हिरीवर पाणी भरू नये म्हणून ईळभर विहीर राखणारा ढेबरा रामभाऊ, मनात आलं तर बजार मांगून नाहितर दूल्डी विणताविणता बडबड करणारी ईमला आक्का, तोंडानंच वाद्याचा आवाज काढून रेडूवर दिवसभर गाणं ऐकणारा राजु दादा, पानं घ्या, कुकू दारशना घ्या म्हणुन खेडे करत करत येणारा शकलालबाबा, केसावर फुगे, पिना, कचका घ्या कपबशा घ्या म्हणत उजव्या पायानं लंगडत रहिमचाचा गावात यायचा तवा आम्ही पोरं भिंतीच्या कोणत्याही कोपऱ्यात मायीनं लपून ठेवलेले केसं चोरून फुगे घ्यायचो.

वरल्या आळीत ऊस्मानबाबाचं पडक्या घरात किराणा दुकान होतं दरवाजात आडवी फळी त्याच्यावर दोन-तीन गोळ्या बिस्किटाच्या बरण्या वर आडव्या सुतळीला पत्तीच्या पुड्या लटकवलेल्या आम्ही साखरपत्ती आणायला गेलो कि ऊस्मानबाबा आम्हाला पैसे देऊन दूसऱ्या दुकानातून किलोभर साखर आणायला लावायचे अन् त्याच्यातून आम्हाला द्यायचे बाकी दूकानात ठेवायचे, मांगवाड्यातच दादु मामाचा केळाचा कोठा होता गाडी आली की आम्ही पोरं ते केळीचे घडं डोक्यावर वाहायचो त्याबदल्यात दादूमामा आम्हाला पाचसहा केळं असं प्रत्येकाला द्यायचा.

ग्रामपंचायत लागून वाण्याच्या दोन हॉटेला होत्या ते दोघं सख्खे भाऊ होते पण त्याच्यात बनत नव्हतं मोठा भाऊ हरीओम म्हणत लहान्याला शिवि द्यायचा अन लहाना भाऊ श्रीराम म्हणत मोठ्याला शिवि द्यायचा त्यायच्या बायकापण कमालीच्या नेहमी धंद्यावरून कूरबुर करायच्या मोठ्यापेक्षा लहान्याचा जास्त पगडा असायचा कारण त्याला दोन बायका होत्या मोठ्याभारी भगुण्यात आर्ध दूध आर्ध पाणी तापवायच्या पण तांबडं फुटल्यापसून त्यायचे तोंड चालू व्हायचे मी चाराणे घेऊन दूध आणायला गेलो कि त्या दोन्ही सवतीचे भांडण पहात रोडवर ऊभा रहायचो..

गावात कोणी सायकल घेतली कि लोकं ती सायकल पाहण्यासाठी गर्दी करायचे किमान महिनाभर तरी तो सायकल वाला छाती फुगवून चालत असे, बैलगाड्या प्रत्येक घरी होत्या कोणीकोणी टांगे वापरायचे, दरवर्षी हिवाळ्यात गावपांढरीत तमाशा यायचा त्यो तमाशा पाहण्यासाठी आसपास खेडयावरून लोकं गावात दाखल व्हायचे पाच रुपये तिकीट काढूनसुद्धा जागा मिळत नसायची कधिकधि तर जाग्यासाठीच लोकं भांडणं करायचे आम्ही कधीच तमाशात तिकीट काढून गेलो नाही कारण पैसे नसल्याने आम्ही पडदा वर झाल्यावरच तमाशात वग पहायला जायचो, त्यावेळी किमान चार वाजूस्तर तमाशा चालू रहायचा, गावात नाटक किंवा सिनेमा आला तर होळीच्या मैदानावर व्हायचा हे ठरलेलंच गावात एक सार्वजनिक जागा होती तीथं सामुहिक होळी पेटवली जात म्हणून त्या मैदानाला होळीचं मैदान हे नाव पडलेलं तीथंच एक झुणका भाकर

केंद्र पण होतं.दिवाळीत माय आम्हाला एक पतनी आईच्या मंदिरात, एक पारावर, एक ऊखांड्यावर, दरवाजा, झाडाखाली, अन घराच्या चारी बाजुला लावायला सांगायची दिवाळी संपताच आम्ही पोरं पोरी मिळून त्या पतन्या जमा करून दोन पतन्याची तराजू करुन दूकान दूकान खेळायचो.

बालवाडीत असताना वर्ग झाडण्यासाठी आमच्यात नेहमीच शर्यत लागायची कारण जो वर्ग झाडेल त्याला बाई इतर मुलांपेक्षा एक-दोन बिस्कीट किंवा चॉकलेट जास्त द्यायची, आम्हाला चॉकलेट, बिस्कीट नेहमीच मिळायचे बालवाडीत एक वर्ष काढल्यावर आमची बदली जिल्हा परीषद शाळेत केली तीथं आम्हाला पहिलीत टाकण्यात आलं पण दाखल करायच्या आधी मास्तर चाचणी घ्यायचे तशी घेतलीही वडीलासमोर मास्तर सरळ ऊभं करुन ऊजवा हात डोक्यावरुन डाव्या कानाला लावायला सांगायचे ज्याचा हात लागला त्याला प्रवेश मिळायचा ज्याचा हात पुरला नाही त्याला परत एक वर्ष बालवाडी..

आमची शाळा हि गावाच्या खालतं होती आणी तिकडं शाळाचा हिरवागार मोकळा परीसर पाठीमागुन शेतात जायचा रस्ता त्यामुळे त्या रस्त्यानं नेहमी वर्दळ असायची..

आम्ही दूपारच्या सुट्टीत खेळण्यासाठी मैदानावर जायचो ते मैदान नदीच्या काठावर होतं, खेळून दमलो कि आम्ही पाणी पिण्यासाठी झिऱ्यावर जायचो झिरा येरंडी, सागरगोटे अन सिताफळाच्या दाट झाडीत बनवलेला होता ते पाणी खडकातून यायचं म्हणून संगळ्यायला ते पाणी शुद्ध वाटायचं.झिऱ्याला लागुनच घसरगुंडी होती ती घसरगुंडी त्याच खडकावर काळी माती साचून तयार झाल्याने भलीमोठी उंच वाटायची. जवा वरून घसरत आम्ही खाली यायचो त्यावेळी पोटात होणाऱ्या गुदगुल्या या विलक्षण आनंद देणाऱ्या होत्या हे आता कळतंय...

कारण ते निसर्ग निर्मित होतं हे महत्त्वाचं...

हे नदीच्या या थडीवर होतं, पण त्या थडीला याच्यापेक्षा वेगळं होतं एक मोठा डोंगर ज्याच्यावर घनदाट जंगल बोरी, बाभळी, लहान-मोठ्या वेली, येरंडं, सागरगोटे, या प्रकारचे हजारो झाडं, वेली त्या डोंगराच्या एका बाजूला होते,

दुसऱ्या बाजूला मोठाले दगडं, त्याच्यावर चढलेलं शेवाळ, निवडूंगाचे झाडं, आणी त्यायच्यातून वाहणारं पाणी हे मन मोहून घ्यायचं, पाखरं, वान्नेराचं ( माकडं) तर राज्यच तीथं रहायचे, त्या डोंगरावर मधोमध पाचदहा मोठमोठाले घनदाट लिंब ते अतिऊंच आमची त्याच्यावर नजरसुद्धा पुरत नव्हती, त्यायच्या मधोमध भलीमोठी महादेवाची पिंड, त्या पिंडीसमोर नंदी, या कारणानं त्या डोंगराला देवटेकडी हे नाव पडलेलं..आम्ही पोरं कधी खेळत खेळत चुकुन तिकडं गेलोच कि वर्गात मास्तरचा अन् घरी मायचा मार खावा लागायचा..

कारण त्या टेकडीखाली सात सोन्याच्या कढाया पुरुन ठेवलेल्या आहेत भलामोठा भुजंग त्याची राखण करतो, त्याच्या डोक्यावर दिवा अन् अंगावर लांब लांब केसं आहे त्यो दूपारच्या भरी अन् रात्री चरायला बाहेर निघतो.शिवाय आमुस्या पोर्णीमेला त्यो अजून मोठा होतो..अशी भिती गावकऱ्यांच्या मनात दडलेली होती अन् त्यासोबतच आमच्याही मनात भरलेली होती. त्यावेळी त्या देवटेकडीकडं पहायची कोणात हिम्मत नव्हती आज ती देवटेकडी फक्त नावालाच उरली ते लिंब तुटून मंदिर झालं, ते जंगल तोडून टाकलं, तिथं देवटेकडी नावानं वस्ती करुन लोकं राहू लागले.. दरवर्षी नित्यनेमानं हिवाळ्यात तीथं सप्ता बसतो.आज तिथं बयामाणसं, लेकरंबाळं आनंदात राहतात ती देवटेकडीची भीती मनात आहे कि नाही हे सांगणं शक्य नाही..असो

मी हि भुतकाळाची यादी सांगत गेलो तर होऊ शकतं पान अपुरे पडतीन कारण मी कोण्या पिच्चरची कहाणी असो का एखादी पुस्तकातली गोष्ट सांगत नही एवढं लक्षात घ्या..

मला सोडून गेलेले, माझेच जुने दिवस, अनुभव मी पायातल्या काट्याच्या कूरूपावानी मनात संभाळून आहे आज भावना अनावर झाल्या म्हणून लिहिण्याचा प्रयत्न केला..माझं बालपण या गोड दिवसात दडलंय, ते तिथंच हरवलंय, मी हातापाया पडूनसुद्धा ते मला भेटायला किंवा स्वप्नात यायला तयार नाही म्हणून महे सगळे प्रयत्न व्यर्थ जातात माझ्या मनात खंत कायमचीच राहते अन तेच आठवून मी परत परत म्हणत राहतो कि..

.......................................

तेरे जैसा यार कहा,  
कहा ऐसा याराना..  
याद करेगी दूनिया,  
तेरा मेरा अफसाना.......

**किशोर त्रींबक भालेराव**  
**मो.9168160528**

# पण सईच्या मनाची..!



रोज कोरड्या घाटाला
सई घालते गाऱ्हाणे,
पापण्यांना ओल द्यावी
व्हावे नदीचे वाहाणे!

किण् किण् ऐकताना
कोण खेळतो पाहुणा,
काजव्यांचा उजेडात
दोन ओळखीच्या खुणा!

जीव हुळहुळा होत
जिथे घालतो घिरट्या,
त्याच चंदेरी वाळूत
खेळे टिटव्या किरट्या!

फक्त पावसाचा हेवा
दूर पाखरांचा थवा
ओल्या पंखांची घरटी
अन् सदोळती हवा!

तिचे आषाढ धारेत
होणे चिंब पावसाने,
पण सईच्या मनाची
बंद सदा तावदाने!

असा आषाढ महिना
जरी पेरी स्वप्नसरी,
त्याचे वास्तव वेगळे
घुसमट दे अंतरी!

**शशी त्रिभुवन**
**अस्तगाव(अहमदनगर)**
**8275032897**

# कशी पेटवू रे वात ?



डूबलं रे पिक सारं
गेली पाण्यात कमाई
सांग सांग रे सायबा
कशी करु मी दिवाई !!

झाली वरचढ आज
फुशी फटाक्याची वात
गड्या मातीमोल झाली
माह्या पणतीची वात !!

तेलं बेइमान झालं
कापसाच्या त्या वातीले
कसं वांझपण आलं
खापराच्या पणतीले !!

कसा लाऊ दिवा देवा
घरी दारी मी देव्हारी
असे लक्ष्मीचा निवास
निच बेइमाना घरी !!

दीप आरास पेटली
भ्रष्ट दुराच्याऱ्या घरी
कसा अंधारात झोपे
बळीराजा कष्टकरी !!

पेटली रे महागाई
गोड लागेना दिवाई
स्वरक्ताचेच व्यापारी
आज झालेत कसाई !!

कसा लावू तेलदिवा
तेल चटणीवर न्हाई
दिवे लावाया पाण्याचे
येतील का बाबा साई ?

**श्री. वासुदेव खोपडे**
**अकोला**
**सहा.पोलीस उपनिरिक्षक**
**मो.9923488556**

# ती परत पहिलीत जातेय...



ती पहिलीत होती. तिला आजही तो दिवस आठवतो. ज्या दिवशी ती वेडी मनातल्या मनात बोलत चालली होती. आपल्या बाबाचा हात घट्ट पकडून शाळेचा पहिलाच दिवस होता. उत्साहात चालली ती...त्यावेळी तिच्या बाबा ने पहिल्याच दिवशी तिला सांगितलं होतं "आजपासून शाळेत यायचं खूप अभ्यास करायचा खूप मोठं व्हायचं" तिला आजही ते बोल आठवतात तिच्या बाबांनी सांगितलेले. त्या दिवसापासून ते आज पर्यंत फक्त ती एकच विचार करते मी मोठी कधी होणार. माझ्या बाबाची स्वप्न कधी पूर्ण करणार. पण त्या विचारात कधी हा विचार केलाच नाही की एक दिवस ती मोठी होईल आणि तिच्या बाबापासून दूरही जाईन.

शाळेचा पहिला दिवस बाबाचा हात धरून चाललेली ती तिने ठरवलं होतं. माझ्या बाबाचे स्वप्न पूर्ण करायचं कसं करायचं हेच माहीत नव्हतं तिला कारण पहिलीत होती ती. पण आजही आठवतात ते क्षण पाच रुपयांवरून शंभर रुपयांवर आलेली ती तिच्या बाबांचं एक दुकान होतं. तिथे तिचे बाबा काम करायचे. ती रोज शाळेला जाताना तिच्या बाबांच्या दुकानात जायची त्याच्याकडे हट्ट करायची. आणि रोज न चुकता त्याच्याकडून पैसे घ्यायची कधी एक रुपया, तर कधी दोन रुपया अशा रुपयांची मागणी बाबांजवळ करायची. सुरुवात एक रुपयाने झाली होती. पण आज मात्र तोच एक रुपया शंभर रुपयांपर्यंत पोहोचला होता. म्हणजे तिच्या मागण्या वाढल्या होत्या.

शाळेमध्ये हुशार म्हणून घ्यायला लागले तर खूप भारी वाटायचं तिला शाळा सुटली की पळत पळत दुकानाकडे जायचं अन बाबांजवळ जाऊन दिवसभराची मजा त्यांना सांगायची टीचरांनी मला असं बोल तस बोल असं सांगताना बाबा मला हुशार म्हटलं. हे सगळं ऐकत असताना तिच्या बाबाला खूप भारी वाटायचं. पण सगळ्यात जास्त भारी हे सगळं ऐकल्यावर तिच्या बाबांच्या चेहऱ्याच्या गालावर खुलणारी कळी मात्र खुलून दिसायची.

त्या दिवसात आई बाबा ती बाजारात फिरायला जायचं आणि नेमका तिला ड्रेस आवडायचा. आणायला बाजार म्हणून जायचं आणि येताना ड्रेस घेऊन यायचं. ती मझा काही वेगळीच होती. जशी ती मोठी झाली तिच्या अपेक्षा वाढल्या तिची प्रत्येक गोष्ट पाहिजे म्हणजे पाहिजे. इथे या वाक्यातच येऊन थांबायची. तिचा बाबा एका गोष्टीवर मात्र तिला हवी ती गोष्ट घेऊन द्यायचा. कधीच कोणत्याही गोष्टीसाठी नकार नाही दिला. कर्ज काढायचं मित्राकडून घ्यायचं उसन घ्यायचं पण लेकीन मागितलय दिल पाहिजे. असा त्याचा विचार असायचा. पण एवढं सगळं करून ती म्हणायची काय बाबा तुम्ही काहीच देत नाही. अस बोलताच तेव्हा मात्र तिच्या बाबांचा चेहरा पडायचा. पुन्हा नव्याने तो कामाला लागायचा.

लेकीच्या शिक्षणात मात्र कधीच कोणत्या गोष्टीची कमी नाही पडू दिली. तिच्या शिक्षणात लागणाऱ्या पुस्तकांसाठी मात्र तो घरापासून ४० किलो मीटर अंतरावर जावून पुस्तक घेऊन यायचा. त्यांची एकच इच्छा असायची आपल्या लेकीने शिकाव आणि शिक्षक बनाव. त्यासाठी ते तिच्या शिक्षणासाठी काहीही करायला तयार होते.

तिला आजही तो दिवस आठवतो. तिची परीक्षा असायची परीक्षेचा अभ्यासाच तीला जितकी काळजी नसायची तेवढी तिच्या बाबांना असायची ती पास होणार इतका विश्वास त्यांचा तिच्यावर असायचा आणि ती पास व्हायची पण काही परीक्षेत बाबांनी खूप विश्वास ठेवला पण ती अपयशी झाली.

तरी त्यावेळी देखील तिच्यावर त्यांचा तितकाच विश्वास असायचा तू करू शकतेस. इतकच ते तिला सांगायचे तिला ना आजही तो दिवस आठवतो ज्या दिवशी तिचा पेन संपायचा आणि त्या दिवशी तिचे बाबा नवीन महागडा पेन आणून द्याचे तिच्या जवळ ते सर्व पेन अजूनही जपून ठेवलेत.

तिला आजही तो दिवस आठवतो तिची परीक्षा असायची आणि तिची आई तिला काम कर असा आवाज द्यायची असं ओरडायची सुद्धा पण त्यावेळी मात्र बाबा आईला खचकावून सांगायचा नाही माझी लेक काम करणार नाही ती अभ्यास करणार आणि खूप मोठी होणार हे बोलन ऐकून आई बोलायची मग सासरी काम करायला तुम्ही जाणार का? मग तिच्यासोबत त्यावेळी ते बोलायचे हो जाईन की! असे बोल देताच ती जावून तिच्या बाबांना घट्ट मिठी मात्र मारायची.

तिचा दादा नेहमी म्हणायचा तुम्ही फक्त मलाच ओरडता त्यावर तिचा बाबा म्हणायचं माझी लेक हुशार आहे. तिला मी ओरडावं असं ती कधी काही कामच करत नाही यावर दादा मात्र चिडलेला असायचा. अस म्हणतात कि लग्न ठरलं की मुलगी बापाला परकी होते. पण हाच विचार ती करते तिचा बाबा तिच्याशिवाय राहू शकेल का ? घरी आल्या आल्या मात्र गुड्डु असे हाक मारत आत येणाऱ्या तिचा बाबांना त्यांची गुड्डु दिसेल का ? ती नसताना तो कोणाला हाक मारणार आहे. त्याचासाठी झोपताना गोळी द्यायचे दूध द्यायचे हे कोण

करेल असे विचार येतात ति मनातल्या मनात म्हणते मी नसेन पण माझीं आई आहे ती करेल..पण बाबाला माझी आठवन येईल का?

तिच्या मनात विचार येतो आज पर्यंत सर्व गोष्टींचा हट्ट तिच्या बाबांनी पूर्ण केला होता आता लग्नानंतर नवरा करेल का ? माझे हट्ट पूर्ण लग्नानंतर काय होईल तिच्या प्रत्येक गोष्टीसाठी हट्ट करणारी वेडी असाच हट्ट नवऱ्याकडे करु शकेल का?

ज्या प्रेमाने बाबा द्यायचा अगदी तसच ती मागेल ती गोष्ट देऊ शकेल का तो? मात्र तिचे हट्ट पुरवणारा तिचा बाबा त्या काळात तिला खूप आठवत राहील. या सर्व गोष्टी आज तिला खूप आठवतायत कारण...आज "ती परत पहिलीत जातेय..."

पहिलीचा वर्ग

नवीन शाळेत जशा नवनवीन मैत्रिणी असायचा अगदी तसच या संसाराच्या वाटेवर नवीन नाती होती. प्रत्येक नात्याला जपणं, मनवण, समजून घेणे या सर्व विषयांचा अभ्यास या प्रवासात सुरु झाला. नवरा त्याच्या प्रत्येक वाक्यात बाबाला शोधत होती. नवीन

पण या संसाराच्या वाटेवर येणाऱ्या अवघड वाटणाऱ्या नात्याच्या गोष्टी कशा सोडवाव्या याचा धडा कधी तिला कोणी घेतलाच न्हवता.

पण लग्नानंतर त्या जगाची सफारी करताना बाबांनी एक गोष्ट शिकवली होती. "तुझा वाटेवर वाटणारे कठीण प्रसंग, अनुभव तुला त्रास देतील पण या त्रासातून ते तुला आयुष्याचं गणित मात्र शिकवून जातील". या शब्दावर विश्वास ठेवून संसाराच्या प्रवासाला सुरुवात झाली होती. तिचा रोजचा दिवस नवीन काहीतरी ठरलेलं असायचं कधी स्वयंपाक तर कधी घरचं काम यातच दिवस निघून जायचा लग्नानंतर बाबांनी सांगितलं होतं. "लग्न झाले तरी सोडू नको साथ शिक्षणाची" या काळात पुस्तकांची मैत्री मात्र होत गेली तिची शिक्षण पूर्ण करायचा आहे. जॉब करायचा असा विचार करतच विचारताच राहिले. त्यानंतर पहिली वर्ष तर माहेर-सासर या प्रवासातच निघून गेलं.

वडिलांचे काही बोल मात्र तिला क्षणाक्षणाला आठवायचे. थकले,रडली तर त्यांना आठवायचे आणि ठरवायचं आपल्याला करायचं आहे. आपल्या बाबांच्या स्वप्नांसाठी.... आपल्याला बाबांचे स्वप्न पूर्ण करायचं



सुरुवात होती समजण अवघड वाटत होतं. बाबांनी नेहमीच शिक्षणाच्या वाटेवर वाटणाऱ्या अवघड प्रश्नांची उत्तरे कशी द्यायची एवढाच अभ्यास शिकवला होता.

आहे. या प्रवासात सगळे बोलत होते तिला शिक्षणाचा विचार सोड आता थोड संसाराकडे लक्ष दे. तेव्हा वाटायचं लग्नानंतर शिक्षण घ्यायचं नसत का ? अस

का बोलतायत हे?

पण असं म्हणतात ना "जर मनात उंचावर जाण्याची जिद्द असेल ना तर ती गोष्ट आपल्याला करण्यापासून कोणीच थांबवू शकत नाही" अगदी तसंच तिच्यासोबत घडलं ते म्हणजे जस शिक्षणाच्या वाटेवर चालताना शिक्षणाच्या दुनियेमध्ये फिरताना बाबा सोबत होता. अगदी तसंच तिच्या या नवीन वाटेवर तिच्यासोबत तिची नाव अडखळणाऱ्या रस्त्यांवरून अडखळणाऱ्याच्या लाठांवरुन समुद्राच्या किनारी आणून लावणारा असा एक सखा सोबतीत होता त्या प्रवासात भेटला होता तो म्हणजे तिचा खरा गुरु नवरा.

लग्नानंतर हा प्रवास करणं तितकं सोपं नव्हतं अडचणी काही वाईट प्रसंग, तर कधी भीती, जबाबदारी सांभाळून तिथपर्यंत जाणं कधी शक्य नव्हतं अभ्यास करण्यासाठी कधी रात्र रात्र जागाव लागायचं तर कधी दिवसभर घरच्या कामात व्यस्त रहावे लागायचं परंतु ओरडून ती गोष्ट तिने ती केली पाहिजे. असा सांगणारा तिचा सखा मात्र तिला नेहमी तिच्या पाठीशी उभा राहताना दिसला. तिला नेहमी तो म्हणायचा "हे बघ एक गोष्ट लक्षात ठेव आपल्याला हे करायचं आहे. आणि सगळं सहज शक्य नाहीये तुला एवढं तर सहन करावं लागणारच आहे. तू घाबरू नकोस मी आहे तुझ्यासोबत. तू कर तुला काय करायचं ते"

हे बोल ऐकून नव्याने प्रवासाला सुरवात करायची. हरलेली ती पुन्हा नव्याने त्या यशासाठी कामाला लागायची. तिच्या या शिक्षणाच्या प्रवासात जे शिक्षण तिने घेतले होते. त्या शिक्षणावरून कुठेच तिला काही नोकरी भेटत नव्हती. पण त्यावेळी तिला साथ देऊन तिच्या नवऱ्याने लग्नानंतर तिला नवीन वाट दाखवून दिली. आणि तिथपर्यंत तिला जाण्यासाठी खऱ्या अर्थाने साथ दिली. या प्रवासात तिला तिचा बाबा मात्र आठवत राहिला. जसं पहिलीच्या वर्गात जाताना शाळेत बाबाचा घट्ट हात पकडला होता अगदी तसंच या नवीन वाटेवरती कॉलेजमध्ये जाताना नवऱ्याचा हात पकडला होता. जसा बाबा हात धरून पुढे घेऊन जातो. अगदी तसंच तिला नवर्याचा हात धरल्यावर तिला वाटत होतं की ती तीच्या वडिलांचा हात धरून त्या शाळेच्या अंगणामध्ये प्रवेश करते आहे. आणि आपल नाव नोंदवण्यासाठी पुढे जाते आहे.

तीच शिक्षण पुन्हा सुरू झालं होत. रोज बाबाजवळ पैसे मागायची आता आठवड्यातून एकदाच पण दोनशे रुपयांची ऑर्डर मात्र नवऱ्याला सोडायची खर्च ५० रुपये असायचा पण ओर्डर मात्र २०० रुपयांची असायची तोही तिच्या वडीलांसारखी तिची ओर्डर मात्र पाळायचे. वही पेन संपलं की लग्ना अगोदर बाबाला मात्र सांगायची बाबा वही संपली आहे. नवीन द्या पण आता तीच मुलगी आपल्या नवऱ्याला सांगते वही संपले मला आणून दे आणि तोही तिच्या त्या प्रवासात तिला हवी ती गोष्ट नेहमी देत राहिला.

पण मनात एक भीती मात्र वाटत होते बाबांनी ठेवलेल्या विश्वासात ती जशी पात्र नाही ठेरवू शकली त्यांच्यासाठी सरकारी नोकरी नाही घेऊन देऊ शकली. अगदी तसंच तिच्या नवऱ्यासोबत तर होणार नाही ना आत्ताचा काळ हा तसाच वाटत होता. तिला वडिलांसाठी करणारे आता नवऱ्यासाठी करू लागली होती. पण आतापर्यंत खूप अपयश त्या वाटेवर येत होत. पुन्हा पुन्हा परत तिथेच येऊन थांबत होती. परंतु सगळ्या प्रवासात तिला तिच्या बाबांचा शब्द एक आठवत होता "अपयश आलं म्हणून प्रयत्न सोडू नको कष्टाचं फळ हे नक्की मिळतच" त्यामुळे या वाटेवर कधीच अजून हार मानली नाही. ती अजूनही लढती आहे. तिच्या बाबांच्या स्वप्नासाठी....

**एकता संकपाळ**
**इचलकरंजी**
**मो.7030430632**

# या वळणावर



“आजी.. ए आजी.. इकडे ये ग!” अर्णव अभ्यास करता करता आजीला आवाज देऊ लागला.

“काय झालं रे बाळा, काही हवं का?” आजी स्वतःला सावरत अर्णवच्या रूममध्ये आली.

“आजी मला खूप कंटाळा आलाय ग.. काय वाचतो ते कळत पण नाही “ अर्णव ने तक्रारीच्या सुरात आजीला सांगितले.

“कंटाळा करून कसं चालेल बाळा, दहावीचं वर्ष ना तुझं.. मग अभ्यास तर करावाच लागेल” आजी समजावणीच्या सुरात बोलली.

“शाळेतून आल्यापासून करतोच आहे ना? पण आता मला खूप कंटाळा आलाय ग “अर्णव.

“बरं थोडावेळ आराम कर, मी तुझ्यासाठी छान उपमा करते.. तुझ्या आवडीचा.तोपर्यंत तू टीव्ही बघ हव तर”

“बरं!” अगदी आनंदीत होऊन अर्णव ने आजीला मिठी मारली.

अर्णव टीव्ही बघायला समोर दिवाणखान्यात गेला आणि आजीने आपला मोर्चा किचनकडे वळवला. आजी म्हणजे सुलभाताई! त्यांचे यजमान प्रभाकरराव जिल्हापरिषदेच्या शाळेतून सेवानिवृत्त झाल्यानंतर दोघेही कधी गावाला तर कधी इथे अनिल कडे यायचे. यावेळी अनिलने त्यांना बोलावून घेतले होते.अर्णवचे दहावीचे वर्ष होते त्यामुळे त्याच्याकडे लक्ष ठेवायला आणि त्याला सोबत व्हावी म्हणून !

विचार करता करता आजीचा उपमा तयार झाला.

“आजी.. खूप टेस्टी झालाय गं! तुझ्या हातात खरंच जादू आहे जादू !” आजी समाधानाने अर्णव कडे पहात नुसतं हसल्या. तेवढ्यातच बाहेर कोणी आल्याची चाहूल लागली म्हणून त्या दिवाणखान्यात आल्या अनिता ऑफिसमधून आली होती.

“लवकर आलीस ग आज?”

“हो आई, मधल्या सुटिनंतर आज सभा होती. सभा संपली आणि आले लवकर” अनिता टेबलवर बॅग ठेवतच बोलली.

“बरं झालं !उपमा केला आहे आत्ताच..खाऊन घे गरम-गरम”

“उपमा ! आत्ता..” अनिता

“हो आई.. मला भूक लागली होती आणि अभ्यासाचा कंटाळा पण आला होता,मग बसलो थोडा वेळ टीव्ही समोर” अर्णव ने खुलासा केला.

“अभ्यासाचा कंटाळा करून कसं चालेल अर्णव.. महत्त्वाचं वर्ष आहे ना हे ! यावरच ठरते पुढे तुला काय करायचं ते; असा टाईमपास करून नाही चालणार” अनिताने जरा रागानेच समजावले.

“करतो ग तो अभ्यास, थोडा वेळ विश्रांती घेतली तर काय बिघडते?” आजीने अर्णव ची बाजू घेतली.

“आई तुम्ही त्याचा कड घेऊ नका.. पहिले सारखे नाही राहिले आता.. स्पर्धा खूप वाढली ! एकेका मार्काने मनासारखी शाखा हातची निघून जाते आणि मग पश्चात्तापाची वेळ येते..” अनिता फणकाऱ्याने आतल्या रूममध्ये निघून गेली.

महिन्याभरावर अर्णवची बोर्डाची परीक्षा आली होती. अभ्यासात व्यत्यय नको म्हणून अनिता आणि अनिल खूप काळजी घेत होते.येणाऱ्या जाणाऱ्यांना घरात बंदी होती. एकमेकांशी बोलताना हळू आवाजात बोलायचे. अर्णवनेही कामाशिवाय रूम बाहेर निघायचे नाही अशी संचारबंदीच लागू झाली होती जणू !

सायंकाळी खाली बगिच्यात फिरायला जायच्या आधी आजोबा अर्णवच्या रूममध्ये डोकावले.अर्णव डोकं टेबलवर टेकवून बसलेला त्यांना दिसला.

“काय झालं रे अर्णव..बरं वाटत नाही का ?”आजोबांनी काळजीने विचारले.

“माझं डोकं खूप दुखते होआजोबा” अर्णव ने रडवेल्या स्वरात सांगितले.

त्याचे डोळे रडून रडून सुजले होते. आजोबांनी त्याच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवत त्याला जवळ घेतले,तसा तो त्यांच्या कुशीत ओक्साबोक्शी रडायला लागला.

“नाही बाळा..असं रडायचं नाही.. डोकं दुखतंय ना? चल खाली माझ्यासोबत.. आणि तो अभ्यास जरा वेळ बाजूला ठेव”

“पण आई-बाबा रागवतील हो आजोबा मला” अर्णवने मनातील भीती बोलून दाखवली.

“काही रागवणार नाही.. मी सांगेन त्यांना “

अर्णव आजोबांसोबत जायला तयार झाला.त्याच्या सोसायटीतील मुले क्रिकेट खेळताना दिसली.किती तरी दिवसानंतर असा सायंकाळी तो खाली आला होता!

“अर्णव तुला आवडते ना रे क्रिकेट खेळायला!”

“हो आजोबा..खूप आवडते”

“मग जा की.. खेळ थोडावेळ त्यांच्याशी, तोपर्यंत मी फिरून घेतो”

अर्णव एकदम खुश झाला आणि पळाला क्रिकेट खेळायला. अर्धापाऊण तास कसा निघून गेला ते कळले देखील नाही. खूप फ्रेश वाटत होते आता त्याला.

"अर्णव.. अर्णव काय आहे हे? अभ्यास करायचा सोडून तू खेळायला आलास.. लाज कशी वाटत नाही रे तुला.. तुझ्यासाठी आम्ही एवढं मरमर करायचं आणि तू मजा करतोस?" अर्णवला खेळताना पाहून अनिताच्या अंगाचा तीळ पापड झाला.अर्णव निमूट पणे तिच्यामागे घरी आला आणि हातपाय धुवून अभ्यासाला बसला. त्यांच्या मागोमाग अनीलही आला.घरातल्या वातावरणावरून काहीतरी बिनसल्याचं त्याला जाणवलं. तो आपल्या खोलीकडे वळला. अनिताने झाला प्रकार त्याला सांगितला.एव्हाना प्रभाकररावही फिरून आले होते.सुलभाताईंनी सगळ्यांसाठी चहा केला. अनिल चहा घ्यायला बाहेर आला.समोर त्याचे बाबा बसले होते.

"हे बघा बाबा.. मी स्पष्टच बोलतो, अर्णवची परीक्षा महिन्याभरावर येऊन ठेपली आहे.. आता त्याला असा वेळ वाया घालवणे परवडणार नाही" अनिलले सरळ विषयालाच हात घातला.

"अनिल.. अरे हे वेळ वाया घालवणं नाही आहे. मी पण शिक्षक होतो,मला पण कळते रे मुलांची मानसिकता.. विरंगुळा म्हणून दिवसातला थोडा वेळ त्यांना त्यांच्या आवडीचं काम करु द्यावे, मग बघा ते पुन्हा नव्या दमाने अभ्यासाला लागतात "

"बाबा तो काळ वेगळा होता, हा काळ वेगळा आहे"

"काळ वेगळा असला तरी मुलांची मानसिकता तीच आहे अनिल.. त्यांचं दडपण वाढू देऊ नये.

मुलांच्या अभ्यासा एवढेच त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याकडेही लक्ष द्यायला पाहिजे " प्रभाकरराव आपल्या परीने अनिलला समजावत होते.

"बाबा आम्ही लक्ष देतोच की त्याच्या तब्येतीकडे आणि खाण्यापिण्याकडे. हे बघा बाबा.. मी काय म्हणतो, तुम्ही आणि आई अर्णव ची परीक्षा होईस्तोवर गावाला जाऊन येता का.. कृपया गैरसमज करून घेऊ नका "

"ठीक आहे.. आम्ही उद्याच निघतो.तसाही अर्णव तुमचा मुलगा आहे त्याचे चांगले वाईट आमच्यापेक्षा तुम्हाला जास्त कळते.. गैरसमज कसला त्यात?" चर्चा तिथेच थांबवून सगळे आपापल्या रुममध्ये गेले. दुसऱ्या दिवशी सुलभाताई आणि प्रभाकरराव, अर्णवला परिक्षेसाठी शुभेच्छा देऊन गावाला निघून गेले.

कार्यालयात मधल्या सुटिनंतर अनिताला सोसायटीमधील बाजूला राहणाऱ्या काळे काकूंचा फोन आला...

"अनिता.. अगं काळे काकू बोलते"

"हा.. बोला काकू "अनिता.

"अगं.. अर्णव ने तुमच्या फ्लॅटच्या बाल्कनीतून उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला ग.." काळे काकूंनी घाबरतच सांगितले.

"काय ! केव्हा.. कसा ?... कुठे आहे काकू तो आता ?" अनिता वर जणू आभाळच कोसळले...

"अगं.. जिल्हा रुग्णालयात घेऊन चाललो आम्ही त्याला! संदीप घरी होता म्हणून बरे झाले..तू तिकडेच पोहोच आणि अनिललाही सांग"

अनिताचे हातपाय थरथर कापत होते.. तिने कसेबसे सावरून अनिल ला सांगितले आणि ऑफिसमध्ये बॉसला सांगून सुट्टी मागितली. धावत पळतच तिने रुग्णालय गाठले.तेवढ्यात अनिल ही तिथे येऊन पोहोचला. दोघेही धावतच अर्णवच्या रुम कडे गेले. डॉक्टर त्याला तपासत होते. अनिताच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहत होत्या.

"काय झालं सर! काही सिरीयस आहे का ?"त्याने घाबरतच डॉक्टरांना विचारले.

"हे बघा.. तसं काही फ्रॅक्चर वगैरे नाही,पण मुलगा खूप दडपणात आहे..काही बोलण्याच्या मनस्थितीत नाही. आम्हाला २४ तास निगराणीत ठेवावे लागेल.. त्यानंतरच काय ते ठरवू" डॉक्टरांनी स्पष्टपणे सांगितले.

"काय झालं हो हे.. कुठे कमी पडलो आपण.. आपल्या मुलाने हे असं पाऊल उचललं..?" अनिताच्या भावनांचा बांध फुटला होता. अनिलही आतून ढासळला होता. आज अनिताला प्रकर्षाने तिच्या सासू-सासऱ्यांची आठवण येत होती.अनिल ने खिशातून मोबाईल काढला आणि बाबांना कॉल केला. त्यांना सगळे सविस्तर सांगितले.

"बाबा.. आमचे चुकले हो..अभ्यासाचा खूप ताण दिला त्याला..तो ताण त्याला कुठेच व्यक्त करता आला नाही मनातल्या मनात त्याचा संघर्ष चालू असेल पण आम्हाला काही कळलेच नाही.. चढाओढ स्पर्धा यात एवढे अडकून गेलो.. अवास्तव अपेक्षा करत राहिलो त्याच्याकडून.. त्या अपेक्षांच्या ओझ्याखाली बिचारा दबून गेला हो.. श्वास कोंडला त्याचा.." आता अनिलच्या भावना अनावर झाल्या.

"अरे, खूप संवेदनशील मन असते किशोरवयीन मुलांचे..आपणच वेळोवेळी त्यांना समजून घ्यावे लागते.. त्यासाठी घरातले वातावरण खेळीमेळीचे ठेवावे..त्यांना व्यक्त होता आले पाहिजे पालकांजवळ म्हणजे एकटेपणाची जाणीव होणार नाही आणि असे टोकाचे पाऊल उचलण्याची गरजच पडणार नाही

"बरोबर बोलताय बाबा तुम्ही.. अभ्यासात व्यत्यय नको म्हणून बोललोच नाही हो आम्ही त्याच्याशी.. खूप चुकले आमचे "

"बरं आता सावर स्वतःला आम्ही निघतोच पुढच्या बसने.. काही होणार नाही अर्णवला" बाबांच्या बोलण्याने दोघांनाही धीर आला. या नाजूक वळणावर त्यांना आईबाबांच्या आधाराची नितांत गरज भासली.

**सौ.विद्या निनावे**
**नागपूर**
**मो. ८७६६९८४०६१**

# दवबिंदू





धुक्यातले दवबिंदू
ओघळले पानावर
धुंद गुलाबी चादर
पसरली रानावर..१

हळूवार काळजात
थेंब थेंब साठवून
मन मोहरून जाई
स्पर्श गोड आठवून..२

पडे प्रकाश किरण
येई चमक आगळी
मंदस्मित करितसे
पहा गुलाब पाकळी..३

मऊ दवात न्हावून
मोहरला पारिजात
स्वप्न सुखाचे दडले
जडावल्या नयनात..४

धुके उरेल रानात
दव जाईल विरून
विरहाच्या वेदनेने
येई काळीज भरून..५

**सय्यद चाँद तरोडकर**
**परभणी**
**मो.९५०३४४७८८७**

# औदार्य



औदार्य असतं झाडात, डबडब आडात
आंब्याच्या पिकल्या, बिल बिल पाडात
सोनसळी उन्हात, मातीच्या कनात
गोठ्यातील गाईच्या, ताठरल्या थानात
खोल खोल दरीत, पावसाच्या सरीत
औदार्य मग्न, सुखाला कुरवाळीत

औदार्य असतं गंधात, हिरवळीच्या छंदात
सागरातील लाटांच्या, खळ खळ निबंधात
निळ्या आभाळात, सावली शिराळात
मावळतीच्या किरणात, मेघातील जळात
औदार्याचा ठेवा, फुलारल्या बकुळात
औदार्याचा जन्म, उदात्ततेच्या कुळात

औदार्याला कुठे माप? औदार्य अमाप
नि:संग नि:संग, औदार्याची नियत साफ
औदार्य नदीत, औदार्य वाऱ्यात
माणसं सोडून, उर्वरित पसाऱ्यात
औदार्याचा गुण, वरदान मागून
घे ना रे जगुन, स्वार्थी माणसा

**भानुदास धोत्रे**
**परभणी**
**मो.7972625086**

# उंच तिचा झोका



"अभिनंदन तुमचे, लक्ष्मी आली घरी," हॉस्पिटलच्या लेबर रूममधून बाहेर येत एक प्रौढ नर्स जगदीशला म्हणाली. तिच्या हातात दुपट्यात गुंडाळलेला, डोळे किलकिले करून हे जग पाहणारा एक चिमुकला जीव होता. हे ऐकताच जगदीशच्या बाजूला बसलेली त्याची आई-मालतीबाईंच्या चेहऱ्यावर नाराजी पसरली. "एक आहे की लक्ष्मी ही. दुसरीपण लक्ष्मीच कशाला पाहिजे?" बाजूला झोपलेल्या अडीच-तीन वर्षाच्या तेजसकडे रागाने पाहत म्हणाल्या.

नर्स बिचारी जगदीशकडे पाहत म्हणाली, "मग सरस्वती आली असे समजा."

"नको आम्हाला या लक्ष्मी आणि सरस्वती, हिला आधीच सांगितले होते की यावेळी मुलगाच हवा पण नाही, परत मुलगीच झाली. जा तिला घेऊन आत, नाही घेणार तिला आम्ही जवळ," नर्सवर ओरडत मालतीबाई म्हणाल्या. ती बिचारी घाबरून तो इवलासा मांसाचा गोळा घेऊन पुन्हा आत निघून गेली.

ती आत जाताच जगदीश आईला म्हणाला, "आई, हे हॉस्पीटल आहे जरा विचार करून बोल गं."

"कळतंय मला. तिचे आई-बाप कधी येणार आहेत? मला आता इथे अजिबात थांबायचे नाही की तिचे तोंडही पाहायचे नाही," त्रागा करत त्या म्हणाल्या.

"निघाले आहेत, येतील," जगदीश हे म्हणत असताना त्याला साधनाचे-त्याच्या पत्नीचे आई-वडील व भाऊ येताना दिसले. तो म्हणाला, "आलेच बघ."

साधनाच्या आईने जगदीशला विचारले, "कशी आहे, साधना?"

"ठीक आहे. मुलगी झाली, आताच नर्स येऊन सांगून गेल्या," जगदीशचे हे ऐकताच आई-वडिलांच्या चेहऱ्यावर काळजी आणि आनंद असे संमिश्र भाव उमटले. साधनाचे सुखरूप बाळंतपण झाले, नवा जीव जन्माला आला म्हणून आनंद तर मालतीबाईंच्या अपेक्षा व स्वभाव माहिती असल्यामुळे काळजी.

अचानक मालतीबाई उठून उभ्या राहिल्या आणि म्हणाल्या, "थांबा, आता तुम्ही इथे आणि सांभाळा कायमचे तुमच्या दोन्ही नातींना आणि लाडक्या लेकीला. आमच्या घरी पाठवू नका पुन्हा. चल रे, जगदीश." आणि खरेच जगदीशचा हात पकडून त्याला जबरदस्तीने घेऊनही गेल्या. जगदीशही काही न बोलता आईबरोबर निघून गेला. हे सर्व पाहून साधनाचे आई-बाबा सुनिताताई-अशोकराव, तिचा भाऊ अनिकेत हतबुद्ध होऊन गेले आणि हताश होत बसून राहिले. सुनिताताई बाजूला झोपलेल्या तेजसच्या डोक्यावरून मायेने हात फिरवत विचार करत राहिल्या.....

......या सात-आठ महिन्यात बरेच काही घडून गेले. जगदीश आणि त्याच्या घरच्यांनी बोलल्याप्रमाणे साधना व तिच्या मुलींना घरी नेलेच नाही. साधना माहेरीच राहिली, एव्हाना जगदीशने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता आणि साधनानेही काहीही आढवेढे न घेता ते कबूल केले होते, जबरदस्तीच्या नात्याला काहीच अर्थ नसतो, हे तिने गेल्या पाच वर्षांत अनुभवले होते.

साधना पहिल्यांदा गरोदर असतानाच वंशाचा दिवा पाहिजे म्हणून हट्ट करणाऱ्या मालतीबाईंनी तेजस झाल्यानंतर साधनाचा मानसिक छळ करण्यास सुरुवात केली होती. दुसऱ्या वेळी तर त्यांनी तिला आधीच धमकी दिली होती की यावेळी मुलगाच व्हायला हवा, नाही झाला तर तिला या घराचे दरवाजे कायमचे बंद करून, काडीमोड दिला जाईल. जगदीशही यावर काहीच बोलत नसे. रस्ते, पूल बांधणीचे प्रकल्प प्रत्यक्षात आणणाऱ्या जगदीशचे आईसमोर काहीच चालत नसे. न बोलून तो आपल्या आईच्या विचारांशी सहमत असल्याचेच दर्शवीत होता. आई-बाबा, अनिकेत-वहिनी यांपासून तिने सासरच्या लोकांचा जाच, मानसिक त्रास लपवूनच ठेवला होता, वरवर सुखी आहे असे दाखवीत, ती सासरी दिवस ढकलत होती पण आता आई-बाबांपासून काहीच लपून राहिलेले नव्हते त्यामुळे तिने आता आपला स्वाभिमान जपतच पुढचे आयुष्य जगत मुलींनाही स्वतः वाढविण्याचा निर्णय घेतला होता.

पदवीधर ती होतीच, तिने बी. एड.साठी प्रवेश घेतला आणि ते पूर्णही केले. नोकरीसाठी शाळा, विद्यालयात अर्ज केले, एका नामांकित शिक्षण संस्थेत तिला शिक्षिकेची नोकरी मिळाली. आई-बाबा, भाऊ-वहिनी नको म्हणत असताना ती आपल्या दोन्ही मुलींबरोबर त्यांच्याबाजूलाच वेगळे घर घेऊन राहायला लागली, कोणावरही आपण ओझे म्हणून जगायचे नाही, हे तिने ठरविले होते. तेजस आणि ओजस दोघीही आईसारख्याच हुशार होत्या, आता त्या समंजसही झाल्या होत्या. साधना घरी नसताना दोघी एकमेकींना सांभाळून घेत अभ्यास करीत असत, तर कधी आजी-आजोबांकडे जात मामे भावंडांबरोबर खेळत असत. साधना मात्र शाळा सुटल्यानंतर आपला सगळा वेळ मुलींना देई. त्यांच्या अभ्यासातील शंकांचे समाधान करी, एखादा विषय समजला नाही तर तो समजवून देई. पण मुलींना शिकविता शिकविता आपला अभ्यास

आणि शिक्षणही तिने सुरूच ठेवले होते. एम. ए. नंतर पी. एच. डी. ही तिने केली आणि एका महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून कार्यरत झाली.

बघता बघता २३-२५ वर्षे उलटून गेली होती. आई-बाबा, भाऊ-वहिनी होता येईल तितकी मदत करत होते, मदत तिला पैशांची कधीच नव्हती फक्त तिच्या पाठिशी खंबीर उभे राहायला हवे होते. ते कर्तव्य त्या चौघांनीही पार पाडले, मुलींची काळजीही घेतली, माया-प्रेम दिले.

तेजस आणि ओजस दोघीही अभ्यासात हुशार असल्याने दहावी, बारावीतही त्या चांगल्या गुणांनी पास झाल्या. पुढे तेजस स्पर्धात्मक परीक्षा देत एक एक परीक्षा उत्तीर्ण होत जिल्हाधिकारी झाली आणि ओजस बारावी नंतर वैद्यकीय शाखेत प्रवेश घेऊन डॉक्टर झाली, नंतर विशेष शिक्षण घेत न्युरोलॉजिस्ट झाली. थोडे दिवस नामांकित हॉस्पीटलमध्ये प्रॅक्टिस केल्यानंतर वेगवेगळ्या विषयातील तज्ञांनी एकत्र येऊन एक मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल उभे केले. दोघीही तेजस आणि ओजस आज आपापल्या क्षेत्रात अग्रस्थानी होत्या. दोघींचाही साधनाला सार्थ अभिमान होता. आजी-आजोबा तर नातींना कुठे ठेवू कुठे नको इतके कौतुक करीत होते. साधनाच्या कष्टाचे, संस्कारांचे हे फलित होते.

तेजस एक कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून प्रसिद्धीस येत होती. शहरात पर्यावरणाला पूरक असे प्रकल्प राबवित होती. पर्यावरणास घातक अशा प्रकल्पांविरुध्द कडक धोरण अवलंबत कठोर कारवाई करीत होती.

एक दिवस ती आपल्या कार्यालयात असताना तिचे सहाय्यक गणेश रावते धावत तिच्या कार्यालयात आले आणि त्यांनी सांगितले की ज्या उड्डाणपूलाचे काम सुरु होते त्याचा पूर्ण झालेला भाग अचानक कोसळला होता आणि त्या कोसळलेल्या भागाखाली आल्याने चार कामगारांचा मृत्यू झाला होता. ती तत्काळ घटनास्थळी दाखल झाली. पूर्ण परिस्थितीचा आढावा घेत मंजूरी दिलेली सर्व कागदपत्रे मागवत काम बंद ठेवण्याचे आदेश दिले.

----"----

या प्रसंगानंतर १५-२० दिवस निघून गेले. या प्रसंगातील दोषी कंत्राटदार यावर कारवाई होऊन त्याच्याकडचे कंत्राट काढून घेण्याचे आदेश दिले. जामिनावर सुटलेला दोषी कंत्राटदार जिल्हाधिकारी तेजसला भेटण्याची परवानगी मागायला आला आणि दारात उभ्या असलेल्या शिपायाला त्याने तसे जिल्हाधिकारी मॅडमना विचारण्यास सांगितले. शिपाई तेजसला सांगण्यास गेला असता कंत्राटदाराने दारावरची पाटी वाचली 'जिल्हाधिकारी कु. तेजस साधना भोसले'. हे वाचल्याबरोबर त्याच्या मनात विचार आला 'ही आपली मुलगी असेल का?' पण क्षणात झुरळ झटकावे तसे तो विचार झटकून टाकला. आपण तर साधनाला घराबाहेर काढले होते, पोरीला एवढे शिकविण्याएव्हढे तिच्याकडे कुठे पैसे आणि तिचा बापही साधा मास्तरच होता, तो काय हिच्या दोन पोरींना सांभाळत इतके शिकविणार. एकसारख्या नावाचे कितीतरी असतात,....हा विचार तो करत राहिला.

शिपायाने आत येऊन जेव्हा सांगितले की कंत्राटदार जगदीश पवार भेटायला आले आहेत तेव्हा तिला आपल्या आईवर आणि आपल्यावर अन्याय करणाऱ्या जगदीशचा खूप राग आला. पण इथे फक्त सरकारी काम. वैयक्तिक नाती कामात आणायची नाहीत, हे तिने आधीच ठरविले होते. तो आत आला, त्याला पाहताच तिच्या हृदयात एक जोरात कळ येऊन गेली. त्याला आईशी असे वागल्याचा जाब विचारावा, असे वाटले पण पुन्हा तिने मन आवरले आणि ती शांतपणे त्याच्याशी बोलू लागली. अपघात घडणारच, कामगार व्यवस्थित काम करीत नाहीत, प्रत्येक गोष्ट प्रत्येक वेळी तपासत बसायला इतका वेळ नसतो, यातूनच कमीजास्त होऊन पूल कमकुवत बनला असणार अशा सबबी व आपल्या गुन्ह्याची सारवासारव करु लागला. तो जसजसा बोलत होता तसतसा तिच्या रागाचा पारा वाढत होता. शेवटी तो जे बोलला ते ऐकून तर तिच्या सहनशक्तीचा अंतच झाला. तो म्हणाला की मरणारे मरुन गेले त्यांच्या घरच्यांना ५-५० हजार दिले की ते गप्प बसतील, तुम्ही काही काळजी करु नका, तुम्ही फक्त माझे काम पुन्हा सुरु करण्यास परवानगी द्या. तुम्हालाही आपण काहीतरी देऊ ना.

हे ऐकताच तेजस आपल्या खुर्चीतून उठून उभी राहिली आणि रागाने म्हणाली, "माणसाच्या आयुष्याची किंमत करणारे तुम्ही कोण? चला, चालते व्हा माझ्यासमोरुन. हेच काय पण यापुढे तुम्हाला कोणतेच सरकारी कामाचे कंत्राट दिले जाणार नाही." तिचा चिडलेला आवाज ऐकून दाराबाहेरचा शिपाई आत आला ते पाहून तेजस म्हणाली, "काका, यांना बाहेर काढा येथून आणि परत पुन्हा माझ्यासमोर येऊ नका असे सांगा." शिपाईकाका जगदीशच्या हाताला धरुन बाहेर घेऊन गेले. तेजस रागाने थरथरत होती. पुन्हा खुर्चीवर बसून शांत होत ग्लासमधील थोडे पाणी ती प्यायली आणि डोळे मिटून बसून राहिली. शिपाईकाका पुन्हा आत येऊन चौकशी करु लागला, "मॅडम, कॉफी सांगू का तुमच्यासाठी, बरं वाटतंय ना तुम्हाला."

"नको, काका. मी बरी आहे आता," असे म्हणत तिने समोरच्या फाईल्स पाहायला सुरुवात केली, शिपाईकाका मान हलवत 'जी' म्हणत बाहेर जाऊन आपल्या स्टूलवर बसले.

संध्याकाळी ऑफिस संपल्यावर तेजस घरी आली. ती येताच साधनाने दोघींसाठी चहा बनविला आणि तो घेत त्या बसल्या असतानाच सुरक्षारक्षक आत आले आणि कोणीतरी भेटावयास आल्याचे सांगितले, तिने पाठवून दे म्हणताच. तो समोर येऊन राहिला. तो जगदीशच होता. त्याला पाहताच साधना पटकन उभी राहिली. तिला पाहताच जगदीशलाही आश्चर्य

वाटले आणि ही कलेक्टर तर आपलीच मुलगी निघाली हिला आता भावनिक करून हिच्याकडून काम करवून घेता येईल, असा विचार त्याने केला. त्याने मनधरणी केली, साधनाची माफी मागितली पण तेजसने त्याला भीक घातली नाही. तिच्या सरकारी कामात साधनाने एकही शब्द उच्चारला नाही. व्हायचे तेच झाले तो ऐकत नाही म्हटल्यावर आता आपली सर्व कंत्राटे जाणार, कसे होणार या विचाराने तो अधिकच आक्रमक बनत गेला शेवटी तेजसने सुरक्षारक्षकांकरवी त्याला गेटच्या बाहेर काढण्यास सांगितले. पण गेटच्याबाहेर काढत असतानाच तो गेटवर बेशुद्ध पडला. त्याला शुध्दीवर आणण्याचा प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही म्हणून त्याला तेजसने रुग्णालयात दाखल केले.

ओजसच्या हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यावर कळाले की त्याला अर्धांगवायूचा झटका आला आहे आणि त्याची उजवी बाजू पूर्ण निकामी झाली आहे. ओजसच्या देखरेखीखाली उपचार सुरु होते. त्याच्या मोबाईलवरून फोन करून त्याच्या घरच्यांना त्याच्याबद्दल हॉस्पीटलच्या स्टाफने कल्पना दिली. थोड्याचवेळात तिथे कमरेत वाकलेल्या मालतीबाई, त्याची आताची पत्नी आणि मुलगा आले. साधनाला पहाताच मालतीबाई ताठ झाली. वय झाले तरी गुर्मी कमी झाली नव्हती.

साधनाला मालतीबाई म्हणाल्या, “पाहिलीस का ही माझी सून संगिता आणि हा जगदीशचा मुलगा. तुला देता आला नाही पण हिने दिला आम्हाला वंशाचा दिवा.”

या बोलण्यामुळे कोणी कोणाला कोण आहेत हे सांगाण्याची गरज पडली नाही. साधना काहीच बोलली नाही. पण साधनाला पाहताच जगदीशचा मुलगा मात्र तोंड लपवत होता. साधनालाही त्या मुलाला कुठेतरी पाहिल्यासारखे वाटत होते, पण लक्षात येत नव्हते. जगदीश शुध्दीवर आला म्हणून डॉ. ओजस त्याला तपासण्यासाठी आली. हॉस्पीटलचा येणारा जाणारा स्टाफ तेजस आणि साधनाला ‘नमस्कार, मॅडम...गुड इव्हिनिंग, मॅडम’ असे म्हणत होता, कोणी ‘उभ्या का, बसा ना’ हेही आदरपूर्वक विनवीत होते. याचे मोठे आश्चर्यच वाटत होते मालतीबाईंना. ती आणि संगिता ओजसकडे जगदीशबद्दल चौकशी करु लागल्या.

“त्यांना पॅरॅलिसिसचा अ‍ॅटॅक आल्यामुळे उजवी बाजू बधीर आणि लुळी पडली आहे. इंजेक्शन्स दिलेली आहेत तो कोर्स पूर्ण झाला की पाहू, काळजी करु नका, होतील ते बरे,” ओजसने त्यांना धीर देत सांगितले.

दोघीही रडू लागल्या, मुलगा मात्र जबरदस्तीने आणल्यासारखा बेफिकीर उभा होता. साधनाने त्यांना समजवले आणि तेजसने सर्वांसाठी कॉफी आणली. कॉफी घेत असताना साधनाला तो मुलगा कोण ते आठवले, ती म्हणाली, “तू तोच ना रे, कॉलेजमधल्या मुलींची छेडछाड, कॉलेजच्या आवारात धूम्रपान आणि प्राध्यापकांशी उर्मट वागतो म्हणून मॉडर्न महाविद्यालयातून निलंबित केलेला विद्यार्थी?”

संगिता, मालतीबाई खाली मान घालून नजर चुकवत राहिल्या, जगदीशनेही मान फिरवली. तितक्यात तिथे एक सिस्टर आली आणि तिने साधना, तेजसला सांगितले की ओजस मॅडमनी बोलविले आहे. दोघीही तिच्या मागोमाग गेल्या. मालतीबाईंना आता मात्र स्वस्थ बसवेना, तिने सलाईन बदलणाऱ्या स्टाफला विचारले, “ही कोण आहे एव्हढी की तुम्ही सगळे तिची विचारपूस करताय, खातरदारी करताय?”

स्टाफ म्हणाली, “यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉ. ओजस आहेत ना, त्यांच्या या आई आणि ती मोठी बहीण. आई कॉलेजमध्ये व्हाईस प्रिंसिपल आहेत आणि ती मोठी बहीण कलेक्टर आहे आणि आमच्या ओजस मॅडम मेंदूच्या मोठ्या डॉक्टर आहेत. दोन्ही मुलीच झाल्या म्हणून डॉक्टर मॅडमच्या आईला सासरच्यांनी घराबाहेर काढत, घटस्फोट दिला होता. परंतु त्यांनी शिक्षिकेची नोकरी करत मुलींना आज इथंवर आणले. आणि या दोघी मुलीही जिद्दीने शिकत आपापल्या क्षेत्रात पुढे आल्या. मॅडमच्या आईच्या झोक्याच्या दोऱ्या कापून तो थांबवायचा यांनी प्रयत्न केला पण त्या मुलींच्या दोन आधारांवरच त्यांचा झोका उंच गगनाला भिडला आहे. दोघी मुली नावाप्रमाणेच एखाद्या ज्योतीसारख्या प्रकाशमान आहेत. पण तुमची कशी काय ओळख यांच्याशी? मॅडमच्या आई आणि ताई पेशंटला घेऊन आल्या ना म्हणून विचारले.”

“आहे ओळख, “ असे कसेबसे मालतीबाई म्हणाल्या. स्टाफने सांगितलेले ऐकताना जगदीश आणि मालतीच्या तोंडात मारल्यासारखे झाले होते. दोघी मुली असूनही एक डॉक्टर तर दुसरी कलेक्टर झाली होती आणि आपला हा वंशाचा दिवा कॉलेजमधून निलंबित केलेला. दोन्ही बाजूला दोन मुली आणि मध्ये साधना अशा समोरुन चालत येत त्यांच्याबाजूने निघून गेल्या. मालती, जगदीश एकदा त्या तेजस्वी तिघींकडे आणि एकदा आपल्या निस्तेज वंशाच्या दिव्याकडे पाहात राहिले.....

**ज्योती हलगेकर-जाधव**
**नवी मुंबई.**
**मो. ९८९२६७६३२१**



# वाढदिवसाला वाढते गैरप्रकार धोक्याची घंटा ?

भारतीय संस्कृतीत वाढदिवसाची स्थिती:

भारतीय संस्कृतीत, पूर्वी जन्मदिवस साजरा करणे फारसे प्रचलित नव्हते. त्याऐवजी, व्यक्तीच्या जीवनातील इतर महत्त्वाच्या टप्प्यांवर विशेष कार्यक्रम केले जात. मात्र, पाश्चिमात्य प्रभावामुळे वाढदिवस साजरा करण्याची पद्धत भारतीय संस्कृतीत आता मोठ्या प्रमाणात दिसून येते. विशेषतः शहरी भागात आणि तरुणांमध्ये ही परंपरा खूप लोकप्रिय झाली आहे. सारांशात, वाढदिवस साजरा करण्याची पद्धत भारतीय परंपरेचा भाग नसली तरी, आजच्या घडीला ती जागतिक स्तरावर पसरलेली आणि स्वीकृत परंपरा बनली आहे.

वाढदिवस साजरा करणे एक प्रथा आहे.

वाढदिवस साजरे करणे विविध संस्कृतींमध्ये एक सामान्य परंपरा आहे. याचा अर्थ प्रत्येक वर्षी आपला जन्मदिन साजरा करून आपण आपले जीवन, नातेसंबंध, आणि आनंद साजरा करतो. वाढदिवसाच्या दिवशी, अनेक लोक विशेष कार्यक्रम, पार्टी, उपहार, आणि विशेष काळजी घेतात.या प्रथेमध्ये आपल्या कुटुंबीय, मित्रमंडळी आणि इतर स्नेही व्यक्तींना आमंत्रित करून विविध गतिविधींचे आयोजन केले जाते. काही लोक धार्मिक किंवा सांस्कृतिक पद्धतींनुसार हा दिवस विशेष पूजा, आरती, किंवा इतर धार्मिक कर्मे करून साजरा करतात.वाढदिवस हा एक सण आणि आनंदाचा दिवस असतो, आणि त्याच्या साजरीकरणात प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनुसार विविध पद्धती आणि रुढी असू शकतात. वाढदिवस हा प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातला एक विशेष उत्साहाचा दिवस. दिवस उजाडला की नविन कपडे घालून थोरा-मोठ्यांच्या आशिर्वादाने दिवस न्हाउन निघायचा. मित्र-मैत्रीणी, नातेवाईकांच्या शुभेच्छा मनमोकळेपणाने मिळायच्या. त्यावेळी भेट वस्तुंपेक्षा शुभेच्छा जास्त मोलाच्या होत्या. घरातली आई, आजी, ताई औक्षण करुन सगळ्यांना नमस्कार करायला लावायच्या. मंदिरात जाउन देवाचा आशिर्वादही घेउन यायचा. आई घरात काहीतरी गोड्-धोड आवडीच जेवण करणार असे मंगल आणि पवित्र वातावरण माझ्या डोळ्यांसमोर येते.

हल्ली वाढदिवसाचे स्वरुप पलटले आहे.

आता वाढदिवस म्हटलं कि डोळ्यांसमोर झगमगते रंगीबेरंगी फुग्यांनी, फुलांनी, पताकांनी सजवलेला हॉल. स्वतःची श्रीमंती व मॉडपणा दाखवण्यासाठी आडव्या तिडव्या फॅशन करुन मराठीला कमीपणा देत सतत इंग्लिश फाडणारया बायका-पुरुष. ह्यात सगळ्यात महत्वाचा कार्यक्रम म्हणजे क्रीमची सजावट केलेला मोठ्ठा केक, मेणबत्त्या पेटवून त्या विझवणे. आपली संस्कृती खर तर दिवा लावण्याला महत्व देते. म्हणुन इथे सगळं उलटंच.) नंतर इंग्रजी गाण्यावर ते केक कापणं, आणि केक एकमेकाना भरवताना तोंडाला फासायचे. त्या केकेची नासधूस, सगळयांच्या तोंडावर, कपडयांवर, पायाखाली, सर्वत्र केकच साम्राज्य, आणि हे कमी म्हणून कि काय, थम्सअप उडवणे, आणि नंतर विविध खाद्यपदार्थ(आकडा न सांगणेच बरे)भरपूर घेऊन, एकमेकांना आग्रह करून, जास्त झाले म्हणून टाकून देणे. मनात असता, नसताना, हसून एकमेकांची स्तुती करणे, आणि खाऊन-पिऊन, नाचून पार्टी करणे. बाहेर पडल्यावर, (कधी कधी तिथेच) दुसरयांबद्दल कुत्स्तीत बोलणे,(यजमानाबद्दलही) खाण्याचा पदार्थांना नावे ठेवणे, (खाल्या मिठाला न जागणे) थोडक्यात काय? वेळ, पैसा, वस्तू, सगळ्याचा, अपव्यय. ह्याचा खर्च कमीत कमी ५०००/- रुपये तरी होत असेल (जास्तीत जास्त सांगवत नाही) (प्रत्येकाच्या ऐपतीप्रमाणे वाढत जाणार.) ह्या पार्ट्या कधी कधी तीन/तीन असतात. एक पार्टी ऑफिसमधल्या लोकांसाठी, दुसरी पार्टी, आपल्या मित्र-मैत्रीणींसाठी, तिसरी पार्टी नातलगांसाठी.(आता पार्टी हॉटेलमध्ये दिल्यास हा खर्च किमान १००००/- ते १५०००/- रु. पर्यंत जात असणार.)

शाळा कॉलेज मध्ये जाणाऱ्या तरुणांमध्ये तर रस्त्यावर वाढदिवस साजरा करण्याचे फॅड वाढले आहे. वाढदिवसाचे औचित्य साधत पंचवीस तीस तरुण एकत्र येत रस्त्यावर तलवारीने केक कापत वाढदिवस साजरा करत आहेत. आणि त्या वाढदिवसाचे व्हिडीओ सोशल मिडियावर व्हायरल करत आहेत. आणि यामधून तक्रार झाल्यास पोलीस केस होण्याचे प्रमाण ही वाढले आहे.आता या चांगल्या प्रथेला गालबोट लागले असून वाढदिवसाचा आनंद बाजूला राहून जेल ची हवा खाण्याची वेळ येत आहे हे नक्कीच चांगले नाही

लहान मुलांचा वाढदिवस असेल तर घरी केक (औक्षण तर नसतच.)वगैरे आणून पार्टी(सोसायटीतल्या मित्र-मैत्रीणींसाठी.) वर्गातल्या मुलांसाठी, शिक्षकांसाठी, खाऊ, भेट वस्तू, (या रिटर्न गिफ्ट, भारीतली पेनं, लीड पेन्सिली, कंपोस-बॉक्स, पाउच, गोष्टीची पुस्तके, इ.इ.असतात.) एका तुकडीत अंदाजे ६० मुले असतात. शिक्षक, व इतर सेवक वर्ग धरुन हा आकडा ७०/७५ वर जातो. प्रत्येकी १०/-रु खर्च धरला तरी ७००/७५०

रु. खर्च होतात. परत नातलगांसाठी हॉटेलमध्ये पार्टी. ह्याचाही खर्च किमान ३०००/- ते ५०००/- रुपये होत असणार.(प्रत्येकाच्या ऐपतीप्रमाणे वाढत जाणार.) आणि हे सर्व आपण कोणासाठी करत असतो तर, ज्यांच्याकडे भरपूर पैसा आहे, खायला प्यायला भरपूर आहे अशांसाठी. शाळेत मिळालेल्या भेटवस्तू, बहूतेक वेळा, वापरल्याही जात नाहीत. कारण दप्तरात सर्व वस्तू ४/४-५/५ असतात. तसेच ती वस्तू आवडलेली असते असेही नाही त्यामुळे कित्येक वेळा त्या इकडे तिकडे पडून शेवटी काचारापेटीच्या धन होतात. मग तुम्हीच विचार करा असे आपण जे ५०००/- ते १००००/- रु. (घरातील एका माणसाच्या वाढदिवसाचा खर्च.) खर्च करतोय ते फक्त, आपला मोठेपणा दाखवण्यासाठी, आपण पार्टी दिली नाही तर लोक आपल्याला हसतील, कंजूस म्हणतील, किंवा आता हे बंद कस करायचं, यासाठीच करतो.याचवेळी काही माणसाना, काहीही खायलाही मिळत नसते. नेसायाला पुरेसे वस्त्र नसते. उपाशी पोटी, (कधी अर्धपोटी) अर्ध वस्त्रात, ही माणसे आपले जीवन कंठत असतात. आणि जगणे अशक्य झाले कि मरत असतात.

आपण जर हे खाणे अशा लोकाना दिले तर त्यांची भूक भागेल. आपण जो हा अवाढव्य खर्च करतो, तो न करता या लोकाना कपडे, पांघरुण दिले तर त्यांची ती गरज तरी पूर्ण होईल. याच ५०००/- ते १००००/- त्यांच्या कितीतरी गरजा आपण पूर्ण करू शकू. एखाद्या अनाथाश्रमात, वृद्धाश्रमात, वगैरे ठिकाणी जाऊन तिथल्या लोकांसाठी जर आपण हा खर्च केला तर, त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद हा केव्हाही तुम्हाला मिळालेल्या भेटींपेक्षा, वाढदिवसाची मिळालेली अमूल्य भेट असेल. माझी कळकळीची विनंती आहे, आपण या गोष्टीचा जरूर विचार करावा. आपल्याबरोबर बाकीच्या नाही हे पटवून देण्याचा प्रयत्न करावा. ज्यांची मुले आता शाळेत जाऊ लागणार असतील, त्यांनी प्रथम पासूनच शाळेत भेटवस्तू, खाऊ वाटणे चालू करू नये. आपल्या मुलांच्या वाढदिवसाला त्यांनाच अनाथाश्रमात, वृद्धाश्रमात घेऊन जावे व तेथे खाऊ/ वस्तू वाटप करावे. म्हणजे मुलांवरही चांगले संस्कार होतील. रंजल्या-गांजल्याना मदत करावी हे कळेल. (गरिबांनाही चांगली वागणूक देतील.) आणि पैशाचा सदुपयोग कसा करावा हे त्यांच्या लक्षात येईल.

अंधानुकरण करण्यात आपण धन्यता मानतो. त्यांचे वाईट गुण आपण हमखास घेतो. पण त्यांच्याकडे असलेले गुण दिसू नयेत म्हणून डोळे झाकून घेतो. ते लोक मात्र आपले चांगले गुण घेत असतात. त्यांचे दातृत्व हा सद्गुण आपण नक्की स्वीकारू या. आणि आपल्या देशाच्या (खरंतर घराच्या)सुधारणेत खारीचा वाटा उचलू या.शेवटी वाढदिवस हा सामान्यतः “घट दिवस” असून आयुष्यातील एक- एक वर्ष कमी होऊन आपली वाटचाल उतारवयाकडे सुरू झाली हे समजून घेणे आवश्यक आहे असे वाटते.

**सोहनी पुरनाळे**
**अहमदनगर**
**प्रा. शिक्षिका (एम.ए.एम.एड.)**
**मो.9529589853**



# आव्हानांना देऊ टक्कर



असलो जरी अपंग तरी
असो द्यावी मनात जिद्द
आव्हानांना देऊन टक्कर
करू स्वत:स आपण सिध्द

आली संकटे किती तरी
इच्छा तेथे दिसतो मार्ग
जरी पाय अधू असले
चढून जाईल कुणी दुर्ग

इच्छाशक्ती असे अंतरी
नसे काही त्यास अशक्य
जोड ठेवता प्रयत्नांचीही
होईल निर्धाराने शक्य

ठेच खाल्ली अनेकवेळा
मिटून गेलो कितीदातरी
जिताजागता ध्यास मनीचा
जिवीत ठेवतो आशा उरी

कधी जमले ढग दु:खाचे
आभाळ फाटले आशेचे
असो द्यावी स्वप्ने उराशी
ध्यास उरतील श्वासाचे

करूनि जावे उदात्त काही
काळालाही यावा गहिवर
कठोर स्वरही कातर व्हावे
सोडून जाता जग हे नश्वर

**कविता दिलिप झुंजारराव**
**मुंबई**
**मो.९८१९७७६४१४**

# मानसिक आरोग्य



गळाले अवसान तरी नव्या उमेदीत जगावे
सुद्दढ तना संगे अपुले मन ही निरोगी करावे ।। धृ।।

शरीर दणकट मन दुबळे
विकार मनाचे जडवशी
तुज आहे तुजपाशी
परी जागा तू चुकलाशी
खचून जाता आयुष्यात आत्महत्येचे विचार टाळावे
सुद्दढ तना संगे अपुले मन ही निरोगी करावे ।। १।।

चिंता वेदना क्रोध अन्
नको ती अवास्तव भिती
मनाच्या देव्हार्यात चेतवावी
समाधानाची एक पणती
“मी”पणा जाळून पुन्हा स्वयंप्रकाशी व्हावे
सुद्दढ तना संगे अपुले मन ही निरोगी करावे ।। २।।

येईल व्याधी होतील दु:खे
शोधावा सुखाचा आधार
औषधांपरी आप्तेष्टांचा
होई रामबाण उपचार
स्वत:तच रमण्यापरी अपुले दु:ख वाटावे
सुद्दढ तना संगे अपुले मन ही निरोगी करावे ।। ३।।

**निलेश दिगंबर तुरके**
**यवतमाळ**
**मो. ७७४१८७७१७४**

# प्रेरणा



आज या लहान गावात सकाळपासूनच गडबड सुरु होती. अध्यक्ष व प्रतिष्ठितांना निमंत्रण करणे, गावकऱ्यांना संदेश देणे, फोटोग्राफरची सोय आणि सभामंडपाची स्वच्छता, गावातीलच एकाने कामाची यादी बनवलेली.कोजागिरीच्या सायंकाळी साहेबरावचा सत्कार करण्याचे ठरले होते.निरोप समारंभ ही आजच करायचे ठरविले.

साहेबरावचे वडील त्यांना सर्वजण रावजी काका म्हणत. 35 एकर जमिनीचे मालक, गुरे ढोरे,शेतात भली मोठी विहीर,नोकर चाकर सर्व सांभाळून रावजी काका त्या गावात आनंदाने राहत. रावजी काकांची परोपकारी वृत्ती साऱ्या पंचक्रोशीत ज्ञात होती. आपलं गाव शिकलं, सवरलं व्हावं ही त्यांची तळमळ. बँकेचे एक निवृत्त अधिकारी गावातील मुलांना एकत्र करून एका मंदिराच्या मोकळ्या जागेत शाळा भरवत. रावजी काकांकडूनच त्यांना ही प्रेरणा मिळाली होती.

रावजीकाका देवकुळे यांच्या घराण्यात चार पिढ्यांनंतर साहेबराव जन्माला आला. सर्वत्र आनंदी आनंद झाला. सर्वांच्या लाडका झाला. घर कामाला असलेली यशवदा त्या बाळाला न्हावू माखू घालू लागली.साहेबराव मोठा होऊ लागला.

एके दिवशी यशवदा जरा काळजीतच रावजी काकांकडे आली. डोक्यावरचा पदर ठीकठाक करत म्हणाली, "दादांनु, साहेबरावच्या पायात मले वाटते, ताकद कमी हाय."

"काय?" असे म्हणत रावजी काकाने साहेबरावला उभा करण्याचा प्रयत्न केला आणि पाहताच त्यांचे हात पाय गळाले.डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रोज तिळाच्या तेलाचे मालिश करण्याचे ठरले.

सहा महिन्यानंतर साहेबराव बरा चालू लागला.

जास्त लांब पर्यंत चालणे त्याला जमत नसे. एकाच जागी बसून अभ्यास करण्यात त्याचा दिवस निघून जाई.

दहाव्या वर्गात 80 टक्के गुणांनी साहेबराव पास झाला. साहेबराव नवव्या वर्गात असतानाच त्यांचे आई-वडील एकापाठोपाठ निवर्तले.अभ्यासात लक्ष लागेना पण जिद्दीने त्याने भरघोस यश संपादन केले.

साहेबरावच्या संगोपनासाठी साहेबरावजी दूरचे काका काकू येऊन राहिलेत. त्यांचा उद्देश, इस्टेटीवर नजर ठेवून स्वार्थ साधावा. ते साहेबरावला कोणाच्या संपर्कात जाऊ देत नसत.

"अरे तुझ्या पायाला त्रास होईल. घरातच बस. शेताचे बघायला दौलत आहेच." काकू गोssss बोलत सतत मागे राही.

साहेबराव समाजापासून एकटा पडला आणि व्यवहार शून्य बनला.शेतीच्या पैशाच्या व्यवहारात काका काकूंचा हस्तक्षेप होताच.

असं सर्व पाहून यशवदाच्या मनाची फार तडफड होई. "कोणाला आणि काय सांगणार?"

एक दिवस हिम्मत करून यशवदा बोललीच.

"सायबराव,लय दिस झालेत.आपण घराबाहेर नाय गेलात. एखाद डाव वावराकडे जावं, मजुराले भेटाव, दौलतशी बोलाव.मले तर वाटून रायलं का,आपून शायेतल्या पोरायले शिकवा. आपल्याला शिकवता यीन"..

आज चार मुलं मुली यशवदाने साहेबराव समोर आणून बसवले. झाली शिकवणी सुरु. इंग्रजी गणित शिकवता शिकवता साहेबरावचा वेळ छान जाऊ लागला.

शिकवण्यात रस निर्माण झाला.

"यशवदाने जुळवून आणलं म्हणून छान झालं". शिकवणी पूर्वी साहेबराव रोज मनात म्हणत असे.

शेजारच्या मंदाला गणित फार लवकर समजत असे. इतर मुलांची इंग्रजीत प्रगती बरी होती.

साहेबराव आणि मंदाला हळूहळू प्रेमाचीही उदाहरणं जमूं लागलीत.एका शुभमुहूर्तावर साहेबराव _ मंदाचं शुभमंगल झाले.महिनाभरात मंदाने काका काकूचा व्यवहार, वर्तणूक सारे बारीक नजरेने टिपले.नवरीचा उद्धटपणा जाणवू नये म्हणून दोन महिने मंदा फक्त निरीक्षण करत राहिली. तीन महिन्यानंतर एक दिवस अचानक काका काकू निघून गेलेत.

"अहो,मी म्हणते आपण स्वतः शेतीचा पैशाचा व्यवहार बघावा.दौलत असेलच.पण दौलतच्या पैशाच्या व्यवहारात सरळपणा मला दिसत नाही. मी आपल्या सोबत आहे.दोघं मिळून व्यवहार बघू.चुकेल सुरुवातीला पण जमेल सावकाश". मंदाने दोन-तीन वेळा सांगितल्यानंतर साहेबराव तयार झाला आणि व्यवहारात लक्ष घालू लागला.

साहेबराव मंदा शेतावर जात.मजुरांशी बोलत.त्यांचे प्रश्न ऐकत.साहेबरावच्या वागणूकीत काही दिवसात सकारात्मक बदल दिसू लागला. दौलतचा

फसवा व्यवहार आता लक्षात आला.

"तुझ्यामुळे मला आज खूप गोष्टी नव्याने कळल्या. गावचे प्रश्न तुझ्यामुळे मला कळू लागले." मंदा विषयी साहेबरावचे मन भरून आले.

गावकरी आज साहेबराव - मंदाच्या शब्दाला मान

देत. साहेबराव मंदा विना आपलं गाव अधूरं आहे,याची जाणीव आज गावकऱ्यांना झाली. गावचा आधार आहे दोघेजण.

पोरांच्या शिक्षणासाठी शहरात जात आहेत म्हणूनच आज कोजागिरीला कृतज्ञता सोहळा आणि निरोप समारंभ ठरला होता.याकरिता गावकरी एकत्र जमले होते.

पांढऱ्या शुभ्र मोगऱ्याच्या फुलांचा सुगंधी हार अध्यक्षांनी साहेब रावांच्या गळ्यात घातला. मोगऱ्याचा परिमळ सर्वत्र पसरला. प्रसन्न वातावरण झाले. साहेबराव मात्र अद्याप मंदा न आल्याने जरा उदास भासले.

"थोड्यावेळातच येते असंच तर मंदा म्हणाली होती. तुम्ही पुढे पहा म्हणून तर मी आलो." साहेबरावच्या चेहऱ्यावर चिंता स्पष्ट दिसत होती.

साहेबरावची नजर भिरभिरत असता व्हीलचेअर वर बसून यशवदा च्या मदतीने मंदा येताना दिसली.

फुलांचा हार गळ्यात तसाच ठेवत साहेबराव धावले. काळजीने म्हणाले,"काय झालं? सविस्तर सांग."

"आज आपल्यासाठी गावकऱ्यांनी कार्यक्रम ठरवला. त्यांना आपल्याकडून काहीतरी द्यावं म्हणून आपल्या घरच्या म्हशीचे दूध मी आटवत होते. आजीला मदत करावी म्हणून यशवदाच्या नातीने चुलीतल्या काड्या हलवल्या आणि दुधाचे भांडे कलंडले. ताबडतोब यशवदाने मलम लावला. आता ठीक आहे" असे सांगून त्याच खुर्चीत बसून पुढचा कार्यक्रम पाहणार असल्याचे मंदाने सांगितले.

गावकऱ्यांच्या नजरा साहेबराव मंदा ताईकडे वळल्या साहेबराव बोलू लागले,

" माझी सहधर्मचारिणी आणि मी स्वतः गावकऱ्यांचे ऋणी आहोत.गावाने आम्हाला भरभरून प्रेम दिले.अशी निर्मळ मनाची माणसं आम्हाला भेटली."

दाटलेल्या कंठाने पुढे मंदा बोलू लागली, "या गावात मला बहिणी मिळाल्या. काकू, मावश्या यांचे प्रेम मिळाले. माझ्या प्रतिष्ठित बंधूंनी मला समजून घेतले.या गावात एकोप्याने कसे राहावे याचे गणित मी शिकले."

साहेबरावने पुन्हा एक मुद्दा स्पष्ट केला.

"माझी अर्धांगिनी मंदा हिच्या आधाराविना मी उभा राहू शकलो नाही. मी मनाने पूर्णपणे अपंग झालो असताना सकारात्मक विचार देवून तिने मला सावरले. आत्मविश्वास दिला. त्याच आत्मविश्वासाने आज मी आपल्यासमोर उभा आहे. मंदा माझी प्रेरणा आहे."

भाजलेल्या पायाच्या वेदना सहन करीत मंदाने पुन्हा विचार मांडलेत,

"आम्ही उभयता गावच्या ऋणात राहणं पसंत करतो."

असं दोघांनीही एकत्र म्हणताच टाळ्यांचा कडकडाट झाला. त्याचवेळी चमेलीच्या नाजूक कळ्यांचा सुगंधी गजरा यशवदाने मंदाच्या लांब सडक काळ्याभोर केसात माळला. आणि साहेबराव मंदाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

"मला आणखी एक महत्त्वाचं बोलायचं आहे असं म्हणून साहेबरावनी पुन्हा सुरुवात केली.

"मी आणि माझी प्रेरणा मंदा आमच्या विचारानुसार आमचा राहता वाडा गावच्या भल्यासाठी देत आहोत.

मायेचे अतूट धागे आमच्या राहत्या वास्तुने जपले, झेलले. यापुढेही ही वास्तु शुभकार्यासाठी उपयोगात आणावी. माझे वडील, आणि आपल्या सर्वांचे रावजी काका त्यांना सुद्धा हा विचार नक्कीच आवडला असता."

" गावातील बहुतेक शेतकरी सकाळी शेतावर जातात. माझ्या बऱ्याच बांधवांचे व्यवहार ज्ञान नगण्य किंवा अल्पसे आहे. पैशाच्या व्यवहारात कोणीही फसवले जाऊ नये म्हणून ज्ञान संपादण्याकरिता रात्रीचे वर्ग या वास्तुत सुरू होतील.गावातील दोन ज्ञानी शिक्षक या वर्गासाठी स्वखुशीने तयार आहेत. मुलांसाठी बँकेचे साहेब वर्ग घेत आहेतच.आपल्या गावाचे सुहित हेच आमचे ध्येय आहे.आज मी मोठ्या अभिमानाने सांगू इच्छितो की रात्रीच्या वर्गाची प्रेरणा मंदाची आहे." बऱ्याच वेळ पर्यंत टाळ्यांच्या कडकडाट चालला होता आणि रात्रीच्या वर्गाला 'मी पण जाणार 'असा भाव अनेक शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

**सौ.वीणा मुळे**
**पाषाण, पुणे**
**मो.९८९०६८०८२०**



# बाकी त्यांच्याविणा वीट





गाव सोडून जातांना आलं पापणीत पाणी,
निरोपाला नव्हतचं गाव पारावर कुणी ।

पाच टिनाच्या छताचं होतं गावामध्ये घर,
आसपास गणगोत सारा फाटका शेजार ।

मायबाप मजुरीला दिसभर वावरात,
कधी पेटे, कधी विझे राती कंदिलाची वात ।

कंदिलाच्या उजेडाला दिली अक्षरांनी हाक,
माय काढे चुलीतली शांत विझलेली राख ।

सारं भोगुनिया दुःख दूर गेले मायबाप,
गाव सोडून जातांना वाटे कोणता हा शाप ।

गाव सोडून जातांना काही आठवते जुनं,
ओलेचिंब पापणीत होते एकटयाचे मन ।

देऊ कुणाला मी हाक गाव सोडून जातांना,
कुणी दिसलीचं नाही भेट घ्यायला येतांना ।

कुण्या निमित्ताने येऊ घेऊ कुणाची मी भेट,
पाच टिनाच्या छतात बाकी त्यांच्याविना वीट ।

**गणेश भाकरे**
**सावनेर**
**मो.९९२३८२९७१७**

# पाठीराखा



काय वर्णावी महती शब्द आणावे कोठून
शेतकऱ्याचा सोबती येती भावना दाटून
डोळ्यातून पाझरती मूक भाव ओसांडती
कष्ट कष्ट कष्ट कष्ट सदा तुझी रे दुर्गती...

जीव थकला भागला नाही सांगताच येत
तुझ्या भरोश्यावरच बळी पिकवतो शेत
आली जरी यंत्रे खूप तुझ्यावाचून भागेना
सगासोयरा आमुचा मन तुझे का कळेना...

ओझे लादावे कितीही पाय तुडवती वाट
धुरकरी असो नसो घर गाठतात थेट
नाही रजा नाही सुटी ऊन सदाच झेलती
खरा जीवलग तूच पिकवतो हिरे मोती...

शिंगे हालती डौलात कशी दुडकी ती चाल
फक्त पोळ्याला करती सजवून मालामाल
घरधनीण करते तुला औक्षण प्रेमाने
शेत सिंचले तू नित थेंब थेंब त्या घामाने...

तुझी कदर, इमान, नाही उपमाच त्याला
कधी कधी वाटते रे शेतकऱ्याहून भला
तुझे मुकाट सोसणे मला लागते जिव्हारी
धन्य तुझी माय वाटे तुझ्याहून आहे भारी..

**प्रा.सौ.सुमती पवार**
**नाशिक**
**९७६३६०५६४२**

# नात्यांची क्षीतीजरेषा!



परवाचा निरोप न मिळाल्याचं एक पुसटसं कारण, अनेक दिवसांचा सुखसंवाद, स्नेहओल संपण्यासाठी पुरेसं ठरलं! अनेक दिवसांची मायाळू मैत्री, काळ-वेळेचं, दिल्या-घेतल्याच्या पलिकडलं, निरलस, निरपेक्ष नातं काही क्षणांच्या अबोल घालमेलीत संपल्याचं आग्रहपूर्वक जाहीर झालं! मैत्री किवा नकळत किवा सहेतुक निर्माण झालेलं नातं असं सहजच, अविवेकाच्या वावटळीत मोडीत निघावं? गैरसमजाची एक हलकीशी झुळूक येते अन् घेऊन जाते, विश्वास, बांधीलकी, प्रेम, आपुलकी अन् जगलेल्या स्मरणीय क्षणांच्या आनंदयात्रेचा हक्ककाळ! हे असं घडतं केवळ अन् केवळ गैरसमजाच्या कावीळ बाधीत क्षणांमधून! मग मित्र म्हणून घेतलेल्या हृदयसंवादी शपथेचे काय?

नात्यांची घट्ट वीण सहजच उसवण्याच्या हया तकलादू दिवसांची उनाड कथा रंगत चालल्याचा हा विसंवादी काळ! प्रेमळ घराचा संवादी उंबरा केव्हा ओलांडून घरात शिरला, ते कुणाच्याच लक्षात आले नाही. कधीतरी फुलपाखराच्या भिरारवृत्तीनं, आपुलकीच्या स्नेहल संवादानं घरात रंगायचे

काळीजसुखाचे बोलके संवाद! घर हिंदोळायचं, या अतुच्य सौख्याच्या लाडिक हिंदोळ्यांवर. दिवस, मास, वर्ष अन् ऋतुंच मागल्य गाण नकळतच संपायचं, घराच्या स्नेहाळ उबेच्या कैफधुंदी क्षणांत! नात्यांच्या उतरंडीचे घट्ट थर शाबुत रहायचे बदलाच्या वा विरोधाच्या आक्रमीत दिवसात. एकमेकांचे हात सहजच यायचे हातात, ह्दयओलावाच्या ओढीनं, डोळे नकळत व्हायचे ओले कुणाच्याही अनाम, बोचऱ्या दुःखानं, पाय व्हायचेत तयार, ऐकलेल्या दुःखहाकेच्या दिशेनं लगबगीनं निघण्यासाठी! असा विलोभनिय काळ का थांबत नसावा माणसांच्या वळचणीला?

नात्यांचा भक्कम आधार, दुःखाच्या वा संकटांच्या अनाम चिरेबंदीपूढे टेकत नाही गुढगे, घेतही नाही सपशेल माघार विजय वा पराजयाची नकोशी चिंता बाळगत! कुणाच्यातरी कंच सोबतीची उबदार श्रद्धा दरवळत राहते आसपास, आपुलकीचा हवा-हवासा मधाळ गंध बनुन! अशा भरवशाच्या उजळ आधारात पायाखालची निसरडी वाटही आवडू लागते. खाच-खळग्यांचं, तीक्ष्ण चढण-उतरणीचं भयही उरत नाही, मुक्कामाच्या अनाम दिशेनं निघालेल्या पावलांना! अशी संवादी नाती काय देत असावीत एकमेकाला? खरंतर, फारसं असं काहीच नाही! फक्त एक नितळ निरपेक्ष विश्वास, एक स्नेहाळ आपुलकी ! अन् हो, गैरसमजाच्या तेजाबी ठिणगीपासून, ही नाती ठेवतात स्वतःला जिवापेक्षाही अधीक काळजीनं सांभाळून. नात्यांच्या पराजयाचं अतिरेकी दुःख, कधीकाळी भोगण्याचा अभिशाप त्यांच्याही वाटयाला आलेलाच असतो!

डोळयांनी का करावा कडेलोट भ्रमाच्या, दुःखदायी दृश्यांनी? विवेकी दृष्टीचा चिरंजीव हक्क सांभाळता यायलाच हवा डोळयांना! कानांनीही करायला हवा निरक्षीर वृत्तीचा लोभस सांभाळ. शब्दांचं लाघवी लौकीकत्व व्यवहाराच्या यम- नियमांनी पडताळून पाहताना, त्यांनी उभा करायला हवा संवादसेतू, या काळजातून त्या काळजापर्यंत जाणारा! क्षणीक स्वार्थाच्या क्षुल्लक प्राप्तीसाठी नात्यांचा बळी जाऊच नये खरेतर!

तसं माणनं न माणनं हीही असते नात्यांची एक अलीखीत परिभाषा! म्हटली तर घट्ट म्हटली तर तकलादू. एका अदृश्य अशा माणुसकीच्या भक्कम रज्जुंनी बांधलेली असतात काही नाती, जी टिकूनच राहतात अमानुषतेच्या वा स्वार्थलोलुपतेच्या पुराण षडयंत्रात! काळाच्या अमानुष कसोटीवर नाती टिकत नसल्याचंच लक्षात येतं. काळाच्या कुठल्याच तुकडयाच्या बर्फाळ नोंदीत, मानवी नाती विणाकुरकुरीची वा विणा अडथळयांची राहिल्याची नोंद बहुतेक सापडतच नसावी!

खरंतर, मायेचे वा प्रेमाचे घट्ट वा भक्कम थरही रोकू शकत नाही नात्यांचा, भराभर कोसळण्याचा प्रघात. मानवीय व्यवहारांच्या, स्वभावांच्या तळाशीच निवांतपणे पहुडलेले असतात असे काही बेवारस क्षण, जे लावतात अस्मानी चूड नात्यांच्या टिकवून ठेवलेल्या साम्राज्याला. मग खरंच, माणसाच्या हाती काहीच नसतं काय? असावं असंही नाही! पण बरंचंसं असतं माणसाच्याच हाती, अखील मानवाच्या मानवी मनाच्या उन्नयनातच बहुतेक दडलेलं असावं याचं लाखमोलाचं गुपीत! माणुस समजून घेताना, नाती टिकवून ठेवण्याच्या या काळ कसोटीवर, मानवी मनातील गैरसमजाच्या या विषवाऱ्याला थारा न दिलेलाच बरा! नाही का?

**रवींद्र जवादे**
**मूर्तिजापूर**
**मो.९४२०७०८०२६**

# सोयरीक जुळव बघ...



बाबा..!
नको मला त्या घरात नांदायला पाठवू
ज्याच्यासाठी तुला कर्ज काढायला लागल...
नको मला त्या गावात देऊस, जिथ लोकांच्या मानापेक्षा पैसा मोठा असल..
त्या घरात नको, लगीन लावूस माझं, जिथं पुस्तकांवर जळमट असतील..
असल पोरगं नको मला,
जे सदानकदा हाडा मांसात खितपत पडलं असल,
जो तरबेज असेल गावच्या पोरी छेडायला..
हे बघ बाबा, हा काय कपड्या लत्त्याचा, भांड्याकुंड्याचा प्रश्न नाय जवा पाहिजे तवा बदलायला...
जो शिवी शिवाय पाणी पीत नसल,
ज्याच थोबाड गुटखया माव्यान सडलेलं असल..
जो कायम हाणामारी च्या बात्या करणारा नवरा नकोय मला...
आणि त्या हातात देऊ नकोस माझा हात ज्यांनी चूरगली असतील फुलं,
येता -जाता रस्त्यावरच्या कुत्र्याला दगूड हाणला असल,
गाय -बैलावर घातल्या असतील्या धोपाट्या
आणि कधीच कुणाच ओझं उचल नसल,
अश्या अति हुशार, श्रीमंत जनावराच्या हातात देऊ नकोस हात..
आणि हा..
ज्या हातानं कधी लिहिले नसेल 'क 'कवितेचा
चुकून पण देऊ नकोस त्या हातात...
लगीन करायचंच असेल तर त्या घरात कर जिथं माझ्या लेखणीला शाई मिळल..
हे बघ बाबा,
एका हाळीच्या अंतरावर असलेलं घर बघ, म्हंजी तू येशील पळत माझी आठवण आल्यावर...
बा, त्याच्याशिच लगीन कर माझं जो सावलीसारखा सोबत राहील अन् संसारातल्या कामापासून ते सुख दुःखाच्या वाटणीपर्यंत...
आणि हा,
जो श्रावणात आणेल माझ्यासाठी माळावरची पारिजातकाची फुलं आणि केसात माळायला सोन चाफा..
ज्याला माझ्या उपाशी पोटी घास नाही जाणार अन् माझ्या डोळ्यातलं टिपूस नाही बघवणार...
बाबा, त्याच्याशीच माझी सोयरीक जुळव बघ....!!

**कु. प्रियांका सूर्यवंशी**
**कुची, सांगली**
**मो.9021253331**

# सयंमाचा महामेरू



स्वर्णिम आयुष्याची पहाट उगवली की रोजची यंत्रवत धावपळ सुरु होते ती ऑफीस गाठण्याची. एकदाचे बावीस कीलो मिटरचा जीवघेणा प्रवास संपला आणि ऑफीस गाठलेकी अगदीच कृतकृत्य झाल्या सारख वाटते.

सकाळचे दहा वाजले की आमचे सिनीयर श्री प्रमोद अप्तुरकर सर संस्थेच्या कार्यालयात येतात ते अगदीच नेहमीच्या दिनचर्यानुसार क्रिकेटच्या ऑल राऊंडर खेळाडू प्रमाणे. त्यांचे संस्थेत प्रदार्पण झाले की त्यांच्या कडे सिनीयर ऑफीसर या नात्याने संगणकावर डे ओपन करून आपल्या दिनचर्येची सुरुवात करतात. तसेच त्यांची दिवसाची सुरुवात मिश्रा महाराजांच्या पट्टशिष्या प्रमाणे "श्री शिवाय नम:स्तुभ्यम् " या गुरु मंत्रा पासून सुरु होते. त्यामुळे आम्हा सर्व कर्मचाऱ्यांना पण एक चांगली सवय अंगवळणी पडली. ती देवाच्या नाम स्मरनाची. वैर्दभीय गोडवा असलेली त्यांची वऱ्हाडी भाषा शैली . कुटी, काबे, अथीसा, तथीसा, मायाकडे या सारख्या लाघवी पण ग्रामीण बोलीभाषा निश्चितच त्यांची आपुलकी निर्माण करणारी आहे.

संस्थेत येणाऱ्या प्रत्येक खातेदारांची आपुलकीने विचारपूस करून त्यांना हवे असलेले मार्गदर्शन आमचे प्रमोद अप्तुरकर सर करतात. संयमी असलेले त्यांचे व्यक्तिमत्व,त्यांना राग आलेला कधीच आम्ही पाहिला नाही.कामामध्ये त्यांचा जबर हातखंड बसलेला. आपल्या सोबत दुसऱ्यांचे भलं झालं पाहिजे ही त्यांची असलेली नेहमीची भावना. जेव्हा ते प्रयाग ते काशी येथे देवर्शनाला गेले असता. अधीक महिण्यात सतत तीन दिवस गंगा जल चढविल्यास आपली मनोकामना पूर्ण होते. अशा ठिकानचे व्हीडीओ कॉल द्वारे सचित्र दर्शन बाबा धामला गेल्या वर भ्रमणध्वनी व्दारे करून दयायला ही ते विसरले नाहीत.

.कुटुंब वसल्य व्यक्तिमत्व म्हणून देखील समाजात, नात्यात त्यांची एक वेगळीच ओळख आहे. ऋणानुबंधांच्या गाठी अखंडपणे जोडणे हे त्यांना चांगल्या प्रकारे जमते. त्या मुळेच ते कुंटूंबवत्सल व्यक्तीमत्व म्हणून सर्व दूर परीचीत आहे.

त्यांचा वावर जरी ग्रामीण भागातला असला तरीही शहरी भागांशी त्यांची नाळ जोडली गेलेली आहे.ग्रामीण भागातले तेच फंडे,तोच प्रयोग ते शहरात करायला ही विसरत नाही. जसे की संस्थेच्या कार्यालयात कुणाच्याही वाढदिवसा निमत्त आलेला नास्ता सर्वांन साठी एकत्र न आनता तो वेगवेगळा आणावा जेणे करून प्रत्येकाला मिळणारा हिस्सा कमी रहाणार नाही. हे ग्रामीण चातुर्य देखील त्यांच्या कडून आम्हाला शिकायला मिळायले.

खडतर प्रवासामधून मुलांना शिक्षणाची योग्य दिशा दाखवणारे परिस्थिती नाजूक असल्यावर देखील कधी कुणापुढे हात न फलवणारे असे आमचे प्रमोद अप्तुरकर सर.

आम्हाला नेहमीच धीर देणारे आपली कुठल्याही कामात चूक न होता याकडे जातीने लक्ष देणारे म्हणजे आमचे प्रमोद अप्तुरकर सर. संस्थेचे बरेचसे खातेदार तर असे आहेत की जर अप्तुरकर सर नसले तर आम्हाला आर्वजून एका कुटुंब सदस्य प्रमाणे ते का आले नाही ? त्यांची तब्येत खराब आहे..! का त्यांचा नंबर देता का, असे आपल्याला त्यांच्याबद्दल विचारपूस करतात.

काही सवय ही त्यांच्या अंगभुत आणि अंग वळणी. त्यातलीच नेहमिची एक सवय म्हणजे आमच्या संस्थेत येणारा चहा.

आमचा नेहमीचा चहावाला रुपेश शर्मा केवळ आणि केवळ त्यांच्याच इशाऱ्यावर.दुपारी चारचा काटा पुढे कधीच न सरकुदेता हजर असतो.घड्याळ मध्ये चार वाजले हे आमच्या अप्तुरकर सराच्या चहाच्या आवडीवरून दिसून येते.एवढे ते चहाचे प्रेमी आहेत.

"संयमाचा महामेरु " असलेले हे व्यक्तीमत्व मी कामकाज आटपून घरी जाताना "निघेले का या मंग् उदया " येवढी आत्मीयता मात्र ते आमच्या विषयी नक्कीच ठेवतात.अशा या व्यक्तीमत्वास पुढील भविष्यासाठी मी सुयश चिंतीते.

**सौ.सपना पवार**
**दर्यापूर**
**मो.9822468568**

# बाप



पोटात अन्नाचा कण नसतांनाही
पसाभर धान्यातून मूठभर धान्य
जेव्हा बाप मांगीनीच्या पदरात घालायचा
तेव्हा त्याच्या भोकं पडलेल्या बंडीतून दिसायची
त्याच्या सुपा एवढ्या काळजाची श्रीमंती...

बापाच्या दातृत्वावर
माय कायम बोटं मोडायची
त्याला घास भरवण्यासाठी मात्र
तुक्याच्या आवली सारखी
गावभर शोधायची

देहभान विसरून
हाडाची काड करत
ती रोजच बापा सोबत राबायची
प्रारब्धाशी पराभूत झाल्यावर
बापाला ती हिमतीने
उभं करायची

निसर्ग आणि प्रारब्धाची सत्वपरीक्षा देतांना
बापाने कधीच ढळू दिले नाही आपले सत्व
अढळ राहिला घेतल्या व्रतावर
हरीचंद्रासारखा...

जगत राहिला
कष्ट आणि हलाखीचे जिणं
दिवाळे निघाल्यावरही
देवाचे आभार माननाऱ्या
तुकारामा सारखा..

जगाने
दिलेल्या
उपाधीवरच
तो आजही खूश होतो
दारी सुखाची झालर नसतांनाही
'बाप ' समाधानी दिसतो

कधी कधी
खादीतला ठग बांधावर येवून
ठेवतो त्याच्या खांद्यावर हात
करतो फोटोसेशन वृत्तपत्राचे रकाने भरण्यासाठी
त्याच्या कष्टाची वाखाणणी  करतो
मताच्या लालसेपोटी
लाळ घोट्या श्वानासारखा.

पण
बापाच्या कष्टमय हयातीची जाण
ना कोणाला झाली ना कोणाला होणार
तो असाच भटकत राहील
भळभळती जखम झाकण्यासाठी
तेल आणि चिंध्याचा बाकोळा मागत
चिरंजीवी अश्वस्थाम्यासारखा
युगानयुगे.

**जयराम मोरे**
**सोनगीर**
**मो.7709565957**

# लेक सावित्रीची!



भर दुपारची वेळ होती. सूर्य माथ्यावर आला होता. ऊन चांगलंच रणरणत होतं. या आठवड्यात स्लॅप पडायला पाहिजे, उगीच काम रेंगाळत पडायला नको, म्हणून भारत मिस्त्री आणि त्यांचे दोन साथीदार जिवाची ओढाताण करून काम करत होते. तारेनं सळई आळपायचं काम चालू होतं. अंगातून घामाच्या धारा निथळत होत्या. थोड्याच वेळात जेवणाची सुट्टी करायची, एवढा एक पिल्लर उरकून घ्यावा म्हणून घाईनं काम करत होते.

तालुक्याला सेंट्रिंगचं काम घ्यायचं. दिवसभर काम करायचं आणि संध्याकाळी आठ दहा किलोमीटरवर असलेल्या आपल्या गावी परत जायचं. असं त्यांचं रोजचं रुटीन चाललेलं होतं.

आज दिपालीचा बारावीचा निकाल लागणार आहे. रात्रीच दिपालीने सांगितले आहे. काय होतंय काय माहीत! पास तर होणारच याची खात्री आहे पण मार्क्स किती पडतील हे सांगता येत नाही. मिस्त्रीच्या डोक्यात असे विचार घोळत होते.

तेवढ्यात खिशातला मोबाईल खणखणला. मिस्त्रीने हातात घेऊन पाहिला. प्राचार्य भोसले सरांचा फोन! पालक मिटींगला गेल्यावर सेव केलेला! मिस्त्रीने फोन उचलला.

“हॅलो, भारत मिस्त्री नमस्कार!”

“नमस्कार सर, कशी आठवण झाली गरिबाची?”

“मिस्त्री तुमचं अभिनंदन!”

“माझं? कशासाठी वो सर?”

“तुमची दिपाली कॉलेजमध्ये पहिली आलीय. ८५ टक्के गुण मिळालेत! या कॉलेजमध्ये!”

“होय सर! येतो.”

भारत मिस्त्रीच्या डोळ्यात आनंदाश्रु दाटून आले. डोक्याला बांधलेला रुमाल काढून त्यांनी ते पुसले. तोंड आणि मानेवरचा घाम पुसला. हातातलं काम तसच ठेवलं. त्यांचे जोडीदार शिवा संभा त्यांच्याकडे पहात उभारलेले.

“काय झालं?”

“अरे शिवा, पोरीनं नाव कमावलं! कॉलेजमध्ये पहिली आलीय. ८५ टक्के गुण मिळालेत. भोसले सरांचा फोन होता.”

“अरे व्वा! मिस्त्री, दिपाली लय हुशार हाय बघा! मग काय करता?”

“तुम्ही दोघं काम चालू ठेवा. पेढे घेऊन शाळेत जातो.”

मिस्त्री शिडीवरून खाली उतरले. गाडीला किक मारून निघाले. जाताना पेढे विकत घ्यायला विसरले नाहीत. गावातच हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज असल्यामुळे दिपाली गावातल्याच शाळेत जात होती. मिस्त्री शाळेत पोहोचले. शाळेत बरेच विद्यार्थी, विद्यार्थिनी, काही पालक आलेले होते. दिपाली वडिलांची वाट पहात थांबली होती. मिस्त्रीनी ऑफिसमध्ये प्रवेश करताच प्राचार्य भोसले सर व इतर शिक्षकांनी त्यांचे स्वागत केले. अभिनंदन केले. दिपाली पप्पांच्या पाया पडली.

“अगोदर सरांच्या पाया पड! त्यांचा आशीर्वाद घे! त्यांनी तुला शिकवलंय!”

“मिस्त्री, दीपा आल्या आल्या सर्वांच्या पाया पडलीय. तुम्हीच यायला उशीर केलाय.”

“कामावर होतो सर! काम केल्याशिवाय पोट कसं भरायचं आमचं? दीपा, हे पेढे घे! सर्वांचं तोंड गोड कर!”

सारे दिपालीचे कौतुक करत होते. अभिनंदन करत होते. सर्व शिक्षकांना पेढे देऊन बाप लेक घरी आले.

भारत मिस्त्रीची पोरगी बारावीला कॉलेजमध्ये पहिली आली. ही बातमी ॲटम बॉम्बच्या आवाजासारखी गावभर पसरली. परिसरात प्रतिध्वनी उमटत गेली आणि अखेर जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन धडकली. दुसऱ्या दिवशी साऱ्या पेपरला फोटोसह बातमी छापून आली.

बारावीला गावातील गोरगरिबांची, बड्या बड्या बागायतदारांची, श्रीमंतांची, नोकरदारांची मुलं होती. त्यांच्यापेक्षा गरिबाघरच्या, एका मिस्त्रीच्या या पोरीने प्रथम क्रमांक मिळवला याचे सर्वांना कौतुक वाटत होते. गावातील अनेकांनी घरी येऊन तिचे अभिनंदन केले. दिपालीचे वर्गातील विद्यार्थी व मैत्रिणी यांनी उशिरापर्यंत दिपालीच्या घरी गर्दी केलेली होती.

इतकी माणसं बघून दिपालीच्या आज्जीनं विचारलं,

“दीपा, का जमल्याती गं इतकी माणसं?”

तेव्हा दीपाने आज्जीला पेढा भरवला आणि पाया पडत म्हणाली,

“आज्जीऽ मीऽ पास झालेय!”

आज्जीनं तिच्या डोक्यावरून पाठीवरून मायेनं हात फिरवून आशीर्वाद दिला.

रात्र झाली. सगळे आपापल्या घरी गेले. सगळीकडे सामसूम झाली. मिस्त्रीनं दिपालीनं जेवण करून अंथरुणावर अंग टाकलं.

भारत मिस्त्री मुळचेच हुशार होते. त्यांचा बाप गवंडी काम करायचा. पोरगा मोठा झाला आता याला शिकून तरी कुठं नोकरी लागायची? म्हणून त्याने त्याला मदतीला आपल्या हाताखाली घेतला. गवंडी काम करता करता

तोच भारत सेंट्रिंगची कामे घेणारे आता सेंटरिंगचे मिस्त्री झाले होते. कसे तरी बारावीपर्यंत शिक्षण झालेल्या मिस्त्रीला शिक्षणाचे महत्त्व पटले होते.

भारत मिस्त्री अंथरुणावर पडले होते खरे, पण त्यांच्या डोळ्याला डोळा लागत नव्हता. त्यांच्या डोक्यात आठवणींचं मोहोळ उठलं होतं. आज 'ती' असायला हवी होती. दीपाची आई! दिपाली दहा वर्षाची होती. पहिल्या पोरी नंतर लगेच मूल नको म्हणून आपण पाळणा लांबवला. आता मुलगा होवो नाहीतर मुलगी! दोनवर प्लॅनिंग करायचं आमचं ठरलं होतं. पण दैवाचा नाद वेगळाच होता. तिचं दिवस भरलेलं. आपण सेंट्रिंगच्या कामाला तालुक्याला गेलो होतो. घरी तिच्या कळा सुरु झालेल्या. मोबाईलवर फोन आला. आपण घाईनं घर गाठलं पण तिला तालुक्याला न्यायला वाहन कुठे आहे. सगळ्या गावात रस्त्यावरुन पळालो. वाहन भेटेना! रोडवरुन सिटा भरुन तालुक्याला चाललेल्या जीप जीपवाल्याच्या पाया पडलो. तवा त्याने वाट वाकडी केली. डिलिव्हरीसाठी दवाखान्यात ॲडमिट केली. पण डॉक्टर बाळ बाळंतिणीला नाही वाचू शकले!

मग मीच दीपाची आई झालो. तिची वेणी फणी, जेवण करुन देण्यापर्यंत तिची काळजी घेतली. लई जण म्हणायचे, "मिस्त्री, दुसरं लगीन करा!" पण मला दीपाला सावत्र आई आणायची नव्हती. दीपा बरेच दिवस आईची आठवण काढून रडायची. नुसता धुडगूस घालायची. तिला आईची आठवण होऊ नये म्हणून तिचे वाटेल ते लाड पुरवले. तिने विचारलेल्या प्रश्नांना उत्तरं देणं अवघड व्हायचे. तिला शिकवून सवरुन घडवायची म्हणून रोज रात्री तिचा अभ्यास घ्यायचो. तिच्याबरोबर जागायचो. त्याचं आज फळ मिळालं! दीपाचं हे यश बघायला खरंच तू हवी होतीस गं! तू हवी होतीस! मिस्त्रीला एकदम हुंदका आला. त्या आवाजाने दीपा चटकन उठून बसली.

"पप्पा काय झालं?"

"काय नाही रे बाळा! तुझ्या आईची आठवण झाली बघ! ती आज असती तर तिला किती आनंद झाला असता!"

"होय, पप्पा मला पण आईची आठवण झालीय. मला पण झोप नाही आली अजून! तिला किती आनंद झाला असता! मला कवटाळून मिठीत घेऊन झोपली असती!" दीपाही स्फुंदून स्फुंदून रडली. दोघेही बराच वेळ आठवणी उगाळत राहिले.

दीपा हुशार आहे. हजरजबाबी आहे. काहीतरी करुन दाखवण्याची धमक तिच्यामध्ये दिसत आहे. हे मिस्त्रीला दिसत होतं. त्यामुळे दीपाला चांगलं घडवायचं हे त्यांनी मनोमन ठरवलेलं होतं. त्या कोवळ्या वयातही दीपा असे काही अवघड प्रश्न विचारायची की त्याला उत्तर देणे अवघड होऊन बसायचं. आई म्हणजे तिची आज्जी उपासतापास, व्रत वैकल्ये, पूजाअर्चा करणारी आहे. तिच्या बालमनानं एकदा तिला प्रश्न विचारला,

"आज्जी, माझी आई का मेली गं? तुझे हे देव देव काय कामाचे आहेत? तुझ्या या देवांना आईला वाचवता आले नाही का?"

यावर आज्जी काय उत्तर देणार? ती गप्प बसली.

दीपाने दोन दिवसांपूर्वीचा प्रसंगही वडिलांना सांगितला. त्यांच्या गल्लीत जागरण गोंधळाचा कार्यक्रम होता. गोंधळच असतो. स्पिकरचा आवाज, वाद्यांचा आवाज, वाघ्याचं भसाड्या आवाजातलं गायन आणि मुरळीचा नाच असा धुमधडाका चाललेला होता. दीपाला हे पटत नव्हतं. तेव्हा ती म्हणाली,

"काय ह्या अंधश्रद्धा आहेत! विनाकारण खर्च करायचा!असा देव देव करुन कुठे सुख शांती अन् समाधान मिळते का?"

पण दीपाची आज्जी अंधश्रद्धाळू! देवभोळी! देवपूजा करणारी! तिला राग आला. ती म्हणाली,

"अगं दीपे, देवाला असं बोलुनी वाईट वकटं! देव कोपला म्हणजे बरं नसतंय! देव सराप देतो. देवाला नावं ठेवणाराचं कधी चांगलं होत नाही बघ!"

आज्जीबरोबर वाद घालण्यात अर्थ नव्हता.

"आज्जी, आपल्या कर्तुत्वावर विश्वास असल्यावर त्याचं देव पण काय वाकडं करु शकत नाही बघ!"

एवढे बोलून आपण तो विषय तेथेच मिटवला होता. याची दिपालीला आठवण झाली. बाप लेकीला फार उशिरा डोळा लागला.

सोनेरी किरणं फेकत पूर्वेला सूर्य वर आला. भारत मिस्त्री आणि दिपाली खूपच आनंदात होते. दोघांनी सकाळची कामं उरकली.

दिपाली रंगानं बापासारखीच सावळी पण नाकी डोळी सुंदर तरतरीत! उंची पुरी! एक प्रकारचं तेज तिच्या चेहऱ्यावर ओसंडत होतं. आईचं रुप घेऊन आलेली! पाच पन्नास जणीत उठून दिसणारी! गरिबाघरचं सोनं होती ती!

पोरगा समजून दिपालीला पुढचं शिक्षण द्यायचं असा मिस्त्रीनं ठाम निर्धार केला होता. तालुक्याच्या ठिकाणी जाऊन कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये कला शाखेत दिपालीला ॲडमिशन घेतले. तसेच कॉलेजच्या मुलींच्या हॉस्टेलमध्येही ॲडमिशन घेतले. होस्टेलमध्ये राहून दिपालीचे शिक्षण सुरु झाले. तेथेही ती चांगलीच चमकू लागली.

कॉलेजमधील वादविवाद स्पर्धा, प्रश्नमंजुषा, चर्चासत्रे, वक्तृत्व अशा उपक्रमांमध्ये ती आघाडीवर असायची. अभ्यासात तर हुशार होतीच पण सामान्य ज्ञानातही कमी नव्हती. तिने बी.ए. ला स्पेशल इंग्रजी विषय घेतलेला. इंग्रजीमधील बरेचसे साहित्य तिने वाचून काढले. अभ्यासले. ग्रंथालयातील पुस्तकं पाहून काय वाचू आणि किती वाचू असे तिला झाले होते. मोठमोठ्या साहित्यिकांच्या कथा, कादंबऱ्यांबरोबरच थोर पुरुषांच्या चरित्रांचे तिने वाचन केले. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य वाचून

ती अतिशय प्रभावीत झाली.

दिपालीच्या जीवनाला नवा मार्ग सापडला. नवी दिशा मिळाली. तिने स्पर्धा परीक्षेचा अभ्यासही मोठ्या जोमाने सुरू केला होता. तिच्यामध्ये एक वेगळ्याच प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला होता.

दीपा दर सणाला घरी यायची. आज्जी आणि पप्पा यांच्याबरोबर दोन दिवस आनंदात सण साजरा करून परत कॉलेजला जायची. शेवटच्या वर्षाला असताना अशीच घरी आली होती. दसऱ्याच्या सणाला! आज्जी थकलेली होती. तिला घरातलंच काय स्वतःचही काही काम करता येत नव्हतं.दीपाने सारं घर सारवून सुरवून लख्ख केलं. दसऱ्याचं धुणं भांडी चकाचक केली. परंपरेने घरात असलेली कोपऱ्यातली परडी देवीची माळ पाहून वडिलांना म्हणाली,

"पप्पा, हे विज्ञान युग आहे. मी विज्ञान युगातली विद्यार्थिनी आहे. फुले सावित्रींची लेक आहे. आंबेडकरांची अनुयायी! घरात या देवीदेवतांची प्रतिकं असणं मला नाही आवडत!"

"पोरी, तुझं म्हणणं बरोबर आहे. मलाही ते पटतंय. पण आईची ती श्रद्धा आहे. हे आपण काढून टाकलं तर म्हातारी जीव देईल. ती जिवंत असेतोपर्यंत हे असंच असू दे घरात! तिच्या माघारी काय करायचं ते आपण पुढचं पुढं बघू!"

दसऱ्याच्या दिवशी झेंडूच्या फुलांचा मान असतो. दिपालीने फुलांचे हार करून घर सजवले. बसल्या जागेवरून आज्जीने दीपाला सांगितले,

"दीपा अगं देव्हाऱ्यावरच्या देवांची पूजा कर! मला काय होत नाही बघ आता!"

"होय आजी! करते!"

तास दोन तासानंतर आज्जी देवांच्या पाया पडायला म्हणून आत आली. पाहते तर काय? देव कोनाड्यात देव्हाऱ्यावर तसेच! दीपानं टेबलवर फुले सावित्री आंबेडकरांचा फोटो मांडलेला! तिच्या अभ्यासक्रमाची वह्या पुस्तके पेन पॅड अशा वस्तू ठेवलेल्या आणि अगरबत्ती लावून फुले वाहिलेली होती. ते पाहून आजीला आश्चर्य वाटलं. ती थोडी रागावली. तणतण करत म्हणाली,

"दीपा हे काय केलंयस गं? अगं, मी ह्या देव्हाऱ्यावरल्या देवाची पुजा कर म्हणलं! देव कोपला म्हणजे डोकं भरमिट व्हईल. काय कळतंय का न्हाय तुला?"

तेव्हा दीपा म्हणाली,

"अगं आज्जे,हेच तर आपले खरे दैवत आहेत. मी यांना देव म्हणणार नाही. पण यांच्या विचारानेच आपला उद्धार झालाय. मी जी शाळा शिकतेय ना, ती या देवांमुळेच!"

आज्जीच्या म्हणण्यानुसार दीपाचे डोके भरमीट झाले नाही की आणखी काही झाले नाही. उलट त्यावर्षी ती फायनलच्या परीक्षेत इंग्लिश विषयात बी.ए. विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाली. दीपा चांगल्या मार्कांनी पदवीधर झाली.

आता दीपानं ध्येय निश्चित केलं. एमपीएससीची परीक्षा द्यायची. क्लास वन अधिकारी बनायचं. मिस्त्रीने कंबर कसली. वाटेल ते कष्ट करीन पण दीपाला काही कमी पडून देणार नाही. एवढा त्यांनी विश्वास दाखवला. तिला प्रोत्साहन दिले. पुण्या-मुंबईला नोकरीला असलेल्या गाववाल्यांना भेटून पोरगी हुशार आहे, तिला शिक्षणासाठी पैसे हवे आहेत असे सांगून थोडे पैसे जमा केले. दीपाला काही महिने पुण्याला स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रावर ठेवले. दीपाने परीक्षेचे स्वरुप, अभ्यासक्रम याचे ज्ञान मिळवले. तिला कायमस्वरूपी पुण्यातला कोचिंग क्लास अटेंड करणे शक्य नव्हते. लाखो रुपये आणायचे कोठून? त्या ठिकाणचा जेवणाचा, राहण्याचा खर्च आणि कोचिंग क्लासच्या फीस तिला परवडण्यासारखे नव्हते. मिस्त्रीने दिलेल्या पैशाची तिने स्पर्धा परीक्षेची दहा हजाराची पुस्तके खरेदी केली. आपले गावाकडचे घर गाठले आणि अभ्यासाला सुरुवात केली. तपश्चर्येला बसलेल्या ऋषीमुनींसारखी! एकलव्याची बहीण झाली! डॉ. आंबेडकरांचा फोटो समोर ठेवून साधना करू लागली! बाबासाहेब अंगठा मागणार नाहीत. यापूर्वी त्यांनी सर्वांना भरभरून मुक्तहस्ताने ज्ञानदान केले आहे. हे तिला माहीत होते.

थोड्याच दिवसात वयोवृद्ध आज्जीनं देह ठेवला. आता घरात दीपा आणि मिस्त्री दोघेच होते. दोघांनी कोपऱ्यातली परडी, माळा व देवांच्या इतर प्रतिमा नदीला नेऊन अर्पण केल्या. घरातली अडगळ निघून गेली. आता तिच्यापुढे शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या प्रतिमाच असायच्या. तिच्या अंगात ऊर्जा निर्माण व्हायची. अधून मधून तिला आज्जीचे शब्द आठवायचे. "देवाला नावं ठेवू नये.देव कोपला तर चांगलं होत नाही."

दिपाने खूप अभ्यास केला. चांगलीच तयारी केली. उंच उडी मारली तर आकाशाला स्पर्श करीन एवढा तिचा आत्मविश्वास वाढला आणि पहिल्याच प्रयत्नात दीपा तहसीलदार परीक्षेत यशस्वी झाली. लाखो रुपये खर्च करून एमपीएससी, यूपीएससीच्या परीक्षेत विद्यार्थी उतरत नाहीत. पण दिपालीने मिळविलेले हे यश तिच्या कष्टाचे फळ होते. पुणे मुंबईच्या वर्तमानपत्रात फोटोसह बातम्या झळकल्या. पेपरवाले, चॅनलवाल्यांनी तिच्या घरापुढे गर्दी केली. अनेकांनी तिच्या मुलाखती घेतल्या. गावची पोरगी तहसीलदार झाली याचा गाववाल्यांना अभिमान वाटला. गाववाल्यांनी तिची गावातून वाजत गाजत भव्य मिरवणूक काढून सत्कार केला. तेव्हा मोबाईलवर एक गाणे वाजत असायचे,

"तू पूजलं तुझ्या देवाला, त्याने मुरळी तुलाच केली...

जिणं पूजलं बुद्ध भीमाला, ती वकिल डॉक्टर झाली...!"

गरिबाघरची दिपाली वकिल डॉक्टर नाही झाली

पण तहसीलदार म्हणजे क्लास वन अधिकारी झाली. हे सर्वांना दिसत होते. सावित्रीचा वारसा जपलेल्या दिपालीचा सगळीकडं जय जयकार होत होता.

भास्कर बंगाळे
पंढरपूर
मो. 9850377481

# लक्ष्मी आणि सरस्वती



दुनियाची रीतच न्यारी,
धनीकाला नेहमी सलामी.
अन् निर्धनाच्या नशिबी
लिहिली आहे फक्त गुलामी.

धनिक असो की नसो ज्ञानी,
पण सभेचा असतो धनी.
निर्धन असला जरी ज्ञानी,
भरतो धनिकाचे घरी पाणी.

धनिकांनाच विचारतात सगळे,
काहो तुम्ही, कसे आहात?
निर्धन कामात मग्न सदा,
त्याकडे, नाही कुणी पहात.

कोण करतो विचार याचा?
कोणत्या मार्गाने मिळविले धन?
एकदा का धनिक झाला म्हणजे,
जो तो त्यांचेच, गातो गुणगान.

असा कसा हा देवाचा न्याय?
सरस्वती पेक्षा लक्ष्मीलाच मान.
सरस्वती लागली भिकेला अन्,
लक्ष्मीला मिळते भरभरून दान.

रामदास राजेगांवकर
मेहकर
मो.९४२०२३३०३२

# बालमनाचा शोध घेणाऱ्या नाट्यछटा



नुकतचं एक छोटेखानी पुस्तक वाचण्यात आलं.. “मलाही काही सांगायचयं...” सौ. रेश्मा संतोष चव्हाण ह्या शिक्षिकेचं हे नाट्यछटेचं पुस्तक.. हाती घेतल्यावर वाचकाला त्याच्या बालपणात घेऊन जातं.. एका दमात वाचून काढल्याशिवाय राहवत नाही..

दिवाकरांची “बोलावणं आल्याशिवाय नाही..” ही नाट्यछटा वाचून प्रोत्साहित.. प्रेरित.. झालेल्या लेखिकेने अशा अनेक छोट्या छोट्या नाट्यछटा लिहून वाचकाला अगदी खिळवून ठेवले आहे..छोट्या वीस नाट्यछटा ह्या पुस्तकात आपण वाचू शकतो..

“ फ्रेंडशिप डे” मधून लहान मुलांचं भावविश्व उलगडून दाखविलं आहे.. मित्रांबद्दलचे लहान मुलांचे विचार आणि मोठ्यांमधला फ्रेंडशिपडेचा उत्साह याची छान तुलना ह्या नाट्यछटेत आहे.. “घरातला भ्रष्टाचार” नावाची नाट्यछटा,छोट्या मोठ्या कामासाठी आपण कसे पॉकेट मनी मागतो किंवा हलक्याफुलक्या कामासाठी कशी घरातली मंडळी एकमेकांना वापरते.. लहानांना वापरतात.. हा एक भ्रष्टाचारच आहे. असं काहीसं मजेशीर वर्णन आपण ह्यात वाचू शकतो..

पंढरपूर आळंदी सारख्या ठिकाणी गेल्यावर मंदिराच्या बाहेरील गंध लावणारी मुले आणि त्यांचे भाव विश्व “देवाचं गंध” ह्या नाट्यछटेत आपण वाचू शकतो..

ह्या मुलांचा प्रामाणिकपणा आणि अगतिकतेतून आलेली गंध लावायची वेळ आपणास हेलावून सोडते.

“कचरा उचलणारी मुलं” बघितल्यावर त्यांच्याहीकडे लक्ष देण्याची गरज आहे,असं सांगत त्यांचं बालमन कसं शाळेच्या गेटवर उरलेल्या छोट्या पेन्सिलचे तुकडे.. रबराचे तुकडे..डब्यात ही मुलं जमा करतात व शाळेशी संबंध प्रस्थापित करतात असं काहीसं मन हेलावणार “मलाही खूप शिकायचं” ही नाट्यछटा सांगून जाते.

“मी बोलतोय डोमकावळा” ही नाट्यछटा तर मनुष्याच्या जीवनात असलेलं कावळ्यांचं महत्व वाचकाला समजावून देते. वर्षश्राद्धांच्या दिवसांमध्ये पितृपक्षात कशी आमची मौज असते हे कावळ्यांच्या तोंडून ऐकण्याची मजा औरच आहे..” दाराचे कुलूप” ही नाट्यछटा आधुनिक कुटुंब व त्यात होणारी मुलांची घुसमट आपणांसमोर मांडते.. कॉम्प्युटर गेम आणि कॅंडी क्रश मध्ये अडकलेल्या मुलांना..कुलूप बंद दाराआड पालक कसे गुंतवतात..हे वाचून मन विषण्ण होते.

“ मुलीसारखं जगू दे” या नाट्यछट्रेमध्ये एका मुलीनंतर आपल्याला मुलगा पाहिजे होता तरी मुलगीच झाली म्हणून अट्टाहासापोटी त्या मुलीला मुलाचा पेहराव आणि मुलांसारखं चालचालन शिकविणारी आई व ती मुलगी यांचा संघर्ष दाखविला आहे..

“ समजूतदार” असण्याचे किती तोटे असतात हे सांगताना छोटी मुलगी आपला सगळेजण कसे वापर करतात तरीही ते आपणास किती छान वाटतं! हे तिचं बालमन वाचकांशी बोलतं. “ मोर नाचतो मनी” ही पौगंडावस्थेत असलेल्या.. आलेल्या..मुला-मुलीचं भावविश्व सांगणारी सुंदर अशी नाट्यछटा आहे. ह्यामधून लेखिका विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र जपणारी.. जाणणारी.. आहे हे लक्षात येतं.

“ मधली सुट्टी” मध्ये बाईसोबत डबा खाण्याची कशी मज्जा असते.. शिवाय त्याक्षणी बाई.. वर्गातल्या बाई पेक्षा कशा वेगळ्या असतात! हे विद्यार्थी- शिक्षिकेचं नातं.. शब्दापलीकडचं आहे हे सांगून जातं. “ वृद्धाश्रम” ही अजून एक नाट्यछटा.. ज्या मुलांना अनाथाश्रमातून आणलं.. त्यांनीच आपल्या बापाला वृद्धाश्रमात ठेवावं हे दुर्दैव मांडणारी आहे..

“ लग्नाला नको ग बाई” मधील मुलगी मोठ्यांच्या मध्ये फसल्यावर तिला तिच्या आवडीच्या.. बाजूच्या गोष्टी करता येत नाही.. ते दुःख याठिकाणी व्यक्त करते. ‘हे नको करु..ते नको करु’ असे सांगणारे पालक तिच्या मनाचा विचार करत नाही हे मांडलेले आहे.

“ येळ नाय मला” मधल्या एका कामवालीचा तोरा बघण्याजोगा आहे..ती किती बिझी आहे हे फारच छान पद्धतीने लेखिकेने वर्णन केलेला आहे.. तिचा बाज आणि ठसका व्यवस्थित सांभाळण्यात आला आहे. “ सायंटिस्ट व्हायचं मला” ह्या नाट्यछटेत ‘काड्या करणाऱ्या मुलाचं’ वर्णन आहे.. कुकरच्या शिट्टीला फुगा लावून तो फुगवायचा..अशी अफलातून सायंटिफिक आयडिया त्याच्या डोक्यात येते.. ती वाचून वाचक चकित होतात!

“ माऊली” नावाची शेवटची सायकल रुपी नाट्यछटा मुलांना आपल्या वस्तूची देखभाल कशी करावी.. हे शिकून जाते..

एकूणच ह्या पुस्तकांमध्ये आलेल्या सर्वच नाट्यछटांची

भट्टी एकदम मस्त जमली आहे.. लेखिकेने पंधरा ते सोळा वर्षापर्यंतच्या मुलांचा विचार करुन लिहिलेल्या ह्या नाट्यछटा खरंच वाचनीय आहे.. वाचकाला त्या आपल्या बालपणामध्ये फिरवून आणतात.. बालपणात

घेऊन जातात.. हे पुस्तक सर्व प्राथमिक.. माध्यमिक शाळांमध्ये असावे इतके सुंदर आहे.. मुलांकडून जर ह्या नाट्यछटा करून घेतल्या तर.. बऱ्याच अंशी "संस्कार" व "शिकवण" देण्याची ताकद ह्यात असल्याचं लक्षात येईल.. लेखिकेला पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा..

**प्रा.भरत खैरकर**
**चिंचवड, पुणे**
**मो.९८८१६१५३२९**

# जरा ऐका



चालला आहे कुठे आपला
समाज तरी सांगा?
इथे सगळे विकत मिळते
फक्त लावाव्या लागतात रांगा.

रांग सुध्दा विकत मिळते
फक्त मोजावा लागतो पैसा.
पाउला गणिक पेरा पैसा
बघा इतिहास बदलतो कसा.

काळा बरोबर समाजाचा
मूलाधार ही बदलत जातो.
काल द्रौ पदी विकली गेली
आज ' धर्म ' विकला जातो.

सणवार आले रस्त्यावर
संस्कृतीची काढली धिंड.
हा कधीच नव्हता
मराठी मातीचा पिंड.

थोडेतरी वळुन पहा
इतिहास साक्ष देतो आहे.
रुपेरी पर्वाची आठवण
करून देतो आहे.

आठवा त्या ओव्या
अन् आठवा ते पोवाडे.
इतक्यातच नका बंद करू
हृदयाची कवाडं.

जेव्हा कंठात होतं गाणं
अन् हृदयात होती प्रीत.
तीच तर खरी होती
जगण्याची रीत.

अजुन उशीर झाला नाही
सावध, ऐका पुढल्या हाका.
जपत चला माणूसपण
सगळंच बाजारात मांडू नका.

**वैदेही आठल्ये**
**ठाणे**
**मो.9920081984**

# मुलांचे खेळ घेत असता



एक छोटासा अपघात झाला. एका मुलाला थोडं लागलं. त्याच्या नाकातून रक्त आलं. नंदाने त्याला व्यवस्थित सांभाळलेही. शांतही केलं. पण संध्याकाळी जेव्हा त्या मुलाच्या आईला हे समजलं तेव्हां ती थोडी तिच्यावर नाराज झाली.

"मुलाला काही झालं ना तर जीव कसा कळवळतो हे तुम्हाला नाही कळणार."

या तिच्या बोलण्याने नंदाच्या डोळ्यातून अश्रुंचा पाऊसच कोसळला.

काय आपलं आयुष्य? कसं सावरायचं?? हे युद्ध होतं. फक्त हरवणारं.

अशीच उदासपणे गॅलरीत उभी राहून ती त्या निष्पर्ण झाडाकडे पाहत होती. खरं म्हणजे कधीतरी हे झाड हिरवगार होतं. बहरलेलं होतं. ही पानगळ कधी झाली? आणि आपल्याला ती आत्ताच का सतावते?

तिच्या पाठमोऱ्या खांद्यावर श्रीरंगने हलकेच हात ठेवले. तिला वळवलं. तिचा चेहरा हातात घेतला. डोळ्यातले वाहणारे अश्रू पुसले. आणि म्हणाला,

"ऐक. माझ्याकडे एक प्लॅन आहे. खरं म्हणजे ही कल्पना माझ्याच ग्रुप मधल्या मित्रांची. आमच्यात बरेच दिवस चर्चा चालू होती. योग्य,अयोग्य साऱ्या पातळीवर ताऊन सुलाखून या निष्कर्षावर पोहोचलो आहोत."

नंदाला काहीच समजत नव्हतं. हा नक्की काय सांगतोय?

" हे बघ, ऐक ऐक, मी काय म्हणतोय ते.

" बोल."

"आपण मूल ॲडॉप्ट करुया. काय हरकत आहे? अगं जगात कितीतरी अनाथ मुलं आहेत, ज्यांच्या आई-वडिलांचा ठाव ठिकाणा नाही. जन्माला येणाऱ्या मुलांचा काय दोष असतो? आपण अशाच एखाद्या मुलाचं पालकत्व स्वीकारलं तर? "

नंदा पार हादरून गेली. इतकं सोपं आहे का हे?

" बघ. बायोलॉजिकली नसली तरी आपण प्रेमाचं एक नातं नक्कीच निर्माण करु शकतो."

" थांब. मला थोडा विचार करु दे."

मात्र यानंतर दोघांच्या संवादाला एक विषय नक्कीच मिळाला होता. निराशा, मरगळ एका वेगळ्या वाटेवर वळवली जात होती. काहीतरी रचनात्मक मनात आकारत होतं. आता निसर्गाची वाट पाहायची नाही. मुल अडॉप्ट करायचं. कदाचित आपल्यासाठी हीच परमेश्वरी योजना असेल.

अनेक प्रश्नांचा उहापोह केला. कुटुंबीय, जवळचे नातेवाईक, शेजारीपाजारी, मित्र मैत्रिणी, यांची नेमकी काय प्रतिक्रिया होईल? जे मूल घेऊ त्याच्यासोबत येणाऱ्या अज्ञात अनुवांशिक गुणांचं काय? मूल वाढत असताना इतरांच्या, सभोवतालच्या, बेधडक प्रतिक्रियांचा त्याच्या मनावर काय परिणाम होईल? भविष्यात त्याने विचारलेल्या प्रश्नांना आपण उत्तरं देऊ शकू का? इथपर्यंत सगळ्या शंका कुशंकांचं चर्वण झालं. पण एक मात्र खरं— मूल अडॉप्ट करण्याच्या विचारातून मात्र माघार घेतली गेली नाही. मुलगी ॲडॉप्ट करुया या विचारावरही एकमत झालं.

श्रीरंगच्या मित्राच्या, एका सामाजिक काम करणाऱ्या नातेवाईक महिलेनी एका आश्रमाची संपूर्ण माहिती दिली. ॲडॉप्शनच्या कायदेशीर बाबी, भरावे लागणारे अर्ज, अटी, नियम, लागणारा वेळ याविषयी सविस्तर माहिती तिने दिली.

श्रीरंग आणि नंदा एक दिवस त्या आश्रमात जाऊनही आले. तिथल्या संचालकांना भेटले. तिथली ती खेळणारी बागडणारी, काम करणारी लहान मोठी मुले पाहून मन गदगदलं. आणि खरोखरच मुल अडॉप्ट करण्याच्या विचाराला एक प्रकारची पुष्टीच मिळाली.

श्रीरंग— नंदाच्या आयुष्यात या नव्या विचाराने खरोखरच नवी पालवी फुटत होती. एका वेगळ्याच विश्वात,, कृतीशीलतेत, एका धाडसी अथवा जोखमीच्या निर्णयानेही निर्माण झालेल्या सुखद वळणावर दोघेही खूप आनंदी होते. आयुष्यातल एक निराळंच आवाहन त्यांनी स्वीकारलं होतं. आणि त्यात गंमत होती.

सर्व प्रक्रियेत अर्थातच काही दिवस उलटले. त्यादरम्यान घरात एका बाळ पाहुण्याची स्वागत तयारी सुरु झाली.बालसंगोपनाचे वर्गही त्या दोघांनी अभ्यासले. जे घडणारच नव्हतं ते घडणार म्हणून त्या घराच्या भिंतीही हसू लागल्या.

खूप दिवसांनी नंदा गॅलरीत आली. रस्त्यावरची वर्दळ, वाहनांचे आवाज,खेळणारी मुलं, आरडाओरडा या चैतन्यपूर्ण वातावरणाचा ती नकळत एक भाग बनली. आणि ते दूरवरचे झाड? अरेच्या! त्या निष्पर्ण झाडावर पोपटी, लालसर, इटुकल्या पानांची पालवी अंगभर फुटली होती. त्या चैत्रपालवीने ते झाड आता कसं बहरलं, हसलं.ते आता ऊर्जीत वाटत होतं.

श्रीरंग तिच्या मागेच उभा होता. त्यानं नंदाला प्रेम भावनेने मिठीत घेतलं.

दूरवरचं पालवलेलं झाडही हळुवार सळसळलं.

**राधिका भांडारकर**
**पुणे**
**मो.९४२१९२३६६९**

# प्रेम म्हणजे



प्रेम म्हणजे
जे कधी मिळत नाही
अन् मिळाले तर कधी
कळत नाही.
प्रेमाचं काही तरी वेगळच असतं
"प्रेम" या दोन अक्षरात सगळं असतं...!
"प्रे" म्हणजे तुझी प्रेरणा
"म" म्हणजे तुझी ममता
आपल्या असण्या नसण्याने
प्रेमाची कधीच संपत नाही समता.
"प्रेम" म्हणजे "प्रेम" असतं
शेवट नसलेली सुरवात असतं
प्रेम श्वासात असतं,घासात असतं
आठवणींच्या सुवासात असतं
प्रेमाला प्रेमळ अंत:करण लागतं
ते प्रेम फक्त प्रेमचं मागतं
राधा कृष्ण, ऍडम ईव्ह,
लैला मजनू,यांची साक्ष गातं
प्रेम एक व्याकुळ तहान
जी कधीच भागत नाही
"प्रेम" ते "प्रेमचं" अमर असतं
ते प्रेमा शिवाय "प्रेम"
नाही मागत काही.
प्रेम नाही तो गाव नाही
असेल तर त्या गावात जीव नाही
प्रेमरंग, प्रेम तरंग,प्रेम स्वप्न प्रेमचं ध्यास
प्रेम म्हणजे प्रेम
जे कधीचं सांगता येत नाही
अन् प्रेम म्हणजे फक्त प्रेम नाही
प्रेम म्हणजे आणखी खुप काही.

**विवेक द.जोशी**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.9850433178**



# सूर्य मी दिंगताचा..



अनादी मी,अनंत मी,
दिंगताचा सूर्य मी,
मुळारंभ मी आरंभाचा,
जनक सृष्टीचा सूर्य मी.

माझ्या वाचुन पान न हाले
कार्यकारण कांहीं न चाले
नियंत्रण मी,निमंत्रक मी,
विश्व दिंगांताचा सूर्य मी.

काळा चा ही काळ मी,
ब्रम्हांडाचा निर्माता मी,
घे जाणुनी माझ्यातला मी
विश्वचक्राचा चक्रधर मी.

अणु पासुन रेणु पर्यंत,
सर्व सत्ताधीश मी स्वामी
जगदीश मी,नियंता मी,
दिगांताचा सूर्य मी.

शुद्र मानव,सुई चे अग्र,
सदैव असती स्वमग्न व्यग्र
जाण माझे अस्तित्व अबाधित,
सूर्य मी,दिगंत,अनंत.

**वल्लभ दास**
**बिबवेवाडी, पुणे**
**मो.8087696340**

# तिमिरातून तेजाकडे..



‘तिमिर’ म्हणजे अंधार,म्हणजे उजेडाचा अभाव. हे सांगण्यासाठी आपण आधार घेतो उजेडाचाच! अंधाराची सांगड नेहमी अज्ञान,ज्ञान उजेडाशी घातली जाते.पण आता एकच गोष्ट राहिली आहे दिवाळीला जोडणारी आणि कधीही न बदलणारी ती म्हणजे अंधार....!

कारण तिमिरातून तेजाकडे नेणारा सण म्हणजे दिवाळी! दिवाळीची सुरुवातच दीप अमावस्येपासून होते.खरे तर इतर वेळी येणाऱ्या अमावस्येला आपण अशुभ मानतो.पण दिवाळीत येणाऱ्या अमावस्येला मात्र शुभ मानतो का? तर याच दिवशी ‘लक्ष्मीपूजन’ असते जे आपण अगदी उत्साहाने साजरे करतो.त्या दिवशी आज अमावस्या आहे,काळोखी रात्र आहे,हा विचारही मनाला शिवत नाही.म्हणून तर नरकचतुर्दशीला अगदी गुडूप अंधार असतानाही पहाटे लवकर उठून अंघोळ करतो.हा अंधारही अनुभवताना तो जवळचा,आश्वासक वाटतो.मग खेडेगावात कधीतरी अनुभवलेला शुध्द काळाभोर अंधार आठवतो.असा अंधार आता शोधावाच लागतो!हल्ली शहरात काय खेड्यातही कुठल्या भागात फिरायला गेलो तरी असा शुध्द,संपुर्ण अंधार भेटतच नाही.कुठे संधी मिळाली तरी आपण त्या काळोखात पाय ठेवायला धजत नाही.अगदी नेहमीच्या ठिकाणी- सुध्दा!आपल्याला तो नकोच असतो.अंधारात प्रकाशाची चाहूल आपण शोधू लागतो.ती लागताच मग हायसं वाटतं.हा उजेड म्हणजे अंधाराचा अभाव का नाही बरं? सारं जे काही सर्जक असतं ते उजेडातच घडतं असं थोडंच आहे? साऱ्या शुभ्र फुलांच्या मिराशी खुलतात रात्रीच्या अंधारातच ना!..माणसांची ढवळाढवळ थांबल्यावर. ते सृष्टीचं रात्रजीवन अंधारात कसं फुलत असेल? अगदी नीरव शांततेत,नि:शब्दपणे किती गुपिते दिली घेतली जात असतील मूकपणे.हा तिमिरच आपल्या ‘उद्याची’ तयारी करत असेल ना! सर्व सृष्टी मानवकेंद्री आहे हा केवळ आपला भ्रम आहे.मला वाटते खऱ्या सर्जकाचा आधार अंधारच असतो.पण माणसाला मात्र तो नकोसा वाटतो. कारण असे वाटते की,अंधार बहुदा स्वत:ला,स्वत:शीच जखडून ठेवतो आणि माणसाला स्वत:चीच सोबत सर्वांत जास्त नकोशी,कंटाळवाणी किंवा घाबरवणारी असू शकते.म्हणून ती टाळण्याकडे कल असतो.

खरे तर अंधार,शांतता,एकांत,आत्मशोध यांचे किती गहिरे नाते आहे..! उजेडात इतरांचे चेहरे वाचता येतात. पण आपल्या स्वत:चा खरा चेहरा वाचायचा असेल तर संपूर्ण शांतता,अंधार आणि फक्त आपण स्वत:सोबत असावं लागतं. अशावेळी मनावर कसलंही ओझं नसावं.काही शोधायचा अट्टाहासही नसावा.काही आठवू नये. काही ऐकूही नये. कोणत्याही,कसल्याही खंती उगाळू नयेत.अशावेळी उजेडाचा एक छोटासा कवडसा आपल्याला बाहेर खेचतो त्याच्या तेज- स्पर्शाने! अंधार मात्र आत वळवतो.’स्व’जवळ यायचे तर अंधारच आधार वाटतो. सारे आधार जेव्हा संपलेसे वाटतात तेव्हा आपण डोळे मिटून घेऊन अंधाराच्या आश्रयाला जातो.कारण तो असतो समूर्त,विशाल,सखोल,काळारंग..! वाटते की हाच काळा रंग पुर्णतेचे प्रतिक आहे.सारं काही पचवल्यावर येणारी पुर्णता.खोल मनाच्या तळाशी असणारी शांत,गूढ,गार,अविचल अशी पुर्णपणे समजूतदार! वाटते हे काळेपण खरंच शुध्द आहे. सात्विक आहे.एक आश्वासन,अनिश्चितता ते ठामपणा ही दोन्ही याचीच रुपे. तो फसवा नाही.तो कसलाही आव आणत नाही. म्हणूनच तो विलक्षण भुलवणारा आहे.त्याच्या-पाशीच सारं सुरु होऊन,त्याच्यापाशीच सारं संपतं!विलिन होतं.असं वाटतं.पंढरपूरच्या विठोबाला पाहूनही असंच वाटतं ना!तो कठोर वाटत नाही.हे आश्चर्यच!एकदा वाटते पंचमहाभूतात हे अंधारतत्व का नाही? ते तर आदिम आहे.मग लक्षात आलं की ते या भूतांच्याही आधीच आहे.साऱ्या भूतांचे उगमस्थान!...त्यांचे गर्भगृह अंधारच!यावरुन मला कवीवर्य बा.भ.बोरकरांचे ‘तम:स्तोत्र’ फार पूर्वी वाचलेले व त्यातील काही मी लिहून ठेवलेले आठवले.कवीवर्य बोरकरांनी अंधारावर फार सुरेख लिहिलं आहे.

‘तिमिरातून तेजाकडे’ म्हणताना त्यांनी अंधाराला कमी लेखलं नाही तर प्रकाशाचा जन्मदाता म्हणून त्याला गौरवलं..,

“अंधारी लावित टक,नेत्र दीप झाले,
अंधारी तपत मौन,दिव्य मंत्र व्याले..
आंध्य घेतल्याविना न ज्योत मिळे ध्याना”...

असं म्हणतं ते प्रकाशाचं जनकत्व अंधारालाच बहाल करतात. “तम:स्तोत्र” त्यांनी त्यांच्या अखेरच्या काळात लिहिलं.त्याची सुरुवातही त्यांनी त्याला “प्रकाशजनका पुरुषोत्तमा” म्हणून केली. कोटी कोटी ज्योतीकमलांना जन्म देणारा तमोमहोदयी..! म्हणूनच स्तोत्र जरी तमाचं असलं तरी त्यात निराशेचा लवलेश नाही.

“ऐसा तू गा दातारु,
निजानंद आवारु..! असं त्यांनी ज्याच्या विषयी म्हटलं,तो अंधार मला आता आपलासा वाटू लागला.

हा आपल्याभोवतीचा अंधारच सर्वार्थाने आपल्या आंतर्ज्योती उजळवतो.नव्या प्रेरणा, नवी दृष्टी,नवी चेतना देतो.सगळा अंधार आहे असं म्हणून खंतावत बसण्यापेक्षा त्याचे स्तवन करून त्याच्याकडे उजेडाचे

दान मागावे. उजेडाची भेट कधी होईल याची पर्वा न करता चालत राहिलेल्या या अंधारयात्रेच्या प्रवाशास जणू..,

“जे जे काही पाहिन नवे,
ते ते सर्व गाईन भावे..
प्रसाद मानून तुझ्याच नावे,
सर्वात्म भावे समर्पिन”...!

हे बोरकरांनी तमोदेवाला दिलेले आश्वासन! हा शाश्वत अंधारच.आपल्या मनात प्रकाशाची, तेजाची स्फूर्ती जागवतो.तेजस्पर्श घडवतो.

तसेच,तिमिरातून तेजाकडे नेणारे आपले आई-वडिलांचे संस्कार,गुरुंनी दिलेले ज्ञान, आपल्या चांगल्या-वाईट प्रसंगात,सुख-दु:खात साथ देणारे सुहृद,स्नेही,मित्र-मैत्रिणी हेही आपले अंतरीचे सोनेरी कवडसे असतात.त्यांच्या अशा तेजस्पर्शाने एकदा का आपल्या मनाचा गाभारा उजळला की,आपल्या आयुष्यातील प्रकाशपर्व सुरु व्हायला वेळ लागणार नाही आणि मग आपण आपोआपच “तिमिरातून तेजाकडे” झेपावतो.

**सौ.प्रज्ञा घोडके**
**चिंचवड, पुणे**
**मो.9604557689**

# लक्ष्मीची आरती



श्री लक्ष्मी धनदेवते, आरती ओवाळिते
विष्णू पत्नी विश्वप्रिये
हिरणमयी पद्मप्रिये
सदनी मम तू ये सये
आसनी तूज बसविते - आरती ।।१।।

चरण तव प्रक्षाळीते
पद्ममाला अर्पिते
तव कृपा मी मागते
हृदय तबकी आत्मज्योती
उजळूनी ओवाळीते - आरती ।।२।।

दिव्य तव दे दर्शना
एकही मम कामना
तवपदी नत प्रार्थना
समर्पिते अर्पिते
आरती ओवाळीते ।।३।।

श्री लक्ष्मीधन देवते
आरती ओवाळीते

**श्रीमती पद्मजा चंद्रशेखर कुलकर्णी**
**मो. ९३२५५२६५६०**
**आरती रचना, नृत्य, संगीत, गायन**
**भारुड सम्राज्ञी**

# पाऊस...



पावसाशी किती हृदयंगम नातं होतं मनाचं...

थोडा हलका, सुखद... उन्हाच्या तापल्या झळांतून थंड हलकासा गारवा देणारी सर...

नंतर पडणारा गारांचा वळीव..

किती शांत, तृप्त करणारा हा वर्षाव...

पण खरा मोसमी पाऊस सुरु झाला की, ती पहिली प्रसन्नता नाही रहात. त्याचा पहिला आवेश आश्चर्य आणि आनंद चकित करणारा असतो.दुसरयामधे तो आवेश आवेगात बदलतो. प्रसन्नता कुठंतरी हरवून जाते. आणि हवेत नकोसा दमटपणा येतो.

सकाळी उजाडता त्याचं आगमन दिवसाच्या कामाच्या उत्साहावर अक्षरशः पाणी फिरवून जातं.

तरीसुद्धा शाळा, कौलेज, ऑफिस, दुकानं, उद्योगधंदे तर सुरुच राहतात. त्यांना कुठे सुट्टी?

सकाळची घाईच्या कामाची वेळ टळते, आणि दाटून येते उदासवाणी, काळोखी अंधारी दुपार!

भर दुपारी आभाळ खाली येतं, पण ते माझ्या एकटेपणाला सोबत म्हणून नव्हे तर... मला अजूनच भिववायला! कुठलाच धड आकार नसलेले, अक्राळविक्राळ ढग गडगडाटी हास्यानं पोटात धडकी भरवतात. घरी मी एकटीच. म्हणजे सासूबाई, सासरे होते तेव्हा सोबत. पण तरीसुद्धा माझी मी एकटीच. बाहेर गेलेल्यांची वाट बघत मी एकटीच. सगळेजण सुखरुप, वेळेत घरी येतील ना, ही धाकधूक मनात राहणारी....

कुणाला.. म्हणजे मुलींना फार उशीर नाही ना होणार? ऐनवेळी खूप जोराचा पाऊस आला तर...?

वाटेत गाडी बंद पडली तर.....? पप्पा घरी यायच्या आत त्या पोचू शकल्या नाहीत तर..,? मुलींना कोणी काही बोलले तर.....? त्यांचं कौलेजला जाणं बंद केलं बिलं तर...? खरी भिती हीच होती माझी.. कधीच विसरु शकत नाही ते दिवस..

अंधारवाण्या दुपारी, पाऊस वाटेल तसा पडतोय, आपण छान पांघरुणात गुडुप करुन पडलोत, आणि आपली पिलं बाहेरच्या अंधारात, पावसात धडपडतायत,डोळे मिटायचेच नाहीत. घाबरुन मोबाईलला हेडफोन जोडून रेडिओ लावायचं समजलं होतं. रोज दुपारी तीन वाजता विविधभारतीवर सखीसहेली कार्यक्रम लागायचा(आजही लागतो.) डोळे मिटून त्या निवेदिकांचे आवाज ऐकताना खूप आधार वाटायचा. त्यांचे आवाज किती प्रेमळ! किती आपुलकी जाणवायची त्यांत! गर्द दाटून आलेल्या मनात एकच गाणं गुणगुणत असायचं..

फिरसे आईयो,बदरा sss बिदेसी....
तेरे पंखोंपे मोती जडूंगी.....
भरके जैयो,हमारी तलैया,
मैं तलैया किनारे मिलूंगी.....
तुझे मेरे, काले, कमलेवाले की सौ....

सुवर्णालंकारांनी भरगच्च असा तो आशाजींचा स्वर आणि त्याला व्हायोलिनची एकतारी, एकाकी सोबत.. चुकून कधी हे गाणं लागलंच तर ते दिवसही पुन्हा आठवतात.

पावसानं मन ओलंचिंब आणि आसमंत हिरवागार! धरती तृप्त व्हावी, एवढी इच्छा! भाजून काढणारं ऊन, त्याची तलखी घेऊन दमूनभागून बसलेलं मन! किती सांगायचं आहे, बोलायचं आहे, आतुरलेलं कासावीस मन!

मातीचा एकेक कण तापलेला, रखरखलेला!

सगळी भिस्त फक्त आभाळावर!

तो एकदा बरसला, की सगळं कसं शांत, तृप्त, गार गा ssss र! पण आज हे काय झालं???

त्या निळ्यासावळ्यानं ऐकलाच नाही, तापलेल्या मृदेचा धुमसत ध्वनी! त्याला नव्हता वेळ मातीच्या गर्भातील जाणीव गोंजारायला!

आला, पण तो आला! आणि बरसला ही! असा बरसला की, माती फुटून तिच्या सर्वांगाच्या ठिकर्या उजव्या! गर्भात काही रुजावं अशी कोवळी जागाच नाही ऊरली!

तो आला, तो बरसला...
आणि बरसून गेला,
कोवळ्या पातीची स्वप्नं उसवून गेला....

**सौ.अनिता सातारकर**
**कोल्हापूर**
**मो. 8999096252**

# नवख्या ठिकाणी..



नवख्या ठिकाणी अचानक
बासरीच्या स्वरांचा भास होता
कळले मनाला येथे
कृष्णाचा वास होता

ती आली हळुच मागे
त्या दीर्घ स्वरांच्या पाठी
कुठे मिळतो कुणास कृष्ण
केवळ वृक्ष सावली तेथे मोठी

त्याक्षणी स्मरते कान्हाला
त्या सावलीत जाऊनी
अन् हर्षित होते कृष्णाचे
मुख चंद्र नदीत पाहुनी

कान्हा मुखातूनी अलगद
स्वर तिच्या बाहेर पडतो
मात्र हे पाहुनी जाती-पातीत
बाटलेला समाज तिजवर चिडतो

कृष्णा म्हणजे आमुचा
तो तुजला दिसतोच कसा
तुझा धर्म नि जात ही वेगळी
आम्ही पाहिल्यावर होतो नाहीसा

नि ताकीद देऊनी समाज
'न दिसण्याची'तेथूनी पाठ फिरवतो
भडक फिक्या रंगाचे
झेंडे खांद्यावरी घेऊनी मिरवतो

मग तीहि निघते तिजला
जन्मत:च मिळालेला धर्म घेऊनी
समाजाच्या वाटा तुडवीत
नि जाते पून्हा नवख्या ठिकाणी

अन् नवख्या ठिकाणी अचानक
बासरीच्या स्वरांचा भास होता
कळले मनाला येथेही
कृष्णाचा वास होता....

**मेघा रामचंद्र गोळे**
**महाड, रायगड.**
**मो.७२१८९५१६७२**



# समाजमनासाठी स्वमन बदलणे आवश्यक....



माणूस हा समाजप्रिय प्राणी असला तरी याच समाजामुळे काही अंशी गोत्यातही आला आहे. माणूस समाजात राहिल्यामुळे स्वत:च्या सामाजिक जीवनात भरपूर बदलाव आणू शकला हे सौ प्रतिशत सत्य असले तरी समाजाच्याच अनेक नकारात्मक भूमिकेमुळे अडचणीत आला आहे.

आई, वडील, आजी, आजोबा, भाऊ, बहीण, काका, काकू इत्यादी नात्याने कुटुंब व्यवस्था बळकट झाली. अशा अनेक कुटुंबाच्या मिलनातून समाजव्यवस्था जन्मली. कालांतराने समाजव्यवस्था दृढ होत गेली. समाजासमाजांच्या एकत्रिकरणातून वाड्या, वस्त्या, गाव, नगर, शहर, महानगरे उभारले. त्यामुळे साहजिकच पंच-पंचकमिटी, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगरपालिका सारख्या नियंत्रण व्यवस्थांनी जन्म घेतला. माणूस मग शिक्षण, आरोग्य, विज्ञान, शेती, तंत्रज्ञान, अवकाश, भुगर्भ सारख्या अनेक क्षेत्रांत अनेकविध करामती करून स्वत:च्या सोयी निर्माण करु लागला.

स्वत:च्या बुध्दीमत्तेच्या जोरावर त्यांनी जग जवळ आणले. जन्मदर- मृत्यूदरासारख्या अशक्यप्राय गोष्टींवरही विजय मिळवला. क्षणार्धात नवीन निर्माण करण्याची ताकद त्याच्यात एकवटली परंतु, जग जवळ आणताना तो स्वत:च्या स्वार्थासाठी आपल्याच हितचिंतकांतील हितसंबंधात अहितपणा आणू लागला. समाजकारणापासून राजकारणापर्यंत अनेक बाबींत नाक खूपसून अन्यायाच्या चक्रव्यूहात गुरफटत गेला. माणूसपण विसरून अमानवीय वृत्तींकडे वळला. माझा, तुझा ऐवजी सुरुवातीला आमचा, तुमचा भावनेतून त्यानंतर ह्यांचा, त्यांचा आणि आता तर कोण कुणाचाच नसल्यासारखा वागत आहे. आपल्यामुळे इतरांना त्रास होईल ही भावनाच त्याच्या वागणूकीतून, विचारातून हद्दपार झाली आहे. आपलं तेवढं चांगभलं होण्यासाठी इतरांना कसं त्रास होईल, इतरांचा कसं नुकसान होईल, इतरांपेक्षा आपण किती वेगळे अथवा श्रेष्ठ आहोत यासाठी तो प्रयत्नशील आहे. आपल्या वरकरणीप्रेमाला भुललेल्या भोळ्याभाबड्यांना कसं फसवता येईल याचे नवनवीन प्रयोग करतो आहे. माणसाचा माणसाला फसवण्याचा धंदा रोजरासपणे चालू आहे. आर्थिक, सामाजिक, मानसिक, भावनिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक सारख्या साऱ्याच बाबीत तो फसतो आहे, फसवला जात आहे.

समाज कधीच वाईट नसतो परंतू त्या समाजातील काही धुरंधर चांडाळ चौकडीमुळे समाज वाईट होत असतो. “आपला तो बाळ्या दुसऱ्याचा मात्र कार्ट्या “ ही प्रवृत्ती अधिक बळावल्यामुळे इतरांसाठीचा दुस्साह वाढला आहे. “मी या समाजात राहतो, मी या समाजाचा आहे, समाज माझ्यासाठी नाही.” अशी खूणगाठ मनापासून बांधली पाहिजे. “मी या समाजाचा काही तरी लागतो, या समाजाचे ऋण माझ्यावर आहेत आणि हे ऋण फेडण्यासाठी मी अहोरात्र मेहनत घेतली पाहिजे.” असा विचार करायला हरकत नाही. तसं तर माणूस आणि समाज यांतील संबंध नितळ पाण्याप्रमाणे आहे किंबहूना असायला पाहिजे. समाज ही एक व्यापक संकल्पना आहे. ज्यात लहान-मोठा, काळा-गोरा, गरीब- श्रीमंत, जात, धर्म, पंथ, भाषा, संस्कार, संस्कृती या साऱ्यांना सामावून घेण्याची क्षमता असते. समाजात राहिल्यामुळे तर माणूसपणाचा अभेद सुरक्षारक्षक प्राप्त झाला. कुटुंबातील तसेच शेजारील, परिसरातील नात्यांत नाजुकता आली. एकमेकांच्या संबंधाला दुर्मिळ नाळ जोडली गेली. समाजातील आई-बहीणींबरोबर, बाया- बाप्प्यांचे हक्काचं घर बनून समाजात अनेकविध एक्स्टेंशन झाले परंतू बोटांवर मोजण्या इतक्या बागूलबुवांमुळे समाज सदोष झाला आहे, माणूसपणाचा अंत होत आहे, तेव्हा जागण्याची, जगण्याची व जगवण्याची हीच वेळ आहे. सावध व्हा हीच तुफानाची सुरुवात आहे. रोखणे आपल्या हातात आहे. अशा बागुलबुवांचे पंख वेळीच छाटणे आवश्यक आहे.

सध्यस्थितीला वाचन, मनन, चिंतनाची, आकलन व अवलोकनाची आणि उपयोजनाची खूप आवश्यकता आहे. वास्तविक पाहता सध्याच्या मिडीयाच्या सुलभतेमुळे माणसाला घरबसल्या साऱ्या गोष्टी मिळतात, सर्व प्रश्नांची उत्तरे वा शंकानिरसन होत आहे परंतू “टच एंड गो” अथवा “युज एंड थ्रो” सारख्या घातक गुणधर्मामुळे वा त्याच्या वाढत्या प्रभावामुळे आकलन, अवलोकन वा उपयोजनाची कृतीच मंदावली आहे. जो तो स्वतापुरताच पाहतो आहे त्यामुळे साहजिकच समाजातील वेगवेगळ्या रुपांचे दर्शन होत आहे. सध्यस्थितीला वाचन, मनन, चिंतनाची, आकलन व अवलोकनाची आणि उपयोजनाची खूप आवश्यकता आहे. वास्तविक पाहता सध्याच्या मिडीयाच्या सुलभतेमुळे माणसाला घरबसल्या साऱ्या गोष्टी मिळतात, सर्व प्रश्नांची उत्तरे वा शंकानिरसन होत आहे परंतू “टच एंड गो” अथवा “युज एंड थ्रो” सारख्या घातक गुणधर्मामुळे वा त्याच्या वाढत्या प्रभावामुळे आकलन, अवलोकन वा उपयोजनाची कृतीच मंदावली आहे.

जो तो स्वतापुरताच पाहतो आहे त्यामुळे साहजिकच समाजातील वेगवेगळ्या रूपांचे दर्शन होत आहे. विंचवाच्या स्वभावाच्या माणसांची भाऊगर्दी वाढत आहे. या अनर्थाचे कारण आपणच शोधून उपाय योजले पाहिजे तेव्हा कुठे आपण समाजाची खरी वास्तविकता अनभवू शकू. समाजात निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या रंगदोषांना, वेगवेगळ्या झेंड्याना आवरता घेणे आपल्या हातात आहे. हे सर्व थांबण्यासाठी कोण्या महात्म्याच्या जन्माची वाट बघत बसण्याची ही वेळ नाही त्याऐवजी समाजमन बदलण्यासाठी स्वमन बदलणे आवश्यक आहे हे लक्षात असू द्या.

**आनंद बाबूराव घोडके**
**सोलापूर**
**मो.७३९७८१३२३६**

# ‘वेदना‘



आधी... फिल्मी...
मग... नाटकी...
संवाद... सारे..
मज... पाठ की..!

रात्री... चंद्र.
दिवसा... तारका..
‘ अंधारचि... सत्य.. ‘
मुखी... मंत्र.. सारखा..!

‘ पाकळ्या’.. क्षणाच्या..
नाजुक... मनाच्या..
बोचतात... काटे..
वेदना... सदाच्या...!

इमारत.. ‘ भव्य दिव्य’
तेज.. प्रखर.. आगळे..
भिंतीचे... भिंतीत च्
कोंडलेले... सगळे..!!

**प्रा. राजाराम बनसकर**
**कळमनुरी**
**मो.९४२१३९१२३०**

# पुतळा...



प्रा. कमलाकर दे हणवंते आसरा जिरापुरे नगर, दारव्हा,जि. यवतमाळ. पिन को. 445202 मो.नं.8423654286.

शिवरामजी कष्टकरी माणूस. त्यांचे गाव, कुटुब आणि कर्मावर निरतीक्षय प्रेम होते, त्यांचीच ही गोष्ट. शिवराम कुटुंबात वडील असल्यामुळेते कुटुबाचे कर्ते पुरुष होते. त्यांना आई, बाबा, एक भाऊ आणि तीन बहिणी होत्या. शिवराम ज्या गावी जात तिथे ते अत्यंत कष्टाळू, प्रामाणिक कुटुंबात गणले जात होते.

ते गरीब असले तरी अत्यंत वैचारिक सतप्रवृत्तीचे होते. हातांना काम नाही, खायला भाकरी नाही आणि रहायला घर नाही त्यांची अशी परिस्थिती असताना देखील एक दिवसही त्यांच्या कामाविना जात नसे. एवढे न नसूनही ते जीवनाचे रडगाणे कधीच गात नसत. गावे बदलत बदलत ते हिरापूर येथे काही महिने राहिले.. इथेच त्यांच्या तीन बहिणींचे आणि लहान भावाचेही लग्न झाले..

अशातच शिवराम आणि त्यांच्या कुटुंबीयांना एका सद्दयी माणसाने त्यांना त्यांच्या गावी घेवून गेले. त्यांना घराशेजारीच घर बांधून दिले. तेव्हापासून शिवराम त त्याच माणसाचे सालकरी गडी म्हणून काम करीत होते

शिवरामचे आई -बाबा, भाऊ जे काम मिळेल ती कामें करीत होते. त्या गावात कष्टिक आणि प्रामाणिक असा नावलौंककही मिळवला होता. शिवराम ज्या घरी सालकरु म्हणून काम करायचे त्या घरच्या माऊलीने शिवरामला भाऊच मानले होते.

आता शिवरामच्या आई-वडिलांचे निधन झाले होते बहिणीही सासरी गेल्या होत्या.. शिवरामला ज्यांनी आश्रय तोही जवळच्या शहरात रहायला गेले होते. शिवराम आणि देवी किसान मोलमजुरी करत आणि गावातील मातीच्या भिंती बांधायचे कामे कटरायचे. अलीकडे अलीकडे ते भाडेतोडे करु लागले.होते. बचत केलेल्या पैश्यातूनच चार एकर शेत, बैलजोडी आणि गाय विकत घेतली.

अशातच शिवरामच्या पत्नीचे निमोनियाने निधन झाले. शेवटी नाही- हो करीत नातेवाईकांच्या आग्रहाखातीर शिवरामने दुसरा विवाह केला.तेथून काही दिवसानेच अचानकपणे माती आणता आणता गढीत पडून देविकिसनचे निधन झाले, तेव्हा देवी किसनची दोन मुले दहाही वर्षाचे नव्हते.

आता शिवरामवर दोन्ही कुटुंबाची जबाबदारी आली होती. तरीही न डगमगता शिवराम, केशर आणि तिच्या मुलांचा सांभाळ करीत होते पुढे शिवरामच्या मोठ्या मुलाचे लग्न झाले.. लहान मुलगा घरची कामे करीत नसला तरी शाळेत जाणे, बाहेरची मुजरीची कामे करीत होता. त्याचे कष्ट करण्याचे वय नसताना सुध्दा. शिवरामचा मुलांसाठी जीव तुटायचा. म्हणूनच मुलींच्या लग्नात घरची होती तेवढी शेती विकून टाकली. आता त्यांचा लहान मुलगा तहसील कार्यालयात नोकरीला लागला होता. तोही त्यांना आता

थोडी थिडकी मदत करायचा. शिवरामचेआपल्या मुला मुलीवर जीवापाड प्रेम होते.ते आईसारखे प्रेम नसले तरी त्यांचे मन मात्र आतल्या आत सारखं तळमळत असे. अशात अचानकपणे शिवरामच्या पायाला मोठा फोड झाला. तेव्हा शिवरामला झोप सुध्दा लागत नव्हती. सगळा त्रास शिवराम मुकाट पाणे सहन करीत होते. फोड बरा झाला नाही तोच त्यांच्या तिन्ही बहिणी त्यांना भेटायला आल्या होत्या. शिवरामचे 'काट्यांच्या वाटेवरुन चालताना 'पायात काटें रुतून पाय रक्ताळले तरी चालेल, मात्र वाटेवरील काटे बाजूला सारुन वाटेवरुन चालणाऱ्याचे पाय रक्ताळले जाणार नाही', याची ते काळजी घेत असत. असे शिवरामचे साधे सोपे जीवन जगायचे तत्त्व होते. त्यांना जीवनाच्या अंतापर्यंत आपल्या तत्वज्ञानाचा विसर कधीच पडला नव्हता.

शिवराम कष्टकरी असले तरी अत्यंत सुसंस्कृत विचारसरणीचे होते. म्हणूनच लोक त्यांना तोंड भरुन सावजी म्हणायचे. त्यांच्या श्रमनिष्ठा, वैचारिकताआणि प्रामाणिकपणाबद्दल बोलायचे.

गावची माती, माणसं आणि कुलदेवतेवर त्यांचा नितांत विश्वास होता. खेळत्या वयात शिवरामचच्या मानेवर कष्टाचे जू घ्यावे लागले होते. कष्ट एके कष्ट करण्यावर असलेली निष्ठा आणि निष्ठेवर असलेले प्रेम यालाच ते आनंद समजत होते. शिवरामचे जीवन अतिशय कष्टात गेले असले तरी त्यांनी तत्त्वनिष्ठा कधीही ढळली नव्हती. कष्टालाच ते राम समजायचे. शिवराम जेवत असताना दारावर कोणीही येवो ते रीकाम्या हाताने कोणालाच परत पाठवित नसत, कधी कधी तर ताटातले सर्व पदार्थ भिकाऱ्याच्या झोळीत टाकायचे, त्यामुळे शिवरामला अनेकदा अर्ध पोटी उपाशी राहावे लागले होते. आता शिवरामने सत्तरी ओलांडली होती. याही वयात त्यांना जीवनमूल्याचा विसर पडला नव्हता.

शिवराम फारसे आजारी नसतांना अचानकपणे त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या अंत्यविधीला आजूबाजूच्या दहा बारा खेड्यातील हजारो लोकं जमले होते. ते शिवरामजीला अखेरचा निरोप द्यायल आले होते. शिवराम पुढारी, नेता नसताना कष्टकरी होते त्यांच्या

अंतिम यात्रेला आलेले लोकं बघून गाववाल्यांची हृदये भरून आली.

शिवराम८०वर्षे जगलेत. या कालावधीतील त्यांचा एकही दिवस कष्टाविना गेला नसेल. कष्ट करता करता अखेरीस त्यांचा मृत्यू झाला, होता, न रडता हसत -हसंत. -आनंदात. त्यांनी शक्य तितके सहकार्य केले. गावात जी घरे बांधली आहेत त्या मातीच्या भिंती आजही बोलक्या आहेत. “ह्या भिंती कोणी बांधला हो”, तर गाववाले सांगतात की “ह्या भिंती शिवराम सावजीने बाधल्या आहेत.” शिवराम शिकले नसले तरी त्यांनी शिक्षणाच्या आवडीपायी लहान मुलास पदवीधरपर्यंत शिकविले.. एवढेच नव्हे तर जे आपणासी ठावे ते इतरांना सांगावे, यात त्यांनी तिळभर चूक केली नव्हती.

शिवरामानी अनेकांच्या जीवनात वसंत फुलविला. प्रेम दिले. आपुलकी दिली. सहकार्य केले. आजही त्या गावाला शिवराम सावजीचे गाव म्हणून ओळखले जाते. कष्टकऱ्यांच्या अंत्यविधीला सात हजाराहून अधिक माणसं उपस्थित होती, हे त्यांच्या कर्मनिष्ठा प्रामाणिकपणाचे प्रतीक म्हणून गाववाल्यांनी दर्शनी भागातच गावात शिवरामजीचा पुतळा उभारला आहे.

**प्रा. कमलाकर हणवंते.**
**मो.९४२३६५४२८६**

# मी आणि माझी सौ



आभाळावर स्वप्ने आमुची
रोज रेखितो आम्ही दोघे
आकाशाला घालू गवसणी
निश्चय करतो आम्ही दोघे

गतकाळाच्या चिंध्या कधीच
चिवडीत नाही आम्ही दोघे
भविष्य सुखकर होण्यासाठी
सदैव झटतो आम्ही दोघे

आयुष्याच्या या वळणावर
झेलू जरी कितीही संकटे
अंती लढ्यात विजय आमचा
आहोत निश्चिंत आम्ही दोघे

आकाश उद्याचे आमचेच आहे
खात्री देतो आम्ही दोघे
त्या उद्याची वाट पाहतो
आतुरतेने आम्ही दोघे

**श्री. उद्धव भयवाळ**
**औरंगाबाद**
**मो.८८८८९२५४८८**

# मन शुद्ध तुझं...

सकाळी सकाळी मालतीबाई नातवाच्या मागे असत. त्याच्या कलाप्रमाणे सगळे उरकून त्याला दूध पोळी भरवायचा मोठ्ठा कार्यक्रम गोष्टी गाणी करीत उरकत. बाहेर गंमत बघत गोष्टी ऐकत अर्जुन पोळी संपवायचा ही जुनीच संवय होती. सुनबाई आठलाच व पाठोपाठ मुलगा दोघेही बाहेर पडत. स्वत:चे आवरून पूजा करून छोट्या अर्जुनला उठवायचे व घरच्याच पण दुस-या घरी सांभाळण्यासाठी जायची तयारी करायची.

मालतीबाईंचा स्वत:चा व्यवसाय असल्याने त्या अकरा पर्यंत नातवाला सुनबाईंच्या आईकडे सांभाळायला सोडीत. एक बाई ठेवल्या होत्या त्या खाऊच्या शाळेत नेत.... आणत. मग त्याची दिवसभर या तिघांना चिंता नसे. आतासुद्धा त्या नातवाला भरवीत होत्या, तो काऊ चिऊच्या गोष्टीत रमला. पोळी संपली वाटी कट्ट्यावर ठेवली इतक्यात फोन वाजला. मुलीचा सईचा फोन असणार म्हणुन चटकन् फोन घ्यायला धावल्या. बोलताना अर्जुन त्रास द्यायचा यासाठी त्याला खाली सोडला. मुलगी घरच्या अडचणी विषयी..... सास-यांच्या शस्त्रक्रियेविषयी बोलत होती. तिची मुलं लहान व सासूबाई नव्हत्या त्यामुळे त्यांना मदतीला पुण्याला जावं लागणार. चार आठ दिवसाचा प्रश्न उभा राहिला. त्यामुळे त्या थोड्या विचारात पडल्या. त्यातच आवरून अर्जुनला घेऊन निघाल्या. सावित्रीबाई आल्या. त्याचे सामान घेऊन आल्या व गाडीत बसल्या. दहा मिनिटात आजोळी बाई व अर्जुनला सोडून त्या पुढे गेल्या. विचारात असल्यामुळे आपण चांदीची वाटीचमचा खिडकीतच ठेवला हे त्या विसरल्या.

संध्याकाळी घरी आल्या. स्वैपाक झाल्यावर अर्जुनला भरवायला वाटी मिळेना. मग आठवलं व त्या खिडकीत पोहोचल्या पण वाटी नव्हती. खाली पडलेला चमचा उचलला. “मिळेल घरात, जाईल कुठे?” असं म्हणत दुस-या वाटीवर भागवीत आवराआवरी झाली. झोपाझोपही झाली. पण यांना झोप येईना. नातवाला पहिल्यांदा बघितलं तेव्हाच त्यांनी खास चांदीची वाटी चमचा त्याच्यासाठी घेतली होती. इवल्याशा हातात आजीची ओळख वाटीचमचा व खुळखुळ्यातुनच करून दिली होती. ती कुठे मिळेल?.... सांपडेल का? अशी कशी मी हरवली? अशा खंतावत होत्या.

सकाळी मजल्यावरच्या मैत्रीणीला फोनवर बोलल्या. तर तिने, “झाडूवाला झाडत खिडकीपर्यंत येतो. उचलली असेल. विचार चांगलं खडसावून.” असं म्हटलं. माझाही विरू झाडूवाल्यावर संशय बळावला. एक तर गरीब होता. इतकी महागडी वस्तू.... मोह होणारच. मनाला चुटपूट लागली. आता आला की पोलीसांची धमकी देऊन वाटी परत मिळवायचीच. हेच मनात घोळत होतं.

काही क्षणात बेल वाजली. दार उघडताच विरूच दारात उभा ! तोंड काळवंडलेलं... घाबरलेला.... बावरलेला..पुढे आला. मट्कन खाली बसला. खिशातुन कळकट कागद व रुमालात घट्ट गूंडाळलेली चांदीची वाटी माझ्या हातावर ठेवीत जोराने हूश्श्श करीत “पाणी द्या मला” म्हणाला. सुटलो एका मोठ्या गडबडीतून, बाईसाहेब ! काल झाडताना आंब्याखाली ही खाली पडली. वर बघितलं तर कावळा. जड असलेली वाटी तोंडातून निसटली व खाली आवाज करीत पडली. ओळखली मी ! तुम्ही रोज बाळाला भरवता ना? तसाच आलो तर तुमचं घर बंद. मग गेलो घरी कारण आवरून बँकेत नोकरीवर जायचं होतं. घरी आमच्याकडे कपाटे थोडीच असतात? मग दत्तगुरुंच्या तसबिरीमागे अशी दडवून ठेवली. हैराण झालो बघा. ज्याची त्याला इतकी महागडी वस्तु परत करायला पाहिजे.. त्यासाठी ती रात्रभर सांभाळायला पाहिजे. कोणी टारगटाने पळवली तर परत इतकी महागडी वस्तु आपण कशी देऊ शकू? ह्या चिंतेने बेचैन होतो. सुटलो बाबा !

तुमची वस्तु तुम्हाला परत केली नाही तर ती लबाडी होईल. कष्ट करून पण जो घास मी व मुले खातो तेव्हढीच देवाजीची कृपा आम्हाला पुरेशी आहे. लोभाने दुस-याचे लुबाडले तर पाप घडेल. देवाजी नाराज होईल. आहे ते पण काढुन घेईल. देवाजीचा राग नको. मुलांना त्याच्या सावलीतच राहू देत. माझ्या घराची सुख सावली मी लबाडी करून नाही हिरावून घेणार. मी ती वस्तू न हरवता परत देऊ शकेन ना ? इतकीच चिंता मला कालपासुन भेडसावत होती. मी चहा दिला व आंत जाऊन थोडे पैसे घेऊन आले. त्याला देऊ लागले तर तो चट्कन उभा होत दाराकडे पळाला. “नको नको मोह नका दाखवू” ! तुमचंच तुम्हाला परत केलं, करायला हवं तेच केलंय. देवाजीची कृपा आहे परत करू शकलो. बस ! आणखी मला काहीही अपेक्षा नाही आणि तो क्षणात निघुनही गेला.

महागडी माझी वस्तू माझ्या हातात असुनही मला आनंद वाटेना. स्वत:ची लाज वाटली. गरीब दिसला की आम्ही त्याला चोर ठरवलंच....पण गरीबीतही मुलांना आपलं असेल तितकंच देवाचं समजुन घ्यायचं, लबाडीने देवाजी रागावतो हे शिकविणारा विरू मला वेगळीच अनुभूती देऊन गेला. गरीबीतही आपले कुटुंब मोहाला बळी न पडता आपले सत्व कसे राखेल हे तो सावधपणे दक्षतेने सांभाळत होता. प्रत्येक गरीब लबाड नसतो....

संस्कारानुसार व्यक्ती वागते. अगदी सहजपणे विरुची वागणूक जणू स्वतःचाच अपराध असल्यासारखी मला थक्क करुन गेली..

सहजपणे मी शाळा कॉलेजाबाहेरचा एक धडा शिकले होते. खरं तर एखाद्याने ती विकून पैसे केले असते. त्यातुन मजा मिळवली असती. गरीबीची परिस्थिती असून आपली हौस पुरी करणे हे एक गरीब व मुलांचा बाप असुनही त्याच्या मनाला शिवलेसुद्धा नव्हते. याउलट ही महाग वस्तु आपल्या हातुन हरवली तर आपण ती परत करु शकणार नाही हीच बोच त्या भाबड्या मनाला लागुन तो बेचैन होता. किती शुद्ध मन आहे त्याचं !

**अनुराधा जोशी**

# तू..



अश्रुंच्या पुरात
अडथळ्याचे खडक
वाहून का जात नसते?
तुझ्याच नावाचे
क्षितिज माझ्या
डोळ्याला दिसते.
खर बोलणं
सत्य पटवणं
आवडत का नसते?
तुझेच नांव
मनात माझ्या
गोठलेलं असते.
तोडलेल्या खोडाला
चिगुर फुलण्याची
आशा का वाढते?
भांभावलेल्या मनाला
'तू' नावाची
भुल भुलवते...

**डी.एन.मोरे,खैरकेकर**
**नांदेड.**
**मो.९९२३८४२०२५,९१३०७३०५६७**

# विधा...



## बहन का पत्र भैय्या के नाम।

मेरे प्यारे भैय्या
आशा है आप आनंदपूर्वक स्वस्थ मस्त व्यस्त होंगे।
सम्भवत: मेरी याद अब कम ही आती होंगी।।
किंतु, मुझे आप की याद बहुत बहुत सताती है।
पर फिक्र न करना चिंता तो बिल्कुल न करना।
मैं यहां ससुराल में बहुत खुश व प्रसन्नचित्त हूं।
मेरा आपसे करबद्ध आग्रह है।
अपनी बहन को कभी न भुलाना।
आप की यादें मेरे जीवन का बहुत बड़ा सहारा है।
कैसे बताऊं मैं तुम्हें अपना हाल चाल!
कैसे लिखू मेरी जीवन की कड़वी सच्चाई को
बहुत कोशिश के बाद भी मैं वहां बैगानी हूं।
सासू मां को मां समान स्थान दिया।
ससुरजी को पिता सा आदर किया।
ननद को छोटी बहन सा प्यार किया।
देवर को अनुज सा दुलार किया।
इतना सब कर भी मैं अब तक
इस घर का हिस्सा न बन सकी हूं।
विश्वास की डोर अधर में अटकी हैं।
बहू ससुराल में ग्रह लक्ष्मी कहलाती है।
पर मैं, अपने ही घर में बैगानी सी हूं ।
अपने अस्तित्व को तलाश रही हूं।
मान सम्मान सेवा का निर्वाह कर।
अपने अधिकार पाने को तरस रही हूं।
यहीं मैरे नए घर की छोटी सी कहानी है।
मैंने भैय्या को लिखकर जो सुनाई है।

## भैय्या का जवाब

प्यारी बहना
सादर प्रणाम
वंदन भी अभिनंदन भी
पत्र तुम्हारा पा कर अचम्भीत हूं
सुख का ठोर नहीं, दुखो का सागर है।
तुमने सबकुछ सच सच कहा है
मैं भी सच सच ही कहुंगा।
याद तुम्हारी हमें यदा कदा ही आती है।
इस कटु सत्य कों मैं स्विकार करता हूं।
मन मस्तिष्क अब मानने को तैयार हैं।
बहना हमारी ससुराल की गृह लक्ष्मी है।
कल तक जो इस घर का हिस्सा थी
आज कुछ दिनों की मेहमान होती है।
इसका मतलब यह नहीं है कि
सम्पूर्ण रिश्ते नाते प्यार मोहब्बत
बेमतलब बेगानेपन में लिन है।
हम बस अपनी उलझनों में कैद है।
भौतिक सुख सुविधाओ में मस्त हैं।
पर बहना तुम हमारे मन मंदिर में
पराइ हों कर भी हमारी बनी हुई हों।
हमारी हर खुशी तुम्हारे बिन अधुरी है।
हर त्यौहार तुम बिन उदास है।
तुम्हारे कुछ समय दिन आ जाने मात्र से ही।
आज भी घर दीपावली सा निखर जाता है।
ऐसा प्यारा अटूट हमारा रिश्ता है।

**कुंदन पाटिल**
**देवास**
**मो. 9826668572**

# डिटॅचमेंट



रोजचाच दिवस, रोजचीच सकाळ, तीच धावपळ, तोच दिनक्रम. पण माझ्यासाठी आजचा दिवस वेगळाच होता. अडोतीस वर्षांपूर्वीही तो दिवस खास होता. पण तो माझ्या आयुष्यातील एका नव्या पर्वाचा आरंभ होता.जीवनाची खऱ्या अर्थानं सुरुवात होती..माझ्या शिक्षणाचं, मी केलेल्या कष्टांचं जणू ते फळ होतं. रोज उठून रोजगाराच्या जाहीराती पाहणं, अर्ज करणं व प्रतिसादाची वाट पाहाणं हा प्रवास आजच्या दिवशी संपला होता. अर्ज, लेखी परीक्षा नंतरचे मुलाखतीचे सोपस्कर आटोपल्यावर आजच्या दिवशी अडोतीस वर्षापूर्वी बँकिंग सर्व्हीस रिक्रूटमेंट बोर्डाकडून ( BSRB ) मला अपाइंटमेंट लेटर मिळून एका राष्ट्रीयकृत बँकेत मला हजर व्हायचे होते

स्वतःच्या पायावर उभं राहण्याचा आनंद काही वेगळाचं असतो, तो आनंद मला मिळाला होता.बँकेत लेटर घेऊन जाणे, अधिकाऱ्यांनी सगळ्या पूर्तता झाल्यावर कामावर रुजू करवून घेऊन मला काम सोपविणे, सगळं अद् भूत होतं माझ्यासाठी. आणि आज इतकी वर्षे इमाने इतबारे सर्व्हीस केल्यावर सेवानिवृत्तीचा दिवस आला होता.

इतकी वर्षे या इन्स्टिस्टूटशी जोडलेली मी डिटॅच होणार होते.

आज रोजच्याप्रमाणे मी ऑफीसला जायला निघाले पण मनात एक वेगळीच हुरहुर होती. उद्यापासून हा दिनक्रम थांबणार होता. रोज घड्याळाच्या तालावर नाचणाऱ्या मला एकदम रितेपण जाणवणार होतं. दिवसातील दहा दहा तास कामाच्या चक्रात फिरणारी मी आता या वेळेत काय करणार, या वेळेचं नियोजन कसं करणार.? या प्रश्नांनी वेढली होते.

" मॅडम आता कोठे घेऊ गाडी, मला रस्ता सांगा " मी तंद्रीतून बाहेर आले. "उजवीकडे घ्या ". रोज नवनवीन आव्हानांना सामोरी जाणारी मी, आजही नवीन आव्हान समोर आलं. ऑटोरिक्षा, टॅक्सीवाल्याँचा आज संप होता. बँकेत वेळेवर पोहोचणं, डे बेगीन करणं, कॅश व सुरक्षा जमा कक्ष उघडणं, वेळेवर होणं गरजेचं होतं. रस्त्यावरुन जाणाऱ्या एका फोर व्हीलरला थांबवून त्या व्यक्तिला मी विनंती केली व त्याने मला इच्छितस्थळी पोहोचविले.

सेवानिवृत्ती नंतर मनसोक्त झोपायचं, आरामात उठायचं, वर्तमान पेपर वाचतांना चहाचा एकएक घोट घ्यायचा. आरामात आंघोळीला जायचं. किती किती छोटी स्वप्न असतात आपली नाही का ?. पण रोजच्या धावपळीत, दगदगीत ती सुद्धा पूर्ण होत नाही. सेवानिवृत्तीनंतर आपण हे सगळं करूया, मी मनाशी खूणगांठ बांधलेली.आज ती वेळ आली होती, पण हे काय ? पक्ष्यांच्या चिवचिवाटासोबत मी पण उठून बसले, ते ही नेहमीपेक्षा लवकर. वर्तुळात फिरण्याची इतक्या वर्षांची सवय. हातही भराभर कामे करु लागलीत.स्वयंपाक आटोपला आणि सवयीने डबा भरायला घेतला, " अगं काय करतेस ? डबा काय भरतेस ? रिटायर झालीस ना तू काल " यांच्या बोलण्याने मी भानावर आले. डब्यातलं अन्न पुन्हा पातेल्यांमध्ये काढलं. " इतकी वर्ष सोबत निभावलीस. माझ्यासोबत तू ही रिटायर झालास. तू ही अलिप्त झालास. डिटॅच झालास " मी हातातील डबा न्याहाळत होते.डबा सिंकमध्ये ठेवला आणि मी गॅलरीत आले.तुळशी चांगली बहरली होती. असं निवांतपणे मी तुळशीला कधी न्याहाळलंच नव्हतं. तुळशीने मंजिऱ्या खूप धरल्या होत्या. " मंजिरी वाढली म्हणजे तुळशीचं लाईफ कमी होतं. म्हणून मंजिऱ्या वरचेवर खुडाव्यात, तुळशी पुन्हा बहरायला मदत होते " आईचे बोल आठवले व मी तुळशीच्या मंजिऱ्या खुडू लागले.देवघरात जाऊन श्रीकृष्णाच्या मूर्तीवर मंजिऱ्या वाहिल्या.

दुपारचा एक वाजला आणि ऑफीसमधील लंचब्रेक मला आठवला.आज मला हे काय होतंय.? सेवानिवृत्तीपूर्वी माझी तीन महिने शिल्लक असलेली रजा मी एंजॉय करत होते, तेव्हा मला अशी हुरहुर कधीच वाटली नाही. हो त्याला कारणंही तसंच होतं म्हणा, मी अजून त्यांच्याशी जोडलेली होते.

हा काय पहिला बदल होता का आयुष्यातला ? नाही ना. प्रत्येक वेळी जुळवलंच ना आपण. प्राथमिक शिक्षण झालं आणि हायस्कूलला प्रवेश घेतला. जुनी शाळा, मैत्रिणी, शिक्षकवर्ग सगळ्यांचा निरोप घेतांना डोळ्यात अश्रूंनी दाटी केलेली.आम्ही मैत्रिणी एकमेकींना भेटवस्तू देत, पुनःपुन्हा भेटीचं आश्वासन देत डिटॅच झालो.पण नवीन शाळा, नवीन मैत्रिणी आणि पुढे शिकण्याची जिद्द, यांनी नवऊर्जा दिलीच की.

हाच परीपाठ हायस्कूल सोडतांना, पुढे महाविद्यालय सोडतांना, मनाला हुरहुर लावणारा घडत गेला. एकीकडे डिटॅच होतांना दुसरीकडे अँटचही होत गेलेलो आम्ही. पण आयुष्याच्या प्रत्येक वळणावर काही ना काही शिकत होतो. नवी उमेद, नवी आशा आणि जुन्याने दिलेल्या असंख्य आठवणींचा खजिना सोबतीला घेऊन मार्गक्रमण होतंच राहिलं.

आठवणींच्या या चलचित्रात मला आठवलं माझं सगळ्यात मोठं डिटॅचमेंट. माझं लग्न. ज्या घरात माझा जन्म झाला, मी लहानाची शहाणी झाले. आई

वडिलांच्या छायेत वावरले, भावंडांच्या सोबतीने खेळले, कधी भांडले, रुसवे फुगवे धरले, यांना सगळ्यांना सोडून नव्या घरी, नवीन माणसांसोबत राहाणं, तेथील रितीरिवाज, घरातील प्रत्येकांचे स्वभावदोष जाणून त्यांच्याशी जुळवून घेत, त्यांची मर्जी राखणं, सासूचा तोरा, दीर जावांचा हेवादावा,नणंदेचे टोमणे सहन करत संसारगाडी हाकायची, अजबच होतं. माहेर सुटलं, अगदी "

तदेव लग्नं सुदिनं तदेव ताराबलं चंद्रबलं तदेव । विद्याबलं दैवबलं तदेव लक्ष्मीपते तेंघ्रियुगं स्मरामि।

म्हणताबरोबर माझं घर दुरावलं. मी परकी झाले. पाहु,णी झाले. आयुष्याच्या या वळणावरील ही डिटॅचमेंट मला खूप हळवी करणारी होती.पण दुरावलेल्या या माया बंधनांची हुरहुर मनी असली तरी नवीन नात्यांची गुंफणही मनाला दिलासा देत होती.सून, वहिनी, जाऊ, पत्नी या नात्यांनी तर समृद्ध केलंच होतं पण एक सर्वोच्च नातं माझ्या कुशीत आलं होतं.मला मातृत्व पद बहाल केलं होतं.माझी छकुली, माझी सावली, माझा काळीज तुकडा, त्रिभुवनाचं सुख मला यापुढे थिटं वाटू लागलं आणि मुली माहेर सोडून सासरी का येतात या प्रश्नाचं गमक मला कळालं.

निसर्गकन्या बहीणाबाईंनी आपल्या योगी आणि सासुरवाशीण कवितेत हेच तर मांडलं.

" देरे देरे योग्या ध्यान<br>
ऐक काय मी सांगते<br>
लेकीच्या माहेरासाठी<br>
माय सासरी नांदते "

या डिटॅममेंटला अशी ही गोड अँटॅचमेंट होती.

पुढे आयुष्यात असेही वळण आले आणि एकएक करत आई बाबांनी इहलोकीची यात्रा संपविली. हा माझ्यावर कुठाराघात होता.माझी मायेची माणसं, माझं हळवंपण जाणणारी आई, माझ्यावर अतोनात प्रेम करणारे बाबा निघून गेले, मला पोरकं करुन गेले. उत्तरकार्य संपल्यावर मी माझ्या घरी निघाले तेव्हा माझा भाऊ गळ्यात पडून रडला होता. " ताई, आई बाबा गेले म्हणजे माहेर संपलं असं समजू नकोस. हा तुझा भाऊ आहे अजून, केव्हाही हक्काने येऊन राहात जा.मला भेटत जा. आईनंतर आता तूच माझी आई आहेस ग. तुझ्या मायेची पखरण होऊ देत जा माझ्यावरही.आणि लाभू दे तुझ्या प्रेमाची श्रीमंती मलाही." या डिंचमेंटलाही किती सुंदर अँटॅचमेंट होती. " आई, तू रडत आहेस " माझी छकुली मला विचारत होती, " नाही बाळा ", मी तिला कुशीत घेतलं. आई गेल्याचं दुःख तर होतंच पण मी सुद्धा कोणाची आई आहे हे विसरुन चालणारं नव्हतं.

छकुली आणि तिच्यानंतर आलेला चिंटू. चौकोनी कुटुंबात विसावलेली मी. मुलांचं संगोपन शाळा, शिक्षण, काळ द्रुतगतीनं कधी पुढे सरकला कळलेही नाही. मुलांना पंख फुटले, भरारी घेण्यास सज्ज झाले,आणि माझे मन कातर झाले.छकुलीचं कन्यादान करतांना मला माझं लग्न आठवलं आणि आयुष्यातलं एक वर्तुळ आज पूर्ण झालं होतं.

चिंटूने खूप प्रगती केली व एका बहुराष्ट्रीय कंपनीच्या द्वारे अमेरिकेला गेला आणि पुढे तिथलाच झाला. " चिंटूसाठी मी स्थळं शोधू लागले. निदान मुलगी भारतीय असावी, आपले संस्कार येणाऱ्या पिढीवर व्हावे ही माझी भोळी आशा. मी चिंटूला म्हणाले पुढच्या महिन्यात येतोच आहेस तर मुलगी पाहाण्याचा कार्यक्रम उरकवून टाकू या ".

" आई तुला हा त्रास कशाला, मी शोधलीय तुझी सून. नॅन्सी खूप गुणी मुलगी आहे."

माझं स्वप्न भंगलं, पण मुलाच्या स्वप्नाला महत्व देणं गरजेचं असल्यानं मी हा दुःखावेगही सोसला.

मुलं घरट्यात विसावली, उरलो आम्ही दोघेच. सुधीरची साथ असल्याने मला जीवन जगणं सोप झालं.

" अगं, सुनीता जेवायचं नाही काय आज ?. चल मलाही वाढून दे आणि तुझंही वाढून घे. चल लवकर, जाम भूक लागलीय मला " " होय चला, जेवण करून घेऊ या. "

सुनीता रिलॅक्स, अगं वाटेल दोन चार दिवस मनाला रुखरुख , रोजचं जीवनचक्र बदललं कि होतो हा त्रास

.सेवानिवृत्त झालं म्हणजे आपण निकामी झालो असं नाही. उलट आता आपला हा वेळ स्वतः साठी ठेवायचा.स्वतःसाठी जगायचं.आपल्या इच्छा पूर्ण करायच्या, आपले छंद जोपासायचे "Life begins at sixty dear ".

दुपारची वामकुक्षीसाठी मी विसावले. झोप येत नव्हती म्हणून टी. व्ही. लावला. कोणत्यातरी चॅनेलवर आध्यात्मिक प्रवचन सुरु होते " हा संसार मोह मायेने व्यापलेला आहे.या मायाजालातच माणूस फसत जातो व हे माझं, हे माझं ची वीण घट्ट होत जाते. माणसानं प्रेम करावं किंबहुना हे जग प्रेमानंच जिंकता येतं पण प्रसंगी कठोर निर्णयही घ्यावे लागतात. जवळकीतूनच दुरावा निर्माण होतो. म्हणून कोठे थांबायचं हा निर्णय घेता आला पाहिजे. साधं पक्ष्यांचंच उदाहरण बघा ना, पिल्लं मोठी झाली, भरारी घेतली कि स्वतंत्र होतात. तसंच माणसांचंही आहे. वानप्रस्थाश्रम ही संकल्पना हेच तर सुचविते.

नवीन पिढीला त्यांचं स्वातंत्र्य मिळायलाच हवं. वृद्धांनीही आपली मते त्यांना द्यावीत पण लादू नयेत. नवीन बदल, नवीन विचारांना संमती आनंदाने द्यावी. निसर्गाचं चक्रही हेच सांगतं. शिशिरात पानगळ होणारचं. जर पानगळ झालीच नाही तर नवपल्लवी फुटणार कशी ? माणूसही यापेक्षा वेगळा नाही.वृद्ध, जर्जर शरीर जीर्ण पानासारखं गळून पडणारचं. पंच तत्वानं भरलेलं हे शरीर शेवटी पंचतत्वात सामावून मोक्षाला जाणारचं.वेळीच ही अलिप्तता ज्याला कळली तो भाग्यवानच,.कारण मायेच्या, मोहाच्या जाळ्याला त्याने भेदलेले असते.सर्व येथे सोडून वैकुंठागमन करणं

सोपं होतं मग "

" होय आता आपणही अलिप्त झालं पाहिजे. निरोगी तनाबरोबरच निरोगी मनासाठी हलकासा व्यायाम, निसर्गात रमणं, आपले छंद जोपासणं आणि संवाद साधत माणसं जोडणं कितीतरी गोष्टी आहेत करण्यासारख्या या जगात." नकळत माझ्या ओठांवर हास्य आलं होतं. आरशात डोकावले तर चेहरा प्रफुल्लीत झाला होता. चित्तवृत्ती फुलल्या होत्या.

**डॉ. शैलजा करोडे**
**नेरुळ (पूर्व) नवी मुंबई**
**मो.9764808391**

# नातं तुझं नि माझं

नातं तुझं नि माझं
नातं तुझं नि माझं
जसं नदी सागराचं
कर्तव्याला जागताना
अंती एकच व्हायचं।।

नातं तुझं नि माझं
जसं लता नि वृक्षाचं
देत दुजाला आधार
ठाम एकानं व्हायचं ।।

नातं तुझं नि माझं
जसं धरती नि नभाचं
खूप तापावं एकानं
शांत दुजानं व्हायचं।।

नातं तुझं नि माझं
जसं पर्णाशी दवाचं
मोती बनून भेटीचं
अस्तित्वच सोडायचं ।।

नातं तुझं नि माझं
जसं नसांशी रक्ताचं
सोबतीनं वहायचं
एकत्रच संपायचं ।।

**डॉ. सौ. ज्युबेदा तांबोळी**
**जयसिंगपूर.**
**9561995255**

# विंदांच्या कवितांच्या गावा..



गोंविंद विनायक करंदीकर उर्फ़ विंदा करंदीकर साहित्य क्षेत्रातला सर्वोच्च प्रतिष्ठित 'ज्ञानपीठ पुरस्कार'त्यांना अष्टदर्शने या साहित्यकृतीसाठी देण्यात आला.स्वेदगंगा ते अष्टदर्शने या त्यांच्या काव्य प्रकारात विविध वळणे आहेत. त्यात कमालीची विविधता आहे. कवितेत एकाच वेळी सामर्थ्य, सुकोमलता,अवखलपणा आणि मार्दव,प्रगाढ वैचारीकतेबरोबरच नाजूक भावसौंदर्याचा एकदम प्रत्यय येते.

विंदांच्या 'असा मी तसा मी कसा मी कळेना ' कविता की ज्यात जीवनाचे मर्म,गूढ उलगडतात. त्या कवितांविषयी रसग्रहण.

असा मी तसा मी कसा मी कळेना - विंदा करंदीकर

कधी येतसे क्षुद्रता कस्पटाची
कधी वाढता वाढता व्योम व्यापी
कधी धावतो विश्व चुंबावयला
कधी आपणाला स्वहस्तेच शापी
कधी याचितो सत कधी स्वप्न याची
कधी धावतो काळ टाकून मागे
कधी वर्षतो अमृताच्या सरी अन
कधी मृत्यूची भाबडी भीक मागे
कधी दैन्यवाणा,निराधार होई
कधी गूढ,गंभीर,आत्मप्रकाशी
कधी गर्जतो सागराच्या बळाने;
कधी कापतो बोलता आपणाशी!
कधी आपणा सर्व पिंडात शोधी
कधी पाहतो आत्मरुपात सारे
कधी मोजीतो आपणाला अनंते
अणूरूप होती जिथे सूर्य,तारे
टळेना अहंकार सध्या कृतीचा
गळेना महापुच्छ स्वार्थी स्मृतीचे
कधी घेतसे सोंग ते सत्य वाटे!
कधी सत्य ते वाटते सोंग साचे!
कधी संयमी,संशयात्मा,विरागी
कधी आततायी,कधी मक्तकामी
असा मी..तसा मी..कसा मी कळेना;
स्वतःच्या घरी दूरचा पाहुणा मी!

विंदा करंदीकरांची ही कविता वाचली आणि अंतर्मुख व्हायला झाले की,खरंच असा मी तसा मी कसा मी कळेना ?

विंदा ज्ञानपीठ पुरस्कार विजेते!वैचारीक तत्वज्ञानाची सखोल बैठक, अनुभूती होती.अनेक कविता त्यांनी लिहिल्या. प्रसिद्धिच्या झोतात ते होते तरीही शेवटी आपण एक मनुष्यप्राणी!त्याला भावभावना आहेत. सामाजिक प्राणी आहे.समाजात वावरत असताना अनेक मुखवटे घेवून वावरतो.मग प्रश्न पडतो की,मूळ खरा मी कसा?खरी मी कशी?आणि आजच्या तर स्वार्थी युगात ही कविता फारच लागू पडते.२४ ओळींची कविता पण गूढ असा जीवन भावार्थ लपलेला आहे.

समाजात वावरत असताना येणाऱ्या सुखदुःखाचे अनुभव त्यातून खूप काही शिकायला मिळते. स्वतःच्या स्वार्थानुसार जवळ व दूर जाणारे आप्त स्वजन पाहिले की,प्रश्न पडतोच- एवढा प्रपंच थाट केला तो कशासाठी?मग कसा मी ,कशी मी अशाच आशयाची आपल्याला तंतोतंत लागू पडणारी कविता मनाचा वेध घेते आणि भावते.

स्वतः विंदांनी म्हटले आहे, 'आत्मज्ञान सर्वात श्रेष्ठ'! अनेक शास्त्रांच ज्ञान घेतले तरी आत्मज्ञान कठीण आहे. मी माझा शोध घेतला,माझ्या मनामध्ये डोकावून पाहिले तर परस्परविरोधी गोष्टी दिसल्या. मी कोण ? ठरविणे कठीण होऊन जाते.अशाच आशयाची व माझ्या सर्व कवितांची पार्श्वभूमीला लागू पडणारी ही कविता -असा मी,तसा मी कसा मी कळेना

कवितेची सुरवात कधी ह्या प्रश्नार्थक शब्दांने सुरवात होते अन जीवनाच्या गूढतेत, आपल्या अस्तित्वाचा प्रश्न कायम मनात रुंजी घालतो.विंदानी त्यांच्या लेखनात सामाजिकता, वास्तवता आणण्याचा प्रयत्न केला. त्यातील ही एक कविता

कधी येतसे क्षुद्रता कस्पटाची
कधी वाढता वाढता व्योम व्यापी
कधी धावतो विश्व चुंबावयाला
कधी आपणास स्वहस्तेच शापी

मानवी जीवन स्वभावाचे कंगोरे अधोरेखित होतात. आपल्या कार्याने कधी कधी सर्व यश पादाक्रांत करतो की काय अशी एकीकडे स्थिती, परोगामीचा आनंद, अहंकार तर कधी दुसऱ्याच क्षणी कर्तव्यहीन स्वतःस क्षुद्र, कमी लेखू लागतो.आपण सर्व स्थितीस जवाबदार आहोत असे समजून स्वतःला कमी लेखतो व एक प्रकारे स्वतःच स्वतःला शापित करतो. द्विधा मनस्थिती, चंचलता दिसून येते.

कधी याचितो
कधी ध्येयाने...

ध्येयाने भारावून जावून अहोरात्र कष्ट करून एक प्रकारे काळालाही मागे टाकत स्वप्नपूर्ती करतो, सुखाच्या सरी बरसण्याचा आनंद घेतो.तरी कधी एवढा लाचार

होतो मृत्यूही येत नाही.मृत्यूची भीक नियतीकडे मागावी लागते.दयनीय अवस्था होते. मानवी अवस्था क्षणांत आसमंत ठेंगणे अन क्षणात मातीत मिळणे. आनंद-दुःख लपा छपी चालू होते.विंदानी जीवनसत्य खूपच सहजतेने कवितेत मांडले आहे.

येणाऱ्या परिस्थिती,प्रसंगानुरूप भावविश्व उलगडते. क्षणात गूढ,शांत गंभीर जणू काही आत्मप्रकाश अंतर्मनात डोकावला आहे.ज्याप्रमाणे सागर जोराने गर्जतो त्याचप्रमाणे आपण (मी)सर्व शक्ती,ताकदीने गर्जतो,लढतो.विंदांनी रुपक समर्पकपणे वापरले आहे-

कधी गर्जतो सागराच्या बळाने

तर दुसऱ्याच क्षणी पुन्हा दीनवाणा होतो.गर्जना तर दूरच बोलतानाही कापतो स्वबळावर उभे राहता येत नाही अशी दयनीय अवस्था! मग मी नक्की कसा? काही वेळा तर कर्तृत्वाचा एवढा अहंकार की,जिथे सूर्य,तारे अणूसमान म्हणजेच क्षुद्र वाटतात.स्वतःच्या साध्या कृतीच्या यशाला मोठे मानून कधी अनंतात स्वतःला मानतात.नंतर सत्यप्रचिती येवून आत्मपरीक्षण!स्वार्थी आठवणींचा अंह्भाव गळत नाही.मुखवटे घेतलेले सोंग सत्य वाटते.पुढीलपदयपंक्तीत जीवनसत्य सांगितले आहे- कधी सत्य ते वाटते ते सोंग

संशयी,विश्वास न ठेवणारा,प्रत्येक गोष्टीत दोष काढणारा, आततायी स्वभाव अशा अनेक स्वभावानी वेढलेला मी नेमका कळेना-माझा तळ मलाच सापडेना. कवितेची शेवटची ओळ मात्र निशब्द करते व मी,तुम्ही आपण सर्वच ह्या ठिकाणी असल्याचे जाणवतेच...

स्वतःच्या घरी दूरचा पाहुणा मी

विशेषतः स्त्री मनाला हे जास्त भावेल.काळ जरी बदलला तरी अजूनही ही परिस्थिती पहावयास मिळतेच-स्वतःच्या घरी दूरची पाहुणी मी...

(सर्वस्व तुजला वाहुनी माझ्या घरी मी पाहुणी -स्त्री भावविश्व मांडणारी विंदाची एक वेगळी कविताही आहे.)

**सौ.ऋतुजा रविंद्र गवस**
**मुख्याध्यापक**
**8652433223**

# सामर्थ्य लेखणीचे



त्रिखंडात वाजे डंका
लेखणी माऊली समान
अनन्यसाधारण महत्त्व
सामर्थ्य लेखणीचे महान.

सर्वव्यापी असे लेखणी
विचारांची प्रगल्भता भारी
भेदभाव नाही कुठलाही
कवेत तिच्या दुनिया सारी.

अन्याय नि अत्याचाराला
वाचा फोडते सदा लेखणी
प्रेम मानवता बाग फुलवते
विचार मांडणी शब्दांची देखणी.

दडलेल्या मनातील भावना
लेखणीतून झरझर उतरती
लेखणी जीवनाचा आधार
असे आपला सखा सोबती.

त्याग साधना अनुभवातून
संत महात्म्यांची लेखणी चाले
न्याय हक्क संस्कार अध्यात्म मार्ग
जग उद्धारी ग्रंथ अनेक त्यांनी लिहले.

भाग्यवान मी खूपच या जगी
लाभले मज लेखणीचे वरदान
लेखणीतून प्रकट होतात भावना
प्रकृतिने दिधले अनमोल हे दान.

**डॉ. मंदा पडवेकर**
**चंद्रपूर**
**मो.9834895238**

# मुलीचा जन्म



बाळ तू जन्माच्या आधीच तुझ्याशी बोलायाचे आहे ग ।
कळी उमलायच्या आधी सांगायच ठरवले आहे ग।

मी माझा विचार बदलायचे ठरवले आहे ग।
तुझ्याशीच बोलून काय ते ठरवते ग।

अग तुझा हट्ट हे जग बघायच
आणि माझी जिद्द ते तुला दाखवायचे ।

दोघांचे असेच ठरले होते ना ग ?
अग खरच जग खूप सुंदर आहे ग तुला सांगितल्या प्रमाण।

तुला वचन दिले होते जग दाखवण्याचे ग।
पण मी आता माझा निर्णय बदलला आहे ग ।

अग ह्या जगात मनुष्य प्राणी आता सैतान झाला आहे ग ।
माणूस हाच एक क्रूर प्राणी आहे ह्या जगात ग ।

तोच एक निष्पाप मुलींच जीवन udhavasta करत करतोय ग ।
दोन चार वर्षाच्या मुलींचा सुद्धा विचार करत नाही ग।

बाप मुलीच नातं सुद्धा ओळखत नाही ग ।
त्या नराधमाला कशाची उपमा देवू या ग ।

जनावर त्याच्या पेक्षा कितीतरी पटीने बरे आहेत ग।
अश्या ह्या जगात तुला जन्म देवून मीच कुठे तरी चुकत नाही का ग।

तुला मी सुरक्षा देवू शकत नाही ग।
ह्या भरकटलेल्या जगात सैतानाचा मुकाबला करु शकत नाही ग।

डोळ्या समोर सर्व गोष्टी घडत आहेत पण मी करु काही शकत नाही ग।
विचाराने मन शून्य झाले आहे ग।

म्हणुन तुला आधीच सांगाव म्हणाले ।
रक्षक bhakashaka एक झाले आहेत ग ।

कुणी कुणाचा वाली नाही ग।
मग शरण कुणाला जायच आम्ही ग।

हे सगळ एकूण जन्म घ्यायचा का नाही।
तुझा निर्णय सांगणार मला कधी
तुझा निर्णय सांगणार मला कधी???

**विजया पाटील**
**मो.9922085169**

# वंशाचा दिवा



“ गावातला दवाखाना एकखेप झाला, आखोटातला दोनखेप झाला, तरीबी लेकरु रातभर बोंबलू बोंबलू अदमोसं होवून राह्यलं. तेही झपत नाई अन आपल्याले बी झपू देत नाई. मले त्याचं काईतरी काम बयकेल दिसते. त्याले बस्स कर म्हना, ते तूहं दवाखान्यात जानं...! काई देवाधर्माचं अशील तं मानून घे..! तसं केल्यानं देव मांगच सारं लचांड घेवून जाते.” कचरु बुढा भुवया तानूतानू, हातवारे करु करु, आंगाचा खकाना करत बुढीशी तंडत होता.

अवंss मी म्हनतो, ते दोघं आपलं आईकतील काय? आगूदर ते नाई पहा लागील. काईबी बोलून वाऱ्याले लाथा मारनं साजरं दिसत नाई तूमाले....!साऱ्यात महत्त्वाचं म्हनजे, त्या दोघा नवरा बायकोचा अशा गोष्टीवर भरोसा बसील काय?

“काऊन नाई बसील..! मले सांग, आपून दूस्मन आहो काय त्याईचे...! तूबी भलकाईच्या भलकाई बोलून राह्यली...! आपल्या लेकराईचा देवधरम आपून त्याईच्या लहानपणी केला नाई काय?”

“ अवंss त्यावाक्तीची गोठ अलग होती अन् आत्ताची गोठ अलग आहे. तो जमाना बी अलग होता. करु द्या त्याईले त्याईच्या मनानं...!”

“अवं, पन त्या तान्ह्या जीवानं अशावाक्ती कराव तरी काय? माहाकून ते पहावल्या जात नाही अन् मले ते सहीन बी होत नाई.”

“ तो वावरातून आला की, तूमच्या समाधानासाठी मी त्याले पूसतो, आईकलं तं आईकलं नाईतर....!”

काशीराम वावरातून दिवा-लागन्याच्या वाक्ती घरी आला. हातपाय धूतले, बायकोनं गरम चहा आनला, बशीत ओतला, दोन फूका मारुन, दोन घोटातच बशी रीकामी केली. लेकराले पायण्यातून काढून जवळ घेतलं आणि जागीच भीतीले रेटून बसला. बूढी आंगनात तूयशीपाशी दिवा घेवून आली. उदबत्ती फिरवताखेपी पोराकडे पाहून म्हने, “बाबू, तूहा बापाचं म्हननं आहे, तूनं लय दवाखाना केला, डाक्टरबी बदलून पाह्यले पन अराम कवळीचाही पळून नाई राह्यला. काई देवाचं असीन तं मानून घे! तसंही तूह्या लगना पासून बारा सालाबाद तूले लेकरु व्हयेल आहे.”

“आपून संत गाडगेबाबाच्या कर्मभूमीत राह्यतो... त्यातल्या त्यात तूहं माहेर शेंडगाव...! असंच शिकवलं काय तूले त्या कर्मयोग्यानं....! माहा नाई भरोसा बसत अशा गोष्टीवर....! माह्या मनाले पटत नाई तूहं असं वागनं....! बुढ्यांचं वयं झालं पन मायं तूही तशीच...!”

बुढीचं पोराशी बोलनं सुरु होतं तसा त्याचा मामा तथी येवून टपकला. आंगनात पायातला जोडा काढंत, गयातला धूपटा काढून वसरीच्या खांडावर ठेवत, “काय सुरु आहे भासेबा दोघा मायलेकाईचं गुलूगूलू....!”

कोनीतरी नवाळं घरात घुसलं म्हणून... बुढा निंबाखालून उठून कुबळी टेकवत टेकवत घरात आला. डोयावर उन्हाचं तिरप पळू नये म्हनून, त्यावर डाव्या हाताचा पंजा धरला....! दुसऱ्या हातानं चष्मा वरखाली करत....!

“ बाप्पा बाप्पा येसवंता व्हयंस काय रे...! वयखूही नाई आला लेका... लय दिवसानं आला गळ्या...! कसं काय येनं केलं बापा गरीबाच्या घरी....! दात धळे होते तदलोक तं एकाही शुक्करवारचा बजार सोळत नव्हता रे तू..! आता तोंडाचं खंडारं झालं तर भूलला लेका तू बाप्पूले...!”

“ तसं काई नाई हो बाप्पू....याद आली म्हनून तं आलो की नाई तूमच्या भेटीले.”

“माही कायची याद येते बदमासा तूले..! तूह्या बहिनीची आली असील...! बरं ते जावू दे...! घे हातपाय धूवून... मंग बोलू अरामानं...!”

खूटीवरच्या टवालाले तोंड पूसंत म्हने, “ त्याचं काय झालं, तेरवी होती बाप्पू तूमच्या गावाले खेटून, तथी आलो होतो, दादा पाटलाच्या घरी....! गावापाशी आलोच तं जावू म्हटलं भेट घेवून...!”

मामानं रातभर मुक्काम केला पण लेकरानं त्याईले काही झोपू देलं नाही. लेकराच आंग तपलं होतं, खोकलतही होतं अन रडून लायशेंबूळ एक करत होत होतं. बुढीनं नाताच्या बीमारीची पोथीच रात्री भावाले वाचून दाखवली. दुसऱ्या दिवशी मामानं त्याले समजावत म्हटलं, “भासेबा, जथी डाक्टरची कोशीस सरते, तथून खरा देव सुरु होत असते. तूमी नवीन लोकं अशा गोष्टीवर भरोसा ठेवत नाई. कोणं काही धोरणसूत मानसानं सांगतलं की, ते हास्यावर नेता अन मंग कूपा-काटीत जावून अटकता.”

अरेss बावा, आमच्या गावाच्या बाजूनं पहाळाच्या बूळाशी एक महाराज आला, त्याले लोकं निरंजन बाबा म्हणतात, आंगात भगवे कपळे, लंबी दाढी, डोक्शाचे कंबरीलोक लंबे केसं, तो बाबा अन्न खात नाई, नीरानाम दूधा-फळावरच राह्यते दोनचार चेले-चपाटे त्याच्या संगच असतात. आपल्याले फक्त बाबाच्या पूळे जावून बसा लागते बाकी सारं तोच सांगते. मनकवळा आहे तो...! आमच्या अथी तं लय लोकाईले गुन आला त्याचा...! कापूराच्या ज्योतीत पाहून तो बातचं कोडं उचलते. खायापेयात कोनं काई घालेल आहे काय? ते बी सांगते. तू ये तं खरं एक दिवस...! अरेss,मी तं

म्हनतो, टाईम असल तं आजच चल माहा संग...! नेक काम के लिये देरी काहेको..., बाबाचा दरबार तसा रोजच भरत असते.

बुढा बुढीनं तं पयलेच त्याच्या शेपटावर जबर पाय ठेवला होता. त्याच्यात मामानं येवून दुखत्या नसीवर अदीक भार देला. कोनाच्या पुढे आपलं आता काईच चालत नाई, आपलं बहुमत गेल्याचं पाहून, त्याले वाटलं, एकवेळा डोयेभरुन बाबाचा दरबार पाहूनच घेवू...कसा असते ते....! म्हणून तो मामासंग तथी गेला.

बाबानं त्याले सव्वा मयना ठान्यावरच कऱ्याले लावला. धागेदोरे, ताईत, मंतरुन लेकराच्या गयात बांधले. दोघंबी लेकराले घेवून तथीच थांबले. बुढाबुढी वापीस घरी आले. आता नातू नक्की बरा व्हईल यावर पक्का भरोसा बसला होता. सव्वा महिना सरत आला. लेकराची तब्येत पहील्याहून आखीन बिघडली. त्याले दम घ्यायलेही तकलीप होत होती. काय करावं.,, कोनाले काहीच सुचत नव्हतं.

घरी आला त्याच रात्री खूप जोराचा पाऊस बरसत होता. नदीनाले दुथडी भरुन वाहत होते. पूर आल्याने गावातून शहरात जाणारा रस्ताही बंद पडला होता. इकडे लेकराची तब्येतही रात्रीचीच जास्त बिघडली. नदीच्या पुलाहून पाणी वाहत होते. रस्त्याच्या बाजूनं गाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. याच्याही घरापूळे वाहनांची रांगची रांगच थांबली होती. कारमधील एका साहेबानं, प्यायाच्या पाण्यासाठी याच्या घराचा दरवाजा वाजवला. बुढीनं दरवाजा उघडला, घरात आले. त्याच्या मायंनं पाणी तर दिलेच पण त्यांची एखाद्या पावन्यारावन्या सारखी सरबराई केली. हातपाय धूवायला गरम पाणी देलं, बस्याले पाट टाकला, बकरीच्या दूधाचा चहाही पाजला. पूर उतरायला उशीर लागत होता म्हणून झूनकाभाकर अन वरतून कांदा, हिरव्या मिरचीचा ठेचा. साहेबाले पोटभर जेवूही घातलं. गावाकडचं चुलीवरच जेवण त्या साहेबांना बरेच दिवसानं जेवायला भेटलं होतं. गावच्या मानसांची निरागस माया, प्रेम, आपूलकीची भावना त्यात दाटूनचेपून भरली होती. ताटावरुन हात धूवून उठाताखेपी त्यांची नजर पायन्यातील रडत्या लेकरावर गेली. त्याची मायं जवळ बसून त्याले झोके देत होती. तेव्हा त्यांनी लेकराला जवळ जावून पाहलं, चौकशी केली असता सारंकाही ध्यानात आलं. जे समजायचे ते समजले. पाऊस थांबून पूराचे पाणी उतरायला लागले होते. साहेबाने अकोल्याला दवाखान्यात चालण्यास त्या दोघांना विनंती केली.

काशीराम म्हने, “साहेब आमी गरीब शेतकरी शेतमजूर मानसं, आमच्यापाशी यावाक्ती इतका पैसाअडका कुठून येईल. कोनाले उसणा मागतला तरी इतक्या रात्री कोण देईल.अकोल्याचा दवाखाना काय थट्टयाबाजी आहे काय साहेब? लय पैसा लागते. लोकं रस्ता सुरु झाला म्हनतात, तूमी आता घरला जावा. अथी मच्छरं रातभर तूम्हाले झपू नाई देतील. आमी दिवस निघाल्यावर काय कऱ्याचं ते पाहू...!”

“अरे, भल्या मानसा, मीही शेतकऱ्याचं लेकरु आहो ना...! मी फक्त शहरात राह्यंतो. तू मले, तूहा भावासारखा समज..., तुह्या लेकराले अर्जंट उपचाराची गरज आहे. पैशाची कायजी अजीबात नको करु...!”

ते दोघं लेकरु घेवून रात्री अकोल्यात गेले. कार दवाखान्यापुळे उभी झाली. कंपोडरले ईशारा करुन पेशंटला अंदर घ्यायला सांगितले. मी आलोच दोन मीनीटात... ! डॉक्टरच्या

कॅबीन वरची बेल वाजली, कंपोडरनं लेकरु तपास्याले पाठवलं. लेकरु टेबलवर ठेवलं अन पाठमोरे खुर्चीवर बसेल डॉक्टर उठले. त्यांना पाहून काशीरामचा स्वतःच्या डोळ्यावर विश्वास बसत नव्हता. त्याले जरासं गरगरल्यावानी झालं, कारण ते डॉक्टर तेच साहेब होते, ज्यांनी कारमधे यांना अकोल्यात आनले होते.

हवं.. बरोबर वयखलं, मी तोच आहो. तुमच्या आईनं मोठ्या मायेनं, मले दोनघास जेवू घातले. त्यावेळी तूमची मायं माह्या मदतीला धावली. मले त्या माऊलीच्या ऋणातून आता उतराई होवू द्या...! हीच योग्य वेळ आहे. लेकराला भरती केलं, न्यूमोनियाचं निदान झालं होतं. पहाडी वातावरणात बाबा जवळ इतक्या दिवस थांबल्यानं आजार वाढत गेला. जे झालं ते झालं, आता काही दिवस थांबा, लेकराची तब्येत साजरी झाल्यावरच घरी जावा अन हा दवाखाना तुमचाच समजून रावा....!

लेकराची तब्येत काही दिवसांत चांगली झाली. एक रुपयाही बील न घेता, वरतून डॉक्टर साहेबाच्या बायकोनंच पाहूनचार केला, लेकराले नवे कपडे घेतले त्याच्या मायले साडीचोळी केली आणि डॉक्टर साहेबांनी स्वतः घरपोच तिघांना घरी आनून सोडले. हसत्याखेळत्या नाताले पाहून बुढीनं पटापट मुकेच घेतले. समाधान बुढ्याच्या चेहऱ्यावर खूशी मावत नव्हती. त्या राती दवाखान्यात घडलेलं सारं बुढाबुढीले सूनेकडून मालूम झालं होतं.

“ मोठीमायं, मोठे बाबा, त्या लच्यांडी भोंदूबाबाच्या नांदी लागून तूमी सोन्यासारखा नातू हातातून गमावून रहाले होते. समाजात असे नंबरी बाबाच जास्त अंधश्रद्धा पसरवतात अन तूमच्या सारखी साधी माणसं याला बळी पडतात. याच्या पुढे असं नातवाच्या आयुष्याशी खेळू नका. त्या येसवंता मामाच्या सांगन्याहून तूमी दोघाईनं काशीरामले त्याच्या मनाविरुद्ध निरंजन बाबाजवळ जान्यास भाग पाडलं. लेकरु सुधं तं झालच नाही उलट एकुलता एक नातू, दैव बलवत्तर म्हणून बचावला. आता वापीस असं नको करु अन् कोनाले कऱ्याले भागही नको पाडू.... अशानं एकदिवस तू तूहा नातू.... ‘ वंशाचा दिवा ‘ स्वतः च्या हातानं विझवून बसशील बरं....!

**संजय अरबट**
**मो.9922876268**

# भाऊ माझा पाठीराखा



भाऊ माझा  पाठीराखा
दिली  मायेची  सावली
त्याचा  प्रेमळ  स्वभाव
गती  आयुष्याला दिली ||१||

आई  बाबा  गेल्यावर
माझा आधार तो झाला
कष्ट  करून  पोसले
काळजाचा झुला केला ||2||

शिक्षणात  हात  दिला
जीव  वेशिस  टांगला
ऋण  बाबांचे  फेडले
देवापेक्षा  तो  चांगला ||3||

घास ताटातला  दिला
भाऊ  उपाशी  राहिला
त्याचे  निरागस  मन
बांध अश्रूंचा  फुटला ||४||

जेव्हा गेले मी  सासरी
त्याने अन्न त्याग  केला
डोळे पुसले मी  त्याचे
त्याला घास  भरविला ||५||

**मंगेश रेडीज**
**संगमेश्वर**
**८६५५१३९५५६**
**९५९४४११६०८**



# वाङ्‌मय क्रांती



प्रत्येक शतकात
घडावा क्रांतीकारी
विचार ज्ञानीवंत
वाङ्‌मय स्वातंत्र्याचा.
लेखणी यावी धार
निळ्या समुद्राच्या
लाटातून उसळावेत
शब्द,
अनमोल मनातील शिंपले
फुटून प्रज्ञामोतींची माळ
प्रतिभेच्या गळी सजवून
कवितेचा व्हावा जयजयकार
आणि प्रत्येक पिढीस स्मरावा
असा थोर अक्षरदेही
एक मानव, काव्यऋषी.

**श्रीशैल चौगुले**
**मिरज**
**मो.९६७३०१२०९०**

# निर्णय



अशोक आजही बिल्डिंग मधील बागेतल्या शेवटच्या बाकावर एकटाच बसला होता. आता रात्रीचे आठ वाजले होते. वॉचमनने शिट्टी वाजवल्यावर तो भानावर आला. सावकाश उठून घरी गेला. दारात ठेवलेला डबा घेऊन आत गेला. हातपाय धुवून दोन घास कसे तरी खाऊन पलंगावर आडवा झाला. पण झोप मात्र येत नव्हती.

अशोक मोठ्या कंपनीतून, मोठ्या पदावरुन निवृत्त झाला होता. त्याला आता पाच वर्षे झाली होती. पण दोन वर्षांपूर्वी त्याची बायको कॅन्सरने गेली. तेव्हापासून तो एकटा पडला आहे. खरंतर त्याला नैराश्य आल आहे. त्याना दोन मुलं. एक मुलगा, एक मुलगी. दोघेही त्यांच्या लग्नानंतर अमेरिकेत स्थायिक झाले आणि त्यांच्या संसारात ते रमले होते. दोन वर्षातून एकदा जमल्यास चार दिवस ते घेऊन जात. पण अशोकला अमेरिकेत अजीबात करमत नाही म्हणून तो ईकडेच राहत होता.

चार बेडरुमच्या प्रशस्त फ्लॅटमध्ये तो आता एकटाच राहत होता. त्याचा फॅमिली डॉक्टर त्याचा बालपणीचा मित्रच होता. त्याने बऱ्याच वेळा अशोकला समजावले की तू दुसरे लग्न कर तुला तिची सोबत जरुरी आहे. बोलायला, मन मोकळे करायला, आधार द्यायला, ती असणे जरुरीचे आहे. आजही डॉक्टरांनी अशोकला हेच लेक्चर दिले. असे उदास राहून तू लवकर जाशील. त्यापेक्षा आनंदी राहिलात तर तू टिकशील. तुला पार्टनर ची जरुरी आहे. तू मुलांशी बोल. खूप विचार करुन तो एक दिवस मुलाशी बोलला. म्हणाला,

“ अरे सुमती गेल्यापासून खूप एकट वाटतय. एवढ्या मोठ्या घरात घर खायला उठतं. कुणाशी बोलू, कोणाशी भांडू, कुणाबरोबर फिरु, म्हणून मी दुसरे लग्न करावं असं वाटतंय.”

यावर मुलगा प्रचंड भडकला. तो वाटेल तसे बोलला. म्हणाला,

“ बाबा या वयात असली थेर का करताय. समाज काय म्हणेल, आम्हाला तोंड दाखवायला जागा राहणार नाही. भलती थेरं सोडून द्या. तुम्हाला घर आहे, पैसा आहे, आम्ही पण पैसे देतोय, तुमच्या जेवणा खाण्याची व्यवस्था व्यवस्थित केली आहे. तुम्हाला काय कमी आहे. असले विचार करुन नका. पुन्हा या विषयावर फोन पण करु नका.”

असे म्हणून फोन ठेवला. पुन्हा अशोक खिन्न होऊन बसला. खरंच आहे, सगळी सुख आहेत, मोठा फ्लॅट, गाडी, भरपूर पैसे, घरात नोकर चाकर, पण आनंद, सौख्य, समाधान नाही. काय त्याचा उपयोग. मग दुसऱ्या दिवशी त्याने मुलीला फोन केला. पुन्हा तेच. तिने पण हे सारे त्यांना सुनावले. आता मात्र तो पूर्णपणे कोलमडून गेला. घरातच राहू लागला. साऱ्या जगाशी संपर्क तोडला. जेवणही घेत नव्हता. कामवाल्या मावशी सकाळी स्वयंपाक करायच्या पण तो तसाच असायचा. त्यांनीच मग डॉक्टरांना फोन करुन सांगितले. ते लगेच अशोकच्या घरी गेले. त्याच्याशी बोलले. तो खूप अशक्तपण झाला होता. बोलण्यातून त्याला समजले की अशोक पूर्णपणे तुटला आहे. अगदी टोकाचा आत्महत्येचा विचारही त्याने केला होता. डॉक्टरांनी त्याला लगेच हॉस्पिटलमध्ये ऍडमिट केले. दोन दिवसात तो थोडा ठीक झाला.

मग त्यांनी त्यांच्या मानसोपचार तज्ञ डॉक्टरांकडे त्याला घेऊन गेला. त्यांनी त्याच्यावर उपचार केले. त्याला मानसिक आधार दिला. त्याचे समुपदेशन केले. त्या डिप्रेशन मधून हळूहळू त्याला बाहेर काढले. थोडी औषधे पण चालू केली. बऱ्याच वेळा बोलल्यानंतर आता अशोक सावरला. मग डॉक्टर अशोकच्या मुलाशी व मुलीशी फोनवर बोलले. त्यांना सारी परिस्थिती समजून सांगितली. म्हणाले,

“ अरे अशोकचे सुमती वर खूप प्रेम होते. पन्नास वर्ष ते एकमेकांच्या सहवासात होते. पण अशोक पहिल्यापासूनच एकलकोंडा आहे. हे तुम्हाला माहीतच आहे. तो फारसा कोणात मिसळत नाही. सुमती हीच त्याची बायको, मैत्रीण, मित्र होती आणि आता तो एकटा पडला आहे. सगळ्या गोष्टी पैशात मोजून मिळत नाहीत. प्रेम ही वेगळी भावना आहे. गप्पा मारायला, मन मोकळे करायला, हसायला, फिरायला अगदी भांडायला सुद्धा कोणीतरी हक्काचा माणूस असावा लागतो. आणि आता सुमती गेल्यापासून ते अशोकला जास्त जाणवत आहे. तो आता एकटा पडलाय. मनातून तुटलाय. मी त्याला कित्येक वर्षापासून मित्र म्हणून ओळखतो आणि डॉक्टर म्हणूनही त्याला ओळखतो. आता त्याला आधार हवा आहे आणि त्याला जर पार्टनर मिळाला तरच तो पुन्हा उभा राहील. राहिलेली थोडी वर्षे तो आनंदात घालवेल. आता पैसा, मौज मजा याची त्याला जास्त अपेक्षा नाही. फक्त बोलायला, गप्पा मारायला, मन मोकळं करायला, आधार द्यायला एका पार्टनर ची आवश्यकता आहे. खरंतर तो आता जीवनाच्या अंतिम टप्प्यात आहे. तुमच्यासाठी त्याने आजवर खूप सोसल आहे. आता खरंतर तुमची त्याला आवश्यकता आहे. मुलं सुना, नातवंड यात त्याला रमायच आहे. पण तुम्ही तिकडे, त्याने काय करायचं. तुम्ही अमेरिकेला राहता, पुढारलेल्या देशात. तुम्ही पण शिकलेले, पुढारलेले

आहात. तुम्ही तिथल्या समुपदेशकाचा पण सल्ला घ्या आणि मला कळवा. वाट बघतो. अरे खरंतर त्याच्या मनाचा मोठेपणा म्हणून तो तुम्हाला विचारून करतोय नाहीतर त्यांनी परस्पर लग्न केलं तर तुम्ही काहीही करू शकत नाही ही गोष्ट तुम्ही लक्षात घ्या. ठेवतो फोन. “

दोघेही सुन्न झाले. त्यांनी पण खूप विचार केला. अमेरिकेतल्या नामवंत समुपदेशकांचाही सल्ला घेतला आणि मग मुलांनी अशोकला फोन केला. म्हणाले,

“ बाबा आम्ही खूप विचार केला तुमच्या मनाचा. आम्ही इकडे आनंदात आहोत. पण तुम्ही तिथे एकटे आहात. आम्ही फक्त पैसे पुरवतो. पण तुमच्या मनाचा विचार करत नाही. तुम्ही आनंदी राहावे हेच आम्हाला वाटत आहे. आई होती तोपर्यंत काळजी नव्हती. पण आता तुम्ही तुमचा जोडीदार शोधा. तुम्हाला साथ देईल असा. पण विचार करून. तुम्ही आमच्या मनाविरुद्ध वागू शकला असता पण तुम्ही आमचाही विचार केलात. तुम्ही ग्रेट आहात. पण आता तुमच्या आनंदा आड आम्ही येणार नाही. डॉक्टर काकांचे आभार. छान निर्णय घ्या. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. तुम्ही आनंदी राहावे एवढीच आता आमची इच्छा आहे. “

आज अशोकला बरे वाटले. मुलांचे कौतुक वाटले. त्यांनी लगेच डॉक्टरांना फोन केला. डॉक्टरांनी अशोकचे नाव सीनियर विवाह संस्थेत नोंदवले. बरीच स्थळे येऊ लागली. डॉक्टर, त्यांची बायको व अशोक मिळून सर्व स्थळे पाहत होते. शेवटी एक स्थळ तिघांनी पसंत केले. अलका त्यांचे नाव. त्यांचे मिस्टर जाऊन दहा वर्षे झाली होती. त्यांची एकुलती एक मुलगी दिल्लीत स्थायिक झाली होती. तिचीही परवानगी मिळाली. मग डॉक्टरांनी पुढाकार घेतला. अशोक व अलकाला भेटायला सांगितले. बरेच दिवस ते रोज दुपारी एकमेकांना भेटत होते. त्यातून दोघांनीही आपापली मने मोकळी केली. पुढे काही होऊ नये म्हणून हे भेटणे आवश्यक होते. पण या भेटण्याने त्यांची मने मोकळी झाली. एकमेकांचे विचार पटले आणि मग त्यांनी एकत्र राहण्याचा निर्णय घेतला.

मग काय डॉक्टर व त्यांच्या बायकोने सगळी तयारी केली. छोटासा हॉल बुक झाला. खरेदी झाली. अशोकची मुलं अमेरिकेतून व अलकाची मुलगी पण आली आणि एका शुभ मुहूर्तावर मोजक्या लोकांच्या उपस्थितीत त्यांचे लग्न झाले. आता मात्र अशोकचा चेहरा खुल्ला होता. मुलं, सुना, नातवंडात तो रमला. नातवंडांबरोबर खूप गप्पा मारल्या, मस्ती खूप केली. त्यांचे खूप लाड केले. आठ दिवस कसे गेले कळलेच नाही. मग पाहुणे एक दिवस गेले.

आता अशोक व अलका सुखाने राहत आहेत.

“ नांदा सौख्यभरे “

**जयंत गणपतराव कोपर्डेकर**
**पुणे**
**मो. 83172 72112**

# या भारत देशा...



जगात भारी भारत देशा
जागाचा कर्दनकाळ भारत देशा||

पाहा माझी ही भूमी
कशी आहे नवरत्नांची
खाण माझी ही भूमी
भारत देशा कणखर देशा||

कशी आहे पुण्यवान
ही भूमी हा भारत
माझा कसा उभा आहे
सन्मानाने देशास दिशा देई||

कित्येक पावन लोक झाले
ते माझ्या भारत देशात
येथे जन्मले भगतसिंग
आणि अण्णाभाऊ क्रांतिकारी थोर||

यांनी साहित्यातून दुःख
उपेक्षितांचे मांडले
अशी नवरत्नांची ही
भारत भूमी ठरली थोर||

**शुभम येरुणकर**
**चिंचवड, पुणे**
**मो.9890680093**

# प्रजासत्ताक



दिन महान
जणू भाग्योदय
वाटे सुखमय
देशाभिमान

राष्ट्रीय सण
आनंद जनांना
वंदू शहिदांना
लढले रण

आदरांजली
ऋण जोपासता
मनी कृतज्ञता
अंतरातली

तिरंगा मान
सुवर्ण दिवस
श्रेष्ठ नि सरस
ते बलिदान

राज्यघटना
आली अमलात
तिरंगा डौलत
उंच गगना

संविधानास
मान जगतात
होई सुरुवात
नव्या पर्वास

ध्वजारोहण
सुरू राष्ट्रगीत
परंपरा रीत
देशास प्रण

ध्वजवंदन
राजपथावर
दृश्य धरेवर
भाविक मन

सारे चकित
भारी आयोजन
मोठे संचलन
राजधानीत

पूर्वतयारी
सादरीकरण
अपूर्वाई क्षण
ती कलाकारी

ज्योत अमर
राष्ट्रभावनेची
ऐक्य समतेची
धरतीवर



**सौ. स्वाती कोरगावकर**
**कोल्हापूर**
**मो.75885 76547**

# वासनेचा बळी



रावसाहेब तोरणे एका फॅक्टरीत गेली २५,वर्षे कार्यरत आहेत. त्यांच्या सुविद्य पत्नी पार्वती या गृहिणी म्हणून घर सांभाळतात.सुयश,पियुष,ही दोन अपत्ये असं छोटं कुटुंब!पार्वती बाईंनी

चाळीशी पार केलेली, माहेरची परिस्थिती वाईट असल्यानं पार्वतीला शिक्षण १०,वी पर्यंत घेता आलं. रावसाहेब पन्नाशीच्या आसपास..एकिकडे मुलं वयात आलेली सुयशचं वय २५, पियुष २३वर्षाचा, दोघांचं शाळा-कॉलेज झाल्यानंतर थोरला सुयश एका कंपनीत कामाला जायला लागला.आणि पियुषला स्टुडिओ मध्ये फोटो ग्राफीची नोकरी मिळाली.

दोघां भावांना मोबाईल चं तंत्र-मंत्र चांगलंच अवगत होतं. रावसाहेब कामानिमित्ताने सकाळी घर सोडायचे ते १२,तासांची ड्युटी करुन यायचे.

सुयश शांत स्वभावाचा तो आपल्याच कामात व्यस्त. पण,पियुष धरसोड वृत्तीचा, उतावळा स्वभाव!सतत काही वेगळ्या विचारात मग्न असायचा मानसिकतेने खचलेला... पार्वती बाईंचा घरकामात अख्खा दिवस निघुन जायचा त्यांना स्वंयपाकात वेगवेगळे पदार्थ करण्याची खुप आवड नेहमी काही ना काही चांगला पदार्थ जेवणात बनवत.उर्वरित वेळेत सोसायटीतल्या महाजन मॅडमशी त्यांची मैत्री होती. महाजन मॅडम शिकल्या-सवरलेल्या मुलांचा क्लास घ्यायच्या फावल्या वेळेत दोघींच्या गप्पा व्हायच्या. असेच एकदा घरगुती गप्पांच्या ओघात महाजन मॅडम, पार्वतीबाईंना म्हणाल्या "तुम्ही युट्यूब वर नवनवे पदार्थ पहात जा, खुप चांगल्या रेसिपी शिकायला मिळतात.

पार्वती बाईंनी आपल्या द्वितिय चिरंजीव पियुष कडून आठवड्याभरात युट्यूब, फेसबुक,हाटस अप शिकून घेतलं.पण, नियतीच्या मनात काही वेगळंच होतं. मोबाईलच्या युट्यूब वर रेसिपी पहाता पहाता पार्वती बाईंना कुतूहलापोटी सेक्स दृश्यांनी भुरळ घातली.त्या आकर्षणापायी त्यांना आपल्या वयाचा विसर पडला. मनात वेगळ्या भावना जाणवू लागल्या. मधल्या काळात महाजन मॅडम शी संपर्क ही तुटला. कालांतराने घरात कुणी नसताना शेजारचा उमदा पोर नुकतंच १६, वं सुरु झालेलं,

वयात आलेला शेखर शी पार्वतीबाईंनी जवळीक साधली.नव्हे,घरात बोलवू लागल्या.त्याला गोडीगुलाबीने पैसे देऊन नकळत आपल्या जाळ्यात ओढून त्याच्या शरिराशी चाळा करु लागल्या. आपली शारिरीक तहान भागवायच्या शेखरला ही उमलत्या वयात सहज सुख मिळत होतं. कैक महिणे,दिवसा भरदुपारी शांततेत हा खेळ चालू होता. बघता बघता वर्ष सरलं.कुठेही बोलबाला झाला नव्हता.पण, म्हणतात ना सत्य कधी लपतं का...! एकाएकी शेखरची तब्येत बिघडलेली.अशक्तपणा शरीर थकलेलं,लुळपुळ पडलेलं, अंगात ताप, शेखरच्या आई-वडिलांनी स्थानिक डॉक्टरांकडे घेऊन गेले.त्याच्या दोन दिवसांच्या अवधीत ठराविक तपासण्यात केल्या.

डॉक्टरांनी शेखरच्या आई-वडिलांना सांगितले, तुमच्या मुलाचे एका प्रौढ बाईशी संबंध आल्याने क्षयरोग झाला आहे. अंतिम स्टेप असल्याने पुढे औषधांचा सकारात्मक परिणाम झाल्यास तरच वाचू शकेल. शेखरचे आई-वडील चिंताग्रस्त झाले होते. खरंच, आपला मुलगा या वाममार्गाला कसा काय लागला या विचारात असतानाच पुढचे काही महिने लोटले.तो पर्यंत शेखरची प्रकृती खुपच नाजूक झाली होती. तो दिवस उजाडला...

नेहमी प्रमाणे त्याने सकाळी नाश्ता केला.गोळ्या घेतल्या.आईला जवळ घेत म्हणाला,"आई, मला माफ कर माझ्या कर्माची फळं भोगतोय मी चुकलो माझ्या हातून व्यभिचार घडला"आणि बोलता..बोलता शेखरनं आईच्या कुशीत शेवटचा श्वास घेतला.ऐन जवानीत आलेला शेखर नाहक आकर्षणापोटी वासनेचा बळी गेला.

**राहुल भोसले**
**पुणे**
**मो.९८९०४६१८८६**

# तिरंगा



स्वातंत्र्य दिवस
सण आनंदाचा
ध्वज भारताचा
अभिमान

केशरी हिरवा
पांढरा मध्यात
चक्र निळेशार
शोभिवंत

त्याग समर्पण
केशरी प्रतिक
हिरवा ध्योतक
सम्रृध्दीचा

अहिंसा शांतीचा
संदेश पांढरा
निळसर आरा
गतिचक्र

झेंडा घरोघरी
डोलतो अंबरी
अभिमान उरी
तिरंग्याचा

तिरंगा मानाचा
. गौरवाची गाथा
झुकवतो माथा
नम्रतेने

ध्वज वंदनाला
. हुतात्मा स्मरण
चढते स्फुरण
सानथोर

तिरंगा आमुचा
फडकतो नभा
भारताची आभा
जगतात

**उषा जोईल**
**मो.9764886384**

# निसर्गातील ऊर्जा



वैशाख मास
तृतीय शुक्लाची
ऊर्जा मिळण्याची
तिथी ही खास...१

येती एकत्र, ऊर्जेच्या लहरी
ब्रम्हांडात परी, असे सर्वत्र...२

एकमेकीत, होती एकरूप
वेगळे स्वरुप, नच दावीत...३

एका क्षणात, नवीन जोमाने
शक्तीच्या रूपाने, उसळतात...४

ताकदवान, ऊर्जेचा संगम
भासे एकदम, तो गतिमान...५

हा सृष्टीतील, असे चमत्कार
शास्त्राचा आधार, मर्म त्यातील...६

नित्य अक्षय, त्या ऊर्जा लहरी
मिसळती परी, होती न क्षय...७

पुष्टी मिळते, नवीन कार्यास
नि चराचरास, ऊर्जा लाभते...८

रहस्य असे, खगोल शास्त्राचे
आणि निसर्गाचे, शाश्वत जसे...९

वैशाखामधे, चंद्र शीतलता
आणिक शुभ्रता, आकाशामधे...१०

रंग पांढरा, चंद्रातून येई
शुद्धता तो देई, सांगे वापरा...११

अजरामर, असा चमत्कार
स्पर्श हळुवार, तो मनावर...१२

**सुनिता वैद्य**
**कोथरूड, पुणे**
**मो.98226 56514**

# भीक नको पण...



एक दिवस सकाळचा चहा पिऊन आं म्ही सगळे कुटुंबीय डायनींग टेबलवर च बसलो होतो. तेवढ्यात दारावरची कॉल बेल वाजली. मीच दार उघडल बघते तर दारात कॉलेजचा एक मित्र उभा. त्याने विचारल सुप्रिया ताईइथेच राहतात का?म्हटलं काय रे माझी फिरकी घेतो आहेस ? मीच तर आहे, आश्चर्याने तो ओरडला केवढी वाढली आहेस, खरंच ओळखलं नाही.आल्याआल्या त्याने माझ्या दुखऱ्या जखमेची खपली काढली मग चहा पिता पिता मीकशी वाढली आणि मी त्या साठी काय काय प्रयत्न केले, कसा झाडू पोछा, कडक डायटिंग, संयुक्त कुटुंबात बॅडमिंटन व हॉकीची स्टिक जाऊन झारे लाटणेत 24 तास बुडून गेले,वगैरे पण मी पुन्हा निर्धार केला काहीतरी करीन, मग सर्वानुमते ठरले की पुन्हा मॉर्निंगवॉक सुरु करणे, लगेच तयारी सुरु झाली, मुलगा म्हणाला आई साडी नेसून जाऊ नको सोयीच नाही मुलगी म्हटली चपलांनी जाऊ नको, बापरे येवढा खर्च फक्त सकाळी फिरायला? मध्यमवर्गीय मानसिकता पण पाया साठी शूजच कसे चांगले हे पटवून दिलच नाही तर मुलांनी तयारी पण करुन दिली.

ठरल तर उद्या पासून जायचं मात्र सोबत कोणी नेणार नव्हते, हे म्हणाले नेलं असत पण आपल्या स्पीड मध्ये फरक पडेल म्हणून खरं होत, मी पहाटे 5चा आलर्म लावला. सकाळी तो वाजला तेंव्हा मात्र रजईच्या उबेतून बाहेर येण जीवावर आल होत साखर झोप आता सोडावी लागणार होती.

मात्र उठले व तयार होऊन बाहेर पडले प्रॉपर ड्रेस मुळे असेल पायांना आपोआप गती मिळाली होती छान वाटत होत जुना काळ आठवत मी खाली आले. आमचं फ्लॅट चा चौ कीदार बघत राहिला म्हटलं आता मी रोज जाणार दरवाजा खोल ke रखना,

गेट उघडून बाहेर पडले थोडया दूर एक कुत्र अंगाच वेटोळं करुन बारक्या डोळ्यांने मला बघत होत. मी घाबरले पण तस न दर्शवता मी मागे बघत बघत चालू लागले, तेवढ्यात कुत्र्याचा एक कळप भो भो करत धावत आला, दोन टोळ्या होत्या बहुदा, दुसरी कुत्री आपली गल्ली सोडून इकडे आली असावीत, अपनी गली में कुत्ता शेर तसच काहीतरी प्रकरण असावं बहुदा, भांडता भांडता मात्र ते माझ्या पायावर आपटले, आता मात्र माझं अवसान गळाल.

मी डोळे गच्च मिटून घेतले देवाचा धावा करु लागले मात्र कसे काय ते आले तसे पळापळी करत निघून गेले. मी मागे पुढं चालत घाबरले नाही दाखवत चालत होते आणि अचानक पाय एका घाणीवर पडला ते बघण्याची हिंमत नव्हती मात्र जोडयांच्या आतही तो घाणेरडा स्पर्श मला जाणवला, बापरे हातात कुठलंही शस्त्र न घेता कोणी सोबत नाही, केवढी मोठी ही चूकल ठरवलं जवळ बाल मैत्रण रहाते तिला उद्यापासून सोबत घ्याव, विचार करत मी तिच्या गेटशी पिहोचली आणि काय दुर्देव मी गेट उघडल 4पांढरी पामोलियन ओरडत धावत गेट कडे आली आता मात्र मी हरले फोन वर सांगीन म्हणत मी आल्या पावली पळ काढला.

ती म्हणत होती प्रिया अगती छोटी बाळ आहेत काही करत नाहीत ये ना घरात चहा घेऊ सोबत म्हंटल नको रे बाबा भीक नको पण कुत्र आवर,

घडलेल्या घटनेचा मी विचार करु लागले, सकाळी फिरणारे त्रस्त, कामवाले, शाळकरी मुलं कोणी या त्रासातून सुटलं नाही कधी आपण यावर उपाय शोधणार?दरवर्षी अनेक मुलं कुत्री चावल्याने मृत्यूमुखी पडतात,मेनकाबाई प्राण्यांना वाचवा हो तो मनुष्य धर्म आहे पण माणसां नाही वाचवा, घटने मुळे हरणार ती मी नव्हे, मी ठरवलं छोटीशी काठी जवळ ठेवायची पण आता फिरण बंद करणे नाही उलट या समस्ये वर उपाय शोधायचा,, जन जगृती करायची, मग येणार ना सोबत?

**सौ. विद्या शैलेंद्र गोवर्धन**
**बिलासपूर छ. ग,**
**मो.90392 16550**

# ॥ मन मुसाफर॥



मन चंचल चंचल
वेगवंत पवन।
मन निश्चल निश्चल
अमूर्त अदृश्य।

मन भ्रमर भ्रमर,
तया रंग गंधाचे आकर्षण।
करी फुलाभोवती गुंजारव,
होवोनिया मोहित।

मन पाखरू पाखरू,
झेप घेई आकाशी।
घाली घिरट्या निरंतर,
नीज समाधानासाठी।

मन सागर सागर,
खळखळणारी लहर।
तया भरती-ओहटीचा शाप,
अस्थिरतेचे प्रतीक।

मन मनाचे भाव,
न लगे कुणा ठाव।
मन:पूत समाचरेत,
मन मुसाफर।

रघुनाथ मोहिते
अंधेरी(प) मुंबई
मो.९८२००८९६०७

# आम्ही नसतो तर...!



ब्याच दिवसांनी पुस्तकांच्या
खोलीत शिरलो
काही क्षण पुस्तकांकडे मी
आणि पुस्तके माझ्याकडे
बघत राहिली !
आणि म्हणाली..?

"आम्ही नसतो तर ?"

क्षणिक माझं डोकं
शून्य झालं,
नि मी पुस्तकांना आणि
पुस्तकांनी मला
कवटाळून छातीशी धरलं...

राकेश खलासने
कुंभापूर
मो.९६२३३४२४९२

# खाकी वर्दीतला निसर्गप्रेमी



नागपूर संत्रा नगरीत राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ०४ नागपूर या ठीकाणी पोलीस नाईक पदावर कार्यरत असलेले पोलीस अंमलदार सुमित राठोड यांनी कर्तव्य करुन आपली एक वेगळीच ओळख निर्माण केली आहे वृक्षप्रेमी पक्षीप्रेमी कविवर्य म्हणुन सुमित राठोड यांची औळख आहे सुमित हे सन २०१२ ला राज्य राखीव पोलीस बल गट क्र ४ नागपूर ला भरती झाले सुमित राठोड यांनी मागील सहा वर्षापासुन म्हणजे सन २०१८ पासुन एक अनोखा उपक्रम व छंद जोपासत आहे.

सुमित राठोड यांनी शुभेच्छारुपी एक वृक्षारोपण हा उपक्रम चालू केला असुन या उपक्रमात नातेवाईक मित्र मडंळी गावात लहान बाळाचे जन्म,जन्म वादढिवस,१० वी च्या वरील सर्व परिक्षा उर्तीर्ण,नोकरी निवड,नोकरी पदोन्नती,राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिन विशेष, थोर पुरुष राष्ट्र पुरुष,क्रांतीकारी समाजसुधारक यांच्या जयंती व पुण्यतीथि निमीत्त व सन उत्सव ला सुमित राठोड या दिनी वृक्ष लागवड करतात किंवा वृक्ष भेट देतात यात खास करुन ते देशी वृक्ष व फळाचे वृक्ष जास्त प्रमाणात प्राणवायु देणारे वृक्षाची निवड करतात वड पिंपळ कडनिंब उंबर अशोका अर्जुन आंबा फणस आवळा जांबुळ सिताफळ रामफळ अश्या विविध या साठी उन्हाळात ते स्वःता विविध वृक्षाचे बीज संकलन करतात व त्यापासुन स्वःता रोपे तयार करतात जेने करुन पशु पक्षी मणुष्य सह निसर्ग संवर्धानाला हातभार लागेल सुमित राठोड यांनी स्वःताची एक मिनी नसर्री तयार केली आहे.

यात आंबा फणस जांब जांबुळ करंजी लिंबु सागवान चिंच रिठा पळस आपटा सिताफळ रामफळ शेवगा हादगा कडुनींब पिंपळ उंबर बकुळ अश्या अनेक झाड त्यांनी तयार केली आहे या शिवाय सुमित यांनी एक बीज बँक सुद्धा तयार केली आहेत यात १०० पेक्षा जास्त प्रकारच्या विविध वृक्षाच्या बिया आहेत जे स्वःता सुमित राठोड यांनी संकलन केल्या आहेत.

सुमित हे टाकाऊ वस्तु पासुन पक्षी करिता कृत्रिम घर व अन्न पाणपोई तयार करतात व ठीक ठीकाणी बसवतात जसे शाळा मंदीर गर्द सावलीचे वृक्ष शिवाय पक्ष्याचं ज्याठीकाणी जास्त वास्तव असतात ऐवढेच नाही तर जन जागृती करिता सुमित दर वर्षी १०० लोकानां ते कृत्रिम घर व अन्नपाणोई स्वःता तयार करुन भेट देतात सुमित राठोड आपल्या कर्तव्यातुन वेळ काढुन दर रविवारी मुलानां वृक्ष, पक्षी, पाणी, प्लाँस्टिक, प्रदुषण,बीज संकलन, सिड्सबॉल या विविध विषयावर मोफत प्रशिक्षण देतात आणी दर तीन -चार महीण्यात ते या सर्व मुलाची लेखी परिक्षा घेतात जेने करुन त्यांनी कीती माहीती ग्रहण केली समजेल व त्यांचे मनोबल वाढवण्या करिता त्यांना बक्षीस व शाळेय साहीत्य भेट देतात सुमित राठोड हे एक कवि सुद्धा आहेत त्यांनी आजवर मराठीत विविध विषयावर ८६ कविता लिहल्या असुन लिखान अजून चालू आहे यातील बराच कविता त्यांच्या बुक प्रकाशन सुद्धा झाल्या आहेत सुमित राठोड यांची हिंदीत लिहलेली एकमेव( वीर शहीद जवान ) कविता लिहली आहे आणि ती कविता उत्तरप्रदेश अयोध्या येथील स्वदेश भारत संस्थान स्मरिका २०२१ -२२ला प्रकाशित सुद्धा झाली आहे सुमित राठोड यांनी आजवर राखीव पोलीस बलात आपले खंडतर कर्तव्य करीता त्यांना महाराष्ट्र शासन गृह विभाग कडुन तीन पदक सुद्धा मिळाले आहेत १) विशेष सेवा पदक -२०२१

२) स्वतंत्रता अमृत पदक-२०२२

३) आंतरिक सुरक्षा पदक -२०२३ असे तीन पदक सुमित राठोड यांना मिळाले आहेत पर्यावरण सेवा पक्षी सेवा बीज संकलन काव्य लिखान मुलानां प्रशिक्षण या विविध कार्याची दखल घेत त्यांना आजवर राज्यस्तरीय,राष्ट्रीय असे बरेच पुरस्कार,अवार्ड देउन त्यांचा सन्मान सुद्धा झाले आहेत खाकीतल्या अश्या अनोख्या पोलीस अंमलदार सुमित राठोड यांचे कार्याचा आदर्श आजच्या युवानी घेतला पाहीजे ज्यांनी आपले कर्तव्य करुन केलेले कार्य खरोखर अतुलनिय आहे वेळेचा नियोजन कसे करावे त्यांच्या कडुन शिकण्या साखरे आहेत ना कुठलही सन ना कुठलेही उत्सव तरी पण कर्तव्यातुन वेळात वेळ काढुन सुमित राठोड यांनी जी निसर्ग सेवा केली याचा खरोखर निसर्गला खुप मोठा फायदा होणार आहे आजवर सुमित राठोड यांनी चार -पाच हजार वृक्षाची लागवड व भेट केली आहेत यात खास करुन फळाचे वृक्ष व जास्त प्रमाणात प्राणवायु देणारे वृक्ष आहेत अश्या कर्तव्य दक्ष पोलीस अंमलदार निसर्गप्रेमी कविवर्य पोलीस अंमलदार सुमित राठोड यांच्या कार्याला खुप खुप शुभेच्छा देतो

**सुमित आर राठोड**
**महाराष्ट्र पोलीस नागपूर**
**मो.9158138889**

# गृहिणी..



अग्रस्थानी शोभिवंत
सर्वत्रलकाके दामिनी
संकट येत विद्युलता
नभीगरजे सौदामिनी

सकल कामना पुरवी
साथ देई ती कामिनी
जोडीदारां सुखप्रदान
समर्पित मधु यामिनी

संसार गाडा चालता
भार सावरी स्वामिनी
धिरोदात्त धन लक्ष्मी
जणू ती गजगामिनी

स्नेहाचा वर्षाव करते
कोमल सुहृद नलिनी
अन्याय होता कुठला
जागृत असूर मर्दिनी

सुख दुःखात साथ दे
सु योग्य सह चारिणी
बिचारी अबला नाही
बनते विचारी धोरणी

सहयोग समग्रक्षेत्रात
जीवन हो सत्कारणी
संसार फुले फुलवते
जशी दिव्य पुष्करणी

आईचावात्सल्य पदर
कोंब रुजविते धरणी
छत्र चामर तीचं सार्थ
भविष्य घडवे स्मरणी

आई बाप सासू श्वसूर
घरास बनवते गृहिणी
माहेरा आणि सासरा
हळूवार साधे जोडणी

**हेमंत मुसरीफ**
**पुणे**
**मो.9730306996**

# एक घर



ओल्या भिंती किती करतात कल्लोळ ?
माणसं मात्र एकमेकांशी अबोल!

म्हणूनच..
प्रत्येकाला हवं असतं
एक घर संवाद जपणारं
ओघळणा-या आसवांना
थोपवून ठेवणारं
नात्याची वीण घट्ट करुन
मनाचा ओलावा जपणारं,
पाखरांना परतीची ओढ
लावणारं,
दुरावा सांधण्यासाठी,
रुसवा काढण्यासाठी,
दूर जाणाऱ्या पावलांना
माघारी बोलवणारं..
प्रत्येकाला हवं असतं एक घर
संवाद जपणारं...

**मितवा श्रीवास्तव अग्रवाल**
**करमाळा**
**मो.७३९७७९९१३५६**

# सावलीतलं रोप



पालवीला जाऊन आज पूर्ण दोन महिने झाले होते. घरात भयान शांतता नांदत होती. बंद खोलीतले उसासे अन् श्वास तेवढे उरले होते. भिंतीला टेकून प्रिया शून्यात कुठंतरी हरवली होती.

पालवीच्या आठवणी तिला स्वस्थ झोपू देत नव्हत्या म्हणण्यापेक्षा जगूच देत नव्हत्या. जगायचं म्हणून ती जगत होती. न तिचं खाण्यात लक्ष न घराकडं न प्रकाश कडं.

अशी कशी पालवी आम्हाला सोडून जाऊ शकते? हा प्रश्न काळजाच्या ठोक्या गणिक तिच्या मनात येत होता. आताही ती त्याच प्रश्नात गुंतून राहिली होती डोळ्यातून वाहणाऱ्या धारांचा वेग अजूनही थांबलेला नव्हता.

"प्रिया जेवून घे" -प्रकाश म्हणाला

प्रकाश आता जेवणा पेक्षा मला महत्त्वाचं हे वाटतं की पालवीनं हे असं पाऊल उचलण्याआधी काय विचार केला असेल? तिच्या भावनांना तिनं का दाबून ठेवलं?

का मोकळी झाली नाही ती? एरव्ही किती सैल मनानं वागायची घरात.एक आई म्हणून थोडीशी ही शंका कशी आली नाही मला?

प्रकाश एक विचारू खरं खरं सांगशील? आपणच तिचं जाण्याचं कारण तर नाही आहोत ना?

ती त्या अमेय बरोबर पळून जाऊ शकते. छेऽऽपटतच नाही मनाला.

ती पुन्हा रडू लागली. खूप रडली. थोड्यावेळासाठी का होईना ती मोकळी झाली.

दिवसा मागून दिवसाचा आणि भयानक अशा जीवघेण्या रात्रीचा सामना प्रिया तर करतच होती. नाही म्हणायला प्रकाश तेवढा आपल्याच धुंदीत जगत होता.

ती त्याची नेहमीची सवय आज तिला नकोशी वाटत होती.

ऑफिस सुटल्यानंतर तिनं कारचा दरवाजा उघडला. आत बसली. एकवार तीनं आरशात पाहिलं डोळ्याखालील काळी वर्तुळ आणखीन जोमानं वाढत होती.

पण आपण कुठं कमी पडलो तिला कळत नव्हतं. विचाराची ब्रह्मानंदी टाळी लागली होती.

तेवढ्यात घाटे धावतच आला. "प्रिया मॅम, आज घरी याल का माझ्या? मी तुमच्या ऑफिसचा शिपाई जरी असलो तरी मी अमेयचा बाप आहे आणि पालवीचा सासरा. मला समजून घ्या मला माफ करा. या दोघा पोरांनी अशी पावलं उचलायला नको होती. मी तुमच्या बरोबरीचा कुठंच नाही, पण आता जे झालं ते स्वीकारणं गरजेचं आहे. का झालं? याची उत्तर शोधून सापडतील की नाही माहित नाही., पण मॅडम पालवीला आशीर्वाद द्यायला घरी या.

आज दोन महिने झाले तुम्ही मायलेकी भेटला नाहीत." हात जोडत घाटे प्रियाला घरी यायची विनंती करत होता.

रस्त्यावर भरधाव वेगात गाडी तर पळतच होती,पण प्रियाचे विचार ही ताशी हजारोंच्या स्पीड नं धावत होते. आपण घाटेच्या घरी जायला हवे होते का? पालवीला भेटता आले असते. का अशी वागलीस ?म्हणून विचारता आले असते. पण घाटे सारख्या शिपायाच्या घरी आपण जायचं. हे तिला पटतच नव्हतं.

मनात असंख्य वादळी थैमानानं प्रवेश केला होता. मेंदूचा पार भुगा, चुराडा झाला होता. पै पाहुणे, मित्रमंडळी एकेक करून भेटून सांत्वन करून निघून गेली,पण हे फारसं कुणाला पटलेलं नव्हतं.

कार पार्किंग मध्ये लावून फाईल्स,पर्स,गॉगल घेत ती गेटकडे वळाली.'पालवी' या आलिशान बंगल्याकडं तिनं एक वार नजर टाकली डोळ्यातून टचकन आलेली आसवं तीनं सावरली.

सगळ्या फाइल्स तिनं टेबलवर भिरकावून दिल्या. जणू तिला या साऱ्या गोष्टीचा आता उब आला होता. या साऱ्या गोष्टी आज तीला नकोशा वाटत होत्या.आपण कुठं चुकलो ही अपराधी भावना तिला सतत बोचत होती.

काळ्याकुट्ट अंधाऱ्या रात्रीत एक काजवा चमकवा तसं तिच्या मनात अचानक आलं की आज आपण पालवीची मैत्रीण आभाला घरी बोलावून विचारूया का? की नेमकं हे पळून जाण्याचं पाऊल तिनं का उचललं ?काहीतरी धागेदोरे हाती नक्कीच लागतील म्हणून तिनंआभाला घरी बोलवायचं ठरवलं.

रात्र आपल्याच धुंदीत पुढं पुढं सरकत होती. घड्याळाची टिकटिक तेवढी कानावर पडत होती. खरंतर आपल्या अवतीभवती जेव्हा माणसं असतात तेव्हा आपल्याला त्यांची किंमत कळत नसते जेव्हा ती नसतात तेव्हा मात्र घर खायला उठतं.असंच काहीसं प्रियाच्या बाबतीत झालं होतं. पालवी घरातून निघून गेल्यापासून तिच्यातला अस्वस्थेपणा खूपच वाढला होता.आज तिनं आभाला घरी बोलावलं होतं.आभा आली की तिला सारं कळणार होतं की पालवीनं हे पाऊल का उचललं ते.

भराभर सारं आवरून ती आभाची वाट पाहत बसली. गेटचा आवाज झाला तशी ती ताडकन उठली. खिडकीतून डोकावत तीनं पाहिलं 'आभा आलीस का? म्हणत तिनं दार उघडलं. आभा बैस! मी पाणी आणते काहीतरी आपण आधी खाऊन घेऊ मग गप्पा मारू.'

'काकू आपण बागेतल्या झोक्यावर बसून गप्पा मारूयात का? माझं ते झोक्याचं आकर्षण आजही

टिकून आहे.’

‘हो चालेल की! म्हणत प्रिया पुढे म्हणाली इथं सगळं इतकं छान ऐश्वर्य, संपन्नता असताना ती त्या कर्मदरिद्री घाटेंच्या घरात गेली.

आभा सांगशील का मला ती अशी का वागली? पालवीच्या काळजात चाललेली उलथा पालथ, ती स्थित्यंतरे मी परतावून लावली असती आभा;पण मला ती कधी जाणवलीच नाही गं!’

“एक्झॅक्टली काकू मलाही हेच म्हणायचंय तुम्हाला तिच्यातला बदल जाणवायला पाहिजे होता. पण काकू एक सांगू तुम्हाला तो जाणवला नाही. कारण.. कारण तुमच्यातला संवाद हरवला होता. तुमच्यातली जवळील दुरावली होती. खरं तर संवादानं माणूस आणि नाती जोडली जातात घट्ट बिलगली जातात.पण तुमच्यात संवादच होत नव्हता.कारण कधीतरी आम्ही बुक कॅफेमध्ये भेटायचो तेव्हा ती पुस्तक वाचताना पानं चाळताना माझ्याशी बोलायची की मम्मी पप्पा दोघेही कामात इतकी व्यस्त असतात की मला कधीतरी काहीतरी बोलायचं असलं तरी मंमी म्हणते की,पालवी बेटा आपण उद्या नक्की या विषयावर बोलू.आज खूप काम पडलं आहे. मनावर खूप ताण आहे.

काकू, तुम्ही तुमचा ताण तिला सांगितला पण तिचा ताण दोन शब्दांच्या त्या संवादानं निवला असता. पण काकू आता तीही वेळ निघून गेली आहे. संवाद एक माध्यम असतं काकू, एक मुक्त असं आभाळ असतं भावनांना आणि विचारांना खुलं करण्याचं पण ते वेळेत नाही झालं तर मग त्या भावना तशाच दाबून ठेवल्या जातात.

आणि काकू अजून एक गोष्ट स्वच्छ आणि स्पष्ट सांगते की घाटे काका तुमच्या ऑफिसमधले शिपाई जरी असले तरी अमेय घाटेने स्पर्धा परीक्षा दिली आहे. आणि त्याचा आता रिझल्ट येणे बाकी आहे. काकू मी खूप बोलते आहे ना! माझ्या बोलण्याचा त्रास तर तुम्हाला होत नाही ना?”

“नाही गं राणी!आणि बोल तू तुझ्या तोंडून जणू पालवी बोलते आहे असे वाटते आहे. पालवीला आम्ही समजून घ्यायला हवं होतं प्रकाश आणि मी आम्ही दोघंही काम आणि पैशाला इतकं महत्त्व देत गेलो की पालवीच्या कोवळ्या मनाचा विचारही आम्ही नाही केला. काम आणि पैशाचं रिंगण घालून तो परीघ आम्ही विस्तारत गेलो.

त्या परीघा बाहेर दूरवर एक बिंदू उभा आहे एकटाच. प्रचंड उलथापालथ काळजात साठवून ठेवलेला.हे आमच्या लक्षातच नाही आलं गं कधी!

तुझं म्हणणं अगदीच चुकीचं नाही आभा. संवाद हा दोघांच्या मधला सांधणारा एक दुवा आहे. बोलल्या शिवाय मनात काय चाललंय ते कसं कळणार?

हितगुज, संवाद,बोलणं या गोष्टी माझ्याच नाही तर अनेक कुटुंबात आज होत नाहीत ही शोकांतिका आहे. आणि याच कारणामुळं घरातली पाखरं आपल्यासमोरुन उडून दूर जातात आणि मग मात्र त्या धायमोकलून पश्चातापाचं रडण्याला ही मग फारसा अर्थ उरत नाही.

आभा तुला एक सांगु का? खरं तर तू काय किंवा पालवी काय तुम्ही दोघीही खूप छोट्या आहात माझ्यासमोर. एका पिढीचं अंतर आहे आपल्यात ;पण दोन पिढ्यांमधलं अंतर कापायचं असेल नं तर खरंच संवाद आणि भावभावनाचं दमन व्हायला हवं आणि नेमकं हेच या वास्तूत झालं नाही.

एक मला आठवतंय की ती खूपदा घाटे बरोबर भाजीला जायची.त्यांच्या घरी जायची पण ती एके दिवशी त्यांचीच होईल हे स्वप्नातही मी पहिलं नव्हतं. आभा पालवीला जाऊन आज दोन महिने उलटून गेले जीव कासावीस होतोय माझा.

परवा घाटे भेटले ऑफिसमध्ये म्हणाले या घरी पालवीला भेटायला पण मला नको वाटतं त्यांच्या घरी जाणं; पण पालवीला पण भेटू वाटतंय,तू भेटलीस का तिला एवढ्यात?”

प्रियाचं बोलणं आभा मन लावून ऐकत होती.

म्हणाली,”काकू मी म्हणाले ना की आम्ही सगळीच मित्र मंडळी बुक कॅफेमध्ये रोज भेटतोय म्हणून!”

आभा पुढं काही बोलणार तेवढ्यात झोका थांबवत प्रिया म्हणाली “चल!आत जाऊया का कैरीचं खास पन्हं केलं आहे तुझ्यासाठी”

‘अरे वा! झकास!! माझं आवडतं पेय’-आभा

‘आभा घे हवं तेवढं!’-प्रिया

‘हो काकू! हे काय विचारणं झालं का?-आभा

सुर्रर्र करत एक छानसा घुटका मारत ती म्हणाली,’काकू तुम्हाला भेटायचं का पालवीला? तर इथंच घरी बोलवून घ्या की. मीही येईल आणि काकू भेटायचं म्हणजे नुसती मेजवानी नाही तर जोडीला बोलणं व्हायला हवं. कामाचा ताण थोडा कमी करुन तुम्हीही दोघेजण जावा की कुठंतरी बाहेर. काका पण जास्त बोलत नाहीत आणि तुम्ही दोघं काय बोलता घरात मला जाणून घ्यायला नक्की आवडेल! आणि काकू गंमत पण वाटते की तुम्ही कसंकाय बुवा न बोलता राहू शकता?’

तिचं वाक्य तोडत प्रिया म्हणाली,”अगं बाई! प्रकाश तर माझ्या पेक्षा एकदम ढम्म.माझा चार्जर कुठंय? माझं पासबुक पाहिलं का? या व्यतिरिक्त तो घरात काहीच बोलत नाही.संवादच नाही. कामाचा ही ताण आहेच म्हणा.मला ही इतकी ती सवय झाली की मी ही आता खूप कमी बोलते’.

‘काकू अजून थोडं बोलू मी! घरातल्या चार भिंतीत संवाद नसेल, संवादाचा ओलावा नसेल तर मनावर काळजावर नकळतपणे चरे पडू लागतात तसेच नात्याच्या भिंती हळूहळू ढासळू लागतात.

खरंतर संवादाच्या माध्यमातून मनातील भावनांना मोकळं व्हायला वाट मिळते. विचारांना प्रेरणा मिळते.

हे चूक, हे बरोबर हे चर्चेतून ठरतं आणि आत्मविश्वास ही प्रचंड दुणावतो आणि म्हणून ज्या घरात नाते संवादावरती टिकून आहेत त्यांच्यात ओढ असते त्यांचीच व्यक्तीमत्व अगदी दर्जेदार उठवदार बनलेली दिसतात. यात शंका ती कसली?

पालवी घाटेच्या घरात गेली म्हणजे एका शिपायाच्या घरात गेली तुम्ही वरवर एवढंच पाहत आहात काकू. अहो त्या घरात बघा किती भरभरून बोललं जातं ते. सगळे सणवार प्रचंड उत्साहानं ते साजरे करतात.आजही ते संध्याकाळी सगळी मिळून एकत्र जेवतात. एवढी श्रीमंती तर त्यांच्या कुटुंबात आहेच. यापेक्षा श्रीमंतीची दुसरी व्याख्या आणखीन काय असू शकेल?

पुन्हा भेटायचं आश्वासन देत आभा निघून गेली. मोकळ्या हलणाऱ्या झोक्याकडं पाहत प्रिया घरात आली. आभाशी बोलून ती आज मोकळी तर झाली होती पण आपण किती चुकलो याची सल तिच्या मनात राहून- राहून येत होती.

ऑफिसमध्ये प्रियाची नजर घाटे बसतात त्या जागेकडं वारंवार जात होती कारण आज घाटे त्या जागेवर दिसत नव्हते. कुठं गेले असतील बरं! अजून कसे आले नाहीत घाटे? घरी काय झाले का त्यांच्या? पालवी बरी असेल ना! अशा कितीतरी प्रश्नांचं काहूर तिच्या मनात माजलं होतं. तिची अस्वस्थता प्रचंड वाढली होती. घसा कोरडा पडला पाणी पिण्यासाठी तिनं बाटली तोंडाला लावली पुन्हा ती बाटली तिनं बंद करून ठेवली आणि टेबल बेल वाजवली.

"एस मॅम म्हणत घाटे पळतच प्रियाच्या केबिनमध्ये पोहोचले.

तीनं घाटेला विचारलं कुठं होता इतक्या वेळ?'

'मॅम काही हवंय का'?- घाटे

'पाणी हवंय'-प्रिया

थंड पाण्याचा ग्लास भरत त्यानं ग्लास प्रिया पुढं केला.

पाणी पिऊन तीनं ग्लास खाली ठेवला. तिरक्या नजरेनं ती घाटे कडं पाहत होती. घाटे तिथंच उभे होते त्यांना काहीतरी बोलायचे आहे हे तिच्या लक्षात आले, पण सुरुवात कोणी करायची? अशी स्थिती उद्भवली होती.तिथली ती शांतता मात्र कमालीची अस्वस्थ करून टाकत होती.

तेवढ्यात फरीन मागून येऊन घाटेला म्हणाली,"घाटे अभिनंदन हो! चला पेढे द्या!"

प्रियाच्या मनात पुन्हा चलबिचल सुरु झाली. ही फरीन घाटेला कशाचे पेढे मागते?कशासाठी अभिनंदन करते आहे.?

आपणच होऊन विचारायचं का? असे विचार तिच्या मनात येत असताना तिची ज्युनिअर असिस्टंट फरीन पुन्हा पुढं म्हणालीच,'मॅम खरच तुमचंही अभिनंदन बरं!

तुमचा जावई- जीभ चावत तीनं तो शब्द फिरवला. म्हणाली म्हणजे घाटेंचा मुलगा अमेय स्पर्धा परीक्षेत अव्वल नंबरनं पास झालाय.मगापासून घाटेवर अभिनंदनाचा वर्षाव होतोय तुम्हाला माहीत नव्हतं का मॅम?' म्हणत तिनं एक कटाक्ष प्रियाकडं टाकला तेवढ्यात घाटे म्हणाले,' मी तेच तर सांगायला आलो होतो ;पण कसं सांगू? कळत नव्हतं म्हणून मी शांत उभा होतो.'

घाटे पुन्हा बोलले,' प्रिया मॅम हे घ्या पेढे माझा अमेय पास झालाय माझ्या सुनेचा पायगुण खरंच भारी आहे हो!' म्हणत त्यांनी पेढ्याचा बॉक्स टेबलवर ठेवला. व ते चालू लागले.

घाटेना थांबवत प्रिया म्हणाली "घाटे अभिनंदन तुमचे आणि अमेयचे ही आणि घाटे पायगुण वगैरे काही नसतं तुमच्या मुलांनं किती कष्ट घेतलेत ते पहा.कारण मेहनतीचं हे फळ आहे.मनापासून तुम्हा परिवाराचं पुन्हा- पुन्हा अभिनंदन."

कधी एकदाची ही अमेयची बातमी प्रकाशला सांगते असं तिला झालं होतं पालवीनं अशी चूक केली हे जरी कोणाला पटत नसलं तरी आज अमेयनं स्पर्धा परीक्षेत यश मिळवलं हे काय कमी आहे? इतक्या दिवसाचा खराब झालेला मूड आज तिचा तिलाच छान वाटू लागला होता. या क्षणी आपण खरंच पालवी सोबत असायला हवं तिच्यासोबत आपणही सुखमय व्हावं असं तिला वाटू लागलं; पण कुठंतरी आपण कमीपणा घेऊ नये असंही तीला वाटत होतं. मनात असे विचार चालू असतानाच प्रकाशला ती म्हणाली,' प्रकाश एक बातमी सांगायची आहे बोलू का?"

'हा बोल'-प्रकाश

'घाटेच्या अमेयनं स्पर्धा परीक्षेत यश मिळवलय. आज घाटे पेढे घेऊन ऑफिसमध्ये आले होते.'-प्रिया

"अरे वा छान झालं की चल ताट वाढ मला जाम भूक लागली आहे."-प्रकाश

जेवताना शांततेचा भंग करत प्रिया म्हणाली "प्रकाश आपल्या घरात कुठल्याच विषयावर संवाद होत नाही. कधी कुठली चर्चा नाही म्हणून आजची हीआपली पिढी वाया जाताना दिसते आहे. ज्या त्या वळणावर त्या त्या वेळी आपण बोलायला पाहिजे होतं. वाढत्या वयात मुलांच्या मनातले काय प्रश्न आहेत त्यांच्या काय गरजा आहेत? याची चर्चा व्हायला हवी होती प्रकाश.

तू तुझ्या कामांना नको तितकं महत्व देत गेलास आणि मी ही वाजवीपेक्षा पैशांला, कामाला केंद्रबिंदू मानून पालवी पासून दूर होत गेले. खरंतर पालवीची निवड चुकली असच मला आज पर्यंत वाटत होतं. आज अमेय परीक्षा पास झाला नसता तर आपण तिच्या माती खापर फोडून मोकळे झालो असतो की तुझी निवड चुकली म्हणून.

पण खरं सांगू शिपायाच्या मुलांनं ही परीक्षा पास होणं हे माझं मन मान्यच करत नाही अजूनही.

पण खरच त्या कुटुंबाचं आपण कौतुक करायला हवं प्रकाश! आज आपल्यासारखी उच्चशिक्षित म्हणवून घेणारी पालक मंडळीच मुलांच्या भावनांचा विचार करत नाहीत.त्यांच्याशी मनमोकळेपणानं बोलत नाहीत. महागड्या वस्तू भेट दिल्या की आपल्याला वाटतं की

आपण जगातले खूप महान आई बाबा आहोत आणि दुसरीकडं घाटे सारखी छोटी, गरीब कुटुंबं आहेत की जी मुलांच्या भावना जपून त्यांच्या मनाचा विचार करतात. त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या भावनिक गरजा पूर्ण करतात. अशीच कुटुंबातील मुलं आज पुढं जाताना दिसत आहेत.

प्रकाश एक सांगशील मला कि तू शेवटचं पालवीशी केव्हा बोललास?"

'नाही आठवत'-प्रकाश

"हं आठवणारच नाही कारण आपण बोलतच नाही आपल्यात संवाद नाही. कारण बोलणं किंवा संवाद साधनं हे आपल्या लेखी खूप महत्त्वाचं नाही कारण परवा आभा आली होती ना ती हेच सांगत होती की पालवीला तुम्हाला हे सारं सांगायचं होतं पण तुम्ही तिला ती संधी दिली नाही. तिचे विचार, तिचे प्रश्न तसेच राहिले म्हणून ती मित्र आणि मैत्रिणीबरोबर बऱ्याच गोष्टी शेअर करत राहिली.

प्रकाश आपण पालवीला आज उद्या किंवा तुझ्या सवडीनं घरी बोलवूया का ?मला तिच्याशी खूप बोलायचं आहे. आमच्या नात्यातला हरवलेला संवाद पुन्हा नव्यानं घडवायचा आहे. कसं काय कोण जाणे आपण एकमेकांशी इतकी तुटक वागत राहिलो.

याचा आज मी विचार करते तेव्हा मला खूप अपराध्यासारखं वाटतं तुला नाही वाटत प्रकाश की आपण चुकलो आहोत म्हणून!"

थंडगार ताकाचा घोट घेत प्रकाश म्हणाला,"प्रिया आपण अपराधी आहोत पालवीचे हे मान्यच आहे. पण आता तिच्यासमोर मी उभा नाही राहू शकणार. तिच्या नजरेला नजर नाही भिडवू शकणार. एकुलत्या एका मुलीला मी खरंच आज हरवून बसलो आहे. पैसा काम, मोबाईल याव्यतिरिक्त मी कुठल्याच गोष्टीचा विचार केला नाही. डबडबलेले डोळे पुसत प्रकाश पुढं म्हणाला,आभाला एक फोन कर आणि पालवीला घरी घेऊन ये म्हणावं!"

संध्याकाळ संथगतीत अंधाऱ्या रात्रीत विलीन होण्यास सज्ज झाली होती. घरट्यातून उडालेली पाखरं पुन्हा घरट्यात परतत होती. झाडावर पक्षांचा एकच किलबिलाट चालू होता. पक्षांच्या किलबिलटानं घरटी गजबजून गेली होती.

पहाटेचा थंड वारा अंगाला झोंबत होता.असंच कितीतरी वेळ पडून राहावं असं प्रियाला वाटत होतं. आभाच्या फोनने प्रियाची झोपमोड झाली.आभा म्हणत होती की,"काकू दह्याची चटणी आणि खमंग थालीपीठ करा मी आणि पालवी येतोय अगदी थोड्याच वेळात."

प्रियानं स्वत:भोवती एक मोठी गिरकी घेतली अशी गिरकी गेल्या कित्येक वर्षात तिनं घेतलेली तिला आठवत नव्हती. भराभर आवरून तीनं टेबल सजवला. फोडणी दिलेलं काकडीचं रायतं तिनं अगदी न विसरता केलं.पालवीच्या आवडी तिनं जपल्या होत्या. प्रकाशला उठवत म्हणाली,'उठ माझा स्वयंपाक झालाय. तू ही वेळेत आवरून घे, पालवी येतेय घरी आपली पालवी!'

किती उत्साहानं, भरभरून ती बोलत होती. आज तिचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.

प्रकाशने ही पटकन उठत आवरायला घेतलं त्यालाही पालवीशी खूप बोलायचं होतं बोलून मन मोकळं करायचं होतं.

'आईस्क्रीम घेऊन येतो गं !'म्हणून प्रकाश उत्साहानं बाहेर पडला.

प्रिया आणि प्रकाश दोघेही अगदी पालवीच्या स्वागतासाठी सज्ज झाली होती. प्रियानं आभाला फोनही केला,' येताय ना? या लवकर मी वाट पाहतेय!'. 'काकू येतोय आम्ही पोहोचतोच पाच मिनिटात'- आभा.

आभा गाडी चालवत आपल्याच मस्तीत चालली होती.तेवढ्यात

'आभा एक विचारु '?पालवी म्हणाली.

'हं बोल की'-आभा

"अगं मी अशी वागले त्याचं आई-बाबांना काय वाटत असेल? मला त्यांच्यासमोर जायला नको वाटतं. पण खरं सांगू हे जे झालं त्यात दोष कोणाचा? या विषयावर नको नं बोलायला. फक्त आई-बाबांनी हे मोठ्या मनानं स्वीकारावं असं मला वाटतं. कारण मी खूप तणावामध्ये वावरत होते त्यावेळेस पण अमेयनं मला खूप समजावून सांगितलं. त्या कठीण वळणावर अमेय सोबतीला होता म्हणून मी या वादळातून बाहेर पडले आणि नकळत मी अमेयच्या प्रेमात पडले. माझ्या बाबतीत जे काय घडलं, घडत गेलं ते मी आई-बाबांना खूप सांगायचा प्रयत्न केला, पण घरात यावर कधीही बोलणंच व्हायचं नाही. म्हणून कॅफे बुक मध्ये आपण जमल्यावर मी अमेयशी बोलायचे. तुम्ही सर्वांनीही मला खूप समजावून सांगितलं आभा तुमच्या सर्वांचे आभार मी कसे मानू? कळत नाही खरंच गं!"

"आभार प्रदर्शन आपण पुन्हा कधीतरी करुया. उतराखाली घर आलय"- आभा

दोघीही खाली उतरल्या. संपूर्ण पालवी बंगल्याकडं,बागेकडं बागेतल्या झोक्याकडं झाडांकडं तिनं नजर फिरवली.पक्षांची घरटी लांबून ही किती छान दिसत होती.हे पाहून तिला खूप गहिवरून आलं. आठवणी जाग्या झाल्या.पानावलेले डोळे पुसत तिनं घरात प्रवेश केला.आईला समोर पाहताच तिनं मिठी मारली. आई तू कशी आहेस!" म्हणत तिनं प्रियाच्या सारा खांदा ओला केला "किती रडशील गं! तू बरी आहेस ना? जा बाबांना भेटून ये -प्रिया"

पालवीनं धावतच प्रकाश च्या गळ्याला मिठी मारली.खाली वाकून पाया पडली. म्हणाली,'बाबा मला माफ कराल? मी चुकले खूप चुकले. वीस, बावीस वर्ष तुम्ही मला किती छान सांभाळलं आणि मी एका झटक्यात हे सारं विसरून अमेयशी लग्न केलं.'

अश्रूंचा बांध फुटला होता अश्रू अनावर झाले होते.

प्रकाशनं पालवीच्या पाठीवरून हात फिरवला. म्हणाला,'तू चुकलीस पण अमेयनं असं करायला नको

होतं. त्यानेही या पळून जाण्याच्या प्लॅनमध्ये तुझी साथ द्यावी. हे मला पटत नाही. नक्कीच त्याचा काहीतरी वेगळा डाव असेल पालवी!' प्रकाशच्या या बोलण्यावर ती दोन पावलं मागं सरकली.

तेवढ्यात आभा पुढे आली. तिला हे अपेक्षित होतं की हा मुद्दा उठणार आहे कारण अमेय परिस्थितीनं गरीब आहे. पालवीच्या आई-बाबांना असं वाटणं साहजिकच आहे की पळून जाण्याच्या प्लॅन हा अमेयचा असू शकतो,पण खरी परिस्थिती खरंच फार वेगळी आहे.

प्रत्येक मनुष्य हा धनाने श्रेष्ठ समजला जातो असं काही नसतं. खरंतर दिव्य स्वभाव, उच्च आचरणावर मनुष्याची श्रेष्ठता ठरवायची असते.

आणि अमेयनं तर कृष्ण बनून पालवीला योग्य मार्ग दाखवून एका थांब्यावर आणून ठेवलं होतं नाहीतर पालवी आज डिप्रेशनमध्ये किंवा व्यसनेच्या आहारी गेलेली दिसली असती. तिला सावरणं खरंच फार कठीण गेलं असतं असे विचार करत ती पालवीला म्हणाली,'पालवी,आज सांगून टाकते मी सारं. कारण जोपर्यंत काका काकूंना अमेय बद्दल सारं कळणार नाही तोपर्यंत त्यांचा त्याच्या बद्दलचा गैरसमज वाढत जाणार आहे. आणि त्यावेळी तू कुठल्या परिस्थितीतून जात होती. हेही नको का त्यांना कळायला? ती पुढं बोलू लागली. म्हणाली,'काका -काकू शांतपणे ऐका मी काय सांगते ते! मी जे सांगते ते सारं आमच्या ग्रुपला ही माहिती आहे आणि हे सारं पालवीनं सांगितलेलं आहे. आम्ही अनुभवलं आहे. काका, तुम्ही दोघंही काम, पैसा, प्रतिष्ठा याला महत्व देत गेला. घरात तुमचं फारसं लक्षही नसायचं आणि संवाद,बोलणं अशा गोष्टी तर घरात नव्हत्याच. काकू तुम्हाला दोष देण्यापेक्षा मी मूळ मुद्द्यावर येते. पालवी डिप्रेशनमध्ये चालली होती. एका वाईट ग्रुपच्या नादी ही लागली होती. कॅफे बुक म्हणजे आमचा थांबा होता. कॉलेज सुटलं की आम्ही कॅफे बुक मध्ये आमच्या थांब्यावर येऊन थांबायचो. कॉफी पिताना आम्ही पुस्तकं वाचायचो, पुस्तकावर बोलायचो, चर्चा करायचो पण या गोष्टीत पालवी फारशी नसायची. ती कुठंतरी दूर शून्यात हरवलेली दिसायची. पानं चाळत राहायची. या गोष्टी अमेयच्या नजरेतून सुटल्या नाहीत. मी आणि अमेयनं एकदा तिला विचारायचा प्रयत्नही केला बोलता -बोलता ती म्हणाली की,' आई-बाबांच्या कामाच्या पुढं मला किंमत नाही.माझ्या भावनांना किंमत नाही.खूपदा मला मार्क कमी पडतात.गणित विषय कठीण जातोय.मी आई-बाबांशी या विषयावर बोलायचा प्रयत्न केला. पण त्याचं उत्तर असायचं की दुसरा क्लास जॉईन कर. आपण उद्या बोलूया या विषयावर. आणि तो "उद्या" कधीच उजाडला नाही आजही. अशा कित्येक समस्या माझ्या आयुष्यात आल्या पण तो आधाराचा खांदा जो हवा असतो ना,तो कधीच मला मिळाला नाही. नकळतपणे मी थोडं वाईट गोष्टींच्या अधीन गेले.' काका या अशा साऱ्या गोष्टी अमेयला पालवीनं सांगितल्या. अजूनही एक गोष्ट मी इथं मांडते काकू, हे सारं ऐकून तुम्ही भांबावला आहात घाबरून गेला आहात,हे कळतंय मला पण मन घट्ट करून ऐका. पालवी रात्री अपरात्री घरी यायची दिवस-रात्र झोपून राहायची हेही तुमच्या नजरेतून कसं काय सुटू शकतं? काकू पालवी ड्रग्जच्या आहारी चालली होती. मी आणि अमेयनं तिला यातून वाचवलं. तिला पुन्हा कॅफे बुकच्या ग्रुप मध्ये ओढून आणलं. तिचे कोणते विषय कच्चे होते याचा अमेयनं अभ्यास करून तिचे ते विषय अगदी व्यवस्थित करून घेतले. या गोष्टी आठ ते दहा दिवसात तर घडलेल्या नाहीत. काकू,या साऱ्या गोष्टीला तब्बल दोन वर्षे लागली. तिच्याशी बोलून तिच्या मनातलं जाणून घेऊन तिला मानसिक स्थैर्य देत ती कशी आनंदी राहिल याचा विचार करत आम्ही तिला खूप जपलं काकू आणि या साऱ्या गोष्टी घडताना, पालवीला सावरताना आमचा एकच उद्देश होता की आमची मैत्रीण यातून वाचली पाहिजे. आम्हाला जेवढं शक्य होतं तेवढं आम्ही केलं आणि अशातच पालवी अमेयच्या प्रेमात पडली. काकू आता यापुढं काय आणि कसं घडलं ते तुम्ही सविस्तरपणे पालवीकडूनच ऐका. मी निघते."

घरात निरव शांतता पसरली होती. वाऱ्यामुळं झाडांच्या पानांचा आवाज कानी पडत होता. पक्ष्यांच्या किलबिलाटानं घरातील शांतता भंग पावत होती. काहीतरी मोठा अपराध आपल्या हातून घडला आहे असे प्रिया आणि प्रकाशला वाटत होते. पालवी आळी पाळीनं दोघांकडं पाहत होती. आभा जे काही सांगून गेली त्यामुळं दोघांच्या चेहऱ्यावर खूप भीतीदायक भावनांचा जाळं पसरलं होतं.

भयान अशा शांततेचा भंग करत पालवी म्हणाली,'आई आभा जे काही सांगून गेली त्यातली कुठलीच गोष्ट खोटी नाही. मला त्यावेळेस अमेयनं

सावरलं नसतं तरी मी आज तुमच्यात नसले असते आई! तुम्ही दूरवरच्या गोष्टी पाहण्याच्या नादात जवळच्या गोष्टी विसरत गेलात.अमेयनं माझं गणित इतकं पक्क केलं की मी आज कुठलीही गणितं चुटकीसरशी सोडवू शकते. वाईट ग्रुप मधून मला बाहेर काढणं, व्यसनातून मुक्त करणं या गोष्टी सहज नव्हत्या आई! मला वाटायचं की मी एकटी पडले. हे अमेयनं जाणलं. त्यानं मला समजून घेऊन माझ्या समस्या सोडवल्या.स्वतःही अभ्यास करत गेला. आज त्याला खूप मोठं यश मिळालं. राहता राहिला प्रश्न की आम्ही पळून का गेलो? अमेयच्या घरातून विरोध होता लग्नाला.तुमच्याशी मी खूप बोलायचा प्रयत्न केला पण आपलं यावर बोलणं होत नव्हतं मी अमेयशी बोलले. म्हणाले,"मला तुझ्याशीच पुढचं आयुष्य घालवायचं आहे. तुझ्याशिवाय मी आता कोणाचा विचार करणार नाही." खरंतर बाबा,अमेयला पळून वगैरे जाणं हे मान्यच नव्हतं पण माझ्या हट्टापुढं त्यानं ते ऐकलं. त्यानं आपला पैसा, संपत्ती, प्रतिष्ठा पाहून माझ्याशी लग्न केलेलं नाही. हे आधी तुम्ही तुमच्या मनातून काढून टाका. शिपायाच्या घरातली मुलंही

संस्काराणं, विचारांनं खूप मोठी असतात बाबा !कारण घरातील मोठी मंडळी त्यांच्या भावनिक गरजांकडं लक्ष देतात.दिलखुलास, मैत्रीपूर्ण वातावरण घरात असलं की पिढी पुढं जाते हे मी अमेयच्या घरच्यांकडून शिकले.आई,अमेय परिस्थितीनं जरी गरीब असला तरी तो स्वाभिमानी आहे.आज मी जी तुमच्या समोर प्रचंड विश्वासानं उभी आहे ती केवळ अमेय मुळेच.हे विसरुन चालणारं नाही.आईबाबा तुम्हाला मी एकच मागते की, आम्ही केलेल्या या लग्नाचा तुम्ही स्विकार करावा.पळून जाणं ही चूक आहे,पण तुम्ही ती मोठ्या मनानं पदरात घ्या."

पालवी खूप रडली.अगदी सैल झाली.तिला आज खूप बरं वाटत होतं.इतक्या दिवसाचं मनावरचं ओझं पार उतरुन गेल्या सारखं वाटत होतं.आता आईबाबा काही का निर्णय घेईनात मी बोलून तर मोकळी झाले. असे विचार तिच्या मनात येत होते.

सोफ्यावर बसलेल्या पालवीच्या दोन्ही बाजूला प्रकाश आणि प्रिया बसली होती.तिला जवळ घेत प्रकाश म्हणाला,"बेटा,आज तूला मी काळजा जवळ घेऊन बसलोय.हा क्षण ही मी पूर्वी आयुष्यात कधी अनुभवलेला नव्हता.खरंच बेटा, खूप गोष्टी आमच्या हातून निसटून गेल्या होत्या.या गोष्टी परत मिळवून दिल्या म्हणून मी अमेयचे आभार मानेन.

आज तू व्यसनाच्या बाहेर पडलीस,माणसांत आलीस हे सारं अमेयमुळे साध्य झालं.आणि हो तुमच्या कॅफेबुकचं ही मी खरंच ऋणी आहे की इतकी छान आणि जीवापाड तुम्ही मैत्री जपता.तुमच्या गृपला पाहून मी असंच म्हणेन की आजची ही तरुण पीढी वाया जाणारी नाही तर एकमेकांना सावरणारी आहे.

बेटा, आम्ही चुकलो.आम्हाला क्षमा कर.इथून पुढं आता अशी चूक होणार नाही.ऑफीस नंतर आता आम्ही तुझेच आहोत.

आम्हाला नकळतपणे वळणावर आणण्याचं काम घाटे परिवारानं केलं आहे.आम्ही त्यांचे ही ऋणी आहोत.!"

प्रियाला ही खूप बोलायचं होतं.पण ती बोलत नव्हती.मनभरुन ती पालवीकडं पहात होती.तिच्या चेह-यावरुन, केसांवरुन ती हात फिरवत होती.

तिनं तिला जवळ घेतलं.कित्येक वर्षातून ती आईच्या कुशीत अशी विसावली होती.ती आणखीन आईला बिलगली.ओढणी सावरत आईला म्हणाली,"आई, रडू नकोस.नाहीतर मला आज दिवसभर करमायचं नाही. मला फक्त माफ कर आई!"

"अगं,वेडाबाई माफी कसली मागतेस?

आम्हीच अपराधी आहोत तुझे.ज्या वयात आईबाबा मित्र मैत्रिण म्हणून सोबत रहायला हवे होते त्या वयात आम्ही तुला एकटे टाकले.तुझ्या गरजा समजून घेतल्या नाहीत.तुझ्याशी कधी मनमोकळेपणानं बोललो नाही. बोललो असतो तर तू अशा वाटा चुकली नसतीस.

पालवी खरं सांगू! तू वाट चुकली आहे. तू काहीतरी वेगळं वागते आहे.हेही कधी आमच्या लक्षात त्यावेळी आलं नाही.संवादानं भरलेलं तुमचं कॅफे बुक नसतं तर तू कुठल्या थराला पोहोचली असती ?हा विचारही करवत नाही. तूच आम्हाला माफ कर आणि जावयाला आजच घरी बोलावून घे. मानाचा पाहुणचार करायचा आहे त्यांचा".

मातीला सुद्धा नांगरटीची गरज असते तेव्हा कुठं जोमानं पीक उभं राहतं.नाही तर नुसती ढेकळं काय ती कामाची?

आज कुटुंबाची मशागत छान झाली होती बोलून मोकळी झाली होती. आज एका नव्या पर्वाला सुरुवात होणार होती. आयुष्यातल्या तारखा तर बदलत राहतात. खरंतर प्रत्येक क्षण आणि वेळ जगण्यासाठी कुटुंबाचं एकत्रित बसणं, संवाद साधणं, आज अत्यंत गरजेचं बनलेलं आहे.कारण आज माणसां जवळ पैसा, संपत्ती, प्रतिष्ठा सारं काही आहे पण कुटुंबांना द्यायला वेळ नाही.दोन मिनिटं बोलायला सुद्धा वेळ नाही. मोठ्यांच्या अनुभवातूनच मागची पिढी घडत असते पण आज अनुभव सांगणारी माणसं आहेत पण त्यांना वेळ नाही.म्हणून नव्या पिढीत हट्टीपणा, दुराग्रहीपणा, चिडचिडेपणा, एक्कलकोंडेपणा व्यसनाधीनता हे असे बदल आपणाला जाणवत आहेत.

संध्याकाळी सारीच मंडळी घाटे परिवार,पालवीच्या माहेरचे,बुक कॅफे ग्रुप अशी सारी मंडळी आज कॅफे बुक मध्ये जमा होणार होती. आज खऱ्या अर्थानं दोन्ही परिवार विषमतेच्या भिंती तोडत एक होणार होती. आज दोन्ही घरात मंगल वाद्य वाजणार होतं.

पालवी प्रिया,प्रकाश,अमेय या साऱ्यांनी आपापल्या नातेवाईक मित्रमंडळींना बोलावलं होतं. घाटे काकाही अगदी जोमानं कामाला लागले होते. आज पालवीच्या घरच्यांकडून अमेयाचा सत्कार होणार होता कॅफे बुक मध्ये सर्वजण आपापल्या जागी स्थानापन्न झाली. कोल्ड कॉफी, हॉट कॉफी, चॉकलेट कॉफी, मोक्का,लाते,मोहितो असे कितीतरी कॉफीचे प्रकार आणि सोबत महान लेखकांची महान विचारांची पुस्तकं मोठ मोठ्या काचेच्या आलमारीत,टेबलवर शोभून दिसत होती.

प्रत्येक टेबलवर कॉफीचे मग आणि पुस्तकं वाचणारी तरुण पिढी हे चित्र खूप आशादायी वाटत होतं. पुस्तकावर भरभरुन बोलणारी मुलं आज एकमेकांच्या मदतीला धावून येत आहेत. समस्या सोडवत आहेत. खरंच असे मैत्रीचे ग्रुप समाजामध्ये असायला हवेत.

हे सारं वैचारिकतेचं वैभव पाहून प्रिया तर हरवून गेली होती. पालवी आणि अमेय खूप छान असं आवरुन समोर आले. एकमेकांना अंगठी घालून त्यांनी साऱ्यांना वाकून नमस्कार केला. घाटे काका काकूंचाही सत्कार करण्यात आला.प्रिया व प्रकाशने अमेयला शाबासकी दिली आणि सत्कार केला.

अमेयने चार शब्द बोलावेत म्हणून सगळ्यांनी आग्रह केला. पण अमेय म्हणाला,'मी नंतर बोलेन.

आधी माझ्या बाबांना बोलण्याची संधी द्या.'

घाटे काकांना गहिवरून आले म्हणाले," मी शिपाई मी काय बोलणार? माझ्यापेक्षा कितीतरी वरचढ मंडळी इथं आहेत त्यांनी त्यांचे विचार मांडावेत असे ते म्हणाले"

तेवढ्यात प्रकाश म्हणाला," घाटे आपण बोला !आज तुमचा मान आहे शिक्षणानं आपण कमी आहात पण अनुभवानं आपण कितीतरी महान आहात आज आपणच बोला."

सगळ्यांच्या आग्रहास्तव घाटे बोलू लागले टाळ्यांचा प्रचंड कडकडाट सुरु झाला.

"मंडळींनो नमस्कार! आज मी खरंच स्वतःला भाग्यवान समजतो की माझा मुलगा आज स्पर्धा परीक्षा पास होऊन लवकरच मोठा पदभार सांभाळणार आहे. हे शक्य झालं ते यामुळं की आम्ही दोघं नवरा-बायको पोरांकडं लक्ष द्यायचो. लक्ष तर सगळेच आई बाबा देतात पण आम्ही त्यांचं मन जाणलं त्यांचे प्रश्न व त्यांच्या समस्या सोडवल्या. परिस्थितीची जाणीव करून देत त्यांच्या आवडीनिवडी जपल्या. खरं तर आमच्या कुटुंबात बोलणं होतं, गप्पा होतात म्हणून आपली मुलं आपल्याला समजतात. कारण मुलांना कुटुंबाची खरी गरज असते. जशी लहान रोपाला सावलीची गरज असते अगदी तसंच घरातल्या मुलांनाही आई-बाबांच्या सावलीची गरज असते. मग रोपाचं झाड झालं की वादळ, वारा व उन्हाचे तडाके सहजपणे ते सहन करतात. समस्यांना सहजपणे तोंड देतात." धन्यवाद म्हणून हात जोडत त्यांनी त्यांच्या वाणीला विराम दिला.

पुन्हा एकदा टाळ्यांचा कडकडाट झाला सारी मंडळी अमेयचे व घाटे काकांचे कौतुक करत होती. कॉफीचा आस्वाद घेत सारी मंडळी एकेक करून आपापल्या घरी गेली.

प्रिया प्रकाशने अमेय व पालवीला जवळ घेतलं शेवटी प्रिया म्हणाली," अमेय तुझे खूप आभार मनापासून धन्यवाद. तुम्ही दोघं छान रहा, छान संसार करा. उशीरा का होईना मला हे कळालं की सगळेच आई-बाबा मानसशास्त्रज्ञ नसतात. पण मुलांच्या वर्तनातून त्यांच्या मानसिक गरजा आपल्याला कळतात. पण त्यासाठी कुटुंबात बोलणं व्हायला हवं. ब-याच आई-बाबांना वेळ नसतो पण त्यातूनही वेळ द्यायचा असतो हे आज पूरतं कळालं !"या वाक्यावर सगळीच मंडळी अगदी दिलखुलासपणे हसू लागली.

एक हसरं,बोलकं, संवादानं परिपूर्ण कुटुंब म्हणून आभानं

दोन्ही कुटुंबांना एकत्र करून त्यांना कॅमेरात कैद केलं.

रोपांना खऱ्च सावलीची किती तरी गरज असते.हे आज सा-यांनाच मनोमन पटलं होतं.

**अंजली राठोड**
**करमाळा**
**मो.७७०९४६४६९३**

---

# प्रश्न



एकेक महिना सरकत चाललेला पावसाविना
ढगांची गाठोडी वारा फिरेल तिकडे विखरत चाललेली
हतबल माणसांनी बाचकीबोचकी बांधून गाव सोडून निघावे तशी
पावसाचे फवारे तणनाशक मारल्यागत भुरभुरणारे
धूळपेरणी मातीआड करपून गेलेली
चिंतेची खोडअळी माणसांना पोखरत असलेली
अन माणसं एकमेकांना प्रश्न करत असलेली
'पडल पाऊस का पडतो आता दुष्काळ'

**सतीश पुंडलिक नवघरे**
**कोळपेवाडी**
**मो.8308033705**

# आई



वेदनांना विसरून,
व्यक्त आनंद करते.
जन्म दिलेल्या बाळाला,
स्वतः छातीस धरते....!!१!!

डोळ्यांतले अश्रू थेंब,
पापणीला तरंगती.
ओल्या पदराची माया,
तिला जीवन संगती....!!२!!

झाली गुरु लेकराची,
दिले जीवनाचे ज्ञान.
घडविते शिकविते,
स्वतः अक्षरी अज्ञान....!!३!!

आई मातृत्वाची मूर्ती,
तिचे वात्सल्य महान.
तिच्या कर्तृत्वाच्या पुढे,
वाटे आकाश लहान....!!४!!

अन्न ठेविते राखून,
स्वतः तजूनी पोटाला.
हास्य ठेऊनी मुखाशी,
खाऊ घाले लेकराला....!!५!!

मुलं चांगले वाईट,
तिला नसे भेदभाव.
दुःख संकटे झेलीत,
खेळे संसाराचा डाव....!!६!!

**श्री.श्रीकांत म. शिरभाते**
**ता. नांदगाव (खंडेश्वर)**
**मो.९६८७३६५४६४७**

# ..मन..



मनाचा थांग
समुद्राची खोली
दगडाशी बोली
गूढ अथांग

मन विहारी
आकाशी ताऱ्यात
वादळ वाऱ्यात
तरंगे भारी

हरीण मन
जंगलात धावे
सकळांस भावे
सुंदर तन

मन राकट
पराक्रमी वीर
मिलना अधीर
ते नटखट

बीजांकुरण
मना आविष्कार
सृष्टी भाष्यकार
धरा चरण

मन भेदते
पृथ्वी आरपार
तोचि चमत्कार
जगी वंदते

मन चंचल
क्षणी अवकाशी
सागर तळाशी
विसावे पल

लेखू नका रे
तुम्ही मना कमी
विकासाची हमी
जगास तारे !

**बाळ झोडगे**
**ठाणे**
**मो. ९८७०७९४९५८**

# “ बाप नावाचे आभाळ”



“बाप” हे असं आभाळ आहे.ते कायम मुलांसाठी सुखाचे पाऊस पडते;आणि उन्हात सुखाची सावली बनून आपल्याला आभाळभर फिरते.आयुष्याच्या प्रवासातील सुखाचं शेवटचं स्टेशन म्हणजे बाप. या थांब्या नंतर सुखच दुसरे स्टेशनच नसते.अनेक लेखकांनी कवींनी आपल्या लेखणीने बाप रंगवला;पण त्या बापा पेक्षा आईच सशक्तपणे त्यांनी रेखाटली.आपल्या साऱ्यांना आई जवळची वाटते;कारण बाप कणखर असतो. लोखंडाला आकार देण्यासाठी तापलेल्या लोखंडावर घण होऊन बापच तडाखे देतो.मग मुलांना बाप कसा जवळचा वाटणार?ऐरणीलाही घणाचे घाव सोसावे लागतात;म्हणून बापाला ऐरणीची भूमिका पार पाडावी लागते.म्हणूनच बाप नेहमीच मुलांच्या आयुष्यात खलनायक म्हणून येतो.किंबहुना मुलांना जगातील सर्वात वाईट व्यक्ती म्हणजे आपला बापच वाटतो. संसारात आई मऊ कनवाळू होते.तर येणाऱ्या लाटा अडवायला बापाला किनाऱ्यावरील भक्कम किनाऱ्याचे रक्षण करणारा दगड व्हावा लागतो. माया,ममता, प्रेम,जिव्हाळ्यासाठी बापानेच आईला पुढे केले असते. म्हणून आई जवळची वाटते बापाला तसं करता येत नाही;कारण अतिप्रेमाने मुले बिघडतील याची भीती त्या भाबड्या बापाला वाटत असते.ती बिघडू नये असं त्या भावड्या बापाला वाटत असते.म्हणून तो कणखर होतो. नव्हे नव्हे, त्याला कणखर व्हावे लागते.आई बाळाला नऊ महिने पोटात वाढवते.आणि ती मोकळी होते;पण लेक नऊ महिन्यानंतर आयुष्यभर बापाच्या डोक्यात असतो. बाबाचा प्रत्येक क्षण,प्रत्येक श्वास, मुलांसाठी खर्च होत असतो.मुलांच्या सुखासाठी वाट्टेल ते तो करतो.मुले झाली की बापाला हौस मौज, छंद,आवड,सगळ्यांना मुरड घालावी लागते.कारण हेच आवड, छंद, हौस,तो आता मुलांची पुरवत असतो.स्वतः स्वस्तातले कपडे, चपला, घेतो;पण जो मुलांच्या चपलांचे आणि कपड्यांची पाळी येते;तेव्हा तो मात्र खिशात किती आहेत याची पर्वा करत नाही;तर तो विचार करत असतो ‘चार पोरात आपला लेक उठून कसा दिसला पाहिजे?’ वेळ प्रसंगी दागिन्यांसाठी आई कधीतरी अडून बसते;पण बाप कधी गळ्यात सोन्याची चैन हवी,हाताला ब्रेसलेट हवे, किंवा अंगावर दागदागिने हवेत म्हणून कधी रुसून बसल्याचा मी तरी ऐकिवात नाही.तो ज्या दिवशी बाप होतो.त्या दिवशी त्याचे नटणे, मुरडणे, हौस,मौज,सारे संपून जाते.वेळप्रसंगी अडीनडीला सर्वात प्रथम दागिने मोडण्याची वेळ येते;तेव्हा बापाकडे असलेले कमीजास्त सोने सगळ्यात आधी बाप मोडतो.आणि त्याचे मनाला अगदी काहीही दुःख वाटून घेत नाही.त्याच्याकडे पैसे असो नसो ; पण कधी हौस करताना दिसत नाही. घरात सगळ्यांत कमी कपडे स्वस्तातल्या चपला बापाकडे असतात.

मुलांसाठी बाप सुपरमॅन पेक्षा कमी नसतो.जगातील कोणतीही वस्तू मुलाने मागू दे ! तो ती वस्तू मुलाला देण्यासाठी जीवाचे रान करतो.आपल्या सगळ्या सगळ्यांना बाप कधी कळतो ?तर मेल्यानंतर!.. मग बाप हिरो होतो ; पण जिवंतपणी जीवाचे रान करणारा हा जादूगर मुलांना का बरे कळत नाही;कारण आपल्यावर हात उगारणारा, वेळप्रसंगी शिव्या देणारा, मारकुटा बाप, कुणाचा दारुडा बाप, का बरे मुलांना सुपरहिरो वाटेल.?त्यासाठी स्वतः बाप व्हावे लागते.मग बाप कळतो.स्वतः बाप झाला की मग आपला स्वतःचा बाप कळतो ; पण काय फायदा ?तो बाप तर कधीच येथून निघून गेलेला असतो. मुलांच्या सुखासाठी आयुष्याची होळी करणारा कर्जबाजारी होणारा,दुश्मनाच्या दारात पण जाऊन पदर पसरणारा,बाप मुलांना कसा कळणार?

आई प्रेमाचे माठ घेऊन येते पण बापाला नाही तसे करता येत.तो मुले झोपली की गुपचुप केसातून हात फिरवतो.कधी मारले तर लेकराला जास्त तर लागले नाही ना? म्हणून रात्री गुपचूप चाचपून पाहतो.तुमच्या खिशात स्वखर्चासाठी पैसे टाकणारा,स्वतःचा वाढदिवस कधीच न साजरा करणार,आणि मुलांचे वाढदिवस मोठ्या धुमधडाक्यात साजरा करणारा बाप खरच खलनायक असतो?

कुटुंबावर किती संकटे येऊ देत.ज्या घरात बाप असतो तो पहाडासारखा उभा राहतो.आई सह्याद्री असते.बाप हिमालय होतो.आई झुळझुळ झरा असते.बाप अथांग समुद्र असतो.आई शालीसारखी मऊ लुसलुशीत,बाप घोंगडी सारखा खडबडीत ओबडधोबड;पण उबदार,घोंगडी थंडीतही चालते ;आणि पावसात चालत असते;तर कधी उन्हातही घोंगडी सावली म्हणून धरता येते.आई मायेची टेकडी असते.बाप पहाड असतो.आई सावली असते.तर बाप झाड असतो.आई गार वारा.बाप झुळूक असतो. आई छोटस गाव.बाप मुलुख असतो.आई नंदा असते. पण बाप परागंदा असतो.एवढे सारे करूनही बाप दुर्लक्षित कसा रहातो?

लेकीसाठी तर बापाच्या मनात एक वेगळाच कोपरा मायेने तुडुंब भरलेला असतो.गरीब,भिकारी,दीन,बाप असला तरी आपल्या लेकीचे लग्न राजकुमारी सारखे व्हावे.हीच त्या भाबड्या बापाची आपेक्षा असते.त्यासाठी काबाडकष्ट,मजुरी करायची त्याला लाज वाटत नाही.

सा-याच वऱ्हाडाला नवीन कपड्यांनी सजवणारा बाप मुलीच्या लग्नात मात्र स्वतःसाठी जुनेच कपडे घालतो. मुलीने आपले नाव मातीमोल करू नये म्हणून जपत असतो.कुणा लाडग्याची शिकार होऊ नये.म्हणून तळहाताच्या फोडाप्रमाणे तीला जपत असतो.कधी कधी त्याच नावाच्या अभिलाषेने मुलीला कॉलेजात टाकत नाही." नको मुलगी पळून गेली तर!"या एकाच शंकेने तो दोन पावले मागे सरकतो.आणि लोक म्हणतात मुलीला दुय्यम वागणूक देतात.त्यापाठीमागे बापाचा शुध्द हेतू असतो.पोरीने घराण्याचे नाव घालवू नये.तो फक्त त्याच्या इज्जतीला जपतो.पण कधी कधी त्याच बापाला "पोरगी पळून गेल्यावर गल्लीतून खाली मान घालून चालावे लागते.तेव्हाचा बाप कुणालाच कळणार नाही.काही मुली तर विवाहित असूनही यारा बरोबर पोबारा करतात,काही लग्नवेधी सजली की दोन दिवसाच्या अगोदर याराला जवळ करून पळून जातात. तेव्हा मनातून तीळ तीळ तुटणारा बाप कुणाला दिसतच नाही.तो मुलीकडून प्रेम,पैसा, कशाचीच आपेक्षा करत नाही. "पोरीने नाक कापू नये ",गल्लीतून जाताना मान ताठ असावी.बरं एवढीच चिमूटभर आपेक्षा बाप मुलीकडून करतो.मुलीच्या व्याभिचाराने उध्वस्त होणारा बाप कधी मुलींना कळतच नाही.त्यांना तो नेहमीच अमरीश पुरी का वाटतो?.आज पर्यंत फक्त मुले वडीलांना सांभाळत नाही म्हणून ओरड होते.पण संपत्तीत आर्धा वाटा सांगणा-या किती मुली आहेत ज्या म्हाता-या वडीलांना सांभाळतात.?मग मुलांप्रमाणेच मुलीपण अपराधी नसतात का?कारणे काहीही असोत. पण बाप मात्र मुलीकडून पण उपेक्षित राहतो हे ही तितकेच खरे!

बापाची सर कोणाला येईल.?तो भक्कम लेकरांच्या पाठीमागे आधार होऊन उभा राहतो;पण हाच बाप हात पाय थकले;की लाचार होतो.दीन होतो.बाप कोणाच्या वाट्याला यावा यावरून मुलांमध्ये खलबतं होतात."तू आमच्यासाठी काय केलेस?"असा प्रश्न बापाला विचारणारी मुलेही थोडी नाहीत.आणि हेच हेटाळणीचे शब्द बापाच्या वाट्याला येतात.मुलांच्या मनातून का बरं बाप परागंदा होतो.विडीकाडीसाठी का बरं मुलांकडे हात पसरावे लागतात ?या महिन्यात छोट्या कडे तर पुढच्या महिन्यात मोठ्या कडे का बरं बापाची वाटणी होते.?जे वय नातवंडाना खेळवण्याचे त्या वयात तो वृध्दाश्रमात का शेवटची घटका मोजतो? नाहीतर... बापाची वाटणी होते. नाहीतर नातवंडाना खेळणारा बाप वृद्धाश्रमाच्या जेलची का बरं हवा खात असतो. फक्त मुत्युची वाट पाहत.बाप का बरं विवंचना सहन करतो.जगातील साऱ्या मुलांनी चिंतन करण्याचा विषय आहे.

माय बाप गेले,
स्वर्गाचिये दारी ।
परत ना माघारी।
येत कधी।।

आरे बाप आपल्याकडे काय बर मागत असतो? मुलांकडे आदर, सन्मान, सहानुभूती दोन-चार शब्द, म्हातारे वडील मागतात. बाकी तुमच्या साम्राज्यात त्यांना कधीच सम्राट व्हायचे नसते.

**प्रा.धनाजी जनार्दन बुटेरे**
**पोई**
**मो.9404608836**

---

# आनंद बिंदू



आनंद बिंदू स्मरा
मनाचा कोंडमारा आवरा
सभोवती धगधगती ज्वाला
शत्रू पाजळीत पुढ्यात आला
तरी न सोडा धीरा
नाग ऊगा झोंबला
रथ अपघाती थांबला
सुटकेची करावी त्वरा
प्राण चालला खरा
तनू तान सोडते सारा
तरी ही सुखाने मरा

**श्री.कलानंद जाधव**
**हिंगोली**
**मो.९४०३८०१२७३**

# कृष्णाची रूपे



वसुदेव, देवकीचा.
नंद यशोदेचा लाल.
वाढे गोकुळात कान्हा.
दावी चमत्कार बाल.

मोहन तो निरागस.
तृणावर्त,कागासूर.
वधे पुतना मावशी.
मारी युक्तीने असुर.

कालियाचा नाश करी.
गोवर्धन गिरीधारी.
गोकुळात रास करी.
मुरलीधर मुरारी.

कंस चाणुर मर्दिले.
उग्रसेना राज्य दिले.
लोक पाल गोविंदाने
गुलामीला संपविले.

द्वारकेचा राणा ऐकि,
आर्त द्रौपदीच्या हाका.
वस्त्र पुरविले झणी.
यदुराया पाठीराखा.

पार्थसारथी माधव.
बोध करी अर्जुनास.
रुक्मिणीचा पती सांगे.
गीता सार समयास

संगीतकार पहिला.
एकजूट क्रीडा शक्ती.
दिली मानवा प्रेरणा.
युद्धनीती, प्रेम भक्ती.

युगंधर द्वापाराचा.
अवतार संपविला.
व्याध शर पाया लागे.
त्यागे हरी शरीराला.



**भारती थोरात**
**मो.95520 26512**

# मेलेली नजर



दाखल झालेल्या रुग्णाच्या आजाराबद्दल नातेवाईकांना समजावून सांगायचे होते. रुग्ण आणि नातेवाईक, तसे कुणाच्या तरी ओळखीनेच आले होते. म्हणून, त्यांना कॉफी साठी रुग्णालयातील कॅन्टीन मध्ये घेऊन गेलो. कॉफी घेता घेता त्यातील एकाने प्रश्न विचारला. "डॉक्टर, एक हजार बेड्स म्हणजे, खूप मोठे हॉस्पिटल आहे हो, हे! किती वर्षे झाली तुम्हांला इथे?"

"तीस वर्षे झाली."

-"टीबीचे एवढे सिरीयस पेशंट इथे येतात, आणि मरतात. रोज मरणारे पेशंट बघून तुमची नजर मेली असेल ना, आता? तुम्हांला काहीच वाटत नसेल ना?"

-एक मोठा श्वास घेतला आणि थोडे थांबूनच म्हणालो, "नजर कधीच मरत नसते, त्यासाठी मन मरावे लागते. आणि, मन मेलेलं असेल तर, त्या माणसातील माणूसही मेलेला असतो. मन मेलेले नसते म्हणून, डॉक्टर शेवटपर्यंत माणूसच असतो. सुरुवातीला कठीण जाते, जरी मरत नसली तरीही हळूहळू नजरेला सवय होते. परंतु, मन आणि कान यांना सवय होणे कठीण आणि अशक्य असते. मेलेल्या पेशंटच्या बापाचा आक्रोश, आईचा हंबरडा, बहिणीचा टाहो, बायकोची शून्यात स्थिरावलेली नजर आणि किशोरवयीन मुलाच्या चेहऱ्यावर भविष्याबाबत दिसणारे अनेक प्रश्न गेले तीस वर्षे अस्वस्थ करत आलेत. का तर,मन जिवंत आहे म्हणून!"

" आणि हो, असे पेशंट्स मरणाच्या दारातून बरे होऊन जेव्हा आपापल्या घरी, पुन्हा कुटुंबात जातात, तेव्हा मिळणारा आनंद काही वेगळाच असतो. त्या आनंदाचे मूल्य, ज्यांचे मन मेलय त्यांना नाही कळणार. काही दिवसांनी त्याची मुले विडिओ कॉल करून डॉक्टरांशी बोलतात आणि पेशंटलाही बोलायला देतात, तेव्हा पेशंटच्या घरातील आनंदी वातावरण बघून खूप खूप आनंद होतो. हाच मन... हो, तुमच्या भाषेत नजर मेलेली नसल्याचा पुरावा आहे."

**डॉ. शशिकांत गंगावणे**
**मुंबई**
**मो.९३२२२११२६१**

# सण उत्सव आणि संस्कृती



जगाच्या पाठीवर भारत हा देश सर्वात जास्त सण उत्सव साजरा करणारा देश आहे. भारतात महादेवाचे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. गणेश उत्सव, दुर्गा उत्सव इत्यादी खुप मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. त्यानंतर पोळा, नागपंचमी, मकर संक्रांत,दसरा, वेगवेगळ्या जयंत्या, पुण्यतिथ्या इत्यादी साजऱ्या केल्या जातात. पण या सर्वांपैकी सर्वात थाटामाटात भारतात दिवाळी साजरी केली जाते. दिवाळी हा सण केवळ पाच दिवसाचा जरी असला तरी त्याचा माहोल एक महिना आरामशीर चालतो.

दिवाळी हा भारतातील हिंदू लोकांचा सर्वात मोठा सण आहे. हिंदू पंचांगानुसार दिवाळीचा सण कार्तिक महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या अमावस्येच्या दिवशी साजरा केला जातो. दिवाळी हा सण आनंद, समृद्धी आणि वैभवाचे प्रतीक आहे. दिवाळी सणाला महालक्ष्मीची विशेष पूजा केली जाते. असे मानले जाते की दिवाळीच्या दिवशी लक्ष्मीची पूजा केल्याने जीवनात कीर्ती आणि वैभव टिकून राहते आणि जीवनात पैशाची कमतरता दूर होते. मात्र दिवाळी हा सण पाच दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. दिवाळी म्हटली की दिवाळी ची सुरुवात ही धनत्रयोगदशीच्या दिवसापासून सुरु होते. त्यानंतर नरक चतुर्दशी, दिवाळी,बलिप्रतिपदा म्हणजे पाडवा आणि भाऊबीज हे पाच दिवस दिवाळी मुख्य रुपाने साजरी केली जाते.

विदेशात राहणारे भारतीय लोकं सुद्धा दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी करतात. ज्या ज्या देशात जे जे सण उत्सव हे साजरे होत असतात त्या त्या देशात त्या सण व उत्सवावर त्या संस्कृतीचा मोठा प्रभाव पडत असतो. भारतीय संस्कृती मध्ये दिवाळीला लोकं घरच्या स्वच्छतेला रंगरंगोटीला अधिक महत्त्व देतात. दिवाळी पंधरा दिवस पुढे राहिली असेल तर पंधरा दिवस आधीपासूनच घराला रंग देणे, घर स्वच्छ करणे इत्यादी कामांना भारतीय लोकं प्राधान्य देतात.भारतीय लोकं आपल्या घरी गोडधोड पदार्थ करतात. फराळाचं बनवतात. नवीन नवीन कपडे खरेदी करतात. फटाके, उजळण्या, मापलं, लक्ष्मीच्या मूर्ती, लाह्या बत्तासे, उठण्याच्या पुडया, सुवासिक तेल,दागिने, तसेच किराणा खरेदी करतात. तसेच वेगवेगळ्या इलेक्ट्रॉनिक वस्तू, आकाशदिवे, इलेक्ट्रॉनिक दिवे, फटाके इत्यादी वस्तुने बाजार खचाखच भरलेला असतो. या सणासुदीच्या दिवसात भारतीय संस्कृतीचा लोकांवर जसा प्रभाव पडतो तसाच तो उद्योगधंद्यांवर पण अतिशय मोठ्या प्रमाणावर पडतो.

गरिबातला गरीब व्यक्ती या दिवाळीच्या दिवसात थोडी का होईना पण आपल्या पद्धतीने खरेदी करतो. आणि दिवाळी साजरी करतो. भारतीय संस्कृतीमुळे उद्योगधंदे दिवाळीच्या मौसमात मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या वस्तूंचे उत्पादन करून वस्तूंचा पुरवठा बाजारात पाठवतात.

भारतीय संस्कृतीमध्ये दिवाळी हा सण अंधारातून उजेडाकडे नेणारा सण आहे. त्यामुळे सर्वात जास्त लोकं पण उजळण्या, मेणबत्या, इलेक्ट्रॉनिक दिवे, आकाशदिवे, मोठ्या प्रमाणात खरेदी करतात.

दिवाळीच्या दिवसात लोक लक्ष्मीपूजनाची तयारी करण्यासाठी बऱ्याच वस्तू बाजारातून खरेदी करतात. ग्राहकांची किराणा दुकानात इतर दुकानात कपड्यांच्या दुकानात एकच गर्दी झालेली असते. भारतीय संस्कृतीचा सर्वात जास्त प्रभाव हा कशावर पडत असेल तर तो पडतो व्यापारावर. दिवाळी आणि भाऊबीजेसाठी लोकं एका शहरातून दुसऱ्या शहरात, एका देशातून दुसऱ्या देशात मोठ्या प्रमाणात प्रवास करत राहतात.बसेस, ट्रॅव्हल एजन्सी, ट्रेन, एअरपोर्ट हे प्रवाशांनी खचाखच भरलेली असतात.

भारतीय संस्कृतीत दिवाळीत महालक्ष्मीची पूजा केली जाते. भाऊबिजेला भाऊ बहिणीच्या घरी जातो. धनत्रयोदशीच्या दिवशी सोनं खरेदी करण्याला खूप महत्त्व दिले जाते. दिवाळीला झेंडूची फुले खूप जास्त प्रमाणात घर सजावटीसाठी व पूजेसाठी नेले जातात.

दिवाली हा मुख्य सण आहे. त्याच खालोखाल दसरा, मकरसंक्रांत, पोळा, गणेशउत्सव, दुर्गाउत्सव हे मोठ्या प्रमाणात साजरे करण्यात येतात. आपल्या संस्कृतीत खूप सगळे धार्मिक उत्सव आपण साजरे करत असतो.

दसऱ्याला दशानंद रावण च्या पुतळ्याचे दहन केले जाते. म्हणजे वाईट प्रवृत्तीचा नाश करून समाजाला योग्य चांगल्या मार्गाने मार्गक्रमण झाल्याचा संदेश दिला जातो. भारतीय संस्कृतीत दसऱ्याच्या दिवशी वाईट प्रवृत्तीचे दहन केले जाते.

भारतीय संस्कृतीत दसऱ्याच्या दिवशी लोखंडाच्या वस्तू, गाड्या, सायकल इतर गोष्टींना स्वच्छ करून त्याची पूजा करतात व त्या वस्तूंचे आभार मानतात.तसेच भारतीय संस्कृती प्रमाणे जे वयाने मोठे व्यक्ती असतात त्यांना नमस्कार करण्याची व इतरत्र गावावर फिरण्याची प्रथा प्रचलित आहे. दसरा हा सण एकमेकांचा आदर करणे सुद्धा शिकवतो.

मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळाचे लाडू बनविले जातात. आकाशात पतंगा उडविल्या जातात. या दिवशी

कोणाचे वर्षभर भांडण असले तरी तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला असे म्हटले जाते. मकर संक्रांतीचा उत्सव संपूर्ण भारतभर साजरा केला जातो. या दिवशी लोक खूप सगळे तिळ आणि गुळ, पतंगा बाजारातून खरेदी करतात. भारतीय संस्कृतीत असे मानले जाते की या दिवसापासून दिवस हा थोडा थोडा मोठा होत जातो व उन्हाळ्याकडे या दिवसापासून प्रवास चालू होते.

भारतीय संस्कृतीत शेतकरी पोळा हा सण मोठ्या उत्सवात साजरा करतात. शेतकऱ्यांसाठी बैल मोठ्या प्रमाणात शेतात कष्ट करतात. त्यामुळे चांगल्या प्रमाणात अन्नधान्य पिकते.भारतीय संस्कृतीत मनुष्याच्या खाण्यापिण्याची सोय करण्यासाठी कष्ट करणाऱ्या बैलाची पूजा केली जाते.त्याचे आभार व्यक्त केल्या जातात. त्यामुळे बाजारात लोक किराणा, वस्तूंसाठी तसेच बैलांच्या शृंगारासाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करत राहतात.

भारतीय संस्कृतीत धार्मिक उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केल्या जातात. जसे महादेवाचे उत्सव. या निमित्ताने खूप ठिकाणी अनेक यात्रांचे, जत्रांचे आयोजन केले जाते. त्यामुळे भारतीय संस्कृतीत लोकं देवी देवतांना मोठ्या प्रमाणावर मानतात. त्यामुळे देवी देवतांच्या मंदिरासमोर अनेक दुकानांची निर्मिती झाली आहे. यात प्रसाद, बेलफुल, नारळ व पूजेसाठीचे इतर साहित्य यांची विक्री केली जाते. यातून लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

शेगावचे गजानन महाराज संस्थान, शिर्डीचे साईबाबा संस्थान, पंढरपूरचे विठ्ठलाचे संस्थान, कोल्हापूरचे महालक्ष्मीचे संस्थान, तुळजापूरचे भवानी मातेचे मंदिर, बालाजी संस्थान अशा अनेक संस्थांनांची निर्मिती ही धार्मिकतेतून झाली आहे. अनेक लोक येथे दर्शनासाठी जातात. त्यामुळे या संस्थानाच्या ठिकाणी अनेक व्यवसायांची निर्मिती झाली आहे. यातुन खूप लोकांना रोजगार मिळतो. तसेच अशा ठिकाणी पर्यटन स्थळाचा सुद्धा विकास झाला आहे. भारतीय संस्कृतीत लोकांचा देवी देवतांवर प्रचंड विश्वास व श्रद्धा असल्यामुळे अशा प्रकारची संस्थाने यातून निर्माण झाली. पर्यटन निर्माण झाले. लोकांना यातून रोजगार मिळायला सुरुवात झाली.

भारतीय संस्कृतीत गणेश उत्सव,दुर्गोत्सव इत्यादी साजरे केले जातात. त्यामुळे मूर्तिकार यांचे व्यवसाय झपाट्याने वाढले आहेत. धार्मिकतेला आपल्या संस्कृतीत खूप मान्यता असल्यामुळे, अनेक देवी देवतांच्या आरत्यांचे पुस्तके, धार्मिक पुस्तके व ग्रंथ यांची निर्मिती झाली आहे. पर्यायाने प्रकाशन व्यवसाय वाढले आहेत.पुस्तक निर्मिती व्यवसाय वाढले आहेत. अनेक बुक्स स्टॉलची निर्मिती यातून झाली. लोकांना यातून रोजगार निर्माण झाला.

भारतीय संस्कृतीत अनेक महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात. त्यामुळे अनेक मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.त्यामुळे त्या कार्यक्रमासाठी लागणारे वेगवेगळे साहित्य लोक खरेदी करत राहतात. पर्यायाने वेगवेगळे व्यवसाय वाढीस लागतात. धार्मिक संस्कृतीचा प्रत्यक्ष व्यवसायाच्या विकासावर परिणाम होतो.

भारतीय संस्कृतीत वेगवेगळ्या धर्मांचे लोकं राहतात. मुस्लिम लोक मोठ्या थाटामाटात ईद साजरी करतात. ख्रिश्चन लोकं ख्रिसमस साजरी करतात. पारशी लोकं पतेती मोठ्या उत्साहात साजरी करतात. पंजाबी लोकं त्यांचे उत्सव साजरे करतात. तर इतर जाती धर्मांचे लोक त्यांचे उत्सव साजरे करतात. त्यामुळे त्या त्या धर्मांचे लोक त्यांना पाहिजे असलेल्या वस्तूंची बाजारातून मागणी करतात. त्यामुळे यातून वेगवेगळ्या व्यवसायांची निर्मिती होते. यातून लाखो लोकांना रोजगार प्राप्त होतो.

वेगवेगळ्या सण उत्सवाप्रसंगी त्या त्या धर्मांच्या संस्कृती प्रमाणे गाणी, कॅसेट, सीडीज निर्माण केल्या जातात. "सिंगिंग" या व्यवसायाला खूप जास्त प्रमाणात आता मागणी आहे. वेगवेगळ्या उत्सवाच्या वेळेला त्या त्या धर्माप्रमाणे, संस्कृतीप्रमाणे डान्सचे आयोजन केले जाते.

डान्स प्रशिक्षण देणे हे व्यवसाय आज खूप मोठ्या प्रमाणात विकसित होत आहेत. कारण सर्वांत जास्त क्रेझ लोकांना आता डान्स नि लावली आहे.

वेगवेगळ्या उत्सवाप्रसंगी आपल्या संस्कृती प्रमाणे वेगवेगळ्या मालिका, चित्रपट तयार केले जातात. यातून समाजाचा आरसा समाजाला दाखवण्याचा प्रयत्न केला जातो. यातून चित्रपटसृष्टी या व्यवसायाचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे.

आपल्या देशात अनेक विविध जाती-धर्मांचे लोक राहतात. त्या त्या जाती-धर्माच्या लोकांची सण, उत्सव, संस्कृती ही वेगवेगळी असते. त्यामुळे वेगवेगळे व्यवसाय समाजात जन्माला येतात. यातूनच लोकांच्या रोजगाराचा प्रश्न निकाली निघतो.

दिवाळी असली की लोकं एकमेकांना गिफ्ट पाठवतात. वेगवेगळे ग्रीटिंगकार्ड पाठवतात. सुवासिक तेल वापरतात. वेगवेगळे फटाके, कपडे,किराणा इतर आवश्यक वस्तूंची खरेदी करतात. यामुळे असं म्हणावे लागेल की वेगवेगळ्या सण उत्सवावर संस्कृतीचा परिणाम मोठ्या प्रमाणावर होतो.

वेगवेगळ्या सण उत्सवाच्या माध्यमातून आपल्याला संस्कृतीचे खरे दर्शन घडते आणि पर्यायाने यामुळेच अनेक व्यवसाय वाढीस लागतात. यातून रोजगाराची निर्मिती होते. लोकांचे उत्पन्न यामुळे वाढते. त्यामुळे लोकांचे जीवनमान मोठ्या प्रमाणात उंचावते. दारिद्र्य दूर होते आणि यामुळेच समाजाचा खऱ्या अर्थाने विकास होतो. म्हणून आपले सण उत्सव आणि संस्कृती यांचा अगदी जवळचा संबंध आहे असे म्हणण्यास काही चुकीचे नाही.

**प्रा. प्रविण बोंद्रे**
**लाडेगाव**
**Mob 9112373191**



# बुद्धाची शिकवण



आपण सर्व अंगीकारूया
गौतम बुद्धाची शिकवण
त्यांच्या आचरणाने होईल
समृद्ध आपले जीवन

प्रज्ञा, शील, करूणेचा
जगाला दिला मंत्र
नीतीने जीवन जगण्याचे
दिले मानवास तंत्र

सत्य, अहिंसा, शांती
विचार पेरले मनात
ठेवूया लालसेला दूर
सुख नाही धनात

आपल्या आचरणात
नको मोहाचे पाश
हिंसा, क्रोध, मत्सर
करी जीवनाचा नाश

जीवन हे नश्वर आहे
सांगितले गौतम बुद्धाने
पंचशीलाचे पालन करूनी
चालूया सुखाच्या मार्गाने

**श्री. रवींद्र चालीकवार**
**महागाव**
**मो.9011559106**

# विरह



वीरह म्हणजे काय?
मनी फक्त एकमेकाचा ठाव
जिथे स्पर्शाचा अभाव
फक्त मनातीलच भाव
आणि स्वप्नांचाच गाव

विरह म्हणजे काय?
समोर फक्त दिसल्याचा भास
वाटी सतत आसपास
पण खोटे खोटे सारे
असतो फक्त आभास

विरह म्हणजे काय?
मनात विचारांचा काहूर
एकमेका पाहण्यास आतुर
न भेटण्याची हुरहुर
कशासाठी असतात बरे
इतके मजबूर

विरह म्हणजे काय?
हृदय आपले जाळणारा
तुला मला छळणारा
भावनांशी खेळणारा
आणि आस लावून पळणारा

विरह म्हणजे काय?
एकमेकांसाठी जगणं
एकमेकांसाठी मरण
भावनेच्या सरणावर
रोजचेच मरण
रोजचेच मरण

**सौ. अपूर्वा पाटील**
**कोल्हापूर**
**9595812813**



# वन्यजीव शास्त्रज्ञ
## अश्विन वारूडकर (स्पायडर मॅन)

निसर्गाने कोळीला कीटकांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी दिली आहे, त्यामुळेच कदाचित "कोळी" जगभरात कानाकोपऱ्यात कुठे ही सापडतात. या कोळ्यांवर जगभरात संशोधन सुरु आहे. भारतात देखील गेल्या काही वर्षांत संशोधन सुरू आहे आणि चांगल्या प्रकारची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे सर्वसामान्य लोकां मधे ही याचे कुतुहल वाढले आहे.

मला आठवते लहानपणी खूप कुतुहल वाटायचे की हा कोळी इतक्या सहजपणे कसे जाळे विणतो? काय खातो? त्याच्या जाळ्यात अडकलेल्या कीटकांना तो कसा खातो? हे प्रश्न नक्कीच तुमच्या तसेच माझ्याही मनात भुरळ घालणारे आहे.

असेच प्रश्न मराठमोळ्या तरुण संशोधक अश्विन वारुडकरला देखील पडत होते. जेव्हा कॅरियर निवडायची वेळ आली त्याने कुतुहलाला प्राधान्य दिले आणि वेगळी वाट निवडून केन्द्रीय वन्यजीव संस्थेत पर्यावरण शास्त्र विषयात शिक्षण घेतले. अश्विनला आता त्याचे मित्र " कोळ्यांचा चालता बोलता एन्सायक्लोपीडिया " म्हणतात. दुसरी ओळख म्हणजे त्याला "स्पायडर मॅन" संशोधक म्हणून ओळखले जाते.

अश्विन वारुडकरचे संशोधन आपल्याला चकित करण्यासारखे आहे. पश्चिम घाटात कोळ्यांचे असंख्य प्रकार असून ते सहजपणे कुठेही प्रवास करतात. एखाद्याच्या बॅगवर, कपड्यांवर लटकलेला कोळी, त्याचे पिल्लू बसले की ते कुठे ही जाते. वातावरणातील बदलानुसार जुळवून घ्यायची त्यांची तयारी असते. जाळ्यासह वाऱ्याने उडणारे देखील कोळी आहेत. प्रत्येक कोळ्याची शिकार करण्याची पद्धत, जाळे बांधण्याची पद्धत वेगवेगळी आहे. कीटनाशकांच्या वापरामुळे कोळ्यांच्या खाद्यावर काही परिणाम होतो का ? याचा अभ्यास करण्याची गरज आहे.

कोळ्यांचे असंख्य प्रकार असून मुंगीच्या आकार पासून ते हाताच्या पंजा एवढे मोठे कोळी आपल्याला दिसतात. जायंट वूड स्पायडर हा महाकाय कोळी जंगलात सापडतो.

विविध प्रकारांची कोळ्यांची घरटी संशोधकांना चकित करतात. तंबू सारखे जाळे विणणारा, जंगलातील झाडांच्या खोडातील पोकळी मधे जाळे विणणारा, जाळे पूर्ण झाल्यावर विशिष्ट द्रवाने जाळ्यावर स्वाक्षरी करणारा कोळी असे विविध प्रकार सापडतात. काही कोळी जाळे विणत नाही.

कोळी उत्कृष्ट शिकार करतात. कीटकांवर नियंत्रण ठेवण्याचे काम निसर्गाने दिले आहे.

परदेशात कोळ्यांना पाळण्याची खूप हौस आहे. आपल्याकडील पश्चिम घाटातील कोळ्यांची मोठ्या प्रमाणात तस्करी होते. जगभरात आतापर्यंत त्रेपनशे पेक्षा जास्त प्रकारच्या कोळ्यांची नोंद झाली आहे. कोळ्यांची वर्गवारी त्यांच्या जाळे विणण्याच्या पद्धती वरून केली जाते.

अंदमान निकोबार येथे संशोधन करतांना वन संवर्धन आणि विकास यावर लक्ष देणे किती गरजेच आहे,हे अश्विन आवर्जून सांगतो. नाहीतर कितीतरी जाती यातर लोप होत आहे किंवा आजून तरी शोध लागला नाही. विकास करण्याच्या नादात आपण संवर्धन कडे लक्ष देत नाहीत, या साठी नीतिनियोजन आवश्यक आहे. अंदमान निकोबार येथे संशोधन करतांना एक विशिष्ट दुर्मीळ प्रकार चा कोळी आढळून येतो, तो आपले घर झाडाच्या फांदीवर बिळ बनवतो आणि फांदीचा एक तुकडा घेऊन त्या बिळाला झाकण लावून ते बिळ बंद करतो. हे ही खूप आश्चर्यकारक आहे.

हे किती आश्चर्यकारक आहे की कोळी किंवा कीटक यांचा रक्ताचा रंग पांढरा असतो कारण की हिमोग्लोबीन



नसल्यामुळे रक्त पांढरे रंगाचे असते.

जाळे बनवण्यासाठी सिल्क हे कोळ्याच्या पोटामधून निघते. यांच्या पोटामधे सहा वेगवेगळ्या ग्रंथी असतात, प्रत्येक ग्रंथी मधून वेगवेगळे धागे निघतात, काही कोळ्यांचे धागे स्टीलचे धागे येवढे मजबूत असतात. नर आणि मादी मधे वेगवेगळे धागे बनवण्याची क्षमता असते. कोळी विष बाहेर टाकतात, हे विष ते कीटक खाण्या करता वापरतात.

हा तरूण संशोधक सध्या केंद्रीय वन्यजीव संस्थेमार्फत गंगानदीतील डॉल्फिनच्या संवर्धन प्रकल्पात काम करतोय. "कोळी" वरती त्याचे संशोधन खरोखरच कौतुकास्पद आहे, जिथे विशेष त्यावर माहिती उपलब्ध नाही,काही डेटाबेस नाही किंवा यावर कुणी आधी संशोधन केले नाही जेणेकरुन मार्गदर्शन मिळू शकेल अश्या परिस्थितीत त्याचे कार्य कौतुकास्पद आहे.

अश्विन वारूडकर, तुला पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा !!

**सौ. रश्मी पिंप्रीकर**
**वडोदरा (गुजरात)**
**मो. 8128059820**

# शिकून घे...



वाणीत जरा मध मिसळणे शिकून घे..
सकला जरा प्रितीने बोलणे शिकून घे..

मौनाचे दोस्ता तुज सांगतो ढीगाएवढे फायदे,
म्हणुनि मुखाला वेळेवर उघडणे शिकून घे....

काही बोलण्याआधी थोडा विचार कर,
स्वतः विचाराला तोलणे शिकून घे....

तू तंडण असो वा असो तू-तू मी-मी,
स्वतःला स्वतः टोकणं-रोखणं शिकून घे....

अरे तू फटाका होऊन फाटण्याआधी,
प्रकाशात जरा रंग भरणे शिकून घे...

तुझे कटु शब्द तर जणू की टोचतात काटे,
मधुर शब्दांचं गुलाब रोपन शिकून घे....

शब्द अपशब्द तुज टोचतात जेव्हा,
'कटुता' ती मधुरतेत बदलणे शिकून घे..,

हे कोण सांगतं की ओठ शिऊनच बसून रहा,
जरुर असता ओठ उघडणेही शिकून घे....

**श्री. का.रा.चव्हाण**
**अमरावती**
**मो.८५५२८३३८३९**

# “स्त्रीचे अंतर्मन”



जन्मापासुन ते अखेरच्या श्वासा पर्यन्त आपला विचार न करता परिवार जोडून ठेवणाऱ्या त्या स्त्री च्या अंतर्मनास कोटि नमन अनेक नाती जपत,पुढे सरसावणारी अशी, मनातील कोंडमारा न दाखवता जीवन जगण्यास सकारात्मक ऊर्जा प्रदान करणारी म्हणजे स्त्री, काळ आणि परिवर्तनाच्या घिरक्यात घिरकि मारणारी आणि आपल्या सोबत परीवार समाज याना देखील मार्गस्थ करणारी,शैशवातील ती तुपरोटी,लक्ष्मी असूनही वाटत असते सर्वांना की मुलगी का झाली. तिच्यावर जन्मापासूनच कोल्हुचा बैल, तिच्या मनाचा विचार कोणी केलाच नाही.

पण तिने कधी हार मानली नाही मनातील पाहिजे नको त्या विचाराना हसत खेळत समोर जाऊन घर परिवाराची कड़ी बनत मोठी होते. जवानीच्या यौवनातील उमबरठयावर पाऊल ठेवताना देखील मन,फूलपाखरा सारख उड़त असत पण विचार सदैव आपल्या परिवाराचा.मित्र मैत्रीणित रमणारी पण स्त्रीच असते.

आपल्यावरील आत्मविश्वास ढळु न देता जीवन सरस बनवणारी स्त्रीच.तीच अंतर्मन समजणे जरा कठीणच आत्ता घरातील विचार तर काहि सेकंदात आणि कुठे धावते तीचे मन माहित नाही.तिच्या मनाचा कानोसा घेता वाटत की स्त्रीचे मन अथांग सागर आहे घर परिवार समाज यांच्या मधील दुवा तीच असते एकटे पणा परिवार त्यात ती कधी स्वतःला रमवते कधी ती घटस्फोटित तर कधी टाकलेली,कधी वरांगनेच्या भूमिकेत अशा अनेक भूमिका निभावुन स्वतःच मन खंबीर ठेवत ती समाजात वावरत असते प्राचीन काळापासून ते आज आधुनिक काळा पर्यन्त तिची भूमिका तीच पण कलांनुरुप ती पण बदलली आणि स्वतः ला अधिक खंबीर बनवल यात वादच नाही,

पण बदलत युग बदलती जीवन शैली डिजिटल युग यातून स्त्री साठी काहि व्याख्या बदलल्या का?यावर अजूनी शंका कुशंका मनी येतात.सासुचा जाँच म्हणा किंवा विधवा स्त्री एकटी राहणारी नोकरी व्यवसाय करणारी या स्त्रियांना अजुन मानसिक शरीरिक त्रास सोसावा लागतोच महिला दिवस म्हणुन कोड़कौतुक भरपूर होत.तीचे सन्मान पण होतात शाल फूल देऊन कौतुक होत पण तीचे होणारे दमन शमन अवहेलना थांबली का? अस वाटत आज वैचारिकतेला महत्व आहे तुम्ही स्त्री बद्दल काय विचार करता,पुरुष प्रधान संस्कृतित तिच्या कड़े बघण्याचा दृष्टिकोण बदलला का? अजूनी दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते यावर विचार व्हावा असे वाटते.

महिला दिन साजरा करताना अस मला विचारावस वाटत खरच आपण तिचा सन्मान करतो का ?सर्व काही आता डिजिटल झाले,स्त्री ही शिकलि ग्रामीण असूदे वा शहरी ती कमजोर नाही मजबूर आहे,तिने तिचा आजवर कधी वीचार केलाच नाही ती जगली झटली परिवार समाज या साठी पण आपण तिला समाजलोच नाही अस वाटत ना

आजच्या या आधुनिक काळात स्त्री सुरक्षित आहे का ? स्त्री वर होणारे अत्याचार मानसिक असोत वा शारीरिक जन्मापासुन च सहन करत येते मुलीला लक्ष्मी तूप रोटी अश्या अनेक नावाने संबोधतो पण वैचारिक पातळी बदलली का ? पुरुष संस्कृति बदलली का? स्त्री कड़े बघण्याची नजर बदलली का? ह्याची उत्तरे अजूनी नाहि मिळाली का? बलात्कार का होतात कधी पुरुष नराधम बनतो ह्यावर उत्तर अजूनी मिळत नाही आणि ह्यांचे उत्तर मिळेल तेव्हा स्त्री सुरक्षित बनेल कितीही परिवर्तन झाले तरी वासना जोवर कमी होत नाही हे होणारच ह्यावर एकच उपाय अरे कायद्यात काही तरी बदल करा आरोप सिद्ध झाले की लगेच फाशी द्या.

आरोप सिद्ध करण्यास पुरावे गोळा करे पर्यन्त अश्या किती घटना घड़तात हिशोब नसतो म्हणुन भीति हा शब्द बलात्कार करणाऱ्याला नाही अपराधी अपराध करत च रहातो त्याला शिक्षा मिळत नाही मग स्त्री कशी सुरक्षित राहील याला उपाय एकच त्यांना मारा किंवा कड़क शिक्षा द्या.पण आता स्त्रीया हताश हतबल आहेत कुठेही गेल्या मूली बाळी तरी घरच्याना ती येई पर्यन्त काळजी वाटते सांभाळून रहा किंवा अनेक अश्या प्रकारचे उपाय स्त्रीलांच सांगितले जातात पण पुरुषांना काय सांगावे बलात्कार करु नका सरकार पण गप आहे मग ह्याला उपाय काय ?जात पात सोडून आता समाजाने जागे झाले पाहीजे श्रध्दा सारख्या घटना खुप वाईट आहेत, अगदी शर्मनाक असे होवू नए म्हणुन सरकार ने जागे झाले पाहीजे कड़क कायदे केले पाहिजेत.

candle March नको आता हातात शस्त्र घ्या तिथल्या तिथे मारा किंवा काहि तरी उपाय मूली कड़े असला पाहीजे, मुलिना आता दुर्गा देवी बनाव लागेल मुलींना आपण 7 नंतर बाहेर पाठवत नाही पण किती दिवस कुठेतरी हे सर्व बदलल पाहीजे मुलींना स्वछन्द उडायला आज समाजानी संस्थानी एकत्रित मिळून काही परिवर्तन घडवून आणणे जरूरीचे आहे सरकार पोलिस यंत्रणा याना देखील हे एक आवाहनच आहे आज स्त्री सुरक्षा हा प्रश्न ऐरणीवर आहे

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते
रमंते तत्र देवताः
ह्या वाक्याला कधी न्याय मिळेल

**प्रा. मनीषा नाडगौडा**
**बेळगाव**
**मो. 9241523418**



---

# मैत्री



मैत्रीमध्ये खरोखर
एकमेकांची मने जुळतात
सहवासाने दोघेही
मनोमन आनंदतात

भेट नाही झाली तर
दिल धडधड करतो
अविचारांचे काहूर
मनामध्ये तो उठवतो

दोस्ती आहे खरी
जगामध्ये छान,प्यारी
विश्वासाच्या धाग्यांनी
गुंफलेली नाळ भारी

मैत्री सर्वांना शिकवते
सभोवतालची दुनियादारी
चुकल्यावर कान उघडणी
एरवी आनंदाची गगण भरारी

दिल,दोस्ती,दुनियादारी
सर्वांनीच जपावी मनी
मिळते सर्वांनाच इथे
यशश्रीची हमी जीवनी

**श्रीमती संध्याराणी जयहिंद कोल्हे**
**कळंब जि.धाराशिव**
**मो.8788591371**

# खरी भेट



गौरी गणपती नंतर आपल्याकडे सणांची, उत्सवांची नुसती धामधूम सुरु असते. छोटे छोटे सणवार तर भरपूरच असतात. त्यात सर्व धर्मांचे, राष्ट्राचे उत्सव सुद्धा असतात. यांपैकी मुख्य दसरा सणं मोठा आणि मग तर दिवाळी हा सणांचा राजा पाठोपाठ येतोच. दिवाळी म्हणजे वसुबारस पासून ते भाऊबीजेपर्यंत अनेक सणांचा संचच! बहीण भाऊ, पती पत्नी यांच्या बरोबरच सर्व नातलगांच्या एकमेकांच्या प्रती असलेल्या.. आपुलकी..प्रेम..मैत्री..आदर

जिव्हाळा जपणारा..वाढवणारा असा हा अतिशय आनंदाचा,उत्साहाचा सणं. हा सणं सर्व देशभरात सर्व जाती धर्मांचे लोक गरीब असो वा श्रीमंत एकत्रपणे धुमधडाक्यात साजरा करतात. सर्व बाजारपेठा कपडे, दागिने मिठाया, फटाके, विविध प्रकारचे दिवे,पणत्या

तर्हेतर्हेच्या भेटवस्तूनी फुललेल्या असतात.

सर्वजण एकमेकाना फराळ,मिठाया,भेटवस्तू देतात. पण मलाच काय सर्वांनाच हा नेहमी मोठ्ठा प्रश्न पडत असणार की भेट म्हणून काय वस्तु द्यावी ?

प्रत्येकाकडे त्यांनी आपापल्या आवडीनुसार सर्व खरेदी केलेल्या वस्तु असतातच. आणि आपण दिलेली वस्तू त्यांच्याकडे असेल तर डबल वस्तूंचे काय करणार.. नवीन वस्तू दिल्या तरी हल्ली चार दिवस वापरली जाते आणि पुन्हा त्याची अडचणच होते.घरे लहान असतात, किती ठेवायच्या असे होते...पण इतक्या प्रेमाने दिलेली म्हणून टाकताही येत नाही आणि ठेवायचीही पंचाईतच होते.मिठाया नाशवंत असतात.ड्रायफ्रुट्स खूप महाग असतात.चॉकलेट्स ची गिफ्ट पॅकेट्स द्यायची तर हल्ली कोणाचे डाएट, कोणाला शुगर, मुलांना दात खराब होतात म्हणून देत नाहीत. त्यामुळे ते द्यायची पण पंचाईतच होते.

पण गेल्या2 वर्षातील दिवाळीत मला यावर खूप छान पर्याय सापडला. सुरुवातीला अशी गिफ्ट सर्वांना आवडेल की नाही याबद्दल थोडी साशंकच होते पण तरीही मी त्या वस्तू खरेदी करून सर्व जवळच्या लोकांना खास 'दिवाळी भेट' म्हणून दिल्या. आणि काय सांगू सर्वांना त्या फक्त आवडल्याच नाहीत तर सर्वांनी मनापासुन कौतुक सुद्धा केले.

मला लहानपनापासुनच वाचनाची खूप आवड. दिवाळीच्या सुट्टीत तर आम्ही मैत्रिणी दररोज संध्याकाळी खास वाचनासाठी म्हणून मोठ्या लायब्ररीत जायचो.अगदी चान्दोबा,चम्पक, अमृत पासून अनेक कथासंग्रह, कादंबऱ्या,लघुकथा,प्रवासवर्णने भरभरून वाचली. वाचनालयातून घरी आणून ताजे दिवाळी अंक वाचताना खूप मजा येते. म्हणून मी विचार केला,सर्वांना निरनिराळे दिवाळी अंकच भेट म्हणून दिले तर ? म्हटले काही तरी आणायचेच, ते तर आवडेलच याची काय खात्री, मग पाहूयाच दिवाळी अंकच भेट देऊन. आणि खरंच सर्वांना ही कल्पना खूपच आवडली.

दरवर्षी दिवाळीच्या सुरुवातीलांच अक्षरशः शेकडो दिवाळी अंक निघतात.त्यात कला,क्रीडा,राजकारण,अर्थविषयक,काव्य, विषयक, व्यंगचित्रं, विनोदी, वैचारिक, ललित,विनोदी,वैचारिक,सामाजिक,धार्मिक अध्यात्मिक, आरोग्य,आहार,पाककृती अशा अनेक विषयांवरील साहित्याचा जणू खजिनाच

वाचकप्रेमीन्साठी उघडलेला असतो. असे विविध दिवाळी अंक खरेदी करून त्यांच्या आवडीनुसार भेट देता येते. लहान मुलांसाठी सुद्धा छान छान अंक प्रकाशीत होत असतात. गिफ्ट मुलाना खुप आवडतात. त्यान्च्यासाठी म्हणुन खास जर ते भेट म्हणून दिले तर ते नक्कीच वाचतील. हळू हळू त्यांना वाचनाची आवड निर्माण होईल. नाहीतर ही पिढी मोबाईल,कॉम्पुटर मध्ये इतकी गुंतली आहे की त्यांना पुस्तके वाचनाचा खूप कंटाळा येतो. शिवाय हिच अशी एक गोष्ट आहे की ती कधीही शिळी,जुनी होत नाही. ज्ञानात वाढ होते,करमणूक होते.विचार चांगले होतात. त्यामुळे मनाचे आरोग्य छान राहते.त्यामुळे आरोग्यही सुधारते.त्यामुळे यांच्यापेक्षा छान दुसरी कोणती भेट उत्तम असेल...

मराठीत काहीच नवीन दर्जेदार साहित्य बनत नाही असे म्हणणारे काही महाभाग आहेत. खरेतर कितीतरी संपादक खूप कठीण अवस्थेतही अंक प्रकाशीत करत असतात.खूप मोठी जबाबदारीच असते ही.तरीही ते सतत झगडत नवनिर्मिती करतात.ज्यांना शक्य असेल त्यांनी,संस्थानी त्यांना आर्थिक मदत करून,जाहिराती देउन प्रोत्साहन द्यायला हवे.पण सर्वांना जाहिराती मिळवून देणे शक्य नसते अशांनी किमान शक्य तितकी पुस्तके, दिवाळी अंक विकत घेऊन त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे. त्यामुळे साहित्य निर्मितीस नकळत का होईना खारीसारखी मदत करणे शक्य होईल आणि गिफ्ट काय द्यावे हा मोठा प्रश्नही मस्त सुटेल.

गेल्या वर्षी आम्ही भिशीतील मैत्रिणींनी प्रत्येकीने एकेक वेगवेगळा दिवाळी अंक खरेदी केला आणि मग तो वाचुन झाल्यावर एकमेकींना वाचायला दिला. सर्वांचे वाचून झाल्यावर जवळच्या लायब्ररीत नेऊन सर्व वाचकांना वाचण्यासाठी म्हणून दिले. यंदाही आम्ही सर्वांचे पैसे एकत्र करून सगळ्या मिळून अंकांच्या शॉपिंगला जाणार आहोत. वेगवेगळी रोपे,

पुस्तके,दिवाळी अंक अशा ज्ञान, आरोग्य,पर्यावरण सुधारणाऱ्या भेट वस्तू हिच खऱ्या अर्थाने उपयुक्त भेट ठरेलं.

**सौ. स्नेहा मुसरीफ**
**पुणे**
**मो.9503434424**



# पथ तरात्म्याचा



पथदर्शक, नेतृत्व नसे कोणाचे
सहज स्वच्छंद मार्ग आत्म्याचे.
सत्याचे...नम्रतेचे...विश्वासाचे
सद् विवेक मतीने भरलेले.

जोड वाटा येऊन मिळती मोहाच्या
मनमोहक दिशा त्या विषयांच्या.
चंचल करती भावना मनाच्या
झेपावती पाऊले पथावरी लोभाच्या.

भरकटला मार्ग, कामनापूर्तीत जो रमला
भुलभुलैयांच्या ताटव्यात अलवार फसला.
लुटण्यात मकरंद जीव हा गुंतला
सात्त्विकतेचा पथ मग ऐसे भुलला.

पाऊलवाट होती ही भुरळ घातलेली
खडतर..खाचखळग्यांनी भरलेली.
संकटांनी, इंद्रिय इच्छेने ग्रासलेली
होता मार्गस्थ उशिरा जाणवलेली.

पर नसे आता थांबा परतीचा
अपरिहार्य असे चालत राहण्याचा.
शोध शोधितो पथ आरंभीचा
मार्ग आक्रमितो तिथे पोहोचण्याचा.

जाणवले जयांसी हे अंतरिचे बोल
उमजले तयासी धार्मिकतेचे मोल.
घेऊनी संयम सोशिकतेचा मेळ
पोहोचेल तिथे त्यागून मोहाचा खेळ.

सत् वचनांचे बोल ऐकिल अंतरिस्थ
ताणतणाव विरहित राही तटस्थ.
इंद्रजीत हा अनमोल पांथस्थ
सुंदर,सहज करे मनाचे स्वास्थ्य.

**डॉ.सुनिता चव्हाण**
**मुंबई**
**मो.९२७००६३६०२**

# निसर्ग



नीरव शांतता !

होय,

पाहटेची नीरव शांतता ! ज्यात रव नाही आवाज नाही सगळं कसं स्तब्ध ! अशीच. आकाशात धुसर चंद्रबिंब,अंधुक चांदणे, हवेत बोचरी थंडी, गर्द धुके, शुभ्र दुलई लपेटून घेतलेली अवनी ! रात किड्यांची किरकर, अधूनमधून.

दवबिंदु चा सडा, चुहकडेच पसरलेला. हिरवीगार गवत पाती,त्यावर दवबिंदु चिकटलेले. चंद्रकीरणात मोतीयाचे दाणे होऊन चिकटले होते.जस काही, आपल्याच तोऱ्यात ऐटीत, मिरवीत होते ! अगदी अमुल्य दागिनाच त्याच्या कोंदणात बसलेला वाटत होता ! अजून रात किड्यांचे साम्राज्य होतच, कुठेकुठे फुलू पहाणार्या कुंद कळ्या, सोबत,

रात पक्ष्यांची फडफड,थंड गार वाऱ्याची झुळूक. अंगावर काटा आणणारी !

ओढ्याच्या पाण्याचा खळ खळणारा आवाज, एकाद्या सवाष्णीच्या चुड्या गत किणकिणत होता ! झाडावर वेलीवर चमकणारे काजवे. पश्चिमेला शुभ्र शुक्रतारा, त्याच लोभस चकाकणारे व्यक्तिमत्त्व, हिऱ्यांच्या खड्या गत पाझरणारे शुभ्र दुधाळ रेषा ! टप्पोरा शुक्रतारा, समवेत असंख्य गगनातील तारका. चमचमणाऱ्या चंद्रकळा साडीगत लखकणार्या, नखशिखांत, शांत श्रांत अवनीच रुप मूक पण बोलकं. गर्द झाडी पलीकडे डोंगर रांगा ! आकाशात दिसणारे नक्षत्रे, स्वर्ग च अवतरला असे वाटणारे, विहंगम दृश्य. जे डोळ्यात ही समावत नव्हते !

उगवतीचे साक्ष देणारे, बदलणारे काहीं आकाशी रंग, किंचित जांभळा केशरी, ताम्बुस छटानी उघडत होता. मध्येच किरमिजी रंग, मावळत जाणारा शुक्रतारा. पाण्यात बर्फ वितळलेल्या सारखा अस्पष्ट होत होता.

मध्येच पक्ष्यांची थोडी हालचाल, चुळबुळ, फडफड, शुभ्र उमळणारी तगर, प्राजक्ताचा सडा विखुरलेल्या अवस्थेत लक्ष्य वेधुन घेत होता. त्याचा गंध रानोमाळ पसरलेला. मध्येच वटवाघुळ पक्षी आपले अस्तित्व दाखवत, गवसणी घालुन आजूबाजूच्या झाडावर लुप्त झालेला !

ओढ्याच्या कडेला मोरांच्या केका साद घालीत, त्यांचे ऐटीत मान वर करून चालणारे पद लालित्य. उगवतीला तांबडं फुटून झुंजू मंजू झालं असेल नसेल तस,

चिमण्यांचा किलबिलाट, घराघरात लागणारे दिवे. आळस झटकुन उघडणारे दरवाजे ! सडा समार्जन साठी बाहेर आलेल्या ललना. मंदिरातून पलीकडून येणारा घंटा नाद.

झोपडीतून येणार धूर व त्यात मिसळणारे दाट धुके.

टिपेच्या आवाजात येणारी

नमाजची बांग व कोंबड्या चे अरवणे, त्यातच घंटा नाद व चिमण्याचा चिवचिवाट, ध्वनी सरगम,

पार्व्यांची घुटूरघुम ही सर्व अवनीला जाग आल्याची नांदी. शुभ्र धुक्याची चादर व बोचरी थंडी !

सोनेरी किरणांची वरात,सहस्त्र रश्मीने बाहेर पडत, ऐटीत झाडातून कवडसे धारण करीत. अवनीला आलिंगन देत होती.तिचे चुंबन घेत होती, त्यातच गाई म्हशीचे हंबरणे, त्यांच्या गळ्यातील घुंगरूचे आवाज, शेतीकडे जाणारी काही आकृत्याचे वर्दळ पाणंदमध्ये, धुक्यात भिजलेल्या पाऊल वाटा, शीत वाऱ्याची झुळक, चिमण्यांचा चिवचिवाट, मध्येच कुठून तरी भारद्वाज पक्षी ह्या फांदीवरून त्या फांदीवर जात, त्याची शोधक नजर, कदाचित दर्शन देण्यासाठी अवतरला असावा. त्याला काय पाहिजे हे न कळणार ! विचित्र कोड्यात हरवल्या सारखा, त्याचे तांबडे डोळे व पंख उठून दिसणारे.

कुहुकुहू अशी साद आम्रवृक्षावर, आंब्याचा मोहर फुटून त्यातुन येणारा सुगंध, कुठंतरी लहान मोठया

कैऱ्या लांब देठावर हेलकावे घेत, सगळ्यांची नजर खेचुन घेत होत्या. सोबत राघु मैनेची जोडी त्यांचाच दिमाखात. हिरव्या कच्च्या कैरीवर चोच मारत, विठू विठू

मिटु मिटु ची भाषा, लांब बाकदार लाल चोच, पोपटी अंगरखा घातलेली जोडी.

जवळच्याच विहिरीवर येणारा मोटेचा आवाज, बैलांच्या गळ्यातील घुंगरूचा आवाज, पाटात पडणारे पाणी. विहिरीच्या कडेला भिंतीतून फुटलेला पिंपळ, त्याच्या फांद्यांवर लोम्बकळणारी कित्येक सुगरणीची अधोमुखी घरटी. घरट्यात असणारे चिमुकले जीव. मध्येच फडफड करत उडणारे मोर त्यांच्या केका

पटातील पाण्यात चोच मारणारी साळुंकी. व त्यांचा थवा खाद्य आराधना करत.

सकाळ होऊन एक कासरा वर आलेला सूर्य तसा

हवेत आलेला उबदारपणा पण. पानंदीच्या वाटेवर वर्दळ वाढलेली. मळ्यातील वस्तीवर चाललेली काम झोपडीतून येणार धूर त्याची साक्ष देत होता.

वाड्या वस्त्यावर जाग आली तशीच, गावच्या पाणंदीकडे पण वर्दळ वाढीला लागली. एव्हाना सुर्याने धरतीवर लाल रंगाचा मळवट भरला होता. पाणंद ची पायवाट मळलेली, थंडीच्या गार वाऱ्यामुळे जमिनीत ओलावा ! ठिकठिकाणी दिसत होताच, धुक्याची चादर

आता कमी कमी होत असतानाच, पाणंदीच्या दोन्ही बाजुस शेंड एकमेकात गुंतून गच्च बसलेली. ते कमी म्हणुन की काय त्यातच अनेक वेलीनी आपला संसार उभा केलेला ! त्या वेलीची पांढरट व लाल चुटुकदार पाने पाहुनच,डोळ्यांना समाधान मिळत होतच, शिवाय फुल पाखरांची गर्दी पण जमा झालेली. रंग लुब्ध पाखर, रुंजी घालण्यात गुंग झालेली. मध्येच कुठंतरी फडया निवडुंग आपलं अस्तित्व ताठ मानेने करत होताच. बाभळीच्या झाडांची संख्या त्यात भर घालत होतीच. पिवळ्या जर्द फुलांची आरास व बाजुला लांब शेंगा व असंख्य काटेरी जाळ विणलेला हा प्राणी अगदी तटस्थपणे दिमाखात उभा होता.अगदी प्रौढ असल्या सारखा त्याच्या अंगावर अनेक गांठी मुळे बाभूळ प्रांजळ वाटत होता. त्याच्या गाठीतून झिरपणारा चिकट स्त्राव, त्यावर फिरणाऱ्या शिस्तबद्ध काळ्या

मुंग्या !

तशी ही पायवाट तुडवून तुडवून, मळवाटीत धुरळ्याने चिकट झालेली. बैलगाडी, जनावर,, अधुन मधून बकऱ्याचा तांडा घेऊन जाणारे धनगर यांच्या खास परिचियाची व आवडती वाट. जरा वरच्या अंगाला वळलंकी शेतीमळाच फुलेला होता. त्याच्या उजव्या बाजुला अखंड वाहणारा गोड्या पाण्याचा ओढा, झुळझुळ वहात होता. आजूबाजूला दाट झाडीत लपलेला ओढा. तसा बक्कळ रुंद होता. दाट हिरव्यागार झाडीत, अनेक पक्ष्यांचे घरटी नांदत होतीच. पण मनमोहून घेणारे मोर, लांडोर यांची दाट वस्ती सुखनैव जगत होती. त्यांच्या प्रभात समईच्या केका व त्याला मिळणारी साद, अवचित उतरणारे त्यांचे दिमाखदार समुह, मन प्रसन्न करीत होती.

ओढ्याच्या दोन्ही कडेला असणारी हिरवीगार शेती व त्यांची घरे सुद्धा टुमदार वाटत होती. मका गहू, हळद,ऊस, सर्व प्रकारच्या भाज्या इत्यादी नी, हिरवं स्वर्गीय आंनद उपभोगणारा बळीराजा त्यात त्यांना मिळालेले निसर्गाचे वरदान. मध्येच कुठं तरी झाडाखाली मयूर नृत्य देखावा हे वैभव त्यांना कायमचंच नशिबी होत. एवढंच काय

चक्क सर्प व सर्पिण यांचं गळ्यात गळा घातलेलं प्रेम शृंगार नृत्य, हे पण कायमचच !

विविध पक्ष्यांचे आवाज व ओढ्यातील पाण्याचा आवाज यांची जुगलबंदी सुद्धा नेहमीची ! त्यांना त्यात काही अप्रूप वाटत नव्हतंच ! दोन्ही बाजुला ओढ्यात कपडे धुणी भांडी घासली जात होती व तेथील बायकांचा राबता हा पण नेहमीचाच. मध्येच कोणी बाळ चमु

पाण्यात मनसोक्तपणे डुंबत जलक्रीडा करणारा,शैशवं जपणारा. घरातील झाडून सगळी जनावरे इथेच येऊन पाणी पीत असत. ओढ्या कडेने असणारी

उतरतीला शेळ्या मेंढ्या बकरी यांचं मुक्त संचार ! चुकून एखादेवेळी सलींद्र बाहेर पडत असे ! काहीवेळा

नागराजच दर्शन पण मिळत असे!

पण कोणत्याही प्राणी मात्रांचं भय कुणालाही नव्हतं ! व प्राण्यांना पण !

“ जिओ और जिने दो” च राज्य दिलखुलास पणे मुक्त पद्धतीनं नांदत होत !

साखर कारखाने असलेतरी कैक गुर्हाळही गुळ करण्यात पटाईत होती. बाजुने जाताना त्याचा एक विशिष्ट असा वास येत होताच. त्यांचं काम सकाळपासून ते संध्याकाळ पर्यंत चालुच होत. येणारा जाणारा गूळ खाऊन, उसाचा रस पण पिऊन तृप्तीची ढेकर देत होताच.

तसं दिवस कासराभर वर सरकलेला. सूर्य डोक्यावर आलेला, राबणारे हात पाय जरा मरगळलेल्या अवस्थेत. अंगावर घामाच्या धारा ! अंगावर म्हणाल तर फक्त अर्धी चड्डी, अन मांजरपाटच शिवलेला बनियन उर्फ बदाम ! ते पण घामाच्या धारांनी रापलेले, कळकट झालेले. तस सगळे राबणारी कष्टकरी आपापल्या पाणवठ्यावर आली व यथेच्छ मनसोक्त गार पाण्यात अंघोळ करीत असत. सोबत अंग घसणीला चपटा दगड असणारच ! कुणाचं पम्प चालु होता, तर कुणाची स्वतः ची विहीर तर कोणी चक्क ओढ्यावर येऊन अंघोळी करत असलेली !

तस तेव्हढीच त्यांना अंघोळीने तरतरीतपणा आलेला दिसत होताच. त्यांची पावलं आता झपझप आपल्या पालाकडे वळली, पोटात आगीचा डोंब उसळलेला केव्हा एकदा भाकरी खाईन अस झालेलं

बऱ्याचजणानी घरून बांधून आणलेली शिदोरी सोडलेली. तर काहीजणांच्या बायका डोईवरन बुट्टीत जेवण बांधून

आणलेल्या असत. त्या पण आपल्या धन्या बरोबरच जेवण करत असत. राबणारी गडी जेवण करून सुस्त होत. वामकुक्षी साठी तिथंच, झाडाखाली आडवी होत असत.

काहीजण चंची सोडून सुपारीच खांड तोंडात टाकीत, वर पानांची देठ खुडून त्याला अंगठ्याने चुना लावून तोंडाखाली दाबत असत. त्यावर तंबाकू चोळून जिभेवर अलगद सोडत असत. घटकभर विश्रांती झाली की, परत ताजेतवाने होऊन कामाला लागत. कोण भांगळण, कोण कोळपणी, कोण पाणी पाजवण अशी सगळी काम झाल्यावर, इकडे त्यांच्या बायका शेळ्या मेंढ्या म्हैस काही असतील त्या जनावरांना बांधावर चरण्यासाठी सोडत असत.

काही बायका मळ्यातील माळवा विविध भाज्या तोडून आपली टोपली भरून घेत असत. त्यातील काही घरी खाण्यासाठी ठेवून उरलेली त्या बाजारात विकत.

दिवस मावळत होता सावल्या जरा लांबलचक पडत होत्या. मावळतीला सप्तरंगाची उधळण चालू होती. केशरी नारंगी पिवळसर ! सूर्य एकदम मोठा लाल भडक होऊन मावळला. पक्ष्यांची गडबड चालू झाली. आपापल्या घराकडे परतण्याची त्यांना घाई झाली. चित्र विचित्र आवाज आसमंतात निघत होताच. मध्येच पांढऱ्या शुभ्र

बगळ्यांची माळ मावळतीकडे लयबद्ध सरकताना दिसत होती. जणू लांबलचक शुभ्र फुलांची माळ घेवून ते रानदेवतेला घालण्यास निघाले होते !

मध्येच खंड्या उच्च स्वरात चित्कार करीत गप्प झालेला. सुतार पक्षाची टकटक थांबलेली. एव्हाना पूर्ण सायंकाळ होऊन थंडीचा गारठा वाढलेला होता. तारांगण सजल होत मध्येच कुठंतरी वटवाघळाचा

समूह आवाज करीत झाडात गप्प होत होता. घुबडाच विशिष्ट ध्वनी आवाज भय कंपित करत असतानाच, टिटवीच पण केकाटण शांततेचा भंग करत होते.

बरीच मंडळी आपल्या पाणंदच्या रस्त्याने घर जवळ करत होते.. त्याच्या दुतर्फा वाढलेली झाडी व शेंड, झाडीत आता रातकिड्यांची किरकिर !

रस्त्याने जाणारी जनावर ! त्यांच्या गळ्यातील वाजणार घुंगरुचा लयबद्ध आवाज. थंडीने आता धुक्याची चादर घातलेली. मध्येच मोरांचे केकाटणे चालू होतेच. कुत्र्यांचा भुंकण्याचा आवाज

गावची वेस आल्याची साक्ष देत होता.

गावात सगळीकडे दिवाबत्ती केल्याने धूसर लाल प्रकाश धुक्यातून दिसत होताच. घरातून धुरांचे लोट बाहेर पडत हवा कुंद करत होते. घराघरातून चुली पेटल्याची खात्री ती धूरकांडे देत होतीच.

जनावर आपापल्या जागी दावणीत गेली. मालकांनी त्यांना तिथंच दोरखंडानी बांधलं. पुढ्यात कडवळची वैरण टाकून दिली. काहीजण धारा काढण्यासाठी चरवीत पाणी घेऊन बसले. समोर पेंड ठेवली व म्हसरच्या पाठीवर थापट मारत, कास धुतली व धारा काढून त्यांनी काही दूध घरी ठेवलं. तर काही दूध डेअरीकडे मोर्च्या वळवला.

दूध घालून झाल्यावर चौकातल्या वडाच्या झाडाखाली जो तो बसकण मारतोच. वडाच झाड हे अबालवृद्धांसाठी नित्याचे ठिकाण झाले होते. जणू आधारवड च ! वडाच झाड हे कित्येक वर्षांपासून त्यांच्या सुखदुःखाच्या आठवणीत रमलेला होता. त्यांचा भागीदारी सोबती होता

कित्येक गावच्या डोई त्यानं आपल्या हयातीत बघितल्या होत्याच !

बरीच मंडळी जमली होती. लहान चिल्लीपिल्ली वडाच्या पारंब्या धरून झोके घेत हुंदडत होते. तर कष्ट करून कामानी दमलेली हात चिलमीचा आस्वाद घेत होते. चिलीम एका हातातून दुसऱ्या हातात फिरत होतीच ! कोण चंची सोडून पानांची देवघेव करत होता तर कोणी सुपारी कातरत, शिळोप्याच्या गप्पा मारत होता. कोण तम्बाकुचा बार भरत अंतराळी बोलत होता.

एव्हाना थंडीची लाट वाढली होतीच, प्रत्येकजण आपल्या मनातील दुःख ओकत होता. आणि हे सारं गप्पाष्टक तो पुराणपुरुष वड

ऐकत होताच. वेळ होईल तस प्रत्येकांनी आपली घर जवळ केली व घरात आल्यावर त्यांनी दरवाजे आतून बंद केले.

वड एकटाच थंडीत स्तब्ध राहिला होता ते पण धुक्याची शाल पांघरून. त्याला ही एकट राहयची सवय झालेली ! उन्ह,पाऊस, वारा, थंडी, धुके,दिवस रात्र,चांदण, याची त्यांनी तक्रारही कधी केली नाही ! त्याचे पण कित्येक डोई इथंच नांदल्या !

तो मात्र आश्रम म्हणून जगण्यात धन्यता मानत होता ! कित्येक पक्ष्यांची घरटी त्याने अंगाखांद्यावर घेतली ! सर्प कपी सारखे प्राणी पण अंतकरणाने जवळ केले ! तो पुराण पुरुष

एकमेव सर्व घटनांचा साक्षीदार होता ! आहे ! राहील ! !

**डॉ. जी. आर. प्रविण जोशी**
**नसलापुर**
**मो.9164557779**



# जात



मानव मी,मानव मी,मानव मी
मानव हीच माझी जात भारतीय मी
कर्म माझे ठरवेल उध्दा चा कोण मी
ऋणी मातापित्यांचा जन्मलो भारतभूमी -मानव मी

जाती निर्मिती ही मानव प्रचिती
जातीची देणगी मिळे जन्माप्रती
पगडा जातीचा बंधन कठोर किती
माणसा माणसात भेदभाव निर्मिती --मानव मी

शरीरयष्टी,रूप,रंगकांती
घटक रक्ताचे कार्य क्षमता संगती
आचार विचारांची सारखीच गती
पण जाती भेदा ने वसे विसंगती -- मानव मी

शारीर, मन, सामाजिक, आध्यात्मिक
मूलभूत गरजा समान सर्वच साधक
जातीच्या भोवर्यात गुंतती एकेक
जाती अंतच घडविल मानवता ऐक्य--मानव मी

वेळ टळली नाही विसरू या जात
सामावून घेऊ सर्वांना एकमेकांत
आंतर जातीय आणि धर्मीय नांदू ऐक्यात
जाती अंत म्हणजेच एक मानव जात--मानव मी

उच्चनीच हा टळेल भेदभाव
सर्व सारखे समानता हाच भाव
संधी सर्वांना मिळेल समान वाव
भारतभूमी ठरेल एकोप्याचे  गाव--मानव मी

**सुधा पाटील**
**कोल्हापूर**
**मो.98503 97902**



# दीपोत्सव



तिमिर संपता
प्रकाश उधळण..
पणती सांगे
तेजोमय जीवन...

ज्योत जागवी
भयमुक्त हे मन..
लीनता वसो
माझ्या आतून...

उजळ दिव्या रे
मनामनातून..
नित तेवत ठेव
ह्यी माणूसपण...!

**ऋचा पत्की**
**लातूर**
**मो. 8983596672**

# सुखाची चावी



प्रत्येक व्यक्ती सुखाच्या शोधात आहे.प्रत्येक जण सुखासाठी धडपडतो आहे. मात्र सुखाचा हा शोध कधीच न संपणार आहे. व्यक्ती विविध ठिकाणी सुख शोधते. मंदिर, मज्जिद, गुरुद्वार,रुढी, परंपरा, दानधर्म,परमार्थ यासारख्या गोष्टींमध्ये सुखानंद शोधला जातो. मग कुठे आहे आनंद? कशात आहे आनंद? खरे सुख काही उमगत नाही. सारे काही अगदी घोड्याच्या मागे धावणाऱ्या रथाच्या चाकासारखे अविरत चालू आहे. कैलास, काबा, गीता, कुराण,बायबल कुठे शोधले तरी हात खालीच आहेत. कोणीतरी म्हटले आहे,

“ चिराग लेके इरादा था वक्त धुंडेंगे !शब्बे फिराक थी कोई चिराग भी न मिला!” अगदी या उक्तीप्रमाणे माणूस सुख शोधत आहे; हाती काही लागत नाही.

एकदा एक फकीर डोळे मिटून आभाळाकडे हात वर करून द्वारखोल प्रभू अशी प्रार्थना करत होता. त्यावेळी राबिया हसन एक सुफी संत त्याला ओरडते.

द्वार तो खुला है,आंख खोल अंदर देख! फार महत्वाचा संदेश ती देते. आपण सर्वप्रथम स्वतःमध्ये पाहायला शिकले पाहिजे. आम्ही जन्माबरोबर घेऊन आलो, ते शरीर आपले आहे. इतरत्र शोधणे सोडायला हवे. आपल्या अंतरंगात पाहायला शिकले पाहिजे.

कस्तुरीमृगा सारखे आपण भरकटतो आहोत. कस्तुरी ही त्याच्या नाभीमध्ये असते; पण त्या सुगंधाच्या वेढाने ते मृग कस्तुरीच्या शोधात भटकते.

एक संत म्हणतात,

“तुझं आहे तुझं पाशी परी जागा चुकलाशी,”

या प्रमाणे स्वतःला ओळखणे फार महत्त्वाचे आहे. स्वतःला ओळखून, जगणे सुंदर करणे म्हणजे जीवन आहे. आम्ही जीवंत आहोत हेच जीवन आहे.मानव स्वतः सुगंधित आहे. हा आपला सुगंध आपण शोधूया. शून्य होऊ या. शब्द, शास्त्र, पुराणात न शोधता स्वतःकडे पहा. डोळे बंद करा. ध्यान करा. ध्यानाने निर्मळ दृष्टी निर्माण होते.आनंद, सुख प्राप्त होते. जीवन हे बंदिस्त नसून खुले राज आहे. ते शांतीने, परिपूर्णतेने जगणे म्हणजे सुख आहे. हे आपल्या हातात आहे.

बराच वेळा माणूस अनेक गोष्टी उद्यावर सोडतो. तथागत गौतम बुद्ध म्हणतात, नेहमी वर्तमानात जगा !उद्या कधी असत नाही. कारण येणारा उद्या हा नेहमी आज म्हणूनच येतो. आम्ही चांगल्या गोष्टी उद्यावर सोडतो; मात्र वाईट, अधर्म आज करतो. याचे उदाहरण म्हणजे आपल्याला येणारा राग. राग हा अधर्म आहे. जगण्याचा शत्रू आहे. तो उद्यावर ढकला तर अनेक गोष्टी टाळता येऊ शकतात. अनर्थ टाळू शकतो; मात्र तसे होताना दिसत नाही. आम्ही राग उद्यावर सोडत नाही. आजच व्यक्त होतो आणि जगण्याचा आनंद गमावतो. बाहेरील गोष्टींपेक्षा मनात काय चालले आहे. मनाचे द्वंद्व समजणे, मनातील तुफान

क्षमवणे महत्त्वाचे आहे. मनाला चांगल्या सवयी लावा. जेव्हा चांगले कर्म घडते. तेव्हा अस्तित्वही तुमचे सहकार्य करत असते. हे अस्तित्व वर्तमानात आहे. मानव प्रतिक-प्रतिमा, यामध्ये अडकला आहे.आमच्या धारणा जुन्याच आहेत. मात्र एक लक्षात ठेवलं पाहिजे, वेळेनुसार सर्व काही बदलत असते.हे सत्य आहे.

कोणतीच गोष्ट कायम राहत नाही. शास्त्र आपले की आपण शास्त्राचे? हे ओळखता आले पाहिजे. वेळ बदलत जाते तशी मुल्ये ही बदलत जातात; म्हणून आपण सवयी पासून मुक्त असले पाहिजे. सवयीपासून मुक्त होण्यातच आनंद आहे. राख फुंकली की निखारा फुलतो, याप्रमाणे मनातील बाह्य जळमटांची राख फुंका. अस्तित्वाचा निखारा फुलुद्या. याप्रमाणे स्वतः स्वतःचे मालक व्हा. बऱ्याच वेळा सवयी आपल्या मालक होतात.

मग सवयीनुसार प्रतिक्रिया,कृती होते. सवयींचे गुलाम होणे टाळले पाहिजे. त्यामुळे स्वतःला हरवून बसतो.जगात मिळवण्यासारखे काही राहत नाही. जीवन अनमोल आहे. कोरे कॅनव्हास आहे. त्यात कोणती कलाकृती निर्माण करायची?कोणते रंग भरायचे? हे ज्याच्या त्याच्या हातात आहे. जीवनाला अर्थ आपल्या कृतीतून येत असतो. जीवनाला अर्थ आला पाहिजे. जीवन सार्थकी लागायला हवे. अंतरिक स्वच्छतेसाठी मनाला तयार करणे. हीच खरी सुखाची चावी आहे.....

**किशोर कासारे**
**मंडणगड**
**मो.8767425180**

# बेटा



जिवा पलिकडे जीव लावते
बाबांची तिला ओढ असते।।धृ. ||

तिच्या नाजुक रेशीम वलयाने
परींचा देश घरच भासते||१

कितीही असो कंगाल बाप
"दाता "त्याला निश्चितच बनविते।।

येऊ द्या हजारो संकटे बापा
तोडगे शोधन्या सतत धडपडते।।

नभाला पुस्तक धरतीला पाटी
निसर्ग संस्कृती शाळेत रमते ।।

जिवन तिचे फुलावे मौजमजेचे
असे मायबापला नित्य वाटते।।

बापासाठी पहिला हंबरडा फोडते
ती बेटी नव्हे मज बेटाच गमते।।६

कधी बापाची 'माय' बनते
नवलाई तर कधी 'ताई' शोभते ||७

'परक्याचं धन' हिनवू नकारे
बापाचं 'ती 'काळीज असते||८

**विनोद जाधव**
**जामनेर**
**मो.9421522008**

# कविता



माझा श्वास कविता
माझा ध्यास कविता
माझी शक्ती कविता
माझी मुक्ती कविता

माझ्या मनात वसते कविता
माझ्या अंत:करणात फुलते कविता
माझ्या हृदयात पाझरते कविता
माझ्या बुद्धीला सुचते कविता

माझ्या विचारात कविता
माझ्या आचारात कविता
माझ्या शब्दांत कविता
माझ्या वाक्यात कविता

माझ्या ऐकण्यात कविता
माझ्या बोलण्यात कविता
माझ्या नजरेत कविता
माझ्या लिहिण्यात कविता

माझे अंतरंग कविता
माझे बहिरंग कविता
माझे वर्चस्व कविता
माझे सर्वस्व कविता

**प्रा. नरेंद्र गुंडेली**
**सोलापूर**
**मो.9823648765**



# पुनरागमन

"काय माधवराव, आज असे उदास का?" वृद्धाश्रमाच्या वॉचमन ने माधवला विचारले

सकाळ पासून वृद्धाश्रमाच्या ऑफिसमध्ये येरझाऱ्या मारणे सुरूच होते. मुलांच्या, सुनांच्या फोनची ते आतुरतेने वाट बघत होते.

शेवटी आपल्या खोलीत येऊन माधवराव वृध्दाश्रमाच्या खिडकीतून झाडावरच्या चिमण्यांच्या घरट्याकडे उदासपणे पाहायला लागले. चिमणा-चिमणी चोचीतून पिल्लांना दाणे खाऊ घालत होते. चिमणा-चिमणी चिमण्या जीवांचेही किती सुखी कुटुंब ते. कधीकाळी त्यांचंही असंच चिवचिवणार घरट होत. आता घरट्यातले सर्व पक्षी उडून गेलेत. माधवरावांचे मन भूतकाळात डोकावू लागले.

श्रीरामपूरची राधा लग्न होऊन सासरी आली तेव्हा अवघ्या अठरा वर्षांची होती. गावातून शहरात प्रथमच आलेली लाजरीबुजरी, नाजूक मुलगी. निमगोर तुकतुकीत कांती. कमालीची लाजाळू व हळवी.

कोणी थट्टा मस्करी केली तरी डोळ्यात पाणी आणणारी. दादरमधल्या चाळीतल्या पहिल्या मजल्यावरच्या तीन खोल्यांचे छोटंसं घर. माधवरावांचे आई-वडील, बहीण-भाऊ व राधा एवढ्या लोकांच ते कुटुंब. संपूर्ण कुटुंब गावाहून दादरला स्थायिक झाले होते. अधूनमधून सणावाराला, लग्नकार्याला किंवा जास्त दिवसांच्या सुट्ट्या घालवण्यासाठी ते गावी कोकणात जात. गावाकडचा ऐसपैस दगडी वाडा, मोठ्ठ अंगण,अंगणाभोवती नारळ पोफळीच्या बागा, फळाफुलांची दाट झाडी, सभोवताली हिरवीगार भातशेती. माधवरावांचे सख्खे चुलत भाऊ मालमत्तेचा व्यवहार बघायचे. शेती सुद्धा तेच करत असत.

घरात नेहमी पाहुण्यांची वर्दळ असायची, मुंबईचे लोक आले म्हणून भेटण्यासाठी. सर्व नातलग जमायचे त्यामुळे खुप्प मज्जा यायची. लग्नानंतर वर्षभरातच आकाश व दोन वर्षांनी सरिताचा जन्म झाला. माधवरावांच्या भावाचं व बहिणीचही लग्न झालं. माधवराव कंपनीत नोकरी करत होते. त्यांच्या तोकड्या पगारात राधा काटकसरीने संसार करत होती. आकाश व सरिता आजी-आजोबांच्या संस्कारात मोठी होत होती. शिक्षण संपताच दोन्ही मुलांना चांगली नोकरी लागली. चांगलं स्थळ आलं व सरिताच लग्न थाटामाटात झालं.

दोन - तीन महिन्यांनीच सरिता व रवीला कंपनी तर्फे तीन - चार वर्षांसाठी अमेरिकेत जावं लागलं. त्यांच्या पाठोपाठ बी ई झालेल्या आकाशलाही पुढच्या शिक्षणासाठी अमेरिका खुणावू लागली. योगायोगाने एम.एस.ची पदवी घेतल्यानंतर त्याला एका चांगल्या कंपनीत मोठ्या पगाराची नोकरी लागली.

"हॅलो, बेटा"

"अरे बाबा, कसे आहात तुम्ही आणि आई? सॉरी बाबा.काही दिवसात फोन करायला वेळच मिळाला नाही. कामाचा नुसता लोड असतो."

"असू दे बेटा. काळजी वाटते तुमच्याशी बोलणे झाले नाही तर. तब्येतीची काळजी घेत जा बेटा. जेवण आणि झोप वेळेवर घेत जा"

"हो बाबा. माझी तब्येत ठीक आहे. तुम्ही दोघे औषधी वेळेवर घेतात ना."

"हो रे बाळा.आमची खरी औषधी तर तुम्ही मुलं आहात रे."

"बाबा येऊन जा ना कायमचे इकडेच रहायला. म्हणजे आपण सर्व सोबत राहू."

"आमची जी नाळ जुळलेली आहे ना मातीशी ती सुटत नाही रे. आता तू पण स्थिर हो. तुझ्या लग्नासाठी मुलगी बघावी असे आईचे म्हणणे आहे. तेवढे झाले की आमची जबाबदारी संपली बेटा."

"बाबा"

"बोल ना बेटा"

"रागावणार नाहीत ना"

"काय ते तर सांग ना. मग ठरवेल रागवायचे की नाही ते."

"बाबा, माझी मैत्रीण आठवते का तुम्हाला ती नीता शाह. ती मला खूप आवडते. म्हणजे अजूनही ती तिकडी भारतात माझ्यासाठी वाट बघते आहे."

"हो आठवते ना. पण कधी कळलच नाही रे तुम्ही एवढे पुढे गेले असाल म्हणून. तुझ्या ग्रुप मधल्या सर्वांना ओळखतो. तु नाही तरी बरेचसे अजूनही आमची विचारपूस करतात. आणि हो नीता जरा जास्तच करते पण असे असेल लक्षातच आले नाही. गुणी मुलगी आहे बेटा. आईला विचारावे लागेल.नुसती आवडून उपयोग नाही बेटा. जीवनसाथी निवडतांना बऱ्याच गोष्टींचा लोकांचा विचार करावा लागतो."

आकाशची बायको नीता स्वभावाला व दिसायला चांगली होती. एक महिना घर भरलेलं होत. परत चौघ आपापल्या घरी निघून गेले. दोन्ही मुलं माधव काका व राधाकाकूंना काही दिवसांसाठी तरी अमेरिकेला बोलावत होती. काका आईवडिलांना सोडून जाऊ शकत नव्हते. काही महिन्यातच सरिता पहिल्या बाळंतपणासाठी माहेरी आली. सरिताला जुळी मुलं झाली. त्यांचं सारं करण्यातच काका-काकूंचा वेळ जायचा. नातवंडांचं

बारसं झालं, "लवकुश" नाव ठेवण्यात आलं. बाळ तीन महिन्याची झाल्यावर सरिता अमेरिकेला परतली. काकांच्या वडिलांचा पाय घसरुन पडण्याचं निमित्त झालं व ते देवाघरी गेले. त्यानंतर महिन्याच्या अंतराने आईही ताप येऊन वारली. नेहमी भरलेलं घर रिकामं झालं. एव्हाना काका राहत असलेली चाळ पाडून तिथे मोठ्ठी इमारत तयार झाली.

थोडे दिवस काका काकू गावाकडच्या घरी राहायला गेले. निताचेही दिवस भरत आले होते पण बाळंतपणासाठी ती भारतात येणार नव्हती म्हणून माधव काका व राधाकाकू पहिल्यांदाच अमेरिकेत गेले. नीताला मुलगा झाला. चार महिने राहून काका-काकू भारतात परत आले. ह्या तीन - चार वर्षात बऱ्याच चांगल्या वाईट घटना घडल्या होत्या. राधा काकूंची तब्येत ठीक राहत नव्हती. किंबहुना त्यांना स्वतःकडे लक्ष द्यायला वेळच मिळाला नाही. संपूर्ण तपासणी केल्यावर त्यांना रक्ताचा कर्करोग झाल्याच कळलं, काकांना एकदम धक्का बसला.

एवढ्या वर्षात जीने आपल्या सुखदुःखात साथ दिली, तीच काही दिवसांची सोबतीनं होती. सात - आठ महिन्यांनी राधाकाकुंच निधन झालं. मुलं व नातवंड त्यावेळी आलेली होती. पण त्यांच्या वागण्यात काकांना काहीतरी फरक जाणवत होता. आकाश व रवी यांची काहीतरी कुजबुज चालायची. मध्येच कोणती तरी माणस यायची संपूर्ण घर बघून जायची. काकांना काहीच कळत नव्हतं, ही दोघ घर विकताय कि काय?अशी भीतीही वाटायची. आधीच पत्नी गेल्याच दुःख होत. नीता व सरीताही काहीच सांगत नव्हत्या.

एक महिना राहून राधाकाकुंच सर्व कार्य आटोपून, मुलांनी माधव काकांना या वृध्दाश्रमात ठेवले व ते अमेरिकेला निघून गेले. काकांना खूप वाईट वाटले. किती हौसेने राधाकाकू व काकांनी त्यांचं घरटं बांधलं होत आणि आता ते उध्वस्त झालं होत. तेही केवळ एका आजारामुळे, काकूंच्या शेवटच्या काळात काकांनी त्यांची खूप सेवा केली होती.

खऱ्या अर्थाने ते दोघ जवळ आली होती. काकूंच्या आजारपणाने काका खूप हळवे झाले होते. काल पर्यंत सुनेचा व मुलांचा रोज फोन येत होता, मग आजच काय झालं? आजचा दिवस सगळेच कसं काय विसरले? सकाळपासून काका घड्याळात बघत होते. आज दिवसही मोठा वाटत होता. आज काकांचा ७० वा वाढदिवस होता. राधाकाकू, काकांचा वाढदिवस कधीच विसरत नव्हत्या, आजही रात्री स्वप्नात येऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या होत्या व स्वतःची काळजी घ्यायला सांगितली होती.

त्या दिवशी काकांनी सकाळी जेवणही नीट नाही केलं. त्यांना एकाकी पडल्यासारख वाटत होत. दुपारचे चार वाजले वृद्धधश्रमाच्या दारात एक कार उभी राहिली. त्या कारमधून रवी व आकाश उतरले, आधी ऑफिसमध्ये गेले. नंतर काकांना भेटले. त्यांना बघून लहान मुलांसारखा खूप आनंद झाला. तीन महिन्यांनी त्यांना त्यांचं कुणीतरी भेटलं होत. दोघांनी काकांना गाडीत बसवलं व घरी आणलं.

घरी आणल्या बरोबर दारातच नीता व सरिताने काकांना औक्षण केलं. काका घरात आले तसा त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. मुलांनी घराचं स्वरुपच पालटलं होत. इंटरीयर केलं होत हॉल मध्ये राधकाकूंचा छानसा फोटो लावला होता. काकूंचा देव्हाराही एका कोपऱ्यात छान सजवला होता. छोट्या छोट्या नातवंडांनी केक आणला. बोबड्या सुरात आजोबांना शुभेच्छा दिल्या. काका संपूर्ण घर न्याहाळू लागले. घरातील एका खोलीच्या दारावर "राधा-माधव" नावाची पाटी लावलेली होती.

राधाकाकाकुंच्या आजाराचं कळल्यापासूनच आकाश व रवीने भारतात कायमच परत येण्याची तयारी सुरु केली होती. पण नियतीच्या मनात वेगळंच होत. मुलं यायच्या आतच काकुंच निधन झालं. काकांचा वाढदिवस नीताच्या लक्षात होता. तीने व सरिताने मिळून हे सर्व केलं होत. मुलांचं प्रेम पाहून काकांना गहिवरुन आलं. त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले व ते म्हणाले,

"भरले माझे गोकुळ,  
गेली राधा माझी दूर"

**सौ.जया सुधाकर पाटील**  
**मो.९२२४३१४०५८**



# ताजमहल



जीवन खूप सुंदर आहे पण
तू तुझं हसणं विसरू नको,
मी आहेच ना
मंगळसुत्रा सारखा
कायम तुझ्याजवळच,
तू नेहमी-नेहमी अशी
माझ्यावर रुसू नको.

सगळं होईल ग मनासारखं,
यातून देव सुद्धा
सुटला नाही,
हातात हात घेवून
विश्वाचे नवे गीत गात राहू,
तू त्याचा जास्त
विचार करत बसू नकोस,
जीवन खूप सुंदर आहे ग
तू तुझं हसणं मात्र
विसरू नको.

जे सुवर्ण क्षण आहेत ना
आपल्या हाती,
ते कायमचे
निसटून जाण्या अगोदर,
त्यांना मनापासून जगून घे,
जीवन खूप सुंदर आहे ग
तू तुझं हसणं मात्र
विसरू नको.

मीही बांधलाय ना,
"ताजमहल" तुझ्यासाठी,
काळजात माझ्या, पण तू मात्र
मुमताज व्हायला
विसरू नको,
जीवन खूप सुंदर आहे
तू तुझं हसणं मात्र
विसरू नको.

**विजय शेळके**
**छत्रपती संभाजीनगर**
**९४०४९८१५९७**



# नित्या बहार



व्यक्तित्व सादगीचे
ठेवून चालतो मी...
सर्वांप्रती सदिच्छा
ठेवून चालतो मी...।

इतरांस काय म्हणुनी
कसलाच दोष द्यावा...
अपुलेच जर मनाशी
ठेवून रोष आहे...।

मशगुल कशात कोणी
कोणी कशात येथे...
जगणे नशेत ऐसे
नाही मनात माझ्या...।

आशा अशी कुणाची
केली न फार केंव्हा...
भवती विवंचनांचा
तैसाच भार आहे...।

आयुष्य पावसाच्या
थेंबात चातकाचे!..
जीवन तयाप्रमाणे
जगतो सुखात आहे...।

येणार पानझड तर
फुटणार पालवीही!..
ठेवून अंतरंगी
नित्या बहार आहे...।

**शशांक दिनकरराव देशमुख**
**चांदुरबाजार**
**मो.९९२३५३६३२९**

# अब्राहम लिंकन
# एका महान राष्ट्रपती



अब्राहम लिंकन यांचे नाव अमेरिकन इतिहासात अजरामर आहे. त्यांनी अमेरिकेचे १६वे राष्ट्रपती म्हणून कार्य केले आणि देशाच्या इतिहासात एक महत्त्वपूर्ण क्रांती घडवून आणली. लिंकन हे केवळ त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे प्रसिद्ध झाले नाहीत, तर त्यांचे जीवन, संघर्ष, तत्त्वनिष्ठा आणि तत्त्वज्ञान या सर्वांमुळे त्यांना जागतिक स्तरावर आदर मिळाला.

**प्रारंभिक जीवन :**

अब्राहम लिंकन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी केंटकी राज्यातील हार्डिन काउंटी येथे एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या कुटुंबाची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती आणि त्यांना फारसे शिक्षण मिळाले नाही. लिंकन यांना केवळ एका वर्षाचे औपचारिक शिक्षण मिळाले, परंतु त्यांची शिकण्याची इच्छा अतिशय प्रबळ होती. त्यांनी स्वतःच वाचन आणि लेखन शिकून आपले ज्ञान वाढवले.

लिंकन यांचे बालपण शारीरिक श्रमात आणि गरिबीत गेले. त्यांच्या कुटुंबाला शेतकरी म्हणून कठोर परिश्रम करावे लागले, त्यामुळे लिंकन यांचे शिक्षण फारसे औपचारिक नव्हते. तरीसुद्धा, त्यांच्या बुद्धिमत्तेने आणि कार्यक्षमतेने त्यांनी स्वतःला घडवले.

**राजकीय कारकीर्द :**

१८३४ मध्ये लिंकन यांची इलिनॉय विधानसभेवर निवड झाली. त्यांनी त्यांची वकिलीची पदवीही मिळवली आणि एक प्रतिष्ठित वकील म्हणून नाव कमावले. याच काळात त्यांची राजकीय कारकीर्द अधिक गतीने पुढे सरकली. १८४६ मध्ये लिंकन यांची अमेरिकन काँग्रेसवर निवड झाली, परंतु गुलामीविरुद्धच्या त्याच्या विचारांमुळे त्यांनी तात्पुरती राजकारणातून माघार घेतली.

**गुलामीविरुद्ध संघर्ष :**

लिंकन यांच्या राजकीय विचारधारेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे गुलामीविरुद्धचा त्यांचा उघड संघर्ष. गुलामी ही अमेरिकन समाजातील एक मोठी समस्या होती, विशेषतः दक्षिणेकडील राज्यांमध्ये. लिंकन यांनी गुलामीचा तीव्र विरोध केला आणि त्यासाठी त्यांची खास ओळख निर्माण झाली.

१८५८ मध्ये लिंकन यांनी अमेरिकन सिनेटच्या निवडणुकीत डग्लसविरुद्ध प्रचार केला. यावेळी दिलेली त्यांची भाषणे गुलामीविरोधी चळवळीसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरली. लिंकन यांच्या "कौटुंबिक विभागणीतून राष्ट्र तग धरू शकत नाही" या शब्दांनी देशभरात मोठी चर्चा झाली.

**राष्ट्रपतीपद आणि अमेरिकन यादवी युद्ध :**

अब्राहम लिंकन १८६० मध्ये अमेरिकेचे राष्ट्रपती झाले. त्यांच्या निवडीमुळे अमेरिकेतील दक्षिणेकडील राज्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली, कारण दक्षिणेकडील राज्ये गुलामीच्या बाजूने होती. लवकरच, १८६१ मध्ये अमेरिकन यादवी युद्धाची सुरुवात झाली. हे युद्ध मुख्यतः उत्तर राज्ये (ज्यांनी गुलामीविरोधी भूमिका घेतली होती) आणि दक्षिण राज्ये (गुलामीच्या बाजूने असलेली) यांच्यातील संघर्षामुळे झाले.

यादवी युद्धादरम्यान लिंकन यांनी उत्तम नेतृत्वगुण दाखवले. त्यांनी अनेक कठीण प्रसंगांवर मात करत युद्धाला योग्य दिशा दिली. १ जानेवारी १८६३ रोजी लिंकन यांनी ऐतिहासिक "मुक्तता जाहीरनामा" (Emancipation Proclamation) जारी केला, ज्याद्वारे गुलामांना मुक्त करण्याचा आदेश देण्यात आला. हा निर्णय लिंकन यांच्या राजकीय कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

**हत्या आणि वारसा :**

१४ एप्रिल १८६५ रोजी, यादवी युद्धाच्या समाप्तीनंतर केवळ काही दिवसांनी, अब्राहम लिंकन यांची वॉशिंग्टन डीसी येथील फोर्ड थिएटरमध्ये हत्या करण्यात आली. जॉन विल्मस बूथ या कट्टर दक्षिणपंथी विचारांच्या व्यक्तीने त्यांना गोळी घालून ठार मारले.

लिंकन यांचे निधन झाल्यानंतरही त्यांचा वारसा आणि योगदान जिवंत आहे. त्यांनी अमेरिकेचे एकीकरण केले आणि गुलामीला कायमचे संपवले. लिंकन यांची शहाणपणाची भूमिका आणि धाडस आजही संपूर्ण जगासाठी एक प्रेरणास्त्रोत आहे.

अब्राहम लिंकन यांचे जीवन एक संघर्षमय जीवन होते, परंतु त्यांनी आपल्या ध्येयाशी कधीच तडजोड केली नाही. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने केवळ अमेरिकाच नव्हे तर संपूर्ण जगाला मार्गदर्शन केले. जगात आजही अब्राहम लिंकन यांचे नाव आदराने घेतले जाते आणि ते कायमस्वरूपी एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व राहतील.

**प्रशांत हरीचंद्र शेंडे**
**गडचिरोली**
**मो.9309180256**




# भारतीय संविधान



संविधान जागृती
करुया सर्व आपण
भारतीय संविधान
जपते आपलं हितपण

न्याय हक्कासाठी
लिहिली डॉ.बाबांनी
भारतीय राज्यघटना
झालं जगणं स्वाभिमानी

मिळाला आपल्याला
लिहिण्या, बोलण्याचा
आंदोलन करण्याचा अधिकार
हक्क आरक्षण मागण्याचा

संकल्प करुया
संविधान जपण्याचा
अधिकार आहे आपल्याला
संविधान अबादीत ठेवण्याचा.

**दीपक तळवडेकर**
**कणकवली**
**मो.९४०५२५७३७२**

# उचकी



उचकी आली रविवार दिन
नातीत तल्लीन हसले गाली

सात दिवस शब्द घुमतात
आवाज कानात प्रेमाची कस

मनात साद उचकी लागते
जराशी थांबते घालिता वाद

गुळाचा खडा जिभेवर ठेवा
मौल्यवान मेवा व्याधीला धडा

फुफ्फुसे थोडी अरुंद पावती
पहावे वरती वायुशी जोडे

हवा ती आत प्रसरण करी
गळ्याला ती बरी थांबे आघात

दूध पिताच उचकी बाळाला
धास्ती कुटूंबाला धरा उभाच

उचकी येता आवाज वेगळा
म्हणती वेंधळा आळस देता

कण अडके जेवण करता
श्वासही अडता होतो रडके

शांत रहावे जेवताना सदा
नैसर्गिक गदा येता लढावे

पाणी जवळ तहान भागवी
उचकी पळवी गळ्याला बळ

फार वाईट उचकी लागते
धांदल उडते येतोच वीट

**सौ. सुरेखा सुरेश हरपाळे**
**नागपूर**
**मो.9405138545**

# ‘पाय आणि वाटा’



लेखक लिहीत असतो, ते वाचलं जात असतं पण लेखक ज्या भोवतालात राहत असतो त्या भोवतालाचं प्रतिबिंब त्याच्या लेखनात उतरलं आहे की नाही किंवा लेखक आपल्या अनुभवविश्वाशी किती प्रामाणिक आहे, हे तपासून पाहणे फार गरजेचे आहे. कल्पनेचे इमले बांधणारे किंवा घडीभर विरंगुळा करणाऱ्या रंजक साहित्याची मांदियाळी समकाळात खूपच वाढली आहे. त्यादृष्टीने सचिन वसंत पाटील, यांच्या ‘पाय आणि वाटा’ या ललितसंग्रहाचा विचार करताना सचिन पाटील यांचे गाव, ग्रामसंस्कृती, तिथला निसर्ग, माणसे, एकूण भोवताल यांचा कितपत ठसा त्यांच्या लेखनात उतरला आहे याची पडताळणी करायचा प्रयत्न आपण या लेखाद्वारे करणार आहोत.

प्रत्येक लेखकाचा एक अवकाश असतो. त्याचं त्याचं आभाळ असतं. तो ज्या गावात/शहरात राहतो, घडतो त्या भागाचा चांगला किंवा वाईट परिणाम त्याच्या मनावर, स्वभावावर होत असतो. लेखक पाटील यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील कृष्णाकाठच्या कर्नाळ या छोट्याशा खेडेगावात झाला. सहा-सात हजार लोकवस्तीचं हे एक टुमदार गाव आहे. इथल्या ग्रामस्थांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. सांगली शहरालगत असल्याने गावगाड्यावर आणि शेतीसंस्कृतीवर अनेक आक्रमणे झाली आहेत. शहरीकरण, प्लॉटिंग, अतिरिक्त पाण्याचा वापरामुळे जमिनी क्षारपड होणे, तरुणांच्यामध्ये कष्ट करण्याची प्रवृत्ती नसणे, व्यसनाधीनता, ढाबासंस्कृती... एकूणच शहरालगतच्या खेडेगावांची जी अवस्था आहे तीच अवस्था याही गावाची आहे.

याच गावात सचिन पाटील, स्वतःच्या पायाने वीस वर्षे चालले आहेत. गावातील वाटा, पायवाटा, ओबडधोबड रस्ते त्यांनी धुंडाळले आहेत, तुडवले आहेत. गावातील निसर्ग, शेत शिवार, जनावरे यांबरोबर आपला वेळ घालविला आहे. येथील पशुपक्षी, पाळीव प्राणी, झाडझाडोरा यावरती निस्सीम प्रेम केले आहे. हा कालावधी साधारण त्यांच्या बालपणीचा म्हणजे इ. स. १९८० ते २००० च्या आसपासचा आहे. त्यावेळी गावावर, ग्रामसंस्कृतीवर इतक्या मोठ्या प्रमाणात जागतिकीकरणाचे आक्रमण नव्हते. गाव आणि माणसांची मने स्वच्छ होती. अपघातानंतर वीस वर्षे त्यांना पाय नाहीत म्हणजे हा कालावधी साधारण इ. स. २००० ते २०२० पर्यंतचा आहे. म्हणजे पाय असण्यातलं सुख आणि पाय नसण्यातलं दु:ख त्यांनी वीस-वीस वर्षे समान पातळीवर अनुभवलं आहे, भोगलं आहे. त्रयस्थ भावनेनं त्याकडं पाहिलं आहे. म्हणूनच लेखक मनोगतात लिहितात, ‘एखादा माणूस आयुष्याच्या सुरुवातीची वीस वर्षे स्वतःच्या पायांवर चालला असेल आणि नंतरची वीस वर्षे त्यानं पाय गमावलेलं आयुष्य भोगलं असेल तर नक्कीच त्याचं आयुष्य लिहिण्यासारखं असणार, यात शंका नाही.’ म्हणजे पाटील यांनी लिहिलेला त्यांच्या आयुष्यातील अपघात, भोगलेलं दु:ख, बदलता भोवताल हे अगदी सत्य, वास्तविक आहे.

एकूणच इ. स. १९८० ते २०२० हा काळ संक्रमणाचा, अनेक बदल घडून आलेला काळ आहे. गावातील अनेक गोष्टी, संस्कार, संस्कृती, समाजरचना, दळणवळण, जीवनपद्धती एवढंच नाही तर गावखेड्यातील माणसे आणि त्यांची मने बदलवून टाकणारा हा चाळीस वर्षांचा प्रदीर्घ काळ आहे. हा इतका मोठा काळ आणि त्यातील सर्व बदल सचिन पाटील यांनी ‘पाय आणि वाटा’ या छोट्याशा ललितसंग्रहात पकडले आहेत, असं म्हणता येणार नाही. पण एकूणच त्यांच्या साहित्यकृतींमधून ते तुकड्यातून, समयसूचकतेने आणि टप्प्याटप्प्याने आले आहेत. जसे ‘सांगावा’ मधून माणसांमधील दुरावा आला आहे. ‘अवकाळी...’ मध्ये बदलती शेती-माती, बदलता निसर्ग आणि जागतिकीकरणाचे दुष्परिणाम येतात तर



जुना सुंदर गाव आणि गावात झालेले बदल 'गावठी गिच्चा' या कथासंग्रहामध्ये आले आहेत.

'पाय आणि वाटा' या प्रस्तुत लेखसंग्रहात लेखकाने गावात झालेले बदल टिपताना 'माझं बदललेलं गाव' हा सविस्तर लेख लिहिला आहे. याशिवाय एकूणच पुस्तकामधे अनेक प्रसंगातून अवतीभवतीच्या छोट्या-छोट्या गोष्टी आल्या आहेत. बारकाईने पाहिल्या तर त्याही आपल्या लक्षात येतील. या मध्ये जुनं टुमदार मंदिर आणि नवं अलिशान मंदिर आहे. मैदान असणारी जुनी मराठी शाळा तर मैदान नसणारी नवी शाळा आहे. जुनी स्वच्छ पाण्याची विहिर आणि सध्या पडीक बनलेली विहीर आहे. हरवलेली अंगणं, तोडलेली झाडं, सिमेंटचे टोलेजंग बंगले, मोबाईल टॉवर, कमी झालेला गोवंश, वाढलेली ढाबा संस्कृती, अन्नातील सकसतेची कमतरता, पिकांवर होणारा औषधांचा वापर, तुरुणांच्यात खेळ, तालिम, व्यायामाबद्दल असणारा निरुत्साह, हरवलेली वाचनसंस्कृती, मोडून पडलेली बैलगाडी, हरवलेलं पोष्टाचं पिवळं पत्रही आहे! म्हणूनच इ. स. २००० ते २०२० च्या दोन दशकातील झालेली गावाची पडझड आणि 'पाय आणि वाटा' मध्ये आलेले वीस वर्षांपूर्वीचे गाव याच्या नोंदी मन अस्वस्थ करणाऱ्या आहेत. हे लेख वाचताना जुन्या गावातल्या अनेक गोष्टी आपण हरवल्या आहेत आणि आपण जीवनाचा, सकसतेचा गाभाच हरवला आहे, असं वाटायला लागतं. जोंधळ्याची भाकरी, लोटक्यातलं दही, ऊनऊन माडगं, बांधावरील अविट गोडीची आंबा-चिंचेची झाडं, एवढंच नाही तर नियमीत येणारा पावसाळा-उन्हाळा-हिवाळा हे ऋतुही बदलले आहेत.

आज हॉटेलमध्ये 'घरच्यासारखं चुलीवररचं जेवण मिळेल!', किंवा टीव्हीवर 'नमकवाला और कॅल्शिअमवाला टूथपेस्ट!' अशी जाहिरात पाहिली की हसू येतं. कारण लहानपणी आपण सर्वचजण मीठ आणि राखेने फुकटमध्ये दात घासत होतो ना! किंवा हाडे ठिसूळ होण्याचं, कॅन्सर होण्याची जी कारणं समोर आली आहेत त्यामध्ये आपली बदललेली जीवनशैली, तुटलेला निसर्गाशी, मातीशी संपर्क, व्यसनाधीनता याचाही समावेश आहे. मातीशी नाळ तुटणे, ही मानवाची सर्वात मोठी अधोगती आहे... आणि हाच धागा सचिन पाटील, यांनी आपल्या सर्वच लेखांतून ओवून घेतलेला आहे. त्यांचा प्रत्येक शब्द, ओळ नि ओळ मायभूमीशी नातं सांगते. गुज बोलते. तिचा अस्सलपणा, थोरवी सांगते.

'पाय आणि वाटा' वाचल्यावर वाटतं, आपण आपलंच गाव गमावलंय.. कुठंतरी हरवलंय... आज गावागावात कुरणं राहिली नाहीत, जणावरंही नाहीत आणि ती हिंडवायला 'राखण' करायला नव्या पिढीला सवडही नाही. डोक्यावर घेऊन विकायला 'करड्याची भाजी' नाही. मोबाईल बघत बघत जेवणाऱ्या पोरांना आपण कशाची भाजी खातोय, हेही समजत नाही! भावासारखा 'पाठीराखा' सख्ख्या भाऊ नाही. माणसांची 'संवेदना' हरवलीय. आज गावात बैल नाही, 'ती बैलगाडी' नाही. ऐटीत बसून फिरायला 'घोडी' नाही. मोबाईल आणि टीव्हीच्या गदारोळात 'पोस्टाचं पत्र हरवलं' आहे. सुट्टीला मामाचा गाव नाही. गावचं स्टँड नाही. पाराचा कट्टा नाही. 'झुकुझुकु आगीनगाडी' नाही. अंगणात बसून चांदणीभोजन करीत गोष्टी सांगणारे आजी-आजोबा नाहीत. आजच्या आजी-आजोबांच्या हाती टीव्हीचा रिमोट आहे. उमाळा दाटून येतो पण 'कोरडे डोळे' टिपूस सांडत नाहीत. मन घरट्यातून पडलेल्या 'चिमणीच्या पिल्लू' सारखं चिवचिवाट करतं. पण 'खरं प्रेम' काही मिळत नाही. पावलोपावली 'बदललेलं गाव' भेटतं पण बालपणीचं हरवलेलं गाव कुठंच सापडत नाही. ते मनोहारी 'पतंगाचे दिवस', हुरड्याचे दिवस, सुगीचे दिवस काही पुन्हा फिरून येत नाहीत.

त्यांच्या 'झाड आणि वाट' या ललितलेखामध्ये गर्द झाडाच्या सावलीत मटक्यातलं थंडगार पाणी वाटसरूंना फुकट वाटणारा म्हातारा भेटतो. तो येणाऱ्या दमल्या-भागल्या जिवांची दु:खं ऐकूण घेतो. लोकांची ख्याली खुशाली, विचारपूस तो करतो... बाटलीबंद पाणी वीस रुपयांना विकत मिळण्याच्या या अस्वस्थ काळात असाही म्हातारा कुणी असेल? कुठे भेटेल? यावर विश्वासच बसत नाही. आपलं जुनं गाव हरवून हा गर्द सावलीत बसून फुकट माठातलं थंडगार पाणी वाटणारा म्हातारा आणि माठातल्या थंडगार पाण्याचा तो अनोखा सुगंधच आपण हरवून बसलोय, असं 'पाय आणि वाटा' वाचून मनोमन वाटतं!

अनेक वाटा, पायवाटा, आडवाटा, बांधवाटा, खट्ट डांबरी, तर कधी चिखलवाटा, अनेक खाच-खळगे, कच्चा रस्ता, पक्का रस्ता, माळवाटा... काटे-सराटे-कुसळे, दगड-धोंडे एवढंच नाही तर मऊमऊ गवत, फुलं, फुलपाखरं, जनावरं, पक्षी, रानचा मेवा, गारगार स्वच्छ हवा... तुम्हाला अनुभवायची असेल त्यातील भोवताल, काळ समजून घ्यायचा असेल तर सचिन वसंत पाटील यांनी लिहिलेला ललितसंग्रह 'पाय आणि वाटा' अवश्य वाचा. तुम्हाला तुमच्या लहानपणीचं जुनं गाव आणि समकालीन बदललेलं नवं गावही भेटेल. तुम्हाला ते तुमचंच गाव वाटेल, इतकं त्यात साम्य आहे.

**ललितगद्य : पाय आणि वाटा**
**सचिन वसंत पाटील**
**हर्मिस प्रकाशन, पुणे**
**मुखपृष्ठ: अन्वर हुसेन**
**पृष्ठे: १००, मुल्य : १५०**
**संपर्क : 8275377049**

# बाईपण



आज पुन्हा कृष्ण येणार नाही
म्हणून तू द्रौपदी होऊ नकोस ...
तुझी तलवार तूच उचल
विसंबून कुणावर राहू नकोस ...

तूच कधी राधा तर कधी मिरा आहेस
जनाबाई,मुक्ताई तर कधी इरा आहेस ...
पण वेळप्रसंगी हो रणचंडिका मर्दिनी
स्वयं तू आत्मचैतन्याचा झरा आहेस ...

तूच कृष्णा,कोयना आणि नीरा आहेस
कोमलांगी जरी आतूनी निखारा आहेस ...
जागव तुझ्या आत्मशक्तीला तूच
कळेल तुला तूच कोहिनूर हिरा आहेस ...

अगं रडतेस काय अन्याय जाहला म्हणुनी
तूच जिजाऊ तूच राणी लक्ष्मीबाई आहेस ...
बाईपण कलंक नसते,नसते अबला नारी
जगाला वाढवण्याचे सामर्थ्य तुझ्या उदरी
अशी तू जगतजननी बाई आहेस..बाई आहेस ...

**वर्षा झांबरे**
**कोल्हापूर**
**मो.९०९६७६५८५६**




# यशोगाथा



गंगा मातेची पवित्रता
मनामनातून वाहतेय रं
देशकारणी जे रक्त सांडले ते
यशोगाथा गातयं रं...

आनण्या देशात लोकशाही
केली बाबांनी रक्ताची शाई
शिवरायांचे विचार मनी
ज्योती फुलेंचा मंत्र कानी
समतेचा हा विचार साऱ्या
समाजात रूजतोय रं..
देशकारणीजे रक्त सांडले
ते यशोगाथा गातयं रं....

शून्य करून इथल्या जाती
उगवली माणुसकीची नाती
करु सुंदर भारत आपला
हा घेऊन तिरंगा हाती
शेतकरी राजा दिनरात माझा
देशासाठीचं राबतोयं रं...
देश कारणी जे रक्त सांडले
ते यशोगाथा गातयं रं....

फुलते तुळस इथल्या अंगणी
पक्षी गाती मुक्त गगनी
परंपरेला नाकारुनी
स्त्री गाते शिक्षण गाणी
संविधान देई जनतेस साऱ्या
समान अधिकार रं..
देशकारणी जे रक्त सांडले
ते यशोगाथा गातयं रं....

महाराष्ट्राची जगात ख्याती
इतिहासाला जोडून नाती
हिमालयाची राखण्या महती
सह्याद्रीने दिले हिरे मोती
वीरांच्या त्या पराक्रमाने
आज स्वराज्य शोभतयं रं
शकारणी जे रक्त सांडले ते यशोगाथा गातयं रं...

गंगा मातेची पवित्रता
मनामनातून वाहतेय रं
देशकारणी जे रक्त सांडले
ते यशोगाथा गातय रं...

**प्रवीण काळे./ माजलगाव**
**मो.8698701955**

# या झोपडीत सुद्धा माणूस राहतो..



प्रकाश बनसोड सर यांचा हा तिसरा गझलसंग्रह होय.२००४मध्ये 'धगधगता निखारा ',२०१५ला 'माणूस 'आणि आता 'या झोपडीत सुद्धा माणूस राहतो हा दर्जासंपन्न, आशयसंपन्न गझलसंग्रह वाचकाचे दरबारात हजर झालेला आहे.

या गझलसंग्रहात एकूण ८३गझल आहेत. पहिलीच गझल खालील प्रमाणे आहेत

दररोज यातनाच्या भट्टीत भाजतो
या झोपडीत सुद्धा 'माणूस 'राहतो
देईल शीत छाया नक्की कधीतरी
विश्वास लावलेल्या वृक्षात पाहतो

दमदार अशी ही गझल आहेत. कवी मनाला सामान्य लोक, त्यांच्या यातना दिसतात. हा गझलकार भेदभाव करीत नाही. त्यांना समतेने बघतो हे विशेष गुण या गझलमध्ये आपणाला दिसतील.

क्रांतिकारी व्याकरणाचा आविष्कार करणाऱ्या साहित्यिकांनी अप्रियतेला आपला गौरव मानायची गरज आहे. कारण तुम्ही सत्य सांगता आणि असत्याच्या भक्तांना ते कटू वाटते!म्हणून साहित्यिकांनी सत्ताधिपतीच्या घरी पाणी भरण्याची लाचारी सोडून दिली पाहिजे. आपले बोलविते धनी नाकारण्याची ताकद स्वतः त निर्माण केली पाहिजे. मी, माझे स्वातंत्र्य, मानवी सन्मानाचा प्रकल्प या गोष्टी मला शांत बसू देत नाहीत असे साहित्यिकाला वाटले पाहिजे. आपण सत्य झालो आहोत. आपण जबाबदारी झालो आहोत. आपण मानवी मूल्यांचा अजिंक्य उजेड झालो आहोत असे वाटणारा आणि जगणारा साहित्यिकच आजच्या युद्धकाळातील जिवंत साहित्यिक ठरू शकेल. ही जबाबदारी म्हणजे आपल्या प्रतिभावंतपणाचा गौरव होय. असे डॉ. यशवंत मनोहर म्हणतात.. ते प्रकाश बनसोड यांचा 'या झोपडीत सुद्धा माणूस राहतो 'या गझल बाबतीत लागू पडते आहे असे मला वाटते.

तेवत असता समानतेची वात माणसा
सांग आणली कुठून तू ही जात माणसा
माणुसकीचा गाव सोडून गेलेत कुठे
आपुलकीने थोपटणारे हात माणसा

'जात 'ही मानवतेला लागलेली कीड आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना या जातीपायी खूप मानसिक त्रास सहन करावा लागला. ते जेव्हा लंडनला शिक्षण घ्यायला गेले... तेथील समानतेचे वातावरण पाहुन त्यांना खूप आनंद वाटला. जात ही व्यवस्था येथील चतुर लोकांनी आणली... तिला दृढ केले. माणुसकी हे तत्व दूर लोटले आणि जात हे तत्व जवळ केले. माणुसकीचा गाव सोडून गेलेले लोक हा गझलकार शोधतो आहे... हाच प्रश्न ते आपल्या गझलमधून मोठया आत्मविश्वासाने मांडत आहे.

सोबत सोबत आपण सारे लढलो असतो
उंच उंच मग शिखरावर चढलो असतो
गेले असते नेते अमुचे योग्य दिशेने
एकीच्या या मार्गाने मी वळलो असतो

सोबत सोबत जाणे खूप आवश्यक आहे. एकीच्या मार्गाने जाणे खूप आवश्यक आहे. घटनेनुसार देश चालला असता तर खऱ्या अर्थाने आपण स्वतंत्र्य झालो असतो... पण सद्यस्थिती फार वेगळी आहे.. या स्थितीला आपणच जबाबदार आहे. हेच गझलकार प्रकाश बनसोड यांनी अतिशय आत्मियतेने आपल्या गझलमधून सांगितलं आहे.

अपमान, कष्ट, दुःखे झेलून वार तू
माणूस 'स्वाभिमानी 'केला तयार तू
अधिकार, हक्क, समता खेचून आणली
जाती अनिष्टतेवर होऊन स्वार तू

"बा भीमा "सुंदर अशी गझल आहे. बाबासाहेब यांनी अपमान, कष्ट सहन केले तेव्हा आम्हाला अधिकार, हक्क, समता दिली. त्यासाठी त्यांना आपल्या मुलांचे बलिदान द्यावे लागले. बाबासाहेब यांचे जीवनावर प्रकाश टाकणारी दमदार गझल आहे.

फोडले फुटले जरी असले पथावर काच मित्रा
ध्येय आपुले पार करण्या पुस्तके तू वाच मित्रा
दूर करण्या अंधश्रद्धा अन गरिबीची बिमारी
डोज आहे शिक्षणाचा फक्त त्यावर हाच मित्रा

पुस्तकाचे महत्व विषद करणारी ही सुरेख अशी गझल आहेत. जो व्यक्ती आपल्या जीवनात पुस्तकाला महत्वाचे स्थान देतो.. त्याला जीवनात काहीही कमी पडत नाही. पुस्तकं स्वतः काही बोलत नाही. पण वाचकाला बोलते करण्यासाठी पुस्तकं खूप महत्वाची भूमिका बजवतात. शिक्षण हाच प्रगतीचा एकमेव मार्ग आहे.

समानतेने प्रकाशणाऱ्या चला लावूया वाती
पाटी, पुस्तक, पेन देऊया मुलामुलींच्या हाती
वेळ कधीही, कशी कुणावर सांगून येत नाही
लढण्यासाठी सदा असावी तयार अपुली छाती

मुला मुलींच्या हाती पेन आणि त्यांचा ब्रेन यामुळेच जगातील पुष्कळ समस्या दूर होईल... असे गझलकार प्रकाश बनसोड यांना वाटते.. आणि ते खरेही आहेत. लढण्यासाठी आपली छाती सदैव तयार असली पाहिजे.

पाहतो तेथे मला आकांत दिसतो
गाव माझा का तरीही शांत दिसतो
लोकसंख्या आज कोटीची तरीही
वाढला अमुच्यातही एकांत दिसतो

सद्यस्थिती फार भयानक आहेत. लोक शांत शांत दिसतात कारण बोलायला कुणी तयार नाही. आज कोटीची संख्या असूनही एकांत वाटतो. लोक एकांत या आजाराने पीडित आहेत. लोकांनी बोलते झाले पाहिजे... आपल्या गोष्टी एकमेकांना सांगितल्या पाहिजे. ती काळाची गरज आहेत.

करतो तुझी प्रतिक्षा मी एक सारखा
देऊ नको सखे तू नुसत्याच तारखा
नेता /समाजसेवी यातून कोण तो
देशास तारणारा तुम्हीच पारखा
न्यायालयात ठरते फिर्याद फालतू
मिळतात फक्त येथे पुढच्याच तारखा

अतिशय वास्तविक जाणीव वरील शेरातून गझलकार प्रकाश बनसोड यांनी आपल्याला करून दिलेली आहेत. सध्या देशात जि हुकूमशाही सुरु आहेत... अशा काळात वरील शेर खूप काही सांगून जाते. हे विशेष आहेत.

प्रकाश बनसोड यांच्या गझलमधील काही भाषा शैली पाहू या... यातनाच्या भट्टीत, समानतेने प्रकाशणाऱ्या चला लावू या वाती, खाटेवरती स्वप्न पाहिले, जगणे गटारलेले, सुधारकाचे ग्रंथ, वखरवाई कापणीचे, झेंडा निळा, मैत्रीने मी गाव जोडला पाहिजे इत्यादीमुळे हा गझल संग्रह खूप उंचीवर गेला असे वाटते.

मुखपृष्ट वेधक आणि अप्रतिम असे आहे. या मुखपृष्ट वरून लक्षात येते की आतील गझल कशा आहेत. एवढा दम या मुखपृष्ट यात आपणास दिसेल. आतील चित्र यामुळे या गझलसंग्रहात चार चांद लागले असे वाटते. ते खरंही आहे.

प्रस्तावना सुंदर व अभ्यासनिय आहे. कवीने सर्वसामान्य माणसाचं जगणं अतिशय प्रभाविपणे मांडलं आहे. माणसाला माणूसपण देण्याचं कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलं. त्याच विचाराचा पाईक असलेला हा शायर तळमळीने लिहिताना आणि आपल्या काव्यातून तोच विचार हळूवारपणे पेरताना दिसून येतो. हा विचार गझलकार विद्यानंद हाडके यांनी आपल्या प्रस्तावना यातून मांडलेला आहे.

पाठराखण सुप्रसिद्ध आंबेडकरी गझलकार प्रमोद वाळके "युगंधर "यांनी केली आहे. ते म्हणतात..."प्रकाश बनसोड...'प्रकाश 'हा गजलकार अत्यंत संवेदनशील मनाचा सूर्यस्वभावी गजलकार आहे. या गजलकाराचे मन बुद्ध, फुले, बाबासाहेब आणि संविधान या चार महासत्याच्या तात्वज्ञानिक विचारांनी संस्कारित झालेले आहे."

अनेक सामाजिक कार्यात गझलकार प्रकाश बनसोड यांनी स्वतःला झोकून दिले आहे. त्यांची गझल सूर्यदिशेने प्रवास करणारी आहे... म्हणून ती अनेकांना प्रेरणा देणारी आहे.

अधिक अभ्यास केल्यास अधिक दर्जेदार गझल वाचकांना वाचायला मिळतील. गझलकार प्रकाश बनसोड यांना मनापासून शुभेच्छा..!!

गझलसंग्रह...या झोपडीत सुद्धा माणूस राहतो.
गझलकार... प्रकाश बनसोड
प्रकाशन... मेधा पब्लिशिंग हाऊस, अमरावती -६
पृष्ठ्ये.....१०४
मूल्य....२००

**समीक्षक**
**प्रशांत नामदेवराव ढोले.**
**सावंगी (मेघे)वर्धा**
**मो.९९२३३०८६३८**



# माणुस विणतो मी



माणुस माणुस विणत असतो मी
फाटलेले अवघं आभाळ शिवत जातो मी
रंग कोणताही असो
बेरंगही जोडत जातो मी
विण बारीक असते
नजर मातुर मोठी दिलीय बाप्पा देणार्यांनी
मळलेलं कोणी मातीत उचलुन घेतो मी
तापलेले असेल कोणी भवतापानी,अंहम भेदांनी भेगाळलं असेल आतुन कोणी
त्या अभाग्यासाठी सचैल
आपुलकीचा अवघा पाऊस होतो मी
गेला बाजार तटातट तुटणार्या नात्यांना शिवणारा कवी मी
अवघाची संसार सुखाचा करीन आनंदे भरीन तिन्ही लोक म्हणणारा पंढरीचा वारकरी मी
जोहार मायबाप जोहार
म्हणणार्या संत कुळातला मी
माणुस माणुस विणत असतो मी

**देवेंद्र औटी./सोलापूर**
**(अ.भा. दलित साहित्य अकादमी नवी दिल्ली, म. फुले फेलोशिप)**
**मो.9881482924**





# आरसा



चकाकणयाची फार तुला हौस
श्रृंगाराचा नाही मला सोस
मिळाले मोकळे स्वच्छंदी आकाश
कमीच झालाय तुझ्यावरचा विश्वास

अदृश्य अंतर्मनाचा भेटलाय आरसा
पातळ काचेचा संबध जरासा
नको बघू माझ्या सौंदर्याकडे
हळूहळू झेपावतेय मी क्षितीजाकडे

हिरवे पाचू माणिक मोती
एकाएकी आलेत माझ्या हाती
कमवतेय मी शब्द संपत्ती
तुला नसावी कसलीच आपत्ती

तडतडून नको जाऊस फार
तू वेडावशील खूप ठार
माझे मी उलगडेन अंतरंग
तुझ्याशिवाय मी दिसेन सुंदर

**सौ.रुपाली लटके (लंबे)**
**सोलापूर**
**मो.९१३७२७२४३७**



# फराळ



लतिकाने अंगणात सडा रांगोळी घालून हात धुतले..आज दिवाळी म्हणून ती लवकर उठली होती.. सुगंधीत उटण्याचा वास घरभर दरवळत होता..सगळं कसं आनंदी आनंद होत..दिवाळीच्या तयारीत ती सकाळपासूनच लागली होती..घरात गोडधोड फराळाची रेलचेल होती..लतिका घरात येऊन उरलेसुरले कामे करु लागली होती..तोच बाहेर एका मळकटलेल्या चेहऱ्याच्या पोरीने हाक मारली

"आई काही असंल तर वाढ गे"..

लतिकाने बाहेर डोकाऊन पाहीले तर एक 8-9 वर्षाची कोवळी पोरगी हाका देत होती..लतिकाला पाहून ती पुन्हा गयावया करु लागली

"आई..दोन दिवस झाले,पोटात अन्नाचा कण नाही.. काही असंल तर दे गं माई"

तिच्या चेहऱ्यावर भूकेचा डोंब उसळलेला दिसत होता..! लतिका माघारी फिरली..घरातील फराळाच्या डब्यातून फराळ काढून त्या पोरीला दिला..फराळाचे गोडधोड पदार्थ पाहून तिचा चेहरा फुलला..डोळ्यांत चमक आली..! पोटाची भूक ओठावर तरळून गेली.. तिने झोळी पसरली..पण ती झोळी फाटकी होती.. तसे अंगावरील कपडेही फाटलेलेच होते..लतिका काही क्षण तसीच उभी राहून तिच्या फाटक्या झोळीकडे एकटक पाहत उभी होती..लतिकाकडे पाहून ती पोरगी म्हणाली..

"माई..ह्या झोळीत टाका"..

लतिका तिला म्हणाली "अगं,तुझी झोळी फाटकी गं"

त्या पोरीचे डोळे अश्रुंनी डबडबले.मनाची चिमणी ह्रदयात फडफडली " माई..माझं नशिबच फाटकं.. त्यात फाटकी झोळी,कसं जगायचं हेच कळतं नाही" लतिकाला तिच्या भावना कळाल्या..लतिका चटकन घरात गेली आणि कालच शिलाई केलेला नवा फ्राँग घेऊन तिला दिला..त्या पोरीनं तो आनंदान घेतला.. लतिकानं वाढलेला फराळ घेऊन ती चालू लागणार तेवढ्यात लतिकानं तिला थांबवलं..आणि विचारलं

"अगं पोरी तुझ्या भाषेवरुन व वागण्यावरुन तू वेगळीच भासते" ती पोरगी थोडी शहाळली..मनात शंका कुशंकाच्या पाली चुकचूकल्या..पण लतिकानं तिला खोचून विचारले तेव्हा ती म्हणाली

" माई..माझ्या नशिबांन मला हे दिवस दाखवले.. मागच्या कोरोनानं माझे आई-वडील गेले..माझा सांभाळ करायला जगात आपली माणसं उरली नाहीत.,आई-वडील गेल्यावर आमची शेती भाऊबंधानी वाटून घेतली आणि वाटेकरु नकोत, म्हणून मला मारायला टपलेत. मी तेथून पळ काढला,मी दहिगावच्याच शाळेत दुसरीत शिकत आहे..तेथेच वस्तीगृहात राहते, कोरोनानं शाळा बंध आहे म्हणून वस्तीगृहही बंद आहे,ज्यांची आई-वडील आहेत ती पोरं त्यांच्या गावी गेलेत..मला जवळचे कोणी नाही म्हणून मी अशी गावोगावी जवळची माणसे शोधत फिरत आहे.."

तिच्या बोलण्यानं लतिका गर्भगळीत झाली. डोळ्याच्या पापणीत अश्रू तरळले..तिचे डोळे भरुन आले..लतिका तिला म्हणाली,

"अगं तू आमच्या घरी राहशील?" लतिकानं विचारताच त्या पोरीचे डोळे चक्रावले, मन गहिवरले.. तिला काय उत्तर द्यावे हे सुचले नाही,काही क्षण ती विचार करत मानेनंच

"हो"

म्हणाली,कारण तिलाही आधार हवा होता,ज्या वयात मायेची उब,व डोक्यावरुन फिरणारा हात हवा होता,आईच्या मायावी पदराची उब हवी होती..त्याच वयात तिच्यावरील मायेची सावली हिरावली होती.. ती मायेचा ओलावा शोधत होती.लतिकाने तिला मायेची उब दिली होती..अंगावर मळकटलेले कपडे व फिंजारलेले केस सावरत लतिकाने तिला घरात घेतले,तिच्या डोक्यावरुन हात फिरवत तिला अंघोळ घालून नवे कपडे दिले.

ती आरशा समोर उभे राहून आपले बदललेले नवे रुप पाहून अचंबित झाली, लतिकाच्या रुपात तिला आई मिळाली होती,ती पोरगी अभ्यासात खूप हूशार वाटली,लतिकानं तिला घरात घेतलं हे ऐकून शेजारी-पाजारी लतिकाचा तिरस्कार करु लागले..एका भिकाऱ्या पोरीला घरात घेतले म्हणून ते लतिकाकडे वेगळ्या नजरेनं पाहू लागले..शेजारी बायाबापडे लतिकाला त्या दिवसापासून टाळू लागले..रस्त्यावरच्या उकिरड्याला घरात घेतले म्हणून शब्दोंनशब्द डिवचू लागले..तसे लतिकालाही जवळचे कोणीच नव्हते..

शिवणकाम करुन ती उदरनिर्वाह भागवत असे..तिचा पती ट्रक ड्रायव्हर होता,पाच वर्षापूर्वीच तो अपघातामध्ये वारला होता,त्याच्यापासून एक सात वर्षाचा मुलगा होता,छोटेशा पत्र्याच्या घरात ती व तिचा मुलगा राहत होते..आता त्यात त्या मुलीची भर पडली

होती..लतिकाचे मन आभाळाऐवढे मोठे होते..मेहनत हेच तिच्या जगण्याचे बळ होते..पती निधनानंतर काही काळ ती खच्चून गेली होती,पण आयुष्याशी संघर्ष करतांना हरली नव्हती.. मुलांच्या डोळ्यांत स्वतःचे भविष्य शोधत ती नव्याने उभी राहीली होती..लग्नापूर्वी आई-वडीलांकडे शिवणकाम शिकली होती. ते आता तिला कामाला आले होते..तेच तिच्या जगण्याचे साधन झाले होते..फाटक्या संसाराला टाके घालत ती जगत होती पण उसावलेल्या संसाराला तिने कधीच फाटू दिले नाही..काळाने सौभाग्य हिरावले होते पण त्या सौभाग्यावर 'काजळी' चढू दिली नाही..आता ती पोरगीही तिच्यातच राहू लागली..लतिकाने तिचे नाव गावातील शाळेतच टाकले..एका नव्या नावाची व माणूसकीच्या धर्माची शाळेत नोंद झाली..ती उपजत अभ्यासात हूशार असल्याने शाळेतील शिक्षकही तिच्या हूशारीवर भाळले होते.तेही तिचे कौतूक करु लागले.. आईच्या उबेपासून पारखी झालेली ती पोरगी..आईची उब मिळाली म्हणून खूश होती,कोरोनाचे दिवस जातील पण तिच्या मनात कोरोना कायमचा राहील..कारण कोरोनानेच तिच्यावर ही वेळ आणली होती..! वाटेकरु म्हणून भावबंधानेही तिला हाकलून लावले होते.. ती जगण्याची उब शोधत गावोगावी भटकत फिरत होती,मिळेल ते खाऊन जगत होती.शाळा सुरु होती तेव्हा वस्तीगृहात जेवायला मिळायचे..पण कोरोनाने शाळाही बंध पडल्यात..मुलं आपापल्या घरी गेलेत..तिला घरही नव्हते आणि गावंही नव्हते..पायाने चालत राहवं,जेथे पाय थांबतील तेच तिचे गांव होते,मनात दुःखाचे सोहळे गात जगावे ऐवढेंच त्या कोवळ्या मनाला माहीत होते.. पण जेव्हा वाटा संपतात तेव्हा जगण्यासाठी नवी दिशा मिळते..! लतिकाच्या घरी दिवाळीच्या पणत्यात एका नव्याच दिव्याचा प्रकाश तेवत होता..!

**दीपक सोनवणे./सिल्लोड**
**मो.9860107398**

# थोड्यात गोडी राहते



कोणत्याही गोष्टीची
थोड्यात गोडी राहते
अतिरेक झाला की
माया थोडी राहते

संसारात नवरा
बायको जोडी राहते
जीवनाच्या सागरात
संसार होडी राहते

लेकराने केलेली
आईची खोडी राहते
जीवनात सुख - दुःख
पेरुच्या फोडी राहते

चोरीच्या पैशात
चोरांची तोडी राहते
जीवनाची वाट
नागमोडी राहते

मोठ्या शहरात नेहमी
वाहतूक कोंडी राहते
आरशाशिवाय
गाडी भोंडी राहते

भारतीय संस्कृतीचे
दर्शन साडी राहते
जन्म - मृत्यूला जोडणारी
जीवन गाडी राहते

प्रेमावर जीवनाची
उभी माडी राहते
विश्वासावर संसाराची
चालू नाडी राहते

**नरेंद्र अ. वाकोडे**
**जळगाव जामोद**
**मो. ९४२१४६५८५४**



# डोंगर



हा कनवाळु डोंगर
सदैव असतो उभा
माझ्या पाठीशी..
ऐकून घेतो माझी स्पंदनं
निर्विकार मनाने.
पायाना देतो बळ
'पंगु लंघयते गिरीम'म्हणत.
मी नसते एकटी कधीच,कुठेही.
तो हसत उभा असतो ठामपणे
तिन्ही त्रिकाल..
कोणताही अभिनिवेश न बाळगता!
या डोंगरालाही असतीलच की
सुख दु:खे,वेदना वंचना.
खरचटल्याच्या जखमा
असतील कदाचित
खोल पायथ्याशी
ज्यावर पाय देवून
हा ठाम अविचल उभा आहे.
आनंदी क्षणांची झुळझुळ ही
वाहत असेल त्याच्या
विशाल माथ्यातून.
खूप काही असेल
दडलेले..साचलेले.
कोणती असतील
त्याची स्वप्नं
आभाळाला कवेत घेण्याची
की
जमिनीवर फुलं फुलवण्याची!
सांग ना.

**डॉ.ज्योती कदम**
**मो.96044 66696**

# थकते बऱ्याचदा आई



आई हवी म्हणुनी
काय जाहिरात द्यावी लागते
फक्त येऊद्या डोळ्यांत पाणी
ती धावत पोटी लावते.

कोण, कशाला हवं
तुमचं भविष्य सांगणारा
क्षणभर बसा कुशीत
सांगेल हात गोंजरणारा

भाषा नसतानाही
आपल्याशी बोलते आई
गर्भात असल्यापासूनच
दु:खांना झेलते आई

थकते बऱ्याचदा आई
तिला धाऊन धापही लागते
बापा शिवाय जगताना
ती बऱ्याचदा बापही बनते.

जळतो दिवा देवालयी
तशी जळते हो माझी आई
रात्र अवसानी असतानाही
धगधगून तळपते आई.

नाही विसावा तुजला
या जन्मी तरी ग आई
बाई म्हणुनी जन्मुनी
जगलीस घाई घाई.

**प्रा.शशी बारी**
**सेंट मेरी उच्च माध्यमिक विद्यालय,**
**वाहेगव, गंगापूर, छ.संभजीनगर.**
**मो.7588761491**

# स्त्रीचे सामाजिक अस्तित्व



स्त्रीच्या सामाजिक अस्तित्वा बद्दल बोलण्याची आणि तिच्या सामाजिक अस्तित्वाची दखल घ्यावी लागली, ह्यातच तिचे अस्तित्व, दुय्यम असल्याचे अधोरेखित होते. समाजात वावरतांना स्त्री च्या अस्तित्वाची प्रामाणिक दखल घेतली जात नाही हे जाणवल्या शिवाय राहत नाही. त्या मागची कारणे पण भरपूर आहेत आणि त्या कारणांना पुढे करून स्त्री मात्र आपले मन मारत कशीतरी जगत असते. हेच तिचे समाजातील अस्तित्व आहे. पुरुष प्रधान संस्कृती मध्ये ती कायम दुय्यम आहे..

आपल्या पुराणात एक उदाहरण नेहमी दिल्या जाते की, सृष्टीची निर्मिती झाली तेव्हा शिवाच्या अर्धनारी नटेश्वराच्या अवतरातून स्त्री पुरुष जन्माला आले. पुरुष आणि प्रकृतीच्या रुपात त्यांनी आपले अस्तित्व निर्माण केले.

शिवाच्या डाव्या अंगातून स्त्री निर्माण झाली अन् उजव्या अंगातून पुरुष निर्माण झाला. डावे अंग कमजोर म्हणून डाव्या अंगातून शक्तीच्या दृष्टीने कमजोर नारीची निर्मिती झाली अन् उजवे अंग बळकट, म्हणून उजव्या अंगातून शक्तिशाली, बलशाली, शिरजोर पुरुष जन्माला आला. बळाचा वापर करून तो आणखी शिरजोर बनला. आपल्या शक्तीचे प्रदर्शन करु लागला. पुरुषांनी आपल्या शक्तीच्या बळावर घरातील स्त्रीवर, कुटुंबातील घटकांवर, समाजातील लोकांवर अधिराज्य गाजविणे सुरु केले. त्याच्या शारीरिक बळकटीचा, कमजोर स्त्री सामना करु शकली नाही. पुरुषाला विरोध करणे म्हणजे, पराभव ठरलेला हे तिला चांगले माहित होते. त्यातूनच स्वतःवर अन्याय ओढवून घेणे ही स्थिती तिच्या वाट्याला घरी दारी सर्व ठिकाणी आली. त्यामुळे स्त्री सुध्दा पुरुषाची शरणागत म्हणूनच जगायला लागली. जे वाट्याला आले तेवढेच पुरेसे समजत आली. प्रत्येक कुटुंबातील महिलांचे, बाहेरील आडदांड आणि विकृत समाजापासून, संरक्षण करण्याचे काम घरातील पुरुषांनाच करावे लागते. ती त्याची जबाबदारी होऊन बसली. घरातील खंबीर पुरुष आपले रक्षणकर्ते आहेत, म्हणून स्त्री पण पुरुषाच्या आधाराने जगू लागली. त्याची आश्रित बनली. कुटुंबातील कडक नियमांनी बांधली गेली. स्त्री नी हे सगळे स्वीकारले. याचा फायदा घेत पुरुष मंडळी घरातील स्त्रीवर कडक अंकुश ठेवायला लागले. हेच कारण पुरुषप्रधान संस्कृती निर्माण होण्यास प्रभावी ठरले. स्व संरक्षणासाठी स्त्रीला पुरुषांवर अवलंबून राहण्या शिवाय काही उपाय नव्हता.

कुटुंबाचे रक्षण ही बाब समजराचनेत बसणारी अशीच आहे. पुरुष मंडळी हे काम पूर्ण जबाबदारीने करायला लागले. प्रत्येक कुटुंबातील स्त्री ही त्या घराची इज्जत असते. प्रतिष्ठा असते. कुटुंबाचे मर्मस्थान असते. कुटुंबाचे श्रध्दास्थान असते. पुरुषी सामर्थ्याने तिचे हे मोठेपण जपले जाते. सांभाळले जाते पण जेव्हा दोन गटांना आपले शक्ती सामर्थ्य दाखवायचे असते, तेव्हा विरोधी गटाकडून, त्या कुटुंबातील स्त्रीला लांच्छन लावून प्रतिष्ठा भंग करण्याचा प्रयत्न केला जातो. ती कमजोर असल्याने प्रतिकार करु शकत नाही आणि विरोधी पक्ष समोरच्या गटाचा बदला घेण्यासाठी त्या कुटुंबातील स्त्रीला आधी नितीभ्रश्ट करून जिंकल्याचा आविर्भाव आणतो आणि आपला दबदबा निर्माण करतो. ही मानसिकता पूर्वी पासून अशीच सुरु आहे. पूर्वी राजे महाराजे साम्राज्य विस्तरा साठी एकमेकांशी लढाया करायला रणांगणात उतरत असत. त्या काळी सुध्दा आपला राणीवसा काळजीपूर्वक सुरक्षित जागी नेऊन ठेवण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची असायची. शत्रूच्या हाती आपल्या घराची इज्जत लागता कामा नये, म्हणून काळजी घेतली जात होती. आज निरोगी समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी खूप प्रयत्न केले जातात. उद्बोधन केले जाते. नियम बनविले जातात. धर्माचा आधार घेतला जातो. काही प्रमाणात त्याचा परिणाम होतो ही, पण कधी कधी पुरुषी अहंकार जागा होऊन अन्यायाच्या घटना घडत राहतात. कमकुवत महिला अन्यायाला बळी ठरतात आणि त्यात सामाजिक जीवन कलंकित होते.

एकीकडे स्त्रीला पूजनीय म्हणायचे आणि दुसरीकडे तिची दयनीय परिस्थिती करून ठेवायची, ही बाब स्त्रियांच्या वाट्याला येते. आपण दुर्गा, काली, चंडिका यांच्या रुपाला पूजनीय समजतो. त्यांची श्रध्देने पूजा करतो, पण त्या सगळ्याच शस्त्र धारी आहेत. आपले संरक्षण करण्यासाठी शस्त्र बाळगले, ते उपयोगात आणून स्वतःचे रक्षण केले, म्हणून त्या पूजनीय झाल्या. आज समाजात तीच गरज निर्माण झाली आहे. स्त्रीला स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी शास्त्र धारी होणे गरजेचे आहे. स्व संरक्षणाचे धडे घेतले आणि कला अंगीकृत करणे गरजेचे आहे. शस्त्र बाळगून ते चालविण्याची कौशल्ये तिनी आत्मसात केली पाहिजेत. अशानेच ती समाजात दुर्गा किंवा काली यांची जागा घेऊन स्व संरक्षण करु शकते. पुरुषांच्या मनात स्त्रीच्या संरक्षण कलेची दहशत निर्माण केल्या शिवाय पुरुष तिचा फायदा घेणे थांबविणार नाहीत. अन्याय

अत्याचार सहन करीतच तिला जगावे लागेल.

आज परिस्थिती बदललेली आहे. आपण स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत. बळकट आणि सुरक्षित न्याय व्यवस्थेत आपण आपले अस्तित्व निर्माण करीत आहोत. संविधानाने स्त्री पुरुष समनातेचे हक्क सर्व नागरिकांना दिले. त्याचा खूप मोठा फायदा स्त्री जातीला झाला. पुरुषांइतकी क्षमता असलेली स्त्री समाजात आपले विशिष्ट स्थान निर्माण करू लागली. उंबरठ्याच्या आतले जीवन सोडून घराबाहेर पडली. खूप शिकली. कमावती झाली. पुरुषांच्या बरोबरीच्या माना-सन्मानाच्या जागा मिळवू लागली. आपल्या कामाला निष्ठेने न्याय मिळवून घेऊ लागली. समाजाच्या मनात एक जबाबदार नागरिक म्हणून नाव कमाऊ लागली. घर सुध्दा उत्तम रीतीने सांभाळू लागली. आपल्या कुटुंबाला प्रतिष्ठित करू लागली. तारेवरची कठीण कसरत करीत, घर आणि नोकरी सांभाळत ती स्वावलंबी होण्या साठी धडपडू लागली. कुटुंबाचा आधार बनली. कुटुंबाची आर्थिक बाजू बळकट बनवू लागली. तिच्या या कार्यामुळे समाजात तिला मानाची जागा प्राप्त झाली.

स्त्रीची प्रतिमा उच्च पातळीवर तिनी निर्माण केली असली, तरी तिला आपल्या शारीरिक कमजोरी मुळे समाजापुढे झुकते घ्यावे लागले. स्वतःच्या इज्जतीला सांभाळतांना आणि जपतांना तिला अनेक नियमांमध्ये बांधून घ्यावे लागते. घराबाहेर राहण्याच्या वेळा बांधून घ्याव्या लागतात. नोकरी व्यसायाच्या जागी स्वतःची प्रतिष्ठा सांभाळावी लागते. ती स्वतः खूप जागरूक राहून सर्व कार्य करीत असते, पण बरेच वेळा तिच्यावर पाळत ठेऊन असलेली विकृत नजर तिला सावज बनविते. तिच्या कार्यक्षमता ओळखण्या ऐवजी तिला भोगवस्तू म्हणून पाहते. शिकार करण्यास टपून बसते.

योग्य वेळ साधून आपला हेतू पूर्ण करण्याचा प्रयत्न सुध्दा करते. या सर्व नियमांमुळे स्त्री अजूनही सुरक्षित नाही. मान सन्मान प्राप्त करू शकत नाही. समाजात तिच्या वाटेला कुचंबणा येते. तिच्यातील कलागुणांचे कौतुक करून तिला संधी प्राप्त करून दिल्या जात नाहीत. उलट घराचा उंबरठा न ओलांडता, घरादारा साठी पूर्ण वेळ कशी उपलब्ध राहील ही अपेक्षा तिच्या कडून केली जाते. हे सगळे सहन करतच आणि स्वतःला जपत असते. तिची समाजातील वाटचाल अशाच पद्धतीने चालू असते.

कुटुंबात देखील तिची तारेवरची कसरतच असते. नोकरी निमित्ताने घराबाहेर पडताना तिची प्रचंड दमछाक होते. मुलाबाळांची



जबाबदारी तिच्यावर अधिक असते. सासू सासरे, नातेवाईक, शेजारी यांच्याशी चांगुलपणाच्या भावनेने संबंध निर्माण करणे तीलाच करावे लागते. हे सर्व करूनही कुटुंबाचे काही कठोर नियम तिच्यासाठी असतात. घरातील कर्त्या पुरुषाची मर्जी सांभाळूनच तिला सर्व निर्णय घ्यावे लागतात. तिच्या वाट्याला कौतुकाचे चार शब्द फार कमी येतात. तिच्या कामाची किंमत फार कमी कुटुंबात होते. समाजात वावरताना जसे तिच्या साठी कठोर नियम आहेत तसेच कुटुंबातही आहेत. तरी सर्व जबाबदारी इमाने इतबारे पार पाडत स्त्री पुढे पुढे जात आहे. संयम आणि सामंजस्याने आपले घर आणि आपले आर्थिक क्षेत्र सांभाळत आहे.

स्त्री ने समाजात आपले प्रभावी अस्तित्व निर्माण केले आहे. फक्त समजाकडून तिला एक नागरिक म्हणून समजून घेण्याची गरज आहे. तिला माना सन्मानाने वागणूक दिली तर समाज व्यवस्था उच्च स्थराला जाईल. स्त्रीला तिचा न्याय मिळेल. तीही स्वतंत्र भारताची स्वतंत्र नागरिक म्हणून मोकळा श्वास घेईल. तिलाही आपले स्वतंत्र अस्तित्व जपता येईल. समाज हिताचे चांगले निर्णय घेता येतील. तिला देवी म्हणू नका. तिची पूजा करू नका पण मानव म्हणून मानवतेची वागणूक मात्र तिला दिली गेली पाहिजे. येवढ्या हक्काची तिला समाजाकडून अपेक्षा आहे. किमान येवढे हक्क तिला समाजाने दिलेच पाहिजेत. तरच ती आपले अस्तित्व निर्माण करू शकेल. समाज बांधवांच्या मदतीने हे पूर्ण पने शक्य आहे......

**सौ.विजया डी.भांगे**
**पथ्रोट, अमरावती**
**मो.8788417459**

# व्यथा समजली नाही



स्त्री म्हणून तिच्या मनाची व्यथा....
कधी कोणाला समजली नाही,
मादी म्हणून सदैव पाहत आले,
दु:खे तिची दिसलीच नाही.......

वेदना होतात त्या  जिवाला.....
कधी कोणाला कळलेच नाही,
उपभोगा व्यतिरिक्त जिवन आहे,
हे कधी कोणी मानलेच नाही......

तिलाही एक मन, भावना आहे.......
जाणून घ्यायला कोणी तयार नाही,
मनाच्या तिच्या ठाव शोधू शकेल
असा कोणी  सहृदय सापडत नाही........

तिलाही कधी  यातना होतात.....
ह्याची जाण कधी ठेवत नाही,
निस्वार्थी  प्रेमा पोटी ती जगते,
का कुणास  ते ठाऊक नाही.......

बांधून संसाराचा रहाट गाड्यात....
बेडी कोणी तिची खोलीतच नाही,
घ्यावे वाटते भरारी तिला  पण,
मुक्त पणे कोणी जगू देतच नाही......

नसते काही मागणे जास्त तिचे....
तेही स्वप्नं कोणी पुरे करत नाही,
उपरोधिक पणे वागले जाते आणी,
मनापासून सन्मान कोणी देत नाही........

विश्वजीत अनंत जगताप.
अंबरनाथ पूर्व
मो.८९८६७९१९६९

# हे देवी शारदे



देवी शारदे, हे देवी शारदे
आम्ही करतो तुला वंदन
गातो तुझ्याचसाठी कवन
देवी शारदे, हे देवी शारदे... ॥धृ॥

त्याग करुनी खोट्याचा
मिळू दे मार्ग मोक्षाचा
आनंदाने भरावे हे गगन
करतेस तू दु:खाचे हरण... ॥१॥

देवी शारदे, हे देवी शारदे

छेडिता तार तू वीणेचा
सूर उमटतो सौख्याचा
चराचराचे नंदनवन
व्हावे दु:खाचे दमन... ॥२॥

देवी शारदे, हे देवी शारदे

अंध:कार दूर व्हावा
प्रकाशाचा पूर यावा
उजळावे सृष्टीचे भवन
स्वीकार तू आमचे नमन... ॥३॥

देवी शारदे, हे देवी शारदे

प्रत्येकाला हक्क जगण्याचा
स्वत:चे पोट भरण्याचा
अन्यायाचे व्हावे पतन
आम्ही आलो तुला शरण... ॥४॥

देवी शारदे, हे देवी शारदे

उमा पाटील
धुळे
मो.9422750558

# बुद्धांची शिकवण सर्व जगास तारक



बुद्धांचे तत्त्वज्ञान या विषयाला अनुसरून मला समजलेल्या बुद्धांच्या विचारांचा उहापोह करण्याचा एक प्रयत्न..

तथागत गौतम बुद्ध एक राजपुत्र, गृहस्थाश्रमी पण दुःख काय असते हे प्रजेच्या माध्यमातून त्यांनी जाणले आणि याचा परिणाम म्हणून ते मोठ्या उदात्त हेतूने राजवाड्याबाहेर पडले. हा गृहत्याग म्हणजे कौटुंबिक जबाबदारी झटकून संन्यासाश्रमाचा स्वीकार नव्हता. तर मानवी समूहाचे दुःख समूळ नष्ट करण्यासाठीची ती उपाययोजना होती. मानवी कल्याणाचे हित साधण्याचा त्यांचा संकल्प होता.

भगवान गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान सर्वव्यापी आहे. मानवाच्या आयुष्यात दुःखे का आहेत ? जीवन दुःखमय आहे त्याचे कारण तृष्णा आहे. अष्टांगिक मार्गाने दुःख नष्ट करता येते,हा प्रयत्नवाद बुद्धांनी सांगितला.

बुद्ध हे प्रयत्नवादी होते. निसर्गामध्ये घडणाऱ्या घटनांमागे शास्त्रीय कारण आहे. बुद्धांचे विचार,तत्त्वज्ञान आणि कार्य हे ज्ञानावर आधारलेले आहे. मानव हीच एक जात आहे.सर्व मानवांची ठेवण एकाच प्रकारची.. सर्वांचे रक्त लालच रंगाचे आहे मग भेदभाव कशाला? आत्ताच्या काळात बुद्धांच्या या समतावादी विचारांची गरज आहे.

शांततेच्या मार्गाने जे साध्य होईल ते हिंसेने आणि युद्धाने साध्य होणार नाही, तसेच प्राणीमात्रांवर दया करा त्यांची हत्या करू नका हा त्यांचा विचार मौलिक आहे.

अत्त दीप भव: म्हणजे स्वयंप्रेरित व्हा हा एक महान संदेश त्यांच्या तत्त्वज्ञानातून मिळतो. २६५२ वर्षांपूर्वी सांगितलेले पंचशील म्हणजे..

अहिंसा, चोरी करू नये, लैंगिक स्वैराचार(व्यभिचार) नको, खोटे बोलू नये, नशा करू नये. असे हे कालातीत तत्त्वज्ञान.. आजही या विचारांचा ठेवा अनमोल आहे. बुद्ध महात्म्य भारतानेच नव्हे तर जगाने सुद्धा मान्य केले आहे.

सुखी जीवनासाठी या पंचशीलाचे आचरण करणे आवश्यक आहे. तरुण पिढीला याची जाणीव करून देणे आवश्यक आहे..

सुखी जीवनासाठी
पंचशील आवश्यक
गौतम बुद्धांची शिकवण
सर्व जगास तारक

**सौ. विद्या मलवडकर (विद्याराणी)**
**सातारा**
**प्र-बोध निर्मितीकार,**
**कवयित्री, लेखिका,**
**शायरा, गझलकारा**
**मो.98224 21008**



# व्यसन



अरे माणसा माणसा
नको करुस व्यसन
दारु पिऊन रे तुझं
होतं लाखो नुकसान

घरोदारी कीटकीट
तुझा संसार फाटका
क्षणोक्षणी कुटुंबाला
देतो कर्जाचा झटका

सिगारेट रे ओढून
होई तनास बिमारी
दारु पिऊन मानवा
संसाराची राख करी

नशेमध्ये तू मानवा
भान विसरुन जातो
घरदार वाऱ्यावर
इज्जतीचा खेळ होतो

नको मानवा व्यसन
शरीराची करु घाण
तुला सांगते मानवा
जप तनमनधन

**गंगा सपकाळे (काव्यगंगा)**
**मो.8668427799**



# स्त्री



सांज होती जेव्हा पळती पाखरे घरा....
अंधुकशा प्रकाशाच्या वाटेने पाऊले पडती घरा...
ज्योत पेटून सारे दुःख अंधारा...
मिनी मिनी त्या दिव्याच्या साक्षीने माऊली चूल पेटविते भराभरा...
सांज होती जेव्हा पळती पाखरे घरा...1....
धना धना जळणाऱ्या विस्तवाने........
काळजाच्या ठिणग्या उडायच्या तिच्या...
कांदा भाकरी लसणाची चटणी.......
त्या पोरांना देऊन.......
खळगी भरायची ती.......
पोरं उपाशी राहतील म्हणून सूर्याच्या साक्षीने हात तिचा घमेल्याकडे जायचा.........
सूर्य रोज धनाधना जळणा...ऱ्या विस्तवाने पहायचा.....
पण तो लबाड दिवस त्या मुकादमचा....
उगवायचा... सांज होती जेव्हा पळती पाखरे घरा....2...
.. तिचे मातीचे घमेले उचलताना......
... बाळाच्या पिणाऱ्या जागेवर मुकादम हात तिथे लावायचा...
टाळता येत नव्हतं....
जळणाऱ्या धनाधना जळणाऱ्या विस्तवानं काळजाच्या ठिणग्या तिच्या उडायच्या....
सांज होती तेव्हा पळती पाखरे घरा...3......
सांगा सांगा तिच्या जीवनाचे...
ठि गाळ असे कुठवर चालायचे.......
पण तक्रार कोणाला द्यायची तक्रार कोणाला द्यायची...

**शांतीलाल ननवरे**
**चिंचोली**
**मो.8850289815**

# समर्थ आणि स्वराज्य



१७ व्या शतकापर्यंत महाराष्ट्रात जेवढे संत मंडळी होऊन गेले त्या बहुतांश संतांचे नाते जोडल्या गेले ते पंढरीच्या विठ्ठला सोबत. मात्र १७ व्या शतकातील समर्थ रामदास स्वामींचे नाव जोडले गेले ते प्रभु श्रीराम आणि हनुमंता सोबत. समर्थ म्हणजे सामर्थ्य निर्मितीला आवाहन करणारे आणि रामदास म्हणजे रामाचा दास. समर्थ रामदास स्वामींचे मुळ नाव होते नारायण सूर्याजी ठोसर. १६०८ साली जालना जिल्ह्यातील जांब या गावी समर्थांचा जन्म झाला होता. लहानपणा पासूनच अध्यात्माची आवड असलेल्या समर्थांचे मन कुटुंब किंवा संसारात कधीच रमले नाही. १६२० साली म्हणजेच वयाच्या १२ व्या वर्षी आईच्या इच्छे खातर समर्थ लग्न मंडपात बोहल्यावर चढले आणि सावधान म्हणताच अध्यात्मिक मार्गावर चालण्यासाठी मंडप सोडुन कायम स्वरुपी निघुन गेले.

१६२० ते १६३२ असे १२ वर्ष समर्थ नाशिक मधील टाकळी येथे वास्तव्यास होते. हे एक तप समर्थांनी टाकळी येथे प्रभु श्रीराम आणि हनुमंताची भक्ती केली. या १२ वर्षात दररोजच्या दिनचर्येत समर्थ १२०० सुर्य नमस्कार घालत असे. टाकळी येथील वास्तव्यामध्येच नारायणाचा रामदास म्हणजेच रामाचा दास झाला. टाकळी येथे समर्थांनी हनुमान मंदिराची देखील स्थापना केली. टाकळी येथील वास्तव्यामध्येच सामाजिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी भारत भ्रमणाचा विचार समर्थांच्या मनात आला. १६३२ ते १६४४ असे पुढील १२ वर्ष समर्थांनी संपुर्ण भारत भ्रमण केले. या भारत भ्रमणामध्येच त्यांची शिखांचे सहावे धर्मगुरु हरगोविंद सिंग यांच्यासोबत सुद्धा भेट झाली. धर्म आणि स्त्रीच्या शील रक्षणासाठी हरगोविंद सिंग त्यांच्या सोबत २ तलवारी बाळगत असे. त्यांच्या सोबत असलेल्या २ तलवारी बघुन, समर्थांच्या मनात देखील वैफल्यग्रस्त समाजाला बलोपासनेचा संदेश देण्याचा विचार आला. याच काळात समर्थांनी संपुर्ण भारतभर ११०० मठांची स्थापना केली. रामदासांना समर्थ हे विशेषण लागले ते याच १२ वर्षाच्या काळात.

या १२ वर्षात समर्थांनी मोघलांच्या अत्याचारांवर भाष्य करणारे काव्य निर्माण केले. या काळातील त्यांची विद्रोह करणारी काव्य निर्मिती धर्म रक्षणासाठी हिंदवी स्वराज्य निर्मितीला देखील आवाहन करत होती. हा तोच काळ होता जेव्हा सामर्थ्याच्या रुपाने उत्तरेत शहाजहानचे नाव घेतले जायचे तर दक्षिणेत शहाजी राजांचे. पण फरक हा होता की शहाजहान सत्तेच्या शीर्ष स्थानी होता तर शहाजीराजे निजामाच्या सत्तेमध्ये सहभागी असलेले सरदार होते. आपण ज्या भूमी मध्ये जन्माला आलो किमान तिथे धर्म रक्षणाचे कार्य हातात घेतले पाहिजे असे समर्थांना मनोमन वाटू लागले होते. समर्थांच्या मनातील धर्म रक्षणाचा विचार राजकीय दृष्ट्या पूर्णत्वास नेण्याचे सामर्थ्य त्या काळात शहाजीराजांकडे होते हे





समर्थ रामदास स्वामी जाणून होते.

काही ऐतिहासिक संदर्भ सांगतात की हिंदवी स्वराज्य निर्मितीच्या याच विचारातून समर्थांनी १६४४ साली शहाजीराजे, राजमाता जिजाऊ आणि शिवाजी महाराजांची भेट घेतली. तेव्हा शिवाजी महाराज १४ वर्षांचे होते. मात्र या भेटी संदर्भातील ऐतिहासिक पुरावा कागदपत्रांच्या रूपाने सापडत नाही. मात्र पुढील वर्षीच म्हणजे १६४५ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मावळ्यांसह रायरेश्वराच्या मंदिरात हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. यावेळेस समर्थ रामदास स्वामींचे वय होते ३७ वर्षे तर छत्रपती शिवाजी महाराजांचे वय होते १५ वर्षे. हा तोच काळ होता जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज सत्ता स्थापनेच्या मार्गाने हिंदवी स्वराज्य वाढवत होते तर समर्थ रामदास स्वामी आध्यात्मिक मार्गाने लोकांना बलोपासनेचा संदेश देत होते.

समर्थ रामदास स्वामींनी अध्यात्मिक मार्ग आणि बलोपासनेचा संदेश समाजाला देण्यासाठी चाफळ परिसराची कर्म भूमी म्हणुन निवड केली. चाफळ परिसरात त्यांनी ११ मारुती मंदिराची स्थापना देखील केली. लोकांमधील धार्मिक वृत्ती वाढावी यासाठी समर्थांनी गणपतीची आरती, मारुती स्तोत्र, मनाचे श्लोक यांचे देखील लेखन केले. शिवथर घळ या एकांत स्थळी समर्थांनी त्यांचे परम शिष्य कल्याण स्वामी यांच्या मदतीने १६५६ साली दासबोध ग्रंथाची निर्मिती केली. दासबोध ग्रंथा मधुनच त्यांनी समाजाला मूर्खांची १३ लक्षणे दाखवुन दिली.

१६५९ साली आदिलशाही सरदार अफजलखान स्वराज्यावर चालून येत आहे असे कळल्यावर समर्थ रामदास स्वामी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना काव्यात्मक रूपाने संदेश देणारे एक पत्र लिहिले होते. या पत्रामध्ये त्यांनी अफजलखानाच्या क्रूर स्वभावाचे वर्णन केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य विस्तार होणारे कार्य आणि स्वराज्यातील सुखावलेली जनता बघुन समर्थांनी महाराजांना "श्रीमंत योगी आणि जाणता राजा" या २ उपाधी बहाल केल्या. समर्थ आणि महाराजांची सदैव भेट होत नसे मात्र पत्राच्या रूपाने दोघांमध्येही वैचारिक संवाद सतत चालु असे. समर्थ अध्यात्माच्या मार्गाने कार्य करत होते तर शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्य विस्ताराच्या मार्गाने कार्य करत होते. दोघांचेही मार्ग वेगवेगळे असले तरीही वैचारिक ध्येय मात्र सारखीच होते.

६ जून १६७४ साली छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. महाराजांनी धर्मासाठी काम करणाऱ्या अनेक मान्यवर आणि संत मंडळींना राज्याभिषेकासाठी निमंत्रण दिले होते. समर्थ रामदास स्वामींना देखील हे निमंत्रण होते मात्र समर्थ राज्याभिषेक सोहळ्यास अनुपस्थित होते. समर्थ का अनुपस्थित होते याचा ऐतिहासिक संदर्भ मिळत नाही मात्र राज्याभिषेक होताना शिवाजी महाराजांनी हातात धरलेले शिवधनुष्य समर्थ रामदास स्वामींनी दिले होते असा ऐतिहासिक संदर्भ मिळतो. १६७८ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी समर्थ रामदास स्वामींच्या अध्यात्मिक कार्य विस्तारासाठी चाफळची सनद देत ३३ गावे इनाम दिली होती. या सनदेची मुळ प्रत ब्रिटनमधील ऐतिहासिक म्युझियममध्ये जतन करून ठेवलेली आहे. या सणदेवर शिवाजी महाराजांची राज्यकारभाराची शिवमुद्रा देखील आपल्याला बघावयास मिळते.

छत्रपती संभाजी महाराज म्हणजे शिवाजी महाराजांचे थोरले पुत्र आणि हिंदवी स्वराज्याचे वारसदार. संभाजी महाराजांनी शिवाजी महाराजांच्या पावलावर पाऊल टाकून स्वराज्य वाढवावे यासाठी १६७९ साली समर्थ रामदास स्वामींनी त्यांना एक उपदेशात्मक पत्र लिहिले. या पत्रात लिहिलेल्या काही उपदेशात्मक ओळी म्हणजे "शिवरायांचे आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा साक्षेप, शिवरायांचा आठवावा प्रताप, या भू मंडळी". छत्रपती शिवाजी महाराजांनी समर्थांना दिलेली चाफळची सनद पुढे संभाजी महाराजांनी देखील चालु ठेवली. संभाजी महाराजांचे पुत्र शाहू महाराज यांनी देखील रामदासी पंथासाठी चाफळची सनद पुढे चालु ठेवली.

महाराष्ट्रात जेवढे संत मंडळी होऊन गेले त्या प्रत्येकांनी सामाजिक परिस्थितीवर भाष्य केले, समाजाला सहिष्णुतेचा संदेश दिला. समर्थ रामदास स्वामींनी देखील सामाजिक परिस्थितीवर भाष्य केले, सहिष्णुतेचा देखील संदेश दिला मात्र सोबतच त्या काळात समाजाला बलोपासनेचा संदेश का दिला ही विचार करण्या सारखी गोष्ट आहे. इतर सर्व संत मंडळींनी सामाजिक परिस्थितीवर भाष्य केले, समाज प्रबोधन केले. पण समर्थ रामदास स्वामींचे वेगळेपण म्हणजे त्यांनी राजकीय विषय, राजकीय परिस्थितीवर देखील भाष्य केले.

समर्थ रामदास स्वामींचा छत्रपती शिवाजी महाराजांसोबत पत्र व्यवहाराच्या रूपाने अनेक वेळेस संवाद झाला मात्र त्यांनी राजकारणात कधीही हस्तक्षेप केला नाही हे देखील तेवढेच खरे आहे. दोघांचेही वैचारिक ध्येय साध्य करण्याचे मार्ग वेगवेगळे होते आणि दोघेही एकमेकांच्या आदर स्थानी देखील होते. कधी वेळ काढुन आपल्याला सज्जनगड, शिवथरघळ, चाफळ, जांब या समर्थांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या जागांना भेट देण्याचा योग आला तर या जागा समर्थांच्या जीवन कार्याचा सविस्तर परिचय देतात.

जय जय रघुवीर समर्थ....

**राहुल बोर्डे**
**पुणे**
**मो.9822966525**

# गझल



अस्तित्व आज माझे माझे मला कळू दे
निरसून दंभ सारा गर्वास या गळू दे....

अंधारली कवाडे शोधू कुठे मला मी!
हे 'स्व'त्व शोधण्या मज भवसागरी जळू दे...

जन्मास अर्थ येई आनंद वाटल्याने
जाणीव ही सुखाची रक्तात पाजळू दे...

खेचू नका कुणीही पाऊल धावणारे
जिंकावया नभाला धैर्याकडे वळू दे...

दु:खा!तुझी नि माझी कारुण्यमय कहाणी
आता परोपकारा हा देह पाजळू दे...

मज मार्ग भेटला अन जन्मास अर्थ आला
निर्माल्य देह होता सरणात विरघळू दे...

अस्तित्व तोडके पण वैश्विक खास होता
ही ज्योत जीवनाची तृप्तीत मावळू दे...

**प्रीती तडस, वाडीभस्मे**
**लहरी नगर, मुरारका वाडी, वर्धा**
**मो.8087360475**







# स्वतःला ओळख



कोण आहेस तू,
हे कधी अनुभवलंस का..?
रोज आरश्यात पाहताना,
अंतर्मुख झालास का..?

तुझ्याशी कोण कसं वागतंय,
हे रोज तू न चुकता बघतोस ना..?
पण तू दुसऱ्याशी कसा वागलास,
हे तू कधीतरी पाहिलंस का..?

समोरच्याकडे बोट दाखवताना,
स्वतःकडे चार बोट आहेत हे विसरलास...
तुलाच कळालं नाही पण,
जगाच्या फसव्या जाळ्यात तुही अडकलास...

जगाला सोड तू आधी स्वतःला ओळख,
इतरांना वाईट म्हणण्यापेक्षा तू चांगला बन...
कुणी कसं का वागेना त्याच्याशी तुला काय,
पण माणसा तू मात्र स्वतः खरा सज्जन बन...

**ॲड.अंश श्रीकांत खलिपे**
**कोथरुड, पुणे.**
**मो.8055847082**

# संवाद असावा नेटका



घर असावे घरासारखे
नकोच नुसत्या भिंती
त्यात असावा प्रेम जिव्हाळा
नकोच नुसती नाती !!

कवितेच्या ओळी मनात फेर धरुन बसल्या आहेत. “आमच्या वेळी असं चालायचं नाही” या सारखे संवाद कानी पडत असतात. पूर्वी काय होतं आणि आता काय नाही या अनुषंगाने विचार करायला लागलो व जाणवत पाया खचतो आहे. समाजाचा आणि एकूणच कुटुंब व्यवस्थेचा तोल बिघडतो आहे.

पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती. एक कुटूंब प्रमुख आणि बाकीचे सगळे सदस्य प्रमुखांनी घेतलेले निर्णय सर्वांना लागू असायचे. कोणतेही संकट येवो एकत्रीत पणाने त्याचा सामना करण्याची धारणा होती. आनंदाचे क्षण ही एकत्रीत पणाने साजरे होत.

कारण परत्वे ही कुटूंब व्यवस्था काहीशी बिघडत गेली. संसार विभक्त झाले. मी आणि माझे कुटुंब ही भावना जोर धरु लागली व सांघीक भावना गायब होवू लागली असं म्हणायला हरकत नाही. ;

पूर्वीही घरात धुसफूस चाले. भांडणे होत पण ती चार भिंतीत संपतही होती. कारण होतं परस्परातील वाटणारा जिव्हाळा ; आपुलकी. कृतीतून व्यक्त होण्याचे दिवस होतें ते. पण धुसफूसीने उंबरठा ओलांडला आणि समस्यांची उत्तरे बाहेर शोधली जावू लागली.

एकत्र असतांना संकटात जबाबदारी वाटून घेतली जायची. कष्ट दुय्यम बनत पण विभक्त झाल्यानंतर एकावरच ताण येवू लागला. वैताग येण्यास खतपाणी मिळत गेले.



दिवसमान बदलत गेले तसे आचार विचारालाही स्वतंत्रता मिळत राहीली. समाज बदलतं होता. आपसातील फरक व अंतर वाढत होते त्यामुळे वाडवडीलाची पर्वा कशाला करायची या विचारा पर्यंत आली.

यामुळे झालं काय ?काळाचे-वेळेचेही भान विसरायला लावणारी भ्रमणध्वनी; यु-ट्यूब ; फेसबुक इ. आयुधे हाती आली आणि आपण राजेच असल्याचे थाटात यांचा वापर होवू लागला.”स्व “मग्नतेची आवड जोम धरु लागली. या वाट्चालीत आपले मुल -मुली काय करतात ; पाहताहेत याची जाणीव पालकांना नाही. कारणं वाढत्या स्पर्धेमुळे नोकरी - धंद्यात उसंत नव्हती. त्यात भरीला किटी व भीशी.

पालकांच्या हाती असलेला लागायचं निसटला आणि त्यांच्या लाडक्या ची पावले नको त्या दिशेने बिनधास्त पडू लागली हे सांगायला पुण्यनगरीत नुकतीच घडलेली घटना पुरेशीच होय.

निश्चितच काळ वेगाने धावतो आहे. जिवघेण्या स्पर्धेचा सामना सुरु आहे ही बाब जरी असली तरी परस्परातील संवाद कमीत होतोय,दुरावा सावली पसरते आहे आणि हाच दुरावा समाज व्यवस्था खिळखिळी करायला कारणीभूत ठरतो आहे.मुला -मुलींना ठराविक वयातील धोक्यांची जाणीव करुन देणे ही पालकांची जबाबदारी आहे हे इष्ट असल तरी त्यांना एकत्र खेळू देण्यात प्रतिबंध करु नये. ती नाती फूलू देतानांच नको त्या वयातील अंकुश त्यांनां एकलकोंडे बनविणार नाही ही खबरदारी जरुरीची वाटते.

त्याच बरोबरीने या गदारोळात आपण आपली संस्कृती ;सण ; त्यातील पावित्र्य विसरत चाललोय काय याची शंका रुपी भिंती वाटू लागली आहे. देव - आणि समाज धूरीनाचे मिरवणूकीत गाण्यावरती होणारे वेडेवाकडे अंगविक्षेप काय सांगतात ? याचे समाज मनावरील होणारे परिणामांचा विचार सर्वांनीच कराय्ला हवा. ही कोणा एकट्याची जबाबदारी नाही.

आपण कोसळतोय ;बेचिराख झालोय असंही समजायची गरज नाही..

गरज आहे ती बांधण्याची ;मना-मनाला फूलवित गुंफण्याची. नव्याची जोड धरताना हळूच मागे डोकविणे जरुरीचे बनते. त्यामुळे आपली पावले चुकीची तर पडत नाही याची शहानिशा करता येईल.

जिवन शैलीमुळे ताण -तणावातून सुटका नाही प्रश्न येतच राहतील. ते सोडवण्याची तयारी हवी संवादातून.

ते शक्य आहे याची उदाहरणे ही जाणकार देतात. मनातील सर्व प्रकारांचे भेद मिटवायला हवेत.संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सांगताच तसे भेदाभेद भ्रम अम़गळच या गोष्टी चे भान सर्वच बाबतीत रांगायला हवे. हे घडायला हवा संवाद एकोपा. मग काय बिशाद स़कट़ाची ?

यामुळे घडेल काय ? सारं आकाश मोकळे होईल आणि या निरभ्र आकाशात घरातून उडालेले पाखरु उ़च झेप घेईल नव नवीन क्षितिज काबिज करायला.. पण यासाठी ध्येयाकडे निडर नजर हवी आणि उंबरठ्यावर भक्ती. हीच बाब कवयित्री विमलताई लिमये बजावून स़ागतात.

पावसाळ्यापूर्वी आपण घराची शाकारणी करतोच की घराला कसला धोका पोहचू नये म्हणून नाही का ? तेच करायचंय पालघर आणि समाज मने स्वच्छ करायचची संवादाने त्यामुळे स्वच्छ झालेली मने प्रसन्न सकाळ सहीत नवीन वाटचाल करतील जोमाने !!

**राजेंद्र चुत्तर.**
**ए-१०३ पद्मविलास अपार्टमेंट**
**बाणेर पाषाण लिंक रोड, पुणे**
**मो.९८९०१२९१०३**

# कशातही न गुंतता



रहावे वाऱ्यासारखे
सगळ्या सवे असूनही
न व्हावे पारखे

सैरभैर होऊनही
व्हावे जरा उनाड
संपूर्ण भूमी व्यापून
क्षणात चढावे पहाड

पाण्याच्या आत व
बाहेर सुद्धा रहावे
अग्नी निर्माण करणारा
वारा सुद्धा व्हावे

झुळूक होऊन वाऱ्याची
उन्हात गारवा द्यावा
तरुवेलींना डोलवणारा
वायू होऊन पहावा

बासरी मधून जाता
मधुर स्वर निघावे
हृदयाची धडधड
प्राणवायू होऊन बघावे

कुठेच न अडकता
सगळीकडे असावे
सर्वच ठिकाणी राहून
कशातच नसावे

**श्रेयस रविंद्र लहामगे**
**अहिल्यानगर**
**मो.91468 80613**



# वरदान



हृदया थेट स्पर्शावे
बीज होऊनी
मनी सदा रुजावे
असे शब्दास वरदान आहे

मौनास अर्थ निरंतर
परी होऊनी बाण
मना घायाळ करावे
असे शब्दास वरदान आहे

रंगुनी रंगात साऱ्या
छटा मोहक उमटवून
रंगबिरंगी व्हावे
असे शब्दास वरदान आहे

सुगंध घेऊन ये संगे
अर्थाचे अत्तर लेवूनी
माला सुंदर व्हावे
असे शब्दास वरदान आहे

सुखदुःखाच्या हिंदोळ्यावर
मनसोक्त झुलुनी
जीवन-सार सांगावे
असे शब्दास वरदान आहे

रसिकांचे मोहूनी मन
भावनांच्या नावेत बसुनी
काव्य सागरात विहरावे
असे शब्दास वरदान आहे

**शितल मोहोळकर(हिरकणी)**
**नवी मुंबई**
**मो.9699129203**

# वेलझुंबर



पाऊस आला
धरा सुखावली
निसर्ग आनंदला
बहरून निघाला

वृक्षात पाहीला
विठूराया उभा
वेलीहार घातला
वेलझुंबर नभा

खांबा तारांवर
वेलींची आरास
स्वागत धर्तीवर
विठूची खास

विष्णू निजला
महादेव आला
श्रावणात झाला
वेलीझुंबरमाला

**नागरत्ना कुरतरकर**
**फोंडा गोवा**
**मो.9423813023**

# रहें ना रहें हम....



'रहें ना रहें हम! महका करेंगे, बन के कली,
बन के सबा, बाग़े वफ़ा में'!

६ फेब्रुवारी २०२४ ला गानसरस्वती लता मंगेशकरला जाऊन २ वर्ष झालीत. पण त्या गंधर्वगायनी कळांना या तारखेशी कांहीही देणे घेणे नाही. त्यांची मनमोहक सुरेल स्वरमधुरिमा आजही तशीच शाबूत आहे. स्वर्गातील नंदनवनाच्या दिव्य सुमनांच्या कालातीत सुरभीप्रमाणेच लताच्या स्वरांचे लाघवी लावण्य वर्षानुवर्षे आपल्या स्वरसौरभाचे सिंचन करीत आले आहे आणि आमच्या दिलांच्या गुलशनला याच प्रकारे वर्षानुवर्षे प्रफुल्लित ठेवीत राहणार आहे. २८ सप्टेंबर १९२९ चा अत्यंत मंगलमय दिवस! या दिवशी घडलेली 'न भूतो न भविष्यति' अशी घटना! गंधर्वगायनाच्या पल्याड असलेले 'लता मंगेशकर' नामक सात अक्षररुपी चिरंतन स्वरविश्वाचे मूर्तरूप जन्माला आले. अक्षय परमानंदाची बरसात करणारी स्वरशारदा लता आज संगीताच्या अक्षय अवकाशात ध्रुव ताऱ्यासारखी अढळपदी विराजमान झाली आहे. तिचे सूर अवकाशात असे कांही विखुरलेले आहेत की, ती या नश्वर जगात नसल्याचे जाणवतच नाही. 'शापित गंधर्व' दीनानाथ मंगेशकरांचा वारसा घेऊन लता आयुष्याचा प्रत्येक क्षण काटेरी वाटचाल करीत संगीताला समर्पित करूनच जगली. एखादी मूर्ती घडत असतांना टाकीचे घाव सहन करते, तसेच तिच्या आयुष्याची सुवर्णसांगता होण्याआधी तिने अगणित घाव सहन केले. तिच्या संगतीने काम करणाऱ्या गायक, संगीतकार, गीतकार, सिनेसृष्टीतील अनेक व्यक्ती आणि बाबासाहेब पुरंदरे तसेच गो नी दांडेकरांसारख्या दिग्गजांच्या सहवासाने तिच्या व्यक्तिमत्वाला अन मखमली स्वरांना दैवी सुवर्णकांती प्राप्त झाली. लता आयुष्यभर एक अनोखी अन अनवट सप्तपदी चालली, सप्तसुरांबरोबर!

मंगेशकर भावंडे म्हणजे आजच्या भाषेत मी म्हणेन, 'मंगेशकर ब्रँड', याला अन्य नसे उपमान अन पर्याय! दीनानाथ आणि माई (शेवंती) मंगेशकरांचे हे पंचप्राण होते, प्रत्येकाचा गुणविशेष निराळा. लताच्या या साफल्याचे रहस्य होते लहानपणापासून आपल्या पित्याकडून, अर्थात मराठी संगीत नाटकांचे प्रसिद्ध गायक अभिनेता 'मास्टर दीनानाथ मंगेशकर' यांच्याकडून वारसाहक्काने आणि शिक्षणातून आलेली संगीतविद्या, तिची स्वयंस्वरप्रज्ञा आणि कठोर स्वरसाधना! अजाणत्या वयापासूनच लताचे हे संगीतज्ञान तिच्या पिताला जाणवले होते. तेव्हांपासूनच त्यांनी तिच्या गायकीला समृद्ध केले. वयाच्या सहाव्या वर्षापासूनच ती रंगमंचावर गायला लागली. १९४२ मध्ये त्यांचा अकाली मृत्यु झाला तेव्हां लता केवळ १३ वर्षांची होती. या कोवळ्या वयापासूनच ती भावंडांचा आधारवड झाली! संघर्षांची मालिका समोर होती, पण त्यांतूनच तिने हे काटेरी मार्गक्रमण केले.

प्रथम प्रसिद्धी मिळाली ती 'महल'(१९४९) चित्रपटातील 'आएगा आने वाला' या गाण्याला! तेव्हा लता वीस वर्षांची होती आणि या चित्रपटाची नायिका मधुबाला होती सोळा वर्षांची. या चित्रपटामुळे या दोघींची कारकीर्द बरोबरच बहरली, एक स्वरसम्राज्ञी अन दुसरी सौंदर्यसम्राज्ञी! गंमत म्हणजे या गाण्याच्या रेकॉर्डप्लेअरवर गायिका म्हणून नाव होते 'कामिनी' (तेव्हा रजतपटावर गाणे साकार करणाऱ्या पात्राचे नाव लिहीत असत)! नंतर लतानेच संघर्ष करून रेकॉर्डप्लेअर वर नावच नव्हे तर रॉयल्टी, तसेच गायक गायिका यांना वेगवेगळे फिल्मफेअर पुरस्कार इत्यादी मिळवून देऊन त्यांना त्यांचे श्रेय मिळवून दिले! लता आणि सिनेसृष्टीची अमृतगाथा समांतर म्हणायला हरकत नाही. १९४० पासून ते अगदी २०२२ पर्यंत जवळपास ८० वर्षांची असलेली ही सांगीतिक सोबत. तिच्या सोबतचे गायक, गायिका, नायक, नायिका, संगीतकार, गीतकार, तंत्रज्ञ, वादक, दिग्दर्शक, निर्माते असे हजारोंच्यावर लोक तिच्या बरोबर



मार्गक्रमण करते झाले, कोणी अर्ध्या वाटेवर सोडून गेलेत. आता तर तीही त्यांच्या सोबत गेली आहे. आता हा स्वरामृताचा वेलू गगनाला भिडलाय!

आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिचं गाणं इतकं ऐकलं तरी असं कां होतं? 'अगंबाई, अरेच्या, हे सुंदर गाणे आजवर ऐकले कसे नाही! आई शप्पथ, हे असं कसं मिस झालं!' मंडळी, ही कथा प्रत्येक रसिकाचीच असावी, इतके हे स्वरभांडार विशाल आहे. आणिक एक वेगळीच गंमत आहे हिच्या जादुई स्वरांत! ऋतूबदलाप्रमाणे आपल्या बदलत्या मूडनुसार आपल्यासाठी लताच्या आवाजाचे पोत बदलल्याचा आपल्याला भास होतो. खरे पाहिले तर एकदा ऐकून हा स्वरानंद आपल्या हृदयात झिरपत नाही असे असावे! बघा ना, आज जर माझा मूड ऑफ आहे, तर या अमुक गाण्यात लताचा आवाज मला जास्तच शोकविव्हल लागलाय असा फील येतो. काय म्हणू या बहुरंगी, बहुढंगी, फुलपाखरी आवाजाच्या कळांना, या स्वरांबद्दल बोलायचे तर संत तुकारामांची रचना आठवली, 'कमोदिनी काय जाणे तो परिमळ भ्रमर सकळ भोगीतसे'! तिला काय माहिती की, तिने आमचे आयुष्य किती अन कसे समृद्ध केले ते! तिच्या आवाजाने समृद्ध झालेल्या ३६ भाषांपैकी कुठलीही भाषा असू द्या, या एकाच आवाजात ती भाषाच धन्य होईल अशी गाणी, एकदम ओरिजिनल लहेजा आणि स्वराघात! लता तू वरून काय घेऊन आलीस अन इथे काय शिकलीस, याचा अचेतन हिशोब करणे म्हणजे तारे मोजण्यापेक्षा दुष्कर. त्यापेक्षा सच्च्या रसिकांनी एक ऍटिट्यूड (वर्तमान संदर्भात नव्हे) ठेवावा, 'आम खाओ, पेड मत गिनो'. फक्त तिच्या गाण्यावर फिदा व्हायचे, म्हणजे विषय तिथंच आटोपला!

तिने दयाबुद्धीने कांही प्रांत अगदी तिच्या आवाक्यात असतांनाही सोडले, शास्त्रीय संगीत अन नाट्यसंगीत. (यू ट्यूब वर आहेत मोजके)! दत्ता डावजेकर यांनी नमूद केल्याप्रमाणे तिच्या नांवातच लय आणि ताल आहे. जिच्या गाण्याने 'आनंदाचे डोही आनंद तरंग' निर्माण होतात, जिने 'आनंदघन' या नावाने मोजक्याच (चार) चित्रपटांना संगीत देऊन तमाम संगीतकारांवर उपकार केलेत, जिने शास्त्रीय संगीताचे उच्चशिक्षण घेऊन, त्यात प्राविण्य संपादून देखील व्यावसायिकरित्या शास्त्रीय संगीताच्या बैठकी सजवल्या नाहीत (प्रस्थापित शास्त्रीय गायकांनी देखील तिचे याकरता जाहीररीत्या आभार मानलेले आहेत!),

तिच्याबद्दल संगीतकार वनराज भाटिया म्हणतात, 'she is composer's dream!' (ती संगीतकारांचे स्वप्न आहे). कुठल्याही संगीतकाराची गाणी असोत, खेमचंद प्रकाश, नौशाद, अनिल बिस्वास, गुलाम मोहम्मद, सज्जाद हुसैन, मदनमोहन, जमाल सेन यांच्यासारख्या दिग्गजांची कठीण चालींची, सलिलदा किंवा सचिनदांच्या लोकसंगीतावर आधारित असलेली, वसंत देसाई, सी. रामचंद्र, रोशन अन शंकर जयकिशन यांच्या अभिजात संगीताने नटलेली, आर डी, ए आर रहमान, लक्ष्मी प्यारे, कल्याणजी आनंदजीची आधुनिक गीते असोत, त्या गाण्याला लताचा परीसरुपी स्वरगंधार लाभला की, त्याची झळाळी नवनवीन सुवर्ण उन्मेष घेऊन रसिकांच्या कलेज्याचा ठाव घेते. अतिशय कठीण अन घनगंभीर चाली रचून लताकडून असंख्य रिहर्सल करून घेणारा संगीतकार सज्जाद हुसैन तर म्हणायचा, 'फक्त लताच माझी गाणी म्हणू शकते!'

ही स्वरवल्लरी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलपेक्षा वरचढ! कुठलाही रोग असू देत, हिच्याजवळ गाण्याच्या रूपात औषध हाजिर है! बरे यात 'औषध नलगे मजला' चे बहाणे अजिबात चालायचे नाहीत. लहान मुलीचे 'बच्चे मन के सच्चे', १६ वर्षांच्या नवयौवनेचे 'जा जा जा मेरे बचपन', विवाहितेचे 'तुम्ही मेरी मंजिल', समर्पितेचे 'छुपा लो यूं दिल में प्यार मेरा', तर एका रुपगर्वितेचे, 'प्यार किया तो डरना क्या', एका मातेचे 'चंदा है तू', एका क्लब डांसरचे (आहे मंडळी) 'आ जाने ना' एका





भक्तिरसाने परिपूर्ण अशा भाविकेचे, 'अल्ला तेरो नाम', एका जाज्वल्य राष्ट्राभिमानी स्त्रीचे, 'ऐ मेरे वतन के लोगों'! अशी ही किती म्हणून लताच्या मधुमधुरा स्वरमाधुरीची बहुरंगी स्त्रीरूपे आठवावीत?

आमच्या कित्येक पिढ्या सिनेसंगीताच्या इतिहासाच्या साक्षीदार आहेत, त्यांनी बघितलंय सिनेसंगीत कसे बदलत गेले ते! मात्र त्यात एक 'चीज' कधीच बदलली नाही, ती म्हणजे गायनाचा अमृतमहोत्सव पार करणाऱ्या लताच्या आवाजाचा गुंजारव! याच स्वरांनी आमचे कोडकौतुक करीत अंगाई गीत ऐकवले, यौवनाच्या मंदिरी प्रणयभावना प्रकट करण्यासाठी स्वर दिलेत, बहिणीच्या मायेने ओथंबलेल्या राखीचे बंधन बहाल केले. इतकेच नव्हे तर, मनोरंजन क्षेत्रातील ज्या ज्या प्रसंगातील ज्या ज्या स्त्रीचे रुप, स्वभाव अन मनाची कल्पना आपण करु शकतो, ते ते सर्व कांही या स्वरात समाहित होते. श्रृंगार रस, भक्ती रस, शांत रस, इत्यादी 'नऊ रसांच्या नऊ स्वर्धुनी' ल्यायलेल्या भावनांना जेव्हां लताच्या स्वरांची साथ लाभायची तेव्हां त्या बावनकशी सोन्यात जडलेल्या रत्नांसारख्या उजळून निघायच्या!

लताने गायलेली माझी आवडती गाणी आठवण्याचा प्रयत्न केला असता, हातातून बहुमोल मोती घरंगळून जावेत असेच होत होते. त्यातील कांही पेश करायचा मोह अगदीच आवरत नाही. मला लताचा १९४९ ते १९५५ चा अगदी कोवळा आवाज फारच प्रिय आहे. म्हणून गाणी तशीच..... 'उठाए जा उनके सितम'- (चित्रपट- 'अंदाज', १९४९, मजरुह सुल्तानपुरी-नौशाद), 'सीने में सुलगते हैं अरमाँ' – (चित्रपट-'तराना', १९५१, प्रेमधवन-अनिल बिस्वास), 'साँवरी सूरत मन भाई रे पिया तोरी'- (चित्रपट-'अदा', १९५१, प्रेमधवन-मदनमोहन), 'ये शाम की तनहाइयाँ'- (चित्रपट- 'आह', १९५३, शैलेन्द्र-शंकर जयकिशन) अन 'जाने वाले से मुलाकात ना होने पायी'-(चित्रपट-'अमर'- १९५४, शकील बदायुनी-नौशाद). अर्थात प्रत्येकाच्या आवडीला कांही परिमाण नाही हेच खरे!

कानांत प्राण एकवटून ऐकत राहावे असे हे आनंदघन बरसतात अन मन चिंब होते, कितीही भिजले तरी परत ते मखमली अन नर्म मुलायम स्वरतुषार झेलावेसेच वाटतात. अमृतलता असेल तर जितके अमृतपान करा, तितकी अतृप्ती वृद्धिंगत होतच जाते. मित्रांनो! ही अतृप्ती शाश्वत आहे, कारण लताचा ॐकारस्वरुपी स्वरच मुळी चिरंतन आहे, त्याचे अनादी अनंत रुप अनुभवल्यावर स्वाभाविकपणे वाटते, 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती!' मला आचार्य अत्रेंचे लताविषयीचे एक वाक्य फार आवडते, 'सरस्वतीच्या वीणेचा झंकार, उर्वशीच्या नुपूरांची रुणझुण नि कृष्णाच्या मुरलीचा नाद, हे सर्व एकवटून विधात्यानं लताचा कंठ घडविला असला पाहिजे.'

आचार्य अत्रे यांनीच लताला २८ सप्टेंबर १९६४ साली (अर्थात तिच्या वाढदिवशी) 'दैनिक मराठा' या त्यांच्या वृत्तपत्रात अजरामर झालेले असे त्यांचे मानपत्र अर्पण केले होते! संपूर्ण लेखच वाचनीय आहे, पण त्याची झलक म्हणून लताच्या अद्भुत, अनमोल अन अनुपम स्वराविष्काराचे वर्णन करतांना अत्र्यांनी किती नाजूक आणि मखमली शब्दांची आरास उभारली आहे बघा, "स्वर्गीय स्वरमाधुर्याचा मूर्तिमंत अवतार असलेल्या लताचे केवळ लोखंडाच्या निफातून उतरलेल्या शाईच्या शब्दांनी, वृत्तपत्राच्या जाड्याभरड्या कागदावर, अभिनंदन करणे म्हणजे स्वरसम्राज्ञीच्या स्वागतासाठी तिचा चरणाखाली जाड्याभरडया गोणपाटांच्या पायघड्या अंथरण्याइतकं विशोभित आहे. लताच्या कंठातील अलौकिक कोमलतेला साजेसं अभिवादन करायचं तर त्यासाठी प्रभातकाळची कोवळी सुवर्णकिरणं दवबिंदूमध्ये भिजवून बनवलेल्या शाईने, कमलतंतूच्या लेखणीने आणि वायूलहरीच्या हलक्या हातानं, फुलपाखरांच्या पंखावर लिहिलेलं मानपत्र गुलाबकळीच्या करंड्यातून तिला अर्पण करायला हवं!"

इतके मानसन्मान, प्रसिद्धी, ऐश्वर्य आणि चित्रपटसृष्टीतला झगमगाट हे सर्व असूनही तिचा रियाज चुकला नाही अन पाय जमीनीवर होते ते तिथंच राहिले. जागतिक कीर्तीच्या प्रतिष्ठित अल्बर्ट हॉल मधील तिला आंतरराष्ट्रीय गायिका म्हणून प्रस्थापित करणाऱ्या कार्यक्रमाची तारीफ करावी की, सर्वश्रेष्ठ असे दादासाहेब फाळके अन भारतरत्न पुरस्कार मिळाले तरी लताची विनम्रता कमी कशी झाली नाही याचे नवल करायचे?

स्वरलता या विषयावर रकान्यांवर रकाने, ऑडिओ, विडिओ, पुस्तके, सर्व कांही भरभरुन उपलब्ध आहेत. पण आपण सागराला त्याच्याच जलाने अर्घ्य देतो ना, तसेच माझे हे अर्घ्य आहे! या स्वरदेवतेने स्वरसुमने भरभरुन दिलीत! 'घेता किती घेशील दो कराने' अशी अवस्था झालीय, ओंजळ कवाच भरली फुलांनी, डोळे बी भरले पाण्यानी, अन हृदय भरलं 'हृदया' च्या (लताचे हे नाव मला अतिप्रिय) स्वरमौक्तिकांनी! आता 'हेचि दान देगा देवा' की, फक्त लताचा निर्मोही, निरंकारी अन निरामय स्वर असावा, तिच्या सप्तसुरांच्या चांदण्यांच्या पायऱ्या चढत जावे आणि पारलौकिक संगीतअवकाशातील ध्रुव ताऱ्यासमान चमकणारी आमची लाडकी स्वरलता अनुभवावी फक्त तिच्या स्वरलहरींतून, अगदी याचि देही अन याचि जन्मी!

प्रिय वाचकांनो, 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' अशा स्वरशारदेच्या या अजरामर स्वराविष्काराला ही शब्दसुमने नम्रपणे अर्पण करते!

**डॉ. मीना श्रीवास्तव**
**ठाणे**
**मो.९९२०१६७२११**

# पोळ्याचा सण



बांशिगे बांधली
झुली चढवली
शिंगे रंगवली
वेसन धरली ||१||

साज हा शृंगारी
भरला श्रीहरी
मुखी गोंडेवरी
फुगे बांधे शिरी ||२||

कवड्याची माळ
खळाळती चाळ
भूमातीसी नाळ
विस्तवर राळ ||३||

पायी तुझ्या रान
सोन्या मोती धान
सर्जा रे सुखानं
पोळ्याचा सण ||४||

**शिवाजी नामपल्ले**
**अहमदपूर जि.लातूर**
**मो.९६२३७९५८०३**

# अंबानगरीचे वैशिष्ट्ये



जयवंती नदीच्या तिरावरती,
वसले एक गावं ऽ ऽ ऽ
त्या गावाला 'जोगाई' वरुनी,
पडले अंबाजोगाई हे नावं !!१!!

जयवंतीचे पाणी वाहतं,
जाते घोड दरीत ऽ ऽ ऽ
राज घोड्याने त्यावरुनी
उड्डाण केल्याने प्रख्यात !!२!!

बालाघाट डोंगर कपारीत,
विराजमान बुट्टेनाथ ऽ ऽ ऽ
दर्शन घेण्या बिकट वाट,
चढून जावे लागे आत !!३!!

बालाघाटाच्या दुसऱ्या कपारीत,
कवी मुकूंदराज समाधिस्थ ऽ ऽ ऽ
त्यांच्या पश्चिमेस ठाण मांडून,
बसले आहेत नागनाथ !!४!!

घोड दरीच्या काठावरती,
ठाण मांडून अंबाबाई ऽ ऽ ऽ
त्या आईचे नाव आहे,
माता डोंगर तुकाई !!५!!

मुकुंदराज वाटे लगतं,
दासोपंतांची समाधी ऽ ऽ ऽ
जाता येता मनोभावे ,
त्यांचे दर्शन घ्यावे आधी !!६!!

असे किती तरी वैशिष्ट्ये,
माझ्या अंबा नगरीत ऽ ऽ ऽ
अंबाजोगाई प्रसिध्द आहे,
या साऱ्या जगतात !!७!!

**नागनाथ पाटलोबा बडे**
**घाटनांदूर**
**मो.९७६७२७३२६८**

# “ देव माणूस”



गणोबा एका गरीब शेतकऱ्याच्या कुटुंबामध्ये देवाचे गोठणे या छोट्याशा खेडेगावात जन्माला आला.मध्यम उंचीचा, काळा सावळा कृष्णवर्णीय रंग, सरळ मोठे नाक, डोळे थोडेसे घारे आणि धिप्पाड शरीर यष्टीचा गणोबा आपल्या कुटुंबासोबत गोठण्यागावात राहात होता. मृदु भाषिक आणि शांत स्वभावाचा गणोबा होता. आपल्यामुळे दुसऱ्याला गावात त्रास होईल असं गणोबाच कधीच वागणं, बोलणं नव्हतं. नाकासमोर चालणारा आणि कोणाच्याही वादविवादात न पडणारा गणोबा आपल्या घरच्या गरीबी परिस्थितीमुळे हालाखीचे आणि कष्टाचे जीवन जगत होता.पण इतरांच्या मदतीसाठी मात्र गणोबा नेहमी धावून जायचा. गावात कोणीही कुठलेही काम गणोबाला सांगितलं तर तो प्रामाणिकपणे, विनातक्रार आणि विना विलंब करता करायचा. गणोबाच प्रत्येक काम अगदी नेटक, सुटसुटीत असायचं.. गणोबाला लहान पणापासूनच आईवडिलांनाकडून चांगले मार्गदर्शन मिळाले होते. त्यामुळे गावात अगदी लहान थोरं म्हाताऱ्या कोताऱ्या माणसांपर्यंतच्या सर्व लोकांचा तो आदर करत होता. गाणोबाच्या मनात कोणत्याही माणसाबद्दल कधीच गावात भेद भाव नव्हता. गणोबा म्हणजे कुणाच्याही वाळलेल्या पाचोळ्यावर पाय न देणारं प्रामाणिक व्यक्तीमत्व. असणारा गावात एकमेव माणूस होता.

गणोबा घरच्या गरीबी परिस्थितीमुळे खूप हालाखीचे आणि कष्टाचे जीवन जगत होता.पण गावात इतरांच्या मदतीसाठी गणोबा नेहमी रात्री अपरात्री जीवाची पर्वा न करता त्यांच्या मदतीसाठी धावून जायचा. त्यामुळे गावातील लोक गणोबाला मानायची.गणोबा आईवडिलांचा एकुलता एक मुलगा होता.गणोबाच्या आईवडिलांना लग्न होऊन बरीच वर्षे मुलं,बाळ होत नव्हतं. गावातील बऱ्याच देवळात जाऊन देव,देवीना नवस केला.नवस तापस केल्यानंतर दहा बारा वर्षांनी गणोबा जन्माला आला.त्यामुळे गाणोबाचे आईवडील खूप लाड, कौतुक करायचे.गणोबा लहान होता तेव्हा तिच्या आई वडिलांनी लोकांच्या शेतात मोलमजुरी करून राब राब राबून कष्ट करून गणोबाला लहानाचा मोठा केला.त्यामुळे गणोबाला आपल्या आईवडिलांच्या परिस्थितीची जाणीव होती.गणोबाने लहानपणी अनेकदा आपल्या आईवडिलांसोबत उपाशीपोटी पाणी पिऊन दिवस, रात्री काढल्या.अनेक वेळा गणोबाने आईवडिलांसोबत दुसऱ्याच्या शेतात जाऊन उन्हात लोकांची मंजूरी ही केली.अंगावर फाटकी चड्डी आणि फाटके मळकट खमीस असायचे.पायात कधी चपला घालायला नशिबात मिळाल्या नव्हत्या अशाच अनवाणी पायाने काट्याकुट्यातून सगळीकडे फिरावं लागायचं. कधी कधी गणोबाला वाटायचं दसरा,दिवाळी, गणपती सणासुदीच्या दिवसांत इतर मुलांप्रमाणे आपल्यालाही नवीन कपडे अंगावर घालायला मिळावेत,पण आपलं नशीबच फुटके होते.आईवडिल दिवसभर दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करून दिवस मावळतीला चार पैसे आणायचेत त्यात दिवसांचा खर्च कसाबसा भागायचा. कधी कधी गावात आईवडिलांना मोलमजुरीचे काम भेटले नाही की दोन चार दिवस उपाशी पोटी दिवस काढावे लागायचे.पण गावातला कोण भाकरीचा तुकडा पण आनून द्यायचा नाही.घरात दोन,चार कोंबड्या गणोबाच्या आईने पाळल्या होत्या.त्या अंडी द्यायला लागल्या की त्यातली काही अंडी गणोबा गावात विकून चार पैसे आणून आईच्या हातावर टेकवायचा.अशा बिकट गरीब परिस्थितीत गणोबाने लहानपणीचे ते कष्टाचे आणि संर्घसाचे दिवस काढले.पण कोणाच्या दारावर हात पसरला नव्हता.की कोणाकडे भाकरीचा तुकडा मागितला नाही.आहे त्या परिस्थितीत मिठ भाकरी मिळाली तर खायची नाही तर दोन घोट पाणी पिऊन झोपायचा.इतकी बिकट परिस्थिती गणोबाच्या वाट्याला आली होती.देव पण या कुटुंबाची परिक्षाच घेत होता.त्यालाही दया,माया येते नव्हती.इतका तो निष्ठूर कठोर बनला होता.

दुपारची वेळ होती.सुर्य माथ्यावर आला होता. बाहेर सुर्य आगीच्या ज्वाला ओखत होता.त्यामुळे अंगाची लाही लाही होऊन जीव कासाविस होतं होता. थकव्यामुळे गणोबाच्या अंगाला थोडी कणकण वाटत होती म्हणून तो जमिनीवर घोंगड टाकून झोपला होता. सदबा आणि भिवरी शेतात पेरणीच्या कामाला गेली होती.दिवस मावळतीला आला तशा सदबा आणि भिवरी शेतातून परतीच्या वाटेला लागली.आजूबाजूची शेतात काम करणारी माणसं घराच्या वाटेला लागली होती. दिवस हळूहळू मावळत चालला होता.पक्षी आपल्या घरट्याकडे किलबिलाट करत जाताना दिसत होती. मधूनच घार आकाशात उंच घिरट्या घेत आकाशाची गवसणी घेत इकडून तिकडे फेऱ्या मारत होती.तापलेला लाल भडक सुर्य डोंगरा,झाडामागून लपंडाव खेळत मावळतीच्या दिशेने सोनेरी किरणे पसरत हळूहळू सरकत होता.मधूनच एखादी गार वाऱ्याची झुळूक अंगाला गारवा देऊन जात होती.डोगराच्या पायथ्याशी कोण्या

एका कवलारु घराराच्या कोणाड्यातून धूरकट धूर येताना दुरुन दिसत होता.अथांग पसरलेल्या समुद्रात सुभ्रदार बगळ्यांची माळ ओवावी तशी बगळ्यांची माळ पाण्यावर तरंगताना दिसत होती.गावात दिवे लागले होते.ते मंद लुकलुकताना दिसत होते.वाटेला हळूहळू अंधार पडत होता.साधारण पायाखालची वाट दिसत होती.त्या अंधारलेल्या पायवाटेने सदबा आणि भिवरी चालत घराकडे पोचली.

घराचं दार आतून बंद होत.सदबा गणोबाला दारं ठोठावत आवाज देऊ लागला,पण बराच वेळ आतून गणोबाचा कोणताही प्रतिसाद येत नव्हता त्यामुळे सदबा आणि भिवरी काळजीत पडली.परत सदबाने दाराची कडी वाजवत गणोबाला आवाज दिला.गणोबाच्या अंगाला फणफणून ताप भरला होता.अंग पिळवटून दुखत होतं त्यामुळे गणोबाला अंथरुणावरून उठायची शक्ती होतं नव्हती.बाहेर सदबा आणि भिवरी आवाज देऊन दारं वाजवत होती.गणोबा फणफणत्या तापातून तो कसाबसा उठला आणि दाराची कडी काढून दार उघडे केले.सदबाने हातामधली पिशवी खाली ठेवली आणि तो गणोबाच्या दिशेने पळत गेला.गणोबा उताना आडवा पडला होता.सदबाने गणोबाच्या अंगाला हात लावून पाहिलं. गणोबाच अंग तापाने विस्तवासारख फणफणले होते.अंग थरथर थंडीने कापत होते.

दोन्ही दातांच्या जबड्यातून कटकट आवाज येत होता. तोंडातून गरम वाफा निघत होत्या. डोळे लाल झाले होते.सदबा गणोबाला या अवस्थेत पाहून पूर्ता कोलमडून गेला होता.सदबाला काय करावे काहिच सुचत नव्हते.आता अशा परिस्थितीत या संध्याकाळच्या वेळी गणोबाला कुठे घेऊन जाऊ काय करू सदबा मोठ्या संकटात सापडला होता.डॉक्टरकडे जायचं म्हटलं तरी आसपास डॉक्टर नव्हता.काय करू कोणाला बोलावू काही काही सदबाला सुचत नव्हतं सदबा एखाद्या लहान पोरासारखा वेडापिसा झाला होता.डॉक्टरकडे गणोबाला आता कसा घेऊन जाऊ तो काय जवळ आहे.तो पण दूर जैतापूरला दोन चार मैलांवर नदिपलीकडे होडीने नदी पार करून जावं लागणार होतं.ती ही नदीवरची तर आता बंद झाली असणार.

आता काय करावे हे सदबाला आणि भिवरीला काहीच सुचत नव्हते.सदबाने भिवरीला पाण्यात मिठ घालून चांगले घोळायला सांगून कपड्यांची घडी डोक्यावर ठेवायला सांगितली. भिवरीने लगबगीने मिठाचा डबा चुलीच्या कोपऱ्यातून घेतला आणि मिठाचे पाणी करून घडी गणोबाच्या डोक्यावर ठेवत होती.. गणोबा तापामुळे उताणी पडून काहीबाही बडबडत होता.सदबा गणोबाच अंग पाण्याच्या कपड्याने टिबून काढत होता.पाण्याची घडी एकामागून एक गणोबाच्या डोक्यावर भिवरी ठेवत होती.त्यामुळे गणोबाच्या अंगातला ताप थोडा थोडा कमी कमी होत होता.भिवरी चुलीपाशी गेली चुलीला लाकड सारून चुल पेटती केली.चार भाताचे दाणे रोवळीतले पेजेसाठी टोपात टाकले आणि चुलीवर आंदण ठेवले.थोड्यावेळाने भाताची पेज चांगली गिरगिरीट झाली होती.ती एका भांड्यात ओतली आणि गणोबाला चमच्याने भरवू लागली.सकाळपासून गणोबाच्या पोटात अन्नाचा कण ही गेला नव्हता.टोपलीखाली झाकून ठेवलेली भाकरी तशीच डब्यात पडून होती.त्यामुळे पोटात अन्नाचा कण ही नसल्यामुळे थकवा जाणवत होता.आता गणोबाच्या अंगातला ताप थोडा थोडा उतरत होता.अंगाला डरडरून घाम फुटला होता.त्यामुळे सदबाला थोडं बरं वाटेल. अंगातला ताप थोडा उतरल्यामुळे गणोबा उठून भिंतीला टेकून बसला.सदबाने गणोबाच्या अंगाला हात लावून पाहिलं अंग गार वाटत होतं. चुल पेटती होती भिवरीनं दोन भाकरीच पिठ ताटात घेतलं आणि ती मळायला लागली.चुलीवर तवा ठेवून दोन भाकऱ्या भिवरीनं भाजल्या.गणोबाच्या अंगातला आता ताप उतरल्यामुळे थोडं बरं वाटतं होतं.पण रात्री परत गणोबाच्या अंगात ताप भरु नये याची काळजी सदबाला सतत वाटत होती. भाकऱ्या भाजून झाल्या होत्या.भाकरीचा तुकडा झालाय तो खाऊन घेताय का...तोपर्यंत मी घरातलं आवरते भिवरी सदबाला म्हणाली.होय...होय...खातो की भिवरे नंतर ते आवरा आवरीच काम कर तू बी भाकरीचा तुकडा खाऊन घे भिवरीनं जेवणाची ताट खाली वाढायली.सदबाच्या पूढ्यात ताट सरकवीत भाकरी आणि चटणी सोबत दिली दोघंही जेवू लागली. अधीमधी सदबा गणोबाच्या अंगाला हात लावून ताप बघत होता.सदबाच जेवण उरकल.तांब्यातल्या पाण्याण इकडून तिकडे दोन चार कुळच्या मारल्या आणि खिशातल विडीच बंडल बाहेर काढून दारावर विडीचा झुरका मारत आकाशाकडे बघत भिवरीला म्हणाला उद्या सकाळी जैतापूरला तरीने पाटकर डॉक्टरकडे गणोबाला घेऊन जातो.परत ताप अंगात भरायला नको..होय...होय... घेऊन जावा आणि एक चांगलं इंजेक्शन ढुंगणावर मारुन आणा भिवरी सदबाला म्हणाली.तोपर्यंत भिवरीन घरातली भांडीकुंडी आवरली होती.अंगातल्या थकव्यामुळे गणोबाचाही डोळा लागला होता.सदबाने गणोबाच्या अंगाला हात लावून पाहिलं अंग घामाने भिजून गेल होत.अंगावरची चादर बाजूला करून सदबाने गणोबाच अंग कपड्याने पुसून काढलं.सदबा दिवसभर शेतात राबल्यामुळे त्याचंही अंग मोडून आलं होतं.सदबाने गणोबाच्याच जोडीला गोणपाट अंतरल आणि तिथेच आडवा पडला. भिवरीनेही अंग टाकलं दिवसभर शेतात राबराब राबून भिवरीचा केव्हा डोळा लागला हे तिला ही कळले नाही. सदबाला गणोबाच्या काळजीने झोप लागत नव्हती. तो सारखा गणोबाच्या अंगाला हात लावून बघत होता. अस करता करता पहाटेच्या वेळी सदबाचा केव्हा डोळा लागला हे त्याला ही कळले नाही.

पहाटेच्या कोंबड्याचा दुरुन आरवण्याचा आवाज येत होता त्या आवाजाने भिवरीला अचानक

जाग आली.ती आपसूकी अंथरुणावरुन उठली आणि गणोबाच्या अंगाला हात लावून बघीतलं तर गणोबाच अंग तापाने फणफणले होते.ताप जास्तच चढला होता. गणोबा तापामुळे काहीबाही बडबडत उताना आडवा पडला होता.लागलीच भिवरीनं सदबाला जाग केलं. तसा सदबा दचकून जागा झाला आणि गणोबाच्या अंगाला हात लावून पाहिलं तर गणोबाच अंग तापाने फणफणले होते.परत गणोबाच्या डोक्यावर मिठाच्या घड्या ठेऊन पूर अंग सदबाने पाण्यान टिबून काढल. सकाळचे सहा वाजले होते.जैतापूरचा पाटकरचा दवाखाना दहाला उघडतो.नदी तरीने पार करून पाही पाही चालत जाहितोपर्यंत तेव्हडा टाईम होईल. गणोबाचा अंगातला ताप मिठाच्या घडीमुळे आणि अंग पाण्याने टिबून काढल्यामुळे बऱ्यापैकी उतरला होता. सदबाने गणोबाला खांद्यावर घेतल.सोबतीला भिवरीही सदबाच्या जोडीला होती.बाहेर कोवळे ऊन पडले होते.ऊन तापायच्या अगोदर जैतापूर गाठायला हवं सदबा आणि भिवरी घरातून झपा झपा पावलं टाकत तरीकडे आली पिरावरची तर पलीकडे होती.सदबाने तरीवाल्या रहिमला अलीकडून आवाज दिला.तसा रहिमने पलीकडून हाताचा इशारा केला.तर येई तोपर्यंत गणोबाला आंब्याच्या झाडाखाली बसवलं आणि तर येण्याची वाट बघत बसला.अधीमधी सदबा गणोबाच्या अंगाला हात लावून बघायचा.तर आता आली होती. सदबाने गणोबाला खांद्यावर घेऊन तरीत चढला त्या मागून भिवरीही चढली.तर चालू झाली.पोराला बरं वाटतं नाही का...? रहिमने सदबाला विचारल तसा सदबा होय....होय....काल संध्याकाळपासून अंगात ताप भरुन आलाय म्हणून पाटकर डॉक्टरकडे जैतापूर घेऊन जातोय सदबा रहिमला म्हणाला.बोलता बोलता तर पिरावरच्या बंदरात येऊन थांबली.तशा सदबा तरीतून उतरला आणि गणोबाला खांद्यावर घेऊन तो जैतापूरची वाट झपा झपा पावलं टाकत चालू लगला.सदबाच्या मागून भिवरीही झपा झपा पावलं टाकत सदबाच्या मागून चालत होती.अधीमधी सदबाच्या अंगाला हात लावून बघत होता.गणोबाच अंग थोड थोड गरम वाटत होतं.सदबा वाटेने चालता चालता काही पूर्वीच्या नव्या मळ्यातल्या सुखा दुःखाच्या गोष्टी आईसोबत यायचा त्या वेळी घडलेल्या घटना गणोबाला सांगत होता.मधूनच गणोबा खांद्यावर बसून हुंकार देत होता.गणोबाचा हुंकार एकूण सदबाला थोडं बरं वाटतं होत.चालत गप्पा गोष्टी करत सदबा आणि भिवरी पाटकर डॉक्टरच्या.



दवाखानयाकडे आला.दवाखाना अजून उघडला नव्हता. डॉक्टरच्या दवाखान्या समोर दोन चार माणसं जमली होती.थोड्या वेळाण पाटकर डॉक्टर आले.सदबाकडे पहात काय...सदबा पोराला आणलं का...सदबा होय... होय...काल संध्याकाळपासून तापाने पोरं फणफणला होता.सकाळी पण अंगात थंडी भरून ताप आला होता. म्हटल एक इंजेक्शन मारुन पोराला आणावं गणोबाची पाटकर डॉक्टरने चांगली तपासणी करून एक इंजेक्शन आणि काही औषधे गोळ्या दिल्या.अर्ध्या तासाने गणोबाच अंग घामाने भिजून गेल. ताप पूर्ण उतरला होता. ह्या औषध गोळ्या टाईमावर खायला द्या आणि जेवण भरपूर जेवायचं काही काळजी करण्याचे कारण नाही ह्या औषध गोळ्यांनी तो पूर्ण बरा होईल.पाटकर डॉक्टरचे आभार मानून सदबा घराकडे निघाला.ताप उतरल्यामुळे गणोबाला आता थोडं बरं वाटतं होतं.

जसं जसे आपण लहानाचे मोठे होत जातो तसं तशी आपल्याला समज येते जाते.तेव्हा आपण घरात आपल्या आईला आई, मम्मी,मॉम आणि वडीलांना बाबा, पप्पा ड्याडी, बोबड्या शब्दात बोलायला म्हणायला लागतो. तेव्हा किती छान आपल्याला आईवडिलांना वाटतंय ना....? बोबड्या तोंडातून हे फुटणारे कौतुकाचे गोड शब्द ऐकताना आईवडील अगदी भारावून जातात.पण आजकालचा जमाना बदलत चालला आहे.आजकालची तरुण मुलं,मुली कधी कधी मुद्दामहून, जाणून बुजून आपल्या मित्रांसोबत बाहेर शाळा,कॉलेजमध्ये गप्पा गोष्टी मारताना आपल्या वडिलांना बाप किंवा आणखी काही टोपण नावानेच जास्त करून बोलतात किंवा एक दुसऱ्याला हाका मारतात.त्यांची चार चौघात नाक्यावर बसून टर उडवतात टिंगल, टवाळी करतात.आई घराचे मांगल्य असते, तर वडील घराचे अस्तित्व आणि करता पूरुष असतो, पण आपण या अस्तित्वाला,महापूर्षाला आपण कधी समजून घेतलेच नाही. का....? वडिलांविषयी अजून तरी फारसी मुले चांगली बोलत किंवा वागत नाहीत ..... आजकालच्या तरुण मुलांनी आपल्या वडिलांविषयी कागदावर आणि डोळ्यात फक्त आपले वडील रेखाटले आहेत. ते ही तापट डोक्याचा, व्यसनी दारुडा, चिडखोर स्वभावाचा, भांडखोर, मारझोड करणारा, नाही असे वडील कदाचित असतील ही आपल्या गावात,वाडी,समाजात, एक किंवा दोन टक्के,पण बाकीच्या चांगल्या वडिलांबद्दलचे काय.... ? आईकडे डोळ्यातल्या अश्रुंचे पाठ असतात ती पटकन रडून मोकळी होते

हो... आपले मनातले दुःख सगळ्यांना सांगून मोकळी होते.पण आई रडली,चिडली तर घरात सांत्वन आणि तिची समजूत काढायला वडिलांनाच करावे लागते. आणि रडणाऱ्या माणसापेक्ष्या सांत्वन करणार्यावरच जास्त तान पडत असतो. कारण समईच्या ज्योती पेक्षा समईच जास्त तापत असते.आणि श्रेय .... श्रेय मात्र ज्योत घेऊन जाते. रोजच्या स्वयंपाकाची घरात सोय करणारी आई नेहमी आपल्या लक्षात राहते. कारण ती आपल्याला रोज सकाळ,संध्याकाळी आयत ताट पूढ्यात ठेवते.मान्य आहे मला हे सगळं,पण आयुष्याच्या शिदोरीची सोय घरात करणारा बाप आपण किती सहजपणे पटकन विसरून जातो ना..... ? तो आठवत नाही.आई सर्वासमोर मोकळेपणाने रडून दुख व्यक्त करुन मन हलकं करु शकते, पण रात्री उशीत तोंड खुपसून मुस्मुसुन रडतात ते आपले वडिलच असतात. घरात स्वताचे आई, वडील जरी आजारी पडले किंवा वारले तरी त्यांना दाहिमोकळून रडता किंवा दुःख व्यक्त करता येत नाही. कारण लहान भावंडाना धीर देण्याचं काम मोठा भाऊ म्हणून ते जबाबदारीने पार करतात, कुटुंबाला आधार देणारे पण तेच असतात, पत्नीने अर्धावासात सोडले तरी स्वताला आवर घालत मुलांच्या अश्रुना आवर घालीत आपले अश्रू लपवत.मुलांना धिर देण्याचं काम बाप म्हणून करत असतो.

**शरद यशवंत नवाळे**
**बुरंबेवाडी, रत्नागिरी**
**मो.91671 16515**

---

# वेड मैत्री जपण्याचे



ना कळले नाते कोणत्या जन्मीचे
ना समजले कोणत्या ओळखीचे
ना उमगले कोणत्या ऋणानुबंधाचे
ना सांगितले कोणत्या रक्ताचे.....!

ना सोडले हात कोणत्या मैत्रीचे
ना मोडले शब्द तूझ्या मनाचे
ना तोडले वचन तूझ्या विश्वासाचे
ना विसरले विश्व दुनिया दारीचे.....।

ना सुकले माझ्या पाणी डोळ्यांचे
ना सुटले कोडे माझ्या अतर्मनाचे
ना सामावले प्रेम माझ्या इंद्रधनुचे
ना विस्कटले किस्से माझ्या शिदोरीचे....।

ना मागे ठेवले ओझे आठवणीचे
ना स्वप्नं राहिले कुणाच्या नावाचे
ना जगणे अशक्य कुणाच्या वाटेचे
ना गोंदण उरले कुणाच्या खुणेचे.....।

**उमेश प्रकाश साळुंके**
**पिंपरी चिंचवड**
**मो.९६६७७६७६१९**

# भाषा



शब्द बनती
ध्वनीस जोडून
लिपीस देखून
भाषा म्हणती

नवे सिध्दांत
एक स्वयंपूर्ण
स्वायत्त संपूर्ण
भाषा उदात्त

काळाप्रमाणे
नित्य बदलते
धाटणी असते
गावाप्रमाणे

सूर आगळे
नवखे उच्चार
चढ नि उतार
हेल वेगळे

व्यक्त शब्दात
भाव भाषेतून
संभाषणातून
ती आत्मसात

ध्वनी रूपात
असे सांकेतिक
आणि स्वाभाविक
हावभावात

भावानुसार
शब्दांचीच पत
शब्दांची किंमत
ठरे अपार

नजरेतून
जणू ती बघते
जगास जाणते
शब्दांमधून

मराठी शान
शब्द संग्रहात
ठसे अंतरात
काव्य महान

ज्ञानभांडार
गीता,योगातून
ओवी,काव्यातून
व्यक्त विचार

भाव अभंग
काळजात खोल
अमृताची ओल
मराठी संग

मिळे सन्मान
संगीत, भजन
भारूड, कीर्तन
समाज भान

मिळाले वाण
मात्रा,वेलांट्याचे
काना,उकाराचे
साहित्य जाण

अलंकारांनी
सजते धजते
मना मोहवते
नाना त-हांनी

शब्दांना धार
बोलणे रागात
गोडवा प्रेमात
अपरंपार

मराठी पर्व
शब्दांकित भाषा
गोड मातृभाषा
आमुचा गर्व

एकच आस
जपू मराठीस
श्वासा अखेरीस
दृढत्व ध्यास

**सौ.नीलम आफळे**
**नाशिक**
**मो.9423093387**

# मनातील भावना



सुख, दुःख, आनंद, या आणि अशा कितीतरी भावना आपल्या मनात असतात.आनंद झाला की आपल्या चेह-यावरुन तो दिसतो.किंवा आपण आपल्या जवळच्या माणसांना सांगत असतो. आपल्या चेह-यावरुन आपल्याला कुणीतरी बोललयं आणि त्याचे आपल्याला दुःख झाले आहे किंवा वाईट वाटत आहे हे स्पष्टपणे दिसून येते.आपण सुखी, समाधानी आहोत हे आपल्याला आपल्या हालचालीवरुन लक्षात येते.अशा कितीतरी भावनांचा कल्लोळ आपल्या मनात चाललेला असतो.भावना या हार्मोन्स मुळे येतात.त्यावर कंट्रोल करणे खरंच खूप अवघड असते.

आजकाल माणुसकी संपुष्टात येत आहे. त्यामुळे भावनांचा ओलावा देखील कमी होत असल्याचे जाणवते. ज्यांच्याकडे पैसा कमी त्यांच्याकडे माणुसकी जास्त असे पूर्वी असायचे.आता माणूस पैशाच्याच मागे धावायला लागला आहे.त्यामुळे भावनांना महत्व देत नाही.आपण आजारी असलो तरी नोकरी टिकवायची म्हणून असेल किंवा बॉसच्या भितीने असेल पण तसेच आजारपण घेऊन ऑफिसला नाईलाजाने का होईना जावे लागते. काळाची गरज म्हणून दोघेही नवरा बायको जॉब करतात. एकमेकांच्या गरजांची दखल कधी आणि कशी घेत असतील हा खरंतरं मोठा प्रश्नच आहे. आणि घरात दुसरे कुणी मुलांना सांभाळणारे नसल्याने मुलांना पाळणाघरात ठेवले जाते.आई वडिलांपासून मुलं दुरावलेली दिसून येतात.माया, प्रेम कसे असणार मुलांमध्ये.आणि नंतर शिक्षणासाठी बाहेरगावी जातात. आजकाल सगळ्यांकडेच पैसा भरपूर असल्याने माणसांची गरज नसल्यासारखे वागू लागला आहे माणूस. माणुसकी कमी होत चालली आहे.

दुस-यांच्या आनंदात आनंद मानता आला पाहिजे. दुस-यांच्या चेह-यावरचे समाधान पाहून आपल्याही चेह-यावर समाधान उमटले पाहिजे.

मनुष्याला कितीही मिळाले तरी तो अतृप्तच असतो. अति हव्यास हेच कारण असावे कदाचित याचे.एखादी गोष्ट करताना किंवा इतरांशी बोलताना कदाचित आपल्याकडून चूकी होऊ शकते.आणि मग नंतर आपल्याला त्याचा पश्चाताप होतो.कधी कधी मनुष्य निर्विकार देखील असू शकतो.

मनुष्याचे जीवन भावनांवर अवलंबून असते. प्रत्येकामध्ये चांगल्या वाईट भावना या असतातच. वाईट असतील तरी त्या भावनाच आहेत ना ! मग माणूस भावनाशून्य आहे असे कसे म्हणता येईल. पण माणुसकी मात्र विसरत चाललाय हे ही तितकेच खरे आहे.

भावना ही दिसत नाही वस्तूंसारखी. आपल्याला जेव्हा भावना अनावर होतात ना तेव्हा आपण खूप जोरात रडतो नाहीतर खूप हसत राहतो.हा आपल्या भावनांचा आपल्यावर होणारा परिणाम असतो.

आपल्या घरात एखादी वाईट घटना घडलेली असेल आणि आपण कुठेतरी दुसरीकडे असू.त्यावेळी डोळ्यासमोर चित्र येते की तिथे नेमके काय घडत असेल ? कुणी मदतीला असतील का ? हे आणि असेच प्रश्न आपल्या मनात येत असतात.कारण त्या घटनांचा संबंध आपल्या वैयक्तिक जीवनाशी असतो.

आपल्या ज्या कोणत्या भावना असतील त्या आधी आपल्याला स्वतःशीच मांडता आल्या पाहिजेत.कारण आपणच जास्त स्वतःशी विश्वासार्ह असतो.यातून एकमात्र होते की स्वतःच स्वतःला समजून घ्यायला शिकत असतो.जगाला विश्वासात घेण्याची गरजच काय ना! आपण स्वतःच स्वतःला माफ करु शकतो.किंबहुना आपल्या चुका, आपल्या भावना आपल्यापुरत्याच मर्यादित राहतील याची खात्री असते.लोक काय हो फुकटचा सल्ला द्यायला आणि आपले वाभाडे काढायला तयारच असतात.आपलं दुःख पाहून खूप जणांना असूरी आनंद देखील होतो.म्हणूनच आपल्या भावना जेव्हा एखाद्यासमोर व्यक्त करणार असू तर ती व्यक्ती किती विश्वासार्ह आहे हे विचारात घेतले पाहिजे.आपल्या त्यावेळेसच्या भावनांची परिस्थिती त्याने समजून घ्यायला हवीय.उगाच चेष्टेचा विषय होता कामा नये.

कोणासमोर काय व्यक्त व्हावे हे आपल्याला समजले पाहिजे.नाहीतर आपल्या भावनेचा आदरच कुणी करणार नाही.आपल्या भावना नेहमीच बॅलन्स असाव्यात.ज्या व्यक्ती खूप भावनिक असतात त्यांना यशही उशीराच मिळत असावे.पण जे मिळते ते दैदीप्यमान असते इतके खरे.

आपल्या माणसासाठी एखादी गोष्ट खूप मनापासून करत असतो आपण.त्यावेळेसचा त्याच्या तृप्तीचा अनुभव आनंदच देऊन जातो.

एखाद्या व्यक्तीशी आपले मतभेद होत असतात.पण आपण रागात लगेचच म्हणून जातो की माझ्या मनातून उतरली आहे ही व्यक्ती. मरेपर्यंत मी तिचे तोंड देखील पाहणार नाही. असे कुठे होऊ शकते का हो ? अशा कितीतरी व्यक्तींनी आपल्याला आयुष्यात दुखावलेलं असतं.किती जणांची तोंडं पाहायची नाहीत मग.उगाचच

आपण आपला अहंकार कुरवाळत बसत असतो काही कारण नसताना. कोरोनाच्या या काळात कितीतरी सोन्यासारखी माणसं आपण गमावून बसलोतच की.

आपल्या भावना आणि आपला अहंकार दोन्हीही यातील सूक्ष्म फरक आपण जाणून घ्यायला हवा. त्या लोकांच्या चांगल्या गोष्टी का नाही आपण लक्षात ठेवू शकत.आपणही आपल्या चूका कधीतरी मान्य करायलाच हव्यात ना !

खूपदा असंही होतं की तिने / त्याने त्यांच्या आयुष्यातील चांगली गोष्ट उशिरा सांगितली म्हणून आपण त्यांना सदिच्छा देखील देत नाहीत.

माणसाला भावना सांभाळता आल्यातर माणूसपण देखील सांभाळता येतं.दिवसभर आपण आपल्या कामात व्यस्त असतो.आणि रात्री शांततेत कधी कधी भावना उफाळून आल्यासारख्या वाटतात. स्वतःशी नेहमीच प्रामाणिक राहावं असं मला वाटतं. आपल्या मनातल्या शंकाच राहिल्या नाहीत तर त्या आपल्याला सकारात्मक विचार करायला प्रवृत्त करतात.

आपल्या डोळ्यातून आपल्या हृदयाच्या भावना व्यक्त होताना आपल्याला दिसतात. कधी कधी आघाताने बांध देखील फुटताना दिसतो.एखाद्या सभेत किंवा कुटुंबासमवेत असताना वडीलधा-यांनी नुसत्या डोळ्यांनी इशारा केला तरी तो आपल्याला खूप काही सांगून जातो.

भावना कधीही व्यक्त झालेल्या चांगल्याच असतात.त्या नैसर्गिक असल्याने आपले मन हलके होते.आणि आपण अगदी आरामात राहतो.

भावनांचा आणि मनाचा खूप जवळचा संबंध आहे. आपल्या मनातील भावना आपण व्यक्त केल्याच पाहिजेत.

**कु. छाया उंब्रजकर**
**सोलापूर**
**मो.९४२३०६७९१६**

# पानगळ



समोर दृष्टीस पडलेले दृश्य विहंगम होते,
बहाव्याच्या पानगळीने त्याचे रुपडेच बदलले होते,
एरव्ही त्यावरून चालताना नीरस वाटणारा तो ;
आज पितवर्णी पानगळीने पितरंगी झाला होता.

दुतर्फा झाडीतून भलताच सुरेख दिसत होता,
पानगळ होऊन गेल्याने जणू झाडे मोकळी झाली होती.
अंगावरची उतरण ती निरखून पाहत होती,
असे असूनसुद्धा शांत,भारदस्त भासत होती.

झाडांनी पण पानगळीचे सत्य जाणले होते,
हे असे होणे असते हे मान्य केले होते ,
जुने गळून गेल्यावरच नवघटीत होणार ;
या एका सकारात्मकतेवर फिरून ती जगू लागणार.

झाडांच्या उदारतेने पडलेला पानांचा सडा,
मात्र रस्त्याचे सौंदर्य खुलवण्यात आनंदी होता ,
आणि ते दृश्य पाहणारी ती वा तो त्याच्या होणाऱ्या कौतुक सोहळ्यात मग्न होती.

**सौ. अर्चना प्र. निकारंगे**
**मो.9820350408**

# उठा उठा चोर आले...



श्रीराम पंत चिंचवडेकर मोठे विनोदी स्वभाव असलेले व्यक्तिमत्व.ऐका प्रसिद्ध महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक. आपण बर अन् आपली नोकरी बरी. लंगोटी साप्ताहिक दैनिक मधून सटर फटर लेखन करण्याचा मनस्वी छंद. यात त्यांना आनंद वाटतो.तेवढीच विनोदी लेखक म्हणून चार लोकात मिरवण्यात हौस पूर्ण करून घेतात. गल्ली बोळातून संस्थेचा पुरस्कार मिळाला की त्या ठिकाणी कथा कथन चान्स ते सोडत नसत. पणं पंत फारच भोळसट स्वभावाचे.भित्रे होते. बारावीच्या परीक्षेत गर्डीग करताना ऐका टुकार मुलाचे गाल रंगवले. पंत यांना वाटले आता आपले काही खर नाही.मला कधी रस्त्यात अडवून बेदम मारहाण करतील याचा मेळ नाही या भीती पुढे त्यांनी आपली राजदूत मोटार सायकल काढली,जोरात किक मारत एखाद्या कुत्र्याने पाठलाग करावा तसा आपला पाठलाग ही पोरं करत असतील या भीतीने बूंगाट गाडी पळवली.

पंत ची गाडी दूर विस फूट लांब असली तरी त्या आवाजाने सगळ्यांना समजते पंत चा

रणगाडा येत आहे. फट..फट.. फटर..या आवाजाने सारा परिसर दणाणून सोडला जायचं.सोबत धूर लोट. मोटार सायकल गटा गट पाणी प्यावं तसे नळ कांडतून धूर जसा सिगरेट चा धूर निघतो असे वाटत आहे. नरेश, सुरेश, संदेश ही पंत ची मुले.गाडीच्या आवाजाने बापाचे स्वागत करायला तयार असत. ब्रम्हा, विष्णु महेश ही त्रिदेव अचानक अवतरले हा रोज अनुभव. तिघ उच्च शिकलेले.स्वतःच्या पायावर उभे राहून काही तरी करावं अस या मुलाचा स्वभाव नव्हता.यांचं पुढे कस होईल ही काळजी मनात घर करून जायची.वडिलांचं ऐक ही गुण मुला मध्ये नाही. कष्ट,मेहनत,करून शेतीवाडी करून प्राध्यापक गिरी करणे ही त्यांची तारेवरची कसरतच होत असे.

फाटके कपडे फेकून द्यावे तसे या मुलांनी बापाचे आडनाव बदलून टाकले.एकत्र कुटुंब श्रीराम पंत यांचे घर असल्याने नाते वाईक मित्र यांचा रोज घरात राबता असायचा. सुरेश ला मात्र हे नको होत.आपण स्वतंत्र जगू ही भावना. पंत यांनी मुलांना प्लॉट घेऊन दिला. नेहमी भाडेकरु ची जत्रा भरत असते.ऐक ना धड बारा भर चिंध्या अशी अवस्था सुरेश ची धरसोड वृत्ती मुळे रोज नौकरी बदलून टाकत.आमचे पोट बेफिकीर वागतो.काळजी नाही त्याला मूर्ख आहे अशी पंच पदी पंत आपल्या जवळच्या लेखक मित्र विसू कडे करत. या त्रासाला कंटाळून सुरेश ने घर सोडलं.बायको ऐक मुलगा नव्या घरी दाखल झाले.घरमालक रहायला आला म्हणून किरायदार जाम आनंदी झाला होता.तो किरायदार ब्राम्हण होता पूजा पाठ भिक्षूकी करत होता. त्याच्या हाताने सत्य नारायण पूजा झाली.त्याच रात्री बाहेर अंगणात ठेवलेल्या मोटार सायकल ची कुणी तरी चोराने हवा काढली.गाडीतील पेट्रोल काढून नेले.या मुळे सुरेशला आल्या आल्या राष्ट्रीय सलामी मिळाली होती. रामनगर मध्ये चोरांची मोठी भीती असत.

पणं नागरिक डोळ्यात तेल घालून असत.बाहेर मोठे अंगण असल्याने किरायदार घर मालक यांच्या गाड्या असत.घर मालक आल्याने मधू गुरु बिनधास्त होते. आता काही भीती नाही.रात्री दोन वाजता चोर भिंती वर उडी मारत आले.शेजारी राहत असलेल्या रघु ला याची जाणीव झाली.कोणी तरी अंधारात आल्याची चाहूल लागली.रघुला झोप येत नव्हती तो जागाच होता.रघुचे वडील नुकतेच देवा घरी गेले होते,रघु त्या हार घातलेल्या फोटो कडे बघत होता.

त्याची आई दुर्गी म्हणाली काय झालं रघु तू जागा का झोप येत नाही का.मला वास येतो गाडीतील पेट्रोल चा. काही तरी जळत असल्याचा.सार्वजनिक कचरा पेटवून द्यावा तशी मधू गुरु यांची गाडी चोरट्यांनी पेटवून दिली होती.रघुने सुरेश,मधुगुरु यांना आवाज देत जागे केले. पाठी मागे झोपड पट्टी मध्ये कलीम चाचा यांच्या मुलीचे लग्न होते सगळी पाहुणे मंडळी तेथे जागी असल्याने धूर येत असल्याचे पहिले.तो पर्यंत गाडीचा पार कोळसा झाला होता.सुरेशला वास येत होता पणं भीती मुळे त्याने तोंड दाखवलं नाही की बाहेर पणं आला नाही.

निसर्ग रम्य सह लीचे फोटो काढावेत तसे पोलिसांनी फोटो काढून घेतले.दुसरे दिवशी गुरु अन् त्यांच्या गाडीचे सांतवन करण्यासाठी गर्दी झाली. हा गाडी जाळपोळ घटना सुरेश अन् त्याच्या बायकोला नवीन होतं मनातून पार घाबरुन गेले होते.मख्ख पहात होते.या मुळे सुरेशला काळजी वाटली घरातील सर्व ग्रील दरवाजे दुरुस्त करून घेतले लोखंडी दरवाजे बसून घेतले.झेड सिक्युरिटी करून टाकली अगदी संडास बाथरुम पणं पक्की करून टाकली.देव घरात नंदा दिप रहावा तसा प्रत्येक ठिकाणी दिवस रात्र दिवे लागलेले असायचे.

बद्रिनाथ शेठ जी यांना काशी विश्वनाथ तिरुपती बालाजी देव दर्शन साठी जायचे होते.सकाळी निघायचं ठरलं म्हणून त्यांनी बोलिरो बुक केली. वाहन चालक घेऊन येत असताना मध्येच गाडी बिघडली बंद पडली. टायर पंक्चर झाले.तशीच गाडी आपटत आपटत आणली.

फट फट करत नेमकी गाडी सुरेश च्या घरा समोर येऊन द त्त म्हणून थांबली.हाडाचा डॉक्टर ने इकडून तिकडून पहावे तसे वाहन चालक याने गाडी अवती भोवती पिंगा घातला. मागे पुढे पहात राहिला.रात्रीचे दोन वाजले. कोणी रस्त्यावर नाही.मोकाट कुत्रे मस्त रियाज करत होती.सोबत क्लिनर नसल्याने वाहन चालक ने टायर बदलण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु केले. स्टफनी, ज्याक, लहान मोठे होतोडे,स्क्रू, नट बोल्ट,रात्रीचे दोन वाजले रस्त्यात खळ खळ ख्ट्याक... दन दन...असा सप्त सुर आवाज निघत होता.भीती जण्य

दह शत मुळे सुरेश त्याची बायको मेघना पार घाबरुन गेले.आपल्या घर कोणी तरी फोडत आहे.घराला धक्के मारत आहे दरोडा टाकण्यासाठी चोर असेल का असा भास आजूबाजूला जाणवत होता.भर कडाक्याच्या थंडीत या नवरा बायको यांना घाम फुटला. बोबडी बंद झाली.तोंडातून ऐक शब्द फुटेना. मेघना सुरेशला जोरात आवाज देत होती.अहो उठा उठा बाहेर चोर आले आहेत. जसा बाहेर गाडीचे चाक बदलण्याचा आवाज यायचं तसा या जोडप्याची घाबरगुंडी उडत.कारण आठ दिवसा पूर्वीच गुरुची गाडी जाळपोळ अनुभव पाठीशी होता. मग ही दुसरी परीक्षा होती. घरातच नुसती धावपळ सुरु झाली.

बाहेर यायची हिमत नव्हती.घरातच सुरेश मोठ्याने काठी आपटत होता.मेघना ने शेजाऱ्याला जागे केले त्या घरातील लेकर आजी आजोबा जागे झाले.पुन्हा खण खन जोरात आवाज सुरु झाला.सुरेश इकडे कोण कोण आहे बोंबलत होता बाहेर काय आवाज येणार.घरातल्या घरात वात नसलेले सुतळी बॉम्ब हा फोडत बसला होता.

बॅटरी डाऊन झाली तशी सुरेश ऐक मेकाला घरातून फोन करत जायचं.तुम्ही पोलस बोलवा माझ्या कडे चोर आले म्हणून.कोणाला वाटले कोण गेलं. गचकल. मेल म्हणून जोशी आजी आजोबा यांनी सुरेश चा फोन घेतलाच नाही.

एकमेकाच्या फोन ची चाचपणी करु लागले. संभा मास्तर स्वेटर,मफलर घालून धोतर चा सोगा सांभाळत हातात वाळलेल्या कडू लिंबाचा जाडजुड फोक घेऊन घरा बाहेर पडले.जाऊ की नको म्हणत घराच्या बाहेर घुटमळत होते.कुणी ओळखीचं दिसत का पहात होते. शाळेतील शिकवताना वर्गात फेऱ्या माराव्या तसे यांचे फिरण चालू होत.पाठी जोरात बुक्का मारावा तसा बुक्का बंडू नाना यांनी आपल्या बॅटरी ला मारला. मिच मिच करत सुरु झाली.

वाहन चालक गाडीच्या खाली झोपून काम करत होता.त्यामुळे आपल्याकडे कोणी येत आहे याची जाणीव त्याला नव्हती. दारे खिडक्या बंद करून सुरेश येर झाऱ्या घालत होता.दवाखान्यात घालतात तश्या. विकास ने सुरेश ला फोन केला, आरे बाबा तू आधी घरा बाहेर ये.

कोणी चोर बीर नाहीत.दरोडेखोर नाहीत. आधी पहा काय आहे ते.घाबरु नको.आम्ही येथेच बसून आहोत. असे सांगून समजूत घालत होते.आपल्या शेठ जी ची गाडी आहे.बिघडली टायर पंक्चर झाले ते ही लोक नीट करत आहेत ये बाहेर असे म्हणत अंगावरचा फाटका टॉवेल अंगावर मळलेली बनेन नीट करत भित भित बाहेर आला. बाहेर तर वेगळेच वातावरण दिसले.बंडू नाना सुरेश कडे पहात पहात बडबड करत राहिले,ज्याची त्याला चोप नाही अन् शेजाऱ्याला झोप नाही.असे म्हणत घरचा रस्ता पकडला.

सायरन वाजवत पोलीस गाडी घेऊन आले. वाहन चालक गाडीच्या खालून हळूच बाहेर आला अंगाला काळे हात पुसले. पोलिसांनी वातावरण पहिले. बोलिरो ला मंदिरातून प्रदक्षणा घालावी तशी घातली. गाडीचे मॉडेल चांगले आहे किती अवरेज देते माहिती करुन घेतली.बिघडली होती का बर बर.. झाली का नीट....

सुरेशला वाहन चालक यास तांब्यात पाणी दिले. त्याने पोलिस अधिकारी समोर खिशातून चुना, तंबाखू अडकित्ता सुपारी काढली. दोन बोटात पकडुन तोंडा मध्ये कोंबली.हात झटकत गाडीत बसून निघून गेला. पोलिसांची गाडी सायरन वाजवत मार्गी लागली. मळलेल्या तंबाखू चा धुरळा उडाला हे सुरेश च्या बायकोला सहन झाले नाही.फटाफट शिंकत बसली, सुरेश पोलीस गाडी कडे त्या धुराकड पहात राहिला. गर्दीचा फायदा घेत बापूंनी रस्त्याच्या कडेला आपले काम करुन घेतले. तेथेच लघु शंका केली.

नाद खुळा

अन्

पब्लिक गोळा........

असे तोंडाने जोरात आवाज करत काठी आपटत घरचा रस्ता धरला.

**शंतनु वि. गौतम**
**परभणी**
**मो.९१३०४७४४१०**

# एकमेव सत्य



अशी कशी मातीच सर्वांची सदैव आहे सांगाती
अनमोल असते प्रितीही तिचीच पंचमहाभुतांशी

महती तीची दरवेळी प्रत्येकांसी आहे वेगवेगळी
बळीराजासीच प्रितीच तीची सोन्याहुनी पिवळी

चरांचरांने धरलीय ओळख याच प्रेमळ धरतीची
अविभाज्य घटकच होऊनही याच धरणीमातेसी

देई मागेल तेच वेळोवेळीही आपल्यां उदरातुनी
युगेयुगे झाल्यागेल्या घडामोडीच कारण नसुनही

इतिहास दडवून ठेवलां सत्याचा तीने वेळप्रसंगी
प्रतारणा करतो मानवही आपल्याच स्वार्थासाठी

प्राणीमात्रांने नाही केलांय विश्वासघात तिच्यांसी
सत्यही निर्विवाद जगी एक आहे शेवटीच माती

अंहकारांपायीच नाही दिसंते स्वार्थीच मानवांसी
साईदास म्हणे अखेर मातीबगरही नाहीच काही

**रामानंद तारी**
**गोवा**
**मो.98508 21609**



# विठ्ठल सावळा



हाती घेऊनी वीणा टाळ
वारकरी संत होती गोळा
पाय आपसूक वळती पंढरीचा
पाहण्या सुख सोहळा

हा विठ्ठल सावळा सावळा
फुलवी चैतन्याचा मळा
सुकलेल्या गवतात ही
फुलवी हिरवागार मळा

वारकरी न पाहे रात अन् दिस
पंढरी पाहणे हाच एक ध्यास
हरी दर्शन होता धावे,जसे भुकेले
वासरू धरे कामधेनू ची कास

चुकू नये त्याची वारी
जोवर श्र्वासामध्ये श्वास
याची घेतो तो काळजी
नाही करत कधी हरी उदास

**सौ. गीता नरेश रक्ताडे**
**न्यू पनवेल**
**मो.8108613820**

# राजकुमार आणि फुल



अंधाराच्या साम्राज्याचे बुरुज ढासळत होते. रात्र आणि दिवसाच्या सीमारेषेवर चौखुर उधळलेलं धुकं डोळ्यांच्या जाणिवा निष्प्रभ करीत होते. थोडाच वेळ गेला असेल, अरुणाच्या आगमनाने आरक्त झालेल्या प्राचीतून प्रकाशाचा धवल स्त्रोत वाहू लागला. आणि त्या स्त्रोतातच धुकं विरुन गेलं.

याच सांद्र सकाळी राजकुमार नेहमीप्रमाणे फिरायला निघाला. वातावरणात दाटून राहिलेली प्रसन्नता मनाच्या मृदुल भावनांवर फुंकर घालत होती. रस्त्याच्या दूतर्फा असलेल्या तृणांकुरांवर थिजलेले दवबिंदू कोवळया उन्हात आगळया तेजाने चमकत होते. नहालेल्या दिशा तपस्व्याच्या चर्ये प्रमाणे तृप्त भासत होत्या.

फिरता फिरता तो एका बागेपाशी आला. विविध प्रकारच्या, आकाराच्या, रंगांच्या फुलांनी ती बाग सुशोभित झाली होती. गुलाब, मोगरा, प्राजक्त, सोनचाफा........ ! किती म्हणून सांगू? त्यांच्या धुंद परिमलाने मनाची बेहोशी आधिकच वाढत होती. ज्या मुग्ध कलिकांनी कित्येक दिवसांच्या अंधारात उजेडाचं फक्त स्वप्न पाहिलं त्यांना पहिली रुपेरी पहाट पहाताना लाजल्यासारखे होत होतं. म्हणूनच की काय त्या अर्धवट उमललेल्या स्थितीत होत्या?

थोडे पुढे जाताच त्याचे लक्ष एका गुलाब पुष्पाने वेधून घेतले.

“आहाहा! किती सुंदर!! निसर्गाची अजब चित्रकारी की इश्वराच्या रसिक मनाचा अनोखा अविष्कार “. राजकुमाराच्या मुखातून हे शब्द उस्फूर्तपणे बाहेर पडले.

बागेमध्ये गुलाबाची पुष्कळ फुले होती पण हे फूल काही वेगळेच होते. कोमल, मुलायम, मखमली पाकळया आणि त्याची रचना तरी किती सुंदर? दवबिंदूंची त्या रक्तवार्णिय पाकळयांवरची आरास सौंदर्य आणखीनच खुलवत होती.

राजकुमार कित्येक तास वेड्यासारखा त्या फुलाकडे पहात होता. परंतु ते असीम सौंदर्य त्याच्या डोळयात जणू मावतच नव्हतं. त्या फूलाने त्याच्यावर विलक्षण मोहीनी घातली होती. आता सूर्य पश्चीमेकडे कलला होता. प्रकाशात मिजाशीने मिरवणाऱ्या, पाठराखण करणाऱ्या सावल्याही दीर्घ आणि निस्तेज झाल्या होत्या. थोड्याच वेळात जग अंधाराच्या विक्राळ विळख्यात गडप होणार हे त्याच्या लक्षात आलं. त्या फुलाचे चित्र हृदयात साठवून तो घरची वाट चालू लागला.

रात्रभर फुलाच्या विचाराने विव्हळ झालेल्या राजकुमाराचे पाय भल्या पहाटे बागेची वाट चालू लागले. ‘ या अद्वितीय सौंदर्याला आपल्या प्रासादाचं कोंदण मिळालं तर?’ राजकुमाराच्या डोक्यात विचार चमकून गेला.

“ जगातल्या साऱ्या सुखांची, मदिरांची नशा ज्या सौंदर्याची बरोबरी करु शकत नाहीत त्या खुबसुरतीकडे पहात जीवन उधळून टाकायचं. सौंदर्याशी एकरुप होउन त्याचा आस्वाद घेणं हीच परिपक्व रसिक मनाची अंतरीम अवस्था आहे.” राजकुमार स्वत:शीच म्हणाला.

विचारांच्या तंद्रीतच तो बागेजवळ आला. अक्षय तारुण्याचं वरदान लाभलेलं ते फूल विलोल वाऱ्याबरोबर हितगुज करीत होतं. ती नव्हाळी, ती गुजगोष्टीतली ऐट पाहून राजकुमार अधिकच सुखावला. त्या फुलाजवळ जावून तो म्हणाला.

“ हे कुसुमनृपा तुझ्या लोभस लावण्यावर मी बेहद्द खुश आहे. माझ्याबरोबर चल, प्रासादात. इथे हा उद्दाम वारा तुझे अवयव छिन्न-विछिन्न करुन टाकील. या दाहक रविकीरणात तुझ्या मुलायम पाकळया मलूल होवून जातील. सुख, ऐश्वर्य, यांनी काठोकाठ भरलेल्या माझ्या महालात, सुवर्णकुंडित, हीरे-माणकांनी मढविलेल्या महिरपांत स्वर्ग सुख उपभोगत जीवन व्यतीत करावसं असं मला वाटतं. तुझ्या सौंदर्याच्या प्रभेने माझं जीवन सुद्धा उजळून निघेल, चैतन्यमय होईल.”

फुलपाखराच्या चुंबनाने गोरंमोरं झालेल्या फुलाच्या चेहऱ्यावर नाजुक हास्य पसरुन गेलं. वऱ्याच्या झुळूकीनं हलणाऱ्या आपल्या पाकळया सावरीत ते म्हणालं.

“ नाही राजकुमारा कित्येक योजनं धावत येवून माझ्याशी खेळणारा हा अवखळ वारा, ही दाहक परंतु संजिवक रविकीरणं, तो खळखळून हसणारा प्रपात हेच माझे राजवैभव. संध्याकाळी पश्चिम क्षितिजावर निळ्या पडदयावरती फिकट-लाल रंगाने माखलेल्या ढगांचं सुंदर प्रदर्शन भरतं. रात्री आकाशात स्वर्गातील रत्नांचं भांडार उघडतं. शुभ्र, धवल चांदण्याचे तरंग माझं अंतरंग उजळून टाकतात. कधी रातकिडयांची सुरेल मैफिल सजते, तर कधी रातराणीच्या मोहक सुगंधाने माझं मन बेधुंद होऊन नाचू लागतं. फुलपाखराच्या चुंबनाने माझे रोमरंध्र पुलकीत होतात. धरतीच्या फिरत्या रंगमंच्यावर वेगवेगळया ऋतूत होणारे नैसर्गिक बदल सुद्धा मला सुखद आनंद देतात.

हे सारं तुझ्या महालात आहे का? या मातीच्या सुवर्णशय्येत फुलायचं, बहरायचं आणि तिच्याच कुशीत चिरनिद्रा घ्यायची. राजविलासापेक्षा काटेरी जीवनातला अकृत्रिम आनंद मला जास्त प्रिय वाटतो. आणि त्यातच

मी तृप्त आहे. मनाच्या तृप्ततेसाठी राजवैभवाची गरज नसते.”

एवढं बोलून फूल क्षणभर थांबलं. वाऱ्याच्या मोठ्या झुळूकीने बाजूला असलेल्या प्राजक्ताची फुलं त्या फुलावर पडली. राजकुमाराने ते पहिलं आणि तो शांतपणे घरची वाट चालू लागला.

**नितिन विनायक म्हात्रे**
**पेण, रायगड.**
**मो. 8554899988**

# भिंती



त्या उत्तररात्री लोक
एकच गलका करतात
रडण्याचा भयंकर कल्लोळ
अचानक आरडाओरडा

अकांत नि आक्रोशाचे
एक तीव्र यातनालय जाते साचत अवकाशात
एक बेदर्दी बेवारस तडफड

मी अर्ध्या झोपेतून उठतोय दचकून
कुणीतरी पेशंट असतो गचकलेला
त्या भयंकर सामसूमीत

निर्विकार असतात भिंती दवाखान्याच्या
त्या थरथरत नाहीत
त्या पाझरत नाहीत

कदाचित त्या सवयीचा
भाग झाल्या असाव्यात?

पण असल्या सवयी का व्हाव्यात?

नि एक प्रश्न निरंतर थरथरतोय...
तो चिरत जातोय अंतर्पार... अंतहीन...
आतल्या आत...

**महेंद्र ताजणे**
**मो.96897 21016**

# आत्मविश्वास



ध्येय गाठावे यशाची आत्मविश्वासाने पूर्ण करावे
संकल्प आपल्या स्वप्नांची पूर्ण होईपर्यंत थांबावे!!1!!

दृढ असावा निश्चय मनात उंच शिखराला गाठावे
येईल अडचणी जरी जीवनात माघे वळून न पहावे!!2!!

आपली इच्छा आपली आकांक्षा
जीवनात असावी नवी दिशा
नको कुणाचे साथीची अपेक्षा
माझ्या जीवनाची मीच आशा!!3!!

जिद्द देशाची मनात बिंबव्याची
मनात ठेवावी सकारात्मकता
लडक्मकता पायरी चढाईची
होईल उद्दिष्टांची पूर्तता!!4!!

ध्यानी मनी असावा एकच ध्यास
होईल मी विजयश्री
प्राप्त करेल मी विजयाची कास
बनेल मग राजश्री!!6!!

**सौ.कल्पना तांबट**
**खामगाव, बुलढाणा**
**मो.82750 27894**



# सल



अनु अग आवरले की नाही तुझे चल उशीर होईल. अबीर आपल्या शर्ट चे स्लीव्हज फोल्ड करत म्हणाला.

हो रे झालेच चल,शेवटचे एकदा आरशात बघून अन्विता बोलली.

अबीर ने अनु कडे पाहिले,खूप सुंदर दिसतेस अनु अस बोलून त्याने तिचे गाल ओढले.

अबीर आता उशीर होत नाही का. लडिवाळ पणे अनु म्हणाली.

हम्म्म.. चलो सुपर सिंगर अन्विता मॅडम आज तुमचा खास दिवस आहे. अबीर.

अबीर आणि अन्विता कार मध्ये बसले.आज अनु ला संगीत क्षेत्रातील एक मोठा पुरस्कार मिळणार होता त्या साठी हे दोघे निघाले होते.

अबीर थँक्यु यू सो मच, अनु ड्राइव्ह करणाऱ्या अबीर कडे बघून बोलली.

अनु माझे आभार का मानतेस? तू स्वतः मेहनत घेतली आहेस,आज तू एक उत्कृष्ठ गायिका म्हणून नावा रूपाला आली आहेस याच सगळ क्रेडिट तुलाच आहे.

अबीर पण तू साथ दिलीस,सोबत केलीस,मला प्रोत्साहन दिलेस या मुळेच तर मी पुन्हा उभ राहू शकले सो त्या साठी थँक्स.

नुसते थँक्स नको हा,पार्टी पण हवी हसतच अबीर म्हणाला.

हो नक्की आज आपण डिनर बाहेरच करू. अनु.

अन्विता आज खूप खुश होती आनंदी होती,तिच्या कष्टाचे फळ तिला मिळाले होते.गाणं तिचा श्वास होता,तिचे पॅशन होते.तिला मागचे दिवस आठवू लागले. कॉलेज मध्ये असताना गाण्याच्या स्पर्धेत,वार्षिक स्नेह संमेलन मध्ये अनु आवर्जून गात असे. गाण्या मुळे ती पूर्ण कॉलेज मध्ये फेमस झाली होती याच तिच्या गोड आवाजाच्या प्रेमात मोहित पडला होता. अनु चे कौतुक करून कंटाळत नसायचा मोहित.अनु ही त्याच्या वर जीव ओवाळून टाकत असे.दोघे एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले होते.कॉलेज संपल्या नंतर दोघांनी आप आपल्या घरी सांगितले आणि लवकरच त्यांचा विवाह संपन्न झाला.

सुरवातीचे गोड गुलाबी दिवस पटकन निघून गेले. मोहित एका मोठ्या इंटर नॅशनल कंपनीत जॉब करत होता,अनु ही आय टी कंपनीत काम करत होती.रोजचे दोघांचे रूटीन सुरू होते. पुण्या मध्ये ते दोघे रहात होते,मोहित चे आई बाबा गावी होते तर अनु चे आई बाबा मुम्बई मध्ये होते.अनु वर कसलीच जास्तीची जबाबदारी नव्हती.कधी घरी काही जेवण अनु बनवत असे तर कधी बाहेर ते खावून येत असत.मोहित तिला कामात मदत ही करत असे.

एक दिवस संध्याकाळी अनु वैतागून घरी आली. तिची खूप चीड चीड होत होती. ऑफिस मध्ये ती कामात परफेक्ट होती,सगळ तीच काम एकदम चोख असायचे पण आता तिला डावलून तिच्या एका कलिग ला निता ला प्रमोशन दिले होते. निता तशी जास्तच फ्री होती सगळे जण हेच बोलत होते की बॉस सोबत निता सतत फिरत असते म्हणून बॉस ने तिला प्रमोशन दिले असेल त्या बदल्यात निता ने काय दिले असेल हे सर्व श्रुत होते. या मुळेच अनु अपसेट होती.

थोड्या वेळात मोहित घरी आला.अनु चा पडलेला चेहरा बघून तिच्या जवळ आला,अनु काय झाले अशी उदास का दिसतेस?

मोहित अरे माझं काम इतकं चांगल आहे सगळ्या पेक्षा एकदम परफेक्ट तरी बॉस ने त्या निताला प्रमोशन दिले हे मुद्दामच केले आहे.माझ्या कामाची त्यांना कदरच नाही आहे.

अनु अग हे असच सगळी कडे चालते ग,ती निता बॉस ची चमची असेल त्याच्या पुढे पुढे करत असणार नक्की.

हो मोहित तीच काहीतरी सुरू आहे बॉस सोबत पण म्हणून काय हुशार एम्प्लॉइज ना अस डावलनार काय?

अनु आता तू चिडून राग राग करून काही बदलणार आहे का सांग.मोहित तिची समजूत काढत म्हणाला.

पण मोहित मला आता तिथे काम करणे जमनारच नाही,माझ्या कामाची कदर नाही त्या लोकांना.

अनु एक सुचवू का तुला बघ पटते का? मोहित तिचा हात हातात घेऊन म्हणाला.

बोल ना काय सुचवणार आहेस?

अनु तू कॉलेज मध्ये असताना किती छान गात होतीस, लग्ना नंतर गाणं विसरूनच गेली आहेस सो आय थिंक यू विल स्टार्ट सिंगिंग अगेन.

मोहित अरे आता कसे जमणार मला गाणे गेली दोन वर्ष साधा रियाज पण नाही केला मी.

अनु आवाज तर तुझा छानच आहे थोडी प्रॅक्टिस केली की जमेल आणि बाकी घर खर्च वैगेरे मी पाहीन सगळ अस ही माझ्या सॅलरी मध्ये सगळ मॅनेज होईल.

मोहित खरच मला गाणं जमेल? मी जॉब सोडून देऊ का?

हो अनु नक्कीच अस ही त्या रटाळ नोकरीत तू खुश

आहेस का? त्या पेक्षा तुला जे आवडते ते तू कर.

येस मोहित मला गाण्यात करियर करायला आवडेल अस बोलून अनु ने आनंदात मोहित ला घट्ट मिठी मारली.

मोहित तिच्या डोक्यावर हात फिरवत म्हणाला,खुश ना आता डियर,चल आज मस्त बाहेर जावू कँडल लाईट डिनर करू.

हो मोहित,मी आता आपल्या साठी कॉफी घेवून येते.

मोहित ने सुचवले त्या प्रमाणे अनु ने जॉब सोडून दिला आणि तिने गाण्याचा क्लास जॉईन केला.रोज मोहित ऑफिस ला गेला की अनु तिचे आवरून क्लास ला जात असे.पुन्हा एकदा गाण्याची प्रॅक्टिस आणि रोजचा रियाज यामुळे अनु आनंदी होती आपल्याला नेमक काय करायचे आहे हे तिला आता समजत होते. नोकरी वैगेरे करणे तिला जमलेच नसते गाणं तिच्या नसानसात भिनलेले होते.

असेच सात आठ महिने गेले. अनूचा क्लास नियमित चालु होता काही ठिकाणी तिने क्लास मार्फत दोन तीन गाण्याचे कार्यक्रम ही केले.गाणं शिकवणाऱ्या मॅडम सुहासिनी ताई यांनी अनुला छान तयार केले होते,ती त्यांची आवडती शिष्या होती.मॅडम सोबत कार्यक्रम केल्या नंतर अनु चा आत्मविश्वास वाढला आपण खरच छान गावू शकतो अशी पावती तिला मिळाली.बाहेर कुठेही कार्यक्रमाला मॅडम अन्विता ला सोबत घेऊन जावू लागल्या.हळू हळू अनु लोकां मध्ये फेमस होऊ लागली.मोहित ही तीच खूप कौतुक करत असायचा.

आताशा अनु ला बाहेर गावाहून ही कार्यक्रमा साठी आमंत्रण येवू लागले होते त्या मुळे अनु खूप बिझी झाली होती.मोहित तीला बाहेर जाण्या साठी अजिबात अडवत नव्हता.अनु तिच्या गाण्यात मग्न होती तर मोहित दिवसेंदिवस कामाच्या व्यापात तणावात राहू लागला. एके दिवशी मोहित लेट घरी आला तर अनु अजून घरी आली नव्हती.मोहित ला खूपच राग आला.थोड्या वेळात अनु घरी आली,अरे मोहित आज तू लवकर आला का घरी? घरात येता येता तिने विचारले,

मोहित ड्रिंक घेत बसला होता.तो रागातच होता,मी लवकर आलो काय नाही आलो तुला काय फरक पडतो अनु? तू तर एकदम बिझी झाली आहेस तुझ्या गाण्यात,शो करण्यात,तुला माझी काही पडलेली आहे का?

मोहित असे का बोलतो आहेस? मी बिझी नाही आहे उलट तूच रोज उशिरा येतोस सतत कामात असतोस,माझ्याशी बोलायला देखील वेळ नसतो तुला.

ओह रिअली अनु,मी बिझी आहे? तू रोज घरी कधी येतेस? मला किती वेळ देतेस?

मोहित आता तू नशेत बोलत आहेस आपण उद्या बोलूया. अनु म्हणाली.

नो अनु मी पूर्ण शुद्धीत आहे नशेत तर तू आहेस तुझ्या प्रसिद्धीच्या,लोकांच्या कौतुकाच्या,पाहतो ना मी तुझ्या इंस्टा वर किती ते फॉलोवर्स,कमेंट लाईकस.. तू तर खूप फेमस झाली आहेस.सगळे जण तुझ्या आवाजाचे गोडवे गातात.मोहित वेगळ्याच टोन मध्ये बोलत होता.

अनु त्याच्या जवळ गेली त्याचा हात पकडत म्हणाली,मोहित अरे मी फेमस झाले याचा तुला अभिमान नाही वाटत का? तुला माझं कौतुक नाही का?

अभिमान,? माय फुट..मी इथे दिवस रात्र मरमर काम करतो आणि एक तू एक गाणं गायली की लगेच फेमस..हे नक्की गाण्या मुळे आहे की लोक तुझ्या वर फिदा आहेत?

मोहित माईंड युवर लँग्वेज..अनु रागात बोलली.

व्हॉय आय शुड..हा चेहरा बघूनच लोक लाईक करतात ना तुला मोहित ने तिची हनुवटी घट्ट पकडली होती.

मोहित वेड लागले आहे का तुला? काही ही काय बोलतो आहेस.त्याची पकड जोरात होती तिला त्रास होत होता सोड मला मोहित इट्स पेनिग.अनु कळवळत म्हणाली.

मला शिकवते तू... नुसत गाणं गावून कोणी फेमस झाले आहे का ? मोहित तिला बाजूला ढकलत म्हणाला.

मोहित अरे तूच मला हा मार्ग दाखवलास ना,गाणं माझं पॅशन आहे मी यातच करियर करावं अस तूच बोलला होतास ना? मग आता का असा वागतो आहेस? अनु रडकुंडीला येत म्हणाली.

हो मीच सांगितले तुला पण मला काय माहीत तू इतकी पुढे निघून जाशील की तुला तुझ्या शिवाय इतर कोणी दिसणारच नाही मी ही नाही.

अस काही नाही आहे मोहित तुझा गैरसमज झाला आहे.

गैरसमज अरे दोन चार शो केले तू आणि आता तुला सिनेमात ही गाणं गायला मिळणार आहे इतक्या लवकर कसे झाले हे ? मोहित नशेत वाटेल ते बोलत होता,तिची प्रसिध्दी बघून त्याचा मेल इगो दुखावला होता.बायको आपल्या पुढे निघून जाते आहे हे त्याला रुचले नाही त्याला जलस फिल होत होते.

अनु रडतच रुम कडे निघून गेली.बेड वर पडून ती हुंदके देत रडत राहिली.आज मोहितचा एक वेगळाच चेहरा तिला दिसला होता.त्यानेच तिला नोकरी सोडून गाण्यात करियर कर असे सुचवले होते तोच मोहित आता तिच्या प्रसिध्दी वर जळत होता? शेवटी किती ही झाले तरी तो एक पुरुष होता त्याचा मेल इगो तिला त्याच्या पुढे जावू देत नव्हता.आज अनुचे म्युझिक इंडस्ट्री मध्ये बऱ्या पैकी नाव झाले होते त्यात तिला सिनेमा साठी गाणे गायची ऑफर मिळाली होती त्यामुळे मोहित अजूनच चिडला होता,या इंडस्ट्रीत अनु गेली तर आपल्या पासून दूर जाईल ही भीती त्याला वाटत होती.

अनु प्रसिद्धीच्या शिखरावर जात होती आणि मोहित अधिकच चिडचिड करत होता.दोघां मध्ये सतत वाद होऊ लागले एक दिवस अनु ची सहनशिलता संपली आणि तिने मोहित चे घर सोडले.

अनु चा क्लास मेट अबीर पुण्यातच होता अधून मधून दोघे बोलत असायचे.अनु अबीर शी सगळ शेअर करत असायची. घर सोडल्याचे तिने अबीर ला सांगितले होते.एक फ्लॅट रेंट ने घेवून अनु राहत होती.अबीर करियर मध्ये इतका गुंतला होता की त्याचे लग्नाचे वय निघून गेले होते.त्यात तो काही वर्षे परदेशी राहिला होता.

अनु अबीर भेटत होते. अनुला आपल मन मोकळे करायला हक्काचा माणूस अबिरच होता.दोघे आता एकत्र लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहत होते.पण दोघांनी आपली मैत्री सांभाळली होती.एकत्र राहत असून ही दोघे मर्यादेत राहत होते.त्यांच्यात प्रेम होते पण प्रेमाची लक्ष्मण रेषा त्यांनी अजून ओलांडली नव्हती कारण अनु ला वेळ हवा होता.पुरुष एका पॉइंट पर्यंत व्यवस्थित वागतात पण जेव्हा त्यांना समजते की आपली पार्टनर फेमस होत आहे,पुढे जात आहे तेव्हा मग त्यांना जलस फिल होऊ लागते.काय सांगावे अबीर ही पुढे जावून असाच वागेल ही भीती तिला होती.

अनु पोहचलो आपण बघ तुझे किती छान पोस्टर लावले आहे इथे.अबीर कार्यक्रमाच्या हॉल जवळ येत म्हणाला.

अनु आपल्या भूतकाळा तून बाहेर आली तिने पाहिले समोर तिच्या नावाचे मोठे कट आवुट लावले होते.

दोघे ही हॉल मध्ये गेले.आयोजकांनी त्यांचे स्वागत केले.मीडिया वाले पटापट अनु चे फोटो घेत होते.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अनुला संगीत क्षेत्रातील बेस्ट अवॉर्ड दिला गेला.

अबीर आणि अनु कार्यक्रम संपून घरी निघाले होते तेव्हा अनु प्लीज दोन मिनिट थांब असा मागून आवाज आला तसे अनु ने वळून पाहिले तर मोहित उभा होता.

मोहित तू आणि इथे? अनु ने विचारले.

हो अनु खास तुझा अवॉर्ड सोहळा पाहायला आलो होतो अभिनंदन अनु यू आर द बेस्ट !मोहित ने हात मिळवला.

अनु थोडे बोलायचे होते मोहित म्हणाला.

अनु तू ये बोलून मी गाडी मध्ये आहे अबीर अस बोलून गेला.

मोहित आता आपल्यात बोलण्या सारखं काय उरल आहे आपला घटस्फोट लवकरच होईल.अनु म्हणाली.

आय नो अनु माझं खरच चुकले,मी खूप चुकीचा वागलो तुझ्या सोबत.मला माफ कर प्लीज.

मोहित आता माफी मागून काही साध्य नाही होणार मी खूप पुढे निघून गेली आहे.

अनु तू मनात आणलेस तर नक्कीच आपण पुन्हा एकत्र येवू शकतो,आय रिअली लव्ह यू.

मोहित आता ते शक्य होणार नाही.मला माझं गाणं माझं करियर महत्वाचे आहे.

अनु मी तुझ्या करियर च्या आड कधीच येणार नाही.तू मला सोडून गेलीस त्या नंतर मला समजले की मी तुझ्या शिवाय नाही जगू शकत अनु.

मोहित आता मी माघारी पुन्हा परतून येणार नाही सॉरी.

अनु एक सल मनात कायम राहिली होती तुला भेटून माफी मागायची होती.आय नो तु खुप पुढे निघून गेली आहेस.मे बी तू तुझा जोडीदार निवडला आहेस. सो हॅप्पी रहा आणि गाणं कायम चालू ठेव.आय मिस यू सो मच.

मोहित तिथून निघून गेला

अनु पाठमोऱ्या जाणाऱ्या मोहित कडे बघत बघत अबीर कडे गेली.

कार चा दरवाजा ओपन होता ती आत जावून बसली.

अनु काही प्रॉब्लेम आहे का मोहित का आला होता? अबीर ने विचारले.

काही नाही अबीर सॉरी म्हणायला आला होता मला पुन्हा परत ये म्हणत होता.

मग काय ठरवले आहेस तू अनु.?

अबीर मी इतकी पुढे निघून आली आहे की आता मागे वळून जाणे नाही होणार.आता मला फक्त पुढे जायचे आहे.अनु म्हणाली.

ओके शेवटी तुला जे वाटते तेच तू कर,मस्त रहा अनु आणि मी आहेच कायम सोबत तुझ्या.

अबीर खरच कायम साथ देशील मला तू.अनु ने आपला हात पुढे केला.

अबीर ने हसतच तिचा हात हातात घेतला म्हणाला,हो अनु नक्कीच आयुष्य भर साथ देईन तुला. तुझं गाणं तुझं करियर त्या साठी तू जी मेहनत घेतली आहेस ते सगळ मी पाहिले आहे सो मला काहीच प्रॉब्लेम नाही तू तुझं पॅशन जप आणि मी तुला जपतो व्हॉट से? मिश्किल पणे अबीर म्हणाला.

अबीर थँक्यु सो मच अनु हसत म्हणाली.

अनु आता थँक्यु नको ग,ते थ्री मॅजिकल वर्ड्स ऐकायचे आहेत मला.अबीर अनु च्या जवळ येत म्हणाला.

अनु एकदम ब्लश करू लागली हलकेच म्हणाली. आय लव्ह यू अबीर.

लव्ह यू टू अनु अबीर ने तिच्या हातावर आपले ओठ ठेवले आणि कीस केले.

अबीर मी फेमस सिंगर झाले तर तुला जलस् फिल नाही ना होणार पुढे जावून आपल्यात भांडण नाही ना होणार? अनु ने विचारले.

नो अनु मला माहित आहे गाणं तुझा श्वास आहे मी पाहिले आहे आणि एका पुरुषा वरून तुम्ही बायका सगळ्याच पुरुषांना एकाच नजरेने का बघता? काही पुरुष माझ्या सारखे ही असतात डियर.

हो अबीर सॉरी तू खरच वेगळा आहेस.सो आय लाईक यू.

ये हुई ना बात अस बोलून अबीर ने अनु ला आपल्या मिठीत घेतले.

**संगीता देवकर**
**वाकड, पुणे.**
**मो.7744001106**



# हायकू



वादळ मोठे
स्थिर दोन्ही किनारे -
परते लाट

पिशा खूडल्या -
हळू हसली लक्ष्मी
दिल्या पाटल्या

झेपावू पाही
पंख तुटका पक्षी -
पिले भुकेली

जोडल्या तारा
जुनीच एकतारी -
जिद्दी म्हातारी

पंढरपूर
कळस दिसू आला -
रोगी हसला

हातात हात
वृद्ध अधू नजरा -
ताजा गजरा

नाचल्या धारा
तापल्या भूईवर -
कोकीळ स्वर

स्पर्श फुलांचा
सूर्य मावळतीला -
सुगंध आला

एका क्षणात
बिजली चमकली -
वाट दिसली

ऊब उन्हाची -
पिलू गारठलेलं
हलू लागलं

देवळापाशी
लाट गंगेची आली -
पायरी ओली

घाव घणाचा -
भाता हलवी मूल
लक्ष पुस्तकी

चोच फळांत -
खोडावर कापल्या
बिया पडल्या

पक्षी खेळती
पावसाळी हवेत -
धुळीचा  लोट

बालश्रमिक
जरासाच हसला -
आली झुळूक

लागली ठेच -
किती सहजपणे
सुटला पेच

एकच उडी
भंगार मालावर -
चमके छल्ला

**तुकाराम खिल्लारे,**
**परभणी**
**मो.८८३०५९९६७५**

# तूच तुझी



हे सखी,
तुझी लाज तुलाच वाचवायची ही वेळ आली...
शरीराचे लचके तोडायला
अनेक दुर्योधन आज तुझ्याजवळी...
सर्व पाहूनी आंधळे-बहिरे बनणारे
सारे धृतराष्ट्र तुझ्या सभोवताली..

होईल वस्त्रहरण तेव्हा
इथे कोण होईल कृष्ण..??
करशील कोणाचा धावा..??
करशील कोणाची प्रार्थना..??

एक ना अनेक द्रौपदी अश्याच
रोज जळती अन् रोज मरती..
कृष्ण मात्र आज कोणाच्याच
मदतीस धावून ना येती..

हे सखे, उठ, चल, लढ या भक्षकांशी..
तुझी लाज हीच तुझी ताकद,
ती तुलाच वाचवायची तुझ्याचसोबती...

नको तू चंद्राचा तुकडा होवूनी जगू..
'चांद का तुकडा' म्हणून
नको कोणाला न्याहाळू देऊ..
तळपणारा तेजस्वी सूर्य मात्र होवुनी जगू..
तुझ्याकडे पाहण्याची कोणाची
नको हिम्मत करू देऊ...
शकूनीच्या षडयंत्रात स्वतःला
अडकून तू नको घेऊ...

तूच तुझा कृष्ण हो,
तूच तुझा मित्र हो..
तूच तुझा आधार हो,
तूच तुझा रक्षक हो..

**स्वप्नाली कोरे**
**इचलकरंजी, कोल्हापूर**
**मो. 7020502235**

# विठुला



विठुला नाम तुझे खुलवी गात्रागात्रा
नको लोटू दूर मी तुझी कान्होपात्रा...||धृ||

नामा तुका ज्ञानेश साऱ्यांची तूच मात्रा
एकाकी पडले मी  घडवी आता यात्रा
सावराया तूच ये माझ्या गलितगात्रा
नको लोटू दूर मी तुझी कान्होपात्रा...|| १ ||

ओघळते आयुष्य ओल आणते नेत्रा
कसे दान मागावे नसे मीच सुपात्रा
सांगितली गीता  पार्था तू कुरुक्षेत्रा
नको लोटू दूर मी तुझी कान्होपात्रा...|| २ ||

रक्षणार्थ लज्जा कृष्णा ये मी अनावृत्ता
तुझ्या भक्तीरसाने सारे जाई सुखांता
ठेव साऱ्यांना तूच अनाक्रांत रे  आता
नको लोटू दूर मी तुझी कान्होपात्रा...|| ३ ||

**संजीवनी काळे**
**अमरावती**
**मो.9422955580**

# ऋतूगंध पाऊस



तिन्हीसांज दाटून आली होती. आभाळात जमलेले घन आता कोणत्याही क्षणी बरसू लागतील असेच काहीसे चित्र अवतीभवती दिसत होते. जणू काही झाडे मेघांचा भार डोक्यावर घेऊन उभी होती.. धुवांधार कोसळणारा "तो" आणि तहानलेली "ती"..!

जणू काही ते तो बरसायची वाट पाहत होते.. झाडांचे पान न् पान

कोणीतरी 'स्टॅच्यू' म्हटल्याप्रमाणे स्तब्ध...! वाराही कुणीकडे गेलेला

झाडांची तंद्री उगाचच भंग व्हायला नको म्हणून असेल कदाचित..! समंजसपणा दाखविला होता त्याने.. एवढ्यातच तो आला... फक्त शिडशिडला.. झाडे शहारली नी

रोम न् रोम पुलकित झाली पण काळोख अजूनही दाटलेलाच..! धुवाधार कोसळून मोकळं व्हायचं नव्हतं त्याला...आज त्याची लहर काही वेगळीच होती... झाडांशी सलगी करण्याच्या नादात तो त्यांना नुसताच खिजवत होता मात्र बरसत नव्हता..,कोसळत नव्हता नी रिमझिमतही नव्हता...!

आतून एक उदासीनता... मोकळं ढाकळं व्हायचं होतं त्याला पण नाही जमलं.. तो त्या दिवशी नुसताच

शिडशिडला आणि गपगुमान गेला... आभाळ भरलेलेच राहिले...

मेघांना मनसोक्त अंगावरून कोसळू देणारा.. तो रिता होणार म्हणून कितीतरी वेळ झाडांनी वाट पाहिली

तिन्हीसांज गडद होत गेली. वाऱ्याची हलकीशी लहर फुलांचा सुगंध घेऊन नाचली... फुलांचा सुगंध एकदम आत शिरला आणि ऋतुगंध पाऊस माझ्या घरात नी मनाच्या कोपऱ्याकोपऱ्याला स्पर्शून गेला... !

का कुणास ठाऊक पण या वेळेस मात्र पाऊस हवा तसा माझ्या मनाला भावला नाही.. दाट भरून राहिलेला.. त्याला व्यक्तच व्हावेसे वाटत नसावे का ? असे क्षणभर मनात आले..

असे असूनही गारव्याच्या सोबतीने फुलांचा सुगंध घरभर नाचला.. !

झाडांचे असतेच मुळी असे.. ती कोणत्याही ऋतूत ती सदासतेज असतात. पावसात तर त्यांच्यावरील टवटवी मनाला आगळी वेगळी प्रसन्नता बहाल करते...!

जुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात कदंब फुलांचा बहर नुसता ओसंडून वाहत असतो... कदंब बहरला की तो रात्र गंधाळून टाकतो...

कदंब वृक्षाला अनुभवावे ते आषाढ मेघ बरसतानाच्या रात्रीच...! एरव्ही नितळ, शीतल आकाशाच्या पार्श्वभूमीवर त्याची जाळीदार पाने

अनोखी नक्षी रेखाटतात खरी परंतु आषाढात दाटून आलेल्या मेघांच्या साक्षीला तो गोंडस फुलांनी गच्च भरलेला असतो..त्याचे हे भरलेपण घराला घरपण देते हे मात्र नक्की..!

मग पावसालाही मोह आवरला नाही... तो धुवांधार कोसळत राहिला....! मग यमुना... कालिया... कृष्ण... मुरली... कदंब... अथांग निळाई... काही काही आठवत राहिले मी....!

निसर्गाची धुंदी... त्याचे चैतन्य याच कालावधीत सळसळून उठते... !

माझ्या पावसाच्या आठवणी तशा खूप आहेत. आपल्या लोकगीतांतून तर त्याला विविध पातळ्यांवर नखशिखांत पारखले आहे..! बाहेर पाऊस धुवांधार कोसळायचा... हृदय मात्र आठवणींनी बरसायचे पण आठवणीच त्या.. दाटल्या

मेघासारख्या... कधीही कोणत्याही क्षणी कोसळणाऱ्या...! मग मी त्यांना शब्दच दिले..

कालच्या पावसात
मनापासून भिजावेसे वाटले
मग शब्दांनाही मनात
रुजावेसे वाटले

कवितेच्या रुपात... कवितेतून...!

आषाढ महिन्यात आषाढ पावळीचे गुणगान केलेले आहे.. इतर महिन्यापेक्षा आषाढ आणि श्रावण या महिन्यांतील पावसाने संवेदनशील मनाला वर्षानुवर्षे पुरते झपाटून टाकले आहे. कालिदासाचे 'मेघदूत' आणि आषाढ मेघ या अनुबंधातून..!

त्यानंतरही किती साहित्य स्फुरावे ? धुंद कोमल मनाची ही असोशी

फुलांफुलांतून दरवळत घरभर पसरताना वातावरणात तजेला निर्माण झाला..इतके दिवस पाऊस आठवतच नव्हता... आता मात्र तो नव्याने मनात रुंजी घालू लागलाय. तो आज ऋतुगंध पाऊस होता... बालपणी अनुभवलेला... आता तर बालपण आठवायला लागले. पावसाळ्यात सगळीच गंधवती फुले रसरसून फुलायची. जाई, मोगरी, जुई, गुलाब, सोनचाफा, प्राजक्त ही त्यात महत्त्वाची फुले..गुलाबाचा रंग गुलाबीच त्याचा नाजूक गंध... तसा गंध तर अलीकडच्या काळात हुंगताही आला नाही. केसांत माळला की केस गंधीत व्हायचे...! पावसाळ्यात घराची सकाळ या गुलाबाच्या फुलांमुळे

सुगंधीत व्हायची तर तिन्हीसांज मोगरा,जाई जुईच्या गंधाने भारली जायची..तिची कळी नाजूक. गुलाबी पांढुरक्या रंगाच्या कळ्या... तिन्हीसांजेला चारपाच कळ्या जरी उमललेल्या असल्या तरी तिच्या गंधाची तरलता सर्वत्र पसरायची. मोगरा, जाई केसांत माळायाची तर ती संध्याकाळीच..!

रात्र घरात शिरण्यापूर्वी गंधवेडात समरसून जायचे ते याच

तिन्हीसांजेला...!

पाऊस धुवांधार कोसळत आहे... सर्वांगावर शहारा उमटतो आहे.. अंग सळसळून उठते... पानापानांवरील थेंब झडझडून ओघळतात... मोगरी कळ्यावरील टपोरे थेंब रोमांचित होतात तरी सुद्धा पाऊस उसंत घेतच नव्हता... तो आता तर धुवांधार पडतोय... घरात जाताना उंबरठ्यावर पाऊल ठेवता क्षणीच कळते की अरे

ऋतुगंध पाऊस तर दरवळतोय... घरात आणि मनातही...!!

**संगीता कुलकर्णी**
**ठाणे**
**मो.9870451020**

## लेकरांनो

भरारी नभी घेत जा लेकरांनो
पुन्हा परतुनी येत जा लेकरांनो

सदा सत्य शोधा असे ते कुठेही
घरी तेच मग नेत जा लेकरांनो

झडावा मनीचा अहंभाव मित्रा
जना ही मती देत जा लेकरांनो

कसा ध्वस्त होतो अहंकार सांगा
बघा फक्त लंकेत जा लेकरांनो

महात्मास शोधू कसा ऐनवेळी
मुखवटेच संकेत जा लेकरांनो

**विलास मोरे**
**एरंडोल**
**मो.7588007866**



# प्रेरणा : नवा उजेड



जीवनाच्या वाटेवरती, चालताना थांबू नको,
पडझडीच्या क्षणांतही, खचून कधी जाऊ नको।
खोल धुक्यात वाट सापडते, मनात ठेव विश्वास,
प्रेरणेने नवी उभारी, मिळतो नवा प्रकाश।

मनाशी धर निर्धार, जिंकून घे संघर्ष हा,
प्रयत्नांमध्येच असतो, यशाचा खरा मार्ग हा।
श्रमांच्या नदीत पोहत जा, कधी नकोस रे थांबू,
प्रेरणाच ती तुझी शक्ती, तीच तुला नेईल सांभाळून ।

तुफानाशी लढताना, धर धीराचा तूच हात,
अपयशातही ठेऊ नको, निराशेचा कुठेच घाट ।
काटेरी वाट असू दे, चालत रहा निर्धाराने,
प्रेरणा तुझा आधार, घेऊन येईल यश क्षणांत।

प्रेरणा देते नवा प्रकाश,मनात उजळतो नवा जोश,
विश्वासाने चालत रहा,मार्ग ठरेल तुझा खास।
स्वतःवर ठेवून विश्वास, जिंकशील तू हर लढाई,
प्रेरणेने उजळवशील, जीवनाची नवी कहाणी।

**चारुशीला बिडवे**
**डोंबिवली**
**मो.9833600312**

# आध्यात्म हेच ना?



चालता बोलता
आध्यात्म जगतो आपण...

एकरुप होवून
काम करता करता
काहीतरी गुणगुणत असतो
तेव्हा ते स्तोत्र होते...

पूजा करताना
तल्लीन होतो
पाद्यपूजेचे ते पाणी
नंतर तिर्थ होते...

शिजवलेले अन्न
देवाला नैवेद्य दाखवतो
ते नैवेद्याचे ताट
आता प्रसाद होते...

कळतं जेव्हा
शेजारी आजारी आहे
दवाखान्यात घेवून जातो
ती निस्वार्थ सेवा होते...

मनात येते
आज अमूक करायचे
पण भावालाही असते जायचे
मनातले मनातच राहते,
तो होतो त्याग...

छोटी मुलगी
पायीच शाळेत जात असते
मी गाडी थांबवून,
तीला लिफ्ट देतो,
तीच्या चेहऱ्यावरील आनंद
तो आत्मानंद होतो...

**अनिल वामोरकर**
**अमरावती**
**मो.9923514390**

# ‘पदर’



गुलाबांच्या रोपट्यांना पाणी घालण्यात अण्णा दंग होते.शेजारी चिमुकली स्वप्नाली अण्णांना मदत करीत होती.गुलाबाचे राणे लागत असलेल्या पिवळ्या कर्दळीला अण्णा पाणी घालू लागले.अचानक ते पाणी देता देता थांबले नी एक टक आपल्या बंगल्याकडे बघू लागले.हातातील पाईप ची तोटी कुंडीच्या बाहेर भलतीकडेच वाहू लागली.मात्र त्यांचें लक्ष एकच ठिकाणी स्थिर होते.

स्वप्नाली हळूच म्हणाली : आजोबा पाणी पुढें वाहत चाललेय ?

आजोबांचे तिकडे मुळीच लक्ष्य नव्हते,ते कोणत्यातरी गहण विचारात गर्क होते.तसेच ते मटकन खाली बसले मात्र नजर एकच ठिकाणी स्थिरावली होती.जणू ती कश्याचा तरी विचार करत होती, वर्तमानातून ती भविष्याकडे वाटचाल करीत होती.

स्वप्नाली ला त्यांचे वागणे अजब वाटले,तीही त्यांचेकडे बघत राहिली.

अण्णांना आढवले ते पूर्वीचे दिवस, जन्मतःच वडिलांचे प्रेमाला मुकलेले अण्णा कसेबसे आईच्या कुशीत वाढले होते. आईच्या त्या एकाकी प्रेमातच बालपण गेलं, तसं पाहिले तर हलाखीच पण तरीही सुखात.

आईने मात्र कधीच दुःखाची छटा ही आपल्या चेहऱ्यावर आणली नाही.मिळेल ते काम करत मुलांना वाढवले, चांगले शिकविले.

एक प्रसंग असा आला की परीक्षेला फी भरण्यासाठी आईजवळ पैसे नव्हते,म्हणून ती तिच्या भावाकडे गेली. म्हणाली : दादा !

दादा : काय क काय झाले अशी अचानक आलीस ?

आई : अरे माझ्या सर्जुला परीक्षा फी भरण्यासाठी, वीस रुपये हवेत रे ? तेवढे दिलेस तर फार उपकार होईल.करेल मी परत तुला.

पण आईची गयावया त्याने काही ऐकली नाही उलट रागानेच बोलला : अग स्वतःजवळ ऐपत नाही तर कश्याला शिकवतेस त्याला, ठेव की कुणाजवळ चाकरीला ?

आईचं मन दुःखी झाले,तरीपण आशेने पुन्हा पुन्हा म्हणाली : दादा ! मी पदर पसरविते तुझ्या समोर पण एवढी मदत कर.

पण दादाने एकले तर तो दादा कुठला.आई तशीच मोकळ्या हाताने परत आली, पण हिम्मत मात्र हरली नाही.

स्वतः पदर खोचून उभी राहिली. आठवडा भर काबाड कष्ट केले.दोन्ही सांज फक्त भिमा नदीचे पाणी प्यायली आणि माझ्या परिक्षेच्या फी साठी पैसे जमा केले.

आई : बाळ सर्जू मन लावून चांगला अभ्यास कर ?

त्या दिवशी मी आनंदाने सांगितले : आई मी पास झालोय ग !

हे एकूण ती दोन मिनिट स्तब्ध उभी होती.मला कवेत घेत डोळ्यातून अश्रूंचा धारा वाहू लागल्या.

मी तिला हलवत : आई रडायला काय झाले. मी पास झालोय?

आई : बेटा सर्जु ! हे अश्रु नाहीत तुझ्या भीमा आईचं प्रेमाचं पाणी आहे रे.

असेच दिवस सुख दुःखातून निघून गेले.मला चांगली सरकारी कार्यालयात नोकरी लागली,संसार केला सेवा निवृत्त ही झालो

आणि त्याच निवृत्तीच्या पैशाने हा बंगला बांधला.

आईच्या प्रेमळ पदराखाली लहानचा मोठा झालो म्हणून त्याला नावही दिलं ते ‘ पदर ‘.

त्या आठवणीने अण्णांचे डोळे पाणावले.स्वप्नालीच्या नाजूक हाताच्या स्पर्शाने ते कुठे वर्तमानात आले.

स्वप्नाली : अण्णा! काय झाले अण्णा ?

अण्णा त्या बालिश चेहऱ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहत म्हणाले : कूठे ? काही नाही.

हातातील पाईपच्या तोटीने पाणी तोंडावर मारत चेहरा ओला केला.आणि स्वप्नाली बरोबर खेळू लागले.

रात्रीचे जेवण झाले होते,सारी मंडळी मधल्या खोलीत गप्पा मारीत बसली होती. अण्णा एका कोपऱ्यात बसून त्यांच्या गप्पा ऐकत बसले,त्याचे बाजूला स्वप्नाली खेळत होती.

अंजू आपल्या डोळ्यांवर येणाऱ्या बेटा उडवत : अरे दादा ! आज मात्र सरांनी कहरच केला

दादा : आता काय केलं सरांनी.

वहिनी : अग स्पष्टपणे सांग की काय केलं ते ?

अंजू : अग वहिनी आज की नाही सरांनी” भारतीय स्त्री आणि तिचा पदर” या विषयावर भंकस लेक्चर दिले.

वहिनी : अग ‘ पदर ‘ म्हणजे तरी काय ग ?

बाजूला बसलेली धाकटी सून कमल : अग त्यात काय विशेष ‘ पदर म्हणजे साडीचा काठ ग ‘ ?

विजयी मुद्रेने अंजू : हो मी ही सरांना हेच सांगितले.

पण सर काय म्हणाले माहित आहे का ?

सर म्हणाले ‘ स्त्रीचा पदर म्हणजे भारतीय संस्कृतीची झाकलेली इज्जत होय ‘!

अंजू : पण मी म्हणते पदराचा भारतीय संस्कृतीशी

संबंध आलाच कुठे ?

सरळ तिने दादालाच प्रश्न केला : दादा तुला काय म्हणायचे या विषयावर ?

दादा मोठ्या ऐटित : अग त्यात काय पदर म्हणजे पदर.

कोपऱ्यात नको तोच विषय अण्णांच्या कानावर पडत होता पण त्यांना अडचण नको म्हणून ते स्वप्नालिशी गुपचुप खेळत होते.

अंजू पुढे म्हणाली : वहिनी,इतकेच नव्हे तर सर पुढे म्हणाले की, आज आपली संस्कृती ताठ मानेने उभी आहे,त्यात सर्वात मोठा वाटा तुम्हा स्त्रीयांचा आहे !

दोन्ही सूना एकदम म्हणाल्या : होय ! आहेच की.

अंजू : पण सर म्हणाले, तुम्हा स्त्रीयांच्या मुळे नाही, तर ती आहे आपल्या थोर इतिहास कालीन स्त्रियांचा.

मोठी सून म्हणाली : अग पण....

शेवटी अण्णा कडे बघत अंजू म्हणाली : अण्णा तुमचा काय विचार आहे ?

इतका वेळ स्तब्ध बसलेले अण्णा एकदम जागे झाले.

सगळ्यांचा त्यांना खूप राग आला होता ? शांतपणे सगळ्यांकडे समोर नजरेने बघत म्हणाले : बेटा अंजू.

अंजू : काय अण्णा ?

अण्णा : तो वर समोरचा फोटो पाहिलास का?

अंजू दादा कडे बघत : हो तो आज्जिंचा ना ?

अण्णा दादा ला उद्देशून : हो संपत. अरे तो तिच्या डोक्यावरचा पदर पाहिलास ते तीच रुप आहे ना ? तीच ती आपली भारतीय संस्कृती आणि तो तिचा पदरा आड जो चेहरा झाकलेला दिसतोय ना ? तो म्हणजे भारतीय संस्कृतीची झाकलेली इज्जत.

रागाने अण्णा : फोटोतच काय तिने उभ्या हायातीत स्वतःचा पदर कधी म्हणून डोक्यावरुन ढळू दिला नाही.

आण्णांनी एक कटाक्ष मोठ्या सूने कडे टाकला : ही माझी मोठी सून हीने तो डोईवरचा पदर खांद्यावर घेतलाय ?

बाजूलाच बसलेल्या लहान सुने कडे बघत : ती माझी लहान सून तीने तर तो खांद्यावरचा पदर कमरे पर्यंत खोचून दिलाय.

आणखी अंजू बेटा तू तर कधीच तो पदर पायाखाली तुडवलास ?

दोन्ही सूना खाली डोके करून गप्प झाल्या पण अंजू : अण्णा ? त्यात काय एवढं ? जग बदललंय आम्हीही त्या प्रवाहात वाहतोय.

अण्णा : अग पण अंजू तो प्रवाह कुठे वाहत चालला आहे माहित आहे का तुला ?

तिच्याकडे एकटक पाहत, थोडं थांबून

मोठ्याने अण्णा : विनाशाकडे....!

आम्ही मानव दिसत होतो ना ? त्याही पेक्षा विचित्र दिसत आहात तुम्ही पोरी ? आणि हो त्या पदराखाली आईने दूध पाजल तुला, तुझ्या आईला दूध पाजताना काय गरज होती तुझ्या भोवती पदर लावायची ?

सगळे स्तब्ध अण्णांच्या चेहर्या कडे पाहत शांत बसले होते.

वरील सर्व सांगताना अण्णांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले,त्यांचं चित्त विचलित झालं होत, अंग थरथरत होते का कोण जाणे पण

ते अगदी भयानक दिसत होते.

सर्वांना त्यांचं बोलण जिव्हारी लागले होते..

बाकी सारेजण गुपचूप आपापल्या खोलीत निघून गेली.

खोलीत होते ते फक्त अण्णा व त्यांची चिमुकली स्वप्नाली!

स्वप्नाली ने इकडे तिकडे नजर फिरवली,जवळपास कोणीच नव्हते ती हळूच अण्णां कडे गेली व तिच्या लहान चिमुकल्या बोटांनी अण्णांचे डोळे पुसू लागली.

अण्णांनी ते दोन्ही हात आवेशाने आपल्या ओढांवरून फिरवले.

तशी स्वप्नाली : आण्णा मी...तुमची स्वप्नाली नाही हो ढळू देणार कधी माझा ‘ पदर ‘.

गळ्याला हात लावत स्वप्नाली :अगदी आज्जी शपथ ? कधीच उघडी पडू देणार नाही आपल्या महान संस्कृतीची इज्जत.

अण्णा विचलितपणे आपल्या चिमुकल्या स्वप्नालिकडे तर कधी वरील समोरच्या फोटोकडे एकटक बघत.

क्षणात त्यांनी तिला वर उचलत पटापट तिचे मुके घ्यायला सुरुवात केली आणि अस्पषट पणे पुटपुटले तूच तर माझे स्वप्न आहे,भविष्य आहेस, माझा ‘ पदर ‘ आहेस...

**रफिक इनामदार**
**शिरूर**
**मो.९३२६८९२२६६**

# जातं



होता पुर्वीच्या काळात
जात्याला अपार मान
जाते घराचे वैभव
जाते आन बान शान

रामप्रहरी दळण्या
माय घालीतसे साद
जात्यातून निघतसे
सप्तसुरांचा निनाद

वेगे दळतसे माय
हाती धरूनीया खुटा
ऐसा होतसे संचार
पीठ गळे पटापटा

मुखी असे ओव्या गाणी
मनी संसाराचा वडा
दळण्याला साथ देई
तिच्या हातातला चुडा

लग्नकार्य सणावारा
माय नेमाने पुजते
विठ्ठल जनाईपरी
ठेवी ईश्वरीय नाते.

**सौ. बालिका बरगळ-वसमतकर**
**मो. ९७६७६१८२१७**



# अनुभव एक सत्य...



आपलेपणा दाखवुन विश्वासघात
करतात,
ज्यांना आपण आपले समजतो ते
कधीच आपले नसतात...

कामापुरता नात आपल्याशी सगळीच
जोडतात,
काम झाल की आपल्याला ओळखसुध्दा
दाखवत नसतात...

काम असल्यावरती गोड गोड
बोलतात,
काम झाल्यावरती परके करुन
टाकतात...

प्रत्येकाला वेळ निघून गेलेली की
अनुभव येत
जे नात टिकवण्यासाठी आपण
प्रयत्न असतो करत....

विश्वास ठेवतो आणि तिथेच
असतो फसत
सुरुवातीला आपल्याला सगळेच
चांगले वाटतात..

प्रेमात पडल्यावरती वाईट ही
चांगल दिसत,
पण जसे जसे दिवस जातात रंग
स्पष्ट दिसतात...

**केतकी अनिल सुतार**
**रोहा, रायगड**
**मो.8459037059**

# मी खरंच मराठी?



दुपारचे चार वाजून गेले होते,मिताली शाळेतून घरी येण्याची वेळ झाली होती.इयत्ता आठवीत इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत असलेली माझी नात खूप हुशार होती,ती प्रत्येक विषयात किमान नव्वद टक्के तरी गुण मिळवायची.नुकतीच दहा दिवसाची मिळालेली दिवाळीची सुट्टी संपली होती.मुलांच्या शाळा पूर्ववत सुरु झाल्या होत्या. दोन दिवसापुर्वी शाळेत मराठीच्या शिक्षकांनी “पत्र लेखन” मधे ग्रंथपालस पत्र हा विषय विशेष चाचणीसाठी ठेवला होता.वीस पैकी गुण मिळणार होते.आज त्या चाचणी परीक्षेचा निकाल होता.

नेहमी प्रमाणे बरोबर साडेचार वाजता मिताली शाळेतून घरी आली,एकदम खूप खुशीत होती म्हणजे तिला चाचणीत चांगले गुण मिळाले असणार हे सहज कळत होते.घरी येताच तिचा चिवचिवाट सुरु झाला होता.दिलेला खाऊ खात ती म्हणाली आज्जी ओळख बरं मला किती मार्क्स मिळाले असतील परवा झालेल्या मराठी लेटर रायटिंग मध्ये? मी थोडे नाराजीनेच तिच्याकडे पाहिलं होतं.पण तिचं त्याकडे मुळी लक्षच नव्हते ती तिच्याच आनंदात गुंग होती.न राहवून मी शेवटी म्हणाले “मिताली अगं मराठी भाषे विषयी बोलताना तरी संपूर्ण मराठीत बोलत जा ना.”

तीने मान उडवीत थोडंसं दुर्लक्ष करीत तिची पत्र लेखनाची वही माझ्या हातात दिली.गुण तर छानच पटकावलेस की असं म्हणून मी तीच प्रथम अभिनंदन आणि कौतुक केलं. तिही आनंदून म्हणाली आज्जी तू ते निवांत वाच मी थोडा वेळ खेळायला जाते.असं बोलत बोलत ती बाहेर तिच्या मित्र मैत्रिणीं बरोबर खेळायला पळाली सुध्दा.मी तिची वही घेऊन आरामात वाचायला सुरुवात केली.सुवासीक चंपाकळी तांदूळाचा भात आवडीने खाताना  पहिल्या घासालाच खडा लागावा अगदी तसंच काहीसं माझं झालं.मला कळेचना की “हे ग्रंथपालस पत्र लिहिले आहे की स्वत:च्या वडीलांना?”

आमच्या मितालीने पत्राची सुरुवात केली होती ती अशी  “तीर्थरुप ग्रंथपाल सर” आणि शेवट केला होता “तुमची खूप खूप लाडकी मितू.”  सुरुवात आणि शेवट असा तर मधल्या मजकुरात अकलेचे काय तारे तोडले असतील ते काही न सांगताच माझ्या लक्षात आले होते,तुम्हालाही त्याचा अंदाज आला असेलच. गंमत म्हणजे ह्या अशा पत्र लेखनाला चक्क वीस पैकी अठरा गुण मिळाले होते.म्हणजे शिक्षकवृंद सुध्दा किती बुद्धिवान,अभ्यासू आहे हे सहज स्पष्ट होत होते.

संध्याकाळी माझा मुलगा नीरज आणि सुन विद्या ऑफिस मधुन घरी आले,त्या दोघांनी ते पत्र वाचन केले आणि कपाळाला हात लावला.कारण माझा मुलगा आणि सून जरी अभियंता होते तरीही त्यांच मराठीशी घट्ट नातं होत.मी सहज त्या दोघांना विचारलं “उद्या जाणार का रे मितालीच्या शाळेत?” जरा चौकशी करायला हवी मराठी विषय शिकवायला कोण शिक्षक आहेत ते.... मुलाने आणि सुनेने त्यांना वेळ नसल्याचे सांगितले आणि जमत असेल तर आई तुच जाऊन ये हेही सांगितले.

दुसऱ्या दिवशी मी मिताली बरोबर तिच्या शाळेत गेले.त्यांची प्रार्थना वगैरे सगळं मला नवीनच होतं कारण तिच्या शाळेत अगदी आत पर्यंत मी पहिल्यांदाच गेले होते.आमच्या वेळेस मराठी माध्यमाच्या शाळेत होणाऱ्या प्रार्थनेत आणि आता हिच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील प्रार्थनेत बराच फरक होता.अहो राष्टगीत सुरु असताना हलायचे नाही,सावधान मधे उभे राहायचे हे नियम जवळपास सारखेच असले तरीही चेहऱ्यावर तो देशाविषयीचा अभिमान विद्यार्थी तर सोडाच शिक्षकांच्या चेहऱ्यावरही दिसत नव्हता.

प्रार्थनासंपल्यानंतर आपआपल्या वर्गात सर्व विद्यार्थी गेल्या नंतर मी ही मितालीच्या वर्गात जाण्यासाठी मुख्याध्यापक आणि  वर्गशिक्षकांची रितसर परवानगी घेतली आणि तिच्या वर्गात गेले.वर्गशिक्षकांनी माझे काय म्हणने आहे हे विचारले तेंव्हा मी मितालीच्या मराठीपत्र लेखना विषयी आणि त्याला मिळालेल्या गुणा विषयी विचारणा केली.चाचणी परीक्षेची तपासणी कोणी केली?ज्यांनी तपासणी केली आहे ते मराठीचेच शिक्षक आहेत का? त्यांना कितपत अनुभव आहे? हे विचारले तेंव्हा सुरुवातीला नरमाईत उत्तर मिळाले आणि नंतर कांगावा सुरु झाला.

मुख्याध्यापक महोदयही काहींसे तसच बोलत होते. शेवटी मी मितालीची वही दाखवली तीला मिळालेले गुण दाखवले तेंव्हा मुख्याध्यापक मला म्हणाले अहो मॅडम भाषा विषयात पैकीच्या पैकी गुण देता येत नाहीत कितीही चांगले लेखन केलेल असले तरीही, हा नियम तुम्हाला माहित नाही का? मी न राहवून कपाळाला हात लावला आणि विचारले पत्र लिहिताना “तीर्थरुप” आपण फक्त आपले आई वडील किंवा घरातील इतर मोठ्यांना लिहित असतो,मग तुमच्या शिक्षकांनी पत्र लेखनाचे नियम विद्यार्थ्यांना सांगितले नाहीत का? हे असं कसं शिकवलं आहे? की तुमच्या शिक्षकांनाही परत शिकण्याची गरज आहे? थोडसं आवाज उंचावून

विचारलं तेंव्हा जे उत्तर मिळालं ते विचार गोठवून टाकणारं होतं,डोकं चक्रावून टाकणारं होतं.

तिथले मुख्याध्यापक महोदय म्हणाले "इंग्रजी माध्यमांच्या शाळांना सरकारी अनुदान देण्यात येत नाही त्यामुळे शिक्षकांच्या पगारी चार हजार पासून सुरू होतात साधारण पंधरा वर्षे ज्यांची सेवा झाली आहे त्यांना बारा हजार पगार दिला जातो. मग इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठीचे उच्च शिक्षीत शिक्षक कसे असतील? त्यामुळे आम्ही नौकरीची गरज असलेल्या कोणत्याही कामचलाऊ व्यक्तीची निवड करतो. म्हणून ह्या विद्यार्थ्यांना काही येत नाही.

किती भयंकर आहे हा प्रकार. पण आपण पालक वर्ग याकडे अजिबात लक्ष देत नाही आहोत. आपला एकच अट्टाहास काहीही झाले तरी "आमचा पाल्य इंग्रजी माध्यमतुनच शिकला पाहिजे." आणि हा पालक वर्ग स्वत:ची जबाबदारी समजून मुलांना काहीही शिकवत नाही, लक्ष देत नाही.

फक्त बोलताना मोठ्या मोठ्या गप्पा मारल्या जातात "मी मराठी,मी महाराष्टीयन" असल्याच्या. "मराठी दिन" आला की त्या दिवसापुरत मराठीवरच प्रेम उफाळून येतं.पण "मराठी दिनाच्या शुभेच्छा" हे मात्र इंग्रजीतून लिहिलेलं असतं.

मग खरं सांगा "मी मराठी आहे का? खरंच आम्ही मराठी आहोत का? आमची मातृभाषा खरंच मराठी आहे का.....?

बघा सर्वांनीच यावर विचार करायला हवा निदान आपल्या मातृभाषेतून योग्य प्रकारे पत्र लेखन करण्या इतपत तरी सर्वांना मराठी यायलाच हव.

मराठवाड्यात घडलेल्या एका सत्यघटनेवर आधारीत हे लेखन केलेले आहे.

**ज्योती जयंतराव आळंदकर**
**लातूर**
**मो.९३७०९४६०५७**

# आली दिवाळी



अंगणात सजे सुरेख रांगोळी
दृढ करण्या नाती आली दिवाळी...१

आकाश कंदील शोभे दारोदारी
फराळाची लगबग घरोघरी..२

शेव,अनारसे नि शंकरपाळी
बुंदी,चिवडा,लाडू सजली थाळी...३

सोनियाच्या पावलांनी लक्ष्मी आली
पाहूनिया सारा साज, सुखावली..४

माहेरात विसावल्या लेकी बाळी
प्रेमभावे खुलते नात्यांची कळी..५

भान पर्यावरणाचे सारे ठेवूया
प्रदूषण मुक्त दिवाळी करूया..६

दिवा लावू एक,वंचितांचे दारी
फुलू दे हास्य,त्यांचे ही ओठावरी..७

घासातल्या घासाची,अवीट गोडी
चव रेंगाळू दे,जिभेवर थोडी...८

मनामध्ये फुलावेत, फुलबाजे
किल्ल्यावर सजावेत मग राजे...९

राव असो रंक,साऱ्यांची दिवाळी
भाग्य वेगळे, नाही लक्ष्मी निराळी...१०

झोपड्यांत ही, लख्ख साज सजावा
हर एक चेहरा, उजळून निघावा...११

मनी उजळावेत, दीप आशेचे
जीवनी सजावे,पर्व प्रकाशाचे..१२

**सौ.स्वाती रामचंद्र कोरे**
**कवठेमहांकाळ**
**मो.90968 18972**

# ढगांची अनोखी सफर



एका छोट्याशा गावात, एका डोंगराच्या पायथ्याशी, राहणारा प्रणित नावाचा मुलगा नेहमीच निसर्गाच्या सानिध्यात असायचा. त्याला ढगांचे विविध आकार पाहायला खूप आवडायचं. एके दिवशी प्रणितने आपल्या आईला सांगितलं, "आई, मी आज ढगांच्या देशात जाईन!" आईने हसून त्याला परवानगी दिली, कारण ती त्याच्या कल्पनाशक्तीचे नेहमीच कौतुक करायची.

प्रणितने डोंगर चढायला सुरुवात केली. तो जितका वर चढत गेला, तितके ढग त्याच्याजवळ येऊ लागले. ढगांना हात लावून पाहण्याची त्याची इच्छा होती, आणि तेवढ्यात एक मोठा ढग त्याच्या समोर येऊन थांबला. त्या ढगाने त्याला आपल्या पंखांवर बसवून वर आकाशात नेलं.

प्रणितला वरून त्याचं गाव लहानसं खेळण्यासारखं दिसू लागलं. ढगांनी त्याला आकाशातील त्यांच्या जगात फिरवलं, तिथं त्याला शुभ्र ढगांची साम्राज्ये आणि स्वप्नांच्या गोष्टी ऐकायला मिळाल्या.

तेव्हा एक ढग म्हणाला, "प्रणित, तुझ्या मनात नेहमीच निसर्गाची आवड असू दे, कारण निसर्गच तुझ्या कल्पनाशक्तीला चालना देतो."

आणि तिथून पुढे, प्रणितने नेहमीच निसर्गाचा सन्मान केला. ढगांच्या देशातली ही सफर त्याला आयुष्यभर आठवणीत राहिली.

आणि त्या दिवशीपासून, प्रणितच्या गावातल्या आकाशात नेहमीच ढग हसताना दिसायचे, जणू त्याच्या कल्पनाशक्तीला सलाम करत होते.

**अमोलजी पाटील**
**मो.9730576056**



# दर्शनाचा जन्म



गेले म्हणजे संपले,
आले म्हणजे आपले
जीवन इतके सरळ नसते
हे गणित व्यवहारातले.

वनवास हा सर्व जनास,
श्री रामाने हे स्वीकारले
सकर्मास धर्म मानता
अवतारी पुरुष झाले.

"मिळणे "याचा स्वभाव
काही हातचं गमावणं,
होता वसंतचे आगमन
तेव्हा पर्ण गळती होणं.

जिथे मनुजा दृष्टी स्थिर होते
तिथे दर्शनाचा जन्म होतो,
ओळखीच्या सर्व गोष्टींना
आपण पुन्हा नव्याने भेटतो.

स्वप्न आन् दर्शनी सत्य यांत
वर वर आंतर दिसते
युगांच्या गणतित त्यांचे
अस्तित्व समसमान असते.

सीमेच्या आचरणास बघता
घटात घटाकाश असते
घट फुटता घटाकाश
अवकाशात विलीन होते..

सूक्ष्म अर्थात बघता सखोल
सृष्टीचा नियम हा परिवर्तन
माझे, तुझे,याचे, त्याचे हे
जीवन पटावर टाकलेले दान!!!

**सुभाष धाराशिवकर**
**वाकड (पुणे)**
**मो.9921979640**

# व्रण



“नाय, नाय, मला झोपू दे आजून...”

“ऊठ, ऊठ साळंला जायला उशीर होतूया...”

“म्या आज साळंला जाणार नाय. रोज रोज काय ती शाळा... तो मास्तर मला लई मारतोय. नाय, आज म्या शाळेला जाणार नाय म्हणजे नाय...”

मायला ठणकावून सांगत दादू तोंडावर बेडशीट पांघरून,कॉटवर पत्र्याकडं तोंड करून झोपू लागला. माईचा राग अनावर झाला. माय चुलीवर भाकर टाकता टाकताच ताडकन उठली. आपल्या कपाळावरचा घाम मळक्या साडीनं पुसत दादूकडं आली,

“भाड्या ! शाळा नकू काय ? साळंत मास्तर मारतोय काय? मुडदा बसवला तुझा अन तुझ्या त्या मास्तरचा...”

असं तोंडानं बडबडत कोपऱ्यातली काटकी घेऊन दादूच्या अंगावर सपासप सपासप मारू लागली. अचानक झालेल्या या मारामुळं दादू ताडकन उठला. माय त्याच्या पायावर, उघड्या पोटावर, हातावर काटकीने मारतच होती. दादू कॉटवर उड्या मारत मारत मार खात ठणानं बोंबलत होता.

“माय मेलो ! म्या काय केलं?... मला कशापाई मारतीस?... नको मारू,नको मारू...मेलो, मेलो... “

बराच वेळ घरातला गोंधळ वाढत चालल्यानं शेजारच्या शेवंता म्हातारीनं कवाड ढकललं अन् घरात प्रवेश केला. घरात येताच तिनं बकुळाचा हात धरला,

“का लेकराला मारतीया सारखं? लहान हाये. जरा सबुरीनं घे. सारखं मारत जाऊ नये. अशांनं पोरं बिघडत्याती...”

“न्हाय न्हाय शेवंताकाकी... ह्यो मुडदा काय सुधारणार नाय. बापावानीच नालायक झालाय. साळंला नको म्हणतोया मुडदा”

असं म्हणत हातातली काटकी दादूच्या अंगावर टाकून देत,तिथंच जोर जोरानं गळा काढून माय रडू लागली.

“काय सांगू काकी! त्यो ह्याचा बाप निस्ता पी पी पीतूया.काम ना धंदा. चार चार पोरं काढून ठेवल्याती. निस्ता बसून खातोया. आता ही पोरं तर,जशी थोर होत आली तशी,लईच तरास द्यायल्याती बघा.माझ्या मागं काय तरास हाय रं देवा....”

आता शेवंता काकी बकुळाला समजावण्याच्या सुरात बोलू लागली,

“अगं बकुळा असंच असतंय बघ. ह्यो बाईचा जन्मच लयी वाईट असतोया बघ. दुसरी करत्याती अन् आपल्याला सारं निस्तरावं लागतंय बघ की गं”

दादू कॉटवर उघड्या अंगानं भेदरलेल्या नजरेने कावराबावरा होऊन हमसून हमसून रडत होता.त्याच्या हातापायावर,पोटावर काटकीचे चांगलेच व्रण उमटले होते.शेवंता काकीनं दादूला जवळ घेतलं कुरवाळलं तसं दादू आणखीनच जोरजोरानं रडू लागला.

“म्या आज साळंला जाणार न्हाय.त्यो मास्तर मला ढोरावानी मारतोया....”

दादूचं बोलणं अन् रडणं सुरूच होतं.

“बरं बरं रडू नको बाबा.आज शाळेला तुझ्याबरोबर मी माईला धाडून देते.बकुळाआज तू शाळेकडं जाऊन मास्तरची गाठ घे.एक सांगतेय बघ पोराला लईच मारलं बघ आज तू....”

शेवंताकाकीनं दादूच्या व्रणावर फळीवरल्या डबीतलं तेल लावलं. दादू थोडा शांत झाला. बकुळा चुलीकडं भाकरी टाकायला गेली. बकुळानं चुलीत लाकडं सरकवताच चुलीतला विस्तव चांगलंच पेटला, तशी शेवंताकाकी उठली आणि उघड्या कवाडातनं आपल्या घराकडं निघून गेली.

हिकडं दादू बाहेरच्या वाट्यावर आला. माईनं रंगाच्या बादलीत ऊन ऊन पाणी काढून ठेवलं होतं. त्यात टिपाडातलं विसणपाणी घातलं आणि दगडावर उभा राहिला. हातात मिसरी घेऊन कितीतरी वेळ दातावरून बोटं फिरवत होता. तेवढ्यात कितीतरी पोरं पोरी शाळेला स्वच्छ गणवेश घालून दप्तर घेऊन शाळेकडे निघाली होती. त्यातील काही पोरं दादूकडे पाहून हसत खिदळत होती. वरच्या अळीतला रामा दादूच्या घरावरून शाळेकडे निघाला. रामा हा दादूच्याच इयत्ता चौथीच्या वर्गातील एक हुशार विद्यार्थी होता. तो दादूचा मित्र होता. तो दादूबरोबर मधल्या सुट्टीत खेळायचा. दादूला आपल्याबरोबर जेवायला बसवायचा. आपल्या डब्यातली गोडपोळी, शिरा दादूला खायला द्यायचा. तो आता दादूचा एक चांगला मित्र झाला होता. तो शाळेत दादूला अभ्यासही शिकवायचा. रामाने दादूकडे पाहिले. तो दादूच्या घरासमोर थांबला दादूने रामाकडे पाहताच दादूला जरासे शरमल्यासारखे झाले रामा म्हणाला,

“दादू !अरे इतका उशीर...चल लवकर, आटप लवकर.आज शाळेत साहेब येणार आहेत.गुरुजींनी तुला घेऊन यायला सांगितले आहे.”

“रामा तू जा साळंकडं. म्या आज शाळेत येणार न्हाय.गुरुजी मला लईच मार देत्याती बघ....”

असं म्हणत दादूरामाकडे गुरुजींची तक्रार करू लागला.

“अरे दादू आपण हुशार व्हावे म्हणूनच आपल्याला

गुरुजी रागावतात ना... तू चल,चल लवकर..."

"नाय नाय तू जा...तुला माझ्यामुळं उगाच उशीर होईल. म्या काय आज शाळाकडं येत नसतो जा तू..."

दादूचा असा नकार कळताच

रामा," लवकरच येरे शाळेत... आज डब्यात मी तुझ्या आवडीचा शिरा आणलायं. मधल्या सुट्टी दोघेही खाऊ. आवर,आवर लवकर. चल..." असं म्हणत शाळेकडे निघून गेला. शिऱ्याचा वास दादूच्या नाकात चांगलाच घुमू लागला. पण, मास्तरचा मार आठवताच दादूचे शाळेकडे जायचे मन तयार होईनासे झाले.

दादूनं फुटक्या तांब्यात प्लॅस्टिकच्या रंगाच्या बादलीतलं पाणी घेतलं. दगडावर बसून गुळणा केला. दोन-चारदा दातावरून बोटं फिरवली. जिभेवरनं काडी घासली. डोळ्याचं चिपडं काढलं. आता अंगावरनं भडाभडा पाणी ओतून घ्यायला सुरुवात केली.

"आरं जरा अंग घास की मुडद्या..."

माईन असं म्हणताच, बादलीत शिल्लक राहिलेलं पाणी दादूनं अंगावरनं ओतलं.

दादूची अंघोळ होईपर्यंत माईनं भाकरी बडिवल्या. चुलीला सारवण केलं.घर झाडलं.भांडी घासून घेतली. आता कॉटवरल्या दोरीवर टाकलेला फाटका टावेल गडबडीनं ओढला अन् दादूचं अंग पुसण्यासाठी माय घराबाहेर गेली.

"आरं दादू ! पाठ तर कोरडीच हाये....लय लागलं काय रं तुला मगा..."

असं म्हणत दादूचे हातपाय,पोट, डोकं चांगलं घसघशीत पुसून घेतलं. दादूच्या व्रणावर डब्यातलं तेल चोळलं. आपणच मारलेल्या काटकीचे व्रण पाहून माईला गलबलून आलं. तिनं आपलं डोळे पदरानं पुसलं. कंगीनं दादूचा भांग पाडला.

"चल भाकर खाऊन घे, साळंला लईच उशीर झालायं बघ..."

साळा म्हणतात दादू पुन्हा रडू लागला.

"म्या आज साळंला जाणार नाय... मला साळा नको... मला मास्तर लईच मारतोय..." असं म्हणताच,

"तू भाकर खाऊन घे. माझ्या दादूला मारतोय काय ? बघतेच त्या मास्तराचं आता... चल आटप लवकर..." माय बोलली.

दादूनं माईच्या आज्ञेनुसार भाकर मिरचीचा भुरका खाल्ला. पाटी पिशवीत कोंबली. शाळेसाठी तयार झाला.माईनं कवाड लगबगीनं ओढलं. कडी वडली. दादूच्या तीनही बहिणी केंव्हाच हायस्कूलला निघून गेल्या होत्या.

थोरली राधा नववीच्या वर्गात, मधली सीता आठवीला तर,धाकटी पार्वती सातवीला शिकत होत्या. तीनही बहिणी हुशार होत्या. अभ्यासात तिघींचा पहिला नंबर होता. तीन मुलींवर वंशाला दिवा हवा म्हणून, हा दादूचा जन्म... दादू हे शेंडेफळ अंगाने किडमिडे अन् घरात लाडके असल्यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष करु लागले होते. इयत्ता चौथीच्या वर्गात कधीमधीच डोकावलेला दादू तसाच पहिलीपासून पुढे पुढे ढकलला गेला होता.

दादूच्या वडिलांना दारूचं, आणखी कसलं कसलं व्यसन.व्यसनासाठी आपली वडीलोपार्जित अर्धा एकर जमीन केव्हाच विकून टाकली होती. आता गावात त्याच्या नावे लाखभर रुपयाचं खाजगी सावकाराचं कर्ज असल्याचं गावातील अनेक लोक बोलत होते. गावात खाल्लल्या आळीत दोन पत्र्याच्या घरात तीन मुली, एक खंगत चाललेली म्हातारी,दादू आणि दादूचे आई-वडील असा संसार नांदत होता. संसाराची दुःखं, वेदना पचवत दिवस कंठत चालले होते. येणारा दिवस आणि दिवस ढकलत होते. कधी भाकरीला पीठ नसायचं,कधी भाजीला तेल नसायचं तर, कधी चुलीला जळण नसायचं. भावकीत नातलगात तोंड दाखवायची कुठं जागा उरली नव्हती. साऱ्या पाहुण्या-रावळ्यांनी दादूच्या घराला जणूकाही वाळीत टाकलेलं. कुठं लग्नकार्याला, कुठं देवाधर्माला जावं म्हणलं तर,अंगावर धड कापडं नाहीत. एसटीला पैका नाही.गावात नवऱ्यामुळं तर कुठं तोंड दाखवायला जागा उरली नव्हती. हायस्कूलला पोरी मात्र,पहिला नंबर काढत होत्या. एवढंच काय ते समाधान....पोरींच्या शिक्षणाचा सारा खर्च हायस्कूलचे शिक्षकच करत होते.

थोरली राधा नाकीडोळी नीटस. दोन वेण्या घालून शाळेत जायची. स्वच्छ गणवेश, टापटीपपणा यात सरस. इयत्ता पहिलीपासून वर्गातील पहिला नंबर तिने कधी सोडला नाही. शाळेतील सर्व शिक्षकांची ती लाडकी होती.वर्गातील मैत्रिणी नेहमीच तिचा हेवा करायच्या. तिने अनेक आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत शाळेला नंबर मिळवून दिले होते. राधा ज्या वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होत असे तिथे तिचा पहिला नंबर हा ठरलेलाच असायचा. त्यामुळे दुसरा नंबर कोणाचा व तिसरा नंबर कोणाचा यावरच चर्चा असायची.

सीता ही दादूची मधली बहीण होती.ती दादूचा खूप लाड करायची. दादूला भुईमुगाच्या शेंगा आणून दे, कुणाच्यातरी शेतातली मक्याची कणसं मागून आणून चुलीवर भाजून दे, उन्हाळ्यात बोरी झाडून बोरं खायला दे, अशी करायची. ती कमी बोलायची. वर्गात इयत्ता चौथीपासून ती अभ्यासात चमकू लागली. इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत तिचा केंद्रात पहिला नंबर आला आणि तेंव्हापासून ती एक हुशार विद्यार्थिनी म्हणून ओळखली जाऊ लागली. तिचा वर्गात आता

नियमित पहिला नंबर येत असल्यामुळे सर्वजण तिचे मित्र झाले. तिला चित्रकलेची खूपच आवड होती. ती रविवारी किंवा इतर सुट्टीच्या दिवशी तासानतास चित्रे काढत बसे. तिला निसर्गचित्रे खूप आवडायची. हुबेहूब चित्रे काढायचा तिचा हात कोणी धरू शकत नसे. हायस्कूलच्या दर्शनी भागात सीताची दोन चित्रे टांगलेली होती.येणारे जाणारे अनेक जण ती चित्रे पहात कितीतरी वेळ तिथे बसून राहत.

पार्वती ही दादूची धाकटी बहीण. ती इयत्ता पाचवीत आली आणि जी अभ्यासात रमली ती आजपर्यंत फक्त अभ्यास अभ्यास आणि अभ्यासच करून तिने शाळेत पहिला नंबर मिळवायला सुरुवात केली. पार्वती बोलकी असल्यामुळे तिच्या गावात, शाळेत,गल्लीत अनेक ओळखी झाल्या होत्या. ती अगदीच बिनधास्त मुलगी होती.प्रत्यक्ष मुख्याध्यापकांनाही ती जाऊन बोलत असे.यामुळे अनेक शिक्षक तिला टरकून असत. पार्वतीला खेळाची विशेष आवड होती. ती नियमित सकाळी धावण्याचा सराव करे. धावण्याच्या शर्यतीत तिने तालुका स्पर्धेत शाळेला पहिला नंबर मिळवून दिला होता.अशी पार्वती घरातील आजीबाईंची खूपच लाडकी झाली होती.आजी आणि पार्वती तासनतास गप्पात रंगायच्या.

दादूला घेऊन आता माय शाळेच्या आवारात पोचली. लांबूनच शाळेची कौलारू इमारत सुंदर दिसत होती.शाळेची प्रार्थना संपून सर्वत्र सामसूम झाले होते. वर्गात आता हजेरी उरकून शिक्षक अभ्यासाच्या वह्या तपासत होते. तेवढ्यात दादू आणि त्याची माय मैदान ओलांडून वर व्हरांड्यात आले. गुरुजी वर्गात शिकवत होते. दादू वर्गापुढे जाऊन उभारला.दादूला पाहताच गुरुजींचा चेहरा रागाने लालेलाल झाला.गुरुजी लांबूनच ओरडले,

"या...या दादासाहेब या... आपली काय सेवा करू ?..."

गुरुजींचे बोलणे ऐकताच विद्यार्थ्यांचा एकच गलका सुरु झाला. सर्व विद्यार्थी दाराकडे पाहू लागले. दारात दादू उभा होता. सर्वजण दादूकडे पाहून हसू लागले. दादू दारातच हिरमुसला.

"ये...ये मुर्खा... ये आत ये..."

गुरुजी गरजले.

दादू दारातच उभा. तो जागचा काही हालेना. एवढ्यात दादूची माय पुढे सरसावली. माईला पाहताच गुरुजी वरमले. कारण,दादूच्या मायीचा पट्टा एकदा चालू झाला की, थांबायचं नावंच काढत नसे. हे गुरुजींना चांगलेच ठाऊक होते.

"तुम्ही कशाला तसदी घेतली शाळेत यायची... दादूला धाडून द्यायचे ना..." गुरुजी म्हणाले.

"व्हय त्यालाच धाडत होते. मगर तुम्ही लय मारता असं दादू म्हणत होता. तवा सोक्षमोक्ष लावायला आम्हीच आलाव. काय कारण मास्तर तुमचं दादूच्या अंगाला हात लावायचं?... पुन्हा एकदा त्याला मारून तर बघा..."

अशा प्रकार दादूच्या माईनं गुरुजीला चांगला दम भरला. घरी व्रण उमटोस्तवर सपासप सपासप काटकीनं मारणारी माय खरी का? आताची माय खरी...याचा प्रकाशकाही दादूच्या बाळ डोक्यात पडंणा.

गुरुजींनी नाही होय करत प्रकरण थोडक्यात मिटवलं. नाही तर, आज काय गुरुजींची शाळा भरत आली होती म्हणायचं... दादू वर्गात सगळ्यात पुढे बसला. दादूची माय दादूची मुके घेऊन घराकडं परतली. गुरुजी फळ्यावर काही बाही लिहू लागले. मुले लिखाणात रमती न रमती तोच मधल्या सुट्टीचा टोल पडला. हुर्रे करत मुले वर्गाबाहेर पडली.

रामानं दादूला गाठलं. आपल्या शेजारी डबा खायला बसवलं. रामाच्या डब्यातील गोड शिरा खाताना दादूचे मन आनंदित झाले. डबा खाऊन दोघेही उठले. घसरगुंडी खेळू लागले. रामा पुढे अन दादू त्याच्या मागं घसरगुंडी वरील खेळात दंग झाले. बऱ्याच वेळानं टोल पडला. मुले वर्गाकडे पांगली. हळूहळू मैदानावर शांतता पसरली. मधल्या सुट्टीनंतर मुलांना ओळीने गुरुजींनी उजळणी पाढे विचारायला सुरुवात केली. सर्व मुले क्रमाक्रमाने उत्तरे देत होती. आता, दादूची पाळी आली.

"दादू ! चल उठ... पाढे म्हण...."

"मला पाढं येत न्हायतं."

"काल पाढे पाठ करायला सांगितले होते ना तुला... आज पुन्हा तू अभ्यास न करता शाळेत आलास... उठ आता ! तुला चांगलीच शिक्षा करतो."

असं म्हणत गुरुजींनी दादूच्या हातापायावर,पाठीवर छडीचे चांगले तडाखे मारायला सुरुवात केली. दादू ओरडू लागला, जोरजोराने रडू लागला.

"नको... नका मारू मला. मला साळा शिकायची नाही... मला पाढं पाठ करायचं न्हायतं. "

दादू रडत ओरडत खाली बसला. दादूच्या मित्राला म्हणजे रामाला खूप वाईट वाटले. दादू रडत होता पाणी मात्र रामाच्या डोळ्यातून वाहत होते. थोड्यावेळाने कसल्यातरी कामात गुरुजी गुंतले.वर्गात मुले गलका करू लागली.रामा आणि दादू गप्पा मारू लागले रामा विचारू लागला.

"दादू तू दररोज अभ्यास करून शाळेला का येत नाहीस? तू दररोज गुरुजींचा मार का खातोस?"

दादू सांगू लागला,"रामा !अरे मला अभ्यासच आवडत नाही बघ.काय कळतंच नाही बघ. पुस्तक उघडलं की डोस्कं निस्त गरगर फिरतयं बघ.कामच करत नाही."

"अरे ! तू मन लावून अभ्यास कर. रात्री तू पाढे का पाठ केले नाहीस?" रामा विचारू लागला.

"आरं रामा !रोज रात्री शाळा सुटली की आमच्या

घरी तमाशा सुरु होतंय बघ...” दादा सांगू लागला.

“तमाशा म्हणजे काय ? “रामाने विचारले.

“तमाशा म्हणजे राती बाप लय पिऊनच घरी येतो. माय रागावती.तवा तो अन माईचं भांडण लागतं. माय अन बाप एकमेकांना शिव्या देऊ लागतात. कवा बवा बाप मायीला बडीवतो. समद्या बहिणी बाप पिऊन येताच शांताआत्याकडं अभ्यासाला निघून जातात. तिकडंच जेवतात. तिकडंच निजतात. कवा बवा दोघं मिळून मला बी बडीवतात. बाहेर गल्ली गोळा होती बघ. शिव्या देऊन बेजार झाला की बाप मग निजतो.”

दादू रडत रडत सांगत होता.

“मग लईच अवघड आहे गड्या “रामा म्हणाला.

“घरात माय बडीवती आणि हितं मास्तर. म्हणून मला शाळा नको वाटती. मी उद्यापासून शाळेत येणार नाही.मला शाळा नको...” दादू डोळे पुसत पुसत म्हणाला.

हे सर्व ऐकून दादूच्या मित्राला म्हणजेच रामाला फार वाईट वाटले. पण तोही पडला लहानच. तो दादूला कशी काय मदत करणार ?थोड्यावेळाने शाळा सुटली. रामा दादूला त्याच्या घरापर्यंत सोडायला आला.दादूच्याबरोबर रामाला पाहताच माय मनातून जराशी घाबरली.

“रामा !असं दादूबरोबर अंगाला अंग लावून आमच्या गल्लीकडे येणं बरं नाही.” माय म्हणाली.

“त्याला काय होतंय? दादू माझा मैतर आहे.आम्ही दोघं मिळून एका डब्यातच जेवतो.”राम मायीला म्हणाला.

“नकू नकू रामा! नको वागू असं लोकांना कळलं तर...”

“तर...तर काय होईल... दादू माझा दोस्त आहे”.

“तसं नाही रामा !तुम्ही वरल्या आळीतली माणसं. आम्ही खालल्ल्या आळीतली गावाबाहेरची माणसं. आमच्याशी तुमची दोस्ती होनं बरं नाही. तुमच्या माय बापाला हे मान्य होणार नाही. आम्ही लहान हाव. तुम्ही लय मोठं हाव. तुम्ही आमच्या गल्लीला यापुढे येत जाऊ नकासा.आमच्या दादूची आन हाय बघा तुम्हाला.”

दादूची आन घातल्यावर मात्र रामाचा नाईलाज झाला. रामा काहीही न बोलता खाली मान घालून निघून गेला.

दुसऱ्या दिवसापासून दादूच्या मायला पाटलाच्या मळ्यात रोजंदारीवर काम भेटलं. मळा दूर होता. माय सकाळी सातला निघायची. रात्री उरलेला शिळा भाकर तुकडा चिरगुटात बांधून घेऊन जायची. तिघी बहिणी घरकाम उरकायच्या.राधा चुलीवर भाकरी करायची. सीता धुनी भांडी करायची तर, पार्वती घर लोटून घ्यायची.तिघी आपापलं आवरुन भाकरी खाऊन हायस्कूल गाठायच्या. सध्या म्हातारी थोरल्याकडं राहायला गेल्यामुळे तिचं तेवढं करायचं नव्हतं. दादूला आवरून शाळेला जा म्हणून सांगायच्या. दादू व्हय व्हय करायचा. बहिणी हायस्कूलला गेल्या की, गल्लीतल्या उनाड पोरांबरोबर तिथेच कुया खेळायचा,गोट्या खेळायचा, चकारी खेळायचा असं करु लागला. दादूला आता शाळाच नकोशी वाटू लागली. हळूहळू तो दिवसभर उनाड पोरात राहून उनाड बनवू लागला. असाच महिना निघून गेला.

अचानक भल्या सकाळ सकाळी रामा दादूच्या दारात येऊन उभारला. रामाला पाहताच दादूच्या बहिणींनी शेजारच्या घरून एक खुर्ची दारात आणून ठेवली. रामा खुर्चीवर बसला. दादू अजून झोपेतून उठला नव्हता. रामा बहिणींना सांगू लागला,

“दादूला काय झालंय? दादू मागच्या महिन्यात शाळेला का आला नाही? गुरुजींनी त्याचं नाव हजेरीपटावरुन कालच कमी केला आहे.”

दादूचे नाव शाळेतून कमी केल्याचे ऐकून दादूच्या तिघी बहिणींना खूपच वाईट वाटले. मायही हे ऐकून कावरीबावरी झाली.

“रामा आता कसं करायचं रं पुढं “माय विचारु लागली.

“आता तीन महिने तरी नाव हजेरीपटावर घेता येणार नाही,असं हेडमास्तर गुरुजींना कालच सांगत होते. असं करा तुम्ही एकदा हेडमास्तरांना शाळेत येऊन भेटा.” रामा एवढे सांगून उठला अन् झोपलेल्या दादूकडे बघत बघतच निघून गेला.

थोड्यावेळाने दादू उठला.त्याला रामा येऊन गेल्याचे कळले पण, रामाची आणि त्याची भेट न झाल्यामुळे जरा वाईट वाटले. बहिणींनी शाळेतून नाव काढून टाकल्याचा निरोप दादूला सांगितला. हे ऐकून दादूचा चेहरा खुलला.आता आपला गुरुजींचा मार चुकणार या विचाराने तो मनातून आनंदला. दादूचा आजचा दिवस मोठाच आनंदात गेला. पुढे एक दोनदा दादूची माय हेडमास्तरांना जाऊन भेटली. मास्तराने दादूला शाळेत घेऊन येण्यास सांगितले. दादू आज जाऊ उद्या जाऊ असं करता करता कित्येक दिवस शाळेकडे फिरकलाच नाही.

अशातच एके दिवशी दादूचा बाप दारु पिऊन जो अंथरुणावर पडला तो सकाळी उठलाच नाही. गल्लीनं पैसा गोळा करुन त्याचा अंत्यविधी पार पाडला. पुढे काही दिवस गेले तसे घरात पैशाची चणचण भासू लागली. तेंव्हा राधा गावातील एका डॉक्टरांच्या दवाखान्यात केसपेपर करायला जाऊ लागली. सीता पाटलांच्या घरी झाडलोट करायला जाऊ लागली. पार्वती गुरुजींच्या घरी धुणीभांडी करु लागली.तिकडे रामा पुढील शिक्षणासाठी तालुक्याला निघून गेला.

साधारण पुढे आठदहा वर्षानंतरचा काळ मध्ये गेला. एके दिवशी तालुक्याच्या ठिकाणी रामा आपल्या मित्रांबरोबर एका भेळच्या गाड्याकडं भेळ खाण्यासाठी गेला. गप्पा आणि हास्य विनोदांना ऊत आला होता. सर्वांनी भेळची ऑर्डर दिली आणि भेळच्या प्रतीक्षेत सगळेजण पुन्हा गप्पात रंगले.रामाचे लक्ष मात्र गाड्याच्या पाठीमागे असलेल्या एका व्यक्तीकडे गेले. तो

व्यक्ती तिथं डिश धूत बसला होता. रामाने त्याच्याकडे नीट निरखून पाहिले. रामाची आणि त्याची नजरा नजर झाली. रामा कसल्यातरी अनामिक हूरहरीने उठला. त्या पोराच्या जवळ गेला आणि दोघांनी एकमेकांना मिठीत घेतले.हातात हात घेऊन बराच वेळ ते गप्पात रंगले. हा भेटणारा व्यक्ती म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून एकेकाळचा रामाचा मित्र दादूच होता. रामा आता शिकूनसवरुन सरकारी नोकरीत अधिकारी पदावर काम करीत होता तर, दादू शहरातील एका भेळच्या गाड्यावर कामाला होता. दोघांना असे गप्पा मारताना पाहून रामाचे मित्र मात्र अचंबित झाले.योग्य वेळी योग्य शिक्षण, योग्य शैक्षणिक वातावरणाचेच हे दोघे म्हणजे मूर्तिमंत उदाहरण नाही का ?.....

**मयुरेश अरुण कुलकर्णी.**
**सोलापूर**

# अर्धांगिनी



भारतीय संस्कृतीत
पत्नी अर्धांगिनी खरी
विवाहाने मिळे हक्क
आनंदाने येई घरी..||१||

जन्मोजन्मी स्नेहबंध
त्यामागील सुप्त भाव
साथ पतीची सदैव
सोसणार सारे घाव..||२||

पाया नात्याचा भक्कम
रेशमाचे जणू बंध
तिच्या रुपाने घरात
दरवळे हा सुगंध..||३||

करी संस्कार पेरणी
परिवारां लावी लळा
घरां देते घरपण
फुले आनंदाचा मळा..||४||

पाश्चिमात्य संस्कृतीने
बदलाची आली पाळी
कुंकू जावून टिकली
आली नारीच्या कपाळी..||५||

स्वावलंबी अर्धांगिनी
पडे पुरुषाला भारी
कर्तृत्वाने पुढारली
घेई गगन भरारी..||६||

**अरविंद कुळकर्णी**
**मलकापूर**
**मो.9822642294**

# ईना मिना डिका



ईना मिना डिका
गाणे शिका
डान्स शिका
ईना मिना डिका
जेवतांना बोलू नका
आपसात भांडू नका
ईना मिना डिका
पाण्यावर कागदी नौका
खेळा खेळा अन् फेका
ईना मिना डिका
दात नको किडका
गणवेष असावा नेटका
ईना मिना डिका
आधि सुधारा चूका
दवडू नका मोका
ईना मिना डिका
उन्हात फिरू नका
रंग होईल फिका
ईना मिना डिका
मोबाईल टिव्ही जास्त बघू नका
चांगल्या गोष्टी दूर सारु नका
ईना मिना डिका
अभ्यास करा पक्का
नको ढब्बूचा शिक्का
ईना मिना डिका..

**अरुणभाऊ धर्माळे**
**अमरावती**
**मो.9403623248**

# दिवाळी



आली दिवाळी दिवाळी
आनंदाला रे उधाण
मोठ्या माणसाने मान
लहान्याला द्यावं ज्ञान ।1।

आली दिवाळी दिवाळी
अंधकाराचा तो नाश
कारा कष्टही जोमान
होऊ नकाच हताशा ।2।

आली दिवाळी दिवाळी
बहिण भावाला ओवाळी
रक्ता प्रेमाच्या नात्यात
राहो सदा अशीच गोडी ।3।

आली दिवाळी दिवाळी
वर्षाचा रे सण मोठा
झटकून टाकू भेदभाव
नाही आनंदाला तोटा ।4।

आली दिवाळी दिवाळी
दीप लावू या ज्ञानाचे
जाळू अहंकारी तेल
मोती होतील घामाचे ।5।

आली दिवाळी दिवाळी
तोरण लावू या समतेचे
काम, क्रोध, मत्सर टाकून
सजवू ताट फराळाचे ।6।

**डॉ.सौ.निर्मला भामोदे**
**अकोला**
**मो.9518953095**

# अनोखा डाव



अंजली आज दडपणाखालीच होती. नुकतेच तिचे विवेकबरोबर लग्न ठरले होते. साखरपुड्याची तारीख पण दोन्ही कडच्या लोकांनी नक्की केली होती. आज प्रथमच ती त्याला भेटायला एका हॉटेलमध्ये जाणार होती. दोघांनाही फोनवर किती वाजता भेटायचं ते ठरविले होते. सकाळी उठल्यापासून तीला एक विचीत्र हुरहुर लागली होती. आणि त्याला कारण पण होते. त्यांचा जेव्हा बघायचा कार्यक्रम झाला तेव्हा विवेकने तीच्याकडे नीट पाहिले आहे की नाही ह्याबद्दल तीला शंका होती कारण जेव्हा जेव्हा तीने त्याच्याकडे पाहिले तेव्हा तेव्हा तो एकतर खाली तरी बघत होता, नाहीतर घराचे निरीक्षण करत होता.अंजली एक मध्यमवर्गीय घरातील एकुलती एक मुलगी होती. दिसायला देखणी नसली तरी निमगोरी शेलाट्या बांध्याची, व टापटीप रहाण्याची सवय असल्याने चारचौघीत उठून दिसायची. केस खूप लांब नसले तरी चांगले घनदाट होते. उंची ५ फुट चार इंच होती. विवेकला बघितलयापासुन तो तीच्या मनात तो भरला होता. गोरापान,सरळ नाकाचा, कुरळ्या केसांचा, आणि मोठ्या डोळ्यांचा विवेक तीला रामासारखा वाटत होता. तो तीला पसंत करेल कि नाही अशी तीला शंका वाटत होती. पण पहिल्या बैठकीतच त्याने होकार दिला. तीला खुप आनंद झाला होता. डेंटिस्ट असल्यामुळे सकाळ आणि संध्याकाळ तीला क्लिनिक वर जायला लागायचे. आज संध्याकाळी तीने ते बंद ठेवले होते.

विवेकने सांगितलेले हॉटेल जरा गावाच्या बाहेरच होते. अंजली तिथे पोहचली आणि पाठोपाठ विवेक पण आलाच. त्याने बुक केलेल्या कोपरयातील एका टेबलावर ते दोघे बसले. अंजली काही बोलणार तेवढ्यात त्यानें हाताने तीला थांबवले व दोन काफीची order दिली. तुम्हाला आज संध्याकाळी क्लिनिक मधे नाही जायचे न? त्याने विचारले. नाही आज सुट्टी घेतली आहे. आपण प्रथमच भेटणार होतो म्हणून. अंजली थोडी नर्व्हस होत म्हणाली. ह्या आधी कधी असा कार्यक्रम झाला होता का? ह्या आधी तुमच्या आयुष्यात कुणी होते का? त्याने विचारले. नाही तसा विचारच केला नाही. शिक्षणाला जास्त महत्व दिले होते त्यामुळे डिग्री मिळाल्याशिवाय आणि क्लिनिक उघडलयाशिवाय लग्नाचा विचारच करायचा नाही असे ठरविले होते. अंजली प्रांजळपणे बोलली. मग तीने पण विचारले तुमच्या आयुष्यात कोण होती का? तुमच्या व्यक्तीमत्वाकडे बघता नक्कीच तुमच्या मागे मुली असणार. तिने थोडेसे हसुन विचारले.

सांगतो न, आज आपण एकमेकांशी मोकळेपणाने बोलण्यासाठी भेटलो आहोत. आणि मग बराच वेळ दोघे बोलत बसले. निघताना त्याने तीचे हात हातात घेऊन तीचे आभार मानले. आणि म्हणाला आज मला प्रथमच एक चांगली मैत्रीण भेटली. ही मैत्री कायम राहील. आणि दोघेही आपापल्या घरी जायला निघाले.

इकडे अंजलीच्या घरांत उत्साहाचे वातावरण होते. एकदम देखणा जावई भेटला म्हणून अंजलीचे आई बाबा खुशीत होते. खरे तर त्यांना डेंटिस्ट मुलगा अंजलीसाठी हवा होता. पण तसा सापडला नाही. पण हा मुलगा चांगला भेटला. अंजली आज पहिल्यांदाच विवेकला भेटणार होती. त्यामुळे दोघेही तीची वाट पहात होती. संध्यकाळचे आठ वाजुन गेले होते. जवळ जवळ तीन तास झाले होते. शेवटी अंजली आली. तिच्या चेहऱ्यावर नेहमीप्रमाणे हास्य नव्हते. का ग काय झाले,? विवेकराव बरे वाटतात न? बोलायला वगैरे? आईने विचारले. अग थांब जरा तीला जरा बसु देत तरी. बाबा म्हणाले. हो आई, इतका सज्जन माणूस मी पाहिला नव्हता. अंजली म्हणाली. एवढ्या मोठ्या पोस्टवर कंपनीत नोकरी करतात पण विचार अगदी संस्कारित आहेत. आमची छान मैत्री झाली. आणि हो साखरपुडा ठरलेल्या तारखेला नाही होणार आम्हाला दोघांनाही विचार करायला थोडा वेळ पाहिजे आहे. शिवाय आपण ठरवलेल्या तारखेला विवेकचा परदेशात कसलातरी महत्वाचा सेमिनार आहे. बाबा त्या तारखेला हालचे बुकिंग केले असेल तर केन्सल करा.

उद्या विवेकच्या आईने पण बोलवले आहे. क्लिनिक मधुन येता येताच तिकडे जाऊन येते.

आणि मग अंजली एक दिवसाआड विवेककडे जाऊन येऊ लागली. सुशिला बाई, विवेकची आई ती पण खुप खुश होत.अंजली तीला आवडली होती. विवेकने जातीबाहेरची सुन केली नाही, आपले म्हणणे ऐकले हे त्यांना आवडले होते. विवेक पण खुश दिसत होता.अंजली अलीकडे वरचेवर विवेककडे जाऊन येऊ लागली होती. सुशिला बाईना अंजली आली कि खुप आनंद व्हायचा. ती आली कि सासुबाईंची, सासरच्यांची विचारपुस करायची. आणि विवेकच्या रुममध्ये जाऊन बसायची.पण कधी किचनमधे तीने कधी डोकावून देखील पाहिले नाही, एवढेच नाही तर चहा प्यायला कि राहीलेली कप बशी पण उचलून ठेवत नसे. ह्याची सुशिला बाईंना खंत वाटायची.

एकदा बोलता बोलता त्या विवेकला म्हणाल्या, विवेक

मला नाही वाटत अंजलीला मला मदत करायला वेळ मिळेल. एखादी बाई शोधायला लागेल. माझ्याच्याने आता हे एवढे काम होत नाही. गुडघे फार दुखतात. आई तुला मी आधीपासून सांगतं होतो, एखादी बाई ठेव म्हणून. वाढल न दुखणे ? अरे मी सुनेची वाट बघत होते. म्हटले सुनबाई मदत करेल. पण अंजलीला काही काम येत असेल असे वाटत नाही. सुशिला बाई म्हणाल्या. अग हल्लीच्या मुली आहेत त्या, करीयर महत्वाचे. एवढी शिकली आहे. तीला वेळ तरी मिळाला असेल का स्वयंपाक शिकायला? विवेकचे बाबा विनायक राव बोलले.

त्या नंतर ४/५ दिवसांनी अंजली एका मुलीला घेऊन आली. मुलगी निमगोरी, थोडी ठेंगणी,पण कमालीचा गोडवा होता चेहर्यावर. आणि केस तर एवढे लांब होते कि सुशिला बाई बघतच राहील्या." अग कोण आहे ही? आणि कशासाठी आली आहे? "अहो, माझी मैत्रीण आहे ही लहानपणापासूनची, सुमन बस ग.आई, जरा आत येता का? तीने सुशिला बाईंना आतमध्ये बोलावून घेतले.

अहो,हिची घरची परिस्थिती बेताची असल्याने तीला कामाची गरज आहे. आपल्याला तुमच्या मदतीला एका मुलीची गरज आहे असे विवेकने मला सांगितले. तशी हि शिकलेली आहे. इथल्या को आपरेटिवह बेंकेत नोकरीला आहे. पण त्याठिकाणी किती कमी पगार असतो तुम्हाला माहिती आहेच. घरात आजारी वडील, आई, आणि अजुन एक भाऊ आणि बहीण आहेत. दोघेही शिकत आहेत. हल्ली शिक्षणासाठी किती पैसे लागतात ते माहीत नाही का? तुम्हाला मदत करण्यासाठी हिला आणले आहे. हि सकाळी बेंकेतुन येथेच येईल.सगळी कामे करेल. फक्त हिला पगार हजार रुपयांपर्यंत तरी द्या तेवढीच तीला मदत होईल. अंजली म्हणाली. सुशिलाबाई म्हणाल्या अगं ते सर्व ठिक आहे. पण हिला काम काय काय द्यायची? म्हणजे ? तुम्हाला जी कामे होत नाहीत ती सगळी तीला सांगायची. अंजली म्हणाली. हो आई, अजुन एक ती आपल्या जातीची नाही आहे. तुमच्या जेवणाच्या पद्धती तीला सांगत जा. अग जातीच कोण बघतय? आपल्या कामवाल्या काय आपल्या जातीच्या थोड्याच असतात? इती सुशिलाबाई." आई, हि कामवाली नाही माझी मैत्रीण आहे.तीला आपल्या घरातील सभासद म्हणून वागवायचे आहे. "अंजली बोलली.

असाच महिना गेला. सुमन आता त्या घरात चांगली रुळली होती. सुशिला बाईंच्या अंजली विषयीच्या तक्रारी कमी झाल्या होत्या. सुमन ने त्यांना चांगलाच लळा लावला होता. त्यांचे एकही काम तीच्या शिवाय होत नव्हते.

एकदा अंजली जेवणासाठी त्यांच्या घरी गेली होती. सर्वजण एकदमच जेवायला बसले. सुमनने केलेल्या जेवणाची सर्वजण तोंडभरुन स्तुती करीत होते. विशेषतः विवेक. सर्वजण जेवायला बसले होते आणि सुमन गरम गरम पोळ्या करुन वाढत होती. अंजली म्हणाली, "विवेक सुमन स्वतः न जेवता गरम पोळ्या करुन वाढते आहे, तशी अपेक्षा माझ्याकडुन करु नकोस. आमच्याकडे सर्व एकत्रितपणे बसतात". "तरी मला वाटलेच विवेक एवढी स्तुती करतोय सुमनची आणि अंजली शांत बसली आहे म्हणजे आश्चर्य आहे. आमच्याकडे आमची आई हि भाजी छान करायची असे म्हणणे पण गुन्हा आहे". विनायक राव विवेकचे वडील बोलले. सुशिला बाई ठसक्यात बोलल्या," पाहिलेस न अंजली, नवर्याला आणि मुलाला असे आपल्या हाताच्या मुठीत ठेवायचे असते". "अजिबात नाही, मला विवेकने असे mamma's boy बनलेले आवडणार नाही. तो आता मोठा आहे, एक responsible अधिकारी म्हणून काम करतो. त्याला पण स्वतंत्र विचार आहेत.. तो आपल्या मनाप्रमाणे वागु शकतो." अंजली थोडी तिरीमिरीत बोलली. अरे, सर्व तीच्याकडे बघत राहीले." अग काय झाले काय?" विवेकने विचारले.

सांगते, ती एक मोठी गोष्ट आहे. माझ्या काकांची, मी लहान होते तेव्हा.मला माझ्या संजुकाकाचा खुप लळा होता. तो कालेजमधे प्रोफेसर म्हणून काम करायचा. एम.ए.बीएड केले होते. त्याच कालेजातील एक विद्यार्थिनी त्याच्या प्रेमात पडली. ती मराठा आणि आम्ही ब्राम्हण, त्यावेळी ही जातपातची विषारी वेल फारच मोठ्या प्रमाणात पसरलेली होती. ती एकसारखी काकांच्या वर्गात काही न काही निमित्ताने यायची. काकाला पण हे सर्व समजत होते. तो पण नकळत तीच्या प्रेमात पडला. ब्राम्हणांना जसा जातीचा गर्व तसाच मराठ्यांना पण त्यांच्या बिरादारीचा गुरूर असतो. सर्व कालेजमधे चर्चा सुरु झाली. बघता बघता घरापर्यंत येऊन पोहोचली. आमच्या घरात तर आजोबांनी फारच आकांडतांडव केले. माझ्या काकाला त्यांनी काठीने मारले होते. तिकडे मुलीच्या घरी तर तीच्या वडिलांनी तीला दुसरया गावात नेऊन एका शेतकरयाशी तीचे लग्न लावून दिले. तीच्या मागचा ससेमीरा सुटला. पण आमच्या काकाला कालेजचया ट्रस्टी लोकांनी एकमताने असा मवाली, मुलींच्या मागे लागणारा म्हणून नोकरीवरुन काढून टाकले. तो जिथे जाईल तीथे लोकांनी त्याची टर उडविली. फारच depress झाला तो. मला सांगा काय दोष होता त्याचा? एका मुलीवर मनापासून प्रेम केले हा? आणि जातपात कसली मानता हो? ह्या जाती काय देवाने निर्माण केल्या आहेत का? तशा असत्या तर पक्षयांमधे का नाहीत? प्राण्यांमधे का नाहीत? अंजली जाम चिडली होती. माझ्या शिकलेल्या तरुण काकाला आणि सर्व कुटुंबीयांचे गावकऱ्यांनी जीणे हराम करुन टाकले.शेवटी माझा काकाला गाव सोडुन जावे लागले. दुसरया ठिकाणीही आधीच्या बदनामी मुळे नोकरी मिळणे कठीण झाले. शेवटी त्याने स्वतःला गळफास लावून घेतला. आणि त्याने गळफास लावून घेतला म्हणून त्या मुलीने तीच्या सासरी स्वतःला जाळून घेतले. काय मिळाले लोकांना

जातीभेदाच्या ह्या भिंती बांधून? आई, तुम्हाला तरी पटते का जातीभेद मानणे?

आपल्या सज्ञान असलेल्या मुलांना त्यांच्या मनाविरुद्ध वागायला भाग पाडुन ह्या दोघांचा बळी घेतला त्यांचाच आई वडिलांनी. आणि मनाविरुध्द दुसरया मुलीशी किंवा मुलाशी लग्न लावून अजुन दोन माणसांच्या आयुष्याची वाताहत लावली जाते. अरे आपण ज्या मुलीवर प्रेम करतो, तीच्या बरोबर आयुष्य काढायची स्वप्न पाहातो तीला डावलून दुसर्या मुलीच्या गळ्यात जबरदस्तीने मंगळसूत्र बांधणे म्हणजे एकाच घावात दोन मुलींचे आणि स्वतःचे आयुष्य पणाला लावणयासारखे आहे. मी तुम्हाला सांगते आई असे जर माझ्या बाबतीत झाले तर मी त्या आई बाबांविरुदध पोलीसात तक्रार करीन सांगुन ठेवते. मग नंतर मला दोष देऊ नका. असे म्हणत जोरात हसली. सुशिला बाईंचे आणि विनायक रावांचे चेहरे बघुन ती जोरात हसत म्हणाली, माफ करा आई बाबा, मी तुमची मजा केली. पण मला माझ्या काकांच्या आयुष्यात जे घडले त्याची आठवण झाली कि असाच अडाणी आई वडिलांचा राग येतो.

विवेक सर्व खाली मान घालून ऐकत होता. आई बाबा तो काही बोलेल कि काय अशा भीतीने त्याच्याकडे पहात होते. तो झटकन उठला आणि आपल्या खोलीत जाऊन त्याने दार लावून घेतले. अंजली चकित होऊन त्यांच्याकडे पहात बोलली “आई बाबा आता ह्याला काय झाले? ते दोघे ही जाम अस्वस्थ वाटत होते.

अंजली आणि सुमन एकमेकींकडे बघत होत्या आणि विवेकच्या आई वडिलांचे चेहरे बघत होत्या. सुशिला बाईंना आता रहावले नाही त्या धावत विवेकच्या खोलीकडे धावल्या. “विवेक दार उघडं बाबा, दार उघडं. आमचे चुकले. बराच वेळ ते दोघंही दार ठोठवत राहीले.” पण विवेकने काही उघडले नाही.

अंजली त्यांना म्हणाली,” आई बाबा काय झाले आहे विवेकला? तो दार का बंद करून बसला आहे?” अंजली सुमन तुम्ही आता काहीतरी करा. त्याला दार उघडायला साृगा. “सुशिला बाई आता जाम रडकुंडीला आल्या होत्या. विनायक राव देखील घाबरलयासारखे वाटत होते.

अहो पण झाले आहे काय? अंजलीने जोरात विचारले.

“अंजली मी सांगतो, विनायक राव घुटमळत म्हणाले, विवेकचे एका जातीबाहेरच्या मुलीवर कालेजपासुन प्रेम आहे. पण त्या मुलीवर बरीच जबाबदारी होती आणि शिवाय जात जुळत नव्हती म्हणून आम्ही नाही म्हटलं तेव्हापासून तो खूप नाराज आहे”. पण हिने जीव द्यायची धमकी दिली म्हणून तो तुला बघायला तयार झाला. पण आता आमचे डोळे उघडले आहेत. विनायक राव बोलले. “हो, आम्ही त्याच्या मनाविरुद्ध नाही वागणार,” सुशिला बाई जोरात रडत बोलल्या. पण त्याला खोलीचे दार उघडायला सांगा.

“म्हणजे तुम्ही मला फसवणार होतात?. अंजली जोरात ओरडली.” नाही नाही पोरी, आता आम्ही तुला सर्व सांगितले आहे. आम्हाला फक्त आमचा मुलगा सुखरूप हवा आहे.” सुशिला बाई हंबरडा फोडत बोलल्या. आम्ही त्यांचे लग्न त्याच मुलीशी लावुन देऊ, जी त्याला आवडते.

“खरच न आई? अंजलीने विचारले. मग त्याला तीच मुलगी आवडते जी तुम्हाला आवडते. काय कोण आहे ती? दोघांनीही आश्चर्याने विचारले. “ही काय तुमच्या समोर उभी आहे”. कोण सुमन? “हो तीच त्याला आवडते. जा सुमनबाई, तुमच्या अहोना घेऊन या.” सुमनने दाराजवळ जाऊन विवेकला हाक मारली. आणि विवेक दार उघडुन बाहेर आला.

अंजलीने त्यांना सांगितले कि विवेकने हॉटेलमध्ये तीला सर्व सांगितले होते. आणि तीने त्याला मदत करायची कबुली दिली. तुमचे परजातीविषयीचे जे गैरसमज आहेत ते जावे म्हणून हे सर्व नाटक. तेवढ्यात विवेक आणि सुमन हातात हात घालून हसत हसत बाहेर आले.

अच्छा म्हणजे हा अनोखा डाव तुम्ही आमच्यासाठी केला होता तर! विनायक राव बोलले आणि सर्वजण जोरात हसले.

चला, मी जाऊ आता? अंजलीने विचारले. छे छे विवेक बोलला आता प्रत्येक राखी पौर्णिमेला हा भाऊ तुझ्याकडे येणार आणि भाऊबीज येथे होणार. एक चांगला कुणाच्या आधीच प्रेमात न पडलेला डेंटिस्ट मुलगा शोधायचे काम आता माझे.

हो आणि लग्नाच्या तयारीसाठी आम्हाला आमची एक गोड मुलगी मदतीला हवी आहे. सुशिला बाई बोलल्या. सुमनने लाजलेलया आणि अश्रुंनी भरलेल्या डोळ्यांनी अंजलीकडे पहात अंजलीला घट्ट मिठी मारली.

**अनुराधा पोतनीस**
**मो.८४३३९३४६८६**

# गृहलक्ष्मी



ऋतू सारेच तुझ्यात
माझ्यासाठी ग असते
तुच लक्षीमीच रूप
घर देऊळ दिसते

घरासाठी राबताना
कधी श्वासही कोंडतो
नाही विचार करत
रोज तुझ्याशी भांडतो

सारा प्रंपचाचा गाडा
मीही थोडा वाटेकरी
तुला दुखाची किनार
मीच सुखी मानकरी

घरी येतात पाहूणे
सारे सांभाळुन घेते
बोजा कामाचा कितीही
ऊर्जा नव्याने मिळते

तु ग थकतेस जेव्हा
नाही सागंत कुणाला
शब्द गोड कानी यावा
तुझ्या वाटते मनाला

तुझी जिंदगी अबाद
तुच कर्माची कहाणी
माझ्यासाठीच तुला ग
पाठवलया देवानी

सखे लिहुन टाकुया
सात जन्माची कहाणी
दान इश्वराने द्यावे
व्हावी आयुष्याची गाणी

**बाळासाहेब गिरी**
**नाशिक**
**मो.9673189278**



# जगू आनंदी



एक तरी आनंदाचं झाड
असावं आयुष्याच्या अंगणी
एक हात असावा प्रेमाचा
पुसण्या डोळ्यातलं पाणी

कुणाचा तरी खांदा असावा
थोडे दुःखाश्रू ढाळण्यासाठी
अन् मायेची कूस असावी
निर्धास्तपणे निजण्यासाठी

दुःखाच्या क्रूर भोवऱ्यात
असावा एक सुखाचा किनारा
अन् थंडगार सावली असावी
सुसह्य करण्या ग्रीष्माचा मारा

वणव्यात करपलेल्या रानात
वसंताची नवपालवी फुटावी
दुःखाच्या ढीगभर राखेतून
आनंदपक्ष्याने भरारी घ्यावी

नियतीच्या कठोर आघातांवर
स्वानंदाची घालावी फुंकर
मग रात्रीच्या काळ्या गर्भातून
प्रसवेल उद्या आशेचा दिनकर

**डॉ. राजेश जोशी**
**सातारा.**
**मो.९०२१५६७८४१**

# थांब सूनबाई..



कुडपण इतिहास जपणारं गाव, खरंतर रस्ता छान होता पण अनोळखी होता,जंगल होतं.. अगदी घनदाट जंगल होतं पण आज त्या समाधी पाशी जाणं गरजेचं होतं कदाचित लोकांना माहिती असेल की नाही माहीत नाही पण अतंत्य देखणं असं ते सुभेदारांचं गाव होतं. त्या गावाला भेट देण्यासाठी ती निघाली होती. निसर्गरम्य असा परिसर, हिरव्यागार झाडानी सजलेले डोंगर माथे, डोंगराच्या कडे कपारीतून झुळझुळणारे झरे एकावर एक कुरघोडी करणाऱ्या सह्याद्रीच्या डोंगररांगा, इतके विलोभनीय दृष्य होतं की पाच मिनिट थांबत तिनं ते सगळं कॅमेरा मध्ये बंदिस्त केलं..

एक वेगळाच आनंद जाणवत होता, नागमोडी वळणं घेत गाडी पुढे पुढे चालली होती एखादा चढ आला की अतिशय कौशल्याने ती गाडी चालवत होती,तसा तिने सराव केला होता कारण रायगडला जाताना जे दोन टर्न लागतात तिथून जाण्याचा सराव तिने बरेच वेळा केला होता आणि हेच कौशल्य असतं, साध्या सरळ रस्त्यावर गाडी चालवण्यात मजा नाही पण नागमोडी वळण घेत आणि घाटमाथ्यावरती गाडी चालवता आली पाहिजे हे स्वप्न होतं आणि अर्थात सगळी स्वप्न वास्तवात येतात असं नाही पण हे स्वप्न मात्र तिने वास्तवात आणलं होतं, असतात काही गोष्टी मनाच्या कोपऱ्यात अशा दडून बसलेल्या आणि मग कधीतरी त्या उसळी मारून अचानक वर येतात तसेच झालं होतं तिचं, अगदी लहानपणापासून असणारी तिची सुप्त इच्छा पूर्ण झाली होती आणि मग काय विचारूच नका गाडी घेऊन जिथे जिथे जाता येईल तिथे तिथे जात होती आजही ती तशीच चालली होती एका शौर्य स्थळाला भेट द्यायला कारणही तसेच होतं गाव 28 किलोमीटरवर असलं तरी नागमोडी वळणं,एका बाजूला खोल दरी,एका बाजूला पहाड कधी कधी दोन्ही बाजूला खोल दरी आणि त्यामधून जाणारा रस्ता दोन्ही आजूबाजूला बघितले की कधी कधी मनात भीती दाटून आली तर त्या गोष्टीचा नवल वाटायचे काही कारण नाही कारण रस्ताच तसा होता.

अगदी वेळेत ती कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचली,भराडी देवीचे दर्शन घेऊन समाधीपाशी नतमस्तक झाली,सभा मंडपातील स्वागत स्वीकारून, सत्कार समारंभ स्वीकारून अगदी गावातील बाया बापड्यांना योग्य ते मार्गदर्शन करून तिने शेलार मामा यांचा तो जुना वाडा पाहिला,देवघरात देवाला नमस्कार केला आणि तिला भरून आले.."लेकी आलीस बरं झालं"असं कोणीतरी बोलल्याचा तिला भास झाला,त्या वाड्याच्या पायरीवर ती पाच मिनिट शांत बसली...... आणि ती परतीच्या प्रवासाला निघाली आता मात्र थोड्या वेगाने जायला पाहिजे होते कारण संध्याकाळ होत आलेली होती आणि रस्त्यावरती चीटपाखरू ही नव्हतं, थोड्या वेळात वस्तीची बस गावाकडे येत होती ती तिला वाटेत भेटली, दहा पंधरा किलोमीटर ती गेली, थोडसं अंधारून येत होतं..

अजून थोड्या वेगाने खाली जाणं गरजेचं होतं कारण रस्ता पूर्ण निर्जन होता एखादा चीटपाखरू ही दिसत नव्हतं अंधारून आले होते, पक्षी आपल्या घरच्या दिशेने निघालेले होते,गाई वासरं आजूबाजूच्या गावांमध्ये घराकडे फिरकत होती, शेतावर गेलेली बायामाणसं घराच्या दिशेने निघाली होती मनात भीती असं नाही पण काहीतरी नक्कीच जाणवत होतं हे मात्र खरं आणि सहज तिचं लक्ष मीटर वर गेलं अरे बापरे डिझेल संपत आले.. कसे शक्य आहे....

आपण तर येताना डिझेल टाकले होते..मग असे कसे काय,आता काय करायचं हा प्रश्न काही क्षण तिच्या मनात आला पण विचार करण्याची ही वेळ नव्हती,जितकं जाता येईल तितकं जाऊ म्हणत ती निघाली खरी...... पण कधी कधी आपल्या मनात आलेल्या शंका इतक्या पटकन प्रत्यक्षात येतात ना तिच्याबाबत तसेच झाले,गाडी बंद पडली,अगदी सात वाजत आलेले होते अजूनही ती रस्त्यापासून वीस किलोमीटर आत मध्ये होती....

सूर्यास्ताच्या खुणा अलगद निळ्या रंगात मिसळून वातावरणात अंधार पसरू लागला होता..एक क्षण तिला काही सुचेना कारण इथे तर मोबाईललाही रेंज नव्हती,एखादा मोटरबाईकवाला येईल, एखादी गाडी येईल या आशेवर ती गाडीच्या बाहेर उभे राहून वाट पाहत होती.. पण अशी शक्यता फारच कमी, साडेसात वाजले,आठ वाजले नेटवर्क नव्हतं, मोबाईलची बॅटरी डाउन होत आली होती,यासाठीच माणसांमध्ये सजगता असणं अत्यंत गरजेचा आहे याची जाणीव तिला आतून होत होती पण त्याला काही पर्याय नव्हता,आजूबाजूला अंधारून आले होते,घनदाट जंगल आणि त्यामध्ये ती एकटीच उभी होती काय करावं सुचत नव्हतं, मनामध्ये भीती दाटून आली होती.

या क्षणी तिला काही सुचत नव्हतं बाहेर उभे राहण्यात काही अर्थ नव्हता,ती गाडीतू जाऊन बसली, ही रात्र आपल्याला एकटीला अशीच गाडीत काढायची आहे याची तिने मनाशी खूणगाठ बांधली,आता काही पर्याय नव्हता, अतिशय घनदाट जंगल,एखादे जंगली जनावर

पटकन येऊ शकते या विचाराने ती मनातून धास्तावली, आता तिच्या समोर कोणताही पर्याय नव्हता, तिने डोळे गच्च मिटून घेतले हळूहळू रात्र होत होती..

अचानक तिला आवाज ऐकू येऊ लागला बघितले तर समोर तिला मशाली दिसू लागल्या, आता एवढ्या रात्री या निर्जन स्थळी मशाली घेऊन कोण चाललय बरं, ती थोडीशी गांगरून गेली पण तिने गाडीचा दरवाजा उघडला नाही हळूहळू हळू त्या मशाली गाडीच्या जवळ आल्या, गाडीभोवती फेर धरून नाचू लागल्या, एक विचित्र आवाज घुमू लागला, आता मात्र तिची बोबडी वळली, ती रात्री अपरात्री प्रवास करायची त्यामुळे तिला जरा अंदाज आला तिने ओम नमः शिवाय, ओम नमः शिवाय ओम नमः शिवाय म्हणत डोळे गच्च मिटून घेतले थोड्या वेळाने तिला असं जाणवलं की गाडीला कोणीतरी धक्का देत आहेआणि गाडी पुढे पुढे सरकतेय तिला जोरात ओरडावं असं वाटलं पण तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता आपण हे काय अनुभवत आहोत हे तिला कळत नव्हतं आणि वळतही नव्हतं..

रस्त्यापासून गाडी बरीच उंच उचलली गेली होती तिला वाटलं आता आपलं काही खरं नाही जे घडतं होतं ते सगळं अनुभवत होतो हळूहळू हळू गाडी खाली ठेवल्याचा भास झाला जातात एक विचित्र हास्य सगळ्या आसमांतात भरून राहिल आणि गाडी जमिनीवर ठेवली आणि गाडीला जोरात धक्का दिला गेला तशी गाडी पुढे पुढे जात होती..आता आपलं काही खरं नाही म्हणत तिने डोळे गच्च मिटले........

हनुमान चालीसा म्हणून झाली होती जेवढे आठवतील तेवढ्या सगळ्या देवांची नावं घेऊन झाली होती कायम तिच्या गळ्यामध्ये आईचा लॉकेट पर्समध्ये आई भगवतीचा अंगारा हनुमान चालीसा पुस्तक आणि असं नेहमीच असायचं का माहिती नाही पण या गोष्टीमुळे तिला दिलासा वाटायचा....

"कोण हाय रे तिकडं,आणि हिम्मत कशी झाली तुमची..आमच्या सूनबाई ना त्रास द्यायची.....असा धीरगंभीर आवाज तिला जाणवला"

एका हातात ढाल,कमरेला तलवार आणि हातात एक पिशवी घेवून शेलार मामा...हो शेलार मामाच उभे असल्याचा तिला भास झाला...."

"मामा,चुकलोआम्ही...आम्हासनी काय ठावूक?"

"काय ठाऊक....कित्येक वर्षांनी आमच्या सूनबाई आम्हाला भेटायला आल्या त्यांचा योग्य तो सन्मान नाही करता आला म्हणून त्यास्नी ही ओटी घेऊन आलोय..... बारा शिवाय येता बी येत न्हाही आणि तस पाठवंण बरोबर दिसतयं होय म्हणून धावत आलो तर ह्यो तुमचा ह्यो धुमशान....चला पळा नाहीतर.... " असे म्हणताच त्या मशाली दूर दूर जाताना दिसल्या..

"पोरी घाबरू नगसं......तू आलीस लयी भारी वाटलं बघ..अशीच येत राहा अधून मधून....तुझंच गाव आहे

ही घ्या ओटी....पहिल्यांदाच आलीस ना.... साडेतीनशे वर्षानंतर.....आपल्या घरातील कोणीतरी आलं.... लई भारी वाटलं

घ्या ही ओटी...."

"पण "

"शंका नका आणू मनात....सूनबाई..."

कसातरी यंत्रवत तिने गाडीचा दरवाजा उघडला..... ती पिशवी घेतली.....आणि ती गाडीत कधी शिरली तिला कळलंच नाही.....

"सुखी राहा सूनबाई........

हा आवाज फक्त तिच्या कानात घुमत राहीला.......

सकाळी जेव्हा जाग आली तेव्हा सूर्याची सोनेरी किरणे अशी छान पैकी धरणीवर पसरलेली होती तिच्या गाडीच्या बाजूला एक बस थांबली होती आणि बसड्रायव्हर जोरजोरात हॉर्न देत होता त्या बसच्या हॉर्नने तिला जाग आली कारण तिची गाडी रस्त्यावर आडवी लावलेली होती..... या क्षणी तिला काही सुचत नव्हतं... ड्रायव्हर कंडक्टर खाली उतरले होते,गाडी अशी आडवी कशी? का? कोणी? लावली या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या मनामध्ये थैमान घालत होतं कारण काल संध्याकाळी त्यांनी ही गाडी रस्त्याच्या कडेला पहिला होती आणि आतातर म्हणजे.... रात्रभर तुम्ही हितच आहात?

" हो रात्रभर मी इथेच आहे गाडी मी रस्त्याच्या कडेला लावली होती.....पण....मी गाडी रस्त्याच्या कडेला लावलेली होती एवढेच मला माहिती... आता तुम्ही बघताय गाडी कुठे आहे ते तुम्ही काय ते समजून जा.."

गाडीतील लोक पटापट खाली उतरले आता त्यांना रात्री काय घडलं याची त्यांना साधारणता जाणीव झाली होती त्यांनी फक्त तिला एवढंच विचारलं,

" तुम्ही ठीक आहात ना,हेच सगळ्यात महत्त्वाचं खूप नशीबवान आणि भाग्यवान आहात तुम्ही की तुम्ही सही सलामत सुखरूप आहात हे सगळ्यात महत्त्वाचं काही काळजी करू नका..मी बघतो गाडीला काय प्रॉब्लेम झाला आहे ते पण लक्षात ठेवा पुन्हा असं धाडस करू नका जीवावर बेतण्याची शक्यता आहे, तुमचं नशीब खूप बलवान म्हणून आणि म्हणूनच तुम्ही सलामत आहात आता मात्र तिच्या मनात धडकी भरली म्हणजे रात्री आपण जे पाहिलं ते सत्य होतं स्वप्न नव्हतं,नक्कीच आपण ते अनुभवलं होतं....

तो पर्यंत बस चालक पाहत होते की गाडीत काय बिघाड झाला तर गाडी पूर्ण तंदुरुस्त होती..गाडीत डिझेल ही पुरेसे होते.....म्हणजे....

ती मनातच हसली...सर्वांचे आभार मानून तिने गाडी सुरू केली आणि

तिने बाजूच्या सीट वर पाहिले तर

ती पिशवी तिथे होती..म्हणजे यासाठी हा सारा अट्टाहास होता तर

"सूनबाई.....ओटी भरून जा........"

तिने आजुबाजुला पाहिले....तो परिसर अगदी जवळचा वाटत होता ...त्या परिसराचा निरोप घेत ती

महाडच्या दिशेने निघाली...पुन्हा एकदा इतिहासाला उजाळा देत.....

**डॉ.शीतल शिवराज मालुसरे**
**महाड, रायगड**
**मो.9850963181**

# औक्षवंत भाऊ



कुण्या पवित्र नात्याला
आई उध्दारते कुळ.
माय बहिणीच्यासाठी
भाऊ पाठवितो मुळं....१

दिवा जीवाचा लावून
ओवाळीतो भाऊराया.
भाऊ औक्षवंत व्होवो
सांगे रक्ताची माया....२

बहिणीला आणायला
जातो मुराळी होऊन.
भाऊ भाग्यवंत होतो
पुण्य पदरी पाडून....३

राखी बांधते भावाला
जन्म मरणाच्या ओढी.
मामा नात्याच्या नाळेला
बांधो उभारीची गुढी....४

पाय माहेर वाटेचे
मना स्वानंदाच्या राशी.
ओटी पोटीचा ओलावा
माय धरीते पोटाशी.....५

**डॉ. प्रभाकर शेळके**
**जालना**
**मो.9975137337**

# एकट चालावं



आयुष्य जगत असताना कधी एकट चालावं
मनातल्या मनात कधी स्वतःशी बोलावं
संकटांच्या छाती वरती पाय ठेवुनी हसावं
आयुष्य जगत असताना कधी एकट चालावं

ना द्वेष कोणाचा ना ही कोणास वाईट बोलावं
न सहता अंतकरणाचा डोह फोडूनी रडावं
झुंज देऊनी साऱ्या त्रासाला आयुष्य हे तरावं
आयुष्य जगत असताना कधी एकट चालावं

मन मोठे करुनी दार मनाच खोलावं
संसारात राहुनी जन कल्याण ही करावं
प्रयत्न होऊदे हे आयुष्य सुखात सरावं
आयुष्य जगत असताना कधी एकट चालावं

मंद वारा होऊनी स्वप्ना परी झुलावं
आरश्यात पाहुनी स्वतः लाच भुलावं
जगता जगता दुसऱ्यासाठी मरून उरावं
आयुष्य जगत असताना कधी एकट चालावं

**ॲड. स्वप्नील जगताप**
**बारामती**
**मो.93077 43316**



# सदाचारी झाडं



सुविचार म्हणजे मनातला सुगंध
सर्वांनाच तो देत असतो आनंद

सदाचार हाच फुलाचा सुगंध
योगी त्यागातून कार्यात आनंद

सदाचार हे जीवनभरची कमाई
फूल तेच तर जीवन ठेवून जाई

असाच सुगंध वाटतो येतच राहावा
मनमुराद श्वास तो होतच होत राहावा

असे उपयोगी झाडे अरे ठेवा लावून ,
अशा झाडांमुळे आहे आपले जीवन

हीच तर आहेत फुला फळांची झाडं ,
घरटी येथे पाखरांची सदा सदैव वाढं

येती पशूपाखरे सदाचारी झाडा खाली
तिचं तर असते त्यांची आश्रय सावली

निसर्ग आश्रय असे ठेवले पूर्वजांनी लावून
आम्हीही ठेवू अपार वाढवून निसर्ग लावून

**दिगंबर कानोले**
**लोहगाव**
**मो.८३९०१७७८७१**

# मशागत हवी तनां - मनांची



परवा मी गावाकडे गेलो होतो. रात्रीचे जेवणे वगैरे झाल्यानंतर मॅट्रिकला शिकत असलेल्या पुतण्याच्या अभ्यासाविषयी सहज चौकशी केली ---

" काय म्हणतो तुमचा मॅट्रिकचा अभ्यास शिवाजीराव?"

शिवाजीराव गप्प. म्हणजे अभ्यास यथातथाच. अधिक माहिती करिता मी त्याच्याकडून वह्या पुस्तके घेऊन चाळू लागलो. गृहपाठ जवळजवळ केलेच नव्हते. म्हणून मी त्यास विचारले, " अरे, कोणत्याच विषयाचं गृहपाठ केलेले दिसत नाही? "

" काका, " मास्तरं " होमर्क देतच नाहीत. "

" अरे, असे कसे सर्वच शिक्षकं होमवर्क देत नाहीत? आणि अशाने तू पास कसा होणार?"

" नाही व्हयाला काय झालं काका? " सातव्या वर्गात शिकत असलेल्या छोट्या पुतण्याने मध्येच तोंड घातले. " मास्तरंच तर जागा भरा, जोड्या लावा परिक्षेत सांगतत आन कमी भरतीला मी दादाला मदत करणार आन दादानं मला मदत करायची आसं आम्ही ठरीवलं." छोट्या पुतण्याने भलत्याच फुशारकीत माहिती पुरविली.

" आन हो, बरं का आनंदराव, तू यावर्षी याच्या इंग्रजीच्या पेपरच्या दिवशी नक्की ये बरं का? " आमचे बंधुराज आपल्या चिरंजीवास परिक्षेत मदत करण्याकरिता मला जणू विनंतीच करीत म्हणाले.

वरील संभाषणामुळे मी तर चांगलाच हादरलो. पालक आणि शिक्षकही असल्यामुळे तेव्हढाच विषन्न आणि अंतर्मुखही बनलो. केव्हढ्या सहजपणे बोलून गेलीत ही सर्व! परंतु हे आणि असेच चित्र सर्वत्र आपणास पाहावयास, ऐकावयास आणि अनुभवासही येत नाही का? मग शिक्षण आहे तरी कशासाठी? नोकरीसाठी की ज्ञानासाठी? सुखी संसारासाठी की चारित्र्य संपन्न नागरिक घडविण्यासाठी? नीतीमुल्ये संस्कारित करण्यासाठी की स्वावलंबी बनवण्यासाठी? की ह्या सर्वांसाठी? मग आजच्या " अश्या " शिक्षणाने ह्या मधील एखादा तरी उद्देश साध्य होईल का? घर असो की शाळा महाविद्यालय बैठक असो की अभ्यासिका, कॅन्टीन असो की कार्यालय वाडी तांड्यांपासून ते महानगरांपर्यंत -- नेहमीच्या शब्दांत म्हणजे गल्ली पासून ते दिल्ली पर्यंत आणि जनता जनार्दनापासून ते संत्र्या-मंत्र्यांपर्यंत सर्वत्रच असा गैर मार्गाचाच, अनीती आणि भ्रष्टाचाराचाच बोलबाला नव्हे तर पुरस्कार आणि आवश्यकताही अगदी सहजपणे व्यक्त करीत असलेल्या सज्जनांचीच संख्या वाढतांना दिसत आहे. एवढेच नव्हे तर निष्ठा आणि प्रामाणिकपणा सारख्या श्रेष्ठ मुल्यांची टर उडविणारे तरुण विचारवंत (?) संख्येने वाढतांना दिसत आहेत. आणि ह्या मुळेच स्वातंत्र्य,समता, बंधुभाव आणि सामाजिक बांधिलकी इत्यादी सारख्या उच्चतम मुल्यांचा दिवसेंदिवस -हासच होताना दिसत आहे. एव्हढा -हास की परिणाम स्वरुप हर्षद मेहता, तेलगी, निरव मोदी आणि विजय माल्या सारखे देश बुडवे तर रामास्वामी सारखे न्यायदेवतेसही निलाम करीत आहेत.

दुसरीकडे भ्रष्ट राजकारणी आणि आसाराम राम रहिम सारखे लिंगपिसाट ' राम'च भक्ती मुक्तीचा पदर पांघरुण "शीलपरभुषणम" सारख्या उच्चतम नीतीमुल्यांची पार वाट लावीत आहेत.

आजच्या तरुणांस हे सर्व दिसते. कळते आणि समजते. तो अतिशय स्मार्ट आहे. त्यांची निरिक्षण शक्ती अतिशय शुक्ष्म आहे. त्यास सत्य -असत्य, नीती -अनीती, व्यवहार बाजार आणि सोंग ढोंग सर्व काही सहज कळते. परंतु त्यांच्या समोर आदर्शच दिसत नाही. म्हणून तो दिशाहीन वाटतो. अश्या वेळी त्यांना दिशा देण्यासाठी - सुसंस्कारित करण्यासाठी आपण जर त्यांना समाज सेवक बाबा आमटे, अनाथांची आई सिंधुताई सपकाळ, देशासाठी जान कुर्बान करणारे शहिद विक्रम बात्रा आणि सर्वार्थाने राष्ट्रपती असणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सारख्या त्यागी आणि निर्मोही दिपस्भांच्या सानिध्यात आणले तर त्यांच्या नावेस निश्चित हवी तशी दिशा मिळेल असा विश्वास वाटतो. ह्या करिता गावोगावी आणि शहराशहरांत संस्कार केंद्रे सुरु करायला हवीत. अश्या केंद्रांमध्ये निरनिराळ्या प्रकारचे कार्यक्रम जाणिवपूर्वक आयोजित करायला हवेत. ह्या मध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित करून राष्ट्रीय ज्वलंत प्रश्नांवर चर्चाही आयोजित करता येतील. तसेच सुद्दढ मनासाठी सुद्दढ शरीराची आवश्यकता लक्षात घेऊन व्यायाम शाळा सुरु करता येतील. अश्या संस्कार केंद्रामधून साक्षरता, जातीयता निर्मुलन, अंधश्रद्धा निर्मूलन, ग्राम सफाई इत्यादी सारख्या राष्ट्आवश्यक बाबींना प्राधान्य देता येईल.

चांगले विचार असणे तर चांगलेच परंतु विचारांपेक्षा आचार केंव्हाही श्रेष्ठच. म्हणून निश्वार्थी आणि त्यागी स्वातंत्र्य विरांचा, प्रामाणिक नागरिकांचा -- जसे दहा विस हजार रुपयांची किंवा चार दोन लाखांची हरवलेली/ विसरलेली बॅग,पर्स परत करणारे रिक्षा चालक, टॅक्सी ड्रायव्हर,बस चालक, तसेच मुली -महिलांची छेड काढणा-यास प्रतिबंध करणा-या तरुणांचा, बलात्कार,

चोरी, भ्रष्टाचारासारखे दुष्कृत्य करणा-यास पकडून देणा-या बहारदारांचा ख-या आदर्श शिक्षकांचा " अवनि " सारख्या सामाजिक संस्थेस जमीन किंवा धन देणा-या धनिकांचा तसेच रक्तदान, किडनी दान, नेत्रदान आणि मृत्यू पश्चात देहदान करणा-या दानशूरांचा ज्यांनी तनमनधनाने समाजसेवेसाठी संपूर्ण जीवनच समर्पित केले आहे अश्या ऋषीतुल्य समाज सेवकांचा, सामाजिक कार्यकर्त्यांचा -- थोडक्यात श्री. म.माट्यांच्या शब्दांत सांगायचे म्हणजे समाज मनाची मशागत करणा-या देशभक्तांच्या कार्यांचे सत्कार सोहळे आयोजित करून " सत्यम, शिवम् सुंदरमचा " आवाज बुलंद करावयास हवा. आज ह्याची तातडीने आवश्यकता आहे.

**प्रा.आनंद कदम**
**नांदेड**
**मो.९८८१७८७६८४**

# भावना



चांगल्यात सर्वांची साथ असते..
पण वाईटाची त्यावर मात असते..

सुखाचे सर्वजण भागीदार असतात..
पण दुःखाचे कुणी जोडीदार नसतात..

जिंकणं हे क्षणिक असतं..
पण हरणं हे पावलागणिक असतं..

आशाही नव्याने जगून शिकते..
पण निराशा धीराने खचून जाते..

प्रेमात सर्वकाही दिलासा मिळतो..
पण रागात बरंच काही नाहीसा होतो..

हसणं ही जीवनाची थाट असते..
पण रडणं ही भावूकतेची वाट असते..

**सौ. पुष्पा कदम**
**मुंबई**
**मो.8452068558**

# तांका



१) अवघे क्षण
गुंतू लागे तुझ्यात
माझ्या मनात
उतू ऋतू डोळ्यात
ह्दयी चोरकप्यात

२) डोळे सुंदर
तशी तुही मोहक
सुगंधी फूल
महिरप ओठात
डाळिंबदाणे गोल

३) चंद्र रातीला
अन् रात्र चंद्राला
दिसे शोभून
नभांगणी खुलून
तो सुपर ब्ल्यू मून

४) प्रेमात तर
नजरेला नजर
भिडल्यावर
काळजावर वार
ह्दयी ते विवर

५) राखीव गडी
खेळात ठेवलेत
तसे ते डोळे
साऱ्या नजाकतीत
गुपित दिसे भोळे

**प्रकाश पोळ**
**ठाणे**
**मो.९१६७ ४५० ६६०**

# बहाणे



गाऊ नको आज
वादळाचे गीत
फुलांच्या तळाशी
निजला असे मीत.

साज असे कर्कश
बेसूर तराणे
वाटे ते सारे
शहाणे बहाणे.

गोंधळात हरले
रेशमी ते सूर
काळवंडले रे
चांदण्याचे नूर.

मनी पाखरांच्या
एवढी, रे आस
मोकळ्या गगणात
घेता यावा श्वास.

**डॉ.अशोक काळे**
**नागपूर**
**मो.99754 10135**

# परीक्षा



मार्च चा शेवटचा आठवडा.सगळीकडे शांत वातावरण होते.औरंगाबाद मधील नागसेन वन परिसरातील गजबजाट कमी झाला होता.विद्यार्थ्यांची फारशी वर्दळ दिसत नव्हती.काहींचे पेपर्स संपले होते काहींचे एक दोन दोन शिल्लक असावेत.

मी आंबेडकर हॉस्टेल च्या पायरीवर बसलेलो. सोशल सायन्स चे पुस्तकं हातातच होते. दुसऱ्या दिवशी सोशल सायन्स चा च पेपर होता.तेवढ्यात टी वाय कॉमर्स ला असलेला गणेश माझ्याकडे आला. एका हातात ट्रंक आणि दुसऱ्या हातात पुस्तकांचा गठ्ठा. म्हणाला दोस्ता,माझी कालच परीक्षा संपली.सगळं आवरून निघालो गावी आता.मी सहज विचारले,पेपर कसे गेले रे गणेश ? 'चांगले होते रे,अभ्यास पण तसा केला होता,जे वाचले, सोलव्ह केले तेच आले परीक्षेला. मन लावून अभ्यास केला ना पास होतच रे.'मी म्हटलं तुझ ठीक हे रे,तू एकपाठी आहेस्,एकदा वाचलं तर, तुझ्या लक्षात राहतं. आमची गोष्ट वेगळी आहे,त्यातल्या त्यात आर्ट्स म्हटलं का नुसती घोंकमपट्टी करावी लागते.

लांब लचक उत्तरं लिहावे लागतात. कॉमर्स रुल्स,सूत्र पाठ असली ना मग काही अवघड नाही, असं मला वाटतं.मी पण कॉमर्स लाच ऍडमिशन घ्यायला पाहिजे होते रे,जाऊ दे ते आता,किती वेळा तेच तेच ते सांगत बसायचे नाही का ? मी त्यालाच प्रतिप्रश्न केला अन् सहमतीची अपेक्षाही न करता म्हटलं, बरं ते जाऊ दे,काय म्हणतो तु,'माझं एक काम कर,पुस्तकांचा गठ्ठा माझ्या हातात देत म्हटला,हे बघ ही पाच पुस्तकं आहेत अन् हे पाकीट तेवढे आठवणी ने मधुकरला दे. ही त्याचीच पुस्तकं आहेत'.'जरूर देईन गणेश,अजिबात काळजी करू नको,मी म्हटलं.चल भेटू परत कधीतरी असं म्हणून गणेश छावणीच्या दिशेने निघाला पण.तो जात होता मी त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे निर्थक पाहत राहिलो,मी असाच विचार करीत पायरीवर बसलेलो.

खरं तर, फ्रेंड मध्ये आणि कॉलेज मध्ये सर्वच एकमेकाला गणेश,मधुकर,नारायण असे कधीच म्हणत नाही.नारायण ला नाऱ्या म्हणणार,मधुकर ला मध्या म्हणणार आणि गणेश ला गण्या म्हणनार हे ठरलेलं च असतं,कुठेही जा तुम्ही.पण गणेश मात्र ह्या नियमाला अपवाद होता. खरं तर,त्याचा गरीब स्वभाव,घरची ही गरीब परिस्थिती होती.आई वडील शेत मजूर होते. साधे सिंपल रहाणे,परिस्थितीची जाणीव असलेला. आणि हुशारही फार. इतरांसारखा उनाडपणा नव्हता त्याच्यात.तसा ॲक्टिवच, गाणे गोष्टीत भाग घेणे यात पुढेच असायचा. कुठल्याही समस्येत आम्ही त्याचा सल्ला घेत असत.आमच्यात मिक्स होत नव्हता असं नाही, मिक्स ही व्हायचा पण जेवढ्यस तेवढे. कॉमर्स च्या मित्रात जास्त असायचा.मधुकर त्याचा चांगला मित्र. खरं तर ते दोघेही कॉमर्स लाच.एकच रुम मध्ये राहायचे,रुम मेटच ते.,मधुकर पेक्षाही जास्त हुशार होता. होता म्हणजे आजही हयात असू शकेल पण कुठे असेल ते सांगता येत नाही.

मधुकर चे आई वडील दोघे ही प्राथमिक शिक्षक होते.त्यामुळे याची राहणी एकदम अपडेट असायची. भरपूर ड्रेस होते त्यांचेकडे.आणि तेही टेरिकॉट चे.आम्ही पोरं त्यावेळेस जडे भरडे नांदेड टेरिकॉट च वापरत असत. म्हणजे दुधाची तहान ताकावर भागवयची तसं.त्यामुळे मधुकर भास मारायचा.दिवसा आड ईस्तरी करायचा. कधी कधी मधुकर प्रेस करीत असला म्हणजे आम्ही ही कपडे धुतलेले असो नाहीतर तसेच असो,ईस्तरी फिरवून घ्यायचो.तेंव्हा कोळस्या च्याच ईस्तरी होत्या.कॉलेजात ठराविक पोरं भास मारायचे काम करीत असत.आम्ही बरेचसे खेड्यातील होतो.आईवडील अडाणी होत आमचे. आमची भाषा ही गावाकडील गावंढळ अन् राहणेही टाप टीप नसायचे.ज्यांचे आईवडील सर्व्हिस ला ती मुलं टीप टॉप राहायची.

मी अजूनही पायरीवर च बसलो होतो.गणेश बद्दल विचार करता करता मला.

पाच सात दिवसापूर्वीचा प्रसंग आठवला.

रविवार होता अन् दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी इकॉनॉमिक्स असा कोणता तरी कॉमर्स चा पेपर होता. अभ्यासात थोडा ब्रेक घ्यावा म्हणून गणेशनी मधुकरची इस्तरी घेऊन थोड रॉकेल टाकून,होते तेच कोळसे पेटवले., इस्तरी गरम झाल्यावर शर्ट ची इस्तरी करीत होता.तेंव्हा मधुकरणी पण एक टेरिकॉट चा शर्ट त्याच्या जवळ आणून ठेवला.सगळे अभ्यासाच्या ताण तनावातच होते.सगळेच उद्याच्या पेपरच्या टेन्शन मध्ये असतात.'तुझे झाले का, मी पण हा शर्ट मारून घेतो',अस सांगून मधुकर बसला पुस्तकं घेऊन.दुसऱ्या दिवशी इकॉनॉमिक्स चा पेपर होता.

गणेशने शर्ट प्रेस करून बाजूला ठेवला,त्याला आता पँट ला प्रेस करायची होती.नांदेड टेरीकॉट ची पँट घेतली, ईस्तरी उचलली तेंव्हा त्यांच्या लक्षात आले,अरे बापरे याच्या शर्ट ची कफ ( बाही)तर जळाली,चुकून ईस्तरी ठेवताना त्याच्या जपान टेरीकॉट च्या शर्ट च्या बाहीवरच ठेवली गेली हे त्याच्या लक्षातही आले नाही.लगेच

ओरडला,अरे मधू तुझा शर्ट जाळला, बाही जळाली यार चुकून.मधुकर धावत येऊन बघतो तर, खरच त्याची शर्ट ची बाही कफ जवळ चांगलीच जळालेली दिसली.अन मग काय विचारता.जोर जोरात त्यांच्या अंगावर धावून ओरडू लागला.आरे गण्या आता उद्या काय घालू,माझ्या चांगला शर्ट जाळलास तु,नवीन शर्ट होता,माझ्या आईने वाढदिवसाला दिलेला.गण्या मूर्खा कळत नाही का तुला.इस्तरी बाजूला ठेवायची ना.मूर्ख कुठला. आणि जोर जोरात भांडण सुरु केले.बाजूच्या रुम मधील पोरं पण धावत आली, काय झालं बघायला. आरे रे,बाही जळाली रे.बरेच जण गणेशला विचारीत सुटले,अरे,कसा काय जळाला रे.ईस्तरी ठेवली ते तर बघायचं,नाहक वाढवा काम झालं ना.झालं ते चुकून झालं, खरं आहे.आणि मधू चे तोंड चालूच होते मूर्ख, बावळट वैगरे वैगरे.त्याला खूप राग आला होता. साहजिक आहे त्याला राग येणे. त्यानेही काही मुद्दाम नाही केले चुकून च झाले होते.

काही पोरं म्हणे शर्ट घालताना बाही थोडी वरती करुन, फोल्ड करुन घालू शकतो,एवढं काय त्याच्यात,नाही तर शर्ट च्या बाह्या हाफ करु शकतोस. चुकून झाले,त्यालाही गिल्टी वाटलेच ना.सोड आता. तुझाच मित्र आहे ना.जमलेले सगळे मधुकर ला सांगत होते.तरीही मधुकर गणेशला टाकून बोलतच होता. गणेश चे एकच वाक्य वारंवार होते,' मित्रा चूक झाली माझ्याकडुन,माफ कर. '

मधूकर नी गणेशाचा खूपच अपमान केला, त्यामुळे गणेश संध्याकाळी दुसऱ्या रुममध्ये शिफ्ट झाला. त्याला खूप आपराध्यासारखे वाटले.आपण मधुकरचा चांगला शर्ट खराब केला.त्या क्षणापासून गणेशने मधुकरशी बोलणे सोडून दिले.मधुकर ही नाराज होता,त्यामुळे दोघांची मैत्री तुटली.कॉमर्सचे शेवटचे दोन विषय राहिलेले.दोघांनीही अभ्यासावर लक्ष केंद्रित केले.

समाजशास्त्र चे पुस्तक घेऊन मी बराच वेळ आंबेडकर हॉस्टेल

च्या पायरीवर बसलो होतो.गणेश पुस्तकांचा गठ्ठा आणि एक पाकीट देऊन गेला.मी ती पुस्तकं अन् पाकीट घेऊन रुम मध्ये गेलो.

दुपारी पाच वाजेच्या सुमारास मधुकर दिसला. मधुकर ची रुम आमच्या समोरच होती.मी मधुकर ला हाक मारली.,'मधुकर...' मधुकर लगेच आला. म्हटला काय रे हारी.खर तर मधुकर मला सिनियर होता बी काम च्या लास्ट इयर ला होता.मी म्हटलं,हे बघ हे पाकीट अन् ही तुझी पुस्तकं गणेश जाताना माझ्याकडे देऊन गेला, 'हे मधुकर ला दे 'म्हटला.माझी पुस्तकं ?छे मी कधी त्याला दिली होती. मधुकर तत्काळ उद्गारला. माझी नाहीत ही पुस्तके. बघु बरं पाकीट.पाकिटावर ठळक अक्षरात मधुकरचेच नाव होते.

त्याने पाकीट उघडले आतमध्ये एक चिठ्ठी आणि शंभरची नोट होती.

मधुकर चिठ्ठी वाचत होता,....'मित्रा,मी अनवधानानी तुझे फार नुकसान केले,तुझा नवीन शर्ट खराब केला. मला फार वाईट वाटले,अशी चूक माझ्याकडुन कशी काय झाली.त्याबद्दल मी स्वतला खूप गिल्टी समजतो. मधुकर माझी घरची परिस्थिती खुपच गरिबीची आहे रे.नाहीतर त्याच वेळेस तुला नवीन शर्ट साठी पैसे दिले असते.हे बघ हे शंभर रुपये घे,आणखी ती पुस्तके कोणाला तरी विक किंवा मग औरंगपुरा मधील बुकडेपो त विक आणि जे पैसे येतील त्याचा तु शर्ट घे." चिठ्ठी वाचता वाचता मधुकरच्या डोळ्यातून पाण्याच्या धारा वाहू लागल्या होत्या. मी म्हटलं,एवढं काय लिहिलय चिठ्ठीत.त्याने माझ्या हातात चिठ्ठी दिली अन् म्हटला वाच.मी चिठ्ठी वाचीत होतो.चिठ्ठी छान अक्षरात होती......वाचता वाचता मी ही इमोशनल होत गेलो. अन् वाचता वाचता माझ्याही डोळ्यात पाणी आलं.मी म्हटलं, मधुकर, तु खुप बोललास त्याला.त्याची फार इज्जत काढली.तु म्हटला एवढा भारी शर्ट घ्यायची तुझी लायकी पण नाही. असं तु नव्हतं बोलायला पाहिजे होते.त्याची पार लायकी काढली.गणेश नी दुसऱ्या दिवशी सगळं सांगि

तलं होत मला.म्हटला,माझा मित्रच आहे तो त्याने एवढं बोलायला नको होतं, हे सांगताना तो अक्षरशः रडला यार.

तेंव्हा मोबाईल नव्हते. कॉंटॅक्ट करणे अवघड होते.'हरी,गणेश चा आड्रेस कुठे मिळेल मला',मधूकर नी विचारले म्हंटले,कॉलेजच्या रेकॉर्ड ला असेल ना.करेक्ट यार,मी उद्या कॉलेजमधून आड्रेस घेतो, त्याचे सगळे पैसे मनी ऑर्डर नी त्याच्या घरच्या आड्रेस वर सेंड करतो.त्याशिवाय मला चैन पडणार नाही.मी एका चांगल्या आणि गरीब मित्राला दुखावले. खरं तर चूक माझीच होती.त्याने काही मुद्दाम हून माझा शर्ट जाळला नव्हताच,चुकीने झाले त्याच्याकडून.दुसऱ्या दिवशी पेपर होता ना, त्याच्या टेन्शनमध्ये असेल तेंव्हा तो.मी संयम ठेवायला पाहिजे होता.खरं तर,ती पण माझी परीक्षा च होती.हारी मी बी कॉम ला पास ही होईन,पण मित्र ओळखण्याच्या परीक्षेत मी नापास झालो आहे.शर्ट काय मी केंव्हाही घेईन,पण माझ्या शब्धानी त्याच्या मनावर झालेली जखम,झालेले घाव कसे बरे होणार.

**हरिष जाधव (वागळुदकर)**
**नाशिक**
**मो.9403449623**

# आठवण येताच तुझी



हे गत दिवसा, सखा तू माझा
प्रवास सोबती तूच की रे माझा ।।

आठवण येताच तुझी दिवसा
जीव होतो कासावीस रे माझा ।।

दिवस सुंदर अबोध चिमुकले
झुलवला तू छान पाळणा माझा ।।

बोट पकडून तुझे, टाकली पाऊले
जाऊ ना दिला तू कधी तोल माझा ।।

बालपणीचे खेळगडी ते आज नाही
आठवणीने दाटतो कंठ माझा ।।

आयुष्य कठीण,धीर तू सोडू नको
समजावणारा, तू दोस्त रे माझा ।।

उमेदी दिवसांनी पंख स्वप्नांचे दिले
तुझ्यामुळे पाय जमिनी राहिला माझा ।।

वेळ असो की पैसा, समय ओळखावा
संगतीत तुझ्या वेळ सार्थकी माझा ।।

दिवस आजचा, उद्या स्मृतीत जातो
आठवणीत तुझ्या हरवणे छंद माझा ।।

**अरुण वि.देशपांडे**
**पुणे**
**मो.9850177342**

# मराठी



माझ्या मराठीची गोडी
जसा अमृताचा घट
पांगलीसे जग भरी
तिची थोरवी अवीट ॥१॥

मातृभाषा मराठीच
ग्रंथ रामायण गीता
गाई तिचेच गोडवे
बाल वृद्ध माता पिता ॥२॥

श्लोक भजन कीर्तन
करी श्रवण नेमाने
प्रवचन कितीतरी
एके लावनी नेमाने ॥३॥

द्यावे शिक्षण सखोल
मुलासाठी मराठीत
व्याकरण समजवा
ज्ञान द्यावे आनंदात ॥४॥

माझ्या मराठीचा स्वाद
जसा आंबा चिंच वाटे
भरे ओठात साखर
प्रेम रद्दयात दाटे ॥५॥

**चंद्रभारती आसडी**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.९६२३७७२८८९**

# सकारात्मकता !



माणसाच्या आयुष्यात सकारात्मकता ही फार मोठी गोष्ट आहे. दुःख, निराशा कधीकधी आनंद झाकोळत असतात, पण मनाची सकारात्मकता माणसाला चैतन्य देत असते. निराशेतून उठायचे बळ देत असते.

काही जणांना जन्मतःच दृष्टीसमोर अंधार असतो. अशा व्यक्ती अंध शाळेत शिक्षण घेतात.आदरणीय हेलन केलरचा आदर्श डोळ्यासमोर ठेवतात. फक्त शिक्षण घेऊन थांबत नाहीत, तर संगीतही शिकतात. गायन वादनाचे ग्रुप करुन, कार्यक्रम सादर करतात. एका तालासुरात त्यांनी वाजवलेल्या धून, गाणी ऐकून, आपणच आश्चर्यचकित होतो. त्यांच्यातील काहीजण डोक्यावर सिंथेसायझर घेऊन सुंदर वादन सादर करतात. आपण धडधाकट असूनही आपल्याला जे जमत नाही, ते हे लोक सफाईदारपणे वाजवून दाखवतात कारण कष्ट, जिद्द, चिकाटी आणि मनाची सकारात्मकता!!

काहींना तर जन्मतःच ऐकू येत नाही आणि बोलताही येत नाही. अशावेळी आईवडीलांवर आभाळ कोसळलेले असते पण आपल्या चिमण्यांच्या बुद्धीवर विश्वास ठेवून, ते नेहमीच्या शाळेतच घालतात. घरी स्वतः अभ्यास घेतात. लिप मुव्हमेंटच्या सहाय्याने शिक्षकांचे, पालकांचे म्हणणे समजून घेतात. तीव्र आकलनशक्तीने वाचनातून ज्ञानप्राप्ती करतात. इंजिनिअर, आर्किटेक्ट यशस्वीरित्या पास होतात. एवढेच नाही तर, नोकरी करुन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊन दाखवतात. मनाची सकारात्मकता माणसाला यशस्वी जीवन देते.

हीच सकारात्मकता मूल न होणा-या बाईला फर्टिलिटी क्लिनिकमधे आशावादी बनवते. कितीही हाल सोसून, आपल्याला बाळ होणार या सकारात्मक विचारांच्या जोरावर अनंत वेदना सोसून, आई व्हायचे स्वप्न उराशी बाळगते आणि एक दिवस तिचे स्वप्न सत्यात उतरतेही. बाळाला कुरवाळताना ती गुणगुणते'

" तुझ्यामुळे मी झाले आई
बाळा होऊ कशी उतराई!!"

सुंदर रुप आणि शिक्षणाची जोड सर्वांनाच कशी लाभेल? काहींना कुरुप देह लाभतो. काहींना आर्थिकदृष्ट्या शिक्षण परवडत नाही. रुप, शिक्षण ह्या गोष्टी नसल्यामुळे, लग्नाचा योग येत नाही. तरीही एकट्याने जगायचे जीवन, ते आनंदाने जगतात. पर्यटनाने दुनिया बघायचा आनंद घेतात.

काहींना दुर्दैवाने अंगावर कोड उठते.औषधपाणी करुनही उपयोग होत नाही. काही कमकुवत मनाची माणसे उगाचच समजवायला जातात." कसं काय बाई तुझ्या अंगावर कोड उठलं? कसं काय व्हायचं तुझं नि तुझ्या भावंडांचं? आई बापाला नसती काळजीच!!"

अशी माणसे शांतपणे उत्तर देतात " अनंत काणेकरांचा जसा पहिला पांढरा केस आयुष्यातला उत्साह घालवत नाही, तसेच हे डाग असल्याने काहीही वाईट होणार नाही. आता लोकं सुशिक्षित आहेत. समजून घेतात. बरीच औषधे निघाली आहेत. तुम्ही आमच्या कुटुंबाची एवढी नाही काळजी केलीत तरी चालेल."

खरोखरीच त्या मुलीचे कोड असणा-या मुलाशी लग्न झाले. इतर भावंडांचीही लग्ने झाली. इतर लोकं उगीचच आऊचा बाऊ करत असतात.

एखादे अवघड ऑपरेशन सांगितल्यावर, घाबरेघुबरे होऊन भेटायला नातेवाईक, ओळखीचे लोक येत असतातच. अशावेळी त्या व्यक्तीचा आत्मविश्वास वाढवायचे काम करायचे असते. अशावेळी जुन्या केसेस उगाळून सांगण्यापेक्षा " हे डॉक्टर चांगले आहेत. त्यांनी अशी खूप ऑपरेशन्स यशस्वी पार पाडली आहेत. सगळे काही व्यवस्थित पार पडेल. काळजी करु नका" अशा सकारात्मक सांगण्याचा खूप चांगला उपयोग होतो.

काही आईवडीलांची मुले परदेशी शिकायला जातात. तेथेच स्थायिक होतात. खरेतर मुले लांब असली तरी, आईवडीलांना नियमित फोन करत असतात. धीर देत असतात. पण काही लोकांना मधे बोलल्याशिवाय, घाबरवल्याशिवाय रहावत नाही. अशावेळी आईवडील शांतपणे सांगतात " आमची मुले चांगली आहेत. आम्ही NRI ग्रुपचे सभासद आहोत. आम्ही सर्वजण एकत्र जमतो. एकमेकांच्या अडचणींना मदत करतो. तुम्ही आमची कीव नाही केलीत तरी चालेल."

हीच सकारात्मकता कधीकधी संकटकाळी श्रद्धेमधे परावर्तित होते. डॉक्टर सर्व उपचार करीत असतातच. ते कधी असेही सांगतात " आम्ही वैद्यकीय उपचार करतच आहोत, पण यापुढचे देवाच्या हातात आहे." अशावेळी परमेश्वराची प्रार्थना करुन यश आल्याची उदाहरणे आहेत. फक्त श्रद्धा आणि सबूरी लागते.

खेळातही सकारात्मकता अंगभूत कौशल्याला सहाय्य करते. बॅडमिंटनसारख्या खेळात पॉइंटस जायला लागल्यावर न घाबरणे खूप महत्वाचे असते. शांतपणे अचूक फटके मारुन प्रतिस्पर्ध्याला हरवता येते. अन्यथा सर्व्हिस चुकणे, शॉटस नेटात जाणे, आऊट जाणे अशा चुका होऊ शकतात.

क्रिकेटमधेही ही सकारात्मकता बरेच बॅटसमन आऊट झाल्यावर बॉलर्स जेव्हा बॅटिंगला येतात, तेव्हा

फोर सिक्स मारायला बळ देऊन मँच जिंकून देते जीवन ही पण एक मँचच आहे आणि सकारात्मकतेच्या जोरावर आपण ती जिंकायलाच हवी.

सौ. मनीषा चिंतामणी आवेकर
वडगाव बुद्रुक, पुणे
मो.9763706200

# दुनिया आता...



दुनिया आता बिघडली
माणसं मनाने किडली
विचार सरणी सडली
दुनिया आता बिघडली

दुनिया आता बिघडली
अहंकाराची नशा चढली
माया ममता बिथरली
दुनिया आता बिघडली

दुनिया आता बिघडली
न्याय नीती हो बुडली
माणसांना माणस नडली
दुनिया आता बिघडली

दुनिया आता बिघडली
न्याय देवी धडपडली
कार्ये चांगली रखडली
दुनिया आता बिघडली

संजय मुकुंदराव निकम
मालेगाव
मो. ८६५७४८८४२६

# नवी वाट स्वप्नांची



शिक्षणासाठी लग्नासाठी
मुलांच्या भविष्यासाठी
एकंदरीतच संसारासाठी
सर्व सुंदर आयुष्यासाठी
पाहिलेली बहुतेक स्वप्न
ब-यापैकी पूर्ण होतात
तरी अपेक्षा स्वप्नांच्या
वेळोवेळी वाढत जातात
एक प्रदीर्घ काळ संपतो
बोनस का काय म्हणतात
आयुष्याचा टप्पा सुरु होतो
लक्षात यायला लागतं...
आताशा थकायला होत आहे
आकाश निरभ्र दिसत आहे
आभाळ दाटून येत आहे
अंगण मात्र मोकळं राहत आहे
पाऊस पाण्याचा शिडकावा नाही
पोगोळ्यांचा गारवा नाही
झाडांचं अंकुरणं बहरणं नाही
आवाज गोंगाट चिवचिवाट नाही
सारे कसे शांत शांत...
हिच शांतता एक दिवस
सांगते एक सत्य निखालस...
बास झाला विचार आता...
फाटलेल्या वस्त्राला शिवण्याचा
चारी बाजू रफूने जोडण्याचा
मोहाच्या अनेक धाग्यांना गुंफण्याचा
त्याच धाग्यात परत गुंतण्याचा
वेळ आता आली आहे...
जूनं ते सोनं विचार सोडण्याची
एकाकीपण मानाने जगण्याची
उर्वरित क्षणांत संधी शोधण्याची
नवी स्वप्ने बघायला शिकण्याची
नवी वाट स्वप्नांची हुडकण्याची
आत्मध्यानात रममाण होण्याची
जिद्दीने स्वअस्तित्व टिकवण्याची
सर्व मोहपाशातून सुटण्याची

**सौ.संगीता एखंडे**
**सोलापूर**
**मो.९४२३५८८३६८**

# माणुसकीन जगायचं



दुसऱ्याच्या बदलण्याची वाट न पाहता
स्वतः च स्वतःला बदलायच
आपलंच आत्मपरीक्षण करत करत
सतत स्वतःला सुधरायाच
गुण दोष असतात प्रतेकातच
जसं आहे तसं स्वीकारायचं
ज्याच्या जागी जो तो बरोबर
हेच मनाला समजवायचं
परत फेडीची अपेक्षा न धरता
मोठ्या मनानं वागायचं
त्यागतच खरं जगणं आहे
देवालाही काही नाही मागायच
कुणाशी तुलना कशाला हवी
प्रामाणिकपणे वागायचं
गरज आणि हाव फरक ओळखून
कळायला हवं थांबायचं
भौतिक सुखाच्या माग न धावता
आत्मिक सुखात डुंबायच
आपल्यामुळ दुखावलं जाऊ नये कुणी
हे कटाक्षान पळायचं
शब्दांनी होऊ नयेत दंश कुणा
टाकून बोलणं टाळायचं
अंधारात कुणाला लागू नये ठेच
पणती लाऊन तेजाळायच
मी पणाला सोडून देऊन
माणूसकीन वागायचं,माणुसकीन जगायचं

**ॲड.संगिता श्रीकांत केंजळे**
**गोडोली, सातारा**
**मो.9404667930**

# स्वीट रिव्हेंज



स्वीट रिव्हेंज म्हणजे गोड बदला. तुम्ही म्हणाल बदला आणि गोड तो कसा काय ? कोणीतरी आपला जिव्हारी लागणारा अपमान करतो. आपण आतल्या आत ज्याने अपमान केला त्याबद्दल राग ठेऊन कित्येक दिवस धुमसत असतो. या अपमानाचा कधी मी बदला घेईन असे आपल्याला झाले असते. पण हि धुमस ऊर्जा म्हणून वापरली तर ? स्वतःला इतके मोठे केले कि सारे जग आपली स्तुती करण्यास बाध्य होईल. तुम्ही म्हणाल कसे ते ? आपल्याला खालील तीन उदाहरणावरून समजेल.

एकदा महात्मा गांधी आपल्या कामानिमित्त दक्षिण आफ्रिकेमध्ये फर्स्ट क्लासचे तिकिटाने रेल्वेने प्रवास करत होते. त्या काळात रंगभेदामुळे काळ्या लोकांना फर्स्ट क्लासने प्रवास करण्यास मनाई होती. तेव्हा टीसीने त्यांना फर्स्ट क्लास मधून उतरण्यास सांगितले. गांधीजींनी आपल्या कडे फर्स्ट क्लासचे तिकीट आहे तेव्हा आपण उतरणार नाही असे टीसीस सांगितले. तेव्हा टीसीने त्यांचे काही न ऐकता केवळ वर्णभेदामुळे त्यांना धक्के मारत त्यांच्या सामानासहित खाली उतरविले. या अपमानाने गांधीजी व्यथित झाले. तेव्हा त्यांनी या वर्णभेदाविरुद्ध लढण्याचा निर्धार केला आणि सत्याग्रहाचा मार्ग निवडला. पुढे याच सत्याग्रहाच्या मार्गाने त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत ब्रिटिश राजवटीस सळो कि पळो करून सोडले व शेवटी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यास मोठा हातभार लावला. आज वर्णभेद जगातून हद्दपार झाला आहे त्यात गांधीजींचे मोठे योगदान आहे. म्हणजेच गांधीजींनी झालेला अपमान व्यक्तिगत न घेता त्याचा वापर समाजासाठी केला.

दुसरा किस्सा आहे जगप्रसिद्ध भारतीय उद्योगपती श्री रतन टाटा यांच्या बाबतीतला. गोष्ट १९९८ ची आहे. रतन टाटा यांनी टाटा मोटर्सची इंडिका कार लॉन्च केली होती. रतन टाटा यांनी या प्रोजेक्टसाठी दिवस रात्र एक केले होते. मात्र काही कारणांमुळे त्यांना या प्रोजेक्टमध्ये यश मिळाले नाही. टाटा मोटर्सला मोठे नुकसान सहन करावे लागले. नुकसान भरपाई करण्यासाठी शेअरहोल्डर्सने कंपनीना विकण्याचा सल्ला दिला. रतन टाटा कंपनी विकण्याचा प्रस्ताव घेऊन अमेरिकेत फोर्ड मोटरच्या मुख्य ऑफिसमध्ये गेले. त्यांच्यासोबत कंपनीचे शेअर होल्डर्सही होते. फोर्ड कंपनीसोबत रतन टाटा यांची तीन तास मीटिंग चालली. यादरम्यान, फोर्डच्या चेअरमनने रतन टाटा यांचा अपमान करत म्हटले की, 'जर व्यवसायाचं कोणतंही ज्ञान नव्हतं तर ही कार लॉन्च करण्यासाठी एवढा पैसा का गुंतवला? आम्ही तुमची कंपनी विकत घेऊन तुमच्यावर उपकार करत आहोत.' कंपनी विकावी लागणार या विचारानेच रतन टाटा दुःखी होते. त्यात या बोलण्यामुळे ते पुरते हलले. मीटिंग अर्ध्यावर सोडून ते भारतात परतले. यानंतर त्यांनी टाटा मोटर्स न विकण्याचा निर्णय घेतला. त्यांनी पुन्हा एकदा शुन्यापासून उभे केले आणि यावेळी कंपनीला नफा झाला.२००८ पर्यंत टाटा मोटर्सचा नफा कित्येक पटींनी वाढला. तर फोर्ट कंपनी नुकसानात जाऊ लागली आणि लवकरच या कंपनीचं दिवाळं निघालं. फोर्डला सर्वात मोठं नुकसान रेंज रोवर आणि जग्वार या गाड्यांमुळे झालं होतं. रतन टाटा यांनी या दोन कंपन्या विकत घेण्याचा निर्णय घेतला. या डीलसाठी विल फोर्ड आणि त्यांचे काही शेअरहोल्डर्स भारतात आले होते, तेव्हा त्यांनी रतन टाटा यांना म्हटलं होतं की, 'तुम्ही आमची कंपनी विकत घेऊन आमच्यावर फार मोठे उपकार करत आहात.' तेव्हा या वरून हेच लक्षात येते कि मोठी लोकं अपमानाचा बदला आपल्या कर्तृत्वाने घेतात. अपमानाला आपली ढाल बनवतात. अपमानाने हातपाय गाळून बसत नाहीत.

तिसरी गोष्ट आहे 2014 ची ज्या वेळी न्यू यॉर्क टाईम्स ने भारताच्या स्पेस एजन्सी ची खिल्ली उतरवताना व्यंग चित्र काढून केली. गाय आणि सापांचा मागासलेला देश काय आमची बरोबरी करणार. इस्त्रो मधील शास्त्रज्ञांना याची चीड आली परंतु त्यांनी अपमानाचे उत्तर व्यंग चित्रला प्रति उत्तर ट्विट करून नाही तर चंद्रयान यशस्वी करून दाखवले सायकल वरूनचा हा आतापर्यंतचा प्रवास किती खडतर असेल विचार करा अनेक शास्त्रज्ञांनी अनेक वर्षे मेहनत घेतली त्यावेळी आजचा हा सुवर्ण क्षण आला आहे. चंद्रयान मुळे आज जगात भारताची मान उंच झाली आहे. झालेल्या अपमानामुळे हातावर हात धरून शास्त्रज्ञांनी काहीही कष्ट केले नसते तर आजचे यश संपादन करणे कधीही शक्य झाले नसते.

आपण अनेक वेळा अपमानाने अगदी हतबल होतो. आतल्याआत कुढत बसतो. पण यातुन काहीही साध्य होत नाही. अपमानाचे चोख उत्तर द्यायचे असेल तर जिद्दीने काम करावे लागेल. मोठे यश संपादन करावे लागेल. कर्तृत्व दाखवावे लागेल. स्वतःला मजबूत करावे लागेल. तुम्ही गाजवलेले कर्तृत्व हाच सर्व अपयशाचा उतारा आहे. तुम्ही मिळवलेले उत्तुंग यश हाच तुमच्या अपमानाचा बदला आहे.

**महेश भा. रायखेलकर**
**सोलापूर**
**मो.९३२६६१२४३६**

# अभिवादन



आलं कीती राजं गेलं कीती
शाहू राजांच गुणगान गाऊया
अभिवादन करण्या छत्रपतींना
शंभर सेकंद स्तब्ध राहूया ।।धृ ।।
गोरगरीबांचा त्यांना ध्यास
रात्रंदिन ते झटले खास
त्यांना खूपच कुस्त्यांचा छंद
अस्वलाशी दीली त्यानी झूंज
ऊभं राहीलं आपल्या माग,
त्यांच गूणगाण आज गाऊया ।।
प्रजा सुखी होती राजाची
त्यांना चिंता होती शिक्षणाची
गावोगावी शाळा काढून
केलं सकला हो सुजन
ऊद्योगाची चाक फिरवली,
त्यांना आदरांजली वाहूया ।।
धरण राधानगरी बांधून
जातीपातीला टाकलं गाढून
राजा रशिक होता नाटकाचा
छंद त्यांना फार कुस्तीचा
सुजलाम सुफलाम झाली शेती,
धरण राधानगरी पाहूया ।।
छंद प्राण्यांचा हत्ती घोड्यांचा
आदर्श ठेविला शिवरायांचा
कलाकाराची कदर केली
तोच होता जनतेचा वाली
म्हणती दलितासोबत आनंदाने,
चहापान घेऊया ।।
झाली राजांना जाऊन शंभर वर्ष
आज मनाला झाला खूप हर्ष
त्यांच्यामूळच शिकलो खुप
शिक्षणामुळच बदललं रुप
कृतज्ञतापूर्वक शिश झुकऊनी,
लोकराजाला स्मरूया ।।



हरिबा महादेव कोळी
दानोळी, कोल्हापुर
मो. 7588270093

# श्री स्वामी समर्थ



गुरू माऊली तू तारणहार
जीवाला माझ्या तूझा आधार
तूच मायबाप बंधू सखा श्रीधर
नको करू देवा कूणा निराधार.....

गोमाता जणू ब्रम्हांड जपती
तशीच तू माता सारं काही जाणती
नको देवा आणू मनात रे भीती
तूझ्या आशिषाने होतसे उन्नती......

आई मी लेकुरवाळी जरी
लेकरांची चिंता सदैव या उरी
मन सांगे सतत तूच रे तारी
तूजवीन दयाळा आम्हा कोण तारी....

संकटाने शिणला जीव माझा हरी
किती परिक्षा देऊ देवा तूच सांग खरी
तू असे पाठीशी म्हणून होते बरी
तूच असावा सदैव आमच्या अंतरी.....

**सौ.मनिषा पिंटू वराळे.**
**धरणगुत्ती**
**मो.7057225407**



# का टाळतोस



अधिपती तू जगताचा
सारेच तुजला ज्ञात
का टाळतोस मला
धगधगते ज्वाला आत

म्हणे मी स्त्री सबला
युक्त साऱ्या कलागुणांनी
सक्षम असता डावलून
लक्तरे अशी का भोगांनी?

काय केला मी गुन्हा?
आई बहीण,लेकी बाळी
हृदयस्थानी पूजिता
अवहेलना लिहिली भाळी

क्वचित अंशी ठेच लागूनी
येतेच शहाणपण अंगी
तुझ्या कृपेने मती सावरेल
नको निवाडा वरपांगी

सत्यतेची पाळे-मुळे
लपवून व्यवहार जगाचा
ना तुझाही राहिला धाक
लज्जा,भीती ह्या शिलाचा

नको रे आयुष्य उध्वस्त
बाल्य, तारुण्य उपभोगात
जगणे सुंदर अपेक्षित दृष्टी
तुझ्या कृपेने मती प्रत्यक्षात

पूजनीय दुर्गा,शक्ती देवता
स्थान अनेक रुपे वंदनीय
स्वाभिमानी जगणे अवलंब
सार्थक जन्मीचे शोभनीय

**सौ. राजश्री संजय जाधव**
**सोलापूर**
**मो.94204 88733**

# जीवन अपूर्णत्व



माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील सुख _ दुःखा शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील चढ _उतारा शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील प्रत्येक प्रसंगा शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील चांगल्या वाईट माणसा शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील त्याला मिळालेल्या नात्यां शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील मान _ अपमाना शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील रडण्या _, हसण्या शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील देण्या _ घेण्या शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील स्वप्न अन् इच्छा पूर्ती शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील जबादारी अन् कर्तव्या शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील सत्कर्म अन् भक्ती शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील सद्गुण, सदाचार अन् चांगले संस्कार या शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील सकारात्मक विचार अन् सद्बुद्धी शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील आई वडील अन् त्यांच्या पासून मिळालेल्या नात्यांशिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील स्व जाणीव अन् अनुभवा शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील समजून घेणे, तडजोड अन् त्यागाशिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील त्याने घेतलेल्या योग्य निर्णया शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील आत्मिक आनंद या शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील आंतर _ बाह्य जगण्यातल्या ज्ञानाशिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील परमेश्वर रूपातील सद्गुरु शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील त्याचे स्व प्रयत्न अन् आई _वडीलांचे आशीर्वाद या शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील भक्ती रुपी श्रद्धा,प्रेम, विश्वास अन् सबुरीतत्वा शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील स्व _ अस्तित्व, स्व _शोध, स्व _कर्तृत्व या शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील जगण्याचा,वागण्याचा, आरोग्याचा,बोलण्याचा अन् आपलेपणाचा समतोल या शिवाय अपूर्ण आहे

माणसाचे जीवन हे त्याच्या प्रवासातील ईश्वरप्राप्ती अन् आनंद अनुभवा शिवाय अपूर्ण आहे

**सौ. सुस्मिता रेंदाळकर**
**पुणे**
**मो.98819 85279**

# पंख



मनामधल्या स्वप्नांना
पंख मिळू दे आशेचे
झरा वाहण्या प्रेमाचा
नको अंतर भाषेचे

अंधःकार दूर होण्या
निराशेला देऊ फाटा
द्वेष भावना सोडता
लाभतील मग वाटा

लाभो सदैव जीवन
मना मनातील भाव
स्वप्नामध्ये सुंदरसा
एक पाहिलेला गाव

एक पाहिलेला गाव
मनामध्ये तो बसला
किलबिल करी पक्षी
बुद्ध तेव्हाच हसला

प्रा. सौ. वर्षा विलास कावरे
मूर्तिजापूर
मो.9021673178



# दो आँखे बारह हाथ



'ए मालिक तेरे बंदे हम' स्वर सम्राज्ञी लता मंगेशकरच्या मधूर कातर स्वरातील या सुश्राव्य गीताने मन हेलावुन जात. अंगावर रोमांच उभे राहतात. अंतर्मुखता येते. दो ऑखे बारह हाथ मधिल कैदी सुद्धा या हळव्या गीताने कळवळून जातात. त्यांचे पाषाणहृदय पाघळून त्यांच्या डोळ्यात अश्रु उभे राहतात. व्ही. शांताराम यांचा 'दो ऑखे बारह हाथ ' हा चित्रपट प्रभावी परिणामकारी चिरस्मृतीत राहणारा आहे. त्या काळात दरोडेखोरांचे हृदयपरिवर्तन हा ज्वलंत आगळा, क्रांतीकारी विषय होता. वास्तव ज्वलंत विषयावरील सामाजिक बांधिलकी ठेवणारा, समाजमनात परिवर्तन घडवून आणणारा हा चित्रपट मैलाचा दगड ठरला.

सत्यघटनेवर आधारित 'दो ऑखे बारह हाथ ' हा एक प्रयोगशील चित्रपट होता.औंध राजाने केलेल्या प्रयोगाची गोष्ट ग.दि.माडगूळकर यांनी व्ही शांताराम यांना सांगितली. शांताराम यांना ही कल्पना खूप आवडली. आणि त्यांनी गदिमा यांनाच चित्रपट कथा लिहायला सांगितली.

एका जेलरचे दोन डोळे आणि सहा कैद्यांचे बारा हात....दो आंखे बारा हाथ ! नावातच सारं समावल आहे. ते दोन करारी डोळे शिस्तीने, प्रेमाने दरोडेखोरांच्या कुकर्मी हातांना विधायक वळण देऊन त्यांचे मत परिवर्तन करुन त्यांना सामान्य नागरी जीवन जगायला लावतात. एक सूत्र, एक उद्दिष्टय, एक संकल्पना,कल्पकता, समाजजीवनाशी बांधिलकी, आशयाघनता असल्यास चित्रपट यशस्वी होतो. हे व्ही. शांताराम सारख्या कल्पक निर्मात्याला जमले. त्यांनी त्यांच्या चित्रपटातून सामाजिक मूल्य जपलीत.

सिनेमाची सुरुवात एका जेलच्या दृष्यापासून होते. जेलचा सुपरिंटेंडेंट अतिशय क्रूर दुष्ट, कैद्यांबरोबर अमानवीय व्यवहार करणारा असे समजतात.. पण या ठिकाणी जेलर आदिनाथ सरळ,माणुसकी जपणारा,क्षमाशील व्यक्ती आहे. शिक्षेनी माणूस सुधारत नसून मानवीय वागणुकीमुळे अपराधी सुधारतो या जेलरच्या वैचारीक बैठकीवर हा प्रयोग असतो.

जेलरने उच्चाधिकाऱ्यांना शिक्षा झालेल्या सहा भयंकर अपराधींना जेलमधून सोडण्याची अनुमती मागितली. कारण जेलरला कैद्यांना मोकळ्या वातावरणात ठेवून हृदय परिवर्तन करुन त्यांना एक चांगला नागरिक बनवायचे आहे. या प्रयोगाकरिता जेलरला अनुमती मिळते.

खून,हिंसा,हत्येच्या आरोपाखाली हे गुन्हेगार शिक्षा भोगत असतात.या दुष्ट प्रवृत्तीच्या गुन्हेगारांना जेलर आपल्याबरोबर मोकळ्या जागेत रहायला नेतो.

जेलर आदिनाथ सततच्या प्रयत्नाने

गुन्हेगारांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. पाऊस येतो."उमड घुमडकर आई रे घटा " या गाण्यावर सगळे नाचतात. भिजल्या जमितीत दरोडेखोर शेती करायला सुरुवात करतात.जेलर त्यांना कुत्सित,दुष्ट, वाईट विचारापासून निवृत्त करण्याचा अतोनात प्रयत्न करतात.खतरनाक कैद्यांना सुधारणे सोप नसतं. पण हळूहळू त्या अपराध्यांना जेलरचे दोन अदृश्य डोळे दुष्प्रवृत्तीपासून,

दुष्कर्मापासून, चुका करण्यापासून थांबवतात. कथानकात उतार-चढ़ाव असून अपराधी चूकतात,आणि पुन्हा सुधारतात.

शेवटी एका सांडाच्या अंगावर येण्यापासून जेलर कैद्यांचे रक्षण करतो.पण सांडाशी झुंज देतांना जेलर आदिनाथचे प्राण जातात. आदिनाथचा त्याग,जबाबदारी,माणुसकी यामुळे प्रभावित होऊन अपराध्यांचे हृदय परिवर्तन होते.ते सर्व आदर्श नागरिकाचे जीवन व्यतीत करण्याचा संकल्प करतात.

डाकू जीवनाला कंटाळलेले डाकू शरण येतात. त्यांना सामान्य नागरिकांप्रमाणे, सामान्य जीवन जगण्याची हौस असते. शेवटी तेही माणसच आहेत. भूतकाळ विसरुन वर्तमानकाळात नवजीवन जगायचे असते. हा भावार्थ, ही वास्तविकता, प्रायोगिकता व्ही.शांताराम

यांनी प्रदर्शित केली आहे.जेलर हा शिक्षा देणारा नसून त्यांच्या जीवनाला योग्य वळण लावणारा दिशादर्शक आहे. डाकू प्रवृत्तींच्या माणसांना वळण लावतांना, त्यांच्या प्रवृत्तीत बदल घडवून आणतांना अनेक अडचणीवर शेवटी जेलर मात करतो. डाकूंचेही मतपरिवर्तन, हृदय परिवर्तन होऊन ते सामान्य माणसं बनतात हे या सिनेमाचे विषेश होय. यावर सिनेमा केंद्रीत असून शेवटी डाकू जीवन परिवर्तन उद्दीष्टाप्रत सिनेमा पोहचतो.

व्ही.शांताराम यांनी एका उत्कट उदात्त हेतुने हा चित्रपट प्रेक्षकांपुढे सादर केला. चित्रपट अतिशय परिणामकारक लक्षणीय,चिरस्मरणीय

ठरला. तो खूप गाजला.. दो ऑखे बारह हाथ अविस्मरणीय चित्रकृती ठरली.

1. "ऐ मालिक तेरे बंदे हम" ; 2. "तक तक धुम धुम" ; 3. "मैं गाऊं तू चुप हो जा" ; 4. "सईयां झूठों का बडा सरताज निकला" ; 5. "हो उमड घुमडकर आई रे...

गाणी भरत व्यास यांनी लिहिले असून संगीत वसंत देसाई यांचे आहे.निर्माता दिग्दर्शक नायक व्ही शांताराम आहेत.

हृदयपरिवर्तनाचा हा प्रयोग फक्त सिनेमा पुरता नाही. जयप्रकाश नारायणांनी चंबळच्या डाकूंना शरणांगती दिल्यावर सेवाग्रामला त्याचे पुनर्वसन केले. त्यांना सामान्य जीवन,प्रतिष्ठा देऊन त्यांना काम दिले. कार्यक्रमात सहभाग दिला. त्यांनी ही जनतेत विश्वास संपादन केला.

या ठिकाणी एक प्रसंग नमूद करावासा वाटतो. पन्नास वर्षापूर्वी घडलेली सत्य घटना आहे. वर्धेला माझ्या चुलत बहिणीचे लग्न होते. मांडवात पंगत बसली होती. तेंव्हा लग्नाच्या पंगतीत बायका आणि मुली वाढायच्या. लग्नात बायका सोन्या मोत्याचे अलंकार घालून भारी साड्या नेसून सजून असायच्या. जेवणारे मनापासून जेवायचे. पंगतीच्या जेवणाची मजा काही और असायची.

लग्नाच्या पंगतीत वाढणाऱ्या महिला,मुली उत्साहानेआग्रहाने वाढत होत्या. जेवणारे आनंदाने जेवत होते.तेवढ्यात कुणीतरी म्हणाले, “डाकू आले, डाकू आलेत”!.... एकच घाबरगुंडी उडाली. बायका मुली घाबरून तिथेच भांडे ठेवून भराभर आतमध्ये गेल्या. मोठमोठ्या मिशा असलेले,फेटे बांधलेले डाकू आले होते. काकांनी त्यांचे स्वागत केले.ते पंगतीत जेवायला बसले.काकांनी जेवतांना आग्रह केला.डाकू जेवून जाईपर्यंत एकही बाई बाहेर मांडवात आली नाही.

माझे काका सेवाग्रामचे ट्रस्टी,लिगल ॲडव्हाईजर असल्यामुळे त्यांनी या शरण आलेल्या डाकूंना जेवणाकरिता खास आमंत्रित केले होते. त्यांना सामान्य माणसांप्रमाणे प्रतिष्ठेने वागणूक देऊन त्यांचे मनोधैर्य वाढवण्याचे कार्य केले.

सिनेमाचा सामाजिक जीवनावर परिणाम होतो. तसेच समाजाचे प्रतिबिंब चित्रपटात दिसते. अर्थात दोन्ही एकाच नाण्याच्या बाजू असल्या तरी सिनेमाचा समाजावर प्रभावी परिणाम होतो. सिनेमा जीवनपरिवर्तनाचे माध्यम आहे.त्यामुळे सामाजिक बांधिलकीचे सिनेनिर्माताने भान अवश्य ठेवायला हवे. प्रभावी समाजप्रबोधन संवेदनशील चित्रपटांचा समाजावर आणि व्यक्ती जीवनावर परिणाम होतो.

आज गुन्हे, अपराध वाढत असून जेल कमी पडत आहेत. जेल ही शिक्षा नसून गुन्हेगाराला सुधारण्याची संधी देण्याची, नवजीवन देण्याचा प्रयत्न करण्याची पाठशाळा आहे हे “दो आंखे बारह हाथ “ ने दाखवून दिले. व्ही. शांताराम सारखा कल्पक प्रायोगिक निर्माता दिग्दर्शकामुळे ही चित्रकृती अमर ठरली.

**मीना खोंड**
**मो.7799564212**

---

# स्वप्नातले घर



स्वप्नामधले घर ते सुंदर,
मिळेल का हो कधी रहाया ?
घराभोवती बाग ती रंगित,
डोक्यावरती हिरवी छाया !....१

निळ्या पांढ्या नभमंडपाखाली,
सृष्टी दिसे ती रम्य साजरी !
स्वप्नासम ते दृश्य देखणे,
पाहून होई वृत्ती हासरी !...२

गावाकडची लाल माती ही
अन् बगिचा सुंदरसा !
वसंतातले दिन येता मज
आठवतो मन भावनसा !....३

संध्या होता टेकडीवरी,
जाते बघण्या रवि किरणे !
लाल केशरी रंगांची उधळण,
नभात ते पसरून जाणे !....४

दूर डोंगराआड तो जाई,
केशर रंगी तो आभाळी !
सोडून जावे मला वाटते,
. शहरातील ही सांज काजळी !..५

**उज्वला सहस्त्रबुद्धे**
**पुणे**
**मो.8087974168**

# आत्मनिर्भर



असंख्य कळा सहन करून जन्माला घातले तिला,
राजकुमारी सारखे वाढवले तिला,

प्रत्येक संकटातून वाचवले तिला,
स्त्री शिकली प्रगती झाली,

हा विचार मनी बाळगला,
सगळ्या मान मर्यादा शिकवल्या  तिला,

ते का वासनांध, विकारी पुरुषाच्या हाती पडायला?
प्रत्येक आई बापाने शिकवावे आपल्या मुलीला,

स्वतःची अब्रू  वाचवायची कशी हे शिकवा तिला,
चांगल्या वाईट स्पर्शाचे ज्ञान द्या तिला,

शिवरायांच्या काळातील चौरंगाशिक्षेची समज ही द्या तिला,
डान्स क्लासलाही पाठवा तिला, त्याआधी कराटे शिकवा तिला,

म्युझिक क्लासलाही पाठवा तिला, त्याआधी लाटी काठी शिकवा तिला,
मोबाईलचा डबड देण्यापेक्षा, पेपर स्प्रे चा वापर शिकवा तिला,

बाळ बोध शिकवताना वासनांध पुरुषाचे डोळे कसे फोडायचे हेही शिकवा तिला,
रक्षाबंधनाचे महत्त्व सांगा तुमच्या वंशाच्या दिव्याला,

पर स्त्री मातेसमान ही जिजाऊंची शिकवण द्या त्याला,
मेहंदी लावणाऱ्या त्या नाजूक हातात हत्यार द्या स्व संरक्षणाला,

द्रोपदीला वाचवायला कृष्ण आला होता, पण तूच हो तुझा कृष्ण हे ठणकावून सांगा तिला,
एवढं सगळं करूनही फरक नाही पडला, त्या वासनांध विकारी पुरुषाला,

वार करायला शिकवा त्याच्या गुप्तांगाला,
म्हणजे तो परत धजणार नाही, कोणत्याही स्त्रीला हात लावायला,

झाशीची राणी बनवा, तुमच्या काळजाच्या तुकड्याला, तिच्या स्वसंरक्षणाला.....

**सौ. अर्चना पाटील.**
**जयसिंगपूर**
**मो.8308331888**

# देहे दुःख तें सुख मानीत जावें



लहानपणी काही झालं तरी लगेच आईला हाक मारत आपण असू. याचा अर्थ प्रत्येक गोष्टीचं उत्तर तिच्या कडे आहे ही भावना मनात तयार असायची. 'बरं ठीक आहे मी पाहाते.' असं कानावर आलं की हायसं वाटायचं. खरंच ती काय जादू होती. तशी काहीच नाही पण आपल्या मनातले भाव आई पर्यंत पोहचवणे आणि स्वतः मोकळे होणे. किती गहन अर्थ आहे हे आज लक्षात येतं. कारण त्याची खरी आवश्यकता मोठेपणी असते. पण मोठेपणाच्या दबावाखाली आम्ही ते करत नाही. मोठं झाल्यावर कुणाला बरे हाक मारायची. तर समर्थ सांगतात की "सदा सर्वदा प्रीति रामी धरावी।".

माणसाची एक स्वाभाविक प्रवृत्ती असते की त्याला कुणीतरी आपलं असं नेहमी हवं असतं. लहानपणी जशी 'आई' तसं थोडं मोठं झालं की 'मित्र'. पुढे नोकरी मध्ये सुद्धा असा कुणी तरी असावाच लागतो. जिथे म्हणून आपण जीव लावतो तिथे मन मोकळं करण्याची हमखास परवानगी आपण आपल्या मनाला देत असतो. मग ज्या देवाने आपल्याला हा देह दिला तो कुठे आहे? आपण आपल्या व्यस्ततेत त्याला विसरलो आहे. आपलं जीवन आपल्या हातात नसतं. ना आपण आपल्या मर्जीने या जगात आलो ना आपल्या मर्जीने जाऊ शकू. ते सगळं त्याच्या हातात असतं. पण ती जाणीव, तसा अनुभव येत नसल्याने आपण त्या परम ईश्वराला विसरलो आहे. कुणावर तरी विश्वास टाकायचा तर तो राम का नाही?, कुणावर तरी निर्व्याज प्रेम करायचे तर ते रामावर का नाही? हा प्रश्न आपल्याला पडला पाहिजे.

विषय आपल्याला सुखावतात म्हणून आपण चटकन विषयांच्या आहारी वळतो. पंच ज्ञानेंद्रिये तशी बाह्य देखाव्याकडे सहज जातात. पण तिथे मिळणारे सुख अखंड समाधान देऊ शकत नाही. त्यासाठी शाश्वत सुख, परमसंतोष वा आंतरिक समाधान, प्रसन्नता मिळवून देणारी गोष्ट शोधावी लागते. मुळात ती आपल्या आत विद्यमान असते पण आपलं मन तिकडे वळत नाही म्हणून ते कळत नाही. बाह्य जगाला मर्यादा आहे. आणि आजचा काळ हा "युज ऍंड थ्रो" चा असल्याने माणसाची नजर, मन सतत भिरभिरत असतं. या भिरभिरण्यात मनाला शांती नसते पण वेळ घालवायची औट मजा असते जी माणसाचे जीवन अलगदपणे ध्वस्त करत असते. ते हवेहवे वाटणे म्हणजेच आसक्ती असते. आणि आसक्ती ही 'विकार' वर्गात मोडते हे कळायला काळ जावा लागतो. तेव्हा कळतं की आपण फसलो गेलो आहोत.

लहानपणी दोन अधिक दोन करायला हाताची बोटे उपयोगी होती. मोठं झालं की ती स्मृती मनात पक्की झाली असायची मग हाताची बोटे वापरणं 'ढ' पणाचं लक्षण मानल्या जातं. सरावाने माणूस तयार होतो. मनातच गणित करत जातो आणि क्षणात उत्तर देऊ शकतो. ही किमया सरावाने साधल्या जाते. व्यवहारात प्रत्येक क्रियेला प्रतिक्रिया असते तशी मनात ती क्षणात तयार होऊ लागते ही विशेषतः आपल्यात तयार झालेली आपल्याला कळलं की मोठेपणाची जाण आपसूकच उत्साहाने प्रगटू लागते. परिक्षेत लवकरात लवकर उत्तरं द्यायची सवय करणं हे कष्ट माणूस सहज स्वतःला लावून घेतो, कारण तिथे आत्मविकास लपलेला असतो. त्या आधारे आम्ही प्रगती करणार असतो. मग कितीही कष्ट झाले तरी ते सहन करण्याची ताकद आपसूकच मनात तयार होते. ते क्षण सुखाने भारावले असतात. आपलं भलं व्हावं ही मनिषा प्रत्येकात असतेच. उत्तम आरोग्यासाठी माणूस व्यायामाचे प्रकार करतो. घाम गाळत त्याचा सराव करतो आणि सुदृढ शरीरसौष्ठव प्राप्त करतो. असे हे कष्टप्रद जीवन जगण्याचा हक्क आपण स्वतः तयार करून घेतो कारण तिथे सुखाची अनुभूती प्राप्त होणार असते.

आत्मा हे माझे स्वरुप आहे. देह म्हणजे मी नव्हे. हा सिद्धांत पूर्णपणे सत्य असला तरी त्याचा अनुभव घेणे ही गोष्ट सोपी नाही. देहबुद्धी सोडतो म्हणताच सुटत नाही. मी आत्मा आहे म्हणताच आत्मसाक्षात्कारही होत नाही. माणसाचे संस्कार, त्याचे प्रारब्ध, त्यामुळे असणारी प्रकृती, प्रवृत्ती वा परिस्थिती यामुळे श्रद्धाभावाने वाचलेल्या ग्रंथातून शब्दज्ञान झाले तरी ते अनुभवास येण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांचा कालावधी फार दीर्घ असू शकतो. तो केवळ वर्षांच्याच नव्हे तर कधी कधी जन्मांच्या संख्येने मोजावा लागतो आणि यामुळेच समर्थांनी 'स्वस्वरुपी विवेके भरावे' असे सांगितले आहे. अशाच रितीने सदा सर्वकाळ भगवंताची आठवण आपण जोपासली पाहिजे. त्याप्रती विनम्रता ठेवली पाहिजे. भले अनुभव चटकन झाला नाही तरी विश्वास ठेवला तर तो नक्कीच जीवन समृद्ध करणारा असतो. माणसाला आपले व्यक्तिमत्व तयार करायला तो मार्गदर्शन करणारा असतो हे कायम लक्षात ठेवावे.

सुख नेमकं असतं तरी काय, तर मनाला शांती आणि समाधान देणारी भावना. आपली भूमिका आपलीच असते ती दुसऱ्याला पटेल हे नक्की ठरतच नाही. आपलं सुख हे कदाचित दुसऱ्याचं दुःख होतं तेव्हा कळतं सुखाला

इंद्रधनुष्य का म्हणतात ते. तो आकाशात दिसणारा भास असतो. पण मनाला खुलवणारी ती घटना क्षणात विरुन जाते तेव्हा समजतं की ती एक भौगोलिक प्रतिक्रिया होती. सुखाला जपून ठेवता येत नाही. दुःख मात्र मनात पुन्हा पुन्हा उफाळून वर येत राहतं.

मग यात सुख शोधायचं कसं?....

परिक्षा जवळ आली की आपण खूप मेहनत करतो. तहान भूक विसरून जातो. कां? परिणामी प्राप्त होणारा आनंद महत्वाचा आहे. पदोन्नती साठी काय काय कष्ट माणूस सहज करत जातो. वेळेचे भान विसरून जातो. पण पदोन्नती चा आनंद जीवन घडवणारा असतो. नेमकी ही बाब लक्षात आली की मग आपण जीवन घडवणाऱ्या त्या सर्व गोष्टी करण्यास उद्युक्त होतो. विवेक जागृत ठेवला तर जीवनाला समृद्ध करण्याचं पाठबळ सहजपणे आपल्या हातात येतं. तेच समर्थ रामदास आपल्याला या मनाच्या श्लोकातून सांगत आहेत.

'मी म्हणजे कोण?' हे या सर्व प्रक्रियेतून आपण समजून घेत आहोत.

त्या आधारे आपला विकास कसा करावा ते बघतो आहोत.

त्यासाठी कशाचा आधार घ्यावा ते ठरवतो आहोत.

मन कशा गोष्टींकडे लावलं पाहिजे ते बघत आहोत.

या सर्व प्रक्रियेतून आत्म जागरुकता कशी बळकट होईल ते बघतो आहोत.

आपले विचार, वर्तन आणि भावना यांची क्षमता कशी सकारात्मक शक्तीत परिवर्तित होईल ते आपण बघतो आहोत.

वर्तमान क्षणात मी कुठे आहे ही सावधानता, दक्षता घेणं जरुरी आहे.

आपली मुल्ये-ध्येय कशी महत्वाची आहेत ते निश्चिती करणे आवश्यक आहे.

आपल्या अनुभवातून आपण आपल्या चुकांना कसे समजून विकासाच्या दिशेने वाटचाल करतो आहोत ते बघून आपली जिद्द चिकाटी आणि जिज्ञासा जोपासली पाहिजे, हे बघतो आहोत.

माझी वेळ, माझा प्रवास, माझी मेहनत हे सर्व आपले धोरण निश्चित करण्यात सहाय्यक कसे होतील ते आपण बघतो आहोत.

अर्थातच स्वतः बद्दल सखोल समजून घेण्यासाठी तरी एक ओवी आपण अनुभवली पाहिजे, ज्या आधारे आपण व्यक्तीमत्व विकासाला चारपट समर्थ करु शकू. देहाचे आरोग्य, इंद्रियांची तृप्तता, मनाचा संतोष, बुद्धीची स्थिरता या क्रमानें आत्म्याच्या प्रसन्नतेपर्यंत माणसाला पोचावयाचे असते. म्हणून देहाभिमान सोडून आत्मस्वरुपाचा साक्षात्कार कसा होईल ते बघणे म्हणजेच "देहेदुःख तें सुख मानीत जावे" असा उपदेश समर्थ करत आहेत.

विकास प्रक्रियेतील सर्व अडथळे हे, विवेक जागृत ठेवून सहज भावनेने स्विकारले तर उज्वल भविष्याचे किमयागार आम्हीच असू यात दूमत नाही.

**अतुल ठाकरे.**
**नागपूर**
**मो.९४२२९१०३४७**



# दिवाळी सण खास



तुळशीचे लग्न होता
दिवाळी संपुन जाते
परी सुट्टी संपू नये
असे छोट्यांना वाटते

कशी समजावू त्यांना
दिवाळी चार दिवस
म्हणून आहे गंमत
दिवाळी सण खास

मिळून सर्वांनी केला
फराळाचा सारा घाट
लुडबूड बालकांची
आवरता दमछाक

झगमग फटाक्यांचा
माझे चिमणे चमके
इवलेसे हात मग्न
दिवे लावण्यात झाले

आकाश कंदील बघा
किती सुंदर बनला
चिमुकल्या हाताने ती
आकारात आली कला

विसरून राग द्वेष
एक होती आप्त जन
फराळाच्या चवीसम
तिखट गोड हो एक

आठवणी अशा खूप
वर्षभर आठवती
पणती प्रकाशासम
मंद मंद उजळती

**सौ. प्रज्ञा सचिन देशपांडे**
**सांगोला**
**मो.8600013008**

# आई बाप



आई आहे माझी वासल्याची खाण
बाप माझा ममतेचे शिखर महान.

बाप संस्काराची आहे देणं
माय माझी मातृत्वाचे लेण.

बाप प्रपंचाचा आहे चालक
महन संस्कृतीचा तोच द्योतक.

आई बाप जीवनाच्या गाडीचे दोन चाक.
तरी बाप्पा विना नाही ध्येयाचा धाक.

बापच असतो ध्येयाचा वसा.
बाप से बेटा सवई म्हण जैसा.

जरी आई करते प्रेमाने संगोपन
तरी बापाविना नाही लालन पालन.

जिजाऊ माता माऊली शिवबाची
शहाजी राजे तलवार पराक्रमाची

आई जैसी कस्तुरीचा गंध.
बाप तैसा मोगऱ्याचा सुगंध.

आई आपुलकीची आहे माया.
बाप वटवृक्षाची शितल छाया.

बाप धैर्याचा भव्य महामेरु.
बापाचं आहे जीवनाचा तारु.

**डॉ. मधुकर हुजरे**
**धाराशिव**
**मो. 7796889974**

# देवघराची फुले...



भावी पिढीचा एक महत्वाचा आणि तरीही दुर्लक्षित असा घटक म्हणजे रेड झोन मधील मातांची मुलं. भयाण वातावरणात जन्म घेणारी ही निष्पाप मुलं आपलं बालपण अत्यंत असुरक्षित अशा वस्तीत व्यतीत करत आहेत आणि बालहक्काच्या मूलभूत गोष्टीदेखील या बालकांना उपलब्ध होत नाही. या मुलांच्या मानसिक, सामाजिक व आरोग्य या विषयावर

या विषयावर आचार्य पदवी प्राप्त करणारी मी महाराष्ट्रातील पहिली महिला अभ्यासक आहे.

या अभ्यासाच्या आधारावर मी काही संशोधनात्मक सत्य कथा लिहिल्या आहेत तसेच माझी पुस्तकं प्रकाशित झाली आहेत.. (research case work) या कथा आणि त्यांची त्रासद बाजू, यांची चर्चा करताना काही घटनांचा उल्लेख करता येईल.

एकदा मी रेड झोन मधील एक सहा सात वर्षाच्या मुलीला आणि तिच्या आईला भेटायला गेले होते. शब्बो मला बघून धावत माझ्याकडे आली आणि अचानक तिने माझी चाचणी घ्यायला सुरुवात केली.तिने पहिला प्रश्न टाकला,"दीदी,क्या मै और माँ यहां से दूर जा सकेंगे?"तिचे चमकणारे डोळे मला होकारार्थी उत्तर मागत होते.

"तू रोज स्कुल जाया कर. पढाई करके बडी बन जयेगी तो, माँ को लेकर यहांसे चली जाना." मी शब्बो च्या डोळ्यात एक स्वप्न पेरलं होतं जणु.

" मैं अगर रोज स्कुल जाऊं तो, मै इस बस्ती से बाहर जा सकुंगी ना दीदी?" आठ वर्षाच्या चिमुकलीने मला परत प्रश्न विचारला होता. अश्या अनेक शब्बो इथे एका शिक्षण ज्योत च्या प्रतीक्षेत आहेत.

या मुलांना सामान्य जीवन प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण हे एकच उत्तम माध्यम आहे याची जाणीव झाली आणि या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहाशी जोडण्याचे माझे प्रयत्न सुरु झाले.

वेश्यावस्तीच्या एकूण वातावरणाचा अभ्यास करता, वेश्यावस्ती म्हणजे एक अनौरस ठरवलेल्या व्यवसाययाची बाजारपेठ. तिथलं निरागस पिकं म्हणजे वेश्या मतांची ही लहान लेकरं. काहीच दोष नसताना इथल्या असुक्षित वातावरणात बालपण नासत जातं, जळतं राहतं. तारुण्याच्या उंबरठ्यावर येण्याआधीच करपून जातं. पोटभर अन्न, अंग झाकण्या इतपत कपडे आणि सुरक्षित निवारा या मुलभुत गरजा पूर्ण होणे हे देखील स्वप्नच त्यांच्यासाठी. फुटा फुटावर जुगाराचे अड्डे, सिगारेटचा धुर, दारुचा वास, उघडी गटार, कचऱ्याचे ढीग, फुटलेल्या दारुच्या बाटल्यांचा काचेचा चुरा सर्वत्र पसरलेला असतो वस्तीत तो, मुलांच्या इवल्याश्या पायांना टोचत राहतो दिवसभर. कचऱ्यातून वेगवेगळ्या प्रकारच्या दारुच्या बाटल्या शोधुन काढताना गुलाबी हातावर कितीतरी जखमा होतात. या बाटल्या भंगरवल्याला विकुन त्या पैशाचा जुगार खेळतात. दोन अधिक दोन चार हे गणित शिकण्याआधीच वस्तीने त्यांना दो का चार हा सट्टा शिकवला असतो. गिर्हाईकांना दारुच्या बाटल्या, सिगारेट अणि लागेल ते आणुन देणे हा त्यांचा पहिल्या कामाचा अनुभव असतो.त्यातुन मिळालेल्या चार दोन पैशानें वस्तीत सुरु असलेले सगळे अनौरस प्रयोग करुन करुन ते बालपण होरपळत जातं. वेश्यावस्तीत आईच्या खोली पासुन शाळेचे दीड किलोमीटर एवढं अंतर गाठायला मुलांना वस्तीतल्या पेटत्या रणांगणातून जावे लागते. कसे पोहोचतील सुरक्षित शाळेपर्यंत? मीच विचारचक्रात अडकले होते. शब्बोच्या सकारात्मक उत्तर देणं गरजेचं होतं. मी म्हणाले," हां तू मन लगाकर पढाई कर. और रोज स्कूल जाया कर".शब्बोला पावती मिळाल्याचा आनंद झाला.

रेड झोन मधील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणं खूप मोठं आव्हान होतं आणि आहे. ph D करताना मी या मातांना,शाळेतील शिक्षकांना आणि मुलांना भेटत असे तेंव्हा प्रामुख्याने जाणवत असे की मुलांना त्यांच्या,कधी अपूर्ण कधी वडिलांच्या खोट्या नावाची चीड येत असे. आईचं नाव लावावं लागत असल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास ढासळत असे.यासाठी त्यांची मानसिक तयारी करुन देणं खूप महत्त्वाचं होतं. वारंवार त्यांच्याशी बोलून त्यांना शाळेची गोडी लावण्याचा प्रयत्न मी करत होते.लहान मुलांना अंगणवाडीत पाठवण्यासाठी पण मी मातांना तयार करत असे.

या निष्पाप बाळांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होऊन सामान्य जीवन जगता यावं आणि त्यांचं होरपळलेलं बालपण सुरक्षित होऊन एक सक्षम नवीन पिढी निर्माण व्हावी. अशा सकारात्मक विचारांची पेरणी या उद्देशाने हे प्रयत्न केले आहेत. मी मुलांच्या डोळ्यात वस्ती बाहेरच्या विश्वाचे स्वप्न पेरत गेले.शिक्षण,शाळा हे एकमेव माध्यम आहे जे त्यांना इथून बाहेर काढून एक सुरक्षित जीवन देऊ शकते. परिस्थिती इतकी भयानक आहे की,त्यांनी स्वतः इथून निघण्याचा निश्चय करणं गरजेचं आहे.अनेक संस्था,शासन यांच्या प्रयत्नांना या मुलांनी आपल्या स्वप्नांची जोड देऊनच हे शक्य होणार आहे.

वस्तीच्या आसपास अशी काही कुटुंब होती ज्यांना आर्थिक मदतीची गरज होती.आणि अशी कुटुंब या महिलांच्या मुलांना काही काळ आपल्या घरी राहण्याची परवानगी देतील यासाठी प्रयत्न केले. या महिला आणि मुलं प्रेम,नाती,घर या गोष्टीसाठी आसुसलेले होते त्यामुळे त्या महिला पैसे देऊन काही मदत करून अश्या कुटुंबाशी नाते जोडत होत्या.आणि मुलांना पण एक घर मिळत असे..आणि याच गोष्टीचा मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने कसा फायदा होऊ शकेल याचा विचार करून या कुटुंबांना आर्थिक मदतीचा हात देऊन जर काही काळ मुलं यांच्याकडे राहून शिक्षण घेऊ शकतील या प्रयत्नात मला काही प्रमाणात यश ओलं.काही कुटुंब यासाठी तयार झालीत.आणि अगदी थोडी मुलं का होईना काही वेळ या कुटुंबात राहू लागली.त्यामुळे त्यांना अभ्यास करण्यास जागा आणि वातावरण दोन्ही मिळू लागलं.

असे अनेक प्रयत्न करून काही अगदी थोडी का होईना मुलं शिकू लागली.आज ती मोठी झाली छान नोकरीला लागली आणि आपल्या आईला देखील तिथून बाहेर घेऊन गेली.

कुठलाही दोष नसताना ही मुलं अत्यंत दुर्लक्षित जीवन जगत आहेत, हे संपूर्ण समाजासाठी घातक आहे. या लाल दिव्याच्या वस्तीतील मुलांना त्याचे बालहक्क मिळायला हवे आहेत. त्यांना शिक्षणाची समान संधी मिळायला हवी आहे.या संधी द्वारे ते जीवनाच्या सामान्य प्रवाहात निश्चित सामील होऊ शकतात.

त्यासाठी माझं कार्य सुरु आहे.

**डॉ. राणी दुष्यंत खेडीकर**
**मो.9370143014**
**अध्यक्ष बाल कल्याण समिती पुणे, महिला बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन**



# विषम



एक सकाळ.. रोजसारखीच..

लोकल गाडीचा महिलांचा डबा..
गर्दीचा..

सामान्य.. मध्यम.. उच्चभ्रू..
सगळ्या प्रकारच्या मुली.. बायका..

एक कॉलेजकन्या..
मस्त राहणी..
ब्रँडेड पर्स घेतलेली..
जीन्स टॉप घातलेली..
प्रचलित प्रथेनुसार जीन्स गुडघ्यावर दोन ठिकाणी फाटलेली..

की फाडलेली.. ?

काळजीमुक्त ती.. ईअर फोन लावून गाणी ऐकतेय..

समोर एक सामान्य दिसणारी कन्या..
कष्टकरी वर्गातली..
जीर्ण झालेली साधी पर्स घेतलेली..
अंगावर साधासा, विटका सलवार कमीज ल्यायलेली..
सलवार गुडघ्यावर फाडलेली..

की फाटलेली.....?

काळजीयुक्त ती.. टॉप सारखा करत ते लपवू पाहतेय..

एकीची फॅशन..
दुसरीचं प्राक्तन..

विषमतेचे कटू दर्शन......
आणि..
आपलं फक्त चुकचुकणं.. निव्वळ अर्थहीन.......

**मेधा फडके-मराठे**
**मो.98928 79105**

# अण्णाभाऊ साठे



जग बदल घालुनी घाव
सांगून गेले मला भीमराव

असे अण्णाभाऊ साठे म्हणतात. अनिष्ट धर्माच्या आचरणाने माणसाने जगणे हा धर्म नसून तो एक रोग आहे असे अण्णाभाऊ साठे म्हणायचे. जात हे वास्तव आहे.गरीबी ही कृत्रिम आहे.गरीबी नष्ट करता येऊ शकते पण जात नष्ट करणे हे आपल्या सर्वांचे काम आहे.असेही ते म्हणायचे.

मित्रांनो अण्णाभाऊ साठे हे एक समाज सुधारक तर होतेच त्याचबरोबर ते एक साहित्यिक, लेखक, कादंबरीकार देखील होते. अण्णाभाऊ साठे यांनी कादंबरी, कथा व्यतिरिक्त पोवाडा लावणी अशा विविध साहित्य प्रकारात भरपूर लेखन केले आहे. अण्णाभाऊंचे पूर्ण नाव तुकाराम भाऊराव साठे. त्यांनी शिवाजी महाराज यांच्यावर अनेक पोवाडे रचले.म्हणून त्यांना शिवशाहीर असे देखील म्हटले जाते.

ज्या जमातीवर ब्रिटिश राजवटीच्या काळात अपराधी म्हणून शिक्का मारण्यात आला होता. अशा घराण्यात अण्णाभाऊंचा जन्म झाला. त्यांचा जन्म १ ऑगस्ट रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा नावाच्या तालुक्यात वाटेगाव या छोट्याशा गावी एका आदिवासी मांग कुटुंबात झाला. अण्णा भाऊ साठे यांना आर्थिक परिस्थितीमुळे त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण करता आले नव्हते. तरी देखील त्यांना अक्षराची ओळख होती. म्हणजेच वाचता यायचे. गरिबी व भेदभावामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. ते वडिलांबरोबर मुंबईत आले. तिथे त्यांनी मिळेल ते काम केले. जगण्यासाठी त्यांना खूप संघर्ष करावा लागला. पण ते खचले नाहीत. नैराश्य हे तलवारीवरील साठलेल्या धुळी सारखे असते. धूळ झटकली की तलवार पुन्हा धारदार बनते अशी त्यांची विचारसरणी होती.

अण्णा भाऊ साठे यांना आपण पोवाडे लावणी रचणारा शाहीर म्हणून ओळखतो.पण पोवाडा व्यतिरिक्त अण्णा भाऊंनी अनेक उत्कृष्ट कादंबरी, कथांचे लेखन देखील केले आहे. त्यांच्या फकीरा,वैजयंता, माकडाची माळ, वारणेचा वाघ, आबी या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. तसेच खुळवाडा, कृष्ण काठच्या कथा, निखारा, पिसाळलेला माणूस, गजाआड हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

18 ऑक्टोंबर 1948 ला मुंबईच्या चौपाटीवर जी संयुक्त महाराष्ट्राची परिषद झाली त्यात अण्णा भाऊ साठे व शाहीर अमर शेख यांनी आपल्या पोवाड्याने संबंध जनसागर हेलावून सोडला. त्याच बरोबर 16 जानेवारी 1956 ला संयुक्त महाराष्ट्रासाठी शिवाजी पार्कवर जी सभा झाली त्याला तीन लाख लोक उपस्थित होते. येथूनच माझी मैना गावाकडे राहिली ही अण्णाभाऊंची लावणी प्रसिद्ध पावत गेली. या मंतरलेल्या दिवसांनी महाराष्ट्राला गुंगवून ठेवले.जागवले.पेटवले. एक वादळ, एक तुफान जागे केले. एवढी ताकद त्यांच्या लावणी आणि शाहीरी मध्ये होती.

अण्णा भाऊ साहित्याच्या दृष्टीने एक शाहीर, एक कवी, एक अभिनेता, कुशल संघटक होते. परंतु त्यांची नाळ कामगार वर्गाशी जोडली गेली होती.अण्णा भाऊंनी श्रमिकांविषयी पोट तिडकिने आपली लेखणी चालवली. अण्णा भाऊंचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाकडे जाणारा होता. बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान सर्व दूर पसरण्यासाठी शाहिरी आणि पोवाड्यातून लोक जागृतीचे काम केले.

अण्णा भाऊ साठे यांची जयंती १ ऑगस्ट रोजी साजरी केली जाते. संपूर्ण मातंग समाज नव्हे तर सर्व तळागाळातील जाती देखील त्यांची जयंती मोठ्या उत्साहाने जल्लोषाने साजरी करतात.म्हणूनच असे म्हणावेसे वाटते

समाजात जगण्यासाठी
दिले ज्यांनी अभिमानाचे स्थान.
साहित्य आणि लोककलेतून त्यांनी केले
समाजाचे पुनर्निर्माण

**किशोर देऊ कदम**
**कणकवली**
**मो.9422963655**

# समाधान



सुख-दुःखाच्या वाटेवरून चालतांना साधलेला मनाचा समतोल म्हणजेच "समाधान".....

डोळ्याला न दिसणारी पण ह्रदयात स्थित असलेली चिरंतन शांतता म्हणजेच "समाधान".....

मान-अपमान, यश-अपयश,गरीब-श्रीमंत यातील पुसटशी रेष म्हणजेच "समाधान"....

आशा-अपेक्षा, लोभ-चिंता, स्तुती-निंदा, यांच्या पलीकडील मनाची शीतलता म्हणजेच "समाधान"....

संतांनी, गुरुंनी गौरविलेले न संपणारे शाश्वत सुख म्हणजेच, "समाधान".....

सकारात्मक नकारात्मक घटनांमधील स्वीकार भावना म्हणजेच, "समाधान".....

इतरांच्या आनंदात आनंद मानण्याची मनाची सात्विकता म्हणजेच, "समाधान".....

जे मागून मिळत नाही पण मनाला सात्विक विचारांची जोड देऊन मिळवता येणारी श्रीमंती म्हणजेच, "समाधान".....

आयुष्यातील चढ उतारांना, धाडसाने सामोरे जाऊन मिळणारा आनंद म्हणजे, "समाधान"....

समाजसेवेतून माणुसकी जपून मिळवलेला आनंद म्हणजेच, "समाधान".....

ईश्वराने मानवाला विवेक या अस्त्राद्वारे दिलेली एक अमूल्य भेट म्हणजेच, "समाधान"......

जगात कुठेही, कितीही पैसे देऊन विकत न घेता येणारी पण प्रत्येकाच्या अंतर्मनात नित्य वास असलेली पूर्णत्वाची भावना म्हणजेच, "समाधान".....

**चैताली स्वप्निल प्रभुदेसाई.**
**मो.9922015038**

# नकोशी



[ विनम्र निवेदन ..“ नकोशी “ ह्या कथेमधील स्थळे, पात्रे आणि त्यांची नावे, प्रसंग, घटना काल्पनिक आहेत ... वास्तवाशी त्यांचा संबंध जुळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा ... ह्या कथेच्या माध्यमातून कोणाच्याही भावना दुखावल्यास क्रुपया क्षमा करावी ही नम्र विनंती ... ]

रामकृष्ण चेंबूरकर मार्गावर ती महिला गेल्या चार दिवसांपासून उपाशीपोटी फिरत होती ...

तीला तहान लागली तरी पण पाणी मिळावे अशी तीने ईच्छा केली नाही ... तीला भूक लागली तरी पण अन्नपदार्थ मिळावे अशी तीने ईच्छा केली नाही ...

तीला भूक नव्हती , प्यास नव्हती पण ... आस मात्र नक्कीच होती ... ती आस म्हणजे गेल्या चार दिवसांपासून दुरावलेली तीची बालिका , तीची कलिका , तीची नकोशी तीला मिळावी ... तीच्या आठवणीने तीला पान्हा फुटायचा... अमृताचा झरा तीच्या उरातून फुटायचा आणि ती कासावीस व्हायची ...

मोठमोठ्याने रडत बोलायची “ मला माझी बालिका पाहिजे ... मला माझी कलिका पाहिजे ... मला माझी नकोशी पाहिजे “...

तीच्या कानांवर बहुभाषिक शब्द पडायचे “ ती वेडी आहे ... वो पागल है ... शी इज मॅड ... ए गांडी ते ... “

अशा प्रतिक्रीया ऐकून ती भन्नाट हसायची ...

चार दिवसांपासून आंघोळ नाही ... अंगावर जुनी मळकटलेली साडी आणि मळकटलेला ब्लाऊज ...

उष्णतेने सर्वांग घामाने भिजायचे ... घामावर धुळीचा थर बसायचा ... शरीरातून दुर्गंधी येऊ लागली ... डोक्यावरचे केस हवेने भुरभूरत तीच्या कपाळावर , गालावर यायचे त्यामधूनच तीचे निस्तेज उदासीन , विस्फारलेले डोळे दिसायचे ... रणरणत्या उन्हात चालत रहायची ... चालत रहाण्याने दोन्ही पायांचे तळवे समजले ... तळव्यांना फोडी आल्या ... तळ पायांच्या वेदना असह्य होऊ लागल्या ...

आता मात्र तीला असह्य भूक लागली ... काही तरी खायला मिळालेच पाहिजे म्हणून ती मार्गावरील अनेक वडापाव टपऱ्या, हॉटेल च्या समोर येऊन ऊभी राहिली ... उजव्या हाताची बोटे एकवटून तोंड आणि पोटाकडे वळवीत खाद्यपदार्थ मिळावे म्हणून मूक याचना केली पण ... कोणीही तीला खाद्यपदार्थ दिला नाही ... “ ए पगली भाग यहासे ... “ अशा वाक्यांचा तिरस्कार मात्र कानभर मिळाला ...

भुकेने कासावीस झालेले तीचे शरीर चौकामधील सार्वजनिक कचरा कुंडीजवळ येऊन स्थिरावले ... तीने कचरा कुंडीत वाकून पाहिले ... कोणत्याही खाद्यपदार्थाचा अंश त्यामध्ये नव्हता ... दुर्गंध मात्र भरपूर प्रमाणात होता तीच्या शरीरातून येणाऱ्या दुर्गंधाशी स्पर्धा करणारा ... ती भन्नाट हसायला लागली ...

हवेमुळे तीच्या डोक्यावरील केस तीच्या चेहऱ्यावर आले ... तीने समोर पाहिले एक माणूस काही तरी भरलेली प्लास्टिकची काळी पिशवी घेऊन कचरा कुंडीजवळ येत आहे ... तीच्या पोटात भूकेचा आगडोंब उसळला ...

तो माणूस ती प्लास्टिकची काळी पिशवी तिथे टाकून निघून गेला ... तो जाताच ती त्या पिशवी कडे झेपावली ... त्या पिशवीचे तोंड उघडून पाहिले ...

उष्ट्या खरकट्या पत्रावळी रचून ठेवलेल्या ... तीने एक एक पत्रावळ बाहेर काढायला सुरुवात केली ... काही पत्रावळी नंतर पंचपक्वानांनी भरलेली पत्रावळ दिसताच तीने हळुवारपणे बाहेर काढली ... ती पत्रावळ बाहेर काढताना पाणी भरलेली बाटली सुद्धा दिसली ... बाटली आणि पंचपक्वानांनी भरलेली पत्रावळ घेऊन फुटपाथवर आली ... चार दिवसांपासून उपाशी असल्याने पत्रावळीतील सर्व अन्नकण तीने वेचून खाल्ले आणि बाटलीतील पाणी पिऊन ती स्वस्थ झाली ...

थोड्यावेळाने तीला झोप येऊ लागली ... तापलेल्या सुर्यप्रकाशाची चादर सर्वांगावर ओढून ती फुटपाथवरच शांत झोपली ...

तीच्या शांत झोपेचा भंग केला तो एका कुत्रीने ... ती कुत्री तीच्या कानाजवळ येऊन भुंकत राहिली ... ती उठून बसली आणि कुत्रीला म्हणाली “ काय झाले गं ???... कशाला माझ्या कानाजवळ भुंकून माझी झोपमोड केलीस ??? ... “

प्रश्नांची प्रतिक्रीया म्हणून कुत्रीने कचरा कुंडीवर उडी घेतली ... तिथून बाहुली तोंडात घेऊन ती कुत्री बाहेर आली ...

ती बाहुली पहाताच त्या महिलेला तीची बालिका , तीची कलिका , तीची नकोशी आठवली ...

कुत्री तोंडात बाहुली घेऊन निघाली ... कुत्रीला जाताना पहाताच ती महिला कुत्रीच्या पाठोपाठ निघाली आणि म्हणू लागली “ मला माझी बालिका पाहिजे ... मला माझी कलिका पाहिजे ... मला माझी नकोशी पाहिजे ... “

कुत्री पुढे आणि ती महिला मागे बडबडत चालली

... दोघीही " आशिर्वाद " सिनेमा थिएटर समोर येऊन थांबल्या आणि समोरचे दृष्य पाहू लागल्या ...

आरसीएफ पोलीस स्टेशनचे , निर्भया पथकाचे महिला पोलीस अधिकारी त्या घटनास्थळी आले ... तीन महिन्याच्या बालिकेला अज्ञात व्यक्ती त्या घटनास्थळाजवळ सोडून गेली होती ... कायदेशीर , रीतसर पंचनामा करून निर्भया पथकाच्या अधिकारी - ममता शिंदे ह्यांनी हळुवारपणे बालिकेला उचलले आणि वाहनात येऊन बसले ... वाहन सुरु होण्याआधी अचानक ती महिला वाहनासमोर येऊन आडवी पडली आणि म्हणू लागली " माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा ... मी वेडी नाही ... ह्या बालिकेने माझ्याच गर्भाशयातून जन्म घेतला आहे ... मीच तीची आई आहे ... मला माझी बालिका पाहिजे ... मला माझी कलिका पाहिजे ... मला माझी नकोशी पाहिजे ... "

निर्भया पथकाच्या अधिकारी - ममता शिंदे ह्या मानसशास्त्रज्ञ असल्यामुळे त्यांनी त्या महिलेला हळुवारपणे उठवले आणि तीला दिलासा दिला " तुला तुझी बालिका, कलिका , नकोशी नक्कीच मिळेल ... चिंता , काळजी करु नकोस ... तुझ्या बालिकेला ... नकोशीला घेऊन चल माझ्या सोबत ... शताब्दी रुग्णालयात तुला आणि तुझ्या बालिकेला ... नकोशीला ट्रीटमेंट करायला पाहिजे ... "

मायेचे , प्रेमळ शब्द ऐकून ती महिला वाहनात बसली ...

शताब्दी रुग्णालयात चार तासांची ट्रीटमेंट करण्यात आली ... त्या महिलेला आंघोळ झाल्यानंतर स्वच्छ सफेद साडी आणि ब्लाऊज परिधान करण्यास दिले ... बालिकेला आंघोळ घातल्यानंतर त्या महिलेने बालिकेला ... नकोशीला अंगावरचे दुग्धप्राशन करायला दिले ...

शताब्दी रुग्णालयातील ट्रीटमेंट नंतर ती महिला बालिका ... नकोशीसह पोलीस उपायुक्त - संदीप खरे ह्यांच्या कार्यालयात आली ... ती म्हणाली " साहेब ...माझे नाव - रुपाली देशपांडे ... वाशी नाका येथे माझ्या सासरची माणसे रहातात ... साहेब ... मी वेडी नाहीच ... माझ्या सासरच्या माणसांनी ... नवरा , सासू , सासरे आणि नणंद ह्यांनी मला हुंड्यासाठी आणि मी बालिकेला - नकोशीला जन्म दिला म्हणूनच मला वेडी ठरवले आहे ...

सासरच्या माणसांना पंचवीस लाखांचा हुंडा पाहिजे आणि वंशाचा दिवा म्हणून मुलगाच पाहिजे ...

साहेब ... माझे वडील शेतकरी ... थोडीशी शेतजमीन विकून पंधरा लाख रुपये आले ते सासरच्या माणसांना दिले ... अजून दहा लाख रुपये देणे बाकी आहे ...

साहेब ... माझ्या लग्नाला पंधरा वर्षे झाली तेव्हा पासून सातत्याने माझा शारिरीक आणि मानसिक छळ करण्यात आला ...

साहेब ... चार दिवसांपुर्वी सासरच्या माणसांनी मला वेडी ठरवले आणि घराबाहेर हाकलून दिले ...तीन महिने वयाची माझी बालिका ... नकोशीला त्यांनी त्यांच्याकडेच ठेवले ... आणि आज त्यांनी माझ्या बालिकेला ... माझ्या नकोशीला " आशिर्वाद " सिनेमा थिएटर समोर निर्दयपणे सोडून दिले ...

साहेब ... एका कुत्रीने मला माझी बालिका ... माझी नकोशी मला मिळवून दिली ...

मुंबई पोलीस - निर्भया पथक ह्यांनी सुद्धा मानवतेच्या दृष्टीने मला खूप सहकार्य केले आहे " ...

रुपाली देशपांडे हीचे निवेदन ऐकून पोलीस उपायुक्त संदीप खरे साहेबांनी आदेश दिला ...

सर्व अत्यावश्यक कायदेशीर कागदपत्रे तयार करा ... रुपाली देशपांडे आणि तीची बालिका ... नकोशीला माटुंगा येथील " श्रद्धानंद महिलाश्रम " येथे दाखल करा आणि वाशी नाका येथील रुपाली देशपांडे हिचे पती , सासू , सासरे आणि नणंद ह्यांना हुंडाबंदी कायदा , अन्नदाता शेतकरी संरक्षण कायदा , महिला - बालक - बालिका संरक्षण कायदा भंग केल्याप्रकरणी संबंधित आयपीसी कलमानुसार अत्यंत तातडीने अटक करण्यात यावी...

ही केस फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणीसाठी यावी आणि लवकरच न्याय निवाडा होऊन बालिका , कलिकांना नकोशी म्हणून नाकारणाऱ्यांना कायद्याची झणझणीत शब्दांजन सहीत जरब बसायला पाहिजे ... "

**अशोक गंगाराम सावंत**
**माहूल, मुंबई**
**मो.9324558492**

# बांधावरचं झाड



खूप दिवसातून गेलो होतो गावी,
रानात पसरली होती पिकांची हिरवी शाई....

गावाकडची पाहिली सुंदर अशी पहाट,
त्यातच पडली चिमण्यांची प्रत्यक्ष गाठ....

गावाकडचं असतं काहीतरी जीव की प्राण,
तसंच होतं माझं बांधावरचं झाड....

बांध होता भरभक्कम डोंगरदार,
अन् बांधावरचं झाड होतं डेरेदार....

बांधावर फुललेलं हे हिरवगार झाड,
लावलं होतं माझ्या आजीने छान....

सकाळच्या वेळेला झाडाखाली रेखाटली जेवणाची पंगत,
माझ्या कुटुंबात उमटली प्रेम,माया अन् गंमत.....

दुपारच्या वेळेला पांघरली तिची सावली,
साक्षात गाठ पडले विठ्ठल-माऊली....

बांधाने जरी केलं असेल दोन भावांना वेगळं,
पण बांधावरच्या झाडाने आणलं संपूर्ण कुटुंबाला एकत्र....

बांधावरच्या झाडाने खूप काही शिकवलं,
गावाकडचं पुस्तक म्हणून त्यालाच हृदयात जपलं....

प्रत्येकाच्या रानात आणि मनात असतो बांध,
पण त्यावर नसतं सुंदरस झाड....

चला तर मग..!रानातील बांधावर लावूयात मायेचं झाड,
अन् मनातील बांधावर लावूयात माणुसकीचे झाड.....

**प्रथमेश भिमराव कुंभार**
**मो.९०४९९६१५६९**

# राधा



मोहक फुलांचा सुगंध भारी
अप्रतिम फुलांच्या सौन्दर्याने
तन मनास भासे शिरशीरी
सखये मन झुलते आनंदाने...1

सौख्याच्या या झुल्यावरती
वाट पाहे ती बैसूनी एकांती
सूर बांसरीचे गे वाऱ्यावरती
अलगद गडे ते कानी पडती....2

मिटूनी लोचने राधा घेऊनी
तल्लीन होई ग ती अंतरमनी
मधुर स्वर ऐकताच कानी
झनकारली ती पूर्ण गात्रातुनी...3

दिव्यत्वाचे समोरी तेज पाहुनी
कळे तिला नच काय जाहले
राधा अवघी मंत्रमुग्ध होऊनी
नकळत पायी पैंजण रुणझुणले...4

सावन ऋतुमधे किमया घडली
राधेची ती बघ कृष्ण जाहली
आनंदासवे काया मोहरली
मनीमानसी धन्यधन्य जाहली....5

**सौ.मीना घोडविंदे**
**मो.84519 97915**

# माणुसकी जपताना



" अरे माणसा माणसा
कधी होशील माणूस "

हे चित्र सगळीकडेच नाही, परंतु काही ठिकाणी सकारात्मक बाजूही पहायला मिळते.प्रत्येक गोष्टीला नाण्याच्या दोन बाजू असतात व काही ठिकाणी चांगली व वाईटही असते.

माणूस समाजप्रिय आहे. तो समाजापासून दूर राहूच शकत नाही. माणूस बुद्धिमान आहे बुध्दीचे वरदान देवाने फक्त मानवालाच दिले आहे. दिलं आहे. बरं वाईट कळू शकते समाजात वावरताना. तरीही तो तसं वागताना दिसत नाही. आपण जीवन जगत असताना कित्येक जणांशी आपला संबंध येतो.प्रथम आईवडील ज्यांनी लहानचं मोठं केलं.कठीण परिस्थितीत कष्ट करून शिक्षण दिले.आजारपणं काढली.प्रगतीसाठी

स्वत:ची हौसमौज बाजुला सारून तुमचं सर्व करणाऱ्या मातापित्याचे ऋण मानून माणुसकी जपत त्यांच्या उतारवयात त्यांची सेवा,विचारपूस

हवं नको ते पाहणे.हे आपले कर्तव्य आहे.

दुसरे म्हणजे आपण प्रगती पथावर वाटचाल करीत असताना या वाटेवर अनेकांची साथ,मदत मिळालेली असते.त्या उपकाराची जाण ठेवणे गरजेचे आहे. यश हे एकट्याचे नसते ते गाठण्यासाठी बरेच जणांचा सहभाग असतो.

सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, एखाद्याने आपल्याला यशस्वी करण्यासाठी हात दिलेला असतो, त्याच्या पडत्या काळात तोंड न फिरवता मदत करणे ही खरी माणुसकी.

समाजात रहात असताना या समाजाने आपल्याला खूप काही दिले आहे. ते समाजऋण फेडणे आवश्यक आहे. गोरगरिबांना मदत किंवा महापूर, कोरोना सारखी महामारी यात आपल्याला शक्य होईल तशी मदत करावी.

"कर्मण्येवाधिकारस्य माफलेषु कदाचन"

श्री कृष्णाने गीतेत सांगितल्याप्रमाणे

कोणतेही कर्म करताना फळाची अपेक्षा न करता कर्म करणे. माणुसकी जपताना हे असेच व्हायला हवं तरचं त्याला अर्थ आहे.

एखाद्या ठिकाणी अपघात झाला तर त्या व्यक्तीला मदतीची गरज असते. बघ्याची भुमिका न घेता होईल तितकी मदत करावी.त्वरीत डॉक्टर कडे नेले तर, त्या व्यक्तीचे प्राण वाचू शकतात तसेच समाजात वावरताना एखाद्या महिलेशी गैरव्यवहार वर्तन करीत असेल,छेड काढत असेल तर वेळीच त्याला समज देणे व विरोध करणे, माणुसकीला धरून आहे.आपण या फंदात कशाला पडा असे म्हटले तर निर्भया, अंकिता सारख्या आणि आपण हल्ली मुलीवर होणारे अत्याचार, ॲसिड हल्ले कसे थांबलीत? यात धोका तर आहेच पण एखाद्या तरुणीचे अब्रू रक्षण करण्याचे सत्कर्म केवढे मोठे आहे.

भुकेल्यांना अन्न देणे, तहानलेल्या पाणी देणे ही आपली संस्कृती व माणुसकी धर्म आहे. कोणत्याही जाती धर्माचा असला तरी जातपात भेदभाव न मानता माणुसकी दाखवावी.

संत एकनाथांनी तर वाळवंटात तहानेने तडफडणाऱ्या गाढवाला काशीवरुन आणलेले गंगा जल त्याच्या मुखात घातले.आणि संत तुकाराम महाराजांनी दुष्काळामध्ये सर्व लोकांना घरातील धान्य वाटून टाकले. यावरुन सर्व संतानी भक्ति बरोबर मानवता धर्म, माणुसकी श्रेष्ठ आहे. हे जनसामान्यांना आपल्या कृतीतून दाखवून दिले

म.फुले, सावित्रीबाई अशा अनेक समाजसुधारकांनी. गाडगे महाराजांसारखे संत गरीबांसाठी आश्रम शाळा काढल्या.भेदभाव न करता. "जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुला देव तेथिची जाणावा. या प्रमाणे प्रत्येक जण वागला तर सर्व सुखात,आनंदात राहतील.

आपणही इतके जरी केले नाही तरी एखाद्या वेळी शेजारी आजारी असेल किंवा अडचणीत,संकटात असेल तर त्याला काय मदत

हवी आहे हे जाणले.शेजार धर्म व माणुसकी नात्याने व विचारपूस करणे अत्यंत मोठी गोष्ट आहे.

दूरवर कोणी मित्र मंडळी किंवा नातेवाईक अडचणीत आजारी असेल तर प्रत्यक्ष मदत करू शकत नाही.पण फोन करून दोन शब्द धीराचे सांगितले व आपुलकीने चौकशी केली. मनोबल वाढवले तर त्या काळात व्यक्तीला मानसिक आधार वाटतो.

दिवसेदिवस सर्वजण दगदग,धावपळ करून

नोकरी धंद्याच्या मागे शहरीकरण,भौतिक सुखाच्या मागे माणुसकी मागे पडत चालली आहे असे वाटते. फ्लॅट संस्कृतीत शेजारी कोण राहतं हेही माहिती नसतं.

तसेच प्रवासात बस, ट्रेन मध्ये वृध्द ज्येष्ठ नागरिकांना उठून जागा देणे आणि गर्भवती महिला असो वा तान्ह्या मुलांसोबत तिला उठून जागा देणे. गाडीत बस मध्ये चढताना गर्भवती महिला व तान्ह्या मुलाची आई ज्येष्ठ नागरिक यांना प्राधान्य देणे हे माणुसकीला धरूनच आहे.

खेडेगावात शेती व अन्य व्यवसाय यामुळे सलोख्याचे

संबंध एकमेकांशी असतात.तेव्हा तिकडे बऱ्यापैकी माणुसकी टिकून आहे ही समाधानाची बाब आहे.परंतु मोबाईल सोशल मिडिया लोन पोहचल्यामुळे तिथे ही शहरीकरणाचा परिणाम होत आहे.

सोशल मिडियाच्या या काळात एखाद्या अपघाता ठिकाणी मदत करायचं सोडून मोबाईल वर फोटो काढण्याची अहमहमिका लागलेली असते. ही किती दुःखदायक बाब आहे.एखादा मदतीचा याचना करतो. अपेक्षा ठेवतो कि कुणी तरी मदतीला धावून येईल.

महापूरात कित्येकांनी प्राण गमावले. अनेकांचे संसार उध्वस्त झाले.अशावेळी कितीतरी हात मदतीला धावून आले.प्राणाची बाजी लावून लहान मुले, महिला,गर्भवती, प्रसूती झालेली स्त्री अशांना सुखरूप सोडवले तेव्हा जे माणुसकीचे दर्शन झाले जातपात न पाहता.भेदभाव न करता

त्यानी माणसात देव पाहिला.

तर कोरोना महामारीच्या काळात डॉक्टर नर्सेस रात्रंदिन कोविड योद्धे बनून रुग्णांची सेवा करीत होते. आपल्या वैयक्तिक अडीअडचणी कुटुंबापासून दूर राहून हे सामाजिक कार्य नेटाने माणुसकी धर्म पाळून करीत होते.तसेच आपले पोलीसदादा डोळ्यात तेल घालून खडा पहारा २४ तास देत होते.ऊन वारा पावसाची तमा न बाळगता. कित्येकांना रस्त्यावर बसून खाणं खावे लागे. तर काही पोलीसांनी आपला डबा भिकाऱ्यांना देवू केला. लॉकडाऊनच्या काळात भिकारी रस्त्यावर राहणाऱ्यांचे खाण्यापिण्या अभावी खूप हाल झाले.पण मदतीचे हातही मिळाले.

सफाई कर्मचारी तर बंद काळात सर्व कचरा साफ करणे. औषध फवारणी करणे. ही कामे इमानेईतबारे करीत होते.कोरोना पासून सुरक्षित सर्वजण घरात बसले होते तर हे योध्दे इतरांचे आरोग्य रक्षणासाठी झटत होते. यातील काहीजण कर्तव्य बजावताना कोरोना लागण होवून मृत्यूमुखी पडले. पण कोणीही कर्तव्यात कसूर केली नाही.

खरे कोविड योध्दे देशसेवक त्यांना त्रिवार सलाम!!!

तर बऱ्याच सोसायटी व गावात कोरोना रुग्ण बरे होवून गेले तरी शिकली सवरलेले लोकं पण त्यांना वाळीत टाकल्या सारखी वागणूक देत होती. माणुसकीच्या दृष्टीने अतिशय खेदजनक ही बाब आहे. यामुळे त्या माणसाला किती मनांला यातना होत असतील व किती अडचणीना तोंड द्यावे लागत असेल. ज्यांच्यावर प्रसंग ओढवतो तेव्हाच समजते.

आपण उपकाराची जाणीव किंवा ऋण म्हणून मदत केली तर आपणही कधी अडचणीत, संकटात असू तेव्हा परमेश्वर तिसऱ्याच कुणाला त्यांच्या रुपात मदत करायला पाठवतो. अशावेळी आपण त्या प्रसंगातून सहीसलामत बाहेर पडतो. आपण एक पटीने दिले तर देव दसपटीने देतो. ते जर तुम्ही प्रामाणिकपणे व फळाची अपेक्षा न धरता केले तरच.

**सौ. किशोरी शंकर पाटील**
**विरार**
**मो.8779165660**



# गरिबांची दिवाळी



येता दिवाळी जवळ
घर घर लागाली बापाला
किती वाढली महागाई
सांगु कस लेकरांना?

रंग रंगोटी होईल
आजु बाजुच्या घरांना
काय कारण सांगावे
नेहमी आपल्या माणसांना
येता दिवाळी जवळ.....

फराळाच्या सामानाची
यादी  हातात पडेल
नुसते शब्द वाचताना
घाम बापाला फुटेल

पैशाची चनचन
तर असते दर वर्षाला
कसा घालावा याचा मेळ
पिळ पडे काळजाला
येता दिवाळी जवळ.....

खरेदीला जाऊ म्हणत मुले
हठ्ठ करती बापाला
घेऊ नबिन कपडे अन्
फटाके फोडायला

हो हो म्हणत बाप
जवळ करित लेकराला
कंठ येतो मग दाटुन
डोळे मिटुन सावरतो स्वःताला
येता दिवाळी जवळ.....

कोणा संगावी ही व्यथा
वाली नाही हो आपल्याला
रोज वाढते महागाई
अन चटके बसती गरीबाला

पुन्हा बाप मग
कर्ज काढतो वेळेला
पण पैसा नाही जवळ सांगण्याचे
धाडस होत नाही त्याला

येता दिवाळी जवळ
घर घर लागली बापाला
घर घर लागली बापाला..

**संतोष किसन शिरावले**
**कोपरखैरणे, नवी मुंबई**
**मो.9322051521**

# अंतरंग



गमती मनामनाच्या मनी वसे ते स्वप्नी दिसे,प्रत्येकाच्या अंतरंगात विविध कल्पना असतात जितके रंग तितक्या कल्पना मनुष्य जातीचा विचार करता एक गोष्ट आपल्या लक्षात येईल कुणाला खेळण्याचा छंद कुणाला वाचनाचा,कुणाला मित्र मैत्रिणी करण्याचा तर कुणाला प्रवासाचा,कुणी अतीचंचल, कुणी लाजाळू किंवा भित्रा प्रत्येकाचा स्वभाव वेगवेगळा,यावर कुणी संमोहन शास्त्र,कुणी अंधश्रद्धा कुणी करणी बाधा कुणी दैव्यशक्ति असा उल्लेख केला परंतु या ठिकाणी एक कविता मला आठवते....

आहे माझी एक कल्पना
स्वप्नात येण्याची स्वप्नातच रंगवण्याची
आहे माझी एक कल्पना
सत्यात उतरण्याची जगासमोर
सत्य करून दाखवायची

बहिणाबाई चौधरी म्हणतात...

मन वढाय वढाय
उभ्या पीकतल ढोर

यातूनच हल्ली मोबाईल वेडे तरुण तरुणी कुणी रागीट,कुणी बोलका, कुणी अबोल तर कुणी वेगळा व्यक्ति तितक्या प्रकृती स्वभावला औषध नाही पण हल्ली मनोकायिक औषधी,पुष्पौषधी आहेत,दुभंगलेले मन,अतिविचार नैराश्य,अत्यंत क्रोध,अतिचंचल,उदासिनता,विसराळू पणा यावर लागेल तितक्या उपचार पद्धती,परंतु कायम स्वरुपी निराकरण नाही परंतु वेळीच उपचार परवडण्यासारखा metacognition theory its better to care than cure. Rational emotive behaviour therapy,its a therapy approach that focuses on managing or unhealthy thoughts emotions and behaviour

विचार ही एक अशी शक्ती आहे तिचा speed जगात सर्वात जास्त आहे ती क्षणात येथे तर क्षणात तिथे तिची कुणीही बरोबरी करु शकत नाही,जी सत्यात उतरेलही किंवा नाही तेव्हा concentrate on yoga & focus on meditation मनुष्याची आयुष्यात तीन goal असतात शिक्षण नौकरी व लग्न कुणाला सहजतेने मिळतात कुणाला विलंबाने तर कुणाला अतिविलांबने पण शेवटी मनुष्य सर्व काही केल्यावर एकच निष्कर्ष वर पोहोचतो ते म्हणजे नशिब मनुष्याने इतके कणखर व कठोर व्हावे की नाशिब पलटीविन्यायची

ताकद त्याच्यात यावी,अर्थात प्रत्येकाच्या कुवतीप्रमाणे यश भेटणार हे निश्चित परंतु हौसेला मोल नाही व ज्ञाना शिवाय प्रगती नाही यासाठी येणाऱ्या अडचणी अर्थात आर्थिक कौटुंबिक किंवा इतर परंतु

थक कर रुकने वालो
की नौका पार नही होती
मनात बळ असेल तर पंखात बळ येते

तेव्हाच apan उंच उडू शकतो sky isn't limit generally जिथ पर्यंत दिसते तेच आपलं Aim परंतु मन ही एक ताकद की ते नजरे पलीकडील देखील बघू शकते अर्थात हे सर्व शक्य आहे ते म्हणजे आपण करु संकल्प निरोगी मनाचा विचारामध्ये अशी ताकद आहे ते तुम्हाला शांत बसू देणार नाही मगते सकारात्मक विचार असो की नकारात्मक सर्वाचे मते positive thinking is necessary not negative thinking पण मी असे म्हणेन positive and negative both are necessary sometimes positive will help sometimes negative will help to reach your destiny something is better than nothing but that something becomes your everything. try to climb your tree to get fruitfully success.try try don't cry

do or die.I will say do and do.It will help you to survive forever and forever...




**संदीप मोकळे**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.9922224083**

# शब्द माझे काव्य गीत



होते लिहित कविता
आपसुक झाले गीत
साधू म्हणता त्यातून
जरा समाजाचे हित॥धृ॥

माझी कविता कविता
झाली कवितेचं गीत
जग सारे जगवित
आले मीही ती जगीत॥१॥

मीच तिला तीही मला
अशी आली जगवित
शिकविली जनरित
जगालाही शिकवित॥२॥

कुणी म्हणते असते
हेच सामर्थ्य कवित
कवितेत ते भरतो
सर्व काळ अविरत॥३॥

अंधश्रद्धा झुगारुन
जग शहाणे करीत
सवे माझिया चालते
माझी कविता ही गीत॥४॥

दु:ख सारे पचवित
सुख सारेच त्यागित
मीही शब्दात रमते
शब्द माझे काव्य गीत॥५॥

**सौ. मंगला मधुकर रोकडे**
**एरंडोल**
**मो.९३७१९०२३०३**



# हर्ष पेरूनी विश्वात



धागे जोडू आनंदाचे,
नाते जपू समतेचे.
हर्ष पेरूनी विश्वात,
गीत गाऊ एकतेचे.

दीप ज्ञानाचे लावूनी,
गंध चंदनाचा होवू.
धर्म शृंखला तोडूनी,
प्रीत हृदयी जागवू.

घेऊ वसा मायभूचा,
सार जिथे ममतेचा.
निळ्या नभाची प्रेरणा,
दिव्य संदेश ताऱ्यांचा.

काळ्या आईचा महिमा,
सौख्य जगी लाभलेले.
कणा कणांत पावित्र्य,
हर्षरुपी व्यापलेले.

धागे जोडू आनंदाचे,
नाते जपू समतेचे.
राष्ट्रहित,अखंडता
गीत गाऊ तिरंग्याचे....

**प्रा.विलास गायकवाड**
**मिलिंद महाविद्यालय, लातूर.**
**मो.9730661640**

# झोप !



शंभर पैकी नव्वद लोकांना, नावडत्या अशा "गणित" विषयावर लिहून झाल्यावर, माझ्या मते बहुतेक त्याच नव्वद लोकांना आवडणाऱ्या, "झोप" या विषयावर लिहावेसे वाटले, म्हणून माझ्या एका रात्रीच्या झोपेचं खोबरे करून, जागेपणी केलेला हा झोपेचा पंचनामा !

विषय जरी "झोप" असला, तरी हा लेख वाचता वाचता तुम्हाला झोप येणार नाही, याची मला खात्री आहे ! पण समजा ती तशी आलीच, तर ज्यांना झोप न येण्याचा त्रास आहे, अशा लोकांसाठी हा लेख म्हणजे एक कायमचा जालीम इलाजच ठरावा ! पण माझ्या दुर्दैवाने तो तसा ठरला तर, मी स्वतःला झोपेत सुद्धा माफ करणार नाही !

आपल्याला जगण्यासाठी जशी हवा, उजेड, अन्न पाण्याची गरज असते, तशीच झोपेची नितांत आवश्यकता असते, हे शास्त्रीय दृष्ट्या सिद्ध झालं आहे ! कारण आपण काही एक न खाता तब्बल २ महिने जगू शकतो, परंतु न झोपता फक्त ११ दिवसच जीवंत राहू शकतो ! (कृपया हे वाचल्या वाचल्या लगेचच या विधानाची सत्यता पडताळायच्या भानगडीत पडू नका, नाहीतर इथे माझी झोप कायमची उडायची !) या वरून आपल्याला आपल्या जीवनात झोपेचं किती महत्व आहे ते कळून यावं ! हे वाचल्यावर, ज्यांना ज्यांना त्यांची आई अथवा धर्मपत्नी, सकाळी उठवतांना कुंभकर्णाचा अवतार म्हणून हिणवत असेल, ते सगळे अवतार मनांतून नक्कीच खूष झाले असतील !

झोपेची गोळी न घेता, अंथरुणाला पाठ टेकताच, ज्याला पुढच्या पाच मिनिटात गाढ झोप येते तो मनुष्यप्राणी खरच भाग्यवान ! त्याचा कुंभकर्णाच्या वंशावळीशी आधीच्या सात जन्मात कधीतरी नक्कीच संबंध आला असावा, त्या शिवाय ही निद्रादेवी त्याला शरण जाणे शक्यच नाही !

आपण ज्या वर झोपतो ते अंथरुण, आपल्या झोपेच्या या विश्रांतीच्या काळात, महत्वाची भूमिका पार पाडत असते, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही ! तर या अंथरुणाच्या बाबतीत प्रत्येकाच्या सवयीचा (आवडीचा नाही बरं !) भाग आलाच. तो कसा, तर कुणाला गादी शिवाय झोप येत नाही, तर कुणाला गादीवर झोप येत नाही ! मी स्वतः या दुसऱ्या प्रकारात मोडणारा, सॉरी, झोपणारा ! कुणाला उशी हवी, कुणाला नको, कुणाला ती पातळच हवी तर काहींना जाड ! काही जणांची उशीच्या बाबतीत थोडी विचित्रच तऱ्हा असते ! त्यांना डोक्याखाली एक उशी लागतेच, पण एक उशी पायाखाली ठेवल्या शिवाय त्यांना झोप येत नाही, याच्या मागे पण एक शास्त्रीय कारण आहेच ! कोणाला डोक्याखाली उंच लोड ठेवल्याशिवाय, झोपेचं लोड घेता येत नाही ! व्यक्ती तितक्या प्रकृती, हे जे पूर्वी कुणी म्हणून ठेवलंय, ते नक्कीच झोपेत म्हटलेलं नसणार याची खात्री, अशा लोकांच्या एकेक सवयी बघूनच पटते !

जी गोष्ट गादी, उशीची तीच थोडयाफार फरकाने पांघरुणाची ! कोणाला ते जास्त जाड नको, थोडं पातळ हवं, तर कुणाला पांघरुण म्हणून रग किंवा ब्लँकेटच लागत !

या पांघरुणाच्या बाबतीतही काही लोकांची स्वतःची अशी वेगळीच खासियत असते, असं माझ्या पाहण्यात आलं आहे ! हे लोक पांघरुण बहुतेक आपल्या मनाच्या समाधानासाठी, ते अंगावर न घेता फक्त पाया जवळ ठेवून झोपतात !

काहींना आपल्या आजी किंवा आईच्या जुन्या, कॉटनच्या पातळा पासून बनवलेल्या गोधडीशिवाय झोपच येत नाही ! त्या मायेच्या गोधडीला एक वेगळीच उब असते याचा अनुभव, माझ्या प्रमाणे आपण सुद्धा घेतला असणार !

काहींना रात्रीच्या वेळेस झोपतांना, गुडूप अंधार करून (जरी ते शास्त्रीय दृष्ट्या चुकीचं असलं तरी) झोपायची सवय असते ! त्यांना अशा वेळी, बाहेरुन येणाऱ्या लांबच्या रस्त्यावरच्या दिव्याच्या प्रकाशाचा पण त्रास होतो बुवा ! मग हे लोकं त्यावर उपाय म्हणून, आपल्याच डोळ्यांवर रुमाल किंवा छोटा टॉवेल ठेवून झोपतात !

आता एव्हढी सगळी निद्रादेवीच्या आराधनेची तयारी जरी मनासारखी झाली,

तरी काही जणांना रोजची काही 'पेय' घेतल्याशिवाय झोप येत नाही ती नाहीच ! 'पेय' म्हटल्यावर तुम्ही उगाच डोक्याला जास्त ताण देण्याआधीच सांगतो, की ही पेय म्हणजे, कोणाला हळद टाकून गरम दूध, कोणाला गरम पाण्यातल लिंबू सरबत, तर कोणाला चक्क चहा किंवा कोल्ड कॉफी लागते झोपायच्या आधी ! या पेयां शिवाय काही जणांना डोक्याला, तळ पायाला खोबरेल तेल लावणे, काशाची वाटी घासणे वगैरे प्रकार करावे लागतात, ते वेगळेच !

आता एव्हढं सगळे सोपस्कार झाल्यावर, शांतपणे झोपेल तो मनुष्य कसला ? म्हणजे काही जण स्वतः शांतपणे झोपतात, पण आपल्या घोरण्यामुळे दुसऱ्याची

झोप उडवायचं काम, त्यांच्या झोपेत नकळत करत असतात ! वर हे घोरणारे लोकं, स्वतः मात्र कधीच झोपेत घोरत असल्याचे मान्य करत नाहीत, हे विशेष ! शिवाय प्रत्येकाची घोरायची पद्धत वेगवेगळी. मला असं कधी कधी वाटत की, दहा अट्टल घोरणाऱ्या लोकांना एकाच खोलीत झोपवून, त्यांच्या घोरण्याचे रेकॉर्डिंग केले तर, एक नवीनच प्रकारचे "घोर संगीत" तयार होईल !

काही काही लोकांना नवीन ठिकाणी गेल्यावर, सगळ्याच गोष्टी बदललेल्या असल्यामुळे बराच वेळ झोप लागत नाही, पण ती पहाटे पहाटे कधी तरी लागते ! याचा पण अनुभव माझ्या प्रमाणे आपल्यापैकी अनेक जणांना आला असेल !

काही लोकांना झोपेत बडबडायची सवय असते आणि बहुतेक वेळा त्या बडबडीचा संबंध जास्त करून, त्यांच्या आयुष्यात घडलेल्या आदल्या दिवशीच्या घटनांवर आधारित असतो, असं म्हणतात ! ह्या झोपेत बडबडणाऱ्या लोकांचा त्रास, हा त्यांच्या बाजूच्यांची झोप सावध असेल तर, ती मोडण्यापर्यंतच मर्यादित असतो, पण याहून जास्त खतरनाक लोकं कोण असतील, तर ते झोपेत चालणारे !

तुम्हाला सांगितलं तर तुमची पण झोप उडेल, पण या जगात 15% लोकांना आपल्या झोपेत चालायची सवय असते ! लहान मेंदूत होणाऱ्या केमिकलच्या लोच्यामुळे किंवा जास्त मानसिक तणावामुळे माणसं झोपेत चालतात, असं विज्ञानाने सिद्ध केले आहे !

बरं नुसतं झोपेत चालणं ठीक, पण त्या झोपेत आपण काय काय करतोय हे त्यांच त्यांनाच कळत नाही, हे जास्त डेंजरस नाही का ?

आपल्या सगळ्यांनाच स्वप्न बघायचा अबाधित अधिकार आहे आणि त्यावर कोणत्याही कायद्याने बंदी येवू शकत नाही ! पण सगळी गोची होते ती, प्रत्येकजण (मी धरून) आपल्या कुवतीपेक्षा जास्त मोठी स्वप्न जागेपणी बघत असल्यामुळे ! पण शेवटी ते दिवास्वप्न असल्यामुळे ते प्रत्यक्षात येण्याची शक्यता नसते ! मग त्यावर उपाय काय, तर ती दिवास्वप्नं आपल्या स्वप्नांत खरोखरचं पुरी झाल्याचा अनुभव आपापल्या झोपेत घेणे व त्यातच आनंद मानणे ! पण कोणतेही स्वप्न पडायला आधी झोप तर यायला पाहिजे !

हिचं सख्य सगळयांशी
असतच अस नाही,
रात्री तर हीच छळणं
अजीबात सोसवत नाही

कोणी करतो हीची
रात्रभर आराधना,
पण हटून बसते ती
जवळ मुळी येईना !

बसल्या बसल्या कोणी
हिला कवटाळतो
बघून त्याच्याकडे एखादा
खरच ओशाळतो

कोणाला पडल्या पडल्या
ही होते लगेच वश
डोळ्यात खुपते अनेकांच्या
अशा लोकांचे यश

श्रीमंतांना गाद्या गिरद्यात
देते ही हुलकावणी
पण, तीच कष्टकऱ्याला
प्रसन्न होते पडल्या क्षणी

विचाराल मला जगी या
सर्वात सुखी कोण म्हणून
म्हणेन मी, कोठेही, केंव्हाही
जो सुखाने देतो ताणून !

तर आपणा सर्वांना, आपण आपापल्या परीने करीत असलेल्या निद्रादेवीच्या आराधनेला सुयश येवून, रोज शांत झोपेचा प्रसाद मिळू दे हीच सदिच्छा !

निद्रादेवीचा विजय असो !

**प्रमोद वामन वर्तक**
**मानपाडा, ठाणे (प)**
**मो.9892561086**

# पळस



रणरणत्या उन्हात ही
तू छान फुलून येतो रे..
हरवूनी रंगात तुझ्या
आम्ही बेभान होतो रे..!

जिकडे  जाई नजर
तुच नजरेत भरतोस..
रणरणत्या उन्हातही
प्रेमळ छाया करतोस..!

उदास जरी दिशांदिशा
भरवतोस आनंद मनी..
जिकडे तिकडे तूच तू
बहरुन येतो रानी वनी..!

उदास भयाण दुपारी
येतोस नजरेत भरुन..
बहरलेल्या फुलांनी
मनात शिरतोस दुरुन..!

दिसतोस फार सुंदर
भरतोस वेड्या मनात..
एकटाच आजही तेथे
उभा असशील वनात..!

तू उन्हात ही बहरुन
घेतो जगण्याची मजा..
जगण्यातिल दुखाला
करतोस वेड्या वजा..!

रानात मंदीरी कुठेतरी
तसाच असावा कळस..
पैलतीरा नदी किनारी
असाच फुलावा पळस..
असाच फुलावा पळस..!

**जावेद शेख**
**जळगाव जामोद जि. बुलडाणा**
**मो. ९९७०६२८७८९**

# संसाराची दावण



दंगा गेला,मस्ती गेली विसरलं सारं
संसाराच्या दावणीला बांधलित पोरं

कोणी करी नौकरी,कोणी करतं धंदा
कोणी झालं पुढारी,कोणी झालं दादा
साऱ्याला गोलगोल फिरवते भाकरं
संसाराच्या दावणीला बांधलित पोरं

कोणी झालं गुरजी,कोणी झालं चेला
कोणी मारतं बाता,कोणी मारतं पेला
कोणी होऊन शिपाई,पकडतय चोरं
संसाराच्या दावणीला बांधलित पोरं

कोणी झालं वकील,कोणी सावकार
कोणी विकी दूध,रोज फिरे दारोदार
कोणी शेतकरी,करी मळा हिरवा गारं
संसाराच्या दावणीला बांधलित पोरं

कोणी पहिलवान,देई मिशीवर ताव
चिडीचिप सारे,त्यांच्या धाकात गाव
कोणी झाले प्रेमी,केले काळजात घरं
संसाराच्या दावणीला बांधलित पोरं

कोणी झालं साहेब,कोणी करी थाट
कोणाच्या संसाराची खडतर वाट
कोणाचे झेंडे गेले, अटकेच्या पारं
संसाराच्या दावणीला बांधलित पोरं

शक्ती आणि युक्तीचा,घालून मेळ
सुखी करा आपल्या,आयुष्याची वेळ
गुणगान गाया,माझ्या शब्दा येऊ धारं
संसाराच्या दावणीला बांधलित पोरं

दंगा गेला,मस्ती गेली,विसरलं सारं
संसाराच्या दावणीला बांधलित पोरं

**शहादेव पा. सुरासे**
**पैठण**
**मो.८३२९६५२६११**

# प्रेरणेस कारण की....



'प्रेरणा'. तीन अक्षरी शब्द. पण खूप अर्थ दडला आहे यात. हे तीन शब्द अक्षरशः जादू करतात आपल्या जीवनात. माणसाला कायमच कुणा ना कुणाकडून प्रेरणा हवी असते. 'प्रेरणा' म्हणजे नक्की काय? तर अशी एखादी गोष्ट जी खरोखर तुम्हाला हलवून टाकते आणि हेलावूनही. दुसऱ्याची अशी गोष्ट ज्यामुळे तुम्ही भारावून जाता आणि तुम्हाला चांगलं काही करण्यास ती गोष्ट प्रवृत्त करते. पुन्हा पुन्हा. रोजचं रुटीन. रोजचं आयुष्य. घड्याळ्याच्या काट्यावर धावणारी वेळ आणि आयुष्य. मन थकतं. कंटाळतं.

बदल हवा असतो. रिचार्ज होण्यासाठी. अशावेळी एखादं गाणं, एखादं पुस्तक, एखादा चित्रपट, एखादं चित्र, एखादा कलाविष्कार, एखादं व्याख्यान, अहो इतकच काय, एखादी व्यक्ती तुमची 'प्रेरणा' बनू शकते. फक्त चांगलं शोधायची, चांगलं ते पहायची शोधक वृत्ती आणि मनाची शांतता आवश्यक असते त्यासाठी. कधी कधी दुसर्याकडे पहायची पण गरज नसते. आपणच आपली 'प्रेरणा' सुद्धा होऊ शकतो. नाही का?

स्वतःतलं चांगलं शोधून त्यावर देखील आपण निश्चितच काम करु शकतो. मी म्हटलं तसं फक्त दृष्टिकोन व्यापक हवा. 'प्रेरणा' आपल्याला काय देते? मनस्वी आनंद, मानसिक समाधान. जगण्यासाठी लागणारी ऊर्जा. जगण्याची उर्मी. सगळं सगळं. मरगळलेल्या मनाला कधी 'उगवणारा सूर्य' जो इमानेइतबारे त्याचं काम करतोय, तो प्रेरणा वाटतो. तर कधी काडी काडी जमवून घरटं बांधणारा एखादा पक्षी प्रेरणा देऊन जातो.

अपघाताने आलेले अंधत्व स्वीकारून डोळसपणे आपले विचार मांडणारी आणि आयुष्याची वाटचाल करणारी 'अनघा मोडक' सारखी व्यक्ती कधी प्रेरणादायी वाटते तर कधी ज्यांचं आभाळ हरवलयं त्यांचा सोबती बनणाऱ्या आणि ज्यांना वाट गवसत नाहीये त्यांचं सारथ्य करणाऱ्या, कुष्ठरोग्यांना माणसात आणणाऱ्या बाबा आमटे यांचं कार्य कुणाला प्रेरणा देऊन जातं. तर कोणाला वपुंचे विचार, त्यांचे शब्द प्रेरणा देतात.

थोडक्यात काय तर जरा डोकावून बघितलं तर आपल्या आसपासच अशा प्रेरणा देणार्या असंख्य गोष्टी आपल्याला सापडतात. फक्त गरज आहे ती, त्या हेरण्याची, त्यांच्यातलं चांगलं आपल्याला दिसण्याची. जाणवण्याची. एकदा का हे जाणवलं की मनाची मरगळ एकदम नाहीशी होते आणि दुप्पट वेगाने आपण कामाला लागतो. तर अशी ही 'प्रेरणा'.

कोरोनाच्या काळात तर प्रत्येकालाच या प्रेरणेची गरज भासली आणि प्रत्येकाने ती अनुभवली देखील.

डॉक्टर आनंद नाडकर्णी यांच्या मते उत्पादकता राखण्यासाठी आपल्याला स्वतःलाच कुणीतरी असे धक्के अधून मधून द्यावे लागतात. हे 'धक्के' म्हणजेच 'प्रेरणा' असावी जी कुणाकडून किंवा स्वतःकडून देखील वेळोवेळी घ्यायची गरज पडते. खरं की नाही?

**आसावरी ऐनापुरे.**
**गिरगाव, मुंबई.**
**मो.9930620898**

# नवख्या ठिकाणी..



नवख्या ठिकाणी अचानक
बासरीच्या स्वरांचा भास होता
कळले मनाला येथे
कृष्णाचा वास होता

ती आली हळुच मागे
त्या दीर्घ स्वरांच्या पाठी
कुठे मिळतो कुणास कृष्ण
केवळ वृक्ष सावली तेथे मोठी

त्याक्षणी स्मरते कान्हाला
त्या सावलीत जाऊनी
अन् हर्षित होते कृष्णाचे
मुख चंद्र नदीत पाहुनी

कान्हा मुखातूनी अलगद
स्वर तिच्या बाहेर पडतो
मात्र हे पाहुनी जाती-पातीत
बाटलेला समाज तिजवर चिडतो

कृष्णा म्हणजे आमुचा
तो तुजला दिसतोच कसा
तुझा धर्म नि जात ही वेगळी
आम्ही पाहिल्यावर होतो नाहीसा

नि ताकीद देऊनी समाज
'न दिसण्याची' तेथूनी पाठ फिरवतो
भडक फिक्या रंगाचे
झेंडे खांद्यावरी घेऊनी मिरवतो

मग तीहि निघते तिजला
जन्मत:च मिळालेला धर्म घेऊनी
समाजाच्या वाटा तुडवीत
नि जाते पून्हा नवख्या ठिकाणी

अन् नवख्या ठिकाणी अचानक
बासरीच्या स्वरांचा भास होता
कळले मनाला येथेही
कृष्णाचा वास होता....

**मेघा रामचंद्र गोळे**
**महाड, रायगड.**
**मो.७२१८९५१६७२**

# खेळ



आयुष्याच्या मैदानात
खेळ माझा रंगत होता,
परफॉर्म करत असताना
षटकार काही जात नव्हता.!

मंदगतीने माझा खेळ झाला
प्रेक्षक त्यावर नाराज झाला,
मनी जिद्द कमी न करता
खेळ माझा सुरुचं ठेवला.!

खेळाचे लक्ष्यही आता
राहिले होते फार-फार दूर,
बॅटीने माझ्या गवसलो
रणांचा धुंवाधार सूर.!

काळालाही माहित झालं
खेळ याचा सुंदर होणार,
त्यानेही मग ठरवलं होतं
याला आता बादच करणार.!

सुंदर खेळाच्या नादात
बॅट माझी तळपतच होती,
काळानेही यॉर्कर टाकून
विकेट माझी घेतली होती.!

मोठ्या धावसंख्येची इच्छा
अपूर्ण तेवढी राहिली,
मैदान सोडताना मात्र
मान खाली घालावी लागली.!

प्रेक्षक जरी नाराज झाला
तरी कप्तान माझ्या सोबत होता,
सर्वांना कुठं माहित होत ? की
हा माझा शेवटचा खेळ होता.!

शेवटचा खेळ होता.!
शेवटचा खेळ होता.!

**भूषण सहदेव तांबे**
**मुंबई**
**मो.९०२९२५८०३८**

# "माझा वेळ माझा हक्क"



एकविसाव्या शतकातल्या गतिमान युगात क्षणभर विसरण्यासाठी एखादा नाजूक, सुंदर, प्रेमळ पण भक्कम नात्याचा भावबंद बघायला मिळतो.तो एका स्त्री मध्येच. प्रत्येक नात्याची चौकट कदाचित निराळी असेल; पण ते नातं दृढ करायचा प्रयत्न करते ती एक स्त्री जी आपलं सारं आयुष्य, आपला वेळ आपल्या आवडीनिवडी बाजूला ठेवून नात्याची वीण घट्ट करण्यासाठी आपला पूर्ण वेळ खर्ची लावते. सारे प्रयत्न पणाला लावते.

आपल्या बायकांच जीवन जगणं म्हणजे काय ? मेणबत्ती सारखं जळून प्रकाश द्यायचा. इतरांना उदबत्ती प्रमाणे जळून घराला सुगंधित करायचं!! संसारात आणि आपल्या माणसात बूडून जायचे,इतके एकरूप व्हायचे ? स्वतःचे वेगळेपण, मी पण विसरुन जायचं ! फक्त समर्पण अन् त्याग !

आयुष्यात किती गुंतवणूक अन् माया पाशात अडकणं ! केव्हा तरी आपण स्वतःला काय हवंय....... काय आवडतय ! काय करायचं याचा विचार करतो का? नेहमीच इतरांची मनं जपायची, आवडी निवडी,रूसवे-फुगवे,दुखणं-खुपण.....सगळ सांभाळायचं. स्वतःसाठी काहीतरी करतो का गं आपण? एकदा मी भानावर आले,जणू मला नवी दृष्टी लाभली. अन् ठरवलं पुरे झाले आता संसारातलं गुंतवणं, ते सण- समारंभ,सोहळे-देणी-घेणी,हेवेदावे................

आता थोडा काळ का होईना स्वतंत्र, स्वतःसाठी जगायचं, आपल्या मनाप्रमाणे डोळे भरून निवांत सारं काही निरखायच. पक्ष्यांच्या मधुर किलबिलाट या प्रमाणे आपणही मस्त गाणी गात मनमुराद भटकायचं, कधी कोसळणाऱ्या पावसात भिजून मस्त पावसाचा आनंद घ्यायचा आपल्याला आवडतील ती पुस्तके वाचावीत मस्त एखादी स्वंछदी ट्रीप करावी.आपल्या आवडीचा एखादा सिनेमा बघावा किंवा चार चौघी मैत्रिणी सोबत हॉटेलमध्ये जावे. तारुण्यात गमावलेला वेळ सत्कारणी लावावा.

सतारीच्या धुंद गोड स्वरात स्वतःलाच काय, जगालाही विसरायचं......अन् जमेलच तर कडू गोड अनुभव शब्दबद्ध करायचे.आता वयाची चाळीशी ओलांडली, आता उरलेले आयुष्य आपल्या साठी जगायचं,आनंदान, खुप केलं इतरांसाठी, सर्वांना भरभरून दिलं, खूप काळ गेला,माया, प्रेम ममतेच्या बंधनात!! आता थोडं स्वतःसाठी !! स्वतःचा आवाज ऐकायचा,स्वताच स्वतःला नव्यानं ओळखायचं !!,आपल्या भावनांना साद घालायचा अन् त्यासाठी काही वेळ काढायचा !!

छोट्या छोट्या गोष्टींमध्ये खूप आनंद लपून बसलेला असतो. त्याचा अनुभव घ्यायचा उरलेल्या आयुष्यात शांतता हवी आहे ! क्षुल्लक गोष्टीकडे लक्ष देऊन आपला आनंद गमवून नाही चालणार.मनाप्रमाणे जगण्यातच खरा आनंद आहे.तो टिकवण्यासाठी आपला हक्क मिळवण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवा.

काळाच्या आरशात स्वतःचे रूप कधी पाहिलं नाही, सजवल नाही, फुलांच्या एकेक पाकळ्या कुस्करून पाण्यात टाकाव्यात तसे दिवस निघून गेले.

आयुष्याची संध्याकाळ कधी होईल कळणार नाही.म्हणूनच आता बोनस आयुष्य आपण आनंदात समाधानात आणि प्रसन्नतेत घालवायचं,त्या साठी मनात असलेल्या विचारांची गर्दी,माझी तुझीची लढाई संपवून टाकायची. गेलेली वेळ,काळ कधीही परत येत नाही,उद्याचा दिवस, आत्ताची वेळ, आपलीच आहे, मग का नाही त्यासाठी मी धडपडायचं?

" पंखामध्ये बळ घेऊन
खूप उंच उडायचे मला
ऊन,वारा पावसाशी नाही
वादळाशी सामना करायचा मला."

**नीता क्षीरसागर**
**कोल्हापूर**
**मो.9552469811**

# स्वातंत्र्याचे मोल समजले का?



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतर तितक्याच उत्साहाने स्वातंत्र्याच्या शतकाकडे आपली वाटचाल सुरु आहे. त्याबद्दल आपणा सर्वांचे अभिनंदन. नुकत्याच झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेतील भारताला मिळालेले यश. त्याआधी देशामध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये लोकांनी निवडून दिलेले सरकार, आपल्या देशात लोकशाही दिवसागणिक प्रगल्भ होत आहे याचीच साक्ष देत आहे.

पण मुळात आपण पारतंत्र्यात का गेलो? हा खूप मोठा प्रश्न आहे. हजारो मैलां वरुन आलेल्या मुठभर इंग्रजांना कोट्यावधीची लोकसंख्या असलेला हा देश कसा जिंकता आला? आम्ही आपापसात फुटलेलो-तुटलेलो, विविध जाती-धर्मांमध्ये गुरफटलेले होतो.

त्यानंतर मात्र वैयक्तिक स्वार्थाच्या पलीकडे विचार करणाऱ्या विचारवंतांनी, समाज सुधारणेची चळवळ सुरु केली. लोकहितवादी, राजाराम मोहन राय, बाळकृष्ण जांभेकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, न्यायमूर्ती रानडे, महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या अनेक महापुरुषांनी आपल्या सामाजिक समस्या लक्षात घेऊन त्यावर काम सुरु केले. पुढे यातूनच 1885 ला राष्ट्रीय सभेची स्थापना व लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल यासारख्या अनेक महान विभूतींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढा उभा राहून भारताला 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले.

यानंतर घटना समितीच्या माध्यमातून आपली राज्यघटना तयार झाली. राज्यघटना तयार झाल्यानंतर ती किती उपयुक्त? या प्रश्नावर उत्तर देताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, त्या राज्यघटनेचा वापर करणारी माणसे ज्या प्रकारे तिचा वापर करतील त्यानुसार ती आपले यश-अपयश दाखवेल. याचा अर्थ केंद्रात पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ किंवा राज्यात मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ यांच्यासाठी केवळ राज्यघटना नाही. तुम्ही आम्ही सर्वसामान्य नागरिक घटनेचा वापर कशाप्रकारे करतो, त्यावर घटनेचे यश-अपयश अवलंबून आहे. आपल्याला जर वाईट सवयी जडलेल्या असतील तर त्यात संविधान काय करणार उदा. सार्वजनिक ठिकाणी पचा-पचा थुंकणे. घरातील कचरा रस्त्यावर टाकने. प्लास्टिकच्या वापराचा अतिरेक करणे. मतदानाच्या दिवशी सुट्टी म्हणून मतदान न करता फिरायला जाणे. ट्रॅफिकचे नियम न पाळणे. अधिकाऱ्यांनी अडवल्यास पैसे समोर करणे. आपले स्वतःचे निवडलेले किंवा नेमून दिलेले काम प्रामाणिकपणे न करणे. आपले बरेच कायदे ब्रिटिशकालीन न्याय व्यवस्थे प्रमाणे आजही आहेत. पण ब्रिटिशांच्या कालखंडात कोणत्याही प्रकारच्या गुन्ह्यासाठी ज्या तात्परतेने कारवाई होत होती. तितक्या तात्परतेने आज होताना दिसत नाही. वर्षानुवर्षे कोर्ट केस सुरु राहतात. त्यालाच आपण तारीख पे तारीख असे म्हणतो. स्वतःचे काम स्वतः न करता वेळ मारुन नेणे. कामाची टाळाटाळ करणे. विविध ठिकाणी होत असलेल्या भेसळीवर दुर्लक्ष करणे. टॅक्स प्रामाणिकपणे न भरणे. मी, माझे कुटुंब व माझा स्वार्थ या पलीकडे विचार न करणे. जातिवाद, जमातवाद, प्रदेशवाद यांना तिलांजली न देणे. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार समजणे. सजग व जागरुक न राहणे. आजच्या युगात वावरतानाही विज्ञानाची कास न धरता, सहिष्णुतेचा स्वीकार न करता, अंधश्रद्धांचा आवडंबर माजविणे. प्रेरणास्थानां मधून योग्य ती प्रेरणा न घेता विविध मार्गांनी प्रेरणास्थानांचे विभाजन करुन समाजात दुही निर्माण करणे किंवा त्याचा उपयोग स्वार्थासाठी करणे. आजही आम्ही आमची जात किंवा आमचाच धर्म श्रेष्ठ यापुढे जात नाही. काळाची पावलं ओळखायची नाही असे ठरवून घेतल्याप्रमाणे वागतो. ज्या देशात छत्रपती शिवरायांनी शून्यातून स्वराज्य निर्माण केले. इतके मोठे प्रेरणास्थान युवकांसमोर असतानाही देशातील युवकांना शून्यातून स्वतःचा उद्योग सुरु करण्याची इच्छा न होता ते नोकरीच्या मागे धावताना दिसतात. अशा सवयी नागरिकांना असतील तर आकाशातून ब्रह्मदेव खाली आले तरी आपल्या समस्या सुटणार नाहीत.

गेल्याच महिन्यात 26 जुलैला आपण कारगिल युद्धाच्या विजयाचा दिवस साजरा केला. पण कारगिल युद्ध का घडले? आपल्या हद्दीत 3 ते 13 किलोमीटर पर्यंतच्या प्रदेशात पाकिस्तानने बंकर्स बांधेपर्यंत आपल्याला कळू शकले नाही. तेव्हा मला इतिहासातील तो एक प्रसंग आठवतो. इ. स. 1308 च्या सुमारास अल्लाउद्दीन खिलजी ने देवगिरीच्या यादवांवर स्वारी केली होती. आमच्या राजांना शत्रू आपल्या किल्ल्याच्या पायथ्याशी आला तरी कळले नव्हते. प्राचीन व मध्ययुगा पासूनचा आमचा इतिहास बघितला तर या घटना सातत्याने घडतांना दिसतात. त्यात अजूनही काही बदल झाला आहे असे दिसत नाही. इतिहासापासून आम्ही काहीच बोध घेत नाही, हे दुर्दैव अजून किती काळ चालू ठेवायचं? हा आपल्यासमोर असलेला खूप मोठा प्रश्न आहे. याशिवाय

ज्या वर्षी हे कारगिल युद्ध झाले, त्याच वर्षी आपल्या तात्कालीन पंतप्रधानांनी भारतातून पाकिस्तानात बस सेवा सुरू केली होती. पुढील 5-6 महिन्यातच कारगिल युद्ध सुरु झाले. तेही तेथील डोंगराळ भागातील एका मेंढपाळ मुलाला काही अनोळखी माणसे दिसली. त्याने ती बातमी येऊन आपल्या द्रासमधील भारतीय लष्कराच्या छावणीत सांगितली.

मिळालेले स्वातंत्र्य वापरण्यास व ते टिकवण्यास खरच आम्ही सक्षम आहोत का? हा या निमित्ताने पडलेला एक खूप मोठा प्रश्न आहे. इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान चर्चिल भारताच्या स्वातंत्र्याबद्दल असे जाहीरपणे सांगत, या देशातील लोकांची स्वातंत्र्य स्वीकारण्याची क्षमताच नाही. आपण स्वातंत्र्य दिल्यानंतर थोड्याच दिवसात हा देश पुन्हा तुकड्या तुकड्यांमध्ये विभागला जाईल. काही प्रमाणात भ्रष्ट, लफंगे, दारुडे, गुन्हेगार, विविध फौजदारी गुन्ह्यांसाठी जेलमध्ये जाऊन आलेले, जनतेत दहशत पसरवणारे, भ्रष्टाचारी माणसे सत्तासूत्र हातात घेतील व ठिकठिकाणचे वतनदार, जहागीरदार आपली वतने व जहागिरी लोकशाहीच्या नावाखाली सांभाळली जावीत म्हणून त्या भ्रष्ट लोकांना पाठिंबा देतील किंवा पाठीशी घालतील. आज काही वेळेला देशासमोर निर्माण झालेल्या समस्यां संदर्भात, समोर घडणाऱ्या घटना संदर्भात, निवडणुकींच्या निकालांसंदर्भात, सामाजिक व राजकीय घडामोडी संदर्भात, विविध आंदोलने व संप संदर्भात प्रश्न निर्माण होतो की आपण चर्चिलला द्रष्टा वक्ताच बनवले आहे. असे एक राष्ट्राभिमानी शिक्षक म्हणून सतत वाटत राहते.

याशिवाय खूप महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, या देशातील सर्व नागरिकांना खरंच स्वातंत्र्याचे मोल समजले आहे का? स्वातंत्र्य मिळाल्याचे मोल कळणे म्हणजे स्वातंत्र्य मिळेपर्यंत मग ते सशस्त्र क्रांतीकारक असतील किंवा सनदशीर मार्गाने स्वातंत्र्यलढा देणारे त्या सर्वांच्या समर्पण व केलेल्या त्यागाबद्दल आम्ही कृतज्ञ असले पाहिजे, ज्या वीरांनी आपला संसार सोडून देशाच्या संसारासाठी, कल्याणसाठी, विकासासाठी, स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग व बलिदान केले त्यांना विसरता कामा नये. देशासाठी कलंक ठरेल असे कोणतेही वर्तन मी करणार नाही. स्वातंत्र्य ही काही काल्पनिक किंवा चमत्कारिक गोष्ट नाही. आपले कर्तव्य नीट व प्रामाणिकपणे करणे हीच देशभक्ती आहे, देवभक्ती आहे, देशसेवा आहे, देशप्रेम आहे, साधना आहे, चिंतन आहे, मनन आहे. अशा कर्तव्यदक्ष माणसां मधूनच राष्ट्र घडत असते. राष्ट्रपिता महात्मा गांधी सांगत देशाच्या विकासासाठी जो बदल व्हावा असे तुम्हांला वाटते, तो बदल आधी स्वतःमध्ये करा, तर आणि तरच आपलं राष्ट्र, आपला देश, आपली राज्यघटना म्हणजेच आपलं संविधान, आपली लोकशाही, आपले प्रजासत्ताक चिरायू राहील. त्यातूनच आपण सर्व खऱ्या अर्थाने सुखी, समाधानी व आनंदी होऊ.

आपल्याला स्वातंत्र्य मिळाले पण ती स्वातंत्र्याची पहाट रक्ताळलेली होती. 16 ऑगस्ट 1946 'प्रत्यक्ष कृती दिन' या दिवशी झालेला नरसंहार म्हणजे प्रत्यक्ष लष्कराचा वापर न करता झालेला तो जगातील सर्वात मोठा नरसंहार होता. या धर्मांधतेचा परिणाम म्हणजेच पाकिस्तानचा जन्म. या स्वातंत्र्यदिनानिमित्ताने आपण हे विसरता कामा नये.

दुर्दैव तर या पुढे आहे की आज 75 वर्षांनंतरही देशात अशा प्रवृत्तीची कमतरता नाही. पुन्हा हे कधी होईल सांगता येत नाही. पण होणारच नाही, असेही सांगता येत नाही. याला अनेक परकीय शक्तींचाही पाठिंबा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा हे काय मोठे संकट उभे आहे? याची जाणीव व जागृती व्हावी. यासाठी सुद्धा आज प्रयत्नांची आवश्यकता आहे.

आपल्याला याची जाणीव आहे का? दुर्दैवाने याचे उत्तर नाही असंच आहे. आम्हीं आजही मी, माझे घर किंवा माझी जहागिरी यात इतके मग्न आहोत की संकटाच्या वास्तविकतेचे भान नाही. मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या भिवंडी जवळ पडघा गावात दहशतवादाचे मोठे केंद्र निर्माण झाले. हे अगदी अलीकडच्या काळात N I A च्या छाप्यात उघड झाले आहे.

केवळ 15 ऑगस्ट, 26 जानेवारी आणि राष्ट्रीय सणांना देशभक्तीपर गाणी, भाषणे म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. ते आतून आले पाहिजे म्हणजे मनापासून आले तर या एक अब्जाच्या पुढे लोकसंख्या असलेल्या देशाकडे कुणी वाकड्या नजरेने बघण्याची हिंमत करणार नाही. त्यासाठी प्रत्येकाने हा देश घडविण्यासाठी, विकसित करण्यासाठी, आत्मनिर्भर करण्यासाठी, "मी माझा खारीचा वाटा उचलणारच" अशी शपथ घेतली पाहिजे. हा खारीचा वाटा उचलणे म्हणजे काय तर फक्त आपण स्वीकारलेले काम प्रामाणिकपणे करणे.

त्यासोबतच स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजतागायत आम्ही आमचे दारिद्र्य दूर करण्यास यशस्वी झालो नाही. आजही जनता शंभर टक्के साक्षर नाही. बेरोजगारी आहे. आपल्या शेजारी असलेला चीन ज्याची अर्थव्यवस्था २१ ट्रिलियन डॉलर असताना आम्हांला तीन ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचायला कष्ट पडत आहेत.

याचा अर्थ असाही नाही की आम्ही स्वातंत्र्य मिळविल्यापासून आजपर्यंत काहीच प्रगती केली नाही. या कालखंडात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपले राष्ट्रीयत्व बळकट झाले. तरी देशात आजही काही शक्ती आहेत. ते या भारताला राष्ट्र मानत नाहीत. काहींच्या मते 15 ऑगस्ट 1947 पासून आपले राष्ट्र निर्माण झाले. तर काहींच्या मते ब्रिटिशांच्या साम्राज्यामुळे आपले राष्ट्र तयार झाले. माझ्या मते आपल्या विविधतेतच एकता आहे. अगदी प्राचीन रामायण-महाभारता पासून आज पर्यंत इथे नांदलेली संस्कृती एक होती व तिच्या मुळाशी सहिष्णुता आणि सर्व समावेशकताही होती. म्हणूनच आधुनिक समाज व्यवस्थेचा अंगीकार करतांना आपण राज्यघटनेचा स्वीकार केला.

याशिवाय विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात स्वातंत्र्योत्तर

कालखंडात आपण केलेली प्रगती ही अभिमानास्पद अशीच आहे. अर्थात याचा पाया स्वातंत्र्यपूर्व कालखंडात जमशेदजी टाटा, जगदीश चंद्र बोस, डॉ. चंद्रशेखर व्यंकट रमन तर स्वातंत्र्यानंतर अनुशास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा, अवकाश शास्त्रज्ञ डॉ. विक्रम साराभाई, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. अनिल काकोडकर, डॉ. जयंत नारळीकर, इस्त्रोचे अध्यक्ष डॉ. सतीश धवन, हरित क्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामीनाथन, धवल क्रांतीचे जनक डॉ. वर्गीस कुरियन, डॉ. हरगोविंद खुराना, मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या या वैज्ञानिकांनी प्रगतीची नवी नवी शिखरे देशाला पदक्रांत करून दिली. आधी मंगळयान व आता सूर्ययान कडे वाटचाल सुरूच आहे. याशिवाय आज बायोटेक्नॉलॉजी, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नॅनोटेक्नॉलॉजी यासोबतच आर्टिफिशियल इंटेलिजन्स मध्येही आपण प्रगती केली आहे. ती भारतीय शास्त्रज्ञांच्या व त्यांनी शोधलेल्या स्वदेशी तंत्रज्ञानाच्या जोरावरच. याशिवाय आपण कोविड कालखंडात केलेल्या कामगिरीचे जगाने कौतुक केले.

आपण आत्मनिर्भर होऊ शकतो याची जाण आपल्याला आहेच. आज भारतातील 66% जनता वय वर्ष 35 च्या खाली आहे. हा लोकसंख्येचा लाभांश आहे. या लोकसंख्येला रोजगार मिळाला तर, सर्वांगीण आर्थिक प्रगती होऊ शकेल. असे मत जागतिक अनेक विचारवंतांचे, उद्योजकांचे व गुंतवणूकदारांचे आहे.

आज आपल्या शेजारी असलेला देश चीन हे एक प्रगत राष्ट्र आहे. पण त्यांचे एक अपत्याचे धोरण त्यांच्या अंगाशी येत आहे. आज चीनमध्ये काम करणाऱ्या लोकांची संख्या कमी आहे व त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या ही वर्षागणिक वाढत चाललेली आहे. ही फार भयंकर गोष्ट आहे.

आपण आत्मनिर्भरतेच्या वाटेवर आहोत. हा प्रवास करताना त्यात अनेक धोके आहेत त्यातील सर्वात मोठा धोका पर्यावरणाचा तो दिवसागणिक वाढत जाणार आहे. कारण कार्बनचे प्रमाण वाढत आहे आणि वाढणारे कार्बनचे प्रमाण या पृथ्वीला विनाशाकडे घेऊन जात आहे. पर्यावरणाचा ऱ्हास औद्योगिक क्रांती पासून आजतागायत सतत होत आहे आणि आज तो अपेक्षेपेक्षा खूप जास्त झालेला आहे. वाढत जाणाऱ्या उष्णतेमुळे हिमालयासहित दोन्ही ध्रुवांवरील बर्फ वितळण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक शास्त्रज्ञांच्या मते याची सुरुवात झाली आहे व भविष्यात ही प्रक्रिया वेगाने घडणार आहे. पर्यायाने पाण्याची पातळी वाढेल. साधारणता शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार सध्या असलेल्या भूभागाचा 40% भूभाग हा पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. हे चित्र आता दिसायला लागले आहे. यामुळे बारमाही वाहणाऱ्या नद्या बर्फ वितळल्याने नंतर कोरड्या पडतील. यातून वाळवंट निर्माण होईल. या वाळवंटाने स्थिती अत्याधिक भयान आणि भकास होईल. तेव्हा आपण फक्त वैयक्तिक स्वार्थापोटी कमविलेल्या संपत्तीचा आपल्या पुढच्या पिढ्यांना नक्की किती उपयोग होईल? याचा विचार कधीतरी करणार की नाही? जेव्हा पाण्यासाठी जग संघर्षाच्या खाईत जाणार तेव्हा आज तुम्ही आम्ही ज्या गोष्टीसाठी संघर्ष करत आहोत त्याचे काय होणार? यावरही विचार नको का करायला? भारताने तोही केला आहे.

याचाच विचार करत आपण पॅरिस पर्यावरण परिषदेत पर्यावरण संतुलन राखण्यासंदर्भात जगासमोर एक योजना ठेवली. त्यानुसार जगाने अवलंब केल्यास या शतका अखेरपर्यंत 2 अंश सेल्सियस पेक्षा जास्त तापमान वाढणार नाही. असे होणे सर्वांच्याच हिताचे आहे.

याशिवाय दुसरी मोठी समस्या म्हणजे भविष्यात भारताला अनेक आघाड्यांवर लढावे लागू शकते दहशतवाद, आतंकवाद, नक्षलवाद यांना बाह्यशक्तींचे असलेले पाठबळ. याशिवाय जमातवाद व प्रदेशवादाचे दिवसागणिक वाढत जाणारे प्रश्न. पाकिस्तान व चीन या प्रश्ना सोबतच भारतीय उपखंडातील अस्थिरता अशांतता या आपल्यासमोर खऱ्या समस्या आहेत. आपण जागृत राहून यावर मात करत प्रगती घडवून आणली पाहिजे.

आपण काय करू शकतो? तर कमी प्रदूषण करणारी जीवनशैली स्वीकारणे. प्लास्टिकचा वापर नियंत्रित करणे. साधी राहणी व उच्च विचारसरणीसोबतच वृक्षारोपण, नियमित योग साधना केली तर अनेक समस्या नियंत्रणात ठेवू शकतो.

शालेय जीवनात वर्गात किंवा खेळांमध्ये प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी जी निकोप स्पर्धा असते अगदी तशीच स्पर्धा सर्व विभागामध्ये, राज्या राज्यात, जिल्ह्या जिल्ह्यात, तालुका तालुक्यात, खेड्या खेड्यांमध्ये प्रगती संदर्भात, विकासासंदर्भात, स्वच्छते संदर्भात, वन्यजीवन, वृक्षारोपण व जंगल संवर्धना संदर्भात सुरू करता येईल. यामुळे माझी मुलं, माझे नागरिक, माझे खेडे, माझे गाव, माझा तालुका, माझा जिल्हा, माझे राज्य हे सर्व संपन्न होण्यास मदत होईल. त्यामुळे देश विकसित होईल. सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे रोजगाराचा प्रश्न मिटेल. अशी निकोप स्पर्धा विकासासाठी पूरक ठरेल. प्रत्येकाच्या उपक्रमांना प्रसिद्धी देणे. यातून चांगल्या गोष्टी पुढे येतील. उत्तम कामगिरी करणाऱ्यांना उत्तम पारितोषिकेही देता येतील. पण या स्पर्धा निकोप ठराव्यात. एकमेकांविषयी सहकार्य आपुलकी व प्रेमाची भावना वृद्धिंगत व्हावी म्हणून गरज वाटल्यास एक स्वतंत्र यंत्रणा कार्यरत करावी लागेल.

शेवटी 'ज्या ज्या ठिकाणी शक्य त्या सर्व ठिकाणी आपल्या उत्तमतेचा व प्रतिभेचा ठसा उमटवणारे काम करणे' अशी या 15 ऑगस्ट ला या राष्ट्रध्वजाला सलाम करताना आपण सर्वांनी शपथ घेऊ या.

**प्रा. प्रशांत पुंडलिक शिरुडे**
**के.रा. कोतकर माध्यमिक**
**उच्च माध्यमिक विद्यालय, डोंबिवली**
**मो.9967817876**

# विठू माझा सावळा



चंद्रभागा नदी तीरी
सुखावला तो सावळा
तोच आहे पांडुरंग
विटेवरी उभा काळा

रंग असूनही काळा
मन आहे त्याचे साफ
मनोभावे भक्ती ज्यांची
त्यासी तोचि मायबाप

मंदिराच्या पायरीस
दिली नामदेवा जागा
संत सज्जन कल्याणा
युगे अठ्ठावीस उभा

मुखी हरी नाम जप
गळा तुळशीची माळ
शुभ्र वस्त्रे वारकरी
वाजवीत येती टाळ

वारी आषाढी कार्तिकी
भेटी साठी दिंड्या येती
तुझ्या भक्तीचा महिमा
सारी दुनिया पाहती

पंढरीच्या वाळवंटी
वाहे वारकरी पूर
स्नान भीमेत करुनि
जीव भेटण्या आतुर

पंढरीच्या पांडुरंगा
तुझा महिमा अपार
भक्त भेटीसाठी येती
सोडुनिया घरदार



श्री.युवराज गोवर्धन जगताप
काटेगाव, सोलापूर
मो.8275171227

# आनंद तरंग



माणसाचं आयुष्य म्हणजे विविध रंगांनी रंगलेले असते. माणसाने बहुरंगी असल्याशिवाय त्यांच्या आयुष्यात स्पतरंगाची उधळण होत नाही. अनेक रंग संगतीत माणूस जगत असतो वेगवेगळ्या रंगछटा माणसांच्या जीवनात रंग भरत असतात. आणि प्रत्येक रंगाचा आनंद माणूस घेत असतो.

नकळतपणे माणसाच्या आयुष्यात वेगवेगळा रंग येत असतात. रंग कसाही असुदे कुठलाही असु दे त्या रंगात कुठलाही बेरंग मिसळायला नको म्हणजे झालं,नाहीतर मग आयुष्याची धुळधाण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आंनदाची डोही आनंद तरंग या युक्ती प्रमाणेच माणसाने जगण्याचा आनंद घेतला पाहिजे. आपल्या अवतीभोवती विविध रंगांची माणस, अर्थात विविध स्वभावाची माणस रेंगाळत असतात कळत नसतो त्यांच्या स्वभावाचा,वागण्याचा रंग आपण पुर्ण विश्वासाने त्याला आपलस करतो आणि मग एक दिवस असं काही होत की संबधीत व्यक्त त्याचे खरे रंग दाखवायला लागतो. म्हणून कोण केव्हा कसा पाठीमागून येईल आणि बेरंगाची उधळण करेल काही सांगता येत नाही. काय असतं की सध्याच युगात पाहिले तर माणसांच्या जगण्याला एव्हढी गती आली आहे की एका जागी त्यांचे पावले थांबत नाही. सतत धावत असतात. घड्याळी प्रमाणे पळत असतात. माणसाच जगणं एव्हढ काही फास्ट झालं आहे की त्याला स्वतःला स्वतःची भ्रांत राहीली नाही.

स्वत:लाच नाही तर परिवाराला देखील वेळ देता येत नाही इतका माणूस व्यस्त झाला आहे. मग याला काय म्हणावे प्रगतीच्या दिशेनं माणसाची वाटचाल की जगण्यासाठी जीवघेणी धावपळ. खर तरं माणसाने हसत खेळत रहावं, आनंदात जगावं जे काही डोळ्यांना चांगलं दिसेल ते डोळ्यात साठवून आत्मसात करावं,आपल्याला जे आवडेल ते करावं प्रत्येक क्षणाचा आनंद घेताना आपल्याला हवं तितकं मनमुराद हसू घ्यावं कारण हास्य रंगाने माणसाच्या अंगावरची मरगळ दुर होते चेहऱ्यावरचा ताणतणाव कमी होतो आणि मग आनंदाच्या छटा चेहऱ्यावर तरंगायला लागता, मन प्रसन्न होते, मनातली उदासीनता दुर होते, माणूस ताजातवाना होतो आणि एक प्रसन्न मुद्रा माणसाला चिरतरुण ठेवते. माणसाच्या जिवनात हाश्यरंग नसते तर त्याचे जगणे अतिशय निरस राहिले असते.

कारण हसणे हा दैनंदिन जीवनातील एक अविभाज्य भाग आहे एक क्षणभर हसु माणसाला हसत खेळतं ठेवते,हास्यनंदमुळे सकारात्मक उर्जा मिळते तर हास्य कल्लोळाने माणूस नेहमी प्रसन्न रहातो विनोदातुन मान्य निर्माण झाल्याने मेंदूची शक्ती वाढते. म्हणून माणसाने नेहमीच प्रसंन्नतेला सोबत घेऊन फिरायचे हवे. प्रसंन्नताही अशी असायला हवी की बघनाऱ्यालाही आपल्या प्रसन्नतेचा हेवा वाटला पाहिजे. कारण एक गोडं हसु किती तरी नजरेमधे बंद होत असते.

आपल हसु पाहून,आपल्या चेहऱ्यावरचा आनंद, आपली प्रसन्नता पाहुन दुसऱ्याच्याही चेहऱ्यावर हसु फुलायला लागते. तेव्हा माणसाने कसलाच विचार न करत आनंदाच्या डोहात डुबकी मारून हसतखेळत रहायला हवं तरच माणूस खऱ्याअर्थाने जगू शकतो. आनंद तरंगच्या लहरी जर माणसा मधुन निघून गेल्यात तर राहत तरी काय निरागसता?

नीरागसमुळे माणसाचं आयुष्य कमी होते. अस म्हणतात की आयुष्य खूप सुंदर आहे आणि अशा सुदंर आयुष्याचा आनंद ज्याने नाही घेतला तो थांबला. म्हणून माणसाने नेहमीच हसत खेळतं रहायचं मस्त जगायचं. आपल्यातला थोडा आनंद जरी दुसऱ्याला देता आला तर आपण खूप काही मिळवलं समजा.

माणूस जन्माला आल्यानंतर अनेक जबाबदारीच ओझं त्यांच्या खांद्यावर असतं आणि प्रत्येक जबाबदारी एक कर्तव्य म्हणून त्याला पुर्ण करायची असते. या दरम्यान अनेक अडचणीही येतात, नैराश्य येते काम करण्याचा उत्साह संपून जातो, अपेक्षा भंग होतात,चिंतेच्या रंगाची ढवळा ढवळ माणसांच्या आयुष्यात रंग भरत असते.

पण प्रत्येक समस्येतून काहीना काही मार्गाने सापडत असतो. प्रयत्नांची वाट अवघड असली तरी आपली पावले डगमगायला नको,आपल्या पावलांवर भरवसा असला पाहिजे. भरवसा नसेल तर पावले पुढे पडणार नाही. अडचणी किती आल्या तरी ज्याला तोल सांभाळता आला त्याला पळणे अवघड नसते. अडचणींच्या फेऱ्यात अडकलेला माणूस काहीही करून आपल्या ध्येयापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करेल पण मागे थांबणार नाही.

नैराश्याने अडचणी दुर होत नाहीत तर जबाबदारी पासुन माणसाला दुर नेण्याचा प्रयत्न होत असतो. माणसाकडे विचारशक्ती किंवा विचार करण्याची क्षमता एव्हढी दांडगी आहे की जर गांभीर्याने विचार केला तर एखाद्या अडचणीही सहज मार्ग सापडतो. त्यासाठी माणसाने प्रयत्नवादी असायला हवे.

जीवनामध्ये अनेक चढ उतार येत असतात,प्रत्येक चढ उतार काही सारखे नसतात. पण केव्हा कुठे कसे

वळण घ्यायचे हे ज्याला जमले त्याला कुठल्याही वाटेवर धावणे अशक्य नसते. तेव्हा अडचणी आल्या म्हणजे आयुष्य थांबत नाही. उलट जगण्याचं बळ मिळते प्रत्येक आव्हान नवीन काहीतरी शिकवत असते. त्यातून जो शिकला त्याला पुन्हा मागे वळून बघण्याची गरज पडत नाही. खरतर जखमी झाल्याशिवाय माणसाला वेदनांची तीव्रता कळत नाही.

वेदनांच्या रंगावर फुंकर घालता आली पाहिजे म्हणजे त्या फुकंरीच्या गारव्याने जखम फारशी पिचडतं नाही. कारण वेदनाच वारंवार आपल्या अडचणी,समस्या, आपल्या प्रतिकुल परिस्थितीची जाणीव करून देत असते. अशाही संकटावर जो मात करून पुढे जाण्याच्या प्रयत्नात असतो. तोच खरूयाअर्थाने जबाबदारीतून सहजपणे मुक्त होतो. काही माणसं खचून जातात नैराश्याने वेगळा विचार करतात पण स्वतःला संपवणे म्हणजे सर्वकाही संपले असं होतं नाही. ही पळवाट झाली.

या उलट प्रतिकुल परिस्थिती माणसाला जगण्याची एक नविन संधी देत असते म्हटलं तर वेळ काळ पुन्हा काहीतरी करण्यासाठी यशाचे दार खुले करून देत असतो. ज्याने त्या यशाच्या दारातून प्रवेश करून प्रयत्नांचा शिखर पार करताना आपले ध्येय साध्या करण्यात यश मिळवले तर तो या जगाच्या पाठीवर कुठेच अपयशी ठरत नाही.

अशी खूप उदाहरण देता येतील की प्रतिकूल परिस्थितीत कठोर परिश्रम करून यशस्वी झालेत आणि ते जगावर राज्य करतायं. तेव्हा घाबरायचे कशाला लढायच जो लढायला शिकला तो लढवायला ही शिकवतो आणि अशी लढवैये माणसं आयुष्यात कुठेच कमी पडत नाही.

संघर्षाच्या वाटेवर संकट येतच असतात त्यावर मात करून जे अडथळे पार करतात त्यांच्या चेहऱ्यावर कायम आनंदाच्या रंगछटा रंगत दिसतात. अर्थात कायम हसतमुख असतात. अशी माणसं कितीही अडचणी आल्यात तरी फक्त

देवावर विश्वास ठेऊन आयुष्य जगत असतात. मगं अशा परिस्थितीत स्वतःशीच बोलत रहायचं किंवा स्वतःची समजूत काढायची की. एक दिवस माझाही असणार आहे. प्रगतीचा ध्वज फडकावयाला काही वयाची अट नसते माणूस कोणत्याही वयात यश मिळवू शकतो. तेव्हा स्वतःशीच बोलत रहायचं की होईल सर्व काही ठिक होईल कधी कधी वाईट दिवसांत वाईट अनुभव येत असतात,अशावेळी कोणी सोबत नसतो. म्हणून चांगल्या दिवसांसाठी आपणचं आपलीच समजूत काढायची.

कारण वेळ वाईट असते पण आयुष्य कधीच वाईट नसते. स्वतःखंबीर राहिलात की वाईट दिवसही निघून जातात. उगवणारा दिवस,उगवती पहाट एक नवीन संधी घेऊन येत असते. त्या संधीच सोन करण्यासाठी आपल्या मनगटात जोर असावा लागतो. आयुष्य म्हटलं म्हणजे संघर्ष असणारच आहे. अशाही संघर्षाच्या काळात चुकीचा मार्ग न निवडता जो प्रामाणिकपणे कष्ट करत रहातो त्याला देव कुठल्याही रूपात येऊन मदत करत असतो. म्हणून धिर ठेवायचा संयम बाळगायचा वाईट वेळ निघून जाते आणि केंव्हातरी चांगल्या दिवसाची सुरुवात होतेच.

सुवर्ण दिवसाची वाट बघायची जो वाट बघायला शिकला तो आयुष्य जगायला शिकला समजा. जेव्हा माणूस एकटा पडतो ना तेव्हा त्यांच्या सोबत कोणीच नसतं. पडत्या काळात दुर उभे राहून गंमत बघतील पण वेदनांचे अश्रु पुसायला कोणी येत नाही अशा वेळी आपले अश्रु आपणच पुसायचे असतात. सहानुभूती ही तेव्हढ्या पुरतीच असते. पण जी व्यक्ती स्वतःचे अश्रू पुसुन पुन्हा लढायला नव्याने उभा रहातो ती व्यक्ती आयुष्यात काहीही करू शकते. आहे त्यात समाधानी राहुन आनंदात जगणाऱ्या माणसांच्या आयुष्यात नक्कीच सुखाचे दिवस आल्यावाचून राहत नाही.

काही माणसं कमी वेळात श्रीमंत होण्याचे स्वप्न पहात असतात. माणसाने श्रीमंत जरूर व्हावं पण वाट चुकणार नाही याची तितकीच काळजी घेतली पाहिजे. कारण कमी वेळेत उंच भरारी घेणारे काही कमी नाहीत पण कमी वेळेत उंच भरारी घेण्याचा वेग जर कमी झाला तर उंचावरून जमीनीवर कोसळल्यानंतर त्याला उचलायला कोणीही येत नाही.

तेव्हा प्रगतीच्या दिशेनं धावताना शॉर्टकट मारण्याचा आगाऊपणा कधीच करायचंय नाही. शॉट कट वाटेवर आत्मसन्मान आणि आत्मसमाधान आत्मसमाधान नसते. कारण छोट्याशा विश्वात जगणाऱ्या माणसांच्या चेहऱ्यावर समाधानाचे रंग अधीकं उजळून दिसतात. म्हणून आपल्या जवळ जे आहे त्यातच समाधानी राहून जो जगण्याचा आनंद घेतो तो जीवनात कधीच असफल होत नाही.

गरिबीची झळ किंवा प्रतिकुल परिस्थितीची झळ परिस्थमाणसाला जगणं शिकवते आणि ज्याने झळ सहन केली ज्याचे जीवन उजळून निघते व त्याचा जन्म सार्थकी लागतो. आपलं आयुष्य हे स्वतःच्या मता प्रमाणे जगलं पाहिजे आपल्या जगण्याची दोरी कुणाच्या हातात देऊ नये. कारण आपण आपल्या आयुष्याचे मालक आहोत. मग आपल्यावर जर दुसरा कोणी मालकी हक्क गाजवत असेल तर अनेक अडथळे येऊ शकतात.

आपल्या स्वातंत्र्यावर कोणालाही बंधनं घालण्याचा अधिकार नाही. धाक असावा,आणि असलाच पाहिजे. आपल्यावर कोणाचा धाक असेल तर पावलं चुकत नाही किंवा वेगळ्या वळणावर जात नाही. धाक माणसाला चुकीच्या कामापासून दुर ठेवत असतो.

पण व्यक्ती स्वातंत्र्यावर जर कोणी हस्तक्षेप करत असेलं तर ते अयोग्य आहे. कारण आपण आपल्या अधिकाराने जगत असतो. तेव्हा कुणाला आवडो अथवा न आवडो आपण आपल्या पध्दतीने जगण्याचा आनंद घ्यायचा. कुणाला आवडत नसेल तर दुरून डोंगर साजरे

करायचं आणि आपण आपल्या मार्गाने चालत रहायचं. कारण दिवस येतात जातात रोज नवरंगाची माणसं भेटतात.

काही आपली होतात तर काही परकी वाटतात. कोणाला जवळ करायचं कोणाला दुर ठेवायचं हे आपणच ठरवायचं पण आपल्या आयुष्यात कळत नकळतपणे सुख दुःख समृद्धीच्या इंद्रधनुष्याची बरसात होत असते.

तेव्हा आपल्या आयुष्यात येणारा आनंद तरंगचा आनंद घेण्यासाठी आपलं आयुष्य सप्तरंगी असायलाच हवं एव्हढ मात्र खरं....

**संजय धनगव्हाळ**
**देवपूर, धुळे**
**मो. ९४२२८९२६१८/९८७९११३५४७**

• 'व्यक्तिमत्व विकास' हे नियतकालिक मुद्रक, मालक, संपादक आणि प्रकाशक मंगेश विठ्ठल कोळी यांनी कवितासागर प्रिंटींग सर्व्हिसेस, जयसिंगपूर येथे छापून 'व्यक्तिमत्व विकास' कार्यालय, सुदर्शन, प्लॉट १६, पद्मावती सोसायटी, बायपास रोड, नांदणी नाक्याजवळ, जयसिंगपूर - ४१६१०१, तालुका - शिरोळ, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र, भारत येथून प्रसिद्ध केले.

• फोन - ०२३२२ - २२५५०० भ्रमणध्वनी - ०९०२८७१३८२०

• ईमेल - mangeshvkoli@gmail.com

• संपादक - श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

• कार्यकारी संपादक - डॉ. सुनिल दादा पाटील

• वादविवाद जयसिंगपूर न्यायालयाच्या कक्षेत.

• या अंकामध्ये प्रकाशित झालेल्या मजकुराशी मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

• पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी मंगेश विठ्ठल कोळी यांच्यावर आहे.

• व्यक्तिमत्व विकास या नियतकालिका मधून प्रसिद्ध झालेल्या कथा, कविता, लेख व अन्य साहित्यांचे सर्व हक्क राखून ठेवलेले आहेत.

# “दृष्टिकोन”



परवाच मोबाईलवर एक व्हिडिओ पाहायला मिळाला, त्याचा आशय असा होता. शहरातील एका आलिशान हॉटेलच्या उदघाटन प्रसंगी विविध क्षेत्रातील नामवंत मंडळी उपस्थित होती. मुद्दाम दर्शनी भागामध्ये ठेवलेले मिसिंग फ्लोअर आणि समोरच उंचच्या उंच पांढऱ्या शुभ्र भिंतीवर असलेले दोन काळे स्पॉट (ठिपके) सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. लाखो करोडो रुपये खर्चून बांधलेल्या हॉटेलमध्ये असंख्य बाबी प्रसंशनीय कुशल व सुबक होत्या. हॉटेलला भेट दिलेल्या तज्ञ जाणकारांनी दिलेला फीडबॅकही तसाच होता, त्यात चांगल्या बाबीवर कमी व दोन उणीवांवर जास्त लेखन केले होते. हॉटेलमध्ये प्रवेश करताच सुहास्य वदनाने स्वागत करणाऱ्या त्या युवती, त्यांचे पोशाख, आतील लाईट योजना, कार्पेट, टेबलांची मांडणी पदार्थांची मांडणी, जेवणानंतरचे स्वीट, वाढण्याचे कौशल्य, बिल अदा करण्याची पद्धती सर्वच्या सर्व बाबी लक्ष वेधून घेणाऱ्या होत्या. त्यात फक्त दोन उणीवा त्यावर मात्र जास्त चर्चा.

माणसांचही असंच आहे ना? आपल्या आयुष्यात अशा अनेक सकारात्मक बाबी असताना मात्र उणीवांवर कमतरतेवर खूप खूप उहापोह केला जातो. उणींवावर रडत बसण्याची सवयच जणू जडलेली, त्यामुळे माणसाची प्रगती खुंटते आहे, असे मला वाटते. उणीवा, अडचणी, समस्या या असणारच त्याकडे दुर्लक्ष करून आहे त्या चांगल्या बाबी अंगीकारील्या तर जीवन नक्कीच सुसह्य होईल. संकटांना संधी म्हणून स्वीकारले तर पुढच्या अनेक बाबी सोप्या होतील. नात्यांच्या बाबतीत ही असेच म्हणावेसे वाटते, समोरच्या व्यक्तीला, नातेवाईकांना गुणदोषासह स्वीकारायला शिकले तर किती छान होईल? सर्व गुण संपन्न अशी कोणतीही व्यक्ती असणार नाही. दोषाकडे दुर्लक्ष करून त्यांच्यातले गुण पाहिले तर अनेक बाबी सुलभ होतील एकमेकांची शंका, असुया, गैरसमज नाहीसे होतील. एकमेकांत सहकार्य वाढून नाती भक्कम होतील.

थोडक्यात काय? माणसाचा दृष्टिकोन संकुचित, नकारात्मक बदलून सकारात्मक व पारदर्शी बदल करूयात, सर्वच बाबी सोप्या, सुलभ होतील व आयुष्य सुंदर व संपन्न होईल. याबाबत एका मुक्या पक्षाचे उदाहरण देता येईल......

दररोज स्वतःसाठी, पिलांसाठी घरटं बनविणारं एक चिमणा चिमणीच जोडपं आणि कचरा होतोय म्हणून दररोज तेच घरटं मोडणारा माणूस असं काहीसं सुरु असतं. एक दिवस काकुळतिला येऊन चिमणी जोडीदाराला म्हणते माणूस असा कसा हो? आपण दररोज घरटं बनवतो आणि तो घरटं मोडतो यावर चिमणा म्हणतो....अगं! माणूस त्याचं काम तो करतो आपण आपलं काम करूयात! आणि हे ऐकून चिमणा चिमणी दोघेही नवीन घरट्यासाठी गवत आणि काड्या आणण्यासाठी आकाशात उंच भरारी घेतात. कधीतरी आपण ही चिमणा चिमणी होण्याचा प्रयत्न करूयात.

एका व्याख्यानमालेत एक व्याख्याते “सकारात्मक दृष्टिकोन यशाची गुरुकिल्ली” यावर व्याख्यान देत होते त्यात त्यांनी सांगितले - दुसऱ्याला बदलायला जाऊ नका स्वतःमध्ये चांगले बदल करा. दुसऱ्याला सहकार्य करायचे नसेल नका करू पण किमान त्याच्या प्रगतीच्या आड येऊ नका. दुसऱ्याची स्तुती करता येत नसेल तर किमान गप्प रहा, टीका करू नका, नकारघंटा वाजवू नका. सकारात्मक रहा अर्धा पेला रिकामा म्हणण्याऐवजी अर्धा पेला भरलेला असे म्हणण्याचा प्रयत्न करा. व्याख्यात्याचे हे विचार मनाला खूपच भावले. सकारात्मकतेच्या बाबतीत निसर्ग, प्राणी, पक्षी खूप जागृत आहेत, असे मला वाटते. यासाठीच अजून एक सुंदर व बोलके उदाहरण सांगावेसे वाटते. परवाचा महापूर या काळात एक व्हिडिओ अनुभवायला मिळाला, नदी काठावरील सर्व गावांचे पुरामुळे स्थलांतर झालेले जनावरे, माणसे सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आलेली. एके ठिकाणी एक म्हैस व रेडकू बांधलेले होते शेडमध्ये सगळीकडे ओल आलेली होती. त्यांच्यासमोर खाण्यासाठी अजिबात चारा नव्हता, बिचारी कोणी चारा देतील का? या भावनेने सर्वांकडे केविलवाण्या नजरेने पहात होते, एवढ्यात एक स्वान (कुत्रा) ओल्या गवताची पेंडी तोंडात धरून आणतो व म्हशीच्या गव्हाणी मध्ये टाकतो. बिचारी म्हैस व रेडकू किती दिवसाचे उपाशी होते माहित नाही पण त्या गवतावर तुटून पडली, गपागप ते गवत खाऊ लागली, बिचाऱ्या त्या मुक्या प्राण्याला त्या म्हैशीच्या भावना समजल्या. आपण तर भावना असणारी जिवंत माणसे आहोत. आपल्यातील दृष्टिकोन विशाल बनवूयात. खरा आनंद, खरे सुख अनूभवूयात.

दृष्टिकोनाबाबत मला वाटते आपण हिरवा चष्मा लावला तर जग हिरवे दिसेल, तांबडा चष्मा लावलात तर जग तांबडे दिसेल, म्हणजेच कावीळ झालेल्या माणसाला सारे जगच पिवळे दिसते थोडक्यात काय? तर “जैसी दृष्टी वैसी सृष्टी” म्हणजेच दोषांकडे दुर्लक्ष करून गुणांकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊयात तर त्यापासून फायदाच होईल. नुकसान तर अजिबात नाही होणार.

थोडक्यात काय तर एक फुल दोन फुले दोऱ्यात ओवली तर जशी फुलमाळ तयार होते, एका दिव्याने दुसरा दिवा लावल्यास दीपमाळ तयार होते त्याप्रमाणे एक चांगले कृत्य किंवा एक चांगले बीज पेरले तर चांगलेच पीक निर्माण होते, एक चांगला सुविचार पेरला तर अनेक सुविचार उदयाला येतील आणि हीच खरी काळाची गरज आहे. एकंदरीत आपण समाजाप्रती असलेला आपला दृष्टिकोन बदलूयात खरे ना?

**सुमन ज्ञानदेव जाधव.**
**किर्लोस्करवाडी, सांगली**
**मो. ९९७०३३३२३६**

# अनेक किती



सागरा तुला किनारे बहुं असती,अनेक किती
टिपती शत्रू शंख,शिंपले तेथे अनेक किती ॥१॥

सौख्याच्या शांत व्दारास आव्हाने जरी किती
शौर्याची कवाडे आम्हां,उघडी अनेक किती॥२॥

वाटेतील कंटक आम्हीं दूर सारतो अनेक किती
झेलतो वार छातीवर,कैकदां अनेक किती ॥३॥

गगनी वीजा तेजाने,कडाडती अनेक किती
एकाच सुनामीने,होती वादळे अनेक किती ॥४॥

आमच्या किर्तीचा बोलवाला अनेकदां किती
बिचारे देशवासी बेचिराख होती अनेक किती ॥५॥

मराठा-मावळा बंडखोर आहे रणवीर किती
सळसळ वाहती रक्तात जिद्दवारे अनेक किती ॥६॥

घेऊ नका रे माघार इतक्यात तुम्हीं सारे किती
झुंजार लढवय्ये लढती आमचे अनेक किती. ॥७॥

पेटुन सरणावर गेले शूरवीर सैनिक अनेक किती
धगधगता अंगार,नयनी असे त्यांच्या अनेक किती ॥८॥

रक्षा होऊनी काळ लोटला फार अनेक किती
अस्थित शौर्यनाद दुमदुमे आज ही अनेक किती ॥९॥

**श्रीमती नीला पाटणकर, शिकागो**
**मो.+1(847)8403286**

(परकीयांचे आक्रमण परतून लावतांना योध्यांनी मांडलेले विचार.)

# तुमचं काय चाललंय सर



तुमचं काय चाललय सर
कळू दे मला जरा...
काही दुःख असेल
तर मन आमच्यापाशी मोकळे करा... ||

पूर्वीसारखं आता तुम्ही हसत नाही
तासाला तुमच्या आम्हाला हसवत नाही
तुमचा चेहरा त्रासिक चेहरा आम्हाला बघवत नाही

आधार कार्ड नंबर, बँक पासबुक, स्टुडंट आयडी सोडून दुसरे काहीतरी विचारा

तुमचं काय चाललंय सर
कळू दे मला जरा ||1 ||

खिचडी, भात यातून तुम्हाला वेळ मिळेनासा झालाय
मातीची भांडी,
पुठ्ठ्याची घरे आता तुम्ही मागेनासा झालाय
वर्गात लॅपटॉप मधून तुमचा चेहरा दिसेनासा झालाय

फक्त शिक्षक म्हणून कधीतरी शाळेत या जरा

तुमचं काय चाललंय सर
कळू दे मला जरा ||2 ||

भात नको सर मला थोडं शहाणपण हवं आहे
ऑनलाइन नको आता ऑफलाईन हवं आहे
स्कॉलरशिप नको तुमची फ्रेंडशिप हवी आहे

कॉम्प्युटर्स स्लाईडचा खरंच कंटाळा आलाय
तुमच्या जिवंत गाठी उभ्या करा

तुमचं काय चाललय सर
कळू द्या मला जरा ||3 ||

आचारी, प्रगणक, मतदान अधिकारी, बी एल ओ लोक तुम्हाला काय काय म्हणतात

आम्हाला मात्र तुम्ही अजून आमचे गुरुजी वाटता

खरं सांगतो सर आता पूर्वीसारखं आम्हालाही शाळेत येऊ वाटेना

डिजिटल बिजिटल बाजूला ठेवा
व्हा हाडामासाचा शिक्षक खरा..

तुमचं काय चाललंय
सर कळू द्या मला जरा
काही दुःख असेल
तर मन आमच्यापाशी मोकळे करा.... ||4||

**प्रा.सचिन कोरोचीकर./शिरोळ**
**मो. 9850335133**

# बिट्विन द लाईन्स



अभिषेक नंदुचा असा मित्र ज्याच्याशी वाद/संवाद एकाच वेळी नंदु करू शकतो.थोडक्यात तुझं माझं जमेना अन् तुझ्या विना करमेना!अशी दोघांची मैत्री! अभिषेक म्हटला तर बिझी म्हटला तर मोकळा!त्यातच एका फॅमिली फंक्शन च्या तयारी मध्ये अभिषेक गुंतलेला! सकाळीच त्याच्या मोबाईलची रिंगटोन वाजली.

"हां बोल रे नंदु!"

"अरे काय बिझी आहेस का? फोन करीत नाहीस हल्ली?"

"आहे थोडासा! पण तुझ्यासाठी नाही!बोल!"

"तुला एक जाहिरात पाठवलीय बघ! तिथे फोन करून बघ काहीं जमतंय का ते!"

अभि ने या दरम्यान अँड्रॉइड फोन (व्हॉटस एप!) मल्टीमोडवर टाकून नंदु ची जाहिरातवाली पोस्ट लगेच पाहून घेतली.

"हो पाहिली!

"बघ बोलुन!ते मला बोलायला जमणार नाही ना!तू कसा व्यवस्थीत बोलशील!"

*"ओ..के !"

अभि,"हॅलो मॅडम!तुम्हीं हि पेपर मध्ये जाहिरात दिलीय! वय वर्ष ५६,शिक्षण १२वी,पेन्शन २१०००/-,स्वतःचे घर,घटस्फोटित किंवा विधुर चालेल गरजू व्यक्तींनीच फोन करावे. संपर्क: सेव्हन......!"

पलीकडून,"हाव न आम्हीच जाहिरात दिली हाय नं! आदूगर तुमची माहिती सांगा न राव!"

"मी... मला... मी नाहीं ओ! माझ्या..... मित्रासाठी!"

"असं हाय का? मंग काय करते तुमचा मित्र! ईकडली बाई पुण्याला रहायते नं!

"बाई म्हंजे? तुम्हीं स्वतः नाहीं!पुण्याचं स्थळ आहे का? मी आता पुण्याला बोलतोय का?"

हाव न बाप्पा! थे मंजे आमचेकडे सर्व प्रकारचे लग्नाले वयस्क बाई रहायते नं! तुम्हीं तुमच्या मित्राची माह्यती सांगाल!ते मंग ते बाईला अन् तुमचे दोस्ताला आपुन कॉन्फरन्स कॉल वर बोलुन घेव नं! मंग तुम्हीं आमची ऑनलाईन फी पांच हजार रुपये भरले!का तुमच्याय लोकांयची एक मीटिंग हुईल!तुमच्या मित्राचं वय काय रहायते?"

"ते सर्व सांगतो ओ!तुम्हीं त्या बाईंची माहिती तर सांगा!"

"त्या बाईचा नवरा वारले ना बप्पा! नी कोरोना मधे पोट्टा पन तिले सोहडून गेला नं! आता ती पून्यामंदि येकटीच रहायते! नवऱ्याची पेंशन हाय! शुगर बि पी काय नस्ते बघा!"

हां हे बरा असते! म्हंजे आमच्या मित्राचीहि नुकतीच पत्नी आणि मुलगा गेला.तोही एकटाच आहे.पण सोबत एक ॲबनॉर्मल मुलगी आहे. अर्थात् हे लग्न रूढ अर्थाने ईतर लोकांसारखे सहजीवन म्हणून करायचे नसुन,त्या ॲबनॉर्मल मुलीच्या देखभालीत जोडीदारीण हवी म्हणून करायचं आहे."

"तुम्हीं म्हणता ते समदं हुईल ना भोव्ह! कायले काडजी करून र्‍हायले तुम्हीं?तुम्हीं आमची ऑनलाईन फी पांच हजार रुपये भरले!का तुमची एक मीटिंग हुईल....!"

"फी चं सोडा हो मॅडम! तुम्हीं असं सॅक्रिफाईज करणारी बाई बघून दिलीत!की आम्हीं तुम्हाला फी देऊच! तुमचं नांव काय म्हणालात?

कुणाचं मा...झं का?"

"हो तुमचंच!

"आपलं ते हे बघा! मि..ना! मिना पाटील!"

काहीं क्षण मोबाईल कॉल वर दोन्हीं कडून ब्लँक!

"आता मला एक सांगा मिना मॅडम! प्रत्यक्ष त्या बाईंच्या भेटीच्या आधी तुम्हाला आम्ही पांच हजार रुपये दीले! आणि नंतरच्या मीटिंग मध्ये लग्न जुळलच नाहीं. तर पांच हजार रुपये भरचुक?गेले आमचे पैसे!"

अवो असं कसं तुम्हीं म्हणते? आम्हीं बी चांगली माणसं हावं नं! तुमच्या बोलण्याय वरून तुम्हीं बी सडळ माणसे दिसते!तुम्हाला संमदं करूनच सोडतेय ना भौव! पन पांच हजाराच ध्यानात धरा म्हणतेय मी!"

"आयला किशोर कुमार पांच रुपय्या बारह आना मागायचा! पण तुम्ही तर काय जमाना बदलल्यामुळे डायरेक्ट पांच हजार मागताय? अडला नंदु........!"

अभि ने त्या मिना पाटील चा फोन ठेवला. आणि साग्रसंगीत बोलणं नंदुला सांगितलं. नंदु म्हणाला,"बरं तुला बरं वाटलं की आपण पुढे बोलू! अभि आपल्या ईतर कामात गुंतला.

ईकडे झालं काय,अभि सारखे आणखी बरेच नंदुचे हितचिंतक होते. त्यापैकी दोघं जणं विकली ऑफ धरुन नंदुला भेटायला गेले. आणि.........!

अभिचा मोबाईल वाजला!

"हॅल्लो!मी अंगद वर्मा बोलते!"

"कोण वर्मा? आणि आवाज पुरुषा सारखा असुन बोलते काय? बोलतो म्हणा!

"मी पुरुसच हाय तरी बी मी बोलते.अरे अभि भाव मी

याने के!नंदु चां दोऽस्सस(त)वर्मा बोलते."

दुरुन कुठुनतरी नंदुचा शेतातून आवाज आल्या सारखा,"हां बोल रे अभि हे वर्मा माझे मित्र आहेत!"

"अरे हां वर्मा म्हणजे तुम्हीं टी एम सी ईस्पितळवाले!"

"हां तेच ते!तर मी काय बोलते? ते तुम्हीं तर तेंच्याशी बोललेच हाय! नेक् काम में देरी काय कु? आज् शेटर्डे हाय और कल शंडे!और अपुन ये शब काम शुट्टी में ही करतें हैं! तो आम्हीं लोक पयले ओ बाई के पाश जा कें आतें हैं! तब तक आपका बी काम हो जायेंगा! अगली बार् आप हमारे शाथ चली ए!"

अभि,"अं.. अम्... हां...हा...ठिक हैं! जरा नंदु को फोन देना!"

"बोल!अरे हे ऑफिस मधले मित्र अचानक भेटायला आले. ते जाऊ या म्हणतायत म्हणून! तु नाराज नाहीस ना?"

"अरे माझ्या नाराजीचं काय घेऊन बसलायस्! पण मोठ्या वहिनी असत्या तर बरं झालं असतं!"

"अच्छा म्हणजे बाई माणूस!अरे त्या कर्पेबाई पण सोबत आहेत ना!"

वर्मा," मी काय बोलते? बेगाने शादी में अब्दुल्ला दिवणा! नंदु तो फ्री हाय ना? वैसे आप नाराज तो नहीं? तो हम बाई को देख के अधार कार्ड बाणाने को डालते हैं!

अभि," यार् वर्माजी आपकी बातों में आग्रा के पेठे की मिठ्ठास हैं! आप वर्जिनल मिलेंगे तो साथ में बैठ के एक नाटक लिखेंगे! ठीक हैं आप हो के आईये! फिर सब मिल के पुना में बारात ले जायेंगे! थोडा फोन नंदु को दिजिए! ड्राईव्हर ढूंढ ना होगा!"

"अभि भय्या आप बिलकुल बेफिक्र रहिये! दो दीन के लिये नंदुजी का सारथी मैं हुं! मैं गाडी चालाऊंगा!"

अभि ने एकदा कट झालेल्या मोबाईल कडे पाहिलं! एकदा आरशात स्वतःला बघुन दोन्हीं खांदे उडवून स्वतःशीच हसला!

दुसऱ्या दिवशी सकाळी मोबाईल वाजला पलीकडून नंदु,"अरे अभि आम्हीं पुण्यात पोहचून अर्धा तास झाला. ती बाई म्हणते पहिले पाच हजार रुपये भरा.....!"

अभि ने एकदा कट् झालेल्या मोबाईल कडे पाहिलं! एकदा आरशात स्वतःला बघुन दोन्हीं खांदे उडवून, स्वतःशीच हसला!

दुसऱ्या दिवशी सकाळी मोबाईल वाजला पलीकडून नंदु,"अरे अभि!आम्हीं पुण्यात पोहचून अर्धा तास झाला. ती बाई म्हणते पहिले पाच हजार रुपये भरा.....!"

अभि," साला तुला सांगतो नंदु ! त्या 'हाव नं बप्पा!'पालुपद आळवणारी मॅरेज ब्युरो वाली,फोनवर प्रत्येक वाक्यागणिक पाच हजार रुपये मागणाऱ्या,जुन्या ब्लॅक अँड व्हाईट सिनेमातल्या मंदाकिनी भडभडे (रिमा लागू ची आई!) किंवा पद्मा चव्हाणला सांग!मी पुण्यातच आलोय! पैसे पैसे काय?देतो ना म्हणावं! मीटिंग स्पॉट वर! त्यात काय एवढे?"

"हां हे बरोबर आहे! तसंच सांगतो तिला! पण पैसे भरल्या शिवाय त्या बाईचा पत्ता ती देणार नाही.असं वाटतंय रे!थांब मी थोड्या वेळाने फोन करतो तुला."

त्या पुर्वी तथाकथित मॅरेज ब्युरो वाली मिना पाटील ने, नाकी डोळी नीटस,रेखीव चेहऱ्याच्या,नितळ त्वचा असलेल्या,आरस्पानी,तांबुस गोऱ्यापान पस्तीशीच्या वाटणाऱ्या बाईचा फोटो, पण पत्ता आणि फोन नंबर नसलेला बायोडाटा,अभिषेक आणि नंदुला व्हॉट्स ॲपवर पाठवला होता. फोन आणि जाहिरातीत मात्र मिना पाटील ती बाई छपन्न वर्षांची असल्याचं सांगत होती. बाई तर फोटोवरुन मनमिळाऊ स्वभावाची वाटत होती.एबनॉर्मल मुलीची देखभाल करण्यासाठी तयारही झाल्याचं मिना पाटील सांगत होती. नांदुची दगदग, धावपळ यामुळेच कमी होणार!नंदुवरचं गडांतर दुर होणार तर! म्हणून अभि मानत मांडे खात असतानाच मोबाईल वाजला.

वर्मा,"आवो अभिभाव! अवो ते रजनी शिंदे म्हणते आज मी भेटू शकते नाय.माजा अंकल एक्स्पायर्ड जा ला! तो मी चंद्रपुरला गेली हाय! मी उंद्या तुमाना भेटेल. आम्हीं ते बाईला ओनलाईन पांच हज्जर रुपय्या पन भरले?"

अभि,"कोण रजनी शिंदे? आणि चंद्रपूर भंडारा जिल्ह्यात आहे ना? एका रात्रीत ही रजनी विदर्भात गेली?"

नंदु स्पीकरवर,"अरे आपल्याला फोटो पाठवला ती रजनी शिंदे!(हसुन) आता म्हणते काका वारले आज कसं भेटणार? तुम्हीं पुण्यात आज थांबा मी उद्या नक्की भेटते."

वर्मा,"अवो अभिभाव! तेवर मी बोलले की, तुम्हीं तुमचे घरचा ऍड्रेस देवा!आम्हीं आज रातीला तुमचेच घरी पुण्यात रहाते."

अभि,"आयला रे xx! एव्हढ्या लांब पुण्याला बोलावून असा कसा करते ते लोग? आपलं ते...नंदु... तु मला त्या रजनी शिंदे चां फोन नंबर दे! आणि मिना पाटीलला फोन लाव."

नंदु स्पीकरवर,"अरे आता मिना पाटीलचा फोन नॉट रिचेबल येतोय."

अभि," हॅल्लो रजनी शिंदे? काय प्रॉब्लेम आहे तुम्हाला आज भेटायला?"

पलीकडून नाजुक,पातळ पण मधाळ आवाजात रजनी शिंदे,"अहो माझे काका वारले ना रात्री! मंग मी आज कशी भेटणार? उद्या मी नक्की भेटते."

अभि,"हे बघा असं चालणार नाही. त्या मिना पाटील पण फोन उचलत नाहीत. मला एक सांगा तुम्हीं आत्ता नक्की कुठे आहात?"

रजनी शिंदे," अहो त्यांना....त्या मिना पाटील ना कशाला त्रास देता? मी तुम्हांला उद्या भेटते म्हणजे भेटते. आणि आता मी कात्रजला आहे."

इतक्यात कॉनफ्रंस कॉल वर असलेले वर्मा पचकले,"मंघाशी आमाला सांगते चंद्रपूरला! ने आता

हेनला सांगते कात्रज? हे क..शा काय?"

अभि,"ते कांहीं असो!नंदु तु गाडी कात्रजला फिरव!या दोन बायांनी आपल्याला कात्रजच्या घाटात अडवलाय! हे बघा रजनी की कोण त्या? तुम्हीं आजच आम्हाला भेटलं पाहिजे! आम्हीं पाच हजार रुपये ऑलाइनवर भरले आहेत. नाहीतर आम्हीं पोलिसात तुमची कंप्लेंट करतो."

पट्कन तथाकथित रजनी शिंदे कडून फोन बंद केला गेला.

अभि,"वर्माजी, नंदु ईट्स ॲन फ्रॉड! आपण त्यांच्या जाळ्यात अडकलो आहोत. तुझा आणि माझा मोबाईल नंबर त्या बायांकडे गेलाय.त्याचा ते मिस युज करू शकतात. तेव्हा तु जवळच्या पोलिस ठाण्यात जा आणि तक्रार नोंदव!"

कर्पे मॅडम,"नाहीं मी काय म्हणते.आपण सर्व नंदुसाहेबांच्या काळजी पोटी हे सगळं करत होतो."

अभि,"हो मॅडम,पण काय करणार? चक्क पेपरात संस्थेचे नावं न देता खोटी जाहिरात दिली. आणि फोन नंबर ही लागला.आपल्याला तर सगळं खरं वाटणारच ना?"

कर्पे मॅडम," अहो माझं सगळं अंग थरथरतय! आपण सुशिक्षित लोक सुध्दा कसं काय या गोष्टीत बळी पडतो?"

अभि,"अहो त्यांनी ट्रॅप च ईतका जबरदस्त लावला. की,आपण त्यात अडकत गेलो. मला तर वाटतं मिना पाटील आणि रजनी शिंदे या माय लेकी असाव्यात. कारण रजनी फोन वर बोलतांना छपन्न वर्षांची वाटतच नव्हती. साधारण तिशीच्या बाई चा आवाज वाटत होता. पैसै दील्या शिवाय पत्ता न देता,आपल्याला दोघींनी ही बोलण्यात गुंतवून ऑन लाईन पैसे काढून घेतले. आता दोघींचा मोबाईल फोन स्विच ऑफ येतोय!"

नंदु,"जाऊदे आपल्या नशिबातच नव्हतं ते!पण अभि तू म्हणत होतास ना तुझे कोणीतरी,साहेबांचे कार्यकर्ते आहेत पुण्यात म्हणून !त्यांचा फोन नंबर तरी पाठव!"

"हो पाठवतो ना लगेच! तू त्यांच्या मदतीने जवळच्या पोलीस स्टेशनवर जा आणि कंप्लेंट केल्याशिवाय मुंबईला निघू नको!कारण आज आपण सापडलो त्यांच्या तावडीत.पण ही पाळी पुन्हा दुसऱ्या कोणावर येता कामा नये.असं नाहीये की अर्धा संसार मोडल्यावर! दुसरा संसार उभा करून पाहणाऱ्यां वयस्करांच्या बाबतीतच हे घडतं. उपवर मुला मुलींच्या बाबतीत पण असं घडतं.ऑनलाईन पैसे पाठवा मग बाहेरची स्थळ आम्ही पाठवतो.एवढा साधा सरळ फ्रॉड आपल्या लक्षात आला नाही इतकच!"

"या बसा मी सब इन्स्पेक्टर शिवाजीराव गायकवाड! इथलाच पुण्यातला आहे मी! त्यामुळे अशी प्रकरणं काय मला नवीन नाहीत!या तिघांना चहा सांगा रे!असो! तुम्ही त्या दोन्ही बाईंचे नंबर मला द्या!"

"हॅलो मी शिवाजीनगर पोलीस स्टेशन हुन बोलतोय सब इन्स्पेक्टर शिवाजीराव गायकवाड!(कट्!) बघितलंत पलीकडून पोलीस स्टेशनच नाव ऐकल्यावर फोन बंद झाला.आता दोन-तीन वेळा आपण लावूनही ते फोन घेत नाहीयेत. याचा अर्थ त्या बायांनी तुमच्याशी फोनवरचं बोलणं झाल्यावर एव्हाना सिम कार्ड काढून तोडून फेकून दिलं असणार! मग आम्हाला लोकेशन ट्रेस् कसं होणार?"

कर्पे मॅडम," पण साहेब तुमच्या सायबर सेलची काही मदत नाही का होणार?आमचे बुडाले पैसे,आता काय करणार?परंतु यानंतर कोणी फसू नये.म्हणून तरी ही तक्रार तुम्ही घ्या!"

"बाई तुमचं बरोबर आहे! पण सायबर सेलची कंप्लेंटची तक्रार ऑनलाइन करायची असते.ती पण झाला प्रकारा पासून २४ तासाच्या आत,तुमच्या ईमेलवर ऑनलाईन करायचे असते.तेव्हा तुम्ही जर मुंबईत संध्याकाळपर्यंत पोहोचलात तर ती ऑनलाईन तक्रार करून टाका.मग आमचं सायबर सेल बघून घेईल! हो पण त्यात वेळ जातो.भरपूर तक्रारी सायबर सेलकडे पण हल्लीं वाढल्यात"

"चला मॅडम,नंदु! चला थोडा मिशळ पांव तो खायले पायजे!मला वाटते पुण्या मंदी पोलिशांपेक्षा भामटेच जास्त असते! बाय डी वे कर्पे मॅडम तुम्ही ते चीतले काय बोलले?ते दोपेहरचे झोंप मधने ऊठ ले असते काय?"

कर्पे मॅडम,"हो चार वाजले ना!उठले असतील चला चितळेंची बाकरवडी तरी घेऊ! जीवनातल्या आणखी एका अनुभवाची चव!"

वर्मा,"आवो अभीभाव !थॅंक्यू व्हेरी मच! तुम्ही चांगला को-ऑपरेट केला.आता आम्ही पुणेची मिशळ,चितलेची भाकरवडी अने बेगाना शादी मे अब्दुल्ला दिवानाचां एक्षपिरियंश घेऊन मुंबईला निघाले."

**अशोक चाफे.**
**मो.9869669673**

# शब्दांकन



‘पहले तोलो, फिर कुछ बोलो,
लफ़्ज़ कोई बेकार नही है,
मै सबसे झुककर मिलता हूं,
मेरी कही भी हार नही है’

शब्दांची ताकद सर्वांनाच माहीत आहे. शब्दांचं माहात्म्य सांगणारी अनेक उदाहरणं इतिहासात वाचायला मिळतात. वरदान, शाप आणि प्रतिज्ञेचं फळ अशा स्वरुपाच्या कहाण्या आपण नेहमीच वाचत, ऐकत तसेच पाहत आलो आहोत. या सर्वांमागे दडलेल्या शक्तीचं नाव, ‘शब्दशक्ती.’

आश्चर्याची बाब म्हणजे, प्रत्येक माणसाकडे ही शब्दशक्ती असूनही तिच्या उपयोगासंबंधी मात्र तो अनभिज्ञ आहे. तसं पाहिलं तर, आपल्या जिभेवर अखंड निवास करत असलेल्या या शक्तीला योग्य दिशा देण्याचं काम आपलंच असतं. जसं, घोड्यांच्या शर्यतीत घोडे धावतात पण पाहणाऱ्याला मात्र वाटतं, ‘अमुक घोडा जिंकला...तमुक हारला’. प्रत्यक्षात घोडा नव्हे तर घोडेस्वार जिंकतो किंवा हारतो. त्याचप्रमाणे जिभेद्वारे उच्चारल्या जाणाऱ्या योग्य व सकारात्मक शब्दांचा विजय होत असतो. त्यामुळे उच्चारल्या जाणाऱ्या प्रत्येक शब्दाची सतर्कतेनं निवड होणं अत्यावश्यक आहे.

आपल्या मनाची भूमी ही भीतीसाठी खूपच पोषक असल्याने तिच्यात भीतीची शेती अगदी सहजपणे होते. एखादा माणूस जर काही अभद्र बोलला, तर आपण भीतीने गारठतो, त्रस्त होतो. विचार करतो,‘खरंच त्याच्या बोलण्याप्रमाणे झालं तर...’ कित्येकदा या अयोग्य शब्दांचा परिणाम आयुष्याच्या अंतापर्यंत टिकून राहतो. आपल्या शब्दांचा समोरच्या माणसावर किती गंभीर परिणाम होऊ शकतो, याची बोलणाऱ्याला सुतराम कल्पनाही नसते.एखाद्याचे कडवट, कटू शब्द नकारात्मक परिणाम घडवून आणतात, तर कुणाचे सकारात्मक शब्द आयुष्याला सहज, सुंदर आणि सामर्थ्यपूर्ण बनवण्यासाठी साहाय्यक ठरतात.

यासाठी शब्दांची शक्ती समजून घ्या. ‘माझा एकही शब्द वाया जाता कामा नये... माझ्या शब्दांमध्ये सद्भावना आणि विश्वास असावा. मी उच्चारलेला प्रत्येक शब्द ऐकणाऱ्यासाठी सफलता प्राप्त करून देणारं बीज असावं,’ अशा दृढ भावनेसह आपण जेव्हा शब्दांचा उपयोग करायला शिकाल, तेव्हा इतरांच्या जीवनात आनंद आणि सकारात्मक विचार पेरण्यासाठी निमित्त बनाल. मग आपण देखील आनंदी जीवनाचे स्वामी व्हाल. कारण निसर्गाचा नियम तर सगळेच जाणतात, ‘आपण ज्या गोष्टीसाठी निमित्त बनतो, ती गोष्ट कित्येक पटींनी वाढून आपल्याकडे परत येते.

एखाद्याचा चुकीचा शब्द आपण जोपर्यंत स्वीकारत नाही, तोपर्यंत त्याचा आपल्यावर कोणताही परिणाम होत नाही. त्यामुळे इतरांनी आपल्याविषयी केलेली टीकाटिप्पणी किंवा अपशब्द ऐकून, ‘लोक मला असं का समजतात?’ असा एकांतात विचार करत बसू नका. केवळ असा विचार केल्याने तुम्ही त्यांच्या शब्दांना अधिकाधिक शक्ती, सामर्थ्य प्रदान करत असता. जोपर्यंत आपण त्यांना शक्ती देत नाही, ते सामर्थ्यहीन असतात.

यावरुन शब्दशक्तीची किमया लक्षात येते. म्हणूनच शब्द तोलून-मापून वापरणं खूप महत्त्वपूर्ण आहे. ज्याप्रमाणे पैसे खर्च करताना आपण घासाघीस करतो, काटकसर करतो त्याचप्रमाणे शब्दांची निवड देखील अचूकपणे करणं आवश्यक आहे

शब्द उच्चारताना मात्र त्यामध्ये उत्साह आणि माधुर्य असणं गरजेचं आहे.

समज ही असावी, की शब्द आकाराकडून निराकाराकडे, सगुणाकडून निर्गुणाकडे नेणारं माध्यम आहेत

शब्दशक्तीची किमया जाणून सर्वांनी स्वत:च्या आणि इतरांच्याही आयुष्यात सुंदर रंग भरावेत,

‘व्यक्ती तितक्या प्रवृत्ती’ प्रत्येक व्यक्ती भिन्न भिन्न स्वभावाचे असते. पण या स्वभाव धर्मामध्ये खर तर माणसाच्या अंगी नम्रता हा गुण असणे आवश्यक आहे. सर्व सद्गुणांचा सुंदर पाया म्हणजे नम्रता होय. आपल्या स्वभावातील नम्रता ही आपल्या सर्व कार्यसिद्धि ची पहिली पायरी आहे. ज्या व्यक्तीचा स्वभाव नम्र असतो अशी व्यक्ती दुसऱ्याच्या हृदयात वास करते.आपले स्वत:चे जीवन आपल्याला सुखी, संपन्न,आनंदी, निर्मळ, निर्भय, प्रफुल्लित, प्रसन्न ठेवायचे असेल तर आपल्या हृदयात आनंदाचा झरा फुलवायचा असेल तर आपला स्वभाव सुस्वभावी व नम्र असावा. तरच आपण आपला सूस्वभावाच्या बगीच्यात आनंदाने राहू, आपल्या मनात हा बगीचा फुलवू. लहानपणातच म्हणजे नम्रपणातच मोठेपण दडलेलं असतं. स्वभावातली नम्रता माणसाला यशाचं शिखर दाखवत असते.

माणसाचा अहंकार त्याला दृष्टीने आंधळा, मतीने भ्रमपूर्ण आणि गतीने थांबवत असतो.

नम्रता म्हणजे लाचारी नव्हे, विनय म्हणजे भित्रेपणा

नाही.

एखाद्यासमोर झुकणे, एखाद्या परिस्थिती त माघार घेणे हे कमीपणाचे लक्षण नसून मनाचा मोठेपणा असतो.

जीवनात गर्व आणि अहंकार नव्हे तर वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये समजूतदार पण, नम्रता, औदार्य दाखवले पाहिजे लोकांच्या मनाला चरे पडू नये असे बरं आणि खरे बोलावे कारण शब्दामुळे दंगल शब्दामुळे मंगल होते.

रसाळ, मधुर आणि मवाळ अशी आपली भाषा असावी. हेच याचे तात्पर्य आहे.

**हसीना सुतार./मंगळवेढा**
**मो.9730419496**

# मी खरा गर्भश्रीमंत



कोणे एके काळी आम्ही खूप धनाढ्य श्रीमंत होतो.आमची हवेत व पाण्यावर चालणारी अगणीत जहाजे होती.पण दुर्दैवाने ते दिवस संपले,जहाजे बुडाली व विमाने जमिनीवर आपटून अपघातग्रस्त झाली.

एक दिवस अभ्यास सोडून घरात विमान उडवले ते वार्याने स्वयंपाक घरात जाउन चुलीवरील आमटीत पडले. आईच्या हातचा खूप मार खाल्ला व त्या दिवसापासून विमाने बनवणे व ऊडवणे हा धंदा बंद करावा लागला.

असेच एके पावसाळ्यातील दिवशी आईने ४ आणे देऊन एक डझन केळी आणायला धाडले,मी माझी कागदी बोट रस्त्याच्या कडेला वाहणार्या पाण्यात सोडली व गंमत म्हणून त्यात ते चार आण्याचे नाणे ठेवले.तेव्हड्यात जोराचा लोंढा आला व बोट बुडाली व नाणे सापडलेच नाही. घरी हात हलवत रिकाम्या हाताने गेल्यावर पुनः आईचा बेदम मार खावा लागला व बोटीचा उद्योगही बंद पडला.

.आता मोठेपणी जेंव्हा मी पदरचे भरपूर पैसे भरून विमान व जहाजातून प्रवास करतो तेंव्हा ते बालपणीचे उज्वल दिवस आठवतात व वाईट वाटते.

आता जमाना बदलला,मुलांनी 20 हजाराचा मोबाईल फोन हरवला तर आई त्याला धीर देते व म्हणते अरे जाउदे वाईट वाटून घेउ नकोस मी तुझ्या बाबांना नवीन आणायला सांगीन.हे ऐकले की त्या चार आण्यासाठी मिळालेली शिक्षा आठवते.

आता महाग अश्या स्वतःच्या मोटारीतून हिंडताना लहानपणी भाड्याने घेतलेल्या सायकलीची सफर आठवते.

आता झगमगत्या कपडे बाजारात कॅज्युअल,फॉर्मल, नॉर्मल,स्पोर्ट्स वेअर असे अनेक महागडे कपडे बघून लहानपणीचे अंगावरील एक व दांडीवर वाळत घातलेल्या एका कपड्याचे आनंदाचे व समाधानाचे दिवस आठवतात व कंठ दाटून येतो.

गेले ते लहानपणीचे अस्सल मानसिक धनाढ्य श्रीमंतीचे दिवस.व पदरात पडली बेगडी श्रीमंती.

**श्रीनिवास शेंडे**
**पुणे**
**मो.9175894727**



# एल्गार पुस्तक परीक्षण

कवीश्रेष्ठ सुरेश भट हे मराठी भाषेतील 'गझलकार सम्राट' म्हणून ओळखले जातात. त्यांचा "एल्गार" हा तिसरा काव्यसंग्रह.काही अपवाद सोडता हा ९६ गजलांचा संग्रह आहे. शीर्षक "एल्गार" हा मूळ शब्द तुर्की "यल्गार" वरुन आला आहे. याचा अर्थ जोराचा हल्ला असा होतो. कवी गझलांच्या माध्यमातून जोराचा शाब्दिक हल्ला करण्याच्या तयारीत आहे.त्यादृष्टीने शीर्षक समर्पक आहे.

मुखपृष्ठावर काही लोक भाले घेऊन हल्ल्याच्या तयारीत आहेत. त्या पाठीमागचा सूर्य हा एका नव्या युगाची नांदी दर्शविती.कवी खुद्द हातात पेन घेऊन गजलांच्या माध्यमातून मराठीत एका नवीन युगाची सुरुवात करू पाहत आहे. मलपृष्ठावर सुरेश भट यांचे चित्र व "बदनाम झंझावत" अशी शब्दांची लाखोली तेथे वाहिली आहे.

पुस्तकाच्या सुरुवातीस कवी" गझल" या प्रकाराविषयी भाष्य करतो. गझल मध्ये नजाकत आहे पण मराठीला तिची गरज नाही. त्यामुळे या पुस्तकातील सर्व गझला या विद्रोही आहेत. कवी म्हणतो की गजल जरी अरबीतून फारशी व उर्दूत आली असली तरी,ती कोणत्याही भाषेची मक्तेदारी नाही. त्यामध्ये एकच वृत्त, एकच यमक व अंत्ययमक अशा ओळींची रचना असते."शेर" हा दोन ओळींचा असतो.त्यामुळे तो पेलण्यासाठी खूप शाब्दिक सामर्थ्याची गरज असते. "मक्ता" प्रकारात गझलकार शेवटी स्वतःचे नाव लिहीत असतो, पण कवीच्या मते असा विमा उतरायची गरज नाही. गझल मध्ये "आशिकमाशुक"चे चोचले त्यांना आवडत नाहीत. त्यामुळे त्यांच्या गझला या वेगळेपण सिद्ध करतात.

सर्वसामान्यांच्या भावना व्यक्त करताना ते लिहितात,

"साध्याच माणसांचा एल्गार हा आहे."

प्रत्येक दोन ओळी पुन्हा पुन्हा वाचावे व त्याची वचने व्हावी अशाच आहेत.

कमी शब्दात त्यांना खोल अर्थ आहे. या संग्रहात कुठेही क्रम नाही. कवी मानवतावादी आहे. ते "आम्ही" मध्ये लिहितात,

" स्वतःच्या झाकूनी भेगा,
मनुष्य सांधतो आम्ही."

कवीची एल्गार करण्याची पूर्ण तयारी आहे. तो लिहितो,

येथे पिसून माझे काळीज बैसलो मी,
आता भल्याभल्यांच्या हातात डाव नाही."

लढण्यासाठी कवी अनेक शस्त्रांचा उल्लेख करतो. उदाहरणार्थ बंदुकीचा बार, घोषणा,उठाव, फास, झेंडा, गाढवाची फौज" इ. कविचा आत्मविश्वास मोठा आहे."आम्ही" या गझलेत ते लिहितात,

" तिथे नाचे विठू, झेंडा जिथे रोवतो आम्ही."

"अजून काही" या गझलेत लिहितात, "विझून माझी चिता युगे लोटली तरीही, विझायचे राहिले निखारे अजून काही." "आम्ही" मधील" दिले प्रत्येक वस्तीला आकाश सोनेरी" या ओळीतून त्याची न्यायप्रियता दिसते. वाट्याला आलेले भीषण वास्तव सांगताना "आकाश उजळले होते "या गझलेत लिहितात,

" इतकेच मला जाताना सरणावर कळले होते,
मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते."

"पांगळा प्रवास" मध्ये तर लिहितात, "राहिले रे अजून श्वास किती



जीवना, ही तुझी मिजास किती.” माणसाच्या स्वभावाचे वर्णन करताना “चंद्र आता” मध्ये ते लिहितात,

“मी खरे बोलून जेव्हा पाहिले,
हा टळाया.. तो पळाया लागला,
हाक दाराने मला जेव्हा दिली,
उंबरा मागे वळाया लागला!”

नियती पुढील हतबलता दर्शविताना ते लिहितात,

“ एकटाच मज बघून,
चांदरात ये अजून,
चांदण्यात फिरण्याचे,
वय निघून गेले.”

कवी प्रचंड आशावादी आहे.” दंश” या गझलेत ते लिहितात,

“हारूनही लाखवार माझी झाली न हार,
मी माझ्या स्वप्नांना फिरून पिसणारच.”

“यार हो” यामध्ये तर
“नवा सूर्य आणु चला” असा एल्गार करतात.

कवी वर्तमानातल्या या वेदना, यातना तून पेटून उठतो कारण त्याला येणाऱ्या भविष्याचे वेध लागले आहेत.

“दाखला” मध्ये लिहितात,

“मला त्यांचे हसू आले,
भविष्याच्या महाद्वारी,
कुणापाशी न,
येणाऱ्या पिढ्यांचा दाखला होता”.

कवीचा स्वभाव विद्रोही असल्याने प्रेयसीला ही जाब विचारताना दिसतात. “बरे नाही” या गझलेत लिहितात,

“मैफलीत या माझ्या,
पाहतेस का खाली,
हाय, लाजणाऱ्यांनी,
जागणे बरे नाही.”

तर “उजाडल्या वरी सख्या” मध्ये ते लिहितात,

“ तुला मला विचारून फुटेल आज तांबडे”.

भीमवंदनामध्ये डॉक्टर आंबेडकरांचे गुणगान गातात. कवीची शब्दफेक व शब्दावरील पकड जबरदस्त आहे. जाबसाल मध्ये जबाब व सवाल यांचा अर्थपूर्ण वापर केला आहे. आजाराचे औषध आजारी असे केवळ तेच वापरू शकतात. त्यांनी अनेक प्रतीके खोल अर्थांनी वापरली आहेत. जात्यावर दळणे, मावळता चंद्र, रिकामा पेला, पिंजरा, सुखाचे इंद्रजाल,सूर्य विकायला काढणे, वाण्याची चोपडी,आसवांचे तोरण, कापूर इत्यादी. कवीचे ‘केव्हा तरी पहाटे व सुन्या सुन्या मैफिलीत’ इत्यादी अनेक गाणी लोकप्रिय आहेत. कवीत फुलां मध्ये पण ज्वाला निर्माण करण्याची ताकद आहे. त्यामुळे त्यांचे शब्द धगधगते निखारे वाटतात. उदाहरणार्थ “रेशमाने रेशीम कातरूया”.

शेवटी गझलांची बाराखडी आहे. त्यामुळे हा गझल प्रकार मराठीत रूढ होण्यास मदत होईल असे कवीस वाटते. ते स्वतः याबद्दल म्हणतात,

“हमसे जो हो सका सो कर गुजरे,
अब तेरा, इंतिहान है प्यारे.”

मराठी भाषेत गजलांचा एल्गार करत येणारे कवि श्रेष्ठ सुरेश भट यांचे हे योगदान मराठी भाषेच्या भवितव्याला नक्कीच उजळत आहे. तो एल्गार अनुभवण्यासाठी हे पुस्तक नक्की वाचायला हवे.

पुस्तकाचे नाव- एल्गार
कवी- सुरेश भट
प्रकाशन वर्ष -1987
पृष्ठ संख्या -104
मूल्य -145

**प्रा. स्वाती पाटील**
**सांगली**
**मो.9921524501**

# हार कधी ना मानेन मी



ध्येय असू दे घाटमाथ्यावर
वळण मार्ग काढेन मी
मार्ग असू दे कितीही खडतर
मार्गाशीही लढेन मी
हार कधी ना मानेन मी

लाटा उसळो अती भयंकर
सुकाणू ना सोडेन मी
सागराशीही करुनी रणसंगर
अंती किनारा गाठेन मी
हार कधी ना मानेन मी

मार्गात असू दे कितीही खड्डे
चालता भले पडेन मी
हसू दे मजला हसतील वेडे
पडता पडता उठेन मी
हार कधी ना मानेन मी

रात्र अंधारी बिकट वनसरणी
भूलभुलैया ना भुलेन मी
आकाश फाटले कंपित धरणी
धिम्या पावली चालेन मी
हार कधी ना मानेन मी

प्रयत्नांची पराकाष्ठा असता
जय खेचून आणेन मी
जोवर जय ना दृष्टी दिसता
हार कधी ना मानेन मी
हार कधी ना मानेन मी

**प्रा. अरुण सुका पाटील (असु)**
**मो.9869073189**

# मी रणरागिणी



आरतीचा क्लास सुटला.साडेसहा वाजून गेले होते. मागून वीणा आली.

“आरती चल बसस्टॉपवर जा उ या”

“आज फार होमवर्क दिलय ग सरांनी “तर काय कधी करणार कळत नाही. वेळ जरा सुध्दा पुरत नाही. सकाळी प्रॅक्टिकलस्,दुपारी हे क्लास,घरी जा ईस्तवर नुसतं थकायला होतं. त्यानंतर रात्री दोन दोन वाजेपर्यत हे होमवर्क करायचं”

“अशीच असते बारावी “ वीणा

दोघी रस्ता क्रास करुन बसस्टॉपवर आल्या.लगेचच बस आली. बस खचाखच भरलेली होती. दांडीला धरुनच दोघींना उभ्यानेच प्रवास करावा लागला.आधी वीणा उतरली. मग दोन स्टांप नंतर आरती.

आज आरती खूप दमलेली होती. तरीही जेवून अभ्यासाला बसली. तशी 12वीची परीक्षा पुढच्या admission साठी इतकी महत्वाची नव्हती. पुढची admission तर सी.ई.टी.वर अबलंबून होती. पण 12वीच्या अभ्यासांतही सी.ई.टी.चा अभ्यास दडलेला होता आणि क्लासचे सर सी ईटीच्या दृष्टीकोनांतून शिकवत होते.

टर्मिनल झाली. 5दिवसांच्या रजेनंतर क्लास पुन्हा चालूं झाला.आता सर आणखी आठ आठ वाजेपर्यत क्लास घ्यायला लागले. एक दिवस क्लास सुटल्यावर वीणा म्हणाली

“आरती काल न एक विचित्र गोष्ट घडली”

“काय गोष्ट?”

“कोणाला सांगू नकोस हं”

“नाही सांगणार”

“एक मुलगा न मी बसस्टॉपवरुन घरी जाताना माझा पाठलाग करीत होता”

“अरे बाप रे “तुला भीति नाही वाटली?”

“वाटली तर पण घरी सांगितलं तर घरचे काळजी करतील. मी घरी पोहचे पर्यत आई सतत गॅलरींत उभी राहिलं”वीणा

“हो ग...आज बध तो मागे येतो कां?” आरती

रात्री अभ्यासाला बसले तर सारखा सारखा तो डोळ्यासमोर दिसतो.. भयंकर भिती वाटते..अंधारांतून तो आपल्यामागे येईल त्याची सावली आपल्याला विळखा घालेल..ती सावली आपल्याला पकडेल... काय काय वाटतं ग आरती.. अभ्यास कसला होतोय?सारखा तो रस्ता,तो अंधार, त्या अंधारांतील दिव्याखाली तो चमकतो.. भयंकर वीज चमकावी तसा.. एकाद्या भयंकर ज्वाले सारखा..वाटतं त्या ज्वालेने आपले हात पोळतील..सर्वांग भस्मसात होईल..शरीर जळून जा ईल..अन् मन तर पोळलंच आहे..

वीणा आरतीकडे मनांतलं सांगत होती

“सहाजिक आहे...खरंच भितीदायक आहे सगळं ....ह्या सरांना एक वेळेचं भान नसतं”

तेवढ्यांत वीणाचा स्टॉप आला..ती उतरुन गेली. आरती विचारांत पडली. हा कोण मवाली वीणाच्या मागे लागतो?त्याने त्या निर्मनुष्य, एकाकी रस्त्यावर वीणाला कांही केलं तर!मग आरतीने घरी पोहचल्यावर लगेच वीणाच्या आईला फोन केला.असं असं घडतंय तर रोज तुम्ही वीणाला बसस्टॉपवर आणायला जा.खूप अंधार असतो आणि तिथे हे मवाल्यांचे लांडगे वावरत असतात.

वीणाच्या आईला जेव्हा आरतीचा फोन आला तेव्हा ती स्वयंपाघरांत होती..पोळ्या भाजीत होती...त्या फोन मुळे ती इतकी कोलमडली की हातांतलं काम अर्धवट सोडून ती बाबा टीव्ही पाहात होते त्यांच्या समोर ये उन उभी राहिली

“बंद करा आधी तो टीव्ही “ ती रागाने म्हणाली. तिच्या सर्वांगाला घाम फुटला होता.

“काय झालं एवढं चिडायला? बाबा म्हणाले.

“वीणाच्या मैत्रीणीचा आरतीचा फोन होता. रोज बसस्टॉपपासून घरापर्यत ये ईपर्यत एक मवाली म्हणे वीणाचा पाठलाग करतोय..ती अतिशय घाबरलेली आहे..तरीच काल ती घरांत शिरली तेव्हा नुसती धापा टाकीत होती..घामाने डबडबलेली होती..”

“बाप रे वीणाने आपल्याला हे सांगायला हवे होते साल्याला कुटला पाहिजे “बाबा त्वेषाने म्हणाले.

“नुसतं बडबडून उपयोगी नाही. प्रत्यक्षांत कांहीतरी केलं पाहिजे...”आई

मी जा ईन तिला बसस्टॉपवरुन आणायला. पण उद्यापासून माझी सेकंड शिफ्ट आहे..आपण शेजारच्या राकेशला पाठवू या कां तिला आणायला?”

“हो कांहीतरी केलंच पाहिजे नाहीतर पोरीला कांहीतरी करायचा तो मवाली आणि घडून गेलं तर वाट लागेल “आई रडत रडत म्हणाली.

“रडूं नकोस हा अस्सा जातो राकेशकडे “

वीणाचे बाबा उठून शेजारी गेले

राकेश घरांत होता. ती मंडळी जेवत होती

वीणाच्या बाबांनी त्यांना सगळं सांगितलं.

“मी जा ईन काका वीणाला आणायला तुम्ही नका काळजी करूं..कोण आहे तो हलकट..पाहातोच त्याला

"राकेशने अश्वासन दिल्यावर आईचा जीव भांड्यांत पडला. आजही राकेश हात धुवून लगेच बसस्टॉपवर गेला.

"काय ग तूं माझ्या आईला सागितलेस कां?दुसर्या दिवशी वीणाने आरतीला विचारले...

"काय?"आरती

"काल आई-बाबांनी शेजारच्या राकेश ला मला आणायला बसस्टॉपवर पाठविले होते "

"मग काय हरकत आहे?"आरती

"अग आपण इतक्या हुषार,अभ्यासू,मुलांच्या बरोबरीने मार्क मिळविणार्या आणि आपल्याला ही "झुरळं" त्रास देतात?मला फार वा ईट वाटतं कीं ही टारगट, रस्त्यावर फिरणारी,रिकामटेकडी मुलींना "मुली" म्हणून त्रास देतात.."

वीणा म्हणाली

"त्यांना कांही काम नसते..अभ्यास नाही..कांही उद्योगधंदा तरी करतात की नाही देवजाणे?आणि मर्दुमकी कशांत तर मुलींना छळण्यांत "आरती "शी हे अगदी नीच पुरुष आहेत "

"नीच!हे नरकवासी आहेत " वीणा चिडून बोलली

"आपल्याला वेळही नाही असल्यांविषयी बोलायला. आणि आपण इतक्या कर्तृत्ववान आणि असल्या फडतूसना घाबरतो..मारता पण येत नाही ह्या झुरळांना "आरती

"जा उ दे. तो फिजिक्सचा पेपर सोडवलास कां?"तिने वीणाला विचारले.

"हो काल राकेश आला म्हणून डोक्यावर टेन्शन नव्हते. तो मवाली राकेश ला पाहून पळाला असणार "वीणा

कॉलेज सुरु हो ईस्तवर मुली रोज रात्री आठला सुटायच्या. तोवर राकेश रोज वीणाला बसस्टॉपवर न्यायला यायचा....

सुट्टी संपली. कॉलेज सुरु झालं. संध्याकाळचा क्लास लवकर सुटायला लागला. पण आई घाबरुन राकेशला पाठवतच राहिली. वीणाला वाटले हा राकेश काय आपल्या आईने आपला "बॉडीगार्ड " करुन ठेवलाय काय?हा असा किती दिवस येणार?मग ती आरतीला म्हणाली

"आरती आईच्या मनावर फार परिणाम झालाय त्या घटनेचा..माझ्यापेक्षाही ती गळून गेलीय.. काळजीने पिचून गेलीय " "बिच्चारी.ती शेवटी आई आहे न "आरती म्हणाली.

सी ईटीच्या रिझल्टवर वीणा आरती ह्यांना उत्तम इंजिनियरिंग कॉलेज मिळाले.हवी ती ब्रॅन्च मिळाली. दोघीही परत एकाच वर्गात आल्या.

आरती थरथरत होती. आणि रडत होती. आई बाबांना समजत नव्हते तिला काय झालं?त्यांनी तिला मोकळेपणाने रडून दिला...आणि मग आरतीने सांगितलेली गोष्ट ऐकून दोघेही हतबुध्द झाले....

आरती कॉलेज मधून येत होती. दुपारचा तीनचा सुमार होता.रस्त्यावर कोणीच नव्हते. समोरुन एक मुलगा आला.आणि त्याने आरतीला एकदम कवटाळले. ती खूप घाबरली. सुटका करण्यासाठी धडपडू लागली,ओरडू लागली.पण आजूबाजूला कोणीही नव्हते.

तेवढ्यांत मागून तिचे प्राध्यापक घोष आले आणि त्यांनी त्या मुलाच्या कानफटांत दिली.त्याला ढकलून रस्त्यावर पाडले. सरांना पाहाताच तो पळून गेला. जर सर आले नसते तर त्या नराधमाने आरतीचा घास घेतला असतात.

प्रा. घोष आरतीला घरी पोहचवायला आले. तिला तिच्या आई वडीलांच्या स्वाधीन करुन म्हणाले "तिला जबरदस्त मानसिक धक्का बसला आहे..तिला एकदम कांही विचारु नका..ती थोडी स्थिरावली की सांगेल...की असे असे घडले...

तो शॉक ओसरल्यावर आरतीने जे सांगितले ते अतिशय धक्कादायक होते..दिवसाढवळ्याही असा प्रसंग घडूं शकतो ह्यावर त्यांचा विश्वासच बसेना... कोणालाही घराबाहेर जाणे शाळा कॉलेज ऑफीसांत जाणे क्रम प्राप्त असते...शाळा कॉलेज तर कधीही सुटतात..कधी दुपारी कधी संध्याकाळी...

म्हणजे स्त्रीयांनी घराबाहेर जायचं नाही कां? रात्री सुटणार्या ऑफीसमधून कसे परतायचे?आईबाबांना समजेच ना...

पण त्या प्रसंगा पासून आरती कॉलेजमध्ये जायलाच तयार नव्हती..भितीच्या काळोखांत बुडून गेली होती.. सारखा तो समोरुन धावत ये उन गळ्याभोवती हात टाकलेला तो नीच डोळ्यासमोर नाचत होता. ध्यानी मनी स्वप्नी. रात्री ती दचकून उठायची..ओरडत...आई तिला थोपटून झोपवायची.त्या प्रसंगाचे वादळ तिच्या सर्वांगाला वेढून राहिले होते."तो बध..तो आला" ती मध्येच ओरडायची. शेवटी आईबाबांनी तिला तिला मनोविकार तज्ञ डॉक्टर मोने ह्यांच्याकडे नेले. त्यांचे म्हणणे पडले की आरती त्या प्रसंगाने कोलमडून गेली आहे..तिला त्यातून वर काढायला तुम्ही कॉलेज ची मदत घ्या..कॉलेजांत त्या सरांना भेटा..ते तिला समजावतील.

प्रिन्सीपॉलांच्या केबिन मध्ये सगळे जमले होते. वीणा व तिचे आईवडील,आरती व तिचे आईवडील आणि प्रा घोष. प्रा घोषांकडे आरती आगतीक हो उन पाहात होती. हे आले नसते तर...तर आपले काय झाले असते...आपले कांही खरे नव्हते..ती एकदम त्यांच्या पायावर कोसळली आणि रडू लाग ली... "सर नेमके तुम्ही आलात..तुम्ही आला नसतात तर सर माझे काय झाले असते?मी ह्या जगांत तरी असते कां?मला जर त्याने कांही केले असते..तर मी जीवच दिला असता सर.. सर तुम्ही मला वाचवलंत..तुम्ही माझे प्राण वाचवलेत.. सर...सर.."तिचा आवेग ओसरत नव्हता. सर नेमके त्या क्षणी आले नसते तर पुढे भयंकर घडले असते..

देवानेच सरांना पाठविले..मग वाटले त्या नराधमांना पाठविणारा दैत्य आणि सरांना पाठविणारा देव ह्यांत देवाची सरशी झाली. तो नराधम, नीच, दैत्य त्याला प्रिन्सीपॉलांच्या केबिन मध्ये सर्वांनी भरपूर शिव्या घातल्या. "आरतीच्या मनावर फारच परिणाम झाला आहे "प्रिन्सिपॉल म्हणाले" होणारच..केवढा बाका प्रसंग "तिची आई म्हणाली.हे प्रसंग मुलींची सुरक्षितता तर धोक्यांत आणीत होतेच पण त्यांच्या मनावर उठणारे ओरखाडे..रुक्ष वाळवंटांत उष्णतेची लाट आल्यासारखे त्यांना भाजून काढीत होते.

प्रो. घोषांनी सगळा प्रकार प्रि. उदय जोगांच्या कानावर घातला होता.त्याचमुळे ही मिटींग प्रिन्सिपॉल च्या केबिनमध्ये झाली आणि एका निर्णयाप्रत ते सर्वजण आले.

"मुलींना एकूण स्त्रीयांना "स्वसंरक्षणाचे "(self defence)चे ट्रेनिंग द्यायला हवे "..आपण आपल्या कॉलेज मधील मुलींना हे दे उ या..कोणीतरी सरकारी यंत्रणा पण हे ट्रेनिंग देतात", "हो आपण त्या संस्थेशी संपर्क साधून कॉलेजांत बोलू या..पण होतं काय ह्या बलात्कारींना त्वरीत शिक्षा होत नाही..आता ते दिल्लीचे निर्भया प्रकरण बघा ना..आरोपींना शिक्षा व्हायला आठ वर्षे लागली. त्यामुळे ह्या गुन्हेगारांवर वचक बसत नाही " सर म्हणाले."दिल्लीचे निर्भया प्रकरण तर भयंकरच होते "वीणाची आई घाबरुन म्हणाली."अशाही घटना कुठे कुठे घडत असतील..पण त्या आपल्या कानावर येत नाहीत.

मुंबई त्यामानाने सुरक्षित आहे..दिल्ली,कलकत्ता तर फार असुरक्षित आहेत "कसले सुरक्षित? आमच्या दोन्ही मुलींना असे अनुभव ये उन गेले..त्या दिवशी घोषसर नसते तर माझ्या लेकीचे कांही खरे नव्हते"... आरतीची आई म्हणाली.

"निराश हो उ नका..आमच्या इंजिनियरिंग कॉलेज मध्ये मुलां एवढ्याच मुली आहेत..मात्र हा त्रास मुलींनाच होतो..आपण उपाय करु.." प्रिन्सिपॉल उदय जोग म्हणाले.

मिटींग संपली. कॉलेजच्या नोटिसबोर्डवर नोटिस लागली. "मुलींना कॉलेज मध्ये हे स्वसुरक्षिततेचे प्रशिक्षण देण्यांत येणार आहे आणि प्रत्येक मुलीने ते नक्कीच घेतलेच पाहिजे"

मुलगे चेष्टा करु लागले. ह्यांना काय कराटे,तायक् वादो,योगासने,येरोबिक्स,लाठी काठी, विविध डावपेच शिकविणार काय?

मुलीपण चर्चा करु लागल्या हे काय इंजिनियरिंग कॉलेज आहे की व्यायामशाळा? आठवड्यांतून एकदा क्लास असणार आणि मुलींनी आलेच पाहिजे.

आणि मुली त्या क्लासला आल्या कारण त्यांना तो अनिवार्य होता. वीणा आणि आरती तर पहिल्या आल्या त्या क्लास ला..कोणीतरी कल्पना मॅडमनी त्यांना सगळे शिकवले...

शेवटी त्या म्हणाल्या।

"आपण पेपरला रोज मुलींची होणारी छेडछाड,मुलींना लैंगिक त्रास देणे,त्यांना एकट्या गाठून त्यांच्यावर "बलात्कार "करणे ह्या घटना पेपरला वाचतो..त्यांना प्रतिकार करण्यासाठी हे शिक्षण तुम्हाला दिले आहे. आजकाल हे शिक्षण अत्यावश्यक आहे. तुमच्यावर असा प्रसंग आला तर तुम्ही घाबरुन जाणार नाही. कोणी मदतीला नसले तरी स्वत:चा प्रतिकार स्वत: करु शकाल..तुम्हाला आत्मविश्वास ये ईल.तुम्ही पर्समध्ये तिखटाची पुडी,स्प्रे वगैरे ठेवू शकता"ह्या कोर्स ला कॉलेज मधील शिक्षीका पण होत्या..कोर्स संपला. मुलींना कोर्स चे महत्व पटले.

थोड्याच दिवसांत पेपरला बदलापुरची घटना आली आणि सगळ्या मुलींमध्ये चर्चा सुरु झाली.

"ए इतक्या लहान मुलींना असा भयंकर त्रास देतात हे दैत्य कुठून आलेत हे ? पाकिस्तानातून की अफगाणीस्थानांतून.."

"हे इथलेच आहेत.गल्लीबोळांतील "उंदिर " नेहा म्हणाली.

"आपण ते self defense चे शिक्षण घेतलं ते बरं केलं हल्ली कांहीही घडू शकतं."

कांही दिवसांनी परीक्षा आली आणि मुली संध्याकाळी लायब्ररीत बसू लागल्या..त्यामुळे उशीरा घरी जाउ लागल्या...

परीक्षा उद्यावर आली. त्या दिवशी उत्तरा रात्री आठला घरी जात होती...

उद्या पेपर कसा येणार ह्याचा विचार करीत होती. तिचे रस्त्याकडे लक्ष नव्हते. सर्वत्र अंधार होता. समोरुन दोन "महावीर " आले.त्यांनी उत्तराला गच्च पकडले..आणि जमिनीवर पाडले. क्षणभर ती गडबडली..घाबरली.. वाटले आता हे आपले कपडे फाडणार.

तिला एकदम काय सुचले कोण जाणे ! तिने हातातले बॉलपेन त्या हलकटाच्या जोरांत डोळ्यांत घातले..त्याचा डोळा फुटला..त्यातून रक्त वाहू लागले. "ए nonsense क्या कर रही है ? "तिने चपळाईने ते पेन त्याच्या दुसऱ्या डोळ्यांत घातले आणि त्याचे दोन्ही डोळे फुटले. "शब्बीर मै अंधार हो गया. ये लडकीने मेरी आंखे फोड दी! चल भाग चल ये तेरी भी आंखे फोडेगी ! उत्तराला तिथेच टाकून ते दोघेजण पळाले. उत्तरा फाटक्या कपड्यानिशी उठली. कसे तरी अंगरक्षण करीत ती आजूबाजूला पाहू लागली.

तिला एक टॅक्सीवाला दिसला. ती जीवाच्या आकांताने ओरडली। "भा ई ठहरो" तो थांबला. ती कशीबशी टॅक्सींत बसली. पण तिची मुद्रा विजयी होती. तिचे मन विजयाने खूप आनंदित झाले होते. आता तो कधीच पाहू शकणार नव्हता. स्त्री त्याला कधीच दिसणार नाही.आणि त्याला बलात्कार ही कधीच करतां येणार नाही ह्याचा तिने कायमचा बंदोबस्त केला होता. आणि आता हे आयुध पाहून इतरही पुरुष घाबरतील ह्या बायकांनी आपले डोळे फोडले तर आपण आयुष्यातून कायमचे उठू ह्या भीतिने ते ही वाट सोडून देतील ह्याची

उत्तरा ला खात्री होती. मारामारी, कराटे, मिरची पूड ह्यापेक्षा हा उपाय जालीम होता. ह्या उपायाला हे नराधम नक्कीच घाबरणार होते.

त्या टॅक्सीवाल्याने एका कापडाच्या दुकानापाशी टॅक्सी थांबवली. दुकानांतून 5/6 मीटर कापड आणलं. “लो बहनजी” त्याने उत्तराला अंगाभोवती गुंडाळायला वस्त्र दिलं. त्या क्षणी तो तिला द्रौपदीला वस्त्रे देणारा श्रीकृष्ण वाटला. तिने भराभर अंगाभोवती कापड गुंडाळले.

उत्तरा लढाई जिंकलेल्या आनंदांत घरांत शिरली. तिच्या अवताराकडे पाहून घरांतील सगळे आवाक झाले..आपण एक कायम स्वरुपी जालीम उपाय शोधला ह्या आनंदांत ती बेडरूममध्ये पळाली.

**सौ. भारती देशपांडे राजे**
**मो. 98332 30112**



# मनाने श्रीमंत होवू या



अगं सखे, आज ज्या रस्त्यावर तू चालत आहेस. त्याच रस्त्यावर काल मी चालत होते. नको स्वतःच्या नशिबाला दोष देवू. नशीब वेगेरे अस काही नसतं. अगं आपल्या आयुष्यात आपणच रंग भरायचे असतात.

तुला वाटत असेल सर्वच गोष्टी का आपल्या मनाविरुद्ध होताय. मुलीप्रमानणे मला मानणारे माझे सासू-सासरे मला कां खोटे वाटतात ? ज्या व्यक्तिसाठी मी माझे आई-वडील, भाऊ-बहीण सगळ्यांना सोडून आले. ती व्यक्ति मला का समजून घेत नाही ? आई वडीलही का सगळं समजून न समजल्यासारखे वाटतात. त्यांनाही मी नकोशी वाटते का ? माझी कोणालाच गरज नाही का ? माझ्या जगण्याला काहीच अर्थ नाही का ? दुसऱ्या पेक्षा ही माझेच आयुष्य का एवढे खडतर ? हे सगळं कधी संपेल ? मुळात संपेल की नाही ? का असच चालणार ? असे एक ना अनेक प्रश्नात तू बुडाली असेल, मी तुला नक्कीच समजू शकते.

अगं सखे कित्तेक वर्ष तुझी सासू ज्या घरात रमली, ज्या घराला जीवापाड जपलं, तिथली नाती जपली हे कसं सगळं दोन दिवसात बदलेल ? तुझ्या सासूला वाटत असेल, की तू त्यांचाच पावलावर पाऊल ठेवून प्रत्येक गोष्ट करावी. म्हणून, कदाचित ते तुला प्रत्येक गोष्ट शिकवत असतील. अगं यातही आपलेपणा दडलेला असतो. तू शोध म्हणजे सापडेल. अगं कधी आपले अन् आपल्या आईचेही स्वयंपाकघरात मतभेद होतातच की गं. त्यांचे विचार, आपले विचार, त्यांचे अनुभव, आपले अनुभव फरक तर पडणारच की गं. त्यावेळी आपण बोलतो का गं, की मी घर सोडून जाते. अगं हे सासू सुनेच्या भांडणाचे कोडे अजूनतरी कुणालाच उलगडले नाही. त्याला तू किंवा मी तरी कशी अपवाद असेल. फक्त मनाने थोडं श्रीमंत होवूया एवढेच.

खरंतर नवऱ्याची मात्र तारेवरची कसरत असते अगं. बायकोला पण आपला राग व्यक्त करण्यासाठी त्या घरात फक्त नवराच आपलासा वाटत असतो. प्रत्येक वेळीच नवऱ्याला आपले म्हणणे पटत नाही असं नाहीगं. त्यांना आपले विचार कधीतरी पटतातही पण, त्यांचे ही आई-वडील आहेत गं, त्यांना ही कसं लगेच उद्धटपणे बोलत येईल. मुळात आई-वडील दुखावणार तर नाही ना ? बायकोलाही का गोष्टी सोडून देता येत नाही ? ह्या विचारात बिचारा घराबाहेर पडत असतो. अगं आपल्याला तरी घरात वर्षा न् वर्ष एकाच व्यक्तीला निभवायचे असते. नवऱ्याचे मात्र तसे नसते. बाहेर जावून दुसरे आणखी चार जण, चार जणांचे चार विचार त्यातूनही पाचवा मार्ग काढून आपले काम पूर्णत्वास न्यायचे असते. शेवटी दोघांचा त्रास सारखाच. माणूस मात्र बाहेरच्या विचारांनी थकतो. तर तू घरातले विचारांनी थकते. दोघांचीही परिस्थिति सारखीच असते. म्हणून दोघांनी ही एकमेकांना मदत म्हणून फक्त थोडसं मनाने श्रीमंत व्हावं.

कधी कधी आपले आई-वडीलही आपल्यालाच समजून सांगतात. त्यावेळी मात्र आई वाडिलांचाही खूप राग येतो. मला समजवण्यापेक्षा माझ्या सासू-सासऱ्यांना का बोलत नाही असं वाटत. पण खरे सांगू सखे आपल्या आई-वाडिलां सारखे हितचिंतक आपल्या आयुष्यात कोणीच नसतात. ते जर आपल्याला सहन करायला संगत असतील, तर त्यांचा राग धरु नको. तुला अजून काही गोष्टींची समज नाही. म्हणून तुला राग येणं अगदीच स्वाभाविक आहे. पण आपल्या आई-वडिलांच्या तत्वावर चालत राहिलीस तर वयानुसार आलेलं शहाणपण नक्कीच शिकवून जाते, कि आपले आई-वाडीलच बरोबर होते. चार दिवस सासू चे असेल तर चार दिवस सुनेचेही येणारच गरज असते, ती फक्त मनाने श्रीमंत होण्याची.

कालांतराने तुला एकटे पडल्यासारखे वाटेल. काही व्यक्ति मला समजू शकत नाही. आणि ज्या व्यक्ति मला समजून घेतात त्यांनी मात्र डोळ्याला पट्टी बांधली.

पण सखे हीच ती वेळ आहे जी तुला जगायला शिकवेल. आपल्याला जगायचे असते ते फक्त आपल्या बाळासाठी. तुला नाही का वाटत आपल्या मुलीला हक्काचे प्रेम करणारे आपली माणसं हवीत. आपण आपले आई-वडील, आजी-आजोबा, काका-काकू, आत्या ह्या सगळ्यांच्या कडे-खांद्यावर खेळून मोठे झालो. तुझ्या मुलीलाही तिचं हक्काच प्रेम नको का मिळायला, आपल्या सारखंच तिला हक्काच माहेर मिळावं, तिचं सुख-दुख समजून घेईला, तिला आधार द्यायला आपली माणसं नकोत का ? तूच सांग सखे आपल्या माणसांशीवाय आपल अस्तित्व असतं का ? आज ह्या वयातही आपल्याला आपल्या सगळ्याच माणसांची गरज असते. आणि तू तुझ्याच बाळाच्या एवढ्या कोवळ्या वयात सर्वच हिरावून घेते आहेस. असं नाही का वाटत तुला ? असं हे सगळं सोसण्याची क्षमता फक्त स्त्री मध्येच आहे गं. तूच सांग पुरुष हे सगळं निभावून नेवू शकतील का ? म्हणूनच कदाचित परमेश्वराने मातृत्वाच सौभाग्य आपल्या पदरी टाकलं असाव. नीट विचार कर. कधी निवांत एका ठिकाणी बसून आपल्याच आईचा विचार कर. तुला तुझ्या सगळ्याच प्रश्नांची उत्तरे मिळतील. तू नव्याने जगायला

शिकशील. फक्त आपल्याच मुलांसाठी थोडं मनाने श्रीमंत होवू या.

अगं सखे सासरची काय नी माहेरची काय सगळी आपलीच माणसं. मान, अपमान, स्वाभिमान हे सगळे शब्द आहेत. आपल्याच माणसांसाठी हे सगळे शब्द गहाण ठेवून बघ. तुला खूप हलके झाल्यासारखे वाटेल. जगण्याची नव्याने प्रेरणा मिळेल. शब्दाने शब्द वाढतात. रागाने राग वाढतो. यातून सिद्ध मात्र काहीच होत नाही.

सखे आपली कदाचित शेवटची पिढी ठरेल, जी आई-वडिलांच्या आज्ञेत शेवटपर्यंत राहीली. देवालाही सत्याला कधीतरी न्याय मिळवून द्यावाच लागतो. आणि एक दिवस असा येईल, तुझं संपूर्ण आयुष्य एकीकडे आणि तो एक दिवस एकीकडे असेल. त्या दिवशी मात्र तूच ह्या सगळ्यांचे आभार मानशील. आणि हे सगळेच अभिमानाने तुझ्याकडे बघेल. ह्या सगळ्यांसाठी गरज आहे सखे, फक्त आणि फक्त थोडं मनाने श्रीमंत होण्याची.

**-प्रियंका राजेश डेरे**
**मो.8830719293**



# मनुष्य स्वभावाची पारख कशी कराल?



कोणत्याही क्षेत्रात यशाच्या शिखरावर पोहोचण्यासाठी बुद्धिमत्ता, उच्च शिक्षण, सुयोग्य अनुभव आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी, हे सर्व तर आवश्यक असतेच. परंतु,आणखीही एक गोष्ट तेवढीच महत्वाची असूनही बरेचदा नजरेआड होते. आपल्या आसपास वावरणाऱ्या लोकांचे स्वभावविशेष, गुण-दोष, बलस्थाने आणि कमतरता, तसेच त्यांच्या आपल्याबद्दलच्या भाव-भावना जाणून घेण्यात आपण बव्हंशी कमी पडतो.

माणसे 'वाचता' येतात !

कार्यक्षेत्र कोणतेही असो, चार लोकांसोबत काम करणे अथवा त्यांच्याकडून काम करवून घेणे आपल्याला क्रमप्राप्तच असते. निर्विवाद यशस्वी व्यक्ति, आणि त्यांच्यापेक्षा तसूभरच कमी पडलेले "Runners-Up", या दोघांमध्ये कदाचित एकच फरक असतो की यशस्वी व्यक्तींना माणसे अधिक चांगल्या प्रकारे "वाचता "येतात. अशा व्यक्तींना आसपासच्या माणसांमधली कर्तबगारीची चुणूक आणि कर्तव्यनिष्ठा जशी ओळखता येते तसेच आपमतलबी आणि चुकार वृत्तीही लक्षात येऊ शकते. आणि म्हणूनच त्यांना प्रत्येक व्यक्तीबरोबर योग्य त्या प्रकारे वागणे सहज साध्य होते.

दीर्घ काळ आपण एखाद्या व्यक्तीसोबत राहिलो तर कदाचित त्या व्यक्तीला आपण बऱ्यापैकी ओळखू लागतो. परंतु, क्वचित कामानिमित्त भेटणाऱ्या व्यक्तींशी आपला संपर्क मर्यादित असतो. तर मग थोडक्या काळात माणसे योग्य प्रकारे 'वाचता' येण्यासाठी आपल्याला काय करता येईल?

सर्वप्रथम, काय करू नये ते जाणून घेऊया.

- रंग-रूप व कपड्यांबद्दल आपली आणि इतरांची मते भिन्न असू शकतात. बाह्य रूप पाहून पूर्वग्रह करून घेऊ नये.
- देश, प्रांत, धर्म, जात, भाषा यावर मनुष्यस्वभाव ठरत नाही. म्हणूनच, त्याआधारे लोकांच्या स्वभावाबद्दल निष्कर्ष काढू नये.
- एखाद्या व्यक्तीबाबत इतरांनी प्रदर्शित केलेल्या चांगल्या अथवा वाईट मतावर विसंबून राहू नये.
- मनुष्यस्वभावाची पारख करण्याबाबत स्वतःबद्दल फाजील आत्मविश्वासही बाळगू नये.

आता काय काय करता येईल तेही पाहू.

'देहबोली' चा अभ्यास

एखाद्या व्यक्तीच्या मनातले विचार आणि त्याच्या शरीराच्या विविध अंगांच्या बारीकसारीक हालचाली यांमध्ये एक अदृश्य किंवा अमूर्त असा संबंध असतो. विशेष म्हणजे, या हालचालींवर जाणीवपूर्वक आणि संपूर्ण नियंत्रण ठेवणे स्वतः त्या व्यक्तीलाही अशक्य असते. ही आपसूक होणारी शरीराची हालचाल, म्हणजेच 'देहबोली' जर आपल्याला 'वाचता' येऊ लागली तर एखाद्या व्यक्तीच्या नेमक्या विचारांपर्यंत पोहोचायला खूप मदत होते. तसेच, त्या व्यक्तीचे शब्द आणि देहबोली परस्परपूरक आहेत की त्यामध्ये विरोधाभास आहे यावरून त्या व्यक्तीच्या स्वभावाचा थांग लावणेही सोपे जाऊ शकते.

देहबोलीचा अभ्यास करण्यासाठी केवळ त्या विषयावरची काही पुस्तके वाचणेच पुरेसे नसते. मनुष्यांचे सूक्ष्म निरीक्षण सातत्याने करीत राहणे, त्यांची देहबोली आणि शब्दांतून व्यक्त केलेले विचार यांची सांगड घालून आपापले ठोकताळे बांधणे व ते वेळोवेळी ताडून पाहणे अधिक उपयुक्त ठरते. असे करताना एखाद्या तज्ञाचे मार्गदर्शन मिळू शकले तर उत्तमच.

पाटी कोरी ठेवणे

कोणत्याही व्यक्तीला आपण जेंव्हा प्रथमच भेटतो तेंव्हा त्याच्यासमोर कोरी पाटी ठेवणे शहाणपणाचे ठरते, कारण ती व्यक्ती हळूहळू स्वतःच त्या पाटीवर स्वतःचे चित्र काढू लागते. म्हणजेच, मनात कोणताही पूर्वग्रह न ठेवता त्या व्यक्तीशी संवाद सुरु करावा, आणि त्या व्यक्तीचे शब्द व देहबोलीची सांगड मनातल्या मनातच घालत जावे. थोड्या काळातच काही प्राथमिक अंदाज आपल्याला बांधता येतात आणि आपलाही संवाद आपसूक त्या अनुषंगानेच होऊ लागतो.

ही सर्व प्रक्रिया होत असताना, आपल्या शब्दांद्वारे अथवा हातवारे व चेहऱ्यावरचे भाव यांमधून कोणताही कृत्रिम आव आणू नये. तसे करणे घातक ठरू शकते, कारण, आपल्या मनात समोरच्या व्यक्तीचा अंदाज घेण्याची प्रक्रिया सुरु आहे हे ती व्यक्ती जाणून असतेच. आपली देहबोली वाचून ती व्यक्तीदेखील कदाचित आपला अंदाज घेत असते. असे असताना, आपल्या कृत्रिम हाव-भावांमुळे त्या व्यक्तीने आपल्याबद्दल असा ग्रह करून घेतला की आपण "आंत एक आणि बाहेर दुसरेच" आहोत, तर आपलेच नुकसान होईल.

"डेटाबेस अपडेट" करीत राहणे

कोणतीही व्यक्ती पहिल्याच भेटीत आपल्याला संपूर्णपणे 'वाचता येणे' अशक्यप्राय असते. म्हणूनच, एखादी व्यक्ति पूर्वी आपल्याला कोणत्या प्रसंगी, कशा परिस्थितीत, केंव्हा भेटली होती,आणि त्यावेळच्या संवाद आणि देहबोलीतून आपण बांधलेले अंदाज काय होते याचे भान सतत ठेवणे गरजेचे असते. तसेच, पुढेही

वेळोवेळी मिळत जाणाऱ्या नवीन माहितीचा वापर करून आधीचा "डेटाबेस अपडेट" करीत राहणेही आवश्यक असते. तसे केल्यास ती व्यक्ती आपल्याला अधिकाधिक चांगल्या प्रकारे समजते.

एखादी व्यक्ती जेंव्हा पुन्हा भेटते तेंव्हा होणाऱ्या संवादातून अथवा घडणाऱ्या घटनांमुळे आपण पूर्वी बांधलेल्या अंदाजांना दुजोरा मिळू शकतो. किंवा, कित्येकदा असेही होऊ शकते की आपल्या आधीच्या अंदाजांना संपूर्णपणे छेद देणारे काही नवीनच अनुभव आपल्याला येतात. दोन्ही वेळचे अनुभव आपल्या "डेटाबेस" मध्ये साठवणे शहाणपणाचे असते. नवीन अनुभवांमुळे लगेच पूर्वीचे अंदाज खोडून काढू नये. त्याचप्रमाणे, तसेच केवळ पूर्वीच्या अंदाजांवर विसंबून, नव्या अनुभवांकडे दुर्लक्षही करू नये. या दोन्ही गोष्टी अयोग्य ठरतात कारण, एखाद्या चित्रकोड्याच्या लहान-लहान तुकड्यांसारखे हे सर्व अनुभव आपल्यासमोर त्या व्यक्तीचा खरा स्वभाव उघड करीत जात असतात. मनुष्यस्वभावाचे गणित २ + २ = ४ असे सरळ सोपे कधीच नसते. म्हणूनच, वेळोवेळी येणाऱ्या अनुभवातून आपल्याला एखाद्याच्या स्वभावाचे आकलन अधिकाधिक होत राहते.

मर्यादा ओळखणे

मानवी मनाची घडण संपूर्णतः व्यक्तिसापेक्ष असते आणि प्रत्येक व्यक्तिच्या मनात निर्माण होणाऱ्या विचारांमध्ये अनेक धागे गुंतलेले असतात. त्यामुळे मानवी मनाचा थांग संपूर्णपणे लागल्याचा दावा कोणीही कधीच करू शकणार नाही. वय, अधिकार, नात्यातले ज्येष्ठत्व अथवा एखाद्या क्षेत्रातील अनुभव यांच्या जोरावर क्वचित काही व्यक्ति आपल्या मर्यादा विसरतात आणि एखाद्याच्या स्वभावविशेषांबद्दल ठामपणे भाष्य करू लागतात. तसे न करता, आपण केवळ अंदाजच बांधत असतो याचे भान सतत ठेवणे आवश्यक आहे. अर्थात, जसजसा या विषयातील आपला अनुभव वाढत जातो तसतसे आपल्या आसपास वावरणाऱ्या लोकांचे स्वभाव ओळखून त्यांच्याबरोबर सुयोग्य व्यवहार करणे आपल्याला शक्य होऊ लागते.

थोडक्यात...

मनुष्यस्वभावाचा अभ्यास हा एक अतिशय जटिल आणि गुंतागुंतीचा विषय आहे. परंतु, दैनंदिन कामकाजात उपयोगी पडेल इतपत समज येणे तितकेसे कठीण नाही. या विषयाचे जुजबी ज्ञान मिळविले आणि दिवसानुदिवस सातत्याने त्यात भर टाकत राहिले तरी आपण मनुष्यस्वभावाचे पारखी निश्चित होऊ शकतो. आणि जर आपापल्या कार्यक्षेत्रात आपल्याला अग्रेसर व्हावयाचे असेल तर या विषयात शक्य तितके पारंगत होण्यातच यशाची गुरुकिल्ली दडलेली आहे हे विसरून चालणार नाही. पुस्तके वाचण्याच्या बाबतीत आपण एक वाक्य नेहमी ऐकतो, "वाचाल तर वाचाल". मनुष्यस्वभावाची पारख करण्याच्या बाबतीतही असेच काहीसे म्हणता येईल, "माणसे 'वाचाल' तरच वाचाल!"

**कर्नल. आनंद भास्कर बापट (सेवानिवृत्त)**
**मो.9422870294**



# सवड मिळेल तेव्हा तरी



छोटा चिमणा बाळ होतास बरा होतास,
अवतीभवती खेळत खेळत माझ्याजवळ बसत होतास.

आता खांद्याच्याही वर पोहोचलास उंची माझी पुरत नाही,
आईशी बोलायला,हसायला तुला क्षणभर उसंत नाही.

सुस्पष्ट संवादाची भाषा केव्हाचीच बंद झाली,
हो, नाही, येतो अशी एकाक्षरी सुरू झाली.

आई म्हणजे घराचा निर्जीव असा खांब झाला,
पाहता पाहता माझा बाळ इतका माझ्यापासून लांब गेला.

दमून झोपतोस तेव्हा वाटते, पायाला, डोक्याला लावावे तेल, पण नको जागा होशील रागावशील जीवाची नुसती घालमेल.

जेवलीस, झोपलीस, कशी आहेस? करशील का रे विचारपूस, तूच माझा काळजाचा तुकडा धन्य होईल माझी कुस.

इवल्याच्या बोटांना धरून शिकलास रे तू चालायला,
आता माझा वेग कमी झाला, तू लागलास धावायला.

कुटुंबाचा तोल सावरतोस, माझा आधार नको तुला.
आता माझा आधार तू यशस्वी हो माझ्या मुला.

औषध, जेवण यापेक्षा आपलेपणाची भूक आहे,
लांबून चौकशी, नाटकी बोलणे फसवे आणि चूक आहे.

ज्येष्ठांसाठी वेळ द्या, तेवढाच हवा विरंगुळा.
सवड मिळेल तेव्हा तरी मनापासून हितगुज करा.

यशाची घ्या गगन भरारी पण पाय असू द्या जमिनीवर, कारण उंच इमारत उभी राहते भरभक्कम पायावर.

नकोच नमस्कार, सत्कार समारंभाचा देखावा!
आई-बाबांना बाळ फक्त त्यांच्या मनाच्या जवळ हवा! त्यांच्या मनाच्या जवळ हवा!

**मुग्धा टेंगशे**
**कोल्हापूर**
**मो. 8530734408**

# एक कवडसा गीता समजण्यासाठी



बालपणानंतर थोडंफार कळायला लागल्यापासून
मी आवडीने ऐकत आलो कीर्तनं प्रवचनं,
राधेय,कौंतेय, कर्णायन, मृत्युंजय, युगंधर आणि
दाजीशास्त्री पणशीकरांनी सांगितलेला "कर्ण खरा कोण होता ?"
"महाभारत एक सूड प्रवास", " भीष्मप्रतिज्ञा" वगैरे सारखी
मोठमोठाली पुस्तकं वाचून सोन्यासारखी ठेवलीत
मी कपाटात, उरात जपून.
हरिविजय तर माझ्या आवडीचा पोथी ग्रंथ,
त्यातल्या कृष्णलीला किती नि काय वर्णाव्या.
त्यातलं वर्णन वाचून ऐकून अगदी सारं सारं
घरदार, नातं गोतं विसरायला होतं.
आपणही त्यासोबत खेळतोय की काय असंच वाटून जातं.

साऱ्या जगाला ज्यानं घरोघरी जाऊन
छोट्या पडद्यावरून मोहिनी घातली ती धारावाहिक
"महाभारत " तर मी पाहिलीच पाहिली,
त्याच्या कॅसेट आणून शेजाऱ्या सोबत्यांना बोलावून,
अनेकदा पाहत राहिलो,
हेतू एकच की अर्जुनाने विचारलेले बारीकसारीक क्लिष्ट प्रश्न
आणि त्यांना तत्त्वज्ञानी कृष्णानं दिलेली उत्तरं
मनात प्रत्येकाच्या रुजावीत म्हणून,

सत्य आणि आदर्श तत्व म्हणून
ज्ञानेश्वरी विषयी तर विचारूच नका,
दांडेकरांची, साखऱ्यांची, ओकांची, पोद्दारांची,
अशा कितीतरी ज्ञानेश्वऱ्या घातल्या पालथ्या --
पारायणावर पारायणं करून,
विनोबांची गीताई तर तोंडपाठच आहे बालपणापासून,
खूप सारं इतकं नवं जुनं रसायन डोक्यात
ठासून भरलेलं असून काय करावं तेच कळत नाहीये,

झालं असं की परवा मी जात होतो मुंबईला,
गाडीत खालच्या बर्थवर तिघा चौघात रंगली होती चर्चा
महाभारतातल्या कौरव पांडव आणि कृष्णार्जुन संवादाची
त्यातला एक जण म्हणत होता - " खरंच,
कमालच म्हणायला हवी त्या कृष्णाची, की --
इतकं सारं टोकाचं, भयावह वातावरण होतं तरीही कृष्ण
कसा अगदी शांत नि शांत होता, साऱ्यांना समजावत,
त्याला दोघं फक्त "हो " ला "हो " म्हणत होते".

दुसरा एक म्हणाला " अरे हे सगळं थोतांड आहे, नकली आहे,
कसलं काय अन् कसलं काय !
इतके हजारो हत्ती, हजारो घोडे, हजारो उंट,
लाखोंनी पायदळ, लाखोंनी ढाल तलवारीवाले,
इतकं सारं सारं काल्पनिक असणार,
कोणा एकाच्या डोक्यातून कल्पना पाझरली असणार,
ठेवली असणार त्यांनं लिहून आणि दिली असेल कानोकानी
फिरून, मग, मग काय विचारता, साऱ्यांनी त्याला हलवल्या असणार माना
बुद्धिवंत, विद्वान, गुरु मानून !
खरं सांगू ? दुनिया झुकती है ! झुकानेवाला चाहिये !
असंच काहीसं असणार, नव्हे आहेच, आणि मग,
मग काय, सुरु आहे सिनेमा, नॉनस्टॉप तेव्हा पासून,

जाऊ दे आपल्याला काय त्याचं !
आपली तर करमणूक होतेय ना !,
उलट ज्यानं कुणी हे लिहिलं असेल,
त्याला मी लाख लाख धन्यवाद देणार,
तुम्ही द्या अगर नका देऊ,
" धन्यवाद ! धन्यवाद ! धन्यवाद ! "

अरे बोल बोलता आपलं स्टेशन आले की,
केव्हा आलं ? कसं आलं ? ते कळलंच नाही,
उतरावं लागेल, चला उतरतोच,
"हरी ओम तत्सत ! हरी ओम तत्सत ! " म्हणत
सगळे उतरले आणि पंचवटीकडे रवाना झाले
पापं धुवायला.

मी, मी काय करणार होतो ?
मी मुंबईपर्यंत माझ्या कामासाठी गेलो,
काम आटोपून दुसऱ्या दिवशी परत आलो आणि निवांत झोपलो,
पहाटे पहाटे पूर्वेला एक लाल चटक शेंदरी गोळा वर आला,
मला म्हणाला, हो,मला म्हणाला --

" कशा करता बोलावलं रे बाबा मला ? "

मी म्हटलं " तू कोण ? आणि मी कशाला बोलवू तुला ?
मला ते काय काम तुझ्याशी ?

अरे तू मला ओळखत नाहीस वाटतं !,
मी सृष्टीकर्ता श्रीमद भगवंत, आणि तू ?
तू कोण आहेस ?.
मी, मी कोण असणार ? मी, मीच आहे, मी मीच आहे !

आणि हो, तू जर स्वतःला सृष्टीकर्ता म्हणवतो आहेस
तर मग साऱ्या विश्वाची तुला इत्थंभूत माहिती असणारच,
असणार कसली, असायलाच हवी,
म्हणजेच मी कोण आहे हेही तुला ज्ञात असणार !

अरे तरीपण मी विचारतोय म्हणून सांग की,

पुन्हा तेच ! अरे "मी" म्हणजे "मी" मीच आहे !

सृष्टीकर्त्याशी तू इतक्या अरेरावीनं बोलतोयस,
खूपच उद्दाम आहेस रे तू. !

हो, हो, मी बोललो, बोलतोय, अरेरावीत !
सर्व प्राणीमात्रात बुद्धिवान,हुशार असणारा
एकमेव प्राणी आहे मी, मला माणूस म्हणतात,
आणि काय रे, तू तरी कुठे आहेस कमी ?
तुझेही पराक्रम काही कमी नाहीएत,
बालपणापासून तू करत आलास खोड्या गवळणींच्या,
मारून खडे फोडलेस त्यांच्या दह्या - दुधाचे माठ,
नदीकाठी जातांना स्नानाला त्या, लपवून त्यांची वस्त्रे
बसून कदंबावर पाहत होतास की मनसोक्त,
भक्ती जाणून घेण्याच्या निमित्ताने, आणि
दूध पिण्याच्या बहाण्याने संपवलंस तू पुतनेला,
घालून मोहिनी राधेला, बसलास भक्ती प्रेमाचे खेळ खेळवत
दिवस रात्र,
नीती तत्त्वाचा भोक्ता म्हणवणारा तू,
पळून आणलेस रुक्मिणीला, आणि भाग पाडलेस
स्वयंवर करायला,
अरे ह्या झाल्या किरकोळ गोष्टी,
यापेक्षा भयंकर म्हणजे भक्ती, कर्मकांड, योग, अणूरेणू,
आत्मा - परमात्मा, जन्म - मरण, मोक्ष - मुक्ती,
इत्यादी इत्यादी समजवण्यासाठी करून गोळा सर्व नात्यागोत्याला,
भाग पाडलेस युद्ध करून एकमेकांचे जीव घ्यायला,
अरे, कुठे अन् कसे फेडशील या रक्तपाताचे पाप ?
तुझ्या खऱ्या खोट्याला आहे की नाही माप ?
दिवस असतांनाही तू झाकून सूर्य
दाखवलास अंधार जयद्रथाला,
सांगत - राजकारणात आणि युद्धात सारे असते माफ,
रुतवलेस चाक रथाचे आणि संपवलेस योद्ध्याला चारचौघात,
अरे असे किती नि काय अपराध आहेत तुझे,
देव, सखा म्हणून घातलेत आम्ही पोटात सगळेच,
मी ते सांगणार नाही आणि सांगितले तरी
उपयोग तो असा कोणाला कितीसा आहे होणार !
ते जाऊ दे,
तुझा तो बालपणीचा ब्राह्मण मित्र सुदामा !
तू असून सर्वेसर्वा जगाचा, स्वतःसाठी बांधलेस सोनमहल
आणि भाग पाडलेस त्याला निर्धन बनून उपाशीपोटी निजायला,
असा रे कसा तू ! सखा जीवाचा,

"थांब, थांब, झालं असेल तुझं बोलणं तर मी बोलतो,
कान असू दे तत्पर ऐकायला,
तुला आणि इतर साऱ्यांनाच समजण्यासाठी
मी वदवले प्रश्न अर्जुन मुखातून, आणि
करत गेलो निरसन शंका कुशंकांचे मुळापासून,
त्यावेळी समजून न घेता तुम्ही दिल्या साऱ्या गोष्टी वाऱ्यावर सोडून
अन देतोयस दोष याच्या त्याच्या वागण्याला, दैवाला, देवाला,
जन्म, मृत्यू, लय, विकास, निकास, भक्ती, कर्म,
मोक्ष, मुक्ती आणि बरंच काही, समजलेही होते बारकावे,
दिले सारे टाळून चर्चा वायफळ समजून,

ऐक, अजूनही वेळ गेली नाहीये,
मी सांगितलेली गीता पुन्हा पुन्हा वाच, आणि
ऐक विद्वान संत महात्म्यांनी त्यावर केलेली भाष्य,
निरुपणं, प्रवचनं, ठेव एकेका पानावर बोट
अन् कर आत्मसात त्यातला गुह्यार्थ, मग ठरव
कुरुक्षेत्रावर जे झाले ते बरे की वाईट ? ,
अरे, तो होता अंत त्या त्या क्षणाचा, नाशिवंत देहाचा,
ती होती मुक्ती त्या त्या आत्म्याची, भेटीसाठी परमात्म्याच्या
नियंत्यानं योजलेली,
आणखी एक मुद्द्याचं, महत्त्वाचं
अरे युद्धातले पाच पांडव, कौरव पांडव शंभर,
धर्म, भीम, अर्जुन, कुंती, कर्ण, द्रोण, विदुर,
गांधारी, रुक्मिणी, दुर्योधन, दुःशासन, पिता राजा-नंद,

माता - यशोदा, सारे सारे होते तरी कोण ?
रणांगणाच्या मधोमध जन्ममरणाविषयीच्या साऱ्यांच्या शंका मिटवण्यासाठी
प्रश्न विचारणारा अर्जुन आणि
त्याला उत्तर देणारा होता तरी कोण ? मीच तर होतो !
तू समोर जे पाहत होतास नात्या गोत्यातले, विविध
काळ्या गोऱ्या, नकट्या चपट्या चेहऱ्यात, ते होते तरी कोण ?
मीच तर होतो त्यात सामावलेला, नांवं रुपं वेगळे वेगळे ल्यालेला,
"यत्र तत्र, सर्वत्र अहम् ब्रह्मास्मी !" म्हणून,
मी कितीतरी वेळा समजावले आहे तुम्हाला,
पडदा नकारात्मककतेचा सारुन, विवेकी उजेडाला अंतरी घे सामावून,

विसरशील सारे भेद, होशील परमात्म्याशी एकरुप
इतकंच काय, स्थित:प्रज्ञाची लक्षणे केली आत्मसात, तर -
सारे तुलाच कृष्ण म्हणू लागतील, नारायण नारायण म्हणत
चरणी तुझ्या लागतील,
। हरी ओम तत्सत । हरी ओम तत्सत ।

**श्री. काशिनाथ भारंबे**
**भुसावळ**
**मो. 9272303212**

# पायगुण



रसिका तशी दिसायला खुप सुंदर नाही पण दहा जणींच्या मध्ये उठून दिसणारी. हसतमुख गोल चेहरा, सावळा रंग, मोठे डोळे आणि सडपातळ बांधा. शिक्षण म्हणावं तर M.Com, M.BA होऊन चांगल्या बँकेत ऑफिसरच्या हुद्यावर काम करणारी. पण कितीतरी दिवस लग्न जुळत नव्हतं. कधी एखाद्या स्थळाला हिचा नकार असायचा तर कधी मुलाकडून नकार यायचा. आई वडीलांची ही एकुलती एक लाडा कोडात वाढलेली मुलगी. त्यामुळे त्यांच्याही अपेक्षा होत्या. आपल्याला चांगला जावई मिळावा. जो आपल्या वृद्धत्वाचा आधार होऊ शकेल. सासरचे लोक चांगले असावेत आणि मुख्य म्हणजे नवरा कर्तृत्ववान आणि सुस्वभावी असावा. आजकाल मुलां मुलींची प्रेमविवाह वर जास्त भिस्त. त्याचं कारण म्हणजे आपली आवड निवड जोपासणारा,आपल्याला संसारात समजून घेऊन आपल्या कला गुणांना मनाजोगता वाव देणारा साथीदार असावा. जरी प्रेमविवाहाच प्रमाण वाढलेलं असलं तरी बऱ्याच जणांना जोडीदार अजूनही विवाह संस्थेमार्फत शोधावा लागतो. रसिकाची आई म्हणायची सुद्धा,

“अग २७ वर्षाच वय झालं तरी तुला कुणी मनासारखा मुलगा कसा काय भेटला नाही गं !” मग ती पण कधी वैतागाने म्हणायची,

“ हो नाही भेटला. मला न कुणाच्या पुढे पुढे करण नाही जमत. आहे माझा स्वभाव भिडस्त. आणि मी शोधला असता तरी तुम्ही लोक म्हणाला असता, ‘आम्ही होतो ना बघायला, एवढी घाई कसली?” त्यावर रसिकाचे बाबा म्हणाले,

“ बरोबर आहे बेटा तुझं, आपल्याला नाही आवडली तर आपण वस्तू बदलू शकतो, कपडे बदलू शकतो. घर सुद्धा विकून दुसरं घेऊ शकतो. पण एकदा लग्न झाल्या नंतर जोडीदार बदलणं तसं सामाजिक दृष्टया आणि कौटुंबिक दृष्ट्या पण सोपं नसतं. प्रत्येकजण घटस्पोटीत व्यक्तीकडे एक defective piece म्हणून बघतात.”

शेवटी एका विवाह संस्थे मार्फत मनाजोगतं स्थळ चालून आलं आणि रसिकाचा विवाह जमला. नवरा आकाश, हा कंप्युटर इंजिनिअर होऊन एका नामांकित कंपनी मध्ये सर्व्हिस करत होता. लग्न जमवण्या आधी दोघांच्या तीन चार भेटी झाल्या. दोघांची कार्यक्षेत्र भिन्न तरी दोघांना एकमेकांचे स्वभाव मिळते जुळते वाटले आणि त्यांनी लग्नाचा निर्णय घेतला. अगदी साध्या पद्धतीने घरच्या घरी साखरपुडा उरकला. लग्न थाटात करायचे असे ठरले. आणि साखरपुड्या नंतर योगायोगाने दोघांचे प्रमोशन झाले. ऑफिसमध्ये वरचा हुद्दा प्राप्त झाला. आणि दोघांची बदली आकाशच्या राहत्या घराजवळच्या शाखेत झाली. त्यांना आणि त्यांच्या घरच्या लोकांना वाटले ह्यांचा पायगुण चांगला आहे. रसिकाची आई म्हणाली,

“ बरं झालं बाई रसिका थांबलीस त्याचं फळ चांगलं मिळालं. चांगला होतकरू मुलगा आहे. आणि तुझा पायगुण सुद्धा चांगला, बघ लग्न ठरलं आणि आकाशच प्रमोशन झालं. राहिला कोथरूडला आणि खुप लांब हिंजवडीला ऑफिसला जायचं, पण कर्वे रोडला ऑफिसची नवी शाखा होऊन तिथं व्यवस्थापकाची पोस्ट मिळाली.” त्यावर रसिकाचे बाबा म्हणाले,

“ अगं, जावयाचा पायगुण पण चांगला आहे म्हण की! रसिकाच सुद्धा लग्न ठरलं आहे असं तिच्या बॉसला समजताच त्यांनी तिची कोथरूडच्या शाखेत बदली केली.”

“ अहो, तुम्ही म्हणता ते खरं आहे पण अजुनी लोक मुलाच्या पायगुणा बद्दल बोलत नसतात, पायगुण घरात येणाऱ्या सुनेचा पहिला जातो. आपली पोरगी नुसती चांगल्या पायगुणाची नाही तर गुणी सुद्धा आहे. कामात शिस्त आहे. कधी उलटून बोलणं नाही. मोठ्यांशी आदराने वागते. आठवतं? तुम्हांला सुद्धा आपल्या रसिकाच्या जन्मा नंतर ऑफिसच्या परीक्षेत यश मिळालं आणि वरची पोस्ट मिळाली.” त्यावर रसिका म्हणाली,

“ आई अग पण आकाशची नवीन ऑफिसला जरी ट्रान्सफर झालेली असली तरी अजून ऑफिसचं इतर काम पूर्ण होऊन त्याला तिथं रुजू व्हायला तीन एक महिन्याचा अवधी आहे.” रसिकाची आई म्हणाली,

“ ते काय होईल गं! लग्न दोन महिन्यावर आलं बाई! तू आमची एकुलती एक मुलगी आणि तुझ्या सासू सासऱ्यांचा आकाश सुद्धा एकुलता एक मुलगा, तेव्हा लग्न थाटातच व्हायला हवं बाई !मेली आमच्या लग्नात आमची काही हौस झाली नाही. तसं तुझं करायचं नाही. लग्न चांगलं आठ दिवस गाजलं पाहिजे. मेंदी, ग्रहमक, सीमांतपूजन, दुसरे दिवशी लग्न मग संगीत आणि नृत्य रजनी रिसेप्शनच्या दिवशी ठेवायची.” रसिकाचे बाबा हसत म्हणाले,

“ हो बाई हो सगळी हौस करूया आपल्या लेकीची आणि उरली सुरली तुझी राहिलेली हौस पण पुरी करून घे. पैठण्या शालू आणि काय दागिने, पार्लर,नटणं सगळं साधून घे.”

" पुरे झालं हं! कळतात टोमणे म्हणलं!"

" नाही बाई खरं म्हणतोय. अग मला सुद्धा तुला नटलेली पाहायला आवडते."

रसिकाच्या घरी अशी हसत खेळत मजेत लग्नाची तयारी चालू होती. तशीच परिस्थिती आकाशच्या घरी सुद्धा होती. रसिकाच्या सासूबाईंचा स्वभाव सुद्धा हौशी, खेळकर. त्यांनी हौसेने रसिकाच्या साड्यांची जबाबदारी आपल्यावर घेतली. स्वत: सुद्धा सुनेसाठी दागिने बनवून घेतले. आपल्या संसारात काटकसर करत त्या सोन्याची भिशी लावून सोनं खरेदी करत राहायच्या, आकाश बावीस वर्षाचा झाल्यापासूनच त्यांनी सुनेसाठी सोनं खरेदी सुरु केली होती. दोन वर्षा पूर्वी आकाशच्या बाबांच्या मागे लागून त्यांनी कोथरूडला ३BHK च प्रशस्त घर बुक करायला लावलं. मुलांना जागा अपुरी पडायला नको. तरी आकाशचे बाबा म्हणायचे सुद्धा,

" तू उगीच खर्च वाढवत आहेस. पैसा राखून ठेवला पाहिजे. उद्या आपलं सुनेशी नाही पटलं त्यांना वेगळं राहायचं झालं तर तेव्हा त्यांना आपण काय मदत करु शकणार?" तेव्हा त्या म्हणायच्या,

" तुम्ही ना सकारात्मक रहा. आधीपासूनच आपलं सुनेशी जमणार नाही ही नकारघंटा कशाला लावता? मी तर काही खाष्ट सासू नाही. मी उलटी तिची हौस करेन, मुलीच्या मायेने तिच्याशी प्रेमाने वागेन. आहेच कोण मला जवळचं ? सून आली की तिचा आणि माझा एक पक्ष बरका!" तसं आकाशचे बाबा म्हणाले,

" आपल्या लग्नापासूनच तू कायम माझ्याशी विरोधी पक्षाची भूमिका ठेवूनच वागत आलीस ना! आणि आता थोडीच आकाशच्या लग्ना नंतर तू माझी बाजू घेणार? सगळे मिळून मला एकटं पाडू नका म्हणजे झालं."

रसिकाच्या सासूबाईंनी चांगला हॉल घेऊन रसिकाच्या माहेरच्या सगळ्या लोकांना व्याही भोजनासाठी आमंत्रण दिलं. रसिकाच्या माहेरच्या सगळ्या लोकांचा मोठे आहेर देऊन यथोचित मानपान केला.

दोन्ही बाजूने लग्न अगदी शाही थाटात एखाद्या राजघराण्यातल्या राजकन्येचे आणि राजपुत्राचे लग्न व्हावे तसे झाले. हौसेला मोल नव्हते. उत्साहाला उधाण होते. रसिकाच्या सासूबाईंनी हौसेने लेकाची आणि सुनेची मोठ्या सजवलेल्या बग्गीतून सोसायटीच्या आवारातून वरात काढली. फुलांच्या पायघड्या घालून सुनेचे घरात स्वागत केले. लक्ष्मीपूजन सुद्धा कार्यालयात न उरकता घरी थाटामाटात केले.

लग्नाच्या दुसरे दिवशी घरी सत्यनारायण होता. तोही अगदी विद्युत रोषणाई, फुलांची सजावट अशा दिमाखात पार पडला. सगळंच कसं डोळे दिपवून टाकणारं होतं. संध्याकाळी मोठे रिसेप्शन होते. त्याचं नियोजन सुद्धा खूपच सुरेख असं केलेलं होतं. दुपारची जेवण झाली आणि आकाशचा जवळचा मित्र मंगेश त्याचे वडील अचानक हृदय विकाराच्या झटक्याने गेल्याचं कळलं. मंगेशला माहित होत की कालच आकाशच लग्न झालं आहे. म्हणून त्याने फोन केला नाही. पण दुसऱ्याच एका मित्राकडून कळले, आणि मग आकाशला राहवले नाही. तो रसिकाला म्हणाला,

" रसिका प्लीज रागावू नकोस पण मी अर्धा तास वैकुंठला तरी जाऊन अंत्य दर्शन घेऊन येतो. मंगेशनी आणि त्याच्या वडीलांनी माझ्यासाठी खुप काही केलं आहे. तो माझा अगदी शाळेपासूनचा मित्र आहे. लग्नात प्रत्येक कार्यक्रमात पुढाकार घेऊन तो जातीने लक्ष घालत होता. मला जाऊन आलं पाहिजे." रसिकाने समजून घेऊन होकार दिला तरी आकाशची आई म्हणत होती,

" कालच लग्न झालं आहे. अशा ठिकाणी नको जाऊ, मंगेश समजून घेईल." पण तोपर्यंत आकाश अंगात शर्ट अडकवून बाहेर पण पडला. तो वैकुंठला गेला. त्याने मंगेशच्या वडीलांच अंत्यदर्शन घेतलं. तरी मंगेश म्हणाला,

" काय यार इथं कशाला आला? जा आज मोठा इव्हेंट आहे आयुष्यातला, आता सर्व विधी व्हायला अवकाश आहे. इथे पण रांग आहे. तू निघ." मंगेशचा खांदा दाबत, डोळ्यातलं पाणी पुसत तो मंगेशला म्हणाला,

" सारं धक्कादायक आहे. काल लग्नात काका किती आनंदात होते, आणि आज हे असं ! सावर स्वत:ला." एवढं बोलून त्याने बाईकला किक मारली तो थोडा घाईतच निघाला. डोक्यात संध्याकाळच्या रिसेप्शनचे विचार होते. दुसरे दिवशी हनिमून साठी काश्मीरला जायचं ठरलं होतं. त्याचेही विचार घोळत होते. रसिकाचा हसरा चेहरा डोळ्यापुढे होता आणि तो रस्त्याच्या कडेने बाईक चालवत होता, मागून येणाऱ्या डंपरने त्याला धडक दिली आणि तो पुढे निघून गेला. आकाश बाईक सह खाली पडला. डंपर पुढे जाताना आधी आकाशच्या उजव्या पायाला जोरात चाटून गेला होता. त्यामुळे त्याचा बाईक वरचा ताबा सुटला होता. लगेच रस्त्यावरची लोक आकाश जवळ आली. त्याच्या अंगावरची बाईक लोकांनी बाजूला केली. पण त्याला उठता येत नव्हतं. जबर मार लागला होता. तोंड आपटल्याने रक्त गळत होतं, ते नक्की कुठे लागले ते कळत नव्हतं. लोकांनी त्याचा खिशातून मोबाइल काढून घरी फोन केला आणि त्याला हॉस्पिटलमध्ये नेलं. बातमी पटकन सगळ्या नातेवाईकांच्या मध्ये पसरली. रसिका आणि तिचे सासू सासरे, आई वडील सगळे हॉस्पिटलमध्ये धावले. तिथ गेल्यावर कळले, आकाशच्या नाकाचे हाड डोळ्याखाली मोडले होते, तसेच उजव्या पायाच्या नडगीचे हाड पण दोन तीन ठिकाणी मोडले होते. डॉक्टरांनी सगळ्यांना तशी कल्पना दिली आणि आपल्याला आकाशच्या पायाच ऑपरेशन करून पायात रॉड घालावा लागेल आणि नाकाचं पण ऑपरेशन करून हाड जुळवावं लागेल आणि तासाभरात हे सगळं करावं लागेल म्हणून सांगीतलं. हॉस्पिटल मध्ये इमर्जन्सी विभागात प्रथम त्याच्यावर उपचार सुरु झाले. तिथे पेशंटची आणि त्याच्या नातेवाइकांची खुप गर्दी होती. लोक सारखी

आत बाहेर ये जा करत होती. नकळत प्रत्येकाच लक्ष आकाश कडे आणि त्याच्या परिवाराकडे जात होतं आणि प्रत्येकजण हळहळत होता. कारण आकाश बरोबर असलेल्या सगळ्या बायकांचे हात हिरव्या बांगड्यांनी आणि मेंदीने सजलेले दिसत होते. अंगावर दागिनेही होते. पण चेहरे काळजीने काळवंडले होते. हातावरच्या आणि पायावरच्या भरगच्च मेंदीने हातातल्या हिरव्यागार चुड्याने आणि दागिन्यांनी मढलेली नवी नवरी रसिका तिच्या चेहऱ्याकडे बघवत नव्हते. चेहऱ्या वरच्या लाजऱ्या बुजऱ्या, हसतमुख भावांची जागा विषण्णतेने घेतली होती. ती थांबून थांबून सारखी मुसमुसत होती. प्राथमिक उपचारा नंतर आकाश थोडा शांत झाला. पेन किलरचा सुद्धा परिणाम होता. त्याची नजर रसिकाला शोधत होती. सर्व नातेवाईकांच्या घोळक्या पासून ती लांब जाऊन मुसमुसत होती हे आकाशच्या लक्षात आलं, तसं त्याने तिला जवळ बोलून घेतलं, तिचा हात हातात घेतला आणि दाबला. त्या स्पर्शात धीर होता, प्रेम होतं, काळजी होती. स्पर्श न बोलता येणारं बरंच काही बोलून गेला. रसिकाची मान खालीच होती तिची आकाशच्या नजरेला नजर देण्याची हिम्मत होत नव्हती. हे सगळं आकाशला कळून चुकलं. कारण बहुतांशी सगळ्या नातेवाईकांच्या नजरा तिच्याकडे खाऊ की गिळू या भावनेतून बघत होत्या. तर अपरिचित लोकांच्या नजरा तिची कीव करत होत्या हे जाणवल्याने तिच्या मनाला असंख्य वेदना होत होत्या. आकाश तिला आश्वासक शब्दात धीर देत म्हणाला,

" रसिका डोळे पूस, मान वर कर आणि एकदा माझ्याकडे बघ. तू स्वत:ला का अपराधी का समजत आहेस? तसं म्हणायचं तर अपराध तर मी तुझा केला आहे. हे सर्व मी घराबाहेर पडल्यामुळे घडलं. तूच मला माफ कर. छोटा अपघात झाला आहे. मी ह्यातून पुन्हा खडखडीत बरा होणार आहे. आपल्याला अख्खं आयुष्य एकमेकांच्या सोबत घालवायचं आहे. अग वेडे तू मला धीर द्यायचा तर मलाच तुला धीर द्यावा लागत आहे." आकाशची मावशी पण आकाशच्या आई बरोबर आकाशच बोलणं ऐकत होती. तो रसिकाला धीर देत होता ते, तिने आपल्या बहिणीला हळूच कोपरखळी मारली. " बघ बाई हिच्या पायगुणा मुळेच आकाशचा अपघात झाला तेव्हा तिच्यावर चिडण्या ऐवजी हा बघ तिची समजूत घालत आहे. खरं तर तुझी समजूत घातली पाहिजे. तू आई आहेस त्याची ! झालं लग्नाच्या दुसरे दिवसा पासून ह्याला बायको प्रिय झाली." आकाशची आई म्हणाली,

" कालच लग्न झालं आणि आज असं, त्यामुळे माझ्या सारखीच ती पोर कावरी बावरी झाली आहे. तिला पण सावरण्याची गरज आहे. आणि आकाशला त्याचं लग्न ठरल्यावर प्रमोशन मिळालं ते पण तिच्या पायगुणा मुळे झालचं की! आता लगेच तिला वाईट का ठरवायचं ? ह्या योगायोगाच्या गोष्टी असतात."

आकाशच्या जवळच्या बेडवर पोटदुखीने हॉस्पिटल मध्ये नुकतीच दाखल झालेली आजी होती. तिला दिलेल्या पेन किलरने तिची पोटदुखी थोडी थांबली होती. ती पण आकाश प्रमाणे हॉस्पिटलची रुम खाली होऊन मिळण्याची वाट पहात होती. ती पण बेडवर पडल्या पडल्या सारं काही ऐकत आणि पहात होती. ती म्हण नाही का, तसं लोकांना आपल्या पानातलं गाढव सोडून दुसऱ्याच्या पानात काय आहे हे बघण्याची भारी उत्सुकता असते. तिला लक्ष देण्याची काय गरज? आकाशच्या आईची पाठ तिच्या बेडकडे होती. तिचा हात ओढत ती आजी बोलली,

" खरच बाई धन्य आहे तुझी! किती शांत स्वभावाची माता आणि सासू आहेस तू ! कालच लग्न झालं आणि आज हे असं! दुसरं काय त्या नवरीचाच पायगुण म्हणलं पाहिजे! सरळ जा म्हणावं माझ्या मुलाच्या आयुष्यातून."

" आजी असं सोप नसतं आजकाल. आपल्यालाच मुलाला आणि सुनेला समजून घ्यावं लागतं ! तुमचे दिवस गेले सुनेला मुठीत ठेवायचे! आणि मी म्हणते, सगळ्यांनी त्या बिचारीला बोलं लावण्याचं कारणच काय? काल फुलांच्या पायघड्या घालून स्वागत करायचं आणि आज लगेच तिला अपशकुनी ठरवायचं? राहू दे आमचं आम्ही बघून घेऊ. तुम्हा सर्वांच्या पेक्षा त्रास आम्हांला जास्त होत आहे. आमचा जसा एकुलता एक मुलगा आहे. तशी रसिका पण तिच्या आई बापाची एकुलती एक लाडकी मुलगी आहे. तुमची पोटदुखी वाढेल, जास्त लक्ष देऊ नका." आकाशच्या मावशीला पण तो टोमणा होता. त्यामुळे आकाशची मावशी आणि ती पोट दुखणारी आजी दोघींनी तोंड वाकडं केलं. आकाशच्या मावशीने तेवढ्यातल्या तेवढ्यात बेडवरच्या आजीचा हात दाबला आणि हळूच तिच्या कानाशी पुटपुटली,

" आमच्या ताईच ना असचं आहे. काल घरात आलेल्या पोरी बद्दल इतका पुळका,काही बोलायची सोय नाही!"

तेवढ्यात तिथल्या असिस्टंटने वाढत्या गर्दीला हटवण्यासाठी आवाज चढवला,

" चला सगळे बाहेर व्हा! फक्त एकच व्यक्ती पेशंट सोबत थांबू शकते. ताई, माई, मावशी चला बाहेर थांबा."

" हे काय लग्न घर नव्हे." सगळ्या मेंदिवाल्या हातांच्या कडे बघत तो हळूच पुटपुटला. तेव्हा रसिका आकाशला म्हणाली,

" आकाश तुझ्या बाबांना थांबू देत का? कारण आत्ता डॉक्टर पुन्हा ऑपरेशन बाबत बोलायला येणार आहेत. तुला अर्ध्या तासात ऑपरेशन रुम मध्ये मध्ये शिफ्ट करणार आहेत. तेव्हा ते इथं थांबलेले जास्त चांगले."

" तसं तू इथं थांबलीस तर मला जास्त मानसिक आधार मिळेल." तो हळूच कुजबुजला. आणि मग पुन्हा आईला ऐकू येईल असं म्हणाला,

" तुझं अगदी बरोबर आहे. बाबांना ऑपरेशन साठी

सही द्यावी लागेल तेव्हा मला शुभेच्छा देऊन तुम्ही सर्व ऑपरेशन रुमच्या बाहेर जाऊन थांबा."

सगळ्या रीतसर, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यावर आकाशला ऑपरेशनसाठी नेलं गेलं. ऑपरेशन रुमच्या बाहेर सगळे जण ओढग्रस्त चेहेरे घेऊन बसले होते. त्यात रसिकाचे आई बाबा, आकाशचे आई बाबा आणि आकाशचा ऑफिसचा मित्र अर्जुन बसला होता. आकाशने स्वत: त्याच्या अपघाता नंतर त्याला ऑफीसला फोन करून बोलावून घेतलं आणि इन्शुरन्सचे पेपर त्याला घेऊन यायला सांगीतले. आकाशची मावशी ऑपरेशनची वाट पहात न थांबता निघून गेली. पण जाताना रसिका कडे पहात कडवटपणे बोलून गेली.

" इथं कुणाला आमची गरज आहे ? कालची नवीन नाती जास्त महत्वाची झाली आहेत."

रसिकाच्या आई बाबांना आणि रसिकाला मेल्याहून मेल्यासारखं वाटलं. त्यांनी माना खाली घातल्या. आपली बहीण काय भलतंच बोलून गेली असं आकाशच्या आईला वाटलं. त्या रसिकाच्या जवळ आल्या, तिच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाल्या,

" बाळा तू नकोस कोणाच्या बोलण्याचं जास्त मनाला लावून घेऊस. लोक काय वाटेल ते बोलत सुटतात. माझी बहीण थोडी फटकळ आहे. सोडून दे तिचं बोलणं. आणि रसिकाचे आई बाबा तुम्ही पण मनावर घेऊ नका. पायगुणाच काय घेऊन बसलात? मी तर म्हणेन असलाच तर रसिकाचा पायगुण चांगला आहे. वेळ आली होती पण थोडक्यावर निभावलं म्हणायचं. रिसेप्शनला जरी गालबोट लागलं तरी पुढचे सण आपण चांगले साजरे करुया." रसिकाला पुन्हा हुंदका आला आणि तिने सासूबाईंच्या खांद्यावर मान ठेवली आणि अश्रूंना मोकळी वाट करून दिली. त्या तिची पाठ थोपटत राहिल्या. रसिकाच्या आई बाबांना सुद्धा खुप बरं वाटलं जावई आणि सासूबाई समजून घेणाऱ्या आहेत हे पाहून! रसिकाचे बाबा म्हणाले,

" सगळी माणसं तशी वरवर चांगलीच वागतात हो. पण कठीण प्रसंग येतो तेव्हा खरा कस लागतो. लोकांना दोषी ठरवण्यासाठी माणसांच्या मधली श्वापदं अशावेळी नखं बाहेर काढतात. आकाश काय महिनाभरात बरा होईल आपल्या सगळ्यांच्या सदिच्छा त्याच्या पाठीशी आहेतच. पण आम्हांला तुमच्यासारखी सज्जन, समंजस माणसं भेटली हे महत्त्वाचं!"

डॉक्टर चिटणीस आणि डॉ. केळकर यांनी स्वत: बाहेर येऊन ऑपरेशन सक्सेसफुल झाल्याचं सांगीतलं. नाकाचं हाड व्यवस्थित जुळवलं गेलं. पण पायात मात्र रॉड घालावा लागला. पण काळजीच तसं कारण नाही. आठवडाभरात आम्ही घरी सोडू, आकाश महिना भरात खणखणीत बरा होईल. असे डॉक्टरांचे आश्वासक शब्द ऐकून सगळ्यांचा जीव भांड्यात पडला. इतका वेळ गंभीर आणि गप्प असलेले आकाशचे बाबा पहिल्यांदा बोलले.

"रसिका औषधं तर आकाशला बरं करण्यासाठी आहेतच पण तुझं प्रेम तितकंच महत्त्वाचं आहे. तू कायम त्याच्या बरोबर रहा त्याला उभारी मिळेल. असं रडून आता चालणार नाही. कणखर बन." रसिका डोळे पुसत हसली, म्हणाली,

" तुम्हां सगळ्यांचा पाठिंबा मला कणखर बनण्यासाठी नक्कीच उपयोगी पडेल."

रसिकाने आकाशला घरी सोडल्यावर त्याची अगदी निगुतीने काळजी घेतली. वेळच्या वेळी औषधं देणं, पौष्टिक आहार देणं , फॉलो अप साठी त्याच्या बरोबर हॉस्पिटल मध्ये येत राहणं, हे सगळं तिने मनापासून प्रेमाने केलं. ह्या सगळ्या गोष्टीमुळे आकाश महिनाभरात बरा झाला. तिला म्हणाला सुद्धा,

" कुणाच्या पायगुणाने काय घडलं हे महत्त्वाचे नाही. आपल्या कठीण प्रसंगात आपला जोडीदार मनाने आपल्या किती बरोबर राहतो ते महत्त्वाचे असतं. तो मानसिक आधार आपल्याला आहे म्हणल्यावर माणसाच निम्मं दुखणं बरं होत असतं. देव करतो ते भल्यासाठीच करतो हे आता मला समजून चुकलं आहे. पुढील संसारात तू मला नक्कीच प्रत्येक वेळी कठीण प्रसंगी साथ देशील याची खात्री पटली आहे."

आकाश बरा झाल्यावर रसिका आणि आकाश आधी त्यांच्या नोकरीवर रुजू झाले. दोन महिने व्यवस्थित काम करून मग त्या दोघांनी हनिमूनला जाण्याची तारीख निश्चित केली होती आणि त्याप्रमाणे ते दोघं काश्मीरला गेले. ह्यावेळी ते शरीरा बरोबर मनाने सुद्धा एकमेकांच्या अगदी जवळ होते.

आयुष्यात संकट येत राहतातच ती कुणी टाळू शकत नाही. पण जोडीदाराची आपल्याला समजून घेऊन मिळालेली खंबीर साथच त्यातून एकमेकांना बाहेर काढू शकते.

आकाशने काश्मीरला जाताना रसिकाचा हात हातात घट्ट पकडला. आणि तिला डोळा मारत म्हणाला,

" तुझा पायगुण चांगला आहे शरीरा बरोबर मनाने सुद्धा आपण खुप जवळ आलेलो आहोत. अशी साथ कायम टिकेल. काश्मीरला मजा येईल." रसिकाने लाजून खाली मान घातली.

**जयश्री देशकुलकर्णी**
**मो.9423569199**

# कसं जमत नाही, तेच बघतो



रात्रीचे दोन वाजले होते. सरकारी मेडिकल कॉलेज हॉस्पिटलच्या खोलीतल्या अंधारात सुदाम बिछान्यावर पडला होता. उजव्या कोपरातून आणि त्यापुढच्या हातातून अचानकपणे असह्य कळा सुरु झाल्यामुळं त्याला जाग आली. वेदना सहन करण्यासाठी त्याने डोळे गच्च आवळून घेतले, खांदे आत ओढले. पण हातांच्या मुठी आवळताना डाव्या हाताची मूठ आवळली गेली, पण उजव्या हातातून येणाऱ्या कळा आणखी वाढ. उजव्या हाताकडं त्याचं लक्ष गेलं. बँडेजचा फास करून त्याचा उजवा हात सलाईन स्टँडला उंचावून बांधला होता. त्या हाताला कोपरापासून पुढे घट्ट बांधलेलं पांढरं बँडेज होतं, पण त्याच्यावर आवळून बांधलेलं गुलाबी इलॅस्टिक बँडेज जरा जास्तच आवळलं गेलं होतं. त्याच्या लक्षात आलं, ऑपरेशनच्या आधी दिलेल्या भुलीचा परिणाम उतरलाय.

त्यानं डोळे ताणून आजूबाजूला पाहिलं. खोलीत काळोख होता. डोक्यावरचा सीलिंग फॅन कचकच आवाज करत सावकाश फिरत होता. न राहवून, सलाईन लावलेला डावा हात त्यानं कसातरी लांबवला आणि बेड शेजारची बेल वाजवली.

टर्रर...टर्रर...एकदा... दोनदा... तीनदा. बेलचा कर्कश आवाज तिसऱ्यांदा घुमल्यावर रात्रपाळीची नर्स डोळे चोळत आली. तिनं खोलीतला दिवा लावला. चाळिशीच्या आसपासच्या त्या लठ्ठ नर्सच्या चेहऱ्यावर झोपमोड झाल्याचा त्रास सुदामला स्पष्ट दिसला. कंबरेवरच्या निळ्या पट्ट्यावर दोन्ही हात ठेवत तिनं विचारलं. “क्याय ये? क्या हुवा?”

“सिस्टर, खूप ठणका लागलाय हाताला.”

“हां... अभी छे घंटे हो गये, तुम्हारा ऑपरेशन होके. ठैरो. मै इंजेक्शन लगाती हूं.” आता तिचा आवाज थोडा नरमला होता.

इंजेक्शन देऊन, दिवा बंद करून नर्स परत गेली. हळूहळू त्याच्या वेदना कमी झाल्या. पण उजव्या मनगटापाशी होणारी आग मात्र थांबली नाही. लहानपणी भांडणात त्याची चुलत बहीण त्याच्या गालांवर लाल तिखट चोळायची. अगदी तशीच आग होत होती. सुदामचा उजवा हात डॉक्टरांनी मनगटापासून कापून टाकला होता. खोलीतल्या अंधारात सुदाम तळमळत राहिला. मध्येच एक डास त्याच्या कानाशी गूँ ss गूँ ss करत गेला. पण डास मारण्याचं सोडा, सुदाम कूसही बदलू शकत नव्हता.

हॉस्पिटलच्या साईडरूम मधल्या त्या मिट्ट काळोखात, अर्धवट गुंगीत, त्याच्या नजरेसमोर आठवणींचे असंख्य कवडसे उघडझाप करू लागले.

साडेचार वर्षं मेडिकल कॉलेजमध्ये शिकून एमबीबीएसच्या परीक्षेत तो पहिल्या दहात आला होता. त्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घ्यायला लागणाऱ्या, राष्ट्रीय पातळीवरच्या नीट परीक्षेतही तो पहिल्या विसात आला होता. मेडिसिन, सर्जरी, गायनॅक, पेडिअॅट्रिक्स... हव्या त्या शाखेतल्या पदव्युत्तर शिक्षणाचे दरवाजे त्याला खुले होते. भारतातल्या सर्वोत्तम मेडिकल कॉलेजमध्ये त्याला प्रवेश मिळू शकत होता. त्या पदव्युत्तर शिक्षणासाठी भरायचा अर्जही त्यानं आणला होता. पुढची तीन वर्षं, दिल्लीच्या एम्समध्ये जनरल सर्जरीत एम्.एस्. करायचं आणि त्यानंतर हृदयशस्त्रक्रियेमध्ये आणखी उच्च शिक्षण घ्यायचं. आंतरराष्ट्रीय पातळीवरचा हार्ट सर्जन व्हायचं स्वप्न होतं त्याचं. एखाद्या आर्किटेक्टनं तीस मजली गगनचुंबी इमारतीचा बिनचूक आराखडा बनवावा, तसा त्याच्या भावी आयुष्याचा पक्का आराखडा त्याने रेखाटला होता.

आठ दिवसांपूर्वी तो त्याच्या मित्राच्या, शिशिरच्या मोटरसायकलवर मागे बसून कॉलेजला येत होता. पावसाच्या बारीक, तलम रेशीमधारा बरसत होत्या, त्यामुळं रस्ता निसरडा झाला होता. चौकात वळताना मोटरसायकल घसरली आणि दोघेही रस्त्यावर आपटले. डोक्यातल्या हेल्मेटसकट रस्त्यावर घासत शिशिर रस्त्याच्या कडेला फेकला गेला. सुदाम तोंडावर आपटला, त्याचा उजवा हात रस्त्यावर घासत गेला आणि मागून येणाऱ्या ट्रकचं चाक त्याच्या हातावरून गेलं.

अपघात पाहायला जमलेल्या लोकांनी दोघांना कॉलेजच्याच हॉस्पिटलमध्ये भरती केलं. शिशिरला किरकोळ खरचटण्यापलीकडे काही झाले नव्हते. मात्र सुदामच्या मनगटाच्या आणि हातांच्या हाडांचा चुरा झाला होता. मनगटापासून पुढच्या हाताच्या दोऱ्या झाल्या होत्या. एक बुद्धिमान विद्यार्थी म्हणून कॉलेजच्या हॉस्पिटलमधले सर्व डॉक्टर्स सुदामला ओळखत होते. सिनियर ऑर्थोपेडिक सर्जन, डॉ. सावंतांनी आणि त्यांच्या युनिटमधल्या डॉक्टरांनी, तब्बल पाचसहा दिवस त्याचा हात वाचवायसाठी अथक प्रयत्न केले; पण शेवटी हाताला गँगरीन झालं. मनगटापासून चार इंच अलीकडे त्याचा हात कापून विलग करण्याचा निर्णय डॉ. सावंतांनी घेतला आणि सुदामला तो सांगितला.

“यंग मॅन कान्ट हेल्प. इन्फेक्शन वाढत चाललंय. आपल्याला हात काढून टाकावा लागेल”. डॉ. सावंतांचे ते शब्द हॉस्पिटलमधल्या अंधारात आठवताच, सुदाम नखशिखांत घामाघूम झाला. “ऑ... हूं,,,आई गं...”

त्याच्या तोंडून एक दीर्घ किंकाळी फुटली.

सुदामची किंकाळी ऐकताच, खोलीबाहेर बाकावर झोपलेले त्याचे वडील, महिपतराव आत आले. सुदामला हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यापासून, ते दिवसरात्र त्याच्या सोबत होते. बाकावर झोपून चुरगळलेल्या, मळक्या पांढऱ्या सदऱ्याच्या बाह्या मागे सारत, त्यांनी खोलीतला दिवा लावला आणि विचारलं,"काय झालं बाळा? दुखतंय का खूप?"

"नाही. मगाशी दुखंत होतं. सिस्टरनं इंजेक्शन दिलंय आत्ताच. बरं वाटतंय."

"मग? वराडलास का?" त्यांचं लक्ष त्याच्या हाताकडे गेलं. बँडेज लालसर झालं होतं. ओलंही झाल्यासारखं वाटत होतं. त्यांच्या डोळ्यात पाणी आलं. आपल्या एकुलत्या एक मुलाची अवस्था त्यांना पाहवत नव्हती.

"नाही, काही नाही. तुम्ही झोपा बाबा." मळक्या लेंग्यातल्या वडिलांकडे पहात, क्षीण आवाजात सुदाम उद्गारला.

"तू झोप बाळा. मी बसतो थोडा येळ." रुममधल्या एका खुर्चीत बसत महिपतराव म्हणाले. बेडवर उताण्या पडलेल्या सुदामकडे बघत राहिले. त्याच्या डाव्या हाताला लावलेल्या सलाईनच्या बाटलीमधून एक एक थेंब नळीत सावकाशपणे पडत होता. एकेका थेंबासोबत त्यांना बालपणापासूनचा सुदाम आठवू लागला.

त्याच्या जन्मापासूनच गावात दुष्काळ पडत गेला. वडलोपार्जित शेतीमधून त्यांच्या वाटेला कशीबशी तीन एकर जिरायत जमीन आली होती. पण ती एकसंध नव्हती. पाच वेगवेगळ्या तुकड्यात होती. जमीन नांगरायला, पेरणी करायला, पाणी द्यायला, खत घालायला, पिकाची मशागत करायला जीवाचा आटापिटा करायला लागायचा. तेंव्हाच त्यांनी ठरवलं होतं, की आपल्या पोराला चांगलं शिक्षण देऊन शहरात पाठवायचं.

शाळेपासूनच सुदाम हुशार होता. पुस्तक एकदा वाचलं की त्याच्या लक्षात रहायचं, तरीही तो खूप अभ्यास करायचा. एखादं कठीण गणित सोडवणं जमत नसेल, तर तो म्हणायचा, "कसं जमत नाही? तेच बघतो." दहावीत असताना, शाळेतून आल्यावर आईवडिलांना शेतात मदत करायचा. शेताला पाणी द्यायला, पेरणी करताना, ज्वारीचं पिक काढल्यावर खळ्यात मदत करायला येणाऱ्या सुदामाच्या आठवणीची चित्रं त्यांच्या डोळ्यासमोरून सरकू लागली. तरीही दहावीत तो तालुक्यात पहिला आला होता.

कॉलेजसाठी त्याला जिल्ह्याच्या ठिकाणी टाकला. तो सायन्सला गेला. अकरावीची परीक्षा पास होऊन तो जेंव्हा बारावीला गेला, तेंव्हा गावच्या दुष्काळ योजनेत, आईवडीलांबरोबर डोक्यावर मातीची घमेली वाहणारा सुदाम त्यांना नजरेसमोर दिसू लागला. काम करता करता एक दिवस डोक्यावरचं घमेलं खाली फेकत तो त्यांना म्हणाला होता, "बाबा, मला डॉक्टर व्हायचंय." हे बोलताना त्याच्या डोळ्यातली चमक पाहून त्यांना तेंव्हाही गलबलून आलं होते. आजही त्याचा तो चेहरा आठवला आणि त्यांच्या अंगावर काटा आला. पण त्याचवेळी सुदामनं मान खाली घालून बोलेलेले शब्द ऐकून त्यांच्या पोटात खड्डा पडला होता. "बाबा... बारावीची कॉलेजची फी पंचवीस हजार आहे. आणि त्यानंतर डॉक्टरांच्या कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळवायला आणखी एक परीक्षा द्यावी लागते. त्यासाठी एक क्लास लावायला लागेल. त्याची फी एक लाख आहे".

महिपतरावांनी त्याच्या आईच्या बांगड्या विकून कॉलेजची फी भरली. क्लासच्या फीसाठी गावातल्या शेटजीपुढं नाक घासून पैसे मागितले. शेटजीनं जमिनीच्या एका तुकड्याचे गहाणखत करून पैसे दिले. त्यानंतर सुदामच्या कॉलेजच्या फीसाठी प्रत्येक वर्षी शेताचा एकेक तुकडा गहाण पडत गेला.

बारावीचं कॉलेज सुरु झाल्यावर कॉलेजच्या गावी निघालेल्या सुदामला आपण म्हणालो होतो, "बाळा, तुला डॉक्टर व्हायचंय.. रग्गड मेहनत कर... आमची काळजी करु नगंस. गावी आला न्हाईस, तरी चालंल, पन अब्यास कर, तब्येतीचं ध्यान ठेव." सुदाम त्यांच्या पाया पडला. त्यांनी त्याला उठवून छातीशी धरलं. दोघांच्या डोळ्यातून आसवं घळाघळा वाहत होती. एक एक दृश्य महिपतरावांच्या मनाच्या खोल कोपऱ्यातून उमटत होतं. ते प्रत्येक चित्र त्यांच्या छातीवर मणामणाचं दडपण आणत होतं.

त्यावर्षी दिवाळीचे दोन दिवस सोडता, सुदाम गावी आलाच नाही. वर्षभर तो अभ्यास करत राहिला. दिवस रात्र. बारावीला तो राज्यात सर्वात जास्त मार्क मिळवणाऱ्या मुलात होता. अख्ख्या देशात झालेल्या पुढच्या परीक्षेत तो पहिल्या पंधरात आला... एका दिवसासाठी तो गावी आला. आपल्या आणि आईच्या गळ्यात पडून रडला... "बाबा... मी डॉक्टर होणार." आत्ताही त्या आवाजाचा प्रतिध्वनी त्यांच्या कानात घुमू लागला. महिपतरावांनी त्याला गावच्या बिरोबाला नेऊन पूजा केली. तो परत गेला आणि दुसऱ्या दिवशी तो जायबंदी झाल्याची बातमी आली...

सलाईनची बाटली संपली होती. पहाट झाली होती. हॉस्पिटलच्या त्या खोलीतला अंधार दूर होऊ लागला होता.

दुसऱ्या दिवशी ऑपरेशन करणारे डॉ. सावंत राऊंडला आले. त्यांनी स्वतःच्या नजरेखाली ड्रेसिंग बदलून घेतलं. डॉक्टरांच्या नेहमीच्या तज्ञ भाषेत ते सुदामला म्हणाले, "जखम छान आहे. काही इन्फेक्शन नाही. उद्या घरी सोडू तुला. जखम भरेपर्यंत, दर दोन दिवसांनी ड्रेसिंगला ये."

सुदाम त्यांच्या नजरेला नजर देऊन ऐकत होता. विद्यार्थ्याच्या कृतज्ञतेच्या आवाजात तो म्हणाला, "थँक्यू सर. पण. जखम भरायला किती दिवस लागतील सर?"

"टाके आठ-दहा दिवसात काढू, पण सगळं काही ठीक व्हायला महिना लागेल." असं सांगून डॉ. सावंत

पुढच्या पेशंटकडं निघून गेले, पण सुदामच्या डोळ्यासमोर लंब्या चवड्या प्रश्नांची आगगाडी उभी राहिली. परीक्षा संपली आहे, हॉस्टेल खाली करावं लागलंय. दहा दिवस कुठं रहायचं? गावी जाणं आणि दिवसाआड ड्रेसिंगला येणं शक्यच नाही. हॉस्पिटलमध्ये राहणं म्हणजे आणखी कुणा गरजवंत पेशंटची जागा अडवून ठेवणं. आणि....उद्या तर एमएससाठी फॉर्म भरायचाय... ऑपरेशन करताना, सर्जनला आहेत ते दोन हातही अपुरे पडतात. देवांसारखे आठ हात हवेत असं वाटतं... मग एकाच हातानं आणि तेही डाव्या... मी शस्त्रक्रिया कशी करणार? एमडीसाठीसुद्धा प्रवेश मिळेल...पण एका हातानं मी पेशंट कसे तपासणार? पेशंटच्या केसपेपरवर लिहिणार कसा? आणि एक हात तुटलेल्या डॉक्टरला पेशंट मान्य कसं करणार? एमडी, एमएसला मोठा प्रबंध लिहावा लागतो... तो लिहिणार कसा? आणि... आणि उद्या?... उद्या तर फॉर्म भरायचाय... त्याच्यावर सही कशी करणार? त्यानं डोळे घट्ट मिटून घेतले. आपलं डॉक्टर होण्याचे स्वप्न हिरावून घेण्यासाठी नियतीने हा फास टाकला आहे? की दैव आपली परीक्षा बघतंय? तो मनात म्हणाला, "जमणार. बघू कसं जमत नाही ते."

दुसऱ्या दिवशी डॉ. सावंत डिस्चार्जच्या वेळेस म्हणाले, "यंग बॉय. आय अंडरस्टँड युवर प्रॉब्लेम... डिसचार्ज घेतलास की सरळ स्वस्तिक हॉस्पिटलमध्ये जा. माझ्या स्टुडन्ट्सचंच हॉस्पिटल आहे. जखम बरी होईपर्यंत तिथंच रहा. ड्रेसिंगही ते करतील. सगळी ट्रीटमेंट पूर्ण झाली की मला दाखवून जा." सुदामनं सरांचे आभार मानले. दैव त्याच्याकडं बघून अखेर किंचितसं का होईना, पण हसलं, असंही वाटून गेलं त्याला.

शिशिर त्या दिवशी त्याला न्यायला आला होता. तो सुदामला आणि त्याच्या वडिलांना स्वस्तिक हॉस्पिटलमध्ये घेऊन गेला. हॉस्पिटल नुकतंच सुरु झालं होतं. पेशंटच्या बऱ्याचशा रुम्स रिकाम्याच होत्या. हॉस्पिटलने त्याच्यासाठी एक रुम ठेवली होती. रुममध्ये गेल्यावर त्यानं सुदामचा फॉर्म भरला. सगळी कागदपत्रं लावली. त्याचं फॉर्म भरण्याचं काम चालू होतं, तोवर सुदामनं एका कोऱ्या कागदावर डाव्या हातानं आपली स्वतःची सही करायचा प्रयत्न सुरु ठेवला. पेन बोटात धरण्यापासून सुरुवात करावी लागली... पण त्यानं प्रयत्न जारी ठेवले. कागद पुरा भरला, पण मनासारखी सही काही जमेना.

त्यानं आणखी एक कागद मागवला... तो ही कागद सह्यांनी निम्मा भरला... शेवटी जमली त्याला स्वतःची सही. तरी आणखी चार वेळा त्यानं ती करुन पाहिली आणि शेवटी फॉर्मवर सही केली. सुदाम शिशिरला म्हणाला, "दैव करतंय मदत आपल्याला, पण त्यासाठी पेन शंभरदा घासावा लागतो... "

शिशिरलाही हायसं वाटत होतं. त्यानं एक दीर्घश्वास सोडला आणि हसत हसत म्हणाला "बरं झालं सुदामराव, नाहीतर डाव्या हाताचा अंगठा निशाणी म्हणून लावावा लागला असता आणि त्यासाठी एक ॲफिडेव्हिट, हॉस्पिटलचं सर्टिफिकेट, 'माझ्या समोर अंगठा दिला' म्हणून डीन सरांचे आणखी एक सर्टिफिकेट... पन्नास कुटाणे करावे लागले असते..."

"पण एक प्रॉब्लेम आहे... मी अर्ज कोणत्या ब्रांचसाठी करु?" सुदामच्या स्वरात खिन्नता होती. पण शिशिर लगेच म्हणाला, "अरे आपल्या पेडिॲट्रिक्सच्या जोशी मॅडम पीजी ॲडमिशनसाठी काऊन्सेलर आहेत, त्यांना भेटूयात."

पन्नाशीच्या डॉ. जोशी मॅडम निळा पंजाबी ड्रेस घालून, त्यांच्या जाडजूड चष्म्यातून ओपीडीमधली छोटी मुलं तपासत होत्या. विद्यार्थांच्या कोणत्याही प्रश्नात त्या नेहमीच लक्ष घालायच्या. त्यांना योग्य तो सल्लाही द्यायच्या. सुदामला त्यांनी ओळखलं. त्याच्या अपघाताची आणि त्यानं हाताचा तळवा गमावल्याची इत्थंभूत माहिती त्यांना होती.

डोळे बारीक करत, किंचितसं हसत त्यांनी सुदामला विचारले, "मेडिकल सोडून वेगळ्या क्षेत्रात का जात नाहीस?" त्यांच्या प्रश्नाचा रोख सुदामला कळला. त्यांच्या डोळ्याला डोळे भिडवत तो लगेच उत्तरला, "मॅडम, मेडिकल फील्डकडं मी एक पॅशन म्हणून बघतो. लांबवर एका खेड्यातून इथं आलोय... माझ्या वडिलांनी शेती गहाण टाकून माझी फी भरली आहे, दरवर्षी. गाव माझं दुष्काळी आहे. अकरावीला असताना, सुट्टीत दुष्काळ निवारण योजनेत, दोन अडीच महिने मी डोक्यावर मातीची घमेली वाहिली आहेत. आमच्या आणि आजूबाजूच्या गावातले खूप लोक, तरुण, म्हातारे, बायका मजूर म्हणून काम करायचे. सगळे तर खरे शेतकरी होते, पण सततच्या दुष्काळाने देशोधडीला लागले होते. त्यात खूप जण आजारी असायचे. काम करताना त्यांना अपघात व्हायचे, जखमा व्हायच्या... पण मजुरी बुडेल आणि खायचे प्यायचे वांधे होतील म्हणून ते त्याही स्थितीत काम करायचे... इलाज करायला त्यांच्याकडं पैसेही नसायचे. त्यांची परिस्थिती पाहिली आणि ठरवलं... डॉक्टर व्हायचं."

डॉ. जोशी मॅडम आ वासून सुदामकडं पहातच राहिल्या. "व्हेरी गुड, सुदाम. एवढ्या वर्षात अशा मानवतेच्या कामासाठी डॉक्टर व्हायचंय म्हणून प्रयत्न करणारा... तूच पहिला विद्यार्थी आहेस."

मान बाजूला वळवत पलीकडच्या खिडकीतून दूर बघत त्या म्हणाल्या, "हे बघ, वैद्यकीय ज्ञान असतं ना, ते फक्त लोकांच्या सेवेसाठीच असतं. सूर्य स्वतःसाठी प्रकाशमान होतो का? नाही, तो जगासाठी होतो. फुलं त्यांचा सुगंध कधीही स्वतःपाशी राखून ठेवत नाहीत. तो चोहीकडं उधळून, सारा आसमंत सुवासिक करतात. डॉक्टरनंही आपलं ज्ञान, आपलं कौशल्य, आजारांनी पिडलेल्या लोकांना बरं करायला वापरायचं असतं. मृत्यूच्या दाढेत गेलेल्या लोकांना, मरणाच्या दारातून परत आणण्यासाठीच ते वापरलं पाहिजे."

क्षणभर त्या स्तब्ध झाल्या. नंतर मान झटकत समोरच्या लॅपटॉपकडं दृष्टीक्षेप टाकत त्या म्हणाल्या,

"तू पॅथॉलॉजी किंवा रेडिऑलॉजी घे. या क्षेत्रात खूप स्कोप आहे. आणि पेशंटशी तसा प्रत्यक्ष संबंध येत नाही. रेडिऑलॉजीमध्ये एक्सरे, स्कॅन करताना काही प्रोसीजर्समध्ये हातांचा वापर करावा लागतो. पण पॅथॉलॉजीमध्ये तुम्ही थोड्या प्रयत्नांनी सर्व करू शकाल. पण लॅब टेस्टचे रिपोर्ट भरायला, शेवटी जो थिसीस करावा लागतो त्यासाठी, परीक्षेसाठी डाव्या हातानं व्यवस्थित लिहिण्याची सवय करावी लागेल."

"थँक्यू मॅडम." सुदामनं उभं रहात मान तुकवून, बॅंडेज बांधलेल्या हाताला डावा हात जोडून नमस्कार केला. खरं तर त्याला त्यांच्या पाया पडावसं वाटत होतं. पण वैद्यकीय क्षेत्रात असा बाळबोधपणा चांगला दिसणार नाही, हे तो जाणून होता. त्याच्या डोळ्यातले निस्सीम कृतज्ञतेचे भाव पाहून डॉ. जोशीही सद्गदल्या. सुदामचा खांदा थोपटत त्या म्हणाल्या, "बेस्ट ऑफ लक सुदाम."

सुदामनं फॉर्म भरून सादर केला. सगळ्या फॉर्म्सची शहानिशा होऊन अंतिम यादी लागायला एक महिना लागणार होता. त्या महिन्याभरात सुदामचं ड्रेसिंग, औषधं चालूच होती. दिवसभर आणि रात्री जागून तो डाव्या हातानं पेन पकडण्याचा आणि एकेक अक्षर लिहिण्याचा प्रयत्न करत होता. तो स्वत:शीच पुटपुटायाचा, "डाव्या हातानं आपल्याला सगळी कामं जमलीच पाहिजेत, कशी जमत नाहीत, तेच बघतो."

पण एका हातानं फक्त लिहिता येणं पुरेसं नव्हतं, रोजची दैनंदिन कामं, कपडे घालणं, केस विंचरणं, पायात बूट घालणं... रोजच्या जीवनातल्या अनेक गोष्टी तो पुन्हा शिकत होता. लहानपणी या गोष्टी आई शिकवायची, पण आता तोच स्वत:साठी आई बनला होता.

अभ्यासामध्ये, त्याला नुसतं लिहायचं नव्हतं, तर ते वाचता येईल असं चांगल्या अक्षरात लिहायचं होतं. शिशिर त्याला कोलेजच्या लायब्ररीतून पॅथॉलॉजीची पुस्तकं आणून द्यायचा. त्यातली वाक्यं, परिच्छेद तो लिहून काढायचा... इंग्रजीमध्ये लिहायचं, देवनागरीत लिहिण्यापेक्षा सोपं होतं. पण लिखाणातली अक्षरं एका आकारात येणं महाकर्मकठीण होतं. आणि तीही कागदावर वर खाली वर न होता एका रेघेत यायला हवी होती.

लिहून लिहून बोटं दुखू लागायची. बोटांची पेरं बधीर व्हायची. पंधरा दिवसांनतर सारखं लेन मास दबून जाऊन खड्डा पडला. एकीकडे उजव्या हाताची जखम पूर्ण बरी होत होती, दुसरीकडं डाव्या हातानं लिहण्याची सवय पक्की होत होती.

आणखी महिन्याभरात तो एका हातानं पानंच्या पानं लिहू लागला. कॉलेजमधल्या पॅथॉलॉजीच्या कामात मायक्रोस्कोपमधून काम करताना अडचण यायची नाही. पण एका हातानं डोळ्याजवळच्या लेन्सची रिंग फिरवणं थोडं जड जायचं. पण त्याखाली ठेवलेला रक्ताचा स्मीअर, बायॉप्सीचा तुकडा, जंतूंच्या निदानासाठी ठेवलेले स्त्राव तपासून त्याचे तपशील नोंदवणं... अशी सारी कामं त्याला जमू लागली. गरगरा फिरणाऱ्या सेन्ट्रिफ्युज यंत्रात रक्ताचे सॅंपल टाकणे, निरनिराळ्या मशीन्समध्ये ठेवलेल्या नमुन्यांचे निरीक्षण करण्यात तो तरबेज होऊ लागला. लॅबमध्ये लिहिण्यापेक्षा कॉम्प्युटरवर नोंदवण्याची प्रथा होती. अनेकदा मोठमोठे लांबलचक रिपोर्ट्स त्यात लिहावे लागत. एका हाताने टायपिंग करणे सोपं नव्हतं. सुदामनं विचार केला, "डाव्या हाताने लिहिता येण्यासाठी परिश्रम घेतले, आता कॉम्प्युटर टायपिंगवर मेहनत करू." मोकळ्या वेळेत तो पुस्तकातल्या नोट्स टाईप करण्याची सवय करू लागला. डाव्या हाताचे पहिले बोट वापरून तो टायपिंग करायचा. बोटाच्या पेराला मुंग्या यायच्या, पण तो ते करतच राहायचा. सहा महिन्यात तो इतर विद्यार्थ्यांच्या वेगाने टायपिंग करू लागला.

पदव्युत्तर शिक्षणासाठी त्याचे शिक्षक होते, डॉ. वासुदेव पाटील. पांढऱ्या शर्टवर काळा कोट आणि लाल टाय घालून यायचे. एमडीच्या पहिल्या वर्षात, सुरुवातीच्या एका प्रयोगात, टेस्टट्यूबमध्ये एक द्राव डाव्या हाताने सोडताना सुदामकडून सांडला. ते पहातच डॉ. पाटील सर भडकले आणि म्हणाले, "डॉ. सुदाम कशाला पॅथॉलॉजी घेतलंत. एक हातानं करायचं काम नाही हे." त्या नंतर त्याच्या बारीक सारीक चुकांवर ते कठोर टीका करू लागले. सुदाम मान खाली घालून त्यांचे शाब्दिक फटके खायचा. क्षणभर त्याला अपमानित झाल्यासारखं वाटायचं. स्वत:चाच राग यायचा. पण दुसऱ्या क्षणी तो स्वत:शीच म्हणायचा, "मला का जमणार नाही हे? कसं जमत नाही तेच बघतो."

आपापलं काम उरकून सगळे निघून गेले, की तो झालेल्या चुका का झाल्या? याचा विचार करायचा आणि पुन्हा तो प्रयोग करून बघायचा. तीन तीनदा, चार चारदा करायचा. वर्षभरात त्याची प्रगती पाहून डॉ. पाटील चकित झाले.

"गुड. डॉ. सुदाम, चांगली प्रगती आहे. कीप इट अप." सुदामवर नेहमी ओरडणाऱ्या त्याच्या शिक्षकांच्या डोळ्यात कौतुकाचे भाव होते.

दुसऱ्या वर्षी त्याने तुटलेल्या उजव्या हातावर कृत्रिम हात बसवून घेतला. त्याचा कामसूपणा आणि अभ्यासूवृत्ती पाहून कॉलेजच्या डीन सरांनी खास शिफारस करून तो बसवून घेतला.

पाहता पाहता तीन वर्षं उलटली. एमडीच्या परीक्षेत तो प्रथम क्रमांकानं उत्तीर्ण झाला. डाव्या हातानं काम करणारा सुदाम देशभरातल्या विद्यार्थ्यात उजवा ठरला होता. मोठमोठ्या कॉर्पोरेट लॅबमध्ये त्याला वर्षाला सात आकडी पगाराची नोकरी मिळू शकत होती. पण त्याने सरकारी प्रयोगशाळेत काम स्वीकारले. नेहमीच्या रोग निदानाच्या कामांसोबत आपले संशोधन सुरु ठेवलं.

सरकारी नोकरीत असला, तरी त्याला पगार चांगला होता. लहानपणापासून छानछोकीत राहण्याची त्याला

कधीच सवय नव्हती. त्यामुळं पैसे शिल्लक राहायचे. ते गावी वडिलांना पाठवायचा. दोन वर्षात त्यानं वडिलांचं सारं कर्ज फेडलं, जमिनीचे गहाण पडलेले तुकडे सोडवून घेतले. एका दिवाळीच्या आधी आईला सोन्याच्या नव्या बांगड्या केल्या. त्यांचं राहत्या घराची डागडुजी करून घेतली. घरात नवे पलंग, नवं फर्निचर, टीव्ही आला.

"सुदामा. आरं कशापाई यवडं करतुयास?" असं म्हणणाऱ्या महिपतरावांच्या प्रश्नाला तो उत्तर देत नसे, त्यांच्याकडं किंचित हसून पहायचा. सुदामच्या डोळ्यात त्यांना ते उत्तर झळकताना दिसायचं. "तुमच्या कष्टांमुळं बाबा मला हे दिवस दिसतायत. तुम्ही पाठीशी होतात म्हणून मी सगळ्या गोष्टींवर मात करू शकलो. तुमच्या उपकारांचे पांग फेडू द्या मला..."

सुदामनं गावामध्ये एक मोफत दवाखाना सुरु केला. दुसऱ्या व चौथ्या शनिवारी आणि रविवारी त्याला सुट्टी असे. तो कॉलेजमधल्या काही स्पेशालिस्ट मित्रांना घेऊन तिथं आणू लागला. पंचक्रोशीमधले हरतऱ्हेचे पेशंट्स तिथं आवर्जून येऊ लागले. त्यांची मोफत तपासणी करून औषधोपचार व्हायचा. ज्यांना गंभीर आजार असायचा किंवा शस्त्रक्रियेची गरज असायची, त्यांना कॉलेजच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करून उपचार केले जायचे. दवाखाना सकाळपासून संध्याकाळपर्यंत चालायचा. संध्याकाळी काम संपल्यावर सुदाम आणि सगळे डॉक्टर मित्र, त्याच्या आईच्या हातच्या जेवणाचा स्वाद घ्यायचे. प्रत्येक वेळी, एखादा तरी मित्र त्याला हमखास विचारायचा, "हा दवाखाना, हे मोफत उपचार, ऑपरेशन्सची रेफरल्स...सगळं कशासाठी करतोस तू?"

" अरे, यासाठीच तर मी डॉक्टर झालो. आणि आपलं ज्ञान आजारी लोकांना बरं करायसाठी असतं". प्रत्येक वेळी सुदामचं उत्तर तेच असायचं. डोळ्यासमोर दुष्काळाच्या कामात आजारानं तळमळणारे लोक असायचे आणि कानात जोशी मॅडमचे शब्द घुमत असायचे.

नंतरच्या काळात दरवर्षी नवनव्या अनोळखी आजारांच्या विश्वव्यापी साथी येत गेल्या. प्रत्येक वेळेस सुदामच्या नेतृत्वाखाली सरकारी प्रयोगशाळेनं परदेशी लॅबोरेटरीजच्या तोडीस तोड काम केलं. झटपट रोगनिदान करण्याच्या पद्धती शोधल्या. त्यातल्या शेवटच्या साथीमध्ये, त्यानं संशोधन केलेली रोगनिदान चाचणी अद्वितीय मानली गेली, जगभरात नावाजली गेली. देशोदेशीच्या संशोधकांनी त्याचा गौरव केला. भारत सरकारकडून त्याला पद्मश्री जाहीर झाली. भारतभरातल्या वृत्तवाहिन्यांमध्ये त्याची वाहवा होत होती. घरी टेलिव्हिजनवर सुदामचं कौतुक पाहणाऱ्या महिपतरावांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहत असत. मुलाला आतातरी दृष्ट लागू नये म्हणून सुदामची आई कानशिलावर आपले हात ठेवून बोटं कडकडा मोडत असे.

राष्ट्रपतींच्या हातून पद्मश्री घेताना, सुदामनं डाव्या हाताकडं पाहिलं. त्याचा डावा हात, उजव्या हाताकडं पहात, अंगठा उचलून जणू "फत्ते" म्हणत होता.

**डॉ. अविनाश भोंडवे./ पुणे**
**मो. ९८२३०८७५६१**



# द मदर



आज श्रावण सोमवार असल्याने कुलदीपची शाळा एक पारगीच होती. त्यामुळे तो दुपारीच घरी आला होता. इंग्रजीच्या सरांनी त्यांना गृहपाठात 'द मदर' या विषयावर निबंध लिहून आणायला सांगितला होता. त्यामुळे तो निबंध कसा लिहावयाचा या विचारातच कुलदीपने घर गाठले होते. आईवडील आंगठे बहाद्दर असल्यामुळे अभ्यासाबाबतीत त्यांचे मार्गदर्शन मिळणे अशक्य होते. इंग्रजी विषयाचे आणि त्याचे सूत जमतच नव्हते. परिणामी, तो जेमतेम त्या विषयात पास व्हायचा, तर कधी कधी ग्रेस पास व्हायचा....... म्हणजे 'वरच्या वर्गात घातले' हा शेरा त्याच्या गुणपत्रिकेत असायचा. त्याला वाटायचे, इंग्रजांनी भारतावर राज्य केले नसते तर किती बरे झाले असते! निदान ही इंग्रजी भाषा शिकायचा ताप तरी आपल्या वाट्याला आला नसता. इंग्रज गेले........ देश स्वतंत्र झाला पण जाता जाता त्यांनी त्यांच्या इंग्रजी भाषेची गुलामी आमच्या माथी मारली. त्याला इतर विषयांत नेहमीच चांगले मार्क्स मिळायचे. परंतु, त्याचा इंग्रजी विषय कमकुवत असल्याने बऱ्याच वेळा त्याला वर्गातील नंबराला मुखावे लागायचे. मात्र एक जमेची बाजू होती जी त्याला या विषयात तारायची ती म्हणजे मुद्देसूद निबंधलेखण, सुंदर हस्ताक्षर आणि निटनेटकी निबंधाची वही जी त्याला पैकीच्या पैकी मार्क्स मिळवून द्यायची. त्याने रट्टा मारुन पाठ केलेला निबंध जर परीक्षेत आला तर त्या निबंधाला चांगले मार्क्स मिळायचे आणि त्यावेळी पहिल्या तीन नंबरात तो हमखास असायचा. पण भलताच निबंधाचा विषय आला तर मात्र इतर विषयात उत्तम मार्क्स मिळूनही पदरी त्याच्या 'ग्रेस पास' होण्याची पाळी यायची. गेल्या वर्षी त्याने इंग्रजी निबंधमालाचे पुस्तक विकत घेतले होते. ते त्याला आठवले आणि त्यातील या विषयाचा निबंध उतरवून काढायचा त्याने ठरवले. बरेच विद्यार्थी तेव्हा निबंधमालाच्या पुस्तकाचा वापर करीत होते. मग काहीजण त्यातील मुद्दे समजून घेऊन स्वत: निबंध लिहायचे तर काहीजण कुलदीप सारखा रट्टा मारुन लिहायचे. कुलदीप ग्रामीण भागातील असल्याने त्याला या पुस्तकाची जास्त निकड भासायची.

शर्टाची बटणे खोलतच कुलदीप घरात शिरला. त्याने दफ्तर फडताळीत ठेवले. घरचे कपडे घातल्यानंतर त्याची बहीण सुमित्राला तो म्हणाला, "ताय, मला लय भूक लागलिया! जेवायला वाड." हातपाय धुवून आला नसल्याचे पाहून ती त्याला म्हणाली, "अरं तू, हातपाय न धुताच कसा काय जेवायला बसतूस. जा बरं हातपाय धुवून ये. मग वाडती तुला." भुकेचा आगडोंब उसल्यामुळे त्याला पोटात काहीतरी टाकायचे होते. त्यामुळे तो तिला काकुळतीला येऊन म्हणाला, "अग, काय झालं माझ्या हाताला! म्या मातीत कुठं खेळायला गिल्तू. चांगलं तर हायीत हात. वाड मला, लय भूक लगालिया." शिस्त लावण्याच्या हेतूने ती त्याला म्हणाली, "हात धुवून आल्याशिवाय म्या तुला वाडणार न्हाय्." शेवटी त्याच्यापुढे कोणताच पर्याय उरला नसल्याने पाय आपटतच तो हात धुवून आला. त्यानंतर तिने त्याला जेवायला वाढले. तेव्हा तो आधाशासारखा जेवणावर तुटून पडला. जस जसे घास पोटात जावू लागले तस तसे त्याचे पोटाचे आंदोलन थंडावू लागले. तेव्हा त्याला निबंधाच्या पुस्तकाचा शोध घ्यायची तीव्र जाणीव झाली.

जेवण आटोपल्यावर प्रथम त्याने पत्र्याची पेटी उघडली. त्यातील सर्व सामान बाहेर काढले. त्यात वह्या पुस्तके मिळाली. पण त्याला हवे असलेले पुस्तक त्यात मिळाले नाही. त्यानंतर त्याने लाकडी पेटी उघडली. तेव्हा त्यात त्याला बालपणातील खेळणी व वापरात नसलेली भांडीकुंडी दिसली. संभावित ठिकाणी त्याने शोध घेवूनही त्याच्या पदरी निराशा आली होती. त्यामुळे त्याचा चेहरा निराशेने ग्रासला होता. काढलेले सामान पुन्हा त्या पेट्यांत भरायचे असल्याने तो त्रस्तही झाला होता. त्याच्या शोध मोहिमेमुळे झालेल्या आवाजाने शेजारच्या घरात गप्पा मारायला गेलेल्या त्याच्या आजीला राधाबाईला घरी काय चालले आहे याचा आढावा घ्यायची आठवण झाली. त्यामुळे तिने गुणाबाईचा निरोप घेऊन घरी आली. घरी येवून पाहाते तर काय, कुलदीप वैतागल्यासारखा दिसला. आपला लाडका नातू त्रासलेला, वैतागलेला पाहून ती काळजीच्या स्वरात त्याला म्हणाली, "आरं ये माझ्या छबुकल्या, काय झालं रं तुला वैतगायला?" तेव्हा तो तिला सांगू लागला, "अग, निबंधाचं पुस्तक शोधतुया. तू मला मदत कर की." त्याचा काकुळतीला आलेला चेहरा पाहून ती मदत करण्याच्या हेतूने त्याला म्हणाली, "व्हय, करती की, पर मला वाचायला न्हाय् येत. म्या कशी सुदू?" त्यावर तो म्हणाला, "अग, सोप हाय. थोडंसं पातळ हाय ते पुस्तक. तुला पातळ पुस्तकं जीवडी मिळतील तिवडी मला दाव. म्या वळकतू तेच्यातून. अग, माज्या इंग्रजीच्या सरांनी मला 'द मदर' या विषयावर निबंधलेखनाचा गृहपाठ दिलाय. माजं गेल्या वर्षी घेतलेलं इंग्रजी निबंधमालेचं पुस्तक मला मिळत न्हाय. तुला आठवतंय का ग ते? अग, बाबांबरोबर म्या शनवारच्या बाजारला गिल्तू तवा ते पुस्तक त्यांनी मला घेऊन दिलं हुतं. त्यालाबी आता एक वर्ष झालंय. आज्जे, म्या सांगितल्या सारखं पातळ पुस्तक हुडकून मला दावत जा. यी की लवकर." नातवाची

उडालेली तारांबळ पाहून तिला त्याची दया आली आणि त्याला मदत करण्यासाठी ती पुढे सरसावली.

राधाबाई त्याला म्हणाली, "आरं बाळा, त्या पत्र्याच्या पिटीत बगीतलं का? आन् लाकडाच्या पिटीत रं?" तेव्हा तो म्हणाला, "व्हय, बगीतलं की." तेव्हा थोडा विचार करून पुन्हा ती म्हणाली, "काय रं त्या फडताळीत बगीतलं का?" तिचं बोलणं संपल्यावर तिच्यावर चिडत तो म्हणाला, "बगीतलं ग! अग तू शोदायला मदत करणार हाय्ईस का नुसतं इचरत बसणार हाय्ईस?" तेव्हा ती त्याला धीर देत म्हणाली, "बगती म्या. कशाला काळजी करतुस." त्यानंतर ती त्या पुस्तकाचा शोध घेवू लागली. बराच वेळ दोघांनी शोधा शोध केली पण त्यांना ते कुठेच सापडले नाही. एवढा शोध घेवूनही ते न मिळाल्याने त्याचा जीव रडकुंडीला आला होता. हतबल झालेल्या कुलदीपची पायाची आपटा आपट चालू झाली होती. त्याच्या उद्वेगामुळे आणि बराचवेळ चालू असलेल्या शोध मोहिमेमुळे तो घामाघूम झाला होता. पुस्तक शोधण्यात वेळ गेल्यामुळे त्याला बाकीच्या विषयांचा अभ्यास करता आला नाही. अखेर तो हत्तबुद्ध होऊन तो एका कोपऱ्यात जाऊन बसला.

शोधत असताना राधाबाईची नजर खुंटीला अडकवलेल्या एका जुनाट पिशवीवर पडली. तिला पुसटसे आठवू लागले की गेल्या वर्षी त्या पिशवीत त्याने काहीतरी ठेवल्याचे. जणू ते पुस्तक सापडल्याच्या आविर्भावात ती त्याला म्हणाली, "कुलदीप बाळा, त्या पिशवीत बग की." त्यावर तो म्हणाला, "अग, एवढ्या घाणेरड्या पिशवीत म्या पुस्तकं ठिवत नसतू." ती त्याला समजावत म्हणाली, "आरं, त्वा समदं बगीतलंस पण कुठं सापडलं न्हाय् ते. मग एवढं बगायला काय हरकत हाय." त्यालाही आजीचे म्हणणे पटले. ती पिशवी पाहिल्यानंतर आपल्या शोध मोहिमेचा समारोप होणार होता. त्याने पिशवीकडे पाहिले तेव्हा त्याला अंधुकसे आठवले की गेल्या वर्षीची वार्षिक परीक्षा संपल्यावर घाईघाईत त्याने वह्या पुस्तके आजीकडे ठेवायला दिली होती. म्हणून तो तिला म्हणाला, "अग आजी,आता मला आठवलं, म्या तुला परीक्षा झाल्यावर पुस्तकं ठिवायला दिली हुती, ती कुठं ठिवल्याती? सांग की ती ह्याच्यात तर ठिवली, नाहीस ना?" तेव्हा राधाबईलाही आठवले, गेल्या वर्षी त्याची पुस्तके तिनेच त्यात ठेवली होती. ती त्याला म्हणाली, "व्हय गड्या, आता आठवलं बग, म्याच तुजी पुस्तकं त्यात ठिवली हुती. चल, बगूया त्यात." त्यानंतर कुलदीपने खुंटीला अडकवलेल्या पिशवीचे बंध काढण्याचा प्रयत्न केला पण ती खूप जड असल्यामुळे त्याला ती काढता येईना. तेव्हा तो आजीला म्हणाला, "अग, ही पिशवी लय जड हाय. आता काय करायचं?" त्यावर राधाबाई त्याला म्हणाली, "आता काय करायचं........ तुजा दादा आणि आय यायची वाट बगायची. चल तो पर्यंत तू खेळत बस." त्याच्या चेहऱ्यावर हतबलता दिसत होती. तो खेळायला गेला पण त्याचे खेळण्यात नीट लक्ष लागत नव्हते. तो अधून मधून दादा व आई येण्याच्या वाटेकडे बघायचा. नुकताच खेळण्यात गुंग झाला असताना त्याच्या कानी खाकरण्याचा आवाज आला. तसा तो आनंदित झाला. तो खाकरण्याचा आवाज त्याच्या दादांचा होता. याचा अर्थ दादा व आई आले आहेत. त्याची आई शेवंताबाईने जळणाची मोळी पडवीत ठेवून ती घरात गेली. त्याचे वडील तुकारामने गाय दावणीला बांधली. घराच्या कोपऱ्यावर असलेल्या दगडी शिळेवर त्यांनी हातपाय धुऊन झाल्यावर तो घरात गेला. त्यानंतर त्याने देवाच्या तसबीरीपुढे अगरबत्ती लावून फुले वाहिली. सूर्य अस्ताला चालला होता. मावळतीला केशरी रंगाचा सडा पडला होता. हळुहळू झांजड पडू लागली होती. रातकिड्यांची 'किर ss किर ss' सुरू झाली होती. भाकरी थापण्याचा आवाज कानावर पडत होता. शेवंताबाईने सुद्धा स्वायपाकाला सुरुवात केली होती. तुकारामची देवपूजा आटोपल्यानंतर कुलदीपने निबंधाच्या पुस्तकाचा सर्वत्र शोध घेऊनही अध्याप ते सापडले नव्हते. केवळ ती खुंटीला अडकवलेली पिशवी खूप जड असल्यामुळे तीच तेवढी बघायची राहिली असल्याचे त्याने तुकारामला सांगितले.

कुलदीप तुकारामला म्हणाला, "दादा, तिवडी पिशवी काडून द्या की." तुकाराम हसत हसत त्याला म्हणाला, "हत्तिच्या मारी एवड्यासाठी माजी वाट बगत हुतास, व्हय!" बोलत असतानाच त्याने बंधाला धरून ती पिशवी खाली काढताना त्याच्यातून टूनकण उडी मारून उंदीर बाहेर पडला. त्या पिशवीचा खूप घाणेरडा वास येत होता. त्यातून बारीक आवाजही येत होता. त्यामुळे कशाचा आवाज आहे हे पाहण्यासाठी त्याने पिशवीचे तोंड वासले, त्यानंतर त्याने ती पिशवी कंदिलाजवळ नेली. तेव्हा त्यात त्याला उंदराची पिल्ली दिसली. अतिशय कोमल, नाजुक, लुसलुशीत मांसाचे गोळेच जणू वळवळत होते. काळीज कातरणारा 'चिऊ ss चिऊ ss' असा मंद आवाज घराच्या उतरत्या वास्यावरुन येत असल्याचे तुकारामच्या लक्षात आले. त्या आवाजाच्या दिशेने त्याने पाहिले तेव्हा मगाशी पिशवीतून बाहेर पडलेला उंदीर नव्हता तर...... ती उंदरिण होती. राधाबाई तिच्याकडे पाहात म्हणाली, "अरे तुका, ती उंदरिण बग, तिच्या पिल्लासाठी तिचा जीव कसा तुटतोय ते! कुलदीप, बग बग वास्यावरुन कशी मागंफुडं करतीया, बगा रं तिची तळमळ!" त्या उंदरिणीच्या मनात विचारांचे द्वंद चालू झाले असावे, ह्या महाकाय राक्षसांच्या तावडीतून मी माझ्या पिल्लांना कशी वाचवू? सर्वांनी त्यांना घेरलेय. तिचे डोळे पान्हवले होते. एक आईच दुसऱ्या आईच्या यातना समजू शकते. राधाबाई सर्वांना उद्देशून म्हणाली, "लांब व्हा त्या पिशवी जवळून तिला तिची पिल्ले घेऊन जाऊ द्या." तेव्हा तुकाराम तिला म्हणाला, "कशाला लांब व्हायचं! ती हितून न्हिल आन परत कुठल्या तरी कुडात ठिवल. तवा म्या फिकून यितू उकींरड्यात." असे म्हणत तुकारामने त्या पुस्तकाला हळूच हात लवताच ती उंदरिण पुन्हा

जिवाच्या आकांताने जोर जोराने 'चिऊss चिऊss!' ओरडू लागली. आता आपल्या पिल्लांची काय धडगत नाही. त्यांचा जीव धोक्यात आहे हे पाहून ती वास्यावरुन मेढीवर आणि पुन्हा मेढीवरुन वास्यावर अशी सारखी खालीवर करु लागली. मेढीवरुन खाली यायचा प्रयत्न करत होती पण भीतीने पुन्हा वर जात होती. तिच्या डोळ्यात करुणा दाटली होती. पण भीतियुक्त काळजी देखील स्पष्ट दिसत होती. जगातल्या प्रत्येक मातेला निसर्गत: स्वत:च्या अपत्त्याबद्दल अतीव प्रेम असतेच आणि त्या प्रेमातूनच काळजी वाटत असते. मग ती आई पक्षातील असो, प्राण्यातील असो वा माणसातील असो तिची माया एक सारखीच असते. आपल्या पिल्लाच्या रक्षणासाठी ती जीवाचे रान करते. त्या उंदरिणीची घालमेल पाहून राधाबाई तुकारामवर ओरडलीच. त्याला म्हणाली, "तू हुतू का न्हाय् बाजूला तिथून, तिला घेऊन जाऊ दे तिची पिल्लं. आरं, जसा तू माजा जीव हाईस आन ह्यो कुलदीप तूजा जीव हाय तशीच हि पिल्लंबी तिचा जीव हायती. तुका, तिचा सराप घिव नग रं!" राधाबाईच्या बोलण्यातील तळमळ तुकारामला कळली. आणि लगेच तो त्या पिशवीपासून दूर झाला. अजस्त्र माणसे दूर झाल्याचे पाहून त्या उंदरिणीचा जीव भांड्यात पडला. तिला माणसाची भाषा जरी कळत नसली तरी शारीरिक भाषेने तिला समजले असावे की तिला पिल्ले नेण्यासाठी वाट मोकळी केलेय ते. त्यामुळे तिने क्षणाचाही विलंब न करता एक एक करत तोंडात पिल्लांना धरून नेऊ लागली. बघता बघता काही क्षणातच तिने सारी पिल्ले सुरक्षित ठिकाणी घेऊन गेली.

उंदरिणीने सर्व पिल्लांना घेऊन गेल्याची खात्री केल्यानंतर तुकारामने ते पुस्तक उचलले, तेव्हा त्याच्या लक्षात आले की पुस्तकाची काही पाने कुरतडून भुगा केला गेला होता आणि त्याचा वापर पिल्लांसाठी गालीचा सारखा केला होता. तिने त्यावर पिल्लांना जन्म देऊन त्यांना वाढवत होती. आता मात्र त्या गालीच्यावर उंदराच्या लेंढ्या दिसत होत्या. त्याचाच घाणेरडा वास येत होता. तुकारामने नाकाला उपरण लावून ते पुस्तक उकींरड्यावर टाकायला निघाला तेव्हा कुलदीप त्याला म्हणाला, "दादा, तेच्यावरची घाण तिवडी टाकून पुस्तक परत आणा." मुलाने सांगितल्याप्रमाणे त्याने त्या पुस्तकावरील घाण उकींरड्यावर साफ करून ते कुलदीपच्या हातात दिले. ते अर्धवट कुरतडलेले पुस्तक नीट पाहिल्यानंतर त्याच्या लक्षात आले, जे इंग्रजी निबंधमालाचे पुस्तक तो शोधत होता ते हेच आहे. त्याचा चेहरा आनंदाने खुलला होता. उंदरिणीने ते कुरतडल्यामुळे त्याचे मुखपृष्ठ, अनुक्रमणिका, आणि सुरवातीचे दोन निबंध गायब झाले होते. अर्धवट राहिलेल्या पानावर 'द मदर' हा निबंध असल्याचे त्याच्या शीर्षकातील शिल्लक राहिलेला इंग्रजी मदर उच्चार असलेल्या शब्दापैकी उरलेला 'मद' शब्द आणि त्याखाली दिसत असलेल्या निबंधाच्या वाक्यांवरून स्पष्ट झाले होते. कुरतडलेले पुस्तक पाहून तुकाराम कमालीचा चिडला होता. त्याला मुलाचे झालेले नुकसान सहण झाले नाही. तो लालेलाल होऊन उंदरिणीला शिव्या हासडत होता. आणि स्वत:शीच पुटपुटत होता, 'तिला काय आमचंच घर दिसलं का पिल्लं काडायला!' त्याला शांत करत त्याची पत्नी शेवंताबाई त्याला म्हणाली, "हरेक मातेला फकस्त एवडच कळतं की आपल्या पिल्लांना कसलाच धोका असायला नको. त्यांना सुखरूपपणे जन्म देता आला पाहिजी आणि त्याचा सांभाळ विनासायास करता आला पाहिजी. त्यामुळेच उंदरिणीनं सापाच्या भ्यामुळे आशी घरातनं पिल्ली काडल्यात. जाऊ द्या, नका दिव तिला शिव्या. उलट म्हणा, तिची पिल्लं सुखरूप राहू दी. तेच्यामुळं आपल्या पोराला तिचा आशीर्वादच लाभंल." असे म्हणत शेवंताबाई कुलदीपच्या डोक्यावरून मायेने हात फिरवून त्याच्या गालाचे मुके घेतले. तिच्या बोलण्याने तुकाराम शांत झाला होता. तेवढ्यात तुकारामचा बालपणीचा मित्र अरुणकाका तेथे आला. अरुण उच्च शिक्षण घेऊन महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास खात्यात मोठा अधिकारी होता. गावी आल्यावर तुकारामला भेटल्याशिवाय तो जात नसे. आजही तो त्यासाठीच आला होता. कुलदीपचा उदास चेहरा पाहून तो त्याला म्हणाला, "अरे कुलदीप, तू उदास का आहेस?" त्यावर तो उत्तरला, "आम्हाला इंग्रजीच्या सरांनी 'द मदर' या विषयावर निबंध लिहून आणायला सांगितलाय. माझ्या इंग्रजी निबंधमालाचे पुस्तक उंदरानं कुरतडलंय. म्या कसा लिहू निबंध? तेच्यामुळं मला काळजी वाटतीय. तुमी मला त्यासाठी मदत कराल का?" अरुणकाका त्याला म्हणाला, "अरे कुलदीप बेटा, द मदर हा निबंध तुझ्यासमोर प्रत्यक्ष जीवंतपणे अवतरला आहे, त्याचा तू अनुभव घेतला आहेस. अरे, चुकलेल्या वासराला हंबरत शोधणारी गाय! आपल्या दातात धरून इकडून तिकडे, तिकडून इकडे झाडावरून फळ शोधत फिरणारी माकडीन! चोचीत चोच घालून आपल्या पिल्लांना अन्न भरवणारी पक्षीण! बेटा, दुसऱ्याने लिहिलेले निबंध आपल्यासाठी निर्जीव, कृत्रिम असल्यासारखेच असतात. स्वानुभावातून, हृदयाला भिडलेल्या भावना जेव्हा तू शब्दबद्ध करशील तेव्हा तुझा निबंध नक्कीच पैकीच्या पैकी मार्क्स मिळवून देईल." त्यावर तो त्यांना म्हणाला, "काका, आता मला द मदर या विषयावर निदान मराठीत तरी निबंध लिहायला पुस्तकाची गरज भासणार नाही. पण इंग्रजीत कसा लिहू?' त्याच्या पाठीवरून हात फिरवत त्याला म्हणाला, "तू मराठीत त्या विषयावर निबंध लिही. मग मी त्याचे इंग्रजीत भाषांतर करून देईन. पण तरीही मराठीत तो लिहून झाल्यावर इंग्रजी भाषेत तू त्याची छोटी छोटी वाक्ये तयार कर. जमेल तुला हळुहळू इंग्रजीसुद्धा!" अरुणने कुलदीपच्या मनात गाढा आत्मविश्वास निर्माण केला होता. अरुणकाका प्रती कृतज्ञता व्यक्त करताना कुलदीपच्या डोळ्यातून नकळतपणे आनंदाश्रू टपकत होते.

**श्री. बाळासाहेब झोडगे./ठाणे**
**मो. 9870794958**

# ऐश्वर्या..



सावरगावच्या पारावर शेतीची कामे व गुराढोराना वैरण पाणी करुन आल्यानंतर गावातली पोरं, तरुण, मध्मम वयातले, आबालवृद्ध माणसं पारावर बसून शिळोप्याच्या गप्पां टप्पांचा विषय म्हणजे शेतीवाडीतील गाव गावस्कीच्या, तसेच गावात घडणाऱ्या घटनांच्या गप्पा रंगात यायच्या, त्या कान देऊन ऐकण्यात और मजा असायची, या गोष्टी सांगणारी व्यक्ती कसा रंग भरेल हे लक्ष वेधून घेत, त्याची सांगण्याची लकब फारच छान असायची, त्यावेळी आमच वय जास्त लहानही नव्हतं वा फार मोठेही नव्हते, बऱ्यापैकी समजण्या इतपत नक्कीच होते, त्यापैकी एक बाज्याच्या बा ची आहे ती अशी.

बाज्याच्या बा तसा लहानपणापासून टारगट कुणाच्याही खोडी काढण, टिंगल टवाळी करण हा आवडता छंद, मग समोर कोणीही असो, गुराढोराना चारायला घेऊन गेला तर, रस्त्यावरुन येणाऱ्या जाणाऱ्या पावण रावळ्याकडे गेलेल्या पोरीटोरींची दोस्तासंग टिंगलटवाळी करायचा, शाळेत गेला तरी मास्तरांची, शाळेतल्या पोरींची टिंगलटवाळीची त्याला सवयचं लागून राहिलेली होती, जसं पोरगं मोठं होईल तसं खोडगुणात वाढ झाली पण फरक पडला नाही, त्याला एकप्रकारे सवयंच लागलेली, या साऱ्या कागाळ्या नाऱ्याच्या म्हणजेच बाज्याच्या बा चं शाळेतनं नांव काढायचं अस मनातनं ठरवलं होत पण, शाळेतनं नांव काढायला मास्तर तयार नव्हते, कारण बाज्याचा बा अभ्यासात हुशार व्हता,आढे वेढे घेत कसे तरी दोन तीन वर्षे शाळेला जात होता, त्याच्या कागाळ्यानी बाज्याचा आजा आंबून गेला व्हता, शेवटीं त्याच नांव शाळेतून काढलं, आणि त्याला पाच सहा शेरडं व दोन म्हैशी घेऊन दिल्या, घराच्या बाजूला एक शेड उभारले होते, पहीली दोन जनावरे होती, या सर्व जनावरांची उगानिगा बाज्याचा बा चांगली करत होता, एकट्याला भिती वाटते म्हणून एक दोन मित्र सोबत घेण्याची मुभा बाज्याच्या आजाने दिल्याने, स्वारी एकदमच खुषीत होती, कारण बरेच शौक बाज्याच्या बा ला पुरे करता येणार होते.

बरेच दिवस शांततेत जात होते, रात्रीचं चोरुन तमाशाला जातो, त्याचा काही एवढा बभ्रा नव्हताच, पाच सहा शेरडांची, सात आठ शेरड झाली कामगीरी चोख पार पाडली जात होती, दही दुभतं भरपूर प्रमाणात होत, मनासारखे सर्व घडत होतं, त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष केले जात होते, एवढही दुर्लक्ष नव्हतं की पोरगं वाया जाईल असे नव्हते, याचीही काळजी घेतली जात होती, त्यामुळे अधूनमधून बाज्याच्या आजाच लक्ष होतं, काही वेळेस काही गोष्टी कडे दुर्लक्ष करुन चालत असते, पण काही वेळा कानावर पडत असलेल्या गोष्टी पडताळून पाहिल्या जात होत्या, असेच दिवस जात होते, बाज्याच्या बा ला कुठल्या गावात तमाशा आहे, याची पुरेपूर माहिती होती, त्यामुळे मित्रा बरोबर रात्रभर तमाशा बघून पहाटे पहाटे येवून, छान पैकी झोपी जायचे, सकाळी उठून नित्य नियमाने जनावारांचा गोठा साफसफाई करण्यासाठी व दुध काढण्यासाठी बाज्याची आजी येत होती, कधी कधी बाज्याचा बा शेडाचे दार उघडले नसायचे, हाका मारुन, हाका मारुन दार उघडलं जायचे, असू देत पोराला झोप लागली असेल, जावू दे, अशी बाज्याच्या आजीची धारणा असायची, पण बाज्याच्या आजाला मात्र संशय यायचा, हे रात्री तमाशा बघून आलं असणार, म्हणूनच झोपलं असलं अजून, हेच्यावर लक्ष्य ठेवायला पायजे, असे बाज्याच्या आजाच्या मनाने हेरले, व त्याप्रमाणे लक्ष द्यायला सुरुवात केली, याची जाणीव बाज्याच्या बा ला झाली, त्यामुळे थोडे दिवस तमाशा बघायला जायचा कारेकरम तकोप ठेवला.

काही दिवस तमाशाला जायचे बाज्याच्या बा ने टाळले होते, पण चार-पाच दिवसा आड तो तमाशाला जात होता,लागलेल्या सवयी सहसा मोडल्या वा विसरल्या जात नाहीत, बाज्याच्या बा ची चालबाजी होती, पणं बाज्याच्या आजाने बरेच पावसाळे बघितले होते, बाज्याचा आजा त्यांच्या हालचालींवर लक्ष देवून होतांच, वरील नाटक बाजीही लक्षात घेऊन, सर्व गोष्टींचा अंदाज घेऊन योग्य ती पावले उचलायची होती, त्यांचं तमाशाला जाणे सुरु झाले, एकदिवस अशी पाळत ठेवून, बाज्याचा बाप शेडाच्या दरवाजाला कुलुप लावुन गेल्याचा बाज्याच्या आजाला आवाज आला, आज ही पोरं तमाशाला गेल्याचे लक्षात आले, हिच संधी साधून शेडाच्या दरवाजाची दुसऱ्या चावीने कुलुप काढले, आणि बाज्याच्या आजाने मागच्याच दरवाजाने जावून, पुढील दरवाजास कुलुप लावले व पुन्हा मागच्या दरवाजाने येवून, कंदीलाची वात बारीक करुन, बाज्याच्या बाच्या अंथरुणावर येवून आजा अंगावर घोंगडी पांघरुन झोपी गेले, इकडे बाज्याचा बा तमाशा बघून साधारण तीन ते चार वाजता आले, कंदीलाची वात मोठी करुन आपण आपल्या अंथरुणावर झोपी जाण्यासाठी गेला असता, बाज्याच्या अंथरुणावर कोणी तरी अगोदरच झोपल्याचे दिसून आले, तशी या सर्वांची घाबरगुंडी उडाली, तीच संधी साधून बाज्याच्या आजाने अंगावरील घोंगडी काढून बाज्याच्या बा च्या पाठीवर काठीचा रमाटा दिला, तसे पोरं सैरावैरा पळत सुटली, बाज्याचा बा पुढे व मागे आजा काठी घेऊन मागे लागले होते, सगळ्या शिवारात

पोरं सैरावैरा रस्ता दिसेल तिकडे सैरावैरा पळू लागली, आजासुध्दा त्यांच्या मागे धावून धावून दमला व मागे घरी परत आला, झाला प्रकार सर्वांना समजला, मुलं सकाळ पर्यंत घरी न आल्याने सर्वांचीच चिंता वाढली, रात्रभर पोरं जंगल झाडीत, कडे कपारीत लपून बसलेले होती, कुणालाही घरी जावे असे वाटत नव्हते, म्हणूनच सर्व त्याना शोधून आणण्यासाठी बाहेर पडले, पण शोधत असताना मुलं दिसली पण, माराच्या भितीनं जीवाच्या आकांताने पळत सुटायचे, पण शोधायला आलेल्या सर्वांनी सांगीतले की, आम्ही तुम्हाला माफ केलेले आहे, कोणीही तुम्हाला मारहाण करणार नाही, घरी परत या, अशी इच्छा व्यक्त केली, हे ऐकून मुलं घाबरत घाबरत घरी परतली.

बाज्याचा आजा व आजी चिंतेत होती, पोरग्याच वय झालंय, त्याच्या लग्नाचा विचार चालू केला, आता त्याला लग्नाच्या बेडीत अडकवून टाकणे हितावह ठरेल, अशी त्यांची धारणा झाली, त्यानंतर त्यांनी मुली बघण्यासाठी सुरुवात केली, मे व जुन महिना असल्याने मुली बघण्यासाठी सुरुवात केली, तुळशीच्या लग्नानंतर बाज्याच्या बा च लग्न लावून जबाबदारीतून मुक्त व्हावयाचे, बघता बघता, मामनोलीच्या रामा बावलेकराची मुलगी सुशीला नाकी डोळी छान, थोडी शाळा शिकलेली, शेतीवाडीतील तिला माहीती असल्याचे माहीत होते, कारण बाज्याच्या आजीच माहेर सरळांबे व ती मुलगी तिच्या नात्यातील होती, त्यांच्या घरी येणं जाणं होतं, बाज्याच्या बा ला म्हणजेच नारायणला शोभेशी होती, रितीरिवाजा प्रमाणे येणे जाणे झाले, ठराव करुन एकदा लग्न लावून दिले, आणि बाज्याच्या बा ला लग्नाच्या बेडीत अडकवून टाकला. बाज्याच्या बा चा तमाशाचा नाद सुटला, व शेतीवाडीत, गुराढोरावर लक्ष देवून, तन मन धनाने संसारात रमून गेला आणि मित्रांनाही विसरला, बाज्याची आई सुशीला ही मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावाची असल्याने, बाज्याचा बा संसारात गुंतुन गेला, एक-दोन वर्षात बाज्याचा जन्म झाला, पुढच्या दोन वर्षात बाज्याची बहीण वत्सलेचा जन्म झाला, बाज्याचा बा परपंरज्यात रुळत चालला, पुढच्याच दोन-तीन वर्षांत सर्जेराव या छोट्या भावाचा जन्म झाला, कुटुंबाची जबाबदारी संपूर्णपणे वाढत चालली, आणि त्यातच आमचा हा बाज्याचा बा पुरेसा गुरफटून गेला.

असेच वर्षानुवर्षे चालत राहिले, मुलांची शिक्षण होत राहिली, बाज्याच्या बा ला आईला एकत्र कुठेही जाता येत नव्हते, कारण दुभती जनावरे, दोघांपैकी एकाला जनावरांच्या धारी काढायला लागायच्या ते दुध डेअरी मध्ये नेवून घालावयाचे, जनावरांना वैरण पाणी, त्यांची निगा राखणे, गोठा साफसफाई इत्यादी कामे करावी लागत होती, हौस मौज करावयाला गावची व आजूबाजूच्या परिसरातील जत्रा यात्रेला जाण येण व्हायचे, पण दोन चार तासांसाठी असायचे, मुलं मोठी होत गेली, आमच्या बाज्याच शिक्षण मॅट्रीक पर्यंत झाले, असा कामाचा व्याप वाढत गेल्याने, मदतीला कोणी तरी असावं असं वाटायला लागलं, म्हणून बाज्याच शिक्षण मॅट्रीक पर्यंत शिकून सोडावं लागलं, त्यामुळे बाज्याच्या बा ला थोडी मोकळीक मिळून थोडी उसंत मिळाली, पणं बाज्याच्या आईला थोडीही उसंत मिळत नव्हती, बाज्या आपल्या आईला मदत करायचा, विहीरीत/ नदी मधून पाणी आणून देणे, सरपणासाठी लाकूड फाटा शेतातून आणने ईत्यादी कामे, पण ती पुरेशी नव्हती, त्यामुळे बाज्याच्या लग्नाचा विचार चालू झाला, त्याला दुसरेही कारण की, बाज्याच्या आजा आजीलाही नातवाच लग्न पहायचे होते.

बाज्याच्या लग्नाचा विचार चालू झाल्या पासून पावण्या रावळ्याच्या ओळखीने मुली पहाण्यासाठी सगळीकडे चौकशा चालू झाल्या, अशाच एका दिवशी झुल्फेवाडीचे पावणे बाज्याला व घर बघण्यासाठी आले, तसे ते लांबच्या पावण्यातील लांबचे पावणे, तसे मुलगी बघण्यासाठी पावण्यानी बोलवल्या प्रमाणे झुल्फेवाडीला गेले, दोन्ही कडच्या पसंती नुसार नियमाप्रमाणे ठराव अरावं झाले. लग्नाची तारीख ठरली, बाज्याच्या बा च्या लग्नानंतर बाज्याच लग्न एकदम धुमधडाक्यात झाले, ते बाज्याच्या आजा आजीने पाहिले, त्याना फार फार आनंद झाला. बाज्याचा बा ला, बाज्या शेतातील कामे व गुराढोरांची उगानिगा करत असल्याने, बाज्याचा बा ला थोडी कामातनं उसंत मिळाली होती, बाज्याचं लग्न झाल्यानंतर बाज्यावर जबाबदारी सोपवून, त्याना मोकळं मोकळं रहायची सवयच लागली.

मोकळ्यापणीचे उद्योग म्हणजेच मासीक वाचण्यात मन रमवू लागला, मासिकात छापून आलेली लेख वाचता वाचता, सोनेरी दुनिया फिल्म सिटीच्या नट नट्यांची माहिती व फोटो पहात रहाण्याचा खुळा नाद लागला. बाज्याच्या आईला थोडी उसंत मिळत असल्याने, बाज्याच्या बा च्या खोलीत जावून बसायची, तेव्हा तिच्या हि गोष्ट लक्षात आली होती, पण चेष्टा मस्करीत म्हणायची, म्हातारपणी हे काय ध्यान, तर बाज्याचा बा म्हणायचा या नट्या कशा देखण्या हाईत तशी तू हाईस काय, बाज्याची आई म्हणायची एवढंच काम मला न्हवतं, शेतातली कामं, गुराढोरांच शान घान काढून, शेणी कुणी थापल्या, हंडा घागरीनं विहीर, ओढ्याच पाणी व जेवाण कुणी केलं, धुणी धुतली, भांडी घासली, सकाळी पहाटचं उठल्यापास्न सगळ्या दिवसभर शेतातली कामं करुन, संध्याकाळी घराकडे आल्यावर गोठ्यातील शान घान जेवाण खावान करुन, धरणीवर आंग टेकायला मध्यान व्हायची, होती कुठं सवड सांगा बरं, असं बोलल्यावर सगळं मस्करीत गणले जायचं.

असेच दिवसेंदिवस वेड वाढतच होते, बाज्याचा बाप मासिकातले नट नट्यांचे फोटो कात्रीने कापून ते भिंतीवर चिटकवून, पुर्ण भिंत फोटोंनी भरल्याचे वाटत होते, एक वेळेस वयात आलेला कॉलेज कुमाराचीच

खोली असल्याचे भासत होते, पण प्रत्यक्षात ५०-५५ वर्षाच्या वयाच्या माणसाच्या खोलीतील हे दृश्य पाहून बाज्याच्या बा आताच वयात आल्याचे वाटत होते, हे नेहमीच दृश्य पाहून तिच्या मनाची घालमेल होत होती, या वयात म्हातार चळ लागलंय, किती वेळा बाज्याच्या बा ला,बाज्याच्या आईने बोलूनही काय उपयोग होत नव्हता, कारण घरात नवीनच सुन आली आहे हे कसं काय ह्यान्नी समजत नाही, सुनेला कसे वाटेल, हा सर्व प्रकार पाहून बाज्याच्या आईचे जेवणा खाण्यावरच लक्ष उडाले व विचारात सतत गर्क रहायची. हे सर्व बाज्याच्या व बाज्याच्या बायकोच्याही लक्षात आले, ते दोघेही तिची सर्वतोपरी काळजी घेत होते.

बाज्याच्या लग्नाचा विचार चालू झाल्या पासून पावण्या रावळ्याच्या ओळखीने मुली पहाण्यासाठी सगळीकडे चौकशा चालू झाल्या, अशाच एका दिवशी झुल्फेवाडीचे पावणे बाज्याला व घर बघण्यासाठी आले, तसे ते लांबच्या पावण्यातील लांबचे पावणे, तसे मुलगी बघण्यासाठी पावण्यानी बोलवल्या प्रमाणे झुल्फेवाडीला गेले, दोन्ही कडच्या पसंती नुसार नियमाप्रमाणे ठराव अरावं झाले. लग्नाची तारीख ठरली, बाज्याच्या बा च्या लग्नानंतर बाज्याच लग्न एकदम धुमधडाक्यात झाले, ते बाज्याच्या आजा आजीने पाहिले, त्याना फार फार आनंद झाला. बाज्याचा बा ला, बाज्या शेतातील कामे व गुराढोरांची उगानिगा करत असल्याने, बाज्याचा बा ला थोडी कामातनं उसंत मिळाली होती, बाज्याचं लग्न झाल्यानंतर बाज्यावर जबाबदारी सोपवून, त्याना मोकळं मोकळं रहायची सवयच लागली.

मोकळ्यापणीचे उद्योग म्हणजेच मासीक वाचण्यात मन रमवू लागला, मासिकात छापून आलेली लेख वाचता वाचता, सोनेरी दुनिया फिल्म सिटीच्या नट नट्यांची माहिती व फोटो पहात रहाण्याचा खुळा नाद लागला. बाज्याच्या आईला थोडी उसंत मिळत असल्याने, बाज्याच्या बा च्या खोलीत जावून बसायची, तेव्हा तिच्या हि गोष्ट लक्षात आली होती, पण चेष्टा मस्करीत म्हणायची, म्हातारपणी हे काय ध्यान, तर बाज्याचा बा म्हणायचा या नट्या कशा देखण्या हाईत तशी तू हाईस काय, बाज्याची आई म्हणायची एवढंच काम मला न्हवतं, शेतातली कामं, गुराढोरांच शान घान काढून, शेणी कुणी थापल्या, हंडा घागरीनं विहीर, ओढ्याच पाणी व जेवाण कुणी केलं, धुणी धुतली, भांडी घासली, सकाळी पहाटचं उठल्यापासून सगळ्या दिवसभर शेतातली कामं करून, संध्याकाळी घराकडे आल्यावर गोठ्यातील शान घान जेवाण खावान करून, धरणीवर आंग टेकायला मध्यान व्हायची, होती कुठं सवड सांगा बरं, असं बोलल्यावर सगळं मस्करीत गणले जायचं.

असेच दिवसेंदिवस वेड वाढतच होते, बाज्याचा बाप मासिकातले नट नट्यांचे फोटो कात्रीने कापून ते भिंतीवर चिटकवून, पुर्ण भिंत फोटोंनी भरल्याचे वाटत होते, एक वेळेस वयात आलेला कॉलेज कुमाराचीच

खोली असल्याचे भासत होते, पण प्रत्यक्षात ५०-५५ वर्षाच्या वयाच्या माणसाच्या खोलीतील हे दृश्य पाहून बाज्याच्या बा आताच वयात आल्याचे वाटत होते, हे नेहमीच दृश्य पाहून तिच्या मनाची घालमेल होत होती, या वयात म्हातार चळ लागलंय, किती वेळा बाज्याच्या बा ला,बाज्याच्या आईने बोलूनही काय उपयोग होत नव्हता, कारण घरात नवीनच सुन आली आहे हे कसं काय ह्यान्नी समजत नाही, सुनेला कसे वाटेल, हा सर्व प्रकार पाहून बाज्याच्या आईचे जेवणा खाण्यावरच लक्ष उडाले व विचारात सतत गर्क रहायची. हे सर्व बाज्याच्या व बाज्याच्या बायकोच्याही लक्षात आले, ते दोघेही तिची सर्वतोपरी काळजी घेत होते.

बाज्याच्या आईच विचार करून डोस्क फिरायची पाळी आली, म्हणून तिने शेताकडे जायचं ठरीवलं, हातात खूरप घेऊन ती शेताकडे जायला निघाल्याचे घरात सांगितले. शेतात गेल्या नंतर मोकळ्या हवेतून बरे वाटले, पण शेतातील कामात तिचं मन रमत नव्हते, शेतात इकडेतिकडे फिरत ती आंब्याच्या झाडाखाली बसून विचार करत राहीली, आंब्याच झाडही रस्त्याच्या बाजूला होते, त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांची रहदारी होती, असं येणाऱ्या जाणाऱ्या कडे पहाता पहाताच डोक्यात विचारचक्र चालू होते, अचानक तिचं लक्ष एका मध्यम वयाच्या बाईकडे वेधलं गेलं, आणि असा विचार डोक्यात आला की, माझ्या पक्षी दहा अकरा वर्षांनी ल्हान असलं, उच्च टाचच चप्पल घालून, क्यास बारीक केलंय, झ्याक दिसतीया जर आपूनबी असं केल तर, चांगलं दिसल, पण आपूनबी नाकी डोळी छान हायच की, पण सर्रकन डोस्क्यात ईचार आला की, लोक काय म्हणतीलं, हिला काय म्हातारचळ लागली की काय, आणि तो ईचार माग पडायचा, पण तिचं मन काय हे सगळं मानायला तयार नाही, ईचार करता करता, सांज व्हायला आली, शेवटी बाज्याची आई सुशीलाने मनाशी पक्का इचार केला की, लोकं काय बी म्हणूद्यात माझं म्याच बदलायला पायजे, असा ईचार करुन बाज्याची आई शेतातनं घरला जायला निघाली. आणि डोस्क्यात एक ईचार चालू झाला की, ती बाई सारं आपूनबी बदलून दावायचं, हाच पक्का इचार मनाशी चालू झाला, इथं राहूनबी बदलाय व्हणार नाही, तवा शेरात जायला पायजे, आपण खेड्यातली शेरात आपलं जवळचं कोणबी नाही, त्याकरता पैसा पायजे, तेची जुळवाजुळव कराय पायजे, असं इचार चक्र सुरु झाले.

असं विचार करता करता दिवस जात होते, बाज्याच्या आईचा शहरात जायचा पक्का विचार झाल्याने पैशाची जमवाजमव सुरु केली, तिने घर खर्च भागवून काही शिल्लक ब्याच ठिकाणी ठेवली होती, ती शोधाशोध सुरु असताना, गाडग, मडक, लाकडी पेटी इत्यादी ठिकठिकाणची मिळून जवळपास चार ते पाच हजार रुपये जमा दिसले, सदरची कामे एकदम सावधानता बाळगून म्हणजे साफसफाईचे काम करत आहे असे भासवून केली, पण घरच्यांना एवढेच समाधान की तीचं

मन कुठे तरी गुंतवून ठेवले आहे.

आषाढ संपून श्रावण महिना सुरू झाला तिने मनाशी गाठ बांधली होती की, रक्षाबंधनाला तिचा भाऊ शंकर येणार, त्यावेळी हि गोष्ट त्याला सांगून आपल्या माह्यारचा कोण माणूस शेरात आसंल तर इचारुन बघूया. दिवस असे जात होते, नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाचा दिवस उजाडला बाज्याच्या आई भाऊ कधी येईल, याची वाट पाहत होती, दुपारनंतर तो आला, रक्षाबंधनाचा कार्यक्रम झाला, शंकरणे बहीणी साठी छान पैकी लुगडं आणलं होतं, पण बाज्याच्या आईने मला लुगड नको, मी १५ ते २० दिसांनी गावाला येईन तवा मी काय तरी तुझ्या कडून मागून घेइन, ही साडी वयनीला दे, माझा काय बी राग न्हाई, आक्का काय म्हंतीस जवा गावाला येशील तवा तु मागशील ते दिन की, पर मानाची साडी घे, भावाला गोड धोड केलेलं जेवायला घातलं, मग म्हणाली चल जरा शेताकडे जावून येवूया.

असं म्हणून बहीण भावंड शेताकडे गेली, शेताचा कडकोना बघून झाल्यावर भाऊ म्हणाला, आक्का खालच्या टपण्यात कोपऱ्यातलं भात लचलयं चिकोल कोळपा करुन घे, म्हंजे त्ये चांगलं हुइल, ते सगळं करायचं हाय, आमच्या हेंच शेताकडे लक्ष न्हाई, कामातनं उसंत मिळाल्यापस्न म्हातारचळ लागल्यासारखं नट्यांचे फोटू काय बघत्यात नको ती थ्यारं चालल्यात बग, माझं इचार करुन डोस्क चालना झालंया. मनातली घुसमट आपल्या जीवाभावाच्या माणसाकडं सांगून मन हलकं करायच आहे बघ, म्हणूनशानी तुला सांगतूया बघ, हेच्यातनं काय तरी मारगं निघतोया काय बग. एवढं समजल्यावर शंकर लगेच म्हणाला हेच्यावर जालीम ईलाज करुया की आक्का.. एवढं बोलल्या बरुबर ती म्हणाली असं काय करू नकूस माझ्या नवऱ्याला, असं गयावया कराय लागली, तवा शंकर म्हणाला तसं काय वाईट साईट करणार नाही, समजावून सांगून काय फरक पडतोया काय बघूया, अरं बाबा सगळं सांगून झालंय, तरी परेत्न करुन बग एगदा, असं म्हणून मला सवतालाच हेच्यातनं मारग काढायला पायजे. असं मनाशी तिनं खूण गाठ बांधली. दोघं बहीण भावंडं घराकडे आली, भाऊ आपल्या गावी गेल्यावर कळवतो, काय तो ईचार करून ते, हा भाऊ तुला संकटात मदत करायला तयार आहे, बहीण हो म्हणाली, व आपल्या कामात व्यस्त झाली.

एखाद्याने एक विचार पक्का केला की, विचारांचा पाठलाग करत असतो, तशी आमची ही सुशीला नवऱ्याला वळणावर आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, तदनुसार आपल्याला शहरात जाऊन स्वत:मध्ये अमुलाग्र बदल घडवून आणायचाच, असा दृढनिश्चय मनात घर करून तो कसा तडीस नेता येईल हेच विचार घोळत होते, त्याकरिता लागणाऱ्या आर्थिक परिस्थितीची जाणीव व आपल्या परिवारास कोणत्याही प्रकारची झळ पोहोचणार नाही याची दक्षता घेतच, पैशाची जमवाजमव करूनच आपल्याला, आपल्या भावाकडे गणपती उत्सवाचे निमित्त साधून सहभागी व्हायचे आहे, असं ठरवून भावाला गौरी गणपतीला माहेरी घेऊन जाण्यासाठी शिदोरीसह येण्याचं ठरल त्यालाही एक कारण आहे, शहरात राहिलेले लोक गावाला गौरी गणपतीच्या सणा निमीत्त गावी येत असतात, त्यातील एका बरोबर जाण्याचे नियोजित केलेले असल्याने, हे सर्व काही नियोजनबध्द, गुप्तता पाळूनच कार्य तडीस न्यावयाचे आहे, आणि ते निर्विघ्नपणे पार पाडणे आवश्यकच आहे. मनाशी ही खुणगाठ बांधून तयारी चालू होती, शेतातली बरीच काम पूर्ण झाली असल्याने, घरातील कामा व्यतिरिक्त कामे नव्हती, त्यामुळे बाज्याची आई निवांत होती, भाऊ कधी गौरी गणपती सणाला न्यायला येईल, याचीच वाट पहात होती. बाकी बाज्याच्या बा चे नखरे शांतपणे पाहून वेळीच उत्तर द्यायचे मनाने ठाणले होते. घरातील कामाला सुनेला मदत व इतर किरकोळ कामे करत होती.

होताहोता वेळ जात होता, श्रावण महिना संपत आला होता, भाद्रपद महिना चालू होणार होता गौरी गणपतीला भाऊ माहेरी घेऊन जाण्यासाठी कधी येतोय व शहरात जाण्याचे कसे पार पडते हिच चिंता मनात घोळत होती, मी गौरी गणपती सणाला माहेरी जाणार हे सर्वांना सांगीतले होते, त्यामुळे बाज्याच्या बा ला बाज्याच्या आईची कटकट कमी होईल व आपणास नटनट्यांची मनसोक्त मनमोजी चित्रे बघता येतील हा आनंद बाज्याच्या बा ला झाला होता, बाज्या व बाज्याच्या बायकोला आई माह्यारला गेल्यावर तिच मन मोकळ होईल, हाच विचार त्यांच्या मनात होता., आणि एकदिवस बाज्याचा मामा शंकर, मामनोलीवरुन आपल्या बहिणीला गौरी गणपतीच्या सणाला घेऊन जाण्यासाठी येणार आहे, हे सर्वांना अगोदरच सांगीतले होते, पण बाज्याच्या आईने सण म्हणून जाणारच आणि आराम करण्यासाठी सुध्दा दोन महिने ही राहू शकेन असंही म्हणाली, त्यावेळी बाज्या व बाज्याच्या बायकोला थोडं आश्चर्य वाटले! हे कसं शक्य आहे, कामाची वाघीन अनं ती कशी काय एवढं दिवस आराम करेल, कदापीही शक्य नाही बाज्याला समज आली तशी ती माहेरी एखाद दिवस रहायची आणि परत यावयाची, सतत काम एके काम व्यग्र असायची कधी कंटाळा हा तिच्या डायरीत लिहीलेला नसायचा, मग आई आराम करणार नाहीतर मामाला शेतात मदत करणार हे मात्र निश्चीत होते, पण बाज्याला एकच समाधान की वयोमाना नुसार माणसात थोडा बदल होवू शकतो, हे या पाठीमागील कारण असावे, बाज्याचा बा ला हा वेगळाच आनंद झाला, दोन महीने आपल्याला कटकट नसणार, एवढीच माफक कल्पना त्या मागील होती, बाज्याची बायको थोडी हिरमुसलेली कारण बऱ्याच कामात तिला सासू म्हणजे बाज्याची आई मदत करत होती, तसेच नवीन लग्न होवून जरी तीन

चार महिण्याचा कालावधी गेला असला तरी, बऱ्याच कामाची व गोष्टींची माहिती नव्हती, वडीलधारी माणस थोडी असली तरं थोडा धीर मिळतो, अन् अनुभवाचा फायदा मिळत असतो, हे तिला तिच्या आई वडीलाकडून अशी छान शिकवण होती. ठरल्यानुसार बाज्याच्या आईने दोन महिण्याच्या हिशोबाने, लुगडी चोळी झंपरा सह कपडे अगोदरच बांधून तयारी केली होती, मामाबरोबर घरातल्या सर्वांनी जेवण करुन दुपारच्या तीन वाजताच्या एस.टी. बसने मामनोलीला म्हणजे माहेरी बाज्याची  आई निघाली अन् माहेरी वहीनीने भावाच्या मुलामुलीनी स्वागत केले, व सर्वांना आनंद वाटला.

बाज्याची आई बऱ्याच वर्षानी माहेरी गणपती सणासाठी आलेली असल्याने, एक वेगळाच माहौल तयार झाला होता, गणपतीसाठी भावाने व भाच्यानी वेगळीच अशी आकर्षक आरास केली होती, कुंभाराने दरवर्षा पेक्षा सुबक साड्डूची गणपतीची मुर्ती दिली होती, पहाताना मन हरखून जायचे, "आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहीकडे", अशी वातावरण निर्मीती झाली होती, भिंतीना रंगरगोटी केली होती, त्यामुळे घर एकदम शुशोभित झाले होते, बाज्याच्या आईच्या भावजयीने सुग्रास जेवणाची तयारी केली, ती व बाज्याच्या आईने मिळून गणपतीला आवडते उकडी मोदक, खीर इत्यादी अनेक प्रकार केले होते, आरती वगैरे देवाला नैवैद्य दिला, मंत्रमुग्ध करणार वातावरण होत, त्यामुळे बाज्याची आई व सर्व घरातील मंडळी आनंद घेत होती, हे मात्र वास्तव होतं.

बाज्याच्या आईने आपल्या भावाने सांगितल्यप्रमाणे गणपती उत्सवा नंतर जिल्ह्याच्या ठिकाणी जायचे होते,  त्यामुलाला पहायचे होते, पण हे भावजय व भाच्यानासुध्दा सुगावा द्यायचा नव्हता, त्याप्रमाणे तिचा भाऊ शंकरने तशी योजना व तयारी केली होती, त्यांच्या गावातील रमेश अर्जून्या जिल्ह्याच्या ठिकाणी नोकरी निमीत्त रहात होता, त्याचे नुकतेच मे महिण्यात लगन झाले होते, रितीरिवाजा प्रमाणे नवरी मुलगी गणपती सणानंतरच मुला बरोबरच जाईल, असे ठरले होते, पण नवरी मुलगी बरोबर रम्याची आई जाऊ शकत नव्हती शेतीभातीची कामे अटोपून ती जाणार होती, पण प्रश्न बाज्याच्या मामाने अक्कल हुशारीने सोडवला होता, तर वत्सलाबाई सोबत गेली नाही तर, सुशीला त्याची बहीण मुलगी म्हणून सोबत, दोन महीण्या नंतर वत्सलाबाईनी शेती भातीची कामे आवरल्यानंतर जावे, असं ठरवूनच ठेवले होते, रमेशची ओळख नव्हती, ती बाज्याच्या मामाने घडवून आणली व इंत्यभूत माहिती दिली, याबाबतीत रमेशचे बोलणे झाले होते, रमेशची बायको गणपती सणासाठी पेरनोलीला गेली होती, बाज्याच्या आईने रमेशला सांगीतले की, मी तुझ्या बायकोची माझ्या मुली सारखी काळजी घेईन, अशा अनेक सविस्तर चर्चा झाल्या, गणपती उत्सह उत्साहात पार पडत होता,    बाज्याच्या आईचा "आनंद गगनात मावेत नव्हता " शहरी वातावरणाचा वेगळाच अनुभव मिळणार होता,  गणपती उत्सव आनंदात पार पडला, ठरवल्या प्रमागे रमेशची बायको माहेरहून मामनोलीला आली, रमेशला नोकरीवर जायचे असलेने, रमेश, रमेशची बायको ममता व बाज्याची आई सुशीला एस.टी.ने जिल्ह्याच्या ठिकाणी दोन तासातच पोहोचले, रमेश खोली घेतलेल्या ठिकाणी साफसफाई करुन संसारोयोगी साहित्य ज्या त्या ठिकाणी लावले, त्यात बाज्याच्या आईचा सहभाग मोठा होता, जेवण वगैरे आटोपून साधकबाधक गप्पा गोष्टी होऊन, आणखी दोन दिवस रमेशची सुट्टी शिल्लक होती, त्या नुसार बिज्याच्या आईला बिवटी पार्लर मध्ये पाठवायचे होते ते अगदी जवळपासचेच निवडले होते, त्याना येण जाण सोईच व्हावं, हे महत्वाचे होते, जवळच " रंजना बिवटी पार्लरची " पसंती कारण थोडक्यात खेड्यावरच्या माणसाला परवडेल असं ते ठिकाण होतं, हे सर्व प्रत्यक्षात गाठीभेटी घेऊन, संबधीतास समजवून देवून रमेशने छान नियोजन केले. दुसऱ्या दिवसापासूनच स्वत: पुढाकार घेऊन रमेशने आपूलकीने कार्य पार पाडण्यास सुरुवात झाली.

सदरचे काम हे दोन महिण्यात पुरे करावयाचे असल्याने बाज्याच्या आईने त्याचा मनापासून ध्यास घेतला, सोबतीला ममता व रमेशचे मोलाचे सहकार्य होते, डोक्यावरचे केस बॉबकट करुन, त्याची उगनिगा काळजी, तसेच भाषेत बदल होणे आवश्यक होते, त्यानुसार बिवटी पार्लरवाली निता याना यातील उद्देश समजल्याने तिने सुध्दा मेहनत घ्यायला, ममतेच्या मदतीने हे कार्य चालू होते, महिण्याच्या आतच यात बाज्याच्या आईत बराच बदल झाल्याच दिसून येत होत, बाज्याची आई तशी नाकीडोळी छान होती, ती जुण्यातली सातवी शिकलेली होती, लग्न झाल्यानंतर संसाराच्या रहाट रगाड्यात सर्व विसरुन गेली होती, पण माणसाला कधीतरी अशा गोष्टीतून शिकण्या सारख भरपूर असत, अन् मनापासून ध्यास घेतल्या नंतर त्या आपोआप पार पडत असतात, थोडस् मोडकतोडक का होईना इंग्रजी वेगळ्या टोन मध्ये बोलायला शिकणे फार अशक्यप्राय होते, पण म्हणतात ना " प्रयत्ना अंति परमेश्वर " प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेल ही गळे " तद्वतच ही बाज्याची आई प्रयत्नाची पराकाष्ठा करत होती, त्याला साथ रमेश, ममता अन् बिवटी पार्लरवाली निता त्याना हे एक आव्हान होत ते तडीस न्यावयाचे आहे, निताला यात रस का होता, कारण बाज्याची आई शेतात काम करणारी नऊ वारी लुगड नेसणारी, कधी कधी केसाचा बुचडा व्वा सणसुणीला छानस् लुगड नेसून एक वेणी घालणारी, आता तिचे केस पिकलेले होते, ते काळे करणे, त्यानुसार वागणे बोलणे असे अमुलाग्र बदल घडवून आणावयाचे काम साधे सोपे नाही, हे माहित होते तशी समोरची व्यक्ती बदलास कितपत अनुकुल होते, हे महत्वाचे जिकीरीचेहोते, पण ते काम बाज्याच्या आईने मनपूर्वक मनावर घेतल्याने कमी वेळात जेवढा

बदल करता येईल तेवढे बदल करण्यात ती माहिर झाली होती, व सर्वांना आंचबीत करणारे बदल घडत होते, त्यामुळे सर्वांना वेगळाच हुरुप येत होता, असे हे कार्य पार पडत असताना, बाज्याच्या आईला गावचा व नातेवाईकांचा विसर पडत नव्हता.

यात जास्तीत जास्त आईची आठवण, बाज्याला जास्त येत होती, म्हणून तो आईला दसऱ्याला सणाला घेऊन जाण्यासाठी मामाकडे मामनोलीला आला होता, पण आई कुठे आहे असे विचारता ती आपल्या मामे बहिणेकडे गेल्याचे सांगण्यात आले, व बाज्याचा मामा बाज्याला म्हणाला की मी तिला तुझ्यकडे घेऊन येतो, अस बोलून बाज्याला आपल्या गावाकडे मार्गी लावला, अशा अनेक अडचणी आल्या, पण शंकर मामाने त्या लिलया पार पाडल्याचे दिसून येते, बहिणीला मोलाची साथ देणारा भाऊ अशी त्याची ओळख होत गेली.

ईकडे बाज्याची आई आपल्यात अमुलाग्र घडवून आणत होती, हे कार्य दिवाळीच्या अगोदर तडीस न्यायच होते, तशी सर्वांना कल्पना होती, तसे सर्वजण आपआपल्यापरीने आपले काम चोख बजावत होते, तसे तात्काळ बदल बाज्याच्या आईत घडत असल्याचे दिसून येत होते, आणि सर्वांमध्ये वेगळाच जोश ओंसडून वहात होता, असे बरेच प्रश्न पडत होते पण ते सर्व मनापासून करत असल्याने, ते चुटकी सरशी सुटत होते, हे मात्र खरे आहे. दिवाळी अवघ्या काही दिवसावर आली होती, तशी सुधारणा करण्याची लगबग सुरु होत होती, पंजाबी ड्रेस तत्सम ड्रेस घालून कसे चालावे याचही प्रशिक्षण प्रात्यक्षीक करुन घेतल जात होत अशा अनेक सुसंगत फॅशनेबल कपडे इत्यादीचाही समावेश त्यामध्ये होता, त्यातही बाज्याची आई पारगंत होतहोती, कोणतेही कार्य करत असताना मनापासून व मनलावून, एकाग्रचित्ताने अन् सकारात्मक दृष्टीने विचाराची दिशा असेल तर कोणत्याही कामात, निश्चीतच यश प्राप्ती होतेच होते.

सुशीला म्हणजे बाज्याची आई सर्व बदलाला अनुकुलता दाखवून आपल्यातील बदलाचे तिचे तिलाच अप्रूप वाटत होते, अन् मनातल्या मनात सुखावत होती, वेगळ्याच विश्वात वावरत असल्याच अनुभवत होती, तिला ऐश्वर्या सारख व्हायच असं सुरुवातीला ती म्हणत तसंच ममता व निता त्यानुसारच सर्व पेहराव व इतर अनुषंघिक तयारी करुन घेतली जात होती, तसा हावभाव बोलण चालण यात अमुलाग्र बदल दिसत होते, त्यामुळे सर्वांना केलेल्या कामाच चिज झाल्याच अंतरिक समाधान चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते, जसजसा दिवाळी सण जवळ येत होता तशी सुशीलाला आपल्या गावी जायच होतं, ममताला तिच्या पहिल्या दिवाळ सणाला रमेशसह माहेरी जायच होतं, तशी ती तयारी न कंटाळता परोपरीने पार पाडत होते, या सर्व बिवटीशियनचा दिवस जवळ येत होता, शेवटची तयारी प्रात्यिक्षीक करुन पूर्ण करावयाची होती, ती ज्यादिवशी पार पडली, सर्वच आश्चर्यचकीत व थक्क झाले, सर्वांना केलेल्या मेहनतीच फळ मिळाल्याचे आनंदी वातावरणातून दिसून येत होते, आणि सर्वांनी मामनोलीला जायची तयारी, सुशीलाने जरी नवा पेहराव परिधान केला असला तरी तिने आपल्या नऊ वारी साड्यांचे गाठोडे कुठेही न टाकता सोबत घेतलं, कारण हा पेहराव थोड्याच दिवसाचा आहे हे सर्व ती जाणून होती, तिला बाज्याच्या बा ला सुशीला म्हणजे काय चीज आहे हे दाखवून देण्यासाठीच हे सर्व कराव लागलं, ही समज तिच्या कडे होती, पुन्हा तिला आपल्या नऊ वारी लुगड्यात शेतात जावेच लागणार होते, त्याशिवाय ती स्वस्थ बसून रहाणारी महिला नव्हती, मामनोलीत व सावरगांवात सर्वच जण आपल्याला बघून हसतील, चेष्टा करतील याची फिकीर तिला अजिबात नव्हती, व ते जिल्ह्याच्या ठिकाणीहून एस.टी.ने मामनोलीला आले, एस.टी. उतरल्यावर सर्व सुशीलाकडे टकामका बघू लागले, सर्वांना सुशीला ओळखण मुश्कील झालं होत, सुशीलाचा भाऊ शंकर आ वासून आपल्या बहिणीकडे पहात होता हिच का आपली बहिण सुशीला, शंकरची बायको वत्सला, भाचे आपल्या घरात कोणही नवीन पावणी आली असंच ते भारलेल वातावरण होतं, आज एकदिवस राहून, उद्या तिच्या गावी सासरी जायचे होते, ती एकटी न जाता सोबत भावाला घेऊन जाणार होती, रमेशने या सर्वांची कोंडी फोडली व ही सुशीला आती असल्याचे सांगताच सर्वच आचंबीत झाले, त्या दिवशी गोडधोड करुन दुसऱ्या दिवशी शंकर आपल्या बहिणीला सासरी म्हणजे सावरगावला घेऊन जाणार असे ठरले, दुसऱ्या दिवशी सकाळी साधारण दहाच्या एस.टी.ने सावरगावला निघाले, एक तासानंतर ते सावरगावला पोहोचले, गावच्या पाराजवळ उतरुन बाज्याच्या घरी त्या गल्लीत वळल्यानंतर काही लोकाना हा बाज्याचा मामा शंकरच आहे हे सर्वांना माहित झाले पण, ही बाई कोण सोबत आहे, मात्र कोडच होतं, गावातले काही लोक हे उगाचच चौकसबुध्दीने चालणारे असतात, त्यातील एकाने मनात शंका घेऊन, एका टारगट पोराला पाठलाग करुन खात्री करुन घेण्यासाठी पाठवले, आणि खरोखरच ती दोघेही जण बाज्यांच्या घरात गेल्याच बघीतलं, बाज्याच्या मामाने बाज्याला हाक मारली व बाज्याची बायको मनीषाला व आपल्या भाउजी नारायणाला ही हाक मारली तसे सर्व जण हा नजारा पहातच राहिले, बाज्याला ही आपली आपली आईच असे वाटल, पण कस शक्य आहे, तसेच ज्याच्या करीता सर्व घडत होते ते ही आ वासून पहात राहीले, सुशीला आतापर्यंत गप्प होती फक्त हावभाव करत होती बोलली मात्र नव्हती, हातात पर्स हलवत, उंच टाचेच चप्पल न काढताच सोप्यात उभी मग, नंतर ती म्हणाली ओ हाय हाऊ आर यू आय एम " ऐश्वर्या " असे शब्द उच्चारताच बाज्याचा बा ताडकन उडाला पण ही सुशीलाच आहे, आवाजावरुन ताडले, पण ती सुशीला आपली बायकोच आहे म्हणायचे धाडस त्याला झाले नाही, हे कसं शक्य आहे, अशा प्रश्नांकित

चेहऱ्यान पहातच, आचंबीत होऊन उभा होता, तसेच दोन पाण्याचे तांबे घेऊन बाज्याची बायको हे दृश्य ती पहातच उभी होती,तिला बाज्याच्या मामाला पाय धुण्यासाठी पाणी न देता उभी होती, हे असं काही काळ चालत राहिलं, तेव्हा जास्त न तानता ही कोंडी फोडत, खरं वास्तव काय आहे व हे आपल्या बहिणीला का कराव लागल हे सविस्तर सर्वाना सांगीतली बाज्याचा बाप थोडा नरमला व वातावरण थोडसं निवळलं, दरवाजावर सुगावा घेण्यासाठी आलेला पोरग, बऱ्याच बघ्यांची गर्दी होती ते कान देवून ऐकत होते, त्या सर्वाना वास्तव कळल्यानंतर सर्वच आचंबीत झाले, व सुशीलाची झालेली " ऐश्वर्या " हे बरेच दिवस पारावरच्या चर्चेचा विषय झाला, तरीसुध्दा काही लोक मात्र म्हणत होते की नवऱ्याला वळणावर आणण्यासाठी मनापासून तयारी केली तर त्याना वळणावर आणू शकतात हे मात्र यावरुन सिध्द झाले, म्हणूनच म्हणावे असे वाटते की काम करताना मनापासून सकारात्मक विचार करुनच ते आपल्या यशोशिखरावर पोहचू शकतात.

**श्री. शामराव सुतार**
**पनवेल.**
**मो. ९९२००६१९९१**



# आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि सायबर सुरक्षा



आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) हे आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगातील एक क्रांतिकारी आविष्कार आहे. याच्या अनंत शक्यता आणि संधींसोबतच, सायबर सुरक्षा आणि डेटा संरक्षणाच्या दृष्टीने काही गंभीर आव्हानेही निर्माण होत आहेत. आज जगभरातील तंत्रज्ञानाच्या प्रगतीला चालना देणारा AI एकीकडे उद्योग, शिक्षण, आणि वैद्यकीय क्षेत्रात मोठे फायदे देत असताना, दुसरीकडे सायबर हल्ल्यांना देखील नवा आयाम देत आहे. AI आणि बिग डेटा यांच्या परस्पर संबंधामुळे माहिती (डेटा)चे महत्त्व प्रचंड वाढले आहे, ज्यामुळे सायबर हल्ल्यांचे स्वरूपही बदलत आहे.

या लेखात, आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या वाढत्या प्रभावामुळे सायबरसुरक्षेत होणारे बदल, डेटा पॉयझनिंग, आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सायबर सुरक्षेसाठी घेतले जाणारे धोरणात्मक उपाय यांचा सविस्तर आढावा घेतला आहे. तंत्रज्ञानाच्या या बदलत्या प्रवाहात आपली सुरक्षा कशी वाढवावी, हे विचारात घेणे आता अधिक महत्त्वाचे बनले आहे.

येत्या काळात AI आधुनिक सॉफ्टवेअरचं केंद्रबिंदू होणार आहे, हे निश्चित आहे. याचा एकीकडे फायदा आहे, तर दुसरीकडे धोका देखील आहे. AI चा उपयोग सायबर हल्ले आणि सायबर सुरक्षा या दोन्ही गोष्टींसाठी केला जाईल. शिवाय, AI तंत्रज्ञानातील विशिष्ट त्रुटींचा फायदा घेऊन नवीन प्रकारचे सायबर हल्ले होण्याची शक्यता आहे. याशिवाय, AI ला प्रचंड प्रमाणात डेटाची आवश्यकता असल्यामुळे, डेटा संरक्षणाच्या बाबतीत आपल्या विचारसरणीत बदल होणे आवश्यक आहे. यामुळे, जागतिक पातळीवर सुज्ञ आणि जबाबदार नेतृत्व महत्त्वाचं ठरणार आहे, जे या तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून सर्वत्र सुरक्षितता आणि समृद्धी सुनिश्चित करेल.

AI आणि बिग डेटा

सोप्या भाषेत सांगायचं तर, AI म्हणजे संगणकाच्या साहाय्याने काही विशिष्ट कामांमध्ये मानवी बुद्धीची जागा घेण्याची प्रक्रिया. AI तंत्रज्ञान सध्या वेगाने प्रगत होतंय, अगदी विसाव्या शतकातील डेटाबेस तंत्रज्ञानाच्या वेगवान वाढीसारखं. आजच्या घडीला डेटाबेस उद्योगक्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण साधन बनलं आहे. उदाहरणार्थ, तुम्हाला पर्सनल लोन किंवा क्रेडिट कार्डसाठी फोन येतात? त्यांच्याकडे तुमची माहिती कशी येते? उत्तर म्हणजे, डेटाबेस. याच प्रकारे, पुढच्या काही दशकांत सॉफ्टवेअरच्या नवसर्जनात AI चं प्राबल्य असणार आहे.

गेल्या दशकात डेटाबेस तंत्रज्ञानात मोठा बदल झाल्यामुळे ‘बिग डेटा’ नावाचं नवीन फिनोमेनॉन अस्तित्वात आलं आहे. आजकाल डेटा सेट्स इतकी मोठी आणि जागतिक पातळीवर विस्तारलेली आहेत की, आपलं रोजचं जीवन ज्या संगणक प्रणालींवर अवलंबून आहे, त्यातूनच हा डेटा गोळा केला जातो. उदाहरणार्थ, यूट्यूबवर प्रत्येक मिनिटाला सुमारे ४०० तासांचा व्हिडिओ कंटेंट अपलोड केला जातो (स्त्रोत: ब्राउर २०१५).

AI आणि बिग डेटाचं एकमेकांशी घनिष्ठ नातं आहे. AI च्या अलीकडच्या प्रगतीचं श्रेय ‘मशीन लर्निंग’ या तंत्राला जातं. AI ला पूर्वनिर्धारित निर्देश देण्याऐवजी, त्याला मोठ्या डेटासेट्सच्या माध्यमातून शिकवलं जातं. उदाहरणार्थ, चॅटबॉट्सना मेसेजिंग ॲप्समधील मानवी संभाषणांच्या उदाहरणांवरून प्रशिक्षित केलं जातं, ज्यामुळे ते माणसांचं बोलणं समजून घेऊन योग्य प्रतिसाद देऊ शकतात (स्त्रोत: पांडा २०१८).

बिग डेटा म्हणजेच AI अल्गोरिदमसाठी कच्चा माल आहे, असं म्हणायला हरकत नाही. AI मोठ्या प्रमाणात जमा झालेल्या डेटातून पॅटर्न्स शोधून काढतो, जे मानवी बुद्धीच्या पलीकडे आहेत. उदाहरणार्थ, काही संशोधकांनी AI मॉडेल्सना व्यक्तीच्या फेसबुक पोस्ट्सवरून त्यांचं व्यक्तिमत्व ओळखायला शिकवलं आहे, ज्यामुळे AI तंत्रज्ञान त्या व्यक्तीला त्याच्या मित्रांपेक्षा अधिक चांगलं ओळखू शकतं (स्त्रोत: वू, कोसिंस्की आणि स्टिलवेल २०१५).

AI आणि सायबर सुरक्षा

आताच्या काळात सायबर हल्ल्यांचं प्रमाण वाढलेलं आहे, आणि त्यामुळे मोठं आर्थिक नुकसान होतंय. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मते, जागतिक वित्तीय क्षेत्रात दरवर्षी सुमारे $100 ते $250 अब्ज डॉलरचं नुकसान होतंय (स्त्रोत: लगार्ड २०१२). संगणक, मोबाइल डिव्हायसेस आणि स्मार्ट उपकरणांची संख्या वाढत असल्यामुळे, या हल्ल्यांचं प्रमाण दिवसेंदिवस वाढतंय. सायबर सुरक्षेच्या बाबतीत AI मोठ्या प्रमाणावर बदल घडवू शकतो.

AI चं मुख्य उद्दिष्ट म्हणजे माणसाच्या बुद्धीची गरज असलेली कामं स्वयंचलित करणं, ज्यामुळे कंपन्या कमी वेळेत आणि कमी संसाधनांत काम करु शकतात. उदाहरणार्थ, चॅटबॉट्स ग्राहकांच्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी वापरले जातात, आणि वैद्यकीय सहाय्यक AI रुग्णांच्या लक्षणांवर आधारित रोगांचा निदान

करण्यासाठी वापरला जातो.

सायबर संरक्षणासाठी AI कसा वापरता येईल याचं एक साधं मॉडेल असं सांगता येईल: सर्व्हर आणि नेटवर्क घटकांमधून आलेल्या लॉग ओळींना 'विरोधी' किंवा 'अनविरोधी' म्हणून लेबल केलं जाईल, आणि त्यानुसार AI प्रणालीला भविष्यकाळात येणाऱ्या निरीक्षणांना या दोन गटांमध्ये वर्गीकृत करण्यासाठी प्रशिक्षण दिलं जाईल. ही प्रणाली नंतर स्वयंचलितपणे सायबर हल्ल्यांचं निरीक्षण करू शकते आणि सामान्य कार्यक्षमतेच्या पार्श्वभूमीतून अयोग्य गोष्टींना हेरू शकते.

सध्याच्या युगात, सायबर सुरक्षा व्यवस्थापन फक्त AI च्या सहाय्याने शक्य होऊ शकतं. सायबर हल्ले अधिक गुंतागुंतीचे आणि वेगाने होत असल्यामुळे, त्यांचं व्यवस्थापन आता मानवी हस्तक्षेपाशिवाय शक्य नाही. भविष्यात, फक्त AI चा वापर करणारी तंत्रज्ञान प्रणालीच या आव्हानांना तोंड देऊ शकेल.

AI च्या सहाय्याने होणारे सायबर हल्ले

जसं AI सायबर सुरक्षा क्षेत्रात वापरला जातोय, तसंच हल्लेखोर देखील AI चा वापर करून त्यांच्या हल्ल्यांची पातळी वाढवत आहेत. हॅकर्स मोठ्या प्रमाणावर AI वापरून वैयक्तिक माहितीच्या आधारे सायबर हल्ले घडवू शकतात. स्पीअर फिशिंग हे त्यातलं एक प्रमुख उदाहरण आहे, ज्यामध्ये AI च्या साहाय्याने वैयक्तिक माहितीचा वापर करून फसवणूक केली जाते (स्त्रोत: ब्रुंडेज इ. २०१८).



शिवाय, AI चा वापर करून सॉफ्टवेअरमधील त्रुटी शोधून 'झिरो-डे व्हल्नरेबिलिटी' सारख्या त्रुटींचा फायदा घेतला जाऊ शकतो. याचा उपयोग कायदेशीर किंवा बेकायदेशीर हेतूंसाठी होऊ शकतो.

शेवटी, सायबर सुरक्षा आणि हल्ल्यांच्या क्षेत्रात AI तंत्रज्ञान नवीन आव्हाने आणि संधी दोन्ही आणत आहे. AI च्या विशिष्ट त्रुटींचा फायदा घेऊन सायबर हल्ले अधिक प्रभावी बनवता येतील. उदाहरणार्थ, 'डेटा पॉयझनिंग' किंवा 'अड्व्हर्सेरियल एक्झ्याम्पल्स' यासारख्या पद्धती वापरून AI प्रणालीला चुकीच्या पद्धतीने काम करण्यासाठी प्रवृत्त करता येईल (स्त्रोत: गेंग आणि वीरापनेनी २०१८).

डेटाचं नवं मूल्य

AI तंत्रज्ञान सायबर सुरक्षा क्षेत्रात बदल घडवेल कारण त्याला जास्त डेटा (माहिती) हवी असते. त्यामुळे अशी माहिती, जी आधी उपयोगाची वाटत नव्हती, ती आता हल्लेखोरांसाठी महत्त्वाची होईल. हल्लेखोर अशा माहितीवर लक्ष केंद्रित करतील जी आधी दुर्लक्षित होती.

काही सायबर हल्ल्यांचं उद्दिष्ट फक्त हानी पोहोचवणं किंवा गोंधळ माजवणं असतं, तर अनेक हल्ल्यांचं लक्ष्य महत्त्वपूर्ण गोष्टींवर असतं, जसं की बौद्धिक संपदा हस्तगत करणं. सायबर जगतातील हल्लेखोर दीर्घकालीन खेळ खेळत असतात, ते सध्या अनिश्चित उद्देशांसाठी डेटा मिळवण्याचा प्रयत्न करतात. AI प्रणाली अगदी साध्या डेटाचाही वापर करू शकते, त्यामुळे 'डेटा हूव्हरिंग' – जास्तीत जास्त माहिती गोळा करून भविष्यातील रणनीतिक वापरासाठी साठवून ठेवण्याचं तंत्र वापरलं जातंय, ज्याचा वापर सध्या स्पष्ट नसला तरी भविष्यात उपयुक्त ठरू शकतो.

न्यूयॉर्क टाइम्सच्या एका अहवालात या रणनीतीचं उदाहरण दिलं आहे (स्त्रोत: सेंगर इ. 2018). अहवालात नमूद केलं आहे की, चीनी सरकारनं मॅरियट हॉटेल चेनच्या 500 दशलक्षाहून अधिक ग्राहकांच्या व्यक्तिगत डेटाची चोरी केली आहे. डेटा चोरीबद्दल सामान्यतः सर्वाधिक चिंता ही वित्तीय माहितीच्या गैरवापराच्या संदर्भात असते, परंतु या प्रकरणात ही माहिती गुप्तहेरांना शोधण्यासाठी, त्यांच्या प्रवासाच्या सवयींवरून शोध घेण्यासाठी किंवा इतर गोष्टींसाठी व्यक्तींना ताब्यात घेण्यासाठी वापरली जाऊ शकते.

डेटा आणि AI यांचा परस्परांशी घनिष्ट संबंध आहे, कारण हे दोन्ही अमूर्त (abstract) आणि मूर्त (tangible) मालमत्तांना जोडून, त्यांचं एकत्रीकरण करून त्यांचं मूल्य उघड करतात. या दोन्ही घटकांना स्वतंत्रपणे विचारता येणार नाही. व्यवसाय, राष्ट्रीय सुरक्षा आणि अगदी २०१० मधील कॅम्ब्रिज अॅनॅलिटिका घोटाळ्यानं हे स्पष्ट केलं आहे की, राजकीय यशासाठी डेटा एक अत्यावश्यक घटक ठरू शकतो. मॅरियट डेटा लीक घटनेनं दाखवून दिलं की साधी आणि सामान्य वाटणारी माहिती देखील गुप्तचर यंत्रणा आणि राष्ट्रीय संरक्षणासाठी एक महत्त्वाची मालमत्ता ठरू शकते. याचं मुख्य कारण म्हणजे AI तंत्रज्ञानाच्या माध्यमातून या साध्या माहितीमधून महत्त्वपूर्ण निष्कर्ष सहजगत्या काढता येतात. त्यामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात डेटा गोळा करणं ही एक सामान्य गोष्ट आणि लक्ष्य बनण्याची शक्यता अधिक आहे.

धोरण आणि शासनासाठी परिणाम

तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे सायबर सुरक्षा धोरणांवर नव्याने विचार करण्याची गरज वाढली आहे. आजच्या

परस्पर जोडलेल्या यंत्रणा आणि प्रणालींमध्ये सर्वात कमजोर कडी शोधणे अधिक आव्हानात्मक झाले आहे, पण त्याचवेळी हे अत्यंत गरजेचेही ठरत आहे. सेन्सर, यंत्रं आणि माणसं AI प्रणालींसाठी महत्त्वाचे डेटा पुरवठादार बनत आहेत, ज्यामुळे सायबर हल्ल्यांचे प्रवेश बिंदू वाढतच जाणार आहेत. यासाठी तुकड्या-तुकड्यांचा दृष्टिकोन सोडून सर्वसमावेशक सायबर सुरक्षा धोरणांची आवश्यकता आहे. AI तंत्रज्ञानासाठी आवश्यक असलेला प्रशिक्षण डेटा विविध देशांमधून गोळा केला जात असल्यामुळे, केवळ राष्ट्रीय पातळीवरचे नियम हे पुरेसे ठरणार नाहीत.

जागतिक धोरणकर्त्यांनी आता AI तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावावर आणि त्याच्या सायबर सुरक्षेशी संबंधित परिणामांवर लक्ष केंद्रित केले आहे. 2018 मध्ये क्यूबेक येथे झालेल्या जी-7 शिखर परिषदेत AI चं शासन कसं करावं, यावर चर्चा झाली आणि सायबर सुरक्षेसाठी योग्य गुंतवणूक करून 'माणसाकेंद्रित AI' चा पाठिंबा देण्याचं वचन दिलं गेलं. मशीन लर्निंगसाठी वापरल्या जाणाऱ्या डेटाच्या गोपनीयतेचा आणि व्यक्तिगत माहितीच्या संरक्षणाचा मुद्दा येथे महत्त्वाचा होता.

AI तंत्रज्ञान स्पीअर फिशिंगसारख्या अस्तित्वात असलेल्या सायबर हल्ला तंत्रांचा वापर अधिक प्रभावीपणे करू शकते. त्यामुळे अधिक लोकांना अशा प्रकारचे हल्ले करण्याची क्षमता मिळू शकते, ज्यामुळे सायबर सुरक्षेसाठी जागतिक पातळीवर प्रभावी शासन आणि आंतरराष्ट्रीय डेटा संरक्षणाच्या दिशेने प्रयत्नांना वेग येईल. संयुक्त राष्ट्रांसारख्या संस्थांनी सायबर सुरक्षेसाठी आचरणाचे निकष ठरवण्याचा प्रयत्न केला आहे.

AI तंत्रज्ञान सायबर हल्ल्यांसाठी धोकादायक ठरू शकते, परंतु ते सायबर सुरक्षा बळकट करण्यासाठी देखील उपयोगी ठरू शकते. जरी AI तंत्रज्ञानामुळे गोपनीयतेस धोका निर्माण होतो, तरी त्याच वेळी AI गोपनीयता जपण्यास आणि मालकी हक्काच्या डेटावर नियंत्रण ठेवण्यासाठी देखील सहाय्य करू शकते. धोरणकर्त्यांनी तंत्रज्ञानाच्या वापराचं नियमन करताना नवकल्पनांना रोखू न देता, हानिकारक घटकांकडे हे शक्तिशाली तंत्रज्ञान पोहोचणार नाही याची काळजी घेणं आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर असलेल्या या धोरणांना एकत्र आणणं महत्त्वाचं ठरत आहे, कारण सायबर हल्ल्यांचे धोकादायक घटक सीमापार सहजपणे पोहोचू शकतात.

यासोबतच, AI तंत्रज्ञान सामान्य नागरी आणि आर्थिक क्षेत्रात अधिक गुंतत असताना, विद्यमान कायदेशीर फ्रेमवर्कमध्येही समायोजनाची गरज निर्माण झाली आहे. डेटा पॉयझनिंग आणि अड्व्हर्सेरियल उदाहरणे यांसारख्या नवीन प्रकारच्या सायबर हल्ल्यांचा विचार करून कायद्यात बदल करणं आवश्यक आहे. आतापर्यंत सायबर जगतातील मुख्य चिंता डेटा चोरी होती, पण भविष्यात हानिकारक घटक डेटामध्ये प्रवेश करून त्यातील माहिती बदलण्याचा किंवा त्याचे व्यवस्थापन करण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे सायबर हल्ल्यांची व्याख्या सुधारून त्यात या नवीन धोक्यांचा समावेश करणं गरजेचं आहे.

AI तंत्रज्ञान डेटा वापरून मौल्यवान भविष्यवाणी साधन तयार करतं, आणि त्याचं आउटपुट मूळ प्रशिक्षण डेटापासून स्वतंत्र असू शकतं. म्हणूनच डेटावर नियंत्रण ठेवण्यासाठी, त्यातून निर्माण झालेल्या मालमत्तांवरही नियंत्रण असणं गरजेचं आहे. तंत्रज्ञानाच्या सुरक्षेसाठी शासन संस्थांना सतत त्यांच्या धोरणात सुधारणा करावी लागेल, विशेषत: ओळख चोरीसारख्या क्षेत्रांमध्ये. कारण AI सॉफ्टवेअर जलदगतीने विकसित होऊ शकतं, त्यामुळे सायबर सुरक्षा हे एक सतत चालणारं काम आहे, आणि यासाठी केवळ एकदाच केलेली गुंतवणूक पुरेशी ठरणार नाही.

सारांश:

AI तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे सायबर सुरक्षा धोरणांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. पूर्वीपेक्षा अधिक डेटा आता मौल्यवान ठरत आहे, आणि त्यामुळे सायबर हल्ल्यांचे धोकादायक प्रकारही वाढले आहेत. अशा परिस्थितीत तुकड्या-तुकड्यांचा दृष्टिकोन न घेता सर्वसमावेशक आणि जागतिक पातळीवर धोरणं आखणं आवश्यक ठरलं आहे. जागतिक संस्थांनी याकडे लक्ष दिलं असून, सायबर सुरक्षेसाठी आंतरराष्ट्रीय नियम बनवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

AI तंत्रज्ञान फक्त धोकादायकच नाही, तर गोपनीयता आणि सुरक्षा जपण्यासाठीही महत्त्वाचं ठरू शकतं. तंत्रज्ञानाच्या योग्य नियमनाशिवाय नवकल्पनांना रोखल्यास धोके वाढू शकतात. सायबर सुरक्षा धोरणांसाठी सतत सुधारणा करणे आवश्यक आहे, कारण सायबर हल्ले वेगाने विकसित होत आहेत, आणि त्यांना रोखण्यासाठी जागतिक स्तरावर समन्वयित प्रयत्नांची गरज आहे.

**श्री. अभिषेक ठमके**
**डोंबिवली**
**मो. 9768650098**

# तू नसताना मी...



अगदी परवाचीच गोष्ट. पाहुणे आलेले घरी. मस्त गप्पा रंगल्या मधेच  एकेकजण झोपायला गेला. शेवटी मी स्वयंपाकघरात डोकावून आत जावून बघते तो काय, सगळे ढाराढूर. मला हि खूप झोप आलेली,पण माझी उशी कुणीतरी घेतलेली. सहज मनात बोलून गेले, “ अगं उशी गं उशी, तू नसताना मी झोपू तरी कशी?”

जसं उशीच तसं कितीतरी होतंच. सवयीचे गुलाम आपण, दुसरं काय. हातात मोबाईल नसेल तर अस्वस्थ होतातच. गाडी  एखादे दिवशी सर्व्हिसिंगला दिली कि लगेच, गाडी नसताना मी जाऊ तरी कशी? इतर वाहने, रिक्षा, बस, लोकल आहे ना, आणि नसेल सोयीस्कर तर दोन पाय आहेतच की शाबूत. पण छे, पडणार नाही बाहेर. घरात, लाईट नाही म्हणजे टीव्ही, इंटरनेट, laptop नाही. करमणार कसं?

खरं तर माणूस येताना एकटा येतो, आल्यावर गोतावळा गोळा करीत फाफट पसाऱ्यात जगतो. प्रत्येकात कणकण जीव अडकतो म्हणूनच उठताबसता म्हणतं राहतो. “पेपर नाही टाकला, उठल्याउठल्या चुकल्यासारखं झालं.” “गॅस नाही स्वयंपाक कसा करु?” “दूधच नासलं आज, चहा कसा मिळणार?”

“ अरे,अरे, मिठा, तू नसताना मी भाजी गिळू तरी कशी?” आहे ना गंमत. अडकावं कशाला इतक्या सर्वत्र? थोडं खुट्ट झालं कि बिनसलं. इतक्या वर्षांची जुनी सवय अशी थोडीच मोडणार.

अशी या निर्जीव वस्तूंमध्ये अडकणारी आपण माणसे, आपापसात गुंतलो नाही तरच नवल. बाळाला

पंहिल्या श्वासालाच भेटतात सगळी नाती. वाढत्या वयाबरोबर नातीही फुलतात. आई करते,

“बुवा ऽ ऽ कू.. क!” तोंडावर धरलेला आपलाच हात. बाळाचा चेहरा कावराबावरा. जणू म्हणतं, “आई गं, तू नसताना मी...आं आं आं ऽ.” किती अल्पावधीसाठी हात धरला चेहऱ्यावर. इथे लहानग्याला आई नसतानाची भावना रडायला लावते. असं का होतं? कुठेतरी गुंतलेला धागा अडकतो, तुटेल अशी भीती वाटते, रडू कोसळतं.

खरं पाहता, कोणाचंच कोणावाचून काहीही आडत नाही. थोडा वेळ, काही दिवस अनुपस्थिती जाणवते. हळू

हळू आपोआप सगळं सुरळीत होते. परंतू, त्या मधल्या काळातील मनाची  अस्वस्थता असह्य भयानक होते. वास्तव स्वीकारले जात नाही. आपल्या आयुष्यातील महत्वाचे क्षण वाया घालवले जातात इतकंच. काळ हेच सर्वांवर औषधं असल्याने, कालांतराने पडदा पडतो. थोड्या दिवसांसाठी, किंवा कायमस्वरूपी गेलेल्या व्यक्तीचे स्थान मनातल्या मनात अबाधिक राहू शकते. फक्त जागा बदलते. आधी वावर होता,

सहवास होता, आता फक्त मनातल्या कोपऱ्यात निवास उरला. असं मनाला समजवलं तर म्हणता येते. “तू नसल्याची  भावना मला बोथट करता येत नाही, फक्त त्या भावनांबरोबर हिंदोळायाचं नाही असं ठरवलं मी आणि पूर्वीसारखे वागू लागले.” अगदी चांगला आहे हा विचार. नसलेल्यासाठी आपलं आयुष्य पणाला लावायचं नसतं. भूतकाळातील आठवणींमुळे वर्तमानातला क्षण सोडायचा नसतो. आपल्यालाही मोजकेच श्वास दिलेले आहेत, याच भान ठेवून समोरचा क्षण जिवंतपणे स्वीकारला की धीर वाढतो, क्लेश जाणवत नाहीत.  अशीच व्यक्ती म्हणू शकते, “तू असताना मी एक झंझावाती वादळ होते, तू नसतानाही तशीच आहे. जेंव्हा केंव्हा वादळ  शमतं तेंव्हा थकून भाकून तुझ्याजवळ विसाव्याला येतं हे नक्की.”

तर काहींच्या बाबतीत भयानक घडतं. अवास्तव अपेक्षा, स्वत:बद्दलचा ओव्हर कॉन्फिडन्स, बेफिकीर वृत्ती ताब्यात ठेवणं जमतंच असे नाही. हवं ते मिळवण्यासाठीची हट्टी मन वाट्टेल त्या मार्गाने धडपड करतं. काय सांगा अशावेळी वाईट मार्गाने पाहिजे ते मिळवताना कोणाची पर्वा केली जात नाही. माणुसकीला काळिमा नुसता. वाचताना हळहळतात सगळे, “ एकतर्फी प्रेमात, ती नसताना मी जगूच शकत नाही, ती माझी नाही तर कोणाचीही  नाही. प्रेयसीचा खून आणि आत्महत्या ” किती ही अमानुषता.

कधी काय होईल सांगता येत नाही. क्वचित एखाद्याचं नसणे सार्वजनिक होऊ शकतं. हेच पहा ना. आपल्या सचिनने क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आणि तमाम भारतीयांना क्रिकेटची काळजी पडली. शेजारच्या नंदूने तर सचिनला इमेल केला, “तू नसताना मी मॅच बघू शकणार नाही. मला ती शिक्षा वाटेल.”

कोण एका घरी काय झालं सांगते. रेखा, हुषार आणि करिअरिस्ट. तिला अधूनमधून जावं लागायचं बाहेर परगावी किंवा परदेशात सुद्धा. जाताना तिच्या आपल्या सूचनांवर सूचना हे नेहमीचच झालं. तेंव्हा शशांक, तिचा नवरा तिला म्हणाला, “तू नसताना माझी मुलांशी मस्त ए वन मेतकुट जमलं. वेव्ह लेंध जुळल्याने मोकळेपणा आला नात्यात. नाहीतर आई असायचीच मध्येमध्ये. बघशीलच, तू नसताना मी कसं छान मॅनेज केलं घर. अर्थात तुझी आठवण पदोपदी. गप्पात तूच. तुला सांगतो, गरज असेल तेंव्हा तू जात जा. तुलाही तुझं करिअर आहेच की. तुझी वाट बघत आहोत सगळे.”

स्त्रीयांना इतकी मोकळीक देऊन करिअर करताना साथ देणारे थोडेच आहेत.

माणसांचा एकमेकांचा सहवास प्रत्येकाच्या मानसिकतेवर, परीपक्वतेवर, विचारधारेवर परिणाम करतो. थोड्या काळाचा दुरावा देखील बोलून जातो. बाई वर्गात नसताना कुठल्याच शाळेतली मुले वर्गात शांत बसत नाहीत. ऑफिसमध्येही तेच चित्र. बॉस खडूस असेल तर बाहेर जायची वाट बघतात सगळेजण, आणि तो जाताच सुटतात एकामागून एक. शाळा, ऑफिस, घर फरक काहीच नाही. घरात सुद्धा बाबांचा धाक इतका की, ते यायच्या वेळेला एकदम चिडीचूप होते, मुलं अभ्यासाला बसतात, ती कामात गर्क असते. अशाने घराचे स्पष्ट चित्र बाबांना कळतच नाही.

एखाद्याच्या आयुष्यात 'तू नसताना' सुखावह होते. आमची कामवाली खूप कष्ट करायची. शिवाय मार

खायची. तो गेला आणि सहज सखुबाई बोलली परवा, "गुरावाणी बडवायचास मला. लाथा बुक्यांनी मारलस. मी आणि पोरं नुसती रडयाचोत. तुला यायचा चेव. का रडता म्हणतं लाथा घालायचास कंबरेत. मुड्या मेल्या, नरकात गेलास. आता, तू नसताना मी मजेत आहे. मी, माझी मुलं, माझं घर सारे सुखात आहोत. आनंदोत्सव साजरा करतो आम्ही." किती वाईट बोलते. पण सत्य आहे. सहनशीलतेलाही मर्यादा असतातच. सुटली सखुबाई कायमची. लोकं असं का वागतात, आपल्याच बायकोशी?

अशी ही नाती आणि त्यांचे घट्ट जाळे. नात्यानात्याचे धागे भक्कम असतात, म्हणून तर सगळं कसं सुरळीत होतं आयुष्यात. एखादा धागा सैल पडला, तुटला, निसटला तर जाळ्याची विण कमकुवत होते,

कुरकुरू लागते. टांगणीला लागतो जीव. सगळेच अनुभवतात हे असलं जीणं. हा नियम सगळ्यांना सारखाच. प्रसंगात बदल आणि वस्तू किंवा व्यक्ती वेगवेगळी. तो, ती, आणि ते नसताना मी नीट राहू शकत नाही, एव्हढेच. जवळ असताना किंमत कळत नाही, दूर गेल्यावर चैन पडत नाही. बरोबर जगताना, प्रेम करायचं, समजून घ्यायचं, चुकलं तर माफ करायचं असतं. त्याऐवजी आपलाच अहं कुरवाळत बसतात सगळे. नंतर स्वत:चा रागराग करीत जगतात. येणारा जाणारच कधीतरी. भेटलेला दुरावणारच. आपलं वागणं तर असतं आपापल्या हातात. गेलेले-दुरावलेले मनात असतात ठाण मांडून. त्यांनाच विचारायचं, "तू नसताना मी काय कसं करू?"

अवघड असतं आपल्या माणसाला सोडून राहणं. आपलं म्हंटल की नाते कुठलेही असो. तरीही पतीपत्नीच्या नात्यात मागे उरलेल्याची हालत फार वाईट होते. कोण पुढे जाणार यांत शर्यत लागते. माझ्या विना तू कसा राहशील, तुझे कोण काय बघेल, ही विवंचना छळते आतल्याआत. कशी सांगावी ती कुतरओढ ? माझ्याच एका कवितेसारखी तर असते ती. बघा जरा, पटते कां?

संसाराचा किती वर्षं खेळला त्यांनी सारीपाट
तरीपण दोघांना जाता येत नाही पाठोपाठ
" तू थांब मागं, मला जावं लागेल पुढं"
दोघेजण दामटत होते आपलं आपलं घोड.
देवाच्या हिशोबी दोघांचेही हिशोबच वेगळे
बेरीज, वजाबाकी, गुणाकार करून उरलेल्याला भागलं
ज्याचं गणित बरोबर त्याला अलगद उचललं
खूप विचार केला, वाटलं सारकाही संपलं.
रडलं, भाकलं, ओरडलं, आरडलं नंतर मात्र स्थिरावलं
पुढे गेलेल्याला काय वाटेल? मीच मनाला दटावलं
तेंव्हा कुठे माझं मला थोडाफार उमजलं
"तू नसताना मी," आहे त्यातच सूख मानायचं ठरवलं.

**सौ.वंदना धर्माधिकारी**
**पुणे**
**मो. 9890623915.**

# जागतिक कीर्तीचे समीक्षक आणि लेखक मंगेश विठ्ठल कोळी द्वारा लिखित

## व्यक्तिमत्व विकास आणि सकारात्मक जीवनासाठी सर्वोत्तम पुस्तके

### सकारात्मक विचारातून पूर्णत्वाकडे नेणारी खालील पुस्तके स्वतःसाठी घ्या/आपल्या मित्र–मैत्रिणींना भेट द्या.

























- कवितासागर प्रकाशन द्वारा प्रकाशित वरील आठ पैकी केवळ चार पुस्तकांचे मर्यादित संच स्टॉक असेपर्यंत उपलब्ध.
- २७०/– रुपये मूळ किंमतीचा चार पुस्तकांचा संच घरपोच मिळवा केवळ **२५०/–** रुपयात
- एकापेक्षा अधिक संच घेतल्यास १०% सवलत दिली जाईल.
- पोस्टेज / वाहतूक खर्च वेगळा आकारला जाणार नाही; संपूर्ण भारतात कोठेही **फ्री होम डिलिव्हरी.**
- मागणी सोबत संपूर्ण रक्कम मनीऑर्डर / डिमांड ड्राफ्ट / ॲट पार चेक द्वारा **कवितासागर** या नावाने द्यावी.

---

**कवितासागर प्रकाशन**, जयसिंगपूर – ४१६१०१, तालुका – शिरोळ, जिल्हा – कोल्हापूर, महाराष्ट्र, भारत

संपर्क : ०२३२२ २२५५००, ९९७५८७३५६९, ८४८४९८६०६४, ईमेल – sunildadapatil@gmail.com

Details of our Bank Account's for Direct Transfer NEFT / RTGS or Cash Deposit:
Account Name - **Kavita Sagar** Bank Name - **Canara Bank**Branch **- Jaysingpur**
Account Number - **5034201000046** IFSC Code - **CNRB0005034** MICR **- 416015506**

---

- 'कवितासागर प्रकाशन'कडून वैविध्यपूर्ण विषयांवर वाचनीय आणि दर्जेदार पुस्तके प्रकाशित केली जातात.
- आपले, नाव, पत्ता, फोन नंबर, ईमेल आम्हांला SMS करा आणि आमच्या पुस्तकांची सूची विनामूल्य घरपोच मागवा.
- संशोधनपर ग्रंथ आणि शोधनिबंध ISBN / ISSN च्या अंतर्गत प्रकाशनाची सुविधा उपलब्ध.
- आमच्या संस्थेमार्फत खालील ISSN मान्यताप्राप्त जर्नल्स प्रकाशित होतात.

**ISSN 2349 - 0446 Kavita Sagar - An International Journal for Poetry and Book Reviews**
**ISSN 0973 - 7235 Knowledge - An International Journal for Education and Research**
**ISSN 0973 - 869X Glory of God - An International Journal for Spirituality and Health**
**ISSN 0974 - 5564 Divine Plan - An International Journal for Literature and Culture**
**RNI # TC - MAHMUL 03484 -Weekly - Kavita Sagar**
**RNI # TC - MAHENG 11453 -Quarterly - Divine Plan**

ACTIV ONE MAX

Active One पॉलीसी मध्ये पहिल्या दिवसापासून ७ दीर्घकालीन आजार कव्हर करणारी एकमेव मेडिक्लेम पॉलिसी...
आदित्य बिर्ला हेल्थ इन्शुरन्स

ADITYA BIRLA CAPITAL

# आरोग्य विमा (मेडिक्लेम) काळाची गरज

## एकदाच हेल्थ इन्शुरन्स चा प्रीमियम भरा आणि पुढील प्रीमियम मध्ये १००% डिस्काउंट मिळवा

# Health Returns™

### सात महत्वाचे आजार पहिल्या दिवसा पासून कव्हर भारीच ना!

* दमा
* कोलेस्टेरॉल
* COPD फुफुसा संदर्भात होणारे आजार
* बी.पी./रक्तदाब
* डायबेटिज/मधुमेह
* ओबेसिटी / लठ्ठपणा
* अँजीओप्लास्टी

## आदित्य बिर्ला हेल्थ इन्शुरन्स

### इतर उत्तम सुविधा

1. फॅमिली फ्लोटर पर्याय
2. रुम भाड्यावर कोणतेही कॅपिंग नाही
3. सुपर क्रेडिट
4. १००% आरोग्य परतावा (पुढील हफ्त्यात)
5. सुपर री - लोड - २रा दावा पासून
6. आयुष उपचार
7. वयाचे बंधन नाही
8. वार्षिक आरोग्य तपासणी
9. ॲडमिट होण्या आधीचे ९० दिवस आणि नंतरचे १८० दिवस खर्च
10. सर्व डे केअर उपचार
11. आय.सी.यु. कोणतीच मर्यादा नाही.
12. AYUSH ट्रिटमेंट (आयुर्वेद, योगा,युनानी,सिध्दी, होमिओपेथि)
13. मानसिक आजारसुध्दा कव्हर
14. अवयव प्रत्यारोपण खर्च (कोणतीच मर्यादा नाही पूर्ण रक्कम वापरू शकता)
15. रोड ॲम्ब्यलन्स तसेच एअर ॲम्ब्युलन्सचा पण खर्च आणि इतर सर्व सुविधा

### रिफिल रीस्टोरिशन वारंवार अमर्यादित

जर आपले एका वर्षात क्लेम आले आणि पॉलिसीची पूर्ण रक्कम वापरली. मागे काही उरले नाही आणि पुन्हा त्याच वर्षात अजून दुसरा क्लेम आला आणि तेवढीच रक्कम पुन्हा लागत असेल तर पुन्हा आपल्याला तेवढीच रक्कम देण्यात येईल आणि ही प्रक्रिया वारंवार चालूच राहील. (No Limit, Unlimited Restoration) विशेष म्हणजे कोणतेही अधिकचा प्रमियम भरण्याची गरज नाही भारीच ना !

**दरवर्षी क्लेम येवो अथवा न येवो दरवर्षी १००% ते ५००% पर्यंत वाढेल**

म्हणजे येणाऱ्या पाच वर्षात ही पॉलीसी ५० लाखाची होईल आणि प्रिमियम वयोगटानुसार राहणार

**भारीच ! ना !**

ई.एम.आय.ची पण सुविधा उपलब्ध भारीच ना !


अधिक माहितीसाठी संपर्क

**भुषण शेवडे**

ABH - 11108571

Mo. No. 8390888275


➤ हेल्थ रिटर्न, दररोज १०,००० पावलं चाला आणि पुढच्या वर्षाचे प्रीमियम भरण्याची गरज नाही. फक्त पॉलीसीमधील जी.एस.टी. भरा.